VOLUME 5 ISSUE 9 SEPTEMBER 2020

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# *MODLIB* *E-Bulletin of Library and Information Centre*

## *On the occasion of Teacher's Day on 05th September….*

**Published by :**

**Dr. Rajendra S. Zunjarrao,**

**Principal,**

**MCASC (Autonomous) ,**

**Shivajinagar, Pune-05.**

**Editor :**

**Dr. Shantashree Sengupta,**

**Librarian.**

**Editorial Assistant :**

**Mrs. Sarika Sable**

**Website :**
http://www.mcasclib.com/

**E-mail :**

libraran@moderncollegepune.edu.in




**मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगरचे प्राचार्य मा. डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी शिक्षकदिनानिमित गुरूजनांच्या चरणी अर्पण केलेले हे काव्यपुष्प. 🙏🙏**

# Table of Contents


| Sr. No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Work of Appreciation by– *Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir and Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam* | 4-5 |
| 2 | Interview of Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir - कोरोना: काही शंका, प्रश्न आणि उत्तरे | 6 |
| 3 | *Online Guidance Session of Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir for Non-teaching Staff of Schools and Colleges of Progressive Education Society* | 7 |
| 4 | Work of Appreciation– *Distribution of Sewing Machines to needs persons by Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam* | 8-11 |
| 5 | *Heartiest Congratulations– Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam* | 12 |
| 6 | 'शांतीचा दरवळ'- *Marathi Poem by Principal Dr. R.S.Zunjarrao Sir* | 13 |
| 7 | अरुणिमा: हिंदी दिवस २०२० विशेषांक | 14-16 |
| 8 | Events conducted by NSS | |
| | *- Teachers Day* | 18 |
| | *- World Literacy Day* | 19-20 |
| | *- World Ozone Day* | 21-23 |
| | *- NSS Day* | 24-25 |
| 9 | Events conducted by Department of German | |
| | *- European Day of Languages* | 27 |
| | *- Extra Curricular Activities (Meme, Picture Write-it, Sanity Insanity, Poet Act-It)* | 28-33 |
| 10 | Events conducted in the Library | |
| | *- Raje Umaji Naik Jayanti* | 34 |
| | *- Pandit Deendayal Upadhyay Jayanti* | 35 |

# *Table of Contents*


| Sr. No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 11 | **Activities conducted by Modern Media Station** | |
| | *- मॉडर्न व्याख्यानमाला २०२० on Gender Equality* | 37 |
| 12 | **Webinars organised** | |
| | *- Online Induction Session by MCASC, Shivajinagar,Pune-5* | 39-40 |
| | *- Two Days Faculty Development Programme on Conduction of Science Practicals (Online)* | 41 |
| | *- How to Develop Effective MCQs and Tips for Conducting Online Examinations* | 42 |
| | *- आधुनिक मराठी कवितेतील मानवतावादी प्रवाह by Department of Marathi* | 43 |
| 13 | *Faculty Members Invited as Resource Persons* | |
| | *- Prof. Dr.Prerna Ubale, Head, Department of Hindi* | 45-46 |
| | *- Prof. Manisha Mandhare , Department of Botany* | 47 |
| 14 | *Modern Achievements* | |
| | *- Prof.Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi* | 48 |
| | *- Prof. Manisha Mandhare , Department of Botany* | 49 |
| | *- Dr.Ujjwala Dixit, First Student to get Ph.D from Research Centre, Department of Marathi, MCASC,Pune-5* | 50 |
| | *- Shri. Surendra Sable, Police Naik, Unit IV, Crime Branch Pune* | 51 |
| | *- Dr. Rahul Panat* | 52 |
| 15 | *Newspaper Clippings* | 54-217 |
| 16 | *Shraddhanjali* | 218 |
| | *- Prof.Nirmala Mone* | |
| | *- Shri.Mukundrao Godbole* | |
| 17 | *Upcoming Events* | 219 |

## *Work of Appreciation by*
## *Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir and Prof.Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*




**आदरणीय,**
**डॉ. एकबोटे सर,**
**कृतज्ञतापूर्वक सप्रेम नमस्कार.**

सर, मी आजपर्यंत आपले आश्वासक विचार ऐकत आलो आहे, परंतु त्याची प्रत्यक्ष प्रचिती मला अलीकडील काही दिवसांत आली.

सर, आपण स्वतः आणि सौ. वहिनीसाहेब आपल्या 'प्रोग्रेसिव्ह' परिवारातील प्रत्येक कर्मचाऱ्याबाबत किती संवेदनशील आहात याचा प्रत्यय माझ्यासारख्या सर्वसाधारण कार्यकर्त्याला आला.

एक-दोन दिवसांच्या फरकाने माझ्या कुटुंबातील मुलगा आणि पत्नी, दोघांचेही रिपोर्ट पॉझिटीव्ह आल्यामूळे मी पूर्णपणे कोलमडून गेलो होतो. या कठीणप्रसंगी मी सर्वप्रथम आपल्याला फोन केला तेंव्हा अत्यंत भावनिक झाल्यामूळे मला फोनवर बोलताही येत नव्हते.पण आपण मला खंबीरपणे धीर दिला आणि माझ्या मुलाचे शाश्वत हॉस्पिटलमध्ये ॲडमिशन करुन दिलेत.या प्रसंगी सौ. वहिनीसाहेबांनी देखील मला धीर दिला आणि लागेल ती मदत करण्याचे आश्वासन दिले.त्यावेळी खरोखरच आपण एकटे नाही याची जाणिव मला सर्वप्रथम झाली.

सर, आपण आणि वहिनीसाहेब दोघेही माझ्या पाठीशी खंबीरपणे ऊभे राहिलात, केवळ आपल्यामूळेच प्रथम माझ्या मुलाला आणि त्यानंतर चार-दिवसांनी पत्नीचा रिपोर्ट आल्यानंतर पत्नीलादेखील शाश्वत हॉस्पिटलमध्ये ॲडमिशन मिळणे शक्य झाले.

हॉस्पिटलमधे प्रथम मुलगा आणि त्यानंतर पत्नी ॲडमिट असताना आपण वेळोवेळी उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी संपर्क साधून मुलाच्या व पत्नीच्या प्रकृतीविषयी जाणून घेत होतात त्याचवेळी मला फोन करुन माझ्या कोलमडून गेलेल्या मनाला आधार देत होतात.

या कालावधीत सौ. वहिनीसाहेबांनी देखील वरचेवर फोन करुन माझी व माझ्या कुटूंबाची आस्थेने, आपुलकीने चौकशी केली आणि आवश्यक असेल ती सर्व मदत करण्याचे आश्वासन मला दिले त्यामूळे मी स्वतःला सावरु शकलो.

सर, मुलाच्या आणि पत्नीच्या आजारपणाच्या पहिल्या दिवसापासून अद्यापपर्यंत आपण आस्थेने, वडीलकीच्या नात्याने माझ्या कुटूंबाची चौकशी करीत आहात, आंम्हाला मार्गदर्शन करीत आहात, त्यामूळेच आमचे कुटूंब या कठीण प्रसंगातून बाहेर पडत आहे.

सर, आपण आणि सौ. वहिनीसाहेब दोघेही नेहमीच संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या अडचणीच्या प्रसंगी, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहता हे मी आत्तापर्यंत ऐकून होतो परंतु त्याचा प्रत्यक्ष अनुभव मला मागील वीस दिवसांपासून रोज येत आहे.

सर, आपण एक संस्थाप्रमुख असूनही माझ्या कुटूंबासाठी तसेच संस्थेतील इतर सर्व कर्मचाऱ्यांच्या अडचणींच्या प्रसंगी जे सहकार्य करीत आहात, महत्वाचे म्हणजे सर्वांना आधार देण्याचे काम आपण करता तशाप्रकारचे सहकार्य इतर कोणत्याही संस्थेत होत नाही हे मी ठामपणे सांगू इच्छितो.

मी आपल्यासारख्या वंदनिय, पितृतुल्य संस्थाचालकाच्या मार्गदर्शनाखाली 'प्रोग्रेसिव्ह' संस्थेत काम करीत आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.

आदरणीय डॉक्टरसाहेब मी आपणांस कृतज्ञतापूर्वक वंदन करतो.

**आपला ऋणांकित,**
**श्री. उध्दव खरे.**

## *Work of Appreciation by*
## *Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir and Prof.Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*

2020 SEPTEMBER ॥ ३०॥ WEDNESDAY 09

[वेळ : सायंकाळ - 5.30]

सौ. कल्पना उद्धव खरे
9/9/2020.
पुणे.

वंदनीय, पितृतुल्य, तीर्थस्वरूप डॉ. एकबोटे सर,
यांजप्रति कल्पनाचे शतशः वंदन !

माणसातील देवत्वाचे दर्शन घडून येण्यासाठी वेळ यावी लागते, निमित्त घडावं लागतं. ते देवत्वाचे दर्शन तुमच्या कृपाने मला घडलं. अक्षरशः दैवी प्रचिती. परमेश्वराप्रति मी श्रद्धा बाळगून आहे. पण "स्वामी समर्थांविषयीची" प्रथम प्रखर जाणीव मला शाश्वत हॉस्पिटलमध्ये अंतर्बाह्य झाली. आपण जे जे 'मार्गदर्शन' केले जो आधार दिला, खरे सरांच्या फॅमिली मागे पहाडासारखे ठाम उभे राहिलात हे सारं स्वामीप्रेरित होतं, असं माझ्या प्रत्ययाला आलं.

शाश्वत हॉस्पिटलचं नाव सुचवणं, माझ्या मुलासाठी, माझ्यासाठी तेथे उत्तम व्यवस्था करणं, तेथील प्रशासनाशी, डॉ. पेनुरकरांशी सतत संपर्क ठेवून updates घेणं, त्यांना योग्य त्या सल्ला, सूचना देणं माझा C. T. Scan Report पडताळून पाहून इंजक्शन्सची संजवीज करणं एवढंच नाहीतर सतत माझ्या कोलमडलेल्या मनाला धीर देणं, त्याचं मनोधैर्य उंचावणं ..... हे सारं पाहत, अनुभवत असताना मन, अंतःकरण गहिवरून आले. मनात आलं, ज्या ठिकाणी आपल्या मिस्टरांनी सेवा केली ती संस्था, आणि त्या संस्थेला हिमालयाच्या उंचीवर नेणारे आणि पुण्यभूमी करणारे एकमेवाद्वितीय डॉ. एकबोटे सर ! एवढा मोठा प्रचंड संस्थेचा विस्तार असताना संस्थेतील प्रत्येक व्यक्तीकडे एखाद्या कुटुंबप्रमुखाप्रमाणे लक्ष देणे ...खरोखरंच आजच्या व्यावहारिक आणि माणूसकीशून्य बनत चाललेल्या युगात अचंबीत, नवलाची पण सुखद भावना वाटणारी अमूल्य गोष्ट आहे.

PTO

| SEPTEMBER 2020 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Mo | Tu | We | Th | Fr | Sa | |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | |
| 28 | 29 | 30 | | | | |

Scanned with CamScanner

10 THURSDAY SEPTEMBER 2020

254-112

आपल्यातील 'मोठेपणाचा' प्रत्यय, अनुभव आम्हीवारंवार, हरघडी घेत आलेलोच आहे. पण आपल्यातील 'दैवी व्यक्तित्वाचे' अलौकिक दर्शन याच संकटाने मला दाखवून दिले. स्वामी समर्थ माऊली आपल्या ठायी अवतरली आणि तिने हात दिला, साथ दिला हे माझ्या हृदयीचे बोल आहेत.

आज आपल्याकडे एवढी मोठी पदांची पदव्यांची, पुरस्कारांची बिरुदावली आहे, नामावली आहे यातून एकच आणि एकच सिद्ध होतं, आपण एक अत्यंत 'उत्कृष्ट माणूस' आहात आणि हे सर्वश्रेष्ठ नातं आपल्याला सर्व जगाशी जोडतं.

अधिक लिहिण्याकरिता साठी माझ्याकडे शब्द नाहीत मन फक्त भावनेनं ओतप्रोत भरलेलं आहे जे शब्दांमध्ये मावू शकत नाही. पत्र लिहिण्यास मला संकोच वाटत होता. पण माझा भावनावेग मला अडवता आला नाही. काही माझ्याकडून चुकल्यास क्षमस्व !

सर, शेवटी एकच तुम्हाला आणि तुमच्या संपूर्ण कुटुंबियांना परमेश्वर उदंड आयुष्य, आरोग्य, ऐश्वर्य, शांती देवो !

आपली ऋणाईत,
सौ. कल्पना खरे.

Notes (9/9/2020)

Scanned with CamScanner



# Interview of Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir

*कोरोना आजाराबाबत गंभीर होणे गरजेचे आहे. सतत मास्क लावा. ३० सेकंद हात धुवा. एकट्याने दिनक्रम पार पाडण्याची सवय लावून घ्यावी. स्वतःची कामे स्वतःच करण्याची सवय लावा. ही शिस्त पाळली तरच कोरोनातून बचाव होऊ शकतो. कोरोनाबाबत सामान्य लोकांच्या मनात अनेक शंका, प्रश्न आहेत. त्यातील काही नेहमीच विचारले जाणारे प्रश्न आणि त्यांची उत्तरे...*

## कोरोना : काही शंका, प्रश्न आणि उत्तरे



**प्रा. डॉ. गजानन एकबोटे**
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे

**▪ कोरोना विषाणू हवेतूनच पसरतो असे सांगतात...**

- होय, हा विषाणू हवेतूनही पसरतो, असे जागतिक आरोग्य संस्थेने जाहीर केले आहे. पण हा हवेतून कसा पसरतो हे लक्षात घ्या. एका खोलीत दोन व्यक्ती बसल्या असतील आणि त्यातील एकाला कोरोना झाला असेल तर त्या व्यक्तीच्या श्वासातून हा कोरोना हवेत जातो. पण हा विषाणू जड असल्याने तो चार-पाच मिनिटेच हवेत राहतो. या चार-पाच मिनिटांत त्या विषाणूचा दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क आला तर तो त्याच्या शरीरात शिरू शकतो. यासाठीच मास्क घालणे गरजेचे आहे. हा हवेत जास्तीत जास्त ४ मिनिटे राहत असल्याने खुल्या ठिकाणी हा धोका फार नसतो.

**▪ हा विषाणू १४ दिवसांत मरतो का?**

- कोरोनाची लागण झाली तर तो १४ दिवसांत बरा होतो. तसेच दहा दिवसानंतर लक्षणे नसतील तर अशा रुग्णांपासून इतरांना संसर्ग फार कमी प्रमाणात होतो. आजार बरा झाला तरी सुमारे ३० दिवस अशक्तपणा राहतो. त्यासाठी व्यायाम, योग व फिजिओथेरपी आवश्यक आहे.

**▪ आता नोकरीवर जावे लागते, त्यामुळे बाहेर पडावेच लागते...**

- होय, आवश्यक आहे तिथे बाहेर जावे लागते. परंतु तेव्हा आपण काळजी घ्यायला हवी. बसने जात असाल तर एका सीटवर एकच जण बसा. बस भरलेली असेल तर त्यात चढू नका. दुसऱ्या बसची वाट बघा. ट्रेनने जात असाल तर एका सीटवर दोघेच बसा. जागा नसेल तर उभे राहून प्रवास करा. सतत मास्क लावा. काहीजण नाक उघडे ठेवतात. हे योग्य नाही. काही गळ्यात मास्क अडकवला तर त्या मास्कच्या आतील बाजूला विषाणू येऊ शकतो. मग तुम्ही तो मास्क तोंडावर लावला तेंव्हा मास्कवरील विषाणू थेट तोंडातून आत जातो.

**▪ आणखी कोणती काळजी घ्यायची?**

- ऑफिसमध्ये एकापेक्षा जास्त व्यक्ती असतील तर पूर्णवेळ मास्क लावून बसा. आपल्या सहकाऱ्यांबरोबर एकत्र जेवायचे नाही की चहा घ्यायचा नाही. आपली तशी संस्कृती नाही, पण यातून बचाव करायचा असेल तर एकटेपणाने दिनचर्या करण्याची सवय लावून घ्यावी लागेल. सकाळी व्यायामाला जाताना, बाजारात जाताना अंतर ठेवायचेच. अगदी कुटुंबातील कुणी असले तरी बाहेर गेल्यावर अंतर ठेवून चाला. घरी आल्यावर कपडे साबणाच्या पाण्यात भिजवून ठेवायचे. आपल्या शरीराचा जो भाग कपड्याने झाकलेला नसतो त्या भागावर साबण लावून ३० सेकंदापर्यंत ठेवावे. त्यानंतरच ते पाण्याने स्वच्छ धुऊन घ्यावे. आपल्याला साबण लावला की पाण्यानी धुण्याची सवय असते, ती बदलावी लागेल. गरम पाणी प्यायचे, मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करायच्या, कच्चे काहीही अजिबात खायचे नाही. फ्रीजमधील पदार्थ बाहेर काढून त्याचे तापमान सामान्य झाल्यावरच तो पदार्थ खायचा. हळद, सुंठ घालून गरम दूध प्यायचे.

**▪ खासगी आणि सरकारी चाचणीत एकाच व्यक्तीचे दोन वेगळे अहवाल येतात ते कसे?**

- खासगी आणि सरकारी चाचणीसाठी एकच Swab दिला तर अहवाल वेगळे येणार नाहीत, परंतु वेगळे Swab दिले अहवाल वेगळे येऊ शकतात. कारण दोन चाचण्यांमध्ये वेळेचे अंतर असते. शिवाय Swab घशातून घेतला आणि नाकातून घेतला तरी फरक पडतो.

**▪ एकदा कोरोना झाल्यानंतर त्या व्यक्तीला पुन्हा कोरोना होण्याची शक्यता असते का?**

- एकदा कोरोना होऊन गेल्यावर त्या व्यक्तीमध्ये निर्माण झालेल्या Antibodies (प्रतिकारशक्ती) तीन महिने राहतात. त्यामुळे एकदा कोरोना होऊन गेल्यावर त्या व्यक्तीस पुढील तीन महिने कोरोना होण्याची शक्यता कमी असते. परंतु असे असले तरी एकदा कोरोना झाल्यावरही परत कोरोना होऊ नये



म्हणून SMS चे पालन करणे अतिशय आवश्यक आहे (S- Social (Physical) distancing, M- Wearing Mask, S – Use of Soap & Sanitizer). कोरोना ज्यांना उच्च रक्तदाब, कर्करोग, मधुमेह, दमा इ. विकार आहेत त्यांनी जास्त काळजी घेणे आवश्यक आहे.

**▪ एखादा कोरोनातून बरा झाला असेल तर त्याला परत कोरोना होऊ शकतो का?**

- कोरोनातून बरा झालेल्या रुग्णात जर Antibodies तयार झाल्या असतील तर त्याला पुन्हा कोरोना लवकर होत नाही. पण त्याला सौम्य आजार असेल आणि Antibodies निर्माण होण्यापूर्वी विषाणू गेला असेल तर त्याला पुन्हा कोरोना होण्याची शक्यता असेल. यासाठी या आजारातून बरे झालेले असतात त्यांनीही इतरांप्रमाणे मास्क लावणे, गरम पाणी पिणे ही सर्व काळजी घेत राहायची आहे.

**▪ कोरोनाशी लढा देऊन पूर्ण बरे झाल्यावरही अनेकांना खूप थकवा जाणवतो...**

- कोरोनातून बरा झालेल्या रुग्णाला पुढे चार आठवडे थकवा जाणवू शकतो. याचे कारण हा विषाणू फुप्फुसावर हल्ला करतो. त्यामुळे फुप्फुसाची क्रिया कमकुवत होते आणि हवेतून ऑक्सिजन घेऊन ते शरीरभर पोचविण्याचे त्याचे कार्य कमी होते. फुप्फुस पूर्ण बरे होण्यास चार आठवडे लागतात. म्हणून तितका काळ थकवा जाणवू शकतो. या काळात फिजिओथेरपी व्यायाम करणे महत्त्वाचे आहे.

**▪ कोरोना आजारातून बऱ्या झालेल्या रुग्णाला प्लाझ्मा दान करण्याचे आवाहन केले जात आहे...**

- कोरोनाशी लढा देताना रुग्णाच्या शरीरात प्रतिकार करणाऱ्या ॲंटीबॉडीज तयार होतात. हा रुग्ण बरा झाल्यावरही त्याच्या रक्तातील प्लाझ्मात या ॲंटीबॉडीज राहतात. त्याने जर प्लाझ्मा दान केले तर दुसऱ्या रुग्णाच्या रक्तात या ॲंटीबॉडीज जातात आणि त्या तेथील कोरोना विषाणूशी लढतात. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही याकडे विशेष लक्ष देऊन प्लाझ्मा दानाचे आवाहन केले आहे.

**▪ संभाजीनगरला रॅपिड ॲंटिजेन चाचणी करून कोरोना आहे की नाही याचे ३० मिनिटांत निदान मिळत आहे. इतर या चाचण्या का करीत नाहीत?**

- रॅपिड ॲंटिजेन चाचण्यांचे जे किट सुरुवातीला चीनहून आले ते अयोग्य ठरल्याने परत पाठवले. आता नवे किट आले आहे. त्यामुळे अधिक चाचण्या सुरू होतील. या चाचणीत एखादा रुग्ण पॉझिटिव्ह असला तर रुग्णाला लागण झालेलीच असते. परंतु निगेटिव्ह आला तरी लागण झालेली नाही असे म्हणता येणार नाही. कारण शरीरात विषाणू कमी असतील तर या चाचणीत त्याचे अस्तित्व पकडले जात नाही.

**▪ चाळ/वाडा अथवा वस्तीतील एखाद्या कुटुंबाला कोरोनाची लागण झाल्यास कोणती काळजी घ्यावी?**

- चाळीतील/वाड्यातील/वस्तीतील सर्वांनी त्या कुटुंबाला मदत करावी. सदर कुटुंबाचे विलगीकरण करावे. त्याचप्रमाणे तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यायला सांगावा. त्यांच्या वापरात असलेले बाथरूम, टॉयलेट, पिण्याचा व वापराच्या पाण्याचे नळ/टाकी इ. वेगळे करावे. सदर कुटुंबाशी प्रत्यक्ष संपर्क न करता फोनवर संपर्क करावा. बाथरूम, टॉयलेट, पिण्याचा व वापराच्या पाण्याचे नळ/टाकी या सुविधा सार्वजनिक असल्यास या कुटुंबाचे महानगरपालिकेच्या Quarantine Centre मध्ये विलगीकरण करावे. कोणीही त्यांच्या शारीरिक संपर्कात येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**(लेखक बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे शल्यचिकित्साशास्त्राचे प्राध्यापक आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे प्रति कुलगुरू आहेत.)**

**सर्वांना आवाहन...**

पुढील ३ महिन्यांत कदाचित कोरोनाची लस उपलब्ध होईल. त्यामुळे पुढील तीन महिने आपण सर्वांनीच काळजी घ्यायची आहे. हा आजार गंभीर आहे. त्यामुळे कंटाळा आला म्हणून बेफिकीर होऊ नका. आपण आजवर खूप फिरलो. आता काही काळ घरी बसायला हरकत नाही. तेव्हा मास्क लावा, हात साबणाने धुवा, कच्चे पदार्थ खाऊ नका, सामान काही वेळ दाराबाहेर ठेवून मगच घरात घ्या. गरम पाणी घ्या व स्वतःची काळजी घ्या. आपल्यामुळे इतरांना लागण होणार नाही याची काळजी घ्या.

Please remember that early diagnosis is very important. There are good drugs to treat mild disease. Ayurveda plays an important role in prevention of this disease.

श्वसनाचे व्यायाम, शारीरिक व्यायाम, ताजे व सकस अन्न, दररोज ६-८ तास विश्रांती आवश्यक आहे. निरनिराळी आयुर्वेद काढे प्रतिकारशक्ती वाढविण्यात निश्चितच मदत करतात.

# *Guidance Session by Progressive Education Society's Chairman Prof. Dr. Gajanan Ekbote Sir on Covid-19 Pandemic*

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आदरणीय कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे सरांनी, मंगळवार, दि 8 सप्टेंबर 2020 रोजी, दुपारी साडे चार वाजता, संस्थेच्या सर्व शाळा व महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. हा संवाद ऑनलाइन पद्धतीने, YouTube Live वर घेण्यात आला.

**YouTube लिंक पुढीलप्रमाणे :**

https://www.youtube.com/channel/UCrbSMrkl_zYoARiZEZ6TfXA















## *Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*

**मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्ताह निमीत्त प्रभाग क्रमांक १४ मधील गरजू महिला व होतकरू तरूणींना नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना गजानन एकबोटे, अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, पुणे महानगरपालिका यांच्या माध्यमातून मोफत २०० शिवणयंत्र वाटप करण्याचा शुभारंभ कार्यक्रम दिनांक १९.९.२०२० रोजी मा.प्रा.डॉ.गजानन रमाकांत एकबोटे सर, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे-५ यांच्या शुभहस्ते व मा.श्री.राजेशजी पांडे, संघटन सरचिटणीस, भाजपा, पुणे शहर, मा.श्री.रघुनाथ येमूल गुरूजी,अध्यक्ष, डिकाई, पुणे, मा.श्री.शामकांत देशमुख, सचिव, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, मा.श्री.रविंद्र साळेगावकर, अध्यक्ष, भाजपा, शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ, मा. डॉ. नंदकिशोर एकबोटे, नियामक मंडळ सदस्य प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, मा.डॉ.निवेदिता एकबोटे, अध्यक्षा, अवनी संस्था यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.**



# *Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*



**महाराष्ट्र लोकमंच: २०.९.२०२०**

पुणे

## लोकसेवा म्हणजेच ईश्वरसेवा, लोकप्रतिनिधींना जनतारूपी ईश्वराचा आशीर्वाद आवश्यक – प्रा डॉ. गजानन एकबोटे

September 20, 2020 maharashtralokmanch 0 Comments पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह, पुणे, प्रा डॉ. गजानन एकबोटे, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

पुणे, दि. २० – महानगरपालिकेच्या महिला आणि बालकल्याण समितीच्या अध्यक्ष व नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या विकासनिधीतून प्रभाग क्र.१४ मधील गरजू महिला व होतकरू तरुणींना सध्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आत्मनिर्भर बनवण्याच्या हेतूने २०० महिलांना शिवणयंत्र वाटप करण्याचा शुभारंभ आज प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा.प्रा.डॉ.गजानन एकबोटे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. महिलांनी त्यांच्या पायावर उभे राहावे. स्वावलंबी बनावे आणि कुटुंबाला आत्मनिर्भर बनवावे यासाठी त्यांना सक्षम करणेचे गरजेचे आहे. असे मत डॉ.गजानन एकबोटे यांनी यावेळी मांडले .लोकप्रतिनिधी जनतेची सेवा करण्यात कटिबध्द असतात त्यांना या जनतारुपी ईश्वराची साथ असणे गरजेचे आहे. कोरोना काळात आपण एकमेकांना मदत करणे आवश्यक आहे. कठीण काळ आपली परीक्षा घेत असून आपण अतिशय संयमाने ,धीराने या संकटाला सामोरे जाऊ असे ते म्हणाले. देशाला नरेंद्र मोदींच्या रुपाने एक कणखर पंतप्रधान मिळाले आहेत त्यांच्या वाढदिवसानिमित्त अशी विधायक कार्यक्रम राबवणारे मा.नरेंद्रजी मोदी हे पहिलेच पंतप्रधान आहेत . महिलांना देण्यात आलेल्या शिवणयंत्राच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली . शिवणयंत्राच्या माध्यमातून महिला वर्ग आपली कला वाढवेल आणि आपला संसाराचा गाडा चालवेल असे उद्गार त्यांनी काढले. यावेळी काढले नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे

आणि त्यांचे सर्वच कुटुंबातील सदस्य कोरोना काळात खूप मोठ्या प्रमाणात मदतकार्य करत आहेत. मोफत मास्क,अन्नधान्य वाटप, त्यासोबतच परप्रांतीयांना त्यांच्या गावी पोहोचण्यासाठी मदत करणे, प्रभागात वेगवेगळ्या ठिकाणी गरजू कुटुंबांना अन्नधान्याचे वाटप करणे अशा प्रकारचे अविरत कार्य एकबोटे कुटुंबीय करत आहे. हा कार्यक्रम भाजपाचे संघटन सरचिटणीस राजेशजी पांडे यांच्या उपस्थितीत पार पडला. या कोरोना काळात मतदारसंघातील रुग्णांना हॉस्पिटल मध्ये जागा उपलब्ध करून देण्यापासून ते रक्तदाते शोधणे, प्लाज्मा दान करण्याचे आवाहन करणे, रुग्णवाहिका रिक्षाची व्यवस्था करणे असे अनेक लोकपयोगी उपक्रम सातत्याने एकबोटे कुटुंबियांकडून शहरवासीयांसाठी चालवले जातात त्याबद्दल त्यांचे आभार पांडे यांनी मानले. या कार्यक्रमाला रघुनाथ येमूल गुरुजी,अध्यक्ष,डिक्काई, मा.प्रा.डॉ.निवेदिता एकबोटे,अध्यक्षा, अवनी संस्था,

मा.डॉ.नंदकिशोर एकबोटे, नियामक मंडळ सदस्य प्रो.ए.सो, रविंद्र साळेगावकर, अध्यक्ष, भाजपा, शिवाजीनगर मतदारसंघ इ मान्यवर उपस्थित होते.

तसेच या कार्यक्रमाला सुरक्षित अंतर राखत प्रभागातील अनेक नागरिक व भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी सहभागी झाले होते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी आभार मानले. त्यांनी कोरोन काळात चालणाऱ्या सर्व विधायक उपक्रमांचा आढावा घेतला. तसेच नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांच्या माध्यमातून सेवा सप्ताह निमित्त दररोज शंभर लोकांना मोफत जेवण देण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन राजन देवकते, दत्तात्रय पाटोळे, विनास लाड, ऋषिकेश कोंढाळकर , मंगेश ननावडे, सुरज दरेकर, यांनी केले होते.

# *Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*



डेक्कन : गरजू महिलांना शिवणयंत्र वाटपप्रसंगी प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्यासह मान्यवर.

## गरजूंना शिवणयंत्राचे वाटप

**पुणे, ता. २० :** महापालिकेच्या महिला आणि बालकल्याण समिती अध्यक्षा व नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांच्यातर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. एकबोटे यांच्या निधीतून गरजू महिला व तरुणींना शिवणयंत्र वाटप करण्यात आले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांच्या हस्ते हे वाटप झाले.

भाजपचे संघटन सरचिटणीस राजेश पांडे, 'डिकाई'चे अध्यक्ष रघुनाथ येमूल गुरुजी, अवनी संस्थेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. शामकांत देशमुख, डॉ. नंदकिशोर एकबोटे, भाजप शिवाजीनगर मतदारसंघ अध्यक्ष रवींद्र साळगावकर आदी उपस्थित होते. प्रा. देशमुख यांनी आभार मानले. राजन देवकते, दत्तात्रेय पाटोळे, विलास लाड, ऋषिकेश कोंढाळकर, मंगेश नलावडे, सुरज दरेकर यांनी आयोजन केले.

**Sakaal: 21.9.2020**

## सेवासप्ताहाचे औचित्य साधून गरजू महिलांना मदत



**पुणे :** महापालिकेच्या महिला आणि बालकल्याण समितीच्या अध्यक्ष व नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या विकासनिधीतून प्रभाग १४ मधील गरजू महिला व होतकरू तरुणींना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्वावलंबी बनवण्यासाठी शिवणयंत्र वाटप करण्यात आले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे यांच्या हस्ते हा कार्यक्रम झाला.

महिलांनी त्यांच्या पायावर उभे राहावे यासाठी त्यांना सक्षम करणेचे गरजेचे आहे, असे मत डॉ. एकबोटे यांनी व्यक्त केले.

प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी कोरोना काळात केलेले मदतकार्य कौतुकास्पद आहे, असे शहर भाजपचे संघटन सरचिटणीस राजेश पांडे यांनी सांगितले.

यावेळी रघुनाथ येमूल, डॉ. निवेदिता एकबोटे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह शामकांत देशमुख, डॉ. नंदकिशोर एकबोटे, रविंद्र साळेगावकर उपस्थित होते.

शामकांत देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन राजन देवकते, दत्तात्रय पाटोळे, विलास लाड, ऋषिकेश कोंढाळकर, मंगेश नलावडे, सुरज दरेकर यांनी केले.

**Kesari: 21.9.2020**



# *Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*

## महिलांना शिवणयंत्र

पुणे महापालिकेच्या महिला आणि बालकल्याण समितीच्या अध्यक्ष व नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांच्या विकास निधीतून प्रभाग क्र. १४ मधील दोनशे महिलांना शिवणयंत्र वाटप करण्यात आली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या हस्ते हा कार्यक्रम घेण्यात आला.

**Maharashtra Times: 22.9.2020**

## दोनशे गरजू महिलांना शिवणयंत्रांचे वाटप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोना संकटाच्या काळात आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशातून महापालिकेच्या महिला आणि बालकल्याण समितीच्या अध्यक्षा ज्योत्स्ना एकबोटे यांच्या विकास निधीतून दोनशे गरजू महिलांना मंगळवारी शिवणयंत्रांचे वाटप करण्यात आले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे आणि भाजप संघटन सरचिटणीस राजेश पांडे यांच्या हस्ते शिवणयंत्राचे वाटप करण्यात आले. या शिवणयंत्राच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध होईल अशी अपेक्षा डॉ. एकबोटे यांनी व्यक्त केली. रघुनाथ येमूल गुरुजी, अवनी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. निवेदिता एकबोटे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य डॉ. नंदकिशोर एकबोटे, भाजप शिवाजीनगर मतदारसंघाचे अध्यक्ष रवींद्र साळेगावकर या वेळी उपस्थित होते.

लोकसत्ता Wed, 23 September 2020 https://epaper.loksatta.com/c/55



# Congratulations Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam










प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता गजानन एकबोटे मॅडम यांची भारतीय जनता पक्ष युवती आघाडीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन....! त्यांच्या भावी राजकीय वाटचालीसाठी आम्हां सर्वांकडून शुभेच्छा....! या पदावर निवड होण्याचा पहिला बहुमान हा त्यांना प्राप्त झाला आहे हि विशेष आनंदाची बाब आहे. आपले पिताश्री मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे (कार्याध्यक्ष, प्रो. ए. सोसायटी) व मातोश्री मा. प्रा. सौ ज्योत्स्ना ग. एकबोटे (अध्यक्ष, महिला व बालकल्याण पुणे, मनपा पुणे, नगरसेविका पुणे मनपा, सहकार्यवाह, प्रो. ए. सोसायटी) तसेच काका मा. श्री. मिलिंद भाऊ एकबोटे, डॉ. नंदकिशोर एकबोटे या सर्वांचे आशीर्वाद, मार्गदर्शन शुभेच्छा तसेच त्यांचा सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव आपल्या पाठीशी आहे.

कै. दादासाहेब एकबोटे आपले आजोबा त्यांच्याकडून आपल्या घराला समाजकारण व राजकारणाचे बाळकडू लाभले आहे. या सर्व गोष्टींचा आपल्या भावी कार्यामध्ये आपणास निश्चितच लाभ होणार आहे. आपल्या सुसंस्कृत स्वभावा मुळे आपण अनेकांशी जोडल्या गेल्या आहात. आपला जनसंपर्क दांडगा आहे. आपण विद्याविभूषित आहात. आपल्या सारख्या सेवाभावी व्यक्तींनी समाजकारणात व राजकारणात येऊन जनता जनार्धनाची सेवा आपल्या हातून घडो हि सदिच्छा....!

आपले पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन...! व आपणास शुभेच्छा....!

प्रा. शामकांत देशमुख

कार्यवाह, प्रो. ए. सोसायटी, पुणे -५ (30.9.2020)

Image Courtesy: Google Images

## *Poem by Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir*

**मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगरचे प्राचार्य मा. डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी जागतिक शांतता दिनानिमित २१ सप्टेंबर २०२० रोजी केलेले हे काव्यपुष्प.**



# अरुणिमा: हिन्दी दिवस 2020 विशेषांक

**हिंदी दिवस के अवसर पर**

**"अरुणिमा" (हिंदी भितिपत्रिका ) अब नए स्वरूप में ......**

हिंदी विभाग की ओर से सन 2016 से अविरत हर महीने प्रकाशित होनेवाली हमारी हिंदी भित्तिपत्रिका "अरुणिमा" सितंबर 2020 से नए स्वरूप में आरंभ कर रहे हैं।

पहले यह हमारे महाविद्यालय के फलक पर छात्रों द्वारा प्रस्तुत की जाती थी। वर्तमान समय में, कोरोना की स्थिति में प्रत्यक्ष रूप से महाविद्यालय के फलक पर प्राप्त साहित्य नहीं लगाया जा सकता । परंतु हमारी गतिविधि न रुकते हुए अखंडित रूप में चलती रहें इसलिए हम इसे एक नए स्वरूप में आप सबके सामने ला रहे हैं। हिंदी दिवस के अवसर पर इसका पुनः आरंभ हो रहा है। हिंदी दिवस के इस विशेषांक के लिए द्वितीय वर्ष.,एम. ए. हिंदी साहित्य के छात्रों ने लेखन किया है। इसी कक्षा की अनिसा शेख ने पत्रिका के लिए सहायक के रूप में बड़े उत्साह से मेरी सहायता की है।

हर महीने अरुणिमा के लिए सभी विषयों के छात्र और अध्यापक, अन्य कर्मचारी भी अपने द्वारा लिखित लेख, कविताएँ, लघुकथा, कहानी मुझे hodhindi@moderncollege.pune.edu.in मेल आई. डी.पर जरुर भेज सकते हैं।

आशा है, आप सबको "अरुणिमा" का यह अंक एवं नया स्वरूप बेहद पसंद आएगा।

धन्यवादसहित।

— डॉ. प्रेरणा उबाळे, हिंदी विभागाध्यक्षा



# अरुणिमा: हिन्दी दिवस 2020 विशेषांक

१)
**अस्वस्थ श्वास**

मिल जाता हूँ अक्सर सिसकते
बच्चों से....
फॅमिली कोर्ट में।
जिनके मां-बाप मिलते हैं कोर्ट
में
हर तारीख पर।
राह देख रहे हैं, .... डिव्होर्स
की।
मेरे मन का मात्र कोलाहल
बढता है
बच्चों की अंतस्थ पुकार से।

मन का कोलाहल और बढता
है
जब सिग्नल पर,
कार के काच पर टकटक
करके,
गुलाब के फूल बेचते,
नन्हे बच्चे...भूखे .. प्यासे... !
और सिग्नल के नीचे
तपती सड़क पर, बैठी उनकी
माँ !

मन का कोलाहल और बढता
है,
जब फूटपाथ पर ढोल के
आवाज पर
देखता हूँ बच्चों के टेढे नाच
चाँद पैसों के लिए।
और, तीखी मिर्ची के साथ
उनका वडापाव खाना।

मन में उठती हैं तरंगें सवालों के
कैसी होगी उनकी कल की
सुबह
और
फिर आनेवाली और एक
सुबह.....!

-दिनकर चौगुले
द्वितीय वर्ष, एम. ए. हिंदी साहित्य

हिंदी दिवस

२)
**हिंदी**

हिंदी मेरे रोम-रोम में,
हिंदी में मैं समाई हूँ,
हिंदी की मैं पूजा करती,
हिंदुस्तान की जाई हूँ
सबसे सुंदर भाषा हिंदी,
ज्यों दुल्हन के माथे की बिंदी,
सूर, जायसी, तुलसी कवियों
की,
सरित-लेखनी से बही हिंदी
हिंदी से पहचान हमारी,
बढ़ती इससे शान हमारी,
माँ की कोख से जाना
जिसको,
माँ, बहना, सखि-सहेली हिंदी
निज भाषा पर गर्व जो करते,
छू लेते आसमाँ न डरते,
शत-शत प्रणाम सब उनको
करते,
गर्व.. हमारा अभिमान है हिंदी
हिंदी मेरे रोम-रोम में,
हिंदी में मैं समाई हूँ,
हिंदी की मैं पूजा करती,
हिंदुस्तान की जाई हूँ
हिंदुस्तानी हैं हम, गर्व करो
हिंदी भाषा पर,
उसे सम्मान दिलाना और देना
कर्तव्य हैं हम पर।।
खत्म हुआ विदेशी शासन,
तोड़ दो अब उन बेड़ियों को।।
खुले दिल से अपनाओ इस
खुले आसमां को,
लेकिन ना छोड़ो धरती माँ के
प्यार को।।
हिंदी हैं राष्ट्रभाषा हमारी,
इस पर करो न्यौछावर जिंदगी
सारी।।

संकलन - शबनम खातून
कक्षा- द्वितीय वर्ष, एम.ए.हिंदी साहित्य

१

३)
**"प्यारी हिंदुस्तानी"**



हम है हिंदुस्तानी,
हिंदी भाषा हमको प्यारी है,
इस भाषा पर सारी दुनिया
भारी-भारी है,
हम है हिंदुस्तानी,
हिंदी भाषा हमको प्यारी है,
चारों द्वीपों की दिशाओं में
जो गूँजे अभियान,
राम-कृष्ण की वाणी है और
गीता का ज्ञान,
किसके क्षमता होगी उसे हराए
न्यारी-न्यारी है,
हम है हिंदुस्तानी,
हिंदी भाषा हमको प्यारी है।
गंगा-सीता है जो है उनका
सम्मान,
उस भाषा के हम वासी हैं,
हैं हमको अभिमान।
हम ना भूल सकेंगे उसको
जब तक जान हमारी हैं,
हम है हिंदुस्तानी,
हिंदी भाषा हमको प्यारी है।
विषयों की वाणी है
कवियों का सम्मान,
प्रेम भाव का पाठ पढ़ाती
देती सबका ज्ञान,
इसकी ख़ुशबू से महके
ये प्यारी-प्यारी है,
हम है हिंदुस्तानी,
हिंदी हमको प्यारी है।

हिंदी हमको प्यारी हैं,
भाषा हमारी न्यारी है।



- शमिम खान
कक्षा- द्वितीय वर्ष, एम. ए. हिंदी साहित्य

४)
**"शुभ वरदान"**

हिंदी हमारी आन है हिंदी
हमारी शान है,
हिंदी हमारी चेतना वाणी का
शुभ वरदान है,
हिंदी हमारी वर्तनी हिंदी हमारा
व्याकरण,
हिंदी हमारी संस्कृति हिंदी
हमारा आचरण,
हिंदी हमारी वेदना हिंदी हमारा
गान है,
हिंदी हमारी आत्मा है भावना
का साज़ है,
हिंदी हमारे देश की हर तोतली
आवाज़ है,
हिंदी हमारी अस्मिता हिंदी
हमारा मान है।,
हिंदी निराला, प्रेमचंद की
लेखनी का गान है,
हिंदी में बच्चन, पंत, दिनकर
का मधुर संगीत है,
हिंदी में तुलसी, सूर, मीरा
जायसी की तान है।,
जब तक गगन में चांद, सूरज
की लगी बिंदी रहे,
तब तक वतन की राष्ट्रभाषा ये
अमर हिंदी रहे,
हिंदी हमारा शब्द, स्वर [illegible]
अमिट पहचान है,
हिंदी हमारी चेतना वाणी का
शुभ वरदान है।
संकलन-रोहिणी चव्हाण
कक्षा-द्वितीय वर्ष, एम. ए.
हिंदी साहित्य

२

# अरुणिमा: हिन्दी दिवस 2020 विशेषांक



५)



नम्रता विटकर
कक्षा- तृतीय वर्ष(कला)




६)

'हिंदी का सम्मान'

हिंदी का सम्मान करें,
यह हमारी राजभाषा,
मिलाती देशवाशियों के दिलों
को यह,
पूरी करती अभिलाषा।

देखो प्रेमचंद और भारतेन्दु का
यह हिंदी साहित्य,
जो लोगो के जीवन में ठहाको
और मनोरंजन के रंग भरते
नित्य।

हिंदी भाषा की यह कथा —
पुरानी लगभग एक हजार वर्ष,
जो बनी क्रांति की ज्वाला तो
कभी स्वतंत्रता सेनानियों का
संघर्ष।

आजाद भारत में भी
इसका कम नहीं योगदान,
इसलिए हिंदी दिवस के रुप में
इसे मिला यह विशेष स्थान।

विनती बस यही हिंदी को
ना दो तुम दोयम दर्जे का मान,
हिंदी से सदा करो प्रेम
तुम दो इसे विशेष सम्मान।

रोज मनाओ तुम हिंदी दिवस
बनाओ इसे अपना अभिमान,
हिंदी है हमारी राजभाषा
इसलिए दो इसे अपने हृदयों में
विशेष स्थान।

अंग्रेजी की माला जपकर
ना करो हिंदी का अपमान,
आओ मिलकर सब प्रण लें
नित्य करेंगे हिंदी का सम्मान।

-----------

मूल कवि - योगेश कुमार सिंह
संकलन- अनिसा अ. शेख़
कक्षा- द्वितीय वर्ष, एम. ए.
हिंदी साहित्य

३

# *Events Conducted by National Service Scheme (NSS) in September 2020*

## *Celebration of Teachers Day –5th September 2020*

On 5th September, throughout the nation '***Teachers Day'*** was celebrated. On this occasion NSS Volunteers of Modern College, Shivajinagar, Pune-5 arranged an online program, which was dedicated to their teachers. Many volunteers participated in this program and expressed their gratitude and appreciation for their teachers. The special guests of this program were Honorable Principal, Modern College, Shivajinagar, Pune-5 Dr. Rajendra Zunjarrao Sir and Dr. Prabhakar Varade Sir (NSS Program Officer, MCASC).

The program began by motivational speech delivered by guest speaker. NSS volunteers expressed their gratitude in the form of speech, poem and by presenting some beautiful videos. Goraksha Gurav made a beautiful poem for teachers "Fakt Ladh Mhana". After that, NSS Volunteer Dhiraj Raut recited a poem titled "Lockdown and Teachers". Tanaya Mondhe presented a video based on old memories of our teachers.

After that video a Speech based on Dr.Sarvapalli Radhakrishnan was given by Kranti Jangam. Tanaya Mondhe recited a poem based on the importance of teachers in our life. After that Rutuja Sable delivered a speech to express her gratitude for teachers. NSS Volunteer Vidya Gaikwad recited poem made by her on "Shikshak". Later, Saniya Patel made a Speech lyrical Video, which was dedicated to teachers. In that video she acted herself and expressed her appreciation towards teachers. The hosting of the whole program was done by NSS Volunteer Mrunal Pawar.

This whole program was carried through Online Mode.






# *Celebration of World Literacy Day - 8th September 2020*

On Tuesday 08th September 2020, ***World Literacy Day*** was celebrated. On this occasion NSS Volunteers of Modern College, Shivajinagar, Pune-5 arranged an online program. The main motive of this program was to learn how to behave as a literate person and to make use of this literacy during the critical situation. This program was carried out under the Guidance of Honorable Principal of MCASC Dr. Rajendra Zunjarrao Sir and Dr.Prabhakar Varade Sir (NSS Program Officer of MCASC).

The beginning of the program was done by the inspirational speech delivered by speaker Dr. Prabhakar Varade. Sir gave a lifelong message of literacy, that according to the situation we come to know the difference between a literate person and an illiterate person. After the speech, Volunteer Tanaya Mondhe presented a video related to the relation between Sane Guruji and Literacy. Goraksha Gurav recited the story from the book *Shyamchi Aai* written by Sane Guruji. The title of the story was "Truth always comes out ".

Thereafter, Volunteer Tanaya Mondhe recited the poem " Bal Sagar Bharat Ho" written by Sane Guruji. NSS Volunteer Mrunal Pawar read the letter which was written by Sane Guruji to his Daughter Sudha. Volunteer Vidya Gaikwad delivered a speech on the importance of Literacy Day. Shyamsundar Kasbe offered prayer. The name of the prayer was " Khara to ekchi dharma". The hosting of this program was done by Kranti Jangam in Online mode..









## *Celebration of World Literacy Day - 8th September 2020*












# Celebration of World Ozone Day - 16th September 2020

National Service Scheme (NSS) Unit of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-411005 organised online program on 'International Day for the Preservation of the Ozone Layer 2020' which is also known as World Ozone Day on 16th September 2020 at 07:00 p.m. on Google Meet Platform.

The theme of World Ozone Day 2020 is 'Ozone for Life : 35 years of Ozone Layer Protection'. Under the guidance of Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, NSS Co-ordinator Prof. Dr. Prabhakar S. Varade and the NSS Volunteers organised the online event which began with the speech delivered by Dr. Shantashree Sengupta, Librarian, MCASC, Pune-5 on the Importance of Ozone and Ozone Day, Origination of Ozone Day, Factors leading to Ozone Depletion, Ozone Hole, Ways to save Ozone and Attempts made by MCASC, Shivajinagar, Pune-5. The session followed by online Plays set by the NSS Volunteers on the Ozone Day Theme ; Poem recitations ; Video presentations and Speech on Ozone Day. After the speech, Apeksha Dagale recited a self composed poem. The name of that poem is "Save The Ozone Layer." The small videos were made by NSS Volunteers related to the importance of Ozone Day and its necessity.

The main attractive part of this program was drama which was carried out by our NSS Volunteers. The main motive of this drama is to aware our society to protect the Ozone Layer. NSS Volunteer Goraksha Gurav recited the poem which is based on the impact of global warming to the farmers. The name of the poem is "Scissor kar Mahnteya Mati" Then without a speech the program cannot be fulfilled, so NSS Volunteer Vidya Gaikwad delivered a wonderful speech based on the overall situation of the environment due to Ozone Hole. Later on, the Shyamsundar Kasbe recited the beautiful poem. The name of that poem is " Manuspan Garathlay". Afterwards, NSS Volunteer Mrunal Pawar made a small video on Ozone Layer which was presented by Dhiraj Raut. Then at the end of the program, Dhiraj Raut recited the wonderful poem based on the Mother Earth. The name of that poem is " Vasundhara Cha Hirwa Shallu".

The hosting of this program was done by Amruta Diwate. In this different way, the NSS Volunteer carried out the awareness program with full enthusiasm.






## *Celebration of World Ozone Day - 16th September 2020*
























# *Celebration of World Ozone Day - 16th September 2020*


















## Celebration of National Service Scheme Day - 24th September 2020

On Thursday, 24 September, throughout the country ***NSS Day*** was celebrated. On this occasion NSS Volunteers of MCASC organized a program through Online Mode. This program was carried out under the guidance of Honorable Principal of MCASC Dr. Rajendra Zunjarrao Sir and Dr.Prabhakar Varade Sir (NSS Program Officer of MCASC). It was the 51st NSS Day and the theme of this year is "My Family, My Responsibility". The Chief Guest of this program was Dr. Rajkumar Rikame Sir who worked as NSS district coordinator of SPPU.

The program commenced with SPPU,Pune song by NSS Volunteer Mrunal Pawar. After that, our guest speaker delivered the inspirable speech and gave his best wishes to our volunteers to do social work throughout their life. As it was NSS Day so it is necessary to have some information related to the Role of NSS Volunteers. Kranti Jangam delivered the speech on "Role of NSS Volunteers."

After the speech, a small video made by our volunteers Goraksha Gurav, Dhiraj Raut and Tanaya Mondhe on the NSS Activities that are conducted throughout the year was presented. Sakshi Dede delivered the speech on the History of NSS. NSS Volunteer Mrunal Pawar recited the beautiful poem related to the NSS Camp. Purva Sankpal delivered her experience while doing social work. Vaishnavi Surve and Ishwari Kamble conducted the Online Quiz for our volunteers. Then, NSS volunteer Amruta Diwate delivered the wonderful speech on "My Family, My Responsibility".

Every NSS Volunteer enjoyed the NSS Camp, so to tell the experience during NSS Camp Goraksha Gurav shared a wonderful experience during Camp. Later on, our Volunteer Shyamsundar Kasbe recited a poem on NSS written by him. NSS Volunteer Vaishnavi Surve delivered the wonderful speech on how NSS Changes her view towards this society. Then, the wonderful poem recited by Tanaya Mondhe based on NSS. Then at the end of the program, the Program Officer of MCASC does the conversation with our Volunteers and guides them. The hosting of this whole program was done by Rutuja Sable. In this way, NSS Volunteers celebrated NSS Day in a different manner with full enthusiasm.






# *Celebration of National Service Scheme Day - 24th September 2020*
























# *Events Conducted by Department of German in September 2020*

# Celebration of European Day of Languages– 26th September 2020

On the occasion of ***European Day of Languages***, celebrated on the 26th of September, the students and teachers of the Department of German, MCASC, Shivajinagar, Pune 5 dived into learning a few European languages and speaking a couple of sentences in these languages. The video comprises of 13 language enthusiasts sharing their passion for learning languages thereby displaying their newly acquired language skills. It is indeed worth mentioning that the students managed to learn the sentences in these foreign languages in a period of barely two days and tried to put up their part at their best in form of a video. These videos were then blended together and woven into a film.

**Students' participation :**

Sanika Shirodkar - Greek
Varda Maydeo - Finnish
Eesha Joshi - Czech
Shravani Panse - Italian
Ketaki Mangrulkar - Turkish
Mruga Kelkar - Portuguese
Aishwarya Karikar - Catalan
Sawni Bhave - French
Avanti Deshpande - Dutch
Hruta Kulkarni - Russian

**Teachers' participation :**

Ashwami Patil - German
Prachi Atre - English
Sneha Mahajan - Spanish




YouTube Link : https://youtu.be/Zjl9fqmAXD0
Thank you!
Prof.Sneha Mahajan
Head, Department of German
MCASC, Shivajinagar, Pune 5.






# Department of German Extra-Curricular Activities August 2020












# Department of German Extra-Curricular Activities August 2020

The Department of German organized various interesting virtual and online competitions for students in the month of August 2020.

***'Meme-it': A meme making competition wherein students had to create authentic memes in German based on any topic.***

The competition focused on the creativity, use of computer and technology skills as well as language skills of the students with an added special factor of entertainment.

***Ms.Riya Khandekar (XII Arts), Ms.Vard Maydeo (T.Y.B.A) and Ms.Sawni Bhave (T.Y.B.A) were the winners of this competition.***












# *Department of German Extra-Curricular Activities August 2020*












# *Department of German Extra-Curricular Activities August 2020*

***'Picture-Write-it': This was a short story writing competition where students were given a picture based on which they were supposed to write a story (about 200 words).***

The main focus of this competition was the writing skills of the students. It also tested their imagination power and their ability to bring their thoughts on the virtual paper keeping it authentic and gripping to read.

***Ms.Ketaki Mangrulkar (T.Y.B.A) won this competition.***

## Picture Write-it



## Entscheiden unsere Entscheidungen unser Leben?

Rebecca haterst ihre zehnte Klasse Prüfung absolviert. Jetzt steht die große Frage vor ihr : "Was soll ich aus so viele Studium und Karrieremöglichkeiten wählen?" Ihre Tante, die bei einem MNC arbeitet schlägt vor „meine Arbeit ist doch stressig, aber ich verdiene ja ziemlich viel sehr schnell. Dazu noch ist das das Traumberuf von Vielen. Mit Geld umzugehen, mithilfe von Kaffee lange zu arbeiten und etwas bedeutend zu tun " Rebecca lächelt. Aber sie wusste schon, dass das sie nie machen möchte. Die dauernde Konkurrenz und Büropolitik geht ihr auf die Nerven. Das geht überhaupt nicht.

Ein Onkel, der der Vorsitzende eines erfolgreichen Wälder-Vereins war, widersprichst, " Das ist zu konventionell.Komm mal und sei ein Mitgleid meines Vereins! Dort hättest du ja kein Stress. Arbeit und Erholung zusammen, toll, oder?" Zwar hat das die Interesse von Rebecca für einen Moment geweckt, aber das war keine richtige Berufsweg, sehr unsicher. Rebecca hat auch zahlreiche Ideen von vielen Anderen bekommmen. Sie war jetzt verwirrt. Sie hat auch viel recherchiert und war so überwältigt, dass sie schon zu weinen geführt hat. Sie hat an ihren Bruder geschrieben und sein Antwort hat ihr beruhigt : „mach dich keine Sorge! Diese Entscheidung ist zwar wichtig, aber, wenn du einen Fehler machst, werde es nicht die Ende der Welt.Mach Gedanken in Ruhe, ohne Angst und wähl eine Karriere aus, denen du wirklich gut findest, vielleicht nicht nur als Beruf, sondern auch als etwas woran du Spaß hättest!

Dieser Rat hilft uns Allen, jedes Mal wir eine Entscheidung mehr als die ganze Leben bewerten.

**-Ketaki Mangrulkar**

**(T.Y.B.A)**

# *Department of German Extra-Curricular Activities August 2020*

***'Sanity-in-Insanity': This video making competition showcased the students portraying their tricks and treats of keeping themselves sane in the insane time of the Corona pandemic.*** The students made a video wherein they spoke about their definition and interpretation of the title 'Sanity-in-Insanity'. This competition gave the students an opportunity to display their creative minds and present their talents of singing, drawing, painting, cooking, handicrafts etc. which were enhanced and polished in the free time they got during the lockdown.

***Ms.Varda Maydeo (T.Y.B.A) and Ms.Meera Kendurkar (S.Y.B.A) were the winners of this competition***.

| Sr. No | Title | Links |
|---|---|---|
| 1. | Sanity-in-Insanity winner - Varda Maydeo | https://youtu.be/Olu4QlJz0eI |
| 2. | Sanity-in-Insanity winner - Meera Kendurkar | https://youtu.be/xCD65Vp9OyU |

***'Poet-act-it': Students chose poems and did an audio-visual depiction of the same.*** Some students in fact wrote poems themselves and enacted and performed them. The competition aimed at bringing out stage presence and presentation skills of the students, as also get more acquainted with the literary genre of poetry, thus understanding the language deeper and better.

***Ms.Rutuja Talekar (S.Y.B.A), Ms. Hazel Roy (S.Y.B.A) and Ms.Komal Bora (T.Y.B.A) were the winners of this competition.***

| Sr. No | Title | Links |
|---|---|---|
| 1. | Poet-act-it winner - Hazel Roy | https://youtu.be/Q01d6uXQBfM |
| 2. | Poet-act-it winner - RutujaTalekar | https://youtu.be/LwA-WsjvABA |
| 3. | Poet-act-it winner - Komal Bora | https://youtu.be/2cRH_SPkr_4 |

The main purpose of these competitions was to fine the students a chance to do something more lively and active apart from the mundane online lectures. These competitions also helped them polish their German language skills and acquire new hobbies and free time activities.

Hearty congratulations to all winners as well as the participants.

**SnehaMahajan**
**Head, Department of German**
**MCASC, Shivajinagar, Pune 5.**

# *Department of German Extra-Curricular Activities August 2020*







Image Courtesy: Google Images

# *Events Conducted in the Library During September 2020*

**1. Raje Umaji Naik Jayanti: 7th September 2020**

On 07th September 2020, as per the Government of Maharashtra Circular, we in Library and Information Centre under the guidance of Respected Principal Dr.R.S.Zunjarrao Sir observed *राजे उमाजी नाईक जयंती. Principal Sir gave a brief summary of the Indian Revolutionary who as one of the earliest freedom fighter of India, challenged the British Rule in India around 1826 to 1832. The program was conducted in the Library by following the Physical Distancing principle in the COVID-19 situation.



















# *Events Conducted in the Library During September 2020*

**2. Pandit Deendayal Upadhyay: 25th September 2020**

On 25.09.2020- **पंडित दिनदयाळ उपाध्याय जयंती- अंत्योदय दिवस**, as per the Government of Maharashtra Circular, we in Library and Information Centre under the guidance of Respected Principal Dr.R.S.Zunjarrao Sir organised program to pay our respect to Pandit Deendayal Upadhyay.

Principal Sir in his speech highlighted the philosophies of Pandit Deendayal Upadhyay, which are:

1) Sarvodaya ( progress of all )
2) Swadeshi ( Indianisation ) and
3) Gram Swaraj.

The program was conducted in the Library by following the Physical Distancing principle in the COVID-19 situation.



# Activities conducted by Modern Media Station

## मॉडर्न व्याख्यानमाला २०२०

*Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 in association with Rotary Club, Shivajinagar, Pune conducted a Webinar Series as an ***Online Co-curricular Activity*** for all students and staff of Modern College, Shivajinagar, Pune-5.

The activity commenced on every Thursday and Saturday through **Modern Media Station** (the official YouTube channel of Modern College, Pune 5. ) the online sessions will be streamed.

In the Inaugural session on 11th July 2020, Principal Dr. R. S. Zunjarrao Sir said -

*"We are at home due to COVID 19 Pandemic and lockdown. We have to take care of our physical as well as emotional health, come of negativity (if any), cherish ourselves, make ourselves happy and energize thereby...... Here is an opportunity brought to you from Modern College, Pune-5. All may please visit Modern Media Station on You Tube. The session will be live on this station. Like, Share and Subscribe the official YouTube channel of our College. Feel Happy....Be Happy".*



# Webinars organized during September 2020

# ' ONLINE INDUCTION SESSION'

Progressive Education Society's Modern College of Arts,Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 as another unique initiative in the COVID-19 pandemic situation, organised ***'ONLINE INDUCTION SESSION'*** from 3rd to 5th September 2020 for the First Year students of Arts, Science and Commerce Streams of our College through YouTube Live on Modern Media Station. https://www.youtube.com/channel/UCrbSMrkl_zYoARiZEZ6TfXA

The Induction Session started with Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir's orientation of introducing the Progressive Education Society, College, Remarkable Achievements, Alumni, Teaching, Learning and Evaluation techniques, Initiatives taken for Online Education in COVID-19 pandemic etc..

IQAC Co-ordinator Prof.Dr.Anjali Sardesai explained the Concept of Autonomy and Evaluation techniques in a lucid manner during the 2nd Day of Induction.

On the third day of the Induction Session,

Student Welfare Officer Prof.Dr. Shubhangi Puranik ; Librarian Dr. Shantashree Sengupta; NSS Co-ordinator Prof. Dr. Prabhakar Varade; NCC Officer and Art Circle Co-ordinator Prof.Dr. Ashok Kamble ; and Director of Physical Education Prof. Vikram Phale introduced the respective Units, achievements, facilities and services provided to the students.

We are thankful to the 'Modern' thinkers of Progressive Education Society, Pune and Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir for providing us the Online Induction Platform to introduce the various Departments, Units, Activities, Facilities etc. to the First Year students.

Thank you Prof. Sameer Nerlekar Sir for the technical support.

We welcome the First Year students and wish them a successful Academic Year and life ahead. Welcome to Modern family.






# 'ONLINE INDUCTION SESSION'


















## *Two Days Faculty Development Program on Conduction of Science Practicals*

**ऑनलाइन पद्धतीने प्रात्यक्षिके कशी घेता येतील याची उत्सुकता सर्व शिक्षक सहकार्यांना होती. याबद्दलचा अभ्यास काही सहकाऱ्यांनी केला. त्यांची माहिती, त्यांचा अनुभव इतर सहकार्यांशी संवाद साधून व्यक्त केला. सर्वांनी, विशेषता, विज्ञान विषय शिकवणाऱ्या सर्व शिक्षक सहकाऱ्यांनी या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम मध्ये सहभाग घेतला, या बद्दलची सर्व माहिती लक्षात घेऊन, ती आत्मसात करून काही दिवसांमध्ये नियोजित वेळापत्रकाप्रमाणे सायन्स प्रॅक्टिकल्स चे ऑनलाइन पद्धतीने आयोजन करण्यात आले. यासाठी सर्व शिक्षक सहकार्यांनी सहकार्य केले.**

**- प्राचार्य डॉ.आर.एस. झुंजारराव**



# *Webinar on How to Develop Effective MCQs and Tips for Conducting Online Examinations*

RUSA, Maharashtra and SPPU, Pune in collaboration with Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous) organised Webinar on 'How to Develop Effective MCQs' and 'Tips for conducting Online Examinations' on 16th September 2020 in two sessions in online mode.



## *'आधुनिक मराठी कवितेतील मानवतावादी प्रवाह'*

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनसोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे-५ येथील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ आयोजित ***'आधुनिक मराठी कवितेतील मानवतावादी प्रवाह'*** या विषयावर १७ सप्टेंबर २०२० रोजी एकदिवसीय वेबिनारचे आयोजित करण्यात आले. या वेबिनारमध्ये डी.पी.भोसले महाविद्यालय, कोरेगाव येथील मराठी विभागप्रमुख ***डॉ.देवानंद सोनटक्के*** यांनी 'आधुनिक मराठी कवितेतील मानवतावादी प्रवाह' या विषयावर मार्गदर्शन केले.


















# *Faculty Members Invited as Resource Persons during September 2020*

## *Dr. Prerana Ubale, Head, Department of Hindi Invited as Resource Person*

14 सितंबर 2020 को हिंदी दिवस के उपलक्ष्य में एस.एन.डी.टी. द्वारा संचालित पी. वी. डी. टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर विमेन, मुंबई द्वारा आयोजित हिंदी दिवस समारोह में डॉ. प्रेरणा उबाळे, हिंदी विभागाध्यक्षा जी को प्रमुख वक्ता के रूप में निमंत्रित किया गया था। डॉ. प्रेरणा उबाळे जी ने प्रमुख वक्ता के रूप में "हिंदी भाषा का महत्व" विषय पर व्याख्यान दिया। साथ ही सभी छात्राओं को हिंदी सेवा के लिए अपनी 'आगाज' शीर्षक कविता के माध्यम से प्रेरित किया -






**"इस डगर की मैं हूँ राही,**
**इस भँवर की मैं खिलाड़ी,**
**अलीक खोजने चल पड़ी हूँ**
**बंदिशों को तोड़ चली हूँ ।**
**कदम उठाकर आस से,**
**लड़ पड़ी अविश्वास से,**
**पिंजरा है तोड़ना है तुझे**
**रूढ़ियाँ हैं लाँघनी हैं तुझे,**
**कर बदल दुनिया अपनी,**
**जी लो अब साँसभर**
**अकेले नहीं पर मुक्त हो,**
**नए जीवन का आगाज कर ।**
**नए जीवन का आगाज कर ।"**




# Dr. Prerana Ubale, Head, Department of Hindi Invited as Resource Person















# *Prof. Manisha Mandhare, Department of Botany Invited as Resource Person*

Prof.Manish Mandhare, Department of Botany was invited as Resource Person on Biology for XIIth Science students by PDEA's Shri.Mhalsakant Madhyamik va Uchcha Madhyamik Vidyalaya, Akurdi, Pune on 15th September 2020. The session was taken in Online Mode.

Heartiest congratulations Madam…!!!



PDEA

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
श्री . म्हाळसाकांत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,आकुर्डी पुणे . 44
( कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम )
शाळा मान्यता क्र.S-1(Gen) N.Sc M/PA/PR/POONA 4 Dt.21 .02.1970
020 – 27650474 / 27657893 / 27657227
SMV_akurdi@pdeapune.org युडायस नं . 27252002421
एच . एस . सी . सांकेतिक क्र . 11 . 16 . 004 / एस . एस . सी सांकेतिक क्र . 11 . 16 . 008

संस्था पदाधिकारी | जा . नं : समव /2020-21 | दिनांक :- 14 . 09 . 2020

• अध्यक्ष • अजित पवार
• उपाध्यक्ष • राजेंद्र घाडगे
• मानद सचिव • ॲड . संदीप कदम
• खजिनदार • ॲड . मोहनराव देशमुख
• उपसचिव • पवार एल एम
• मुख्याध्यापक • श्री लाडके एस वी

प्रति,
प्रा . मनिषा मांढरे
मॉडर्न . ज्यु . कॉलेज,
शिवाजीनगर,पुणे

विषय : दिनांक 15 . 09 . 2020 यादिवशी जीव शास्त्र या विषयावर ऑनलाईन व्याख्यान घेणेबाबत......

महोदय,

आमच्या महाविद्यालयात दिनांक 15 . 09 . 2020 रोजी ऑनलाईन व्हिडिओ मिटींग व्दारे इयत्ता 12 वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना जीव शास्त्र या विषयाचे व्याख्यान आयोजित केले आहे .

आपण आमच्या विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करावे ही नम्र विनंती .

आपला विश्वासू
श्री लाडके एस वी
PRINCIPAL
Shri Mhalsakant Vidyalaya & Junior College, Akurdi, Pune - 44



PDEA

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
श्री . म्हाळसाकांत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,आकुर्डी पुणे . 44
( कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम )
शाळा मान्यता क्र.S-1(Gen) N.Sc M/PA/PR/POONA 4 Dt.21 .02.1970
020 – 27650474 / 27657893 / 27657227
SMV_akurdi@pdeapune.org युडायस नं . 27252002421
एच . एस . सी . सांकेतिक क्र . 11 . 16 . 004 / एस . एस . सी सांकेतिक क्र . 11 . 16 . 008

संस्था पदाधिकारी | जा . नं : समव /2020-21 | दिनांक :- 15 . 09 . 2020

• अध्यक्ष • अजित पवार
• उपाध्यक्ष • राजेंद्र घाडगे
• मानद सचिव • ॲड . संदीप कदम
• खजिनदार • ॲड . मोहनराव देशमुख
• उपसचिव • पवार एल एम
• मुख्याध्यापक • श्री लाडके एस वी

प्रति,
प्रा . मनिषा मांढरे
मॉडर्न . ज्यु . कॉलेज,
शिवाजीनगर,पुणे

विषय : दिनांक 15 . 09 . 2020 यादिवशी जीवशास्त्र या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाव्दारे मार्गदर्शन केल्याबाबत......

महोदय,

आमच्या महाविद्यालयात दिनांक 15 . 09 . 2020 रोजी ऑनलाईन व्हिडिओ मिटींग व्दारे इयत्ता 12 वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनासाठी आयोजीत केलेल्या जीव शास्त्र विषयाच्या व्याख्यानामध्ये उपस्थित राहुन आमच्या विद्यार्थ्यांना आपण बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्रथम आपणास धन्यवाद देतो .

आपाले सहकार्य महाविद्यालयास पुढील काळातही वेळोवेळी मिळत राहील ही अपेक्षा पुनश्च मनपुर्वक आभार .

आपला विश्वासू
श्री लाडके एस वी
PRINCIPAL
Shri Mhalsakant Vidyalaya & Junior College, Akurdi, Pune - 44

# Modern Achievements



Rajgad Dynanpeeth's Anantrao Thopte College, Bhor, Maharashtra, India ("A" Grade by NAAC)

Phule, Shahu, Ambedkar Vichar Prasarak Mandal, Bhor, Maharashtra, India

Marathi Speaking Union. (Under the Agies Mauritius of the Ministry of Arts & Culture)

SMP NEGERI 1, Kuta, Bandung, Bali, Indonesia

International Cultural and Social Fourum, Dubai, UAE.

**CERTIFICATE**

This Certificate is awarded to

Prof./Dr./Mrs./Mr. **Dr. Nisha Kishor Bhandare**

for successful Participation in Online International Conference on

"DR. BABASAHEB AMBEDKAR'S GUIDING THOUGHTS IN SOCIAL & NATURAL CALAMITIES ON THE BACKGROUND OF CORONA PANDEMIC"

Organized by **Anantrao Thopte College, Bhor (India) & Phule, Shahu, Ambedkar Vichar Prasarak Mandal, Maharashtra (India)** in association with **Marathi Speaking Union (Mauritius), International Cultural and Social Forum (Dubai), SMP NEGERI 1, Bali (Indonesia)** on **6th September 2020.**

[Mr. Dilip Thanekar] Joint Convenor, Dubai, UAE

[Dr. Beedun Abba] Joint Convenor, Mauritius

[Drs. I Wayan Tur Adnyana] Joint Convenor, Indonesia

[Dr. Rohidas Jadhav] Convenor, India

[Prin.Dr. Prasanna Deshmukh] Convenor, India

Prof.Dr.Nisha Bhandare, Head, Department of Marathi participated in Online International Conference on *'Dr.Babasaheb Ambedkar's Guding Thoughts in Social and Natural Calamities on the background of Corona Pandemic.'* The online conference was organised on 06th Sepetmebr 2020 by Anantrao Thopte College, Bhor and Phule, Shahu, Ambedkar VIchar Prasarak Mandal, Maharashtra inassociation with Marathi Speaking Union (Mauritius), International Cultural and Social Forum(Dubai), SMP NEGERI 1, Bali.

*Congratulations*

## *Modern Achievements*

Prof. Manisha Mandhare, Department of Botany , Modern College, Shivajinagar, Pune-5 received ***Asian Education Awards 2020*** for Contribution to Education Community on 05th September 2020.


ASIAN EDUCATION AWARDS

AEA 2020 AWARDS

Honours

Manisha Mandhare

For

Contribution to Education Community

In recognition of your continuing Excellence in Teaching

Awarded at AEA Conference 2020 took place virtually on 05 . 09 . 2020

MANISH GAUR

DR KUNAL KALA

SH. DILBAGH SINGH

Organized by KITES PRODUCTIONS

Our Partners:








# Modern Achievements

## डॉ. उज्ज्वल दीक्षित






**मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ 'मराठी संशोधन विभागातील' प्रथम पी.एचडी पदवीधारक म्हणुन अभिनंदनत्यांनी 'वि.रा. करंदीकर यांच्या समग्र वाड्ग्मयाचा अभ्यास' या विषयीचे संशोधन प्रबंध डॉ . माधवी खरात यांच्या मार्गदर्शनाने सादर केला. मॅडमची मौखिक परीक्षा ऑनलाइन झाली. ३०-४० अभ्यासक, संशोधक हजर होते. बहिस्थ परीक्षक डॉ . शैलेंद्र लोंढे सर उपस्थित होते,सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठ मराठी विभाग प्रमुखः डॉ .प्रभाकर देसाई सरांनी आयोजक म्हणुन उत्तमरित्या आखणी केली. आपले प्राचार्य डॉ .राजेंद्र झुंजारराव सर, सहसचिव डॉ.प्रकाशदिक्षित सर ही उपस्थित होते. संपूर्ण मराठी विभागातील माझे सहकारी प्राध्यापक होते. दिनांक ९ सप्टेंबर २०२० रोजी विद्यावाचस्पती पदवी धारक झाल्या सर्व मॉडर्न परीवाराच्या वतीने खुप खुप शुभेच्छा.**

Image Courtesy: Google Images

# *Modern Alumni Achievements*

**श्री. सुरेंद्र साबळे, पोलीस नाईक, गुन्हे शाखा, युनिट ०४, पुणे (मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ चे माजी विद्यार्थी व श्री प्रकाश साबळे, सहाय्यक ग्रंथपाल, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ यांचे लहान बंधू) यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने पोल्ट्री फार्म वर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांना अटक केली. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.**






प्रेसनोट दि. १५/०९/२०२०

**"पोल्ट्री फार्मवर दरोडा टाकण्याचे तयारीत असलेल्या दरोडेखोरांना गुन्हे शाखा,युनिट-०४ कडून अटक"**

पुणे पोलीस आयुक्तालयामध्ये होणा-या वाहनचो-या,मोबाईल चो-या व रोड रॉबरी रोखण्यासाठी मा.पोलीस आयुक्त सो यांनी पुणे शहरातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना निर्देश दिलेले आहेत.मा.अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे,मा.पोलीस उपआयुक्त,गुन्हे व मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा वारंवार गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सदबाबत सुचना दिलेल्या आहेत.

सदर सुचनां व मार्गदर्शनानुसार गुन्हे शाखा,युनिट-०४ चे अधिकारी व कर्मचारी पोलीस निरीक्षक,गुन्हे शाखा,युनिट०४ अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली परिमंडळ-०४ चे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुन्हे शाखा युनिट-०४ चे सपोफौ अब्दुलकरीम सय्यद व पोलीस नाईक सुरेंद्र साबळे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, बिंदु माधव ठाकरे चौकाजवळ, संगमवाडी कडे जाणारे रोडवर, येरवडा या ठिकाणी ४ ते ५ इसम थांबलेले असुन त्यांच्या जवळ कोयते, चाकू, वगैरे हत्यारे असुन ते जवळच असलेल्या योजना पोल्ट्री फार्म, येरवडा पुणे या चिकन विक्रीचे सेंटरवर दरोडा टाकण्याच्या तयारीत आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड,सपोफौ अब्दुलकरीम सय्यद, पो.हवा गणेश साळुंके,शितल शिंदे,पो.ना.सुरेंद्र साबळे,राकेश खुणवे,निलेश शिवतरे असे अचानकपणे १९.१० वा. छापा टाकून इसम नामे १) दिलीप विठ्ठल भोई वय २८ वर्षे रा. सध्या-पुणे रेल्वे स्टेशन फिरस्ता, मुळगांव-मु पो शेंदुर्णी वाडी दरवाजा, ता जामनेर, जि जळगांव २) राज्या ऊर्फ विकास सिताराम लांडगे वय ३५ वर्षे रा. सध्या-पुणे रेल्वे स्टेशन फिरस्ता, मुळ रा.राजेंद्रनगर,बोरीवली मुंबई, ३) रोहित शंकर पाटील, वय-२२ वर्षे रा. सध्या-विजय हॉस्पीटलशेजारी, गांधीनगर झोपडपट्टी, पिंपळेगुरव पुणे मुळगांव-आझाद चौक, कोरेगांव जि सातारा ४) विकास दिलीप कांबळे वय २५ वर्षे रा. सध्या-अपर डेपोच्या पाटीमागे, चाळ नं.१, गणपती मंदिराशेजारी, अपर इंदिरानगर पुणे, मुळगांव-मु.बाळे ता.जि. सोलापूर, अशा ०४ इसमांना पकडून बातमीप्रमाणे खात्री केली असता त्यांचे ताब्यात २ लोखंडी कोयते,०१ चाकू व ०१ नायलॉनची दोरी असा मुद्देमाल जप्त केला असून त्यांचा आणखी ०१ साथीदार नाग्या पुर्ण नाव व पत्ता माहीत नाही हा अंधाराचा फायदा घेवून पसार झाला.पकडलेल्या आरोपींकडे तपास केला असता त्यांनी सांगितले की, येरवडा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सादलबाबा दर्ग्याजवळ योजना पोल्ट्री फार्म नावाचे प्रसिध्द होलसेल चिकन विक्री सेंटर असून सदर दुकानावर रविवारी चिकन-मटण खरेदी साठी प्रचंड मोठया प्रमाणात गर्दी होत असते व रविवारी बंद करण्याचे वेळेत त्यांचेकडे मोठया स्वरुपात कॅश असते,म्हणून आम्ही पोल्ट्री फॉर्म बंद झाल्यावर त्यांचे कॅश काउंटरवर दरोडा टाकून मागील नाल्याने दाट झाडीमध्ये पळून जाणार होतो.वगैरे माहिती सांगितल्याने व ०५ ही आरोपीविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.२०९७/२०२० भा.दं.वि कलम-३९९,४०२ आर्म अॅक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कमल-३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करून नमूद ०४ आरोपी अटक करून त्यांना मा.न्यायालयासमक्ष हजर करून त्यांची दि.१६/०९/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

त्यांचेकडे अदयापपर्यंत झालेले तपासामध्ये **येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.२०२४/२०२० भा.दं.वि कलम-३९४,३४** हा गुन्हा उघड झालेला असून दाखल गुन्हयातील चोरी गेलेला १००००/- रुपयाचा मोबाईल फोन व ६०००/-रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.त्याची

**हकिगत:-** दाखल गुन्हयातील फिर्यादी हे रिक्षा चालक असून त्यांना यातील आरोपी क्रमांक १ ते ३ यानी येरवडा ब्रीज या ठिकाणी भावाचा ॲक्सिडेंट झालेला आहे व हॉस्पिटलमध्ये पैसे भरणेसाठी घरीहुन उरळी कांचन येथून पैसे आणायचे आहे,असे सांगून रात्री ०२ वा.सुमारास उरळी कांचन येथे






निर्मनुष्य ठिकाणी नेवून त्याचे गळयाला चाकू लावून लाथा बुक्यांनी मारहाण करुन त्यांचेकडील १००००/-रुपयाचा मोबाईल फोन व ०७०००/-रुपये रोख रक्कम काढून नेली आहे.

तसेच यातील आरोपींनी दापोडी येथील एका रिक्षा चालकाला च-होली या ठिकाणी भाडे असल्याचे भासवून निर्मनुष्य ठिकाणी नेवून त्याचेकडील मोबाईल फोन हिसकावून नेलेबाबत तपासामध्ये निदर्शनास आलेले आहे.दाखल गुन्हयातील आरोपींनी असे अनेक प्रकारचे गुन्हे केले असण्याची शक्यता असून त्याबाबत तपास चालू आहे.

**आरोपींची मोड्स ऑपरेंडी** :- यातील आरोपी हे रिक्षा चालक यांना भाडे आहे असे भासवून निर्जन स्थळी नेतात व त्यांना मारहाण करून त्यांचेकडील मोबाईल फोन व रोख रक्कम लुटतात व त्याच मोबाईल फोनवरुन फिर्यादीच्या नातेवाईकांना फोन करुन फिर्यादीचा ॲक्सिडेंट झालेला आहे त्याला हॉस्पिटलमध्ये अॅडमीट केले आहे,एवढे एवढे पैसे घेवून या असे सांगून एका ठिकाणी बोलावितात व पुन्हा त्यांचेकडील पैसे लुटून नेतात,तसेच पुणे रेल्वेस्टेशनचे बाहेरील निर्जन रोडवरील रेल्वेने आलेल्या प्रवाशाला चाकूचा धाक दाखवून मारहाण करुन मोबाईल फोन व रोख रक्कम काढून घेतात तसेच रेल्वे प्लॅटफार्मवरुन जात असताना रेल्वे ट्रॅकचे बाजूला अंधारात थांबून रेल्वे स्पीड पकडण्यास लागली की,काठीने मोबाईल पाडतात.लुटले गेलेले व्यक्ति हे रेल्वे प्रवासी असल्याने सदरबाबत शक्यतो गुन्हा दाखल न करता निघून जातात व सदर आरोपी हे अगदी तोकडया किंमतीत एखादया वाटसरुला मोबाईल फोन विकतात व आलेल्या पैशामध्ये नशा करतात.

**नागरिकांना आव्हान** :- अशा प्रकारे पुणे शहरामध्ये कोणा व्यक्तिची लुटमार झालेली असल्यास त्यांनी गुन्हे शाखा,युनिट-०४ येथील कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

**सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.अशोक मोराळे,मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.बच्चन सिंह,मा.पोलीस उपआयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे श्री.संभाजी कदम,सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा, श्री.विजय चौधरी,पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड,सहाय्यक पोलीस फौजदार अब्दुलकरीम सय्यद,भालचंद्र बोरकर,पोलीस कर्मचारी गणेश साळुंके,शितल शिंदे,सुरेंद्र साबळे, राकेश खुणवे,निलेश शिवतरे व सुहास कदम यांनी केलेली आहे.**

पोलीस निरीक्षक
युनिट-०४,गुन्हे शाखा,पुणे शहर

## *Modern Alumni Achievements*

# दहा सेकंदांत होणार कोरोनाचे निदान

## अमेरिकास्थित मराठमोळ्या शास्त्रज्ञाने विकसित केले प्रतिपिंडे निदान यंत्र

**पुणे, ता. १८ :** कोरोनाच्या निदानासाठी आता तासन्तास थांबण्याची गरज नाही. केवळ दहा सेकंदांत कोरोनाचे निदान करणारी प्रतिपिंडे (अँटिबॉडी) चाचणी यंत्र विकसित करण्यात अमेरिकास्थित मराठमोळ्या शास्त्रज्ञांना यश आले आहे.

पेनिसिल्वानिया प्रांतातील कार्नेजी मेलॉन विद्यापीठाचे

पान ६ वर »

> **त्रिमितीय छपाई तंत्रज्ञान आधारित सेन्सरवर आम्ही काम करत आहोत. या तंत्रज्ञानाच्या आधारे विकसित केलेले सेन्सर कोरोनाच्या जलद आणि स्वस्त निदानासाठी उपयोगात येणार आहेत. खऱ्या अर्थाने आमच्या तंत्रज्ञानाचा सामान्यांना फायदा होणार आहे.**
> – डॉ. राहुल पानट, सहयोगी प्राध्यापक, कार्नेजी मेलॉन विद्यापीठ



### सीओईपीचे माजी विद्यार्थी डॉ. पानट

पुण्याचे असलेले डॉ. राहुल पानट यांचे शिक्षण गरवारे प्रशाला, मॉडर्न कॉलेजमध्ये झाले आहे. तर, त्यांचे अभियांत्रिकीचे शिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात (सीओईपी) झाले आहे. प्रसिद्ध सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. पी. व्ही. पानट यांचे ते चिरंजीव आहेत.



### संयंत्राची वैशिष्ट्ये

- सर्वांत जलद गतीने निदान करणारे रुपयाच्या नाण्याएवढे संयंत्र
- कोरोनासह भविष्यात इतर संसर्गजन्य आजारांचीही प्रतिपिंडे निदान शक्य
- स्वस्त, जलद आणि सोईस्कर निदान शक्य
- निदानाची अचूकता जास्त

# दहा सेकंदात होणार कोरोनाचे निदान

» पान १ वरून

डॉ. राहुल पानट यांच्या नेतृत्वात आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांच्या चमूने हे संयंत्र विकसित केले आहे.

कोरोनासाठी प्रथमच त्रिमितीय छपाई (थ्रीडी प्रिंटिंग) अभियांत्रिकी आणि इलेक्ट्रोकेमिकल या शाखा एकत्र आल्या आहेत. व्यक्तीच्या रक्तातील कोरोना प्रतिपिंडांच्या शोधावर निदान करणाऱ्या या पद्धतीची अचूकताही जास्त आहे. मोबाईलच्या आकाराच्या या संयंत्रामुळे कोरोना निदानामध्ये मोठी क्रांती होणार आहे.

### कसे होते निदान

- कोरोनाविरुद्ध कार्य करणाऱ्या प्रतिपिंडांचा (अँटिबॉडी) शोध घेण्यासाठी रक्ताचा थेंब इलेक्ट्रोडवर टाकण्यात येतो
- इलेक्ट्रोडवरील प्रतिजनांशी (अँटिजन) अभिक्रिया झाल्यावर विशिष्ट प्रकारचे इलेक्ट्रॉनिक सिग्नल मिळतात
- संबंधित सिग्नल मोबाईलवरही पाहता येतात
- ज्या अर्थी प्रतिपिंडे रक्तात आहे, त्या अर्थी व्यक्तीला कोरोनाची बाधा झाली आहे

### असे आहे संयंत्र

- त्रिमितीय छपाई तंत्रज्ञानाद्वारे (थ्रीडी प्रिंटिंग) १० मायक्रोमीटर जाडीच्या संयंत्राची निर्मिती
- सोन्याच्या अतिसूक्ष्म इलेक्ट्रोडचा (मायक्रोपिलर्स) वापर
- नॅनोपार्टिकलच्या साहाय्याने इलेक्ट्रोडचा भाग खडबडीत करण्यात आला
- पर्यायाने मायक्रोपिलर्सला इलेक्ट्रोकेमिकल अभिक्रियेसाठी जास्त जागा मिळते
- इलेक्ट्रोडवर कोरोनाच्या अँटिजेनचा लेप लावलेला असतो

**Sakaal: 19.9.2020**

# News Paper Clippings During September 2020




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from* http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time.

As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service.

The E-Newspaper Clippings Section is divided into ***Education, Work of Appreciation, Awards and Achievements, Contribution of Institutions towards the Society, Health, Research, Sports, Miscellaneous .***

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

लोकमत

मंत्री उदय सामंत : ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून परीक्षा

# अंतिम सत्राच्या परीक्षा घरूनच ऑनलाइनद्वारे देता येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा घरूनच देता याव्यात यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून या परीक्षांना सुरुवात होणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

विनापरीक्षा पदवी देता येणार नसल्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर परीक्षा कशा घ्याव्यात याबाबत निर्णय घेण्यासाठी कुलगुरूंची समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपला पहिला अहवाल सादर केला आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत सामंत म्हणाले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना घरातूनच परीक्षा देता याव्यात यावर कुलगुरूंचे एकमत झाले आहे. त्यामुळे अशाप्रकारे परीक्षा पद्धतीचे नियोजन करण्यात येत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेंबर महिन्यातच परीक्षा प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले होते. मात्र, आवश्यकता भासल्यास याला मुदतवाढ घेण्याची मुभा सर्वोच्च न्यायालयाने निकालात दिली आहे. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंनी मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

अमरावती आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने १० नोव्हेंबर तर उर्वरित सर्व विद्यापीठांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ मागितली. त्यानुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीत तसा प्रस्ताव मांडला जाईल आणि यूजीसीकडे मुदतवाढ मागितली जाणार आहे. या परीक्षा ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरु होईल. ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत निकालासह सर्व प्रक्रिया पूर्ण करावी आणि ज्या विद्यापीठांना अडचणी आल्या तर त्यांनी निकालाची प्रक्रिया जास्तीत जास्त १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी, अशा सूचना देण्यात आल्याचेही सामंत यांनी सांगितले.

## २ सप्टेंबरच्या बैठकीनंतर पुढील निर्णय



बैठकीत परीक्षा किती तारखेपर्यंत घेऊ शकतो, परीक्षा ऑनलाइन की ऑफलाईन, परीक्षेची तारीख काय असावी, निकालाची तारीख किती असावी, परीक्षा पद्धत कशी असेल, अशा विविध विषयांवर कुलगुरुंशी सविस्तर चर्चा करण्यात आली. परीक्षा पद्धतीसंदर्भात गठीत केलेल्या समितीची बैठक बुधवारी, २ सप्टेंबरला होईल. त्यानंतर पुढील निर्णय घेतले जातील, असेही सामंत म्हणाले.

## प्राधिकरणाचे अधिकार अबाधित राहणार

कुलगुरु आणि परीक्षा प्राधिकरणाचे अधिकार हे त्यांच्या स्तरावर अबाधित राहणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. परीक्षा कधी, कोणत्या पद्धतीने घ्यायची याचा निर्णय विद्यापीठांच्या कुलगुरुंच्या अखत्यारित असेल.

Pune Main
Page No. 3 Sep 01, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

# अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबरमध्ये

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांची माहिती; घरातून पेपर देण्याबाबत नियोजन

**मुंबई, ता. ३१ :** अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना घरी बसूनच परीक्षा देता यावी, अशा परीक्षा पद्धतीचे नियोजन करण्यात येत आहे. याबाबत राज्यातील कुलगुरूंचेही एकमत झाले आहे. त्यानुसार परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देण्यात येणार आहे. या परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्यात येतील. परीक्षा कोणत्या पद्धतीने होतील, याचा निर्णय बुधवारी (ता. २) जाहीर होईल, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत 'झूम'च्या माध्यमातून ऑनलाइन बैठक झाली. बैठकीत परीक्षा किती तारखेपर्यंत घेऊ शकतो, परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन, परीक्षेची तारीख किती असावी, निकालाची तारीख किती असावी, परीक्षा पद्धत कशी असेल, अशा विविध विषयांवर कुलगुरूंशी सविस्तर चर्चा झाली.विद्यापीठांना वेळापत्रक निश्चित करण्यासाठी आणखी एका दिवसाचा अवधी देण्यात आला आहे. त्यानंतर परीक्षा पद्धतीसंदर्भात स्थापन केलेल्या समितीची बैठक उद्या सकाळी होईल. त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आपत्कालीन व्यवस्थापनाची बैठक घेऊन परीक्षेबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे सामंत म्हणाले.

विद्यापीठांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत अंतिम सत्राच्या परीक्षेसंदर्भात निकालासह सर्व प्रक्रिया पूर्ण करावी. ज्या विद्यापीठांना स्थानिक पातळीवर कोरोनाचा प्रादुर्भाव किंवा तांत्रिक अडचणी आल्यास त्यांनी आपली निकालाची प्रक्रिया जास्तीत जास्त १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी, अशा सूचना सामंत यांनी केल्या.

'एटीकेटी'च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचा विचार करता विधी व न्याय विभाग आणि ॲडव्होकेट जनरल यांच्याशी चर्चा करण्यात येणार आहे. यानंतर या परीक्षांचा निर्णयही लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही सामंत यांनी सांगितले.

### बैठकीतील निर्णय

- ३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा व निकालासह प्रक्रिया पूर्ण होईल
- अडचणी असणाऱ्या विद्यापीठांना १० नोव्हेंबरपर्यंत प्रक्रिया पूर्ण करावी लागेल
- राज्यातील ७ लाख ९२ हजार ३८५ विद्यार्थी परीक्षा देणार
- परीक्षेचा पर्याय निवडण्याचे अधिकार कुलगुरूंना

**Sakaal: 1.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

# ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पदवी परीक्षा

## उदय सामंत यांची घोषणा; कुलगुरूंना परीक्षा पद्धत ठरवण्याचे अधिकार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** पदवी-पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात घेण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत असून, ऑक्टोबरअखेरीस निकाल जाहीर करण्यात येतील. परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात याबाबत कुलगुरू घेतील तो निर्णय स्वीकारण्यात येईल, असे उच्चशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत निर्णय घेण्यासाठी आजी-माजी कुलगुरूंची समिती नेमण्यात आली आहे. या समितीबरोबर सामंत यांनी सोमवारी बैठक घेतली. 'राज्यात अंतिम वर्षाचे साधारण ७ लाख ६२ हजार विद्यार्थी आहेत. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा घेऊन ऑक्टोबरअखेरीस निकाल जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्या विद्यापीठांना ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल जाहीर करता येणार नाही, त्यांना १० नोव्हेंबरपर्यंत *(पान ८ वर)*



### अंतिम घोषणा बुधवारी

प्रत्येक विद्यापीठाने त्यांच्या कक्षेतील विभागाचा आढावा घेऊन परीक्षा कशा घ्यायच्या याचा आहवाल समितीला द्यायचा आहे. त्यासाठी समितीच्या अंतिम अहवालास मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रत्येक कुलगुरूंनी दिलेल्या आराखड्यावर बुधवारी (२ सप्टेंबर) सकाळी चर्चा करण्यात येईल. त्यानंतर परीक्षा पद्धत, वेळापत्रक असे तपशील जाहीर करण्यात येईल.

लोकसत्ता Tue, 01 September 2020 https://epaper.loksatta.com/c/54630963

# ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पदवी परीक्षा

**(पान ३ वरून)** मुदत देण्यात येईल. पूर्ण सप्टेंबर महिना विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मिळू शकेल. ही परीक्षा कमी गुणांची असावी तसेच शक्यतो कोणत्याही विद्यार्थ्याला परीक्षा केंद्रापर्यंत यावे लागू नये, त्यासाठी ऑनलाइन परीक्षा, प्रश्नपत्रिका घरी देणे अशा पर्यायांचा विचार करावा. सर्व परीक्षांसाठी शक्यतो एकच पर्याय असावा, अशा सूचना कुलगुरूंना देण्यात आल्या आहेत. परीक्षा कशी घ्यावी, याबाबत कुलगुरूंनी घेतलेला निर्णय मान्य करण्यात येईल,' असे सामंत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### नवे शैक्षणिक वर्ष जानेवारीपासून

सद्यस्थिती पाहता नवे शैक्षणिक वर्ष लगेच सुरू करणे शक्य नाही. ते जानेवारीपर्यंत सुरू होईल, असे दिसत नाही. मात्र, शक्य झाल्यास त्यापूर्वी शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे सामंत यांनी सांगितले.

एटीकेटीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचा विचार करता विधी व न्याय विभाग आणि महाधिवक्ता यांच्याशी चर्चा करून निर्णय जाहीर करण्यात येईल, असे सामंत यांनी संगितले.

लोकसत्ता Tue, 01 https:/

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

# परीक्षार्थींना मुखपट्ट्या, सॅनिटायझर

## केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची शिक्षणसंस्था, विद्यापीठांना सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** देशभरातील विद्यापीठाच्या परीक्षार्थींना परीक्षेच्यावेळी मुखपट्ट्या आणि सॅनिटाझर पुरवण्याची जबाबदारी शिक्षणसंस्थांची राहणार आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने विद्यापीठ आणि शिक्षणसंस्थांसाठी सूचनापत्र जाहीर केले आहे. याशिवाय वय अधिक असलेले प्राध्यापक, गर्भवती कर्मचारी, प्राध्यापक, आजारांची पार्श्वभूमी असलेले कर्मचारी आणि प्राध्यापक यांना परीक्षा केंद्रावर काम देऊ नये असेही स्पष्ट केले आहे.

देशातील विद्यापीठांच्या परीक्षा घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर आता या परीक्षा घेताना विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षा केंद्रीवर मुखपट्टी आणि सॅनिटायझर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शिक्षणसंस्थांची असणार आहे. त्याचप्रमाणे परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या आरोग्यस्थितीबाबत स्वयंघोषणापत्रही घेण्याची सूचना देण्यात आली आहे.



### वेगळा कक्षही ठेवणार

प्रतिबंधीत क्षेत्रातील विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक यांना परीक्षा केंद्रावर बोलावण्यात येऊ असेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. एखाद्या विद्यार्थ्याला परीक्षेदरम्यान काही त्रास होऊ लागल्यास किंवा करोनाची लक्षणे असतानाही विद्यार्थ्यानि परीक्षा देण्याचे ठरवल्यास त्यांच्यासाठी वेगळा कक्ष राखून ठेवावा लागणार आहे. प्रतिबंधित क्षेत्रात परीक्षा केंद्र ठेवता येणार नाही.

### राज्यातील परीक्षांचा निर्णय विद्यापीठांकडे



राज्यातील परीक्षा कधी होणार याचा अंतिम निर्णय बुधवारी जाहीर करणे अपेक्षित असताना अद्यापही हा निर्णय होऊ शकला नाही. दरम्यान उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, सचिव राजीव जलोटा यांनी कुलपती भगतसिंह कोश्यारी यांची बुधवारी भेट घेतली. 'परीक्षा कशा घ्यावा याचा निर्णय विद्यापीठांनी घ्यावा, त्यासाठी राज्यसरकार सहकार्य करेल. परीक्षा सोप्या पद्धतीने घ्याव्यात असे मत कुलपतींनी व्यक्त केले आहे. गुरुवारी सर्व कुलगुरू, कुलपती यांची एकत्रित बैठक होणार आहे,' असे सामंत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### कर्मचाऱ्यांची कमतरता

आरोग्य विभागाच्या सूचनांनुसार प्रतिबंधीत क्षेत्रात राहणारे प्राध्यापक, कर्मचारी यांना परीक्षा केंद्रावर काम देता येणार नाही. त्याचप्रमाणे गर्भवती, आजारांची पार्श्वभूमी असलेले, वय अधिक असलेले प्राध्यापक, कर्मचारी परीक्षा केंद्रावर काम देता येणार नाही. त्यामुळे प्रत्यक्ष परीक्षा घ्यायच्या झाल्यास आहे त्या कर्मचाऱ्यांमध्ये शिक्षणसंस्थांना निभावून न्यावे लागेल.

**Loksatta: 3.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

**लोकमत**

### पहिल्या फेरीतील प्रवेशासाठी उद्या शेवटचा दिवस

**पुणे :** अकरावी प्रवेश ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादीतील २१ हजार विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशास सहमती दर्शविली आहे. तर १५ हजार १०१ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शुल्क भरुन आपला प्रवेश निश्चित केला.

पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय व इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीतर्फे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावीच्या जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात असून ३० ऑगस्ट रोजी पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाली. ४० हजार विद्यार्थ्यांनी ३ सप्टेंबरपर्यंत मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे अपेक्षित आहे. मात्र, १८९०० विद्यार्थ्यांनी अद्याप कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

Pune Main
Page No. 2 Sep 03, 2020
Powered by: erelego.com

**लोकमत**

### १० वी-१२ वीच्या फेरपरीक्षा यथावकाश जाहीर होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दहावी-बारावीच्या फेरपरीक्षांसंदर्भात अद्याप कोणत्याही प्रकारचे वेळापत्रक जाहीर झालेले नाही. दरम्यान, राज्यातील कोरोना प्रादुर्भावाची परिस्थिती पाहता ते यथावकाश जाहीर केले जाणार असल्याची माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली.

राज्य मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या पुनर्परीक्षा सर्वसाधारण स्थितीत ऑक्टोबरमध्ये घेतल्या जातात. परंतु यंदा राज्यावर कोरोनाचे सावट असल्याने या परीक्षा नोव्हेंबर किंवा कदाचित डिसेंबरपर्यंतही लांबणीवर पडतील अशी भीती व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर मंडळातील अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. दर वर्षी दहावी व बारावीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना तत्काळ फेरपरीक्षा देऊन उत्तीर्ण होण्याची संधी गेल्या काही वर्षांपासून दिली जात होती.

Pune Main
Page No. 1 Sep 03, 2020
Powered by: erelego.com

### निम्म्या विद्यार्थ्यांकडून अकरावी प्रवेश निश्चित

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये राबविण्यात येत असलेल्या अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत पहिल्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांपैकी बुधवारपर्यंत १५ हजार १०१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. त्यामुळे उर्वरित २० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आज (३ सप्टेंबर) शेवटचा दिवस आहे.

केंद्रीय ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समितीच्या माध्यमातून अकरावीची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेत ३० ऑगस्टला जाहीर झालेल्या पहिल्या फेरीच्या निवड यादीत ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आले होते. त्यातील १९ हजार ५७५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले होते. त्यामुळे त्यांना या फेरीत प्रवेश घेणे अनिवार्य होते. प्रवेशासाठी ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर अशी मुदत देण्यात आली होती. प्रवेश जाहीर झालेल्या ४० हजार १३ विद्यार्थ्यांपैकी २१ हजार ११३ विद्यार्थ्यांनी वेबसाइटद्वारे 'प्रोसीड फॉर ॲडमिशन'ची प्रक्रिया केली आहे; तर १५ हजार १०१ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत, अशी माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली. दरम्यान, उर्वरित विद्यार्थ्यांना आज गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत प्रवेश घेण्यासाठी मुदत राहणार आहे.

#### विद्यार्थ्यांना व्यवस्थित माहितीच नाही

राज्यात करोना विषाणूच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याचे अकरावी प्रवेश नियंत्रण समितीने स्पष्ट केले आहे. त्याच्या सूचनाही अकरावी प्रवेशाच्या वेबसाइटवर देण्यात आल्या आहेत. मात्र, विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेची व्यवस्थित माहिती झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना 'प्रोसीड फॉर ॲडमिशन' करण्यासाठी शिक्षकच दूरध्वनीद्वारे कळवत आहेत.

**Maharashtra Times: 3.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

४ ते १२ सप्टेंबर या कालावधीत राबवणार : प्रवेश निश्चित करण्यासाठी वाढीव मुदत

# अकरावी प्रवेश; दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : इयत्ता अकरावी प्रवेशासाठी राबविल्या जात असलेल्या ऑनलाइन प्रवेश फेरीच्या दुसऱ्या नियमित फेरीचे वेळापत्रक माध्यमिक उच्चशिक्षण संचालक कार्यालयातर्फे प्रसिद्ध करण्यात आले असून, येत्या ४ ते १२ सप्टेंबर या कालावधीत प्रवेशाची दुसरी फेरी राबविली जाणार आहे. तसेच पहिल्या नियमित फेरीतून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी एका दिवसाची वाढीव मुदत देण्यात आली आहे.

पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय व इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका परिसरातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे.

शिक्षण विभागातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या पहिल्या नियमित फेरीतून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ३ सप्टेंबरपर्यंत प्रवेश निश्चित करण्यास मुदत देण्यात आली होती. परंतु, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना पहिल्या प्रवेश फेरीतून प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करण्यासाठी विलंब होत असल्याचे दिसून आले आहे. तसेच विद्यार्थी, पालक व कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेशासाठी मुदतवाढ मिळावी, अशी विनंती शिक्षण विभागाकडे केली. त्यामुळे पहिल्या नियमित फेरीतून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आपला प्रवेश निश्चित करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

इयत्ता अकरावी प्रवेशाची दुसरी नियमित फेरी ४ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे. या फेरीअंतर्गत ४ सप्टेंबर रोजी रिक्त असलेली पदे दर्शविली जाणार आहेत. तसेच ५ सप्टेंबरपासून दुसऱ्या नियमित फेरीसाठी विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविता येणार आहेत. त्याचप्रमाणे यापूर्वी भरलेले पसंतीक्रम बदलता येणार आहेत. तसेच ५ ते ७ सप्टेंबर या कालावधीमध्ये प्रवेश अर्जाचा पहिला व दुसरा भाग विद्यार्थ्यांना भरता येऊ शकतो. विद्यार्थी मार्गदर्शन केंद्रातून किंवा माध्यमिक शाळांमधून अर्ज व्हेरिफाय आणि एडिट करु शकतील.

दुसऱ्या नियमित प्रवेश फेरी अंतर्गत दिल्या जाणाऱ्या प्रवेशाची गुणवत्ता यादी १० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता प्रसिद्ध केली जाईल.

या फेरीतून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात १० ते १२ सप्टेंबर या कालावधीत प्रवेश घेता येईल. विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास आपल्या लॉगिनमधून प्रोसीड फॉर ॲडमिशन करावे लागेल.

## प्रथम पसंतीक्रमानुसार मिळालेला प्रवेश बंधनकारक ?




पहिला पसंतीक्रम निवडल्यानंतर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक आहे. जर प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही अथवा नाकारला, तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित संधी दिली जाणार नाही. त्यांना केवळ विशेष फेरीमध्ये संधी मिळणार आहे.

### प्रवेश रद्द केल्यास काय होईल ?

- जर घेतलेल्या प्रवेश रद्द करायचा असेल तर विद्यार्थी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाला विनंती करुन आपला प्रवेश रद्द करु शकतात.
- मात्र, घेतलेला प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील नियमित फेरीसाठी प्रतिबंधित करण्यात येणार आहेत. अशा विद्यार्थ्यांना विशेष फेरीपर्यंत थांबावे लागणार आहे.

1 ज्या विद्यार्थ्यांना अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतून बाहेर जायचे असेल किंवा इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यायचा असेल, त्या विद्यार्थ्यांना विड्रॉल ऑफ ॲप्लिकेशन या सुविधेचा वापर करून अर्ज मागे घेता येऊ शकतो. विड्रॉल ऑफ ॲप्लिकेशन केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याचे अर्ज सिस्टीममधून रद्द होईल.

2 मात्र, विद्यार्थ्यांनी सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून पुढे जाणे अपेक्षित आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याने चुकीने विड्रॉल ऑफ ॲप्लिकेशन बटन क्लिक केले तर अर्ज पुन्हा अनविड्रॉ करण्याची सुविधा शिक्षण उपसंचालक लॉगीनमध्ये देण्यात आलेली आहे.

### दुसऱ्या प्रवेश फेरीच्या महत्त्वाच्या तारखा

- ४ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता दुसऱ्या नियमित फेरीची रिक्त पदे दर्शविणे
- दुसऱ्या नियमित फेरीसाठी ५ ते ७ सप्टेंबरपर्यंत पसंतीक्रम नोंदवणे
- ८ ते ९ सप्टेंबर पात्र विद्यार्थ्यांची अंतिम गुणवत्ता यादी तयार करणे
- १० सप्टेंबर रोजी १० वाजता दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे
- १० ते १२ सप्टेंबर या कालावधीत मिळालेला प्रवेश निश्चित करणे

Pune Main
Page No. 3 Sep 04, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

## अकरावीसाठी तीन दिवसांत केवळ १५ हजार प्रवेश

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २ - इयत्ता अकरावीसाठी तीन दिवसांत केवळ १५ हजार १०१ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला. गुणवत्ता यादीत स्थान मिळालेले असतानाही प्रवेशासाठी सोयीचे नामांकित महाविद्यालय मिळाले नसल्याने विद्यार्थी प्रवेशाकडे पाठ फिरवत आहेत.

अकरावी ऑनलाइन प्रवेश फेरीची रविवारी गुणवत्ता यादी जाहीर झाली. यासाठी ७३ हजार ६८५ विद्यार्थ्यांचे अर्ज दाखल झाले होते. त्यातील ६८ हजार ७२ अर्ज पात्र ठरवले आहेत. गुणवत्ता यादीत एकूण ४० हजार १३ विद्यार्थ्यांना संधी मिळाली. यातही प्रथम पसंतीक्रमांक मिळालेल्या १९ हजार ५७५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. २८ हजार ५९ विद्यार्थ्यांना यादी स्थान मिळालेच नाही.

गुणवत्ता यादीत स्थान मिळालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश निश्चितसाठी ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वा.पर्यंत मुदत आहे. आतापर्यंत २१ हजार ११३ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संमती दर्शविली. त्यातील सर्वच विद्यार्थ्यांनी अजूनही प्रवेश नोंदविलेले नाहीत. १८ हजार ९०० विद्यार्थ्यांनी प्रवेशाबाबत काही माहितीच नोंदविलेली नाही.

**Prabhat: 3.9.2020**



## सोप्या पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत राज्यपाल सकारात्मक

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) - विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या संदर्भात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली. सोप्या पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत राज्यपाल सकारात्मक असल्याचे या भेटीनंतर उदय सामंत यांनी सांगितले. दरम्यान, उद्या राज्यपाल व उच व तंत्रशिक्षण मंत्र्यांची पुन्हा एक बैठक होणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राजभवनावर जाऊन राज्यपाल कोश्यारी यांची भेट घेतली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या संदर्भात यावेळी चर्चा झाली. यावेळी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, उच्चशिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजीव जलोटाही यावेळी उपस्थित होते.

**Saamana: 3.9.2020**

## अंतिम वर्ष परीक्षांचा पॅटर्न ठरण्याची चिन्हे

प्रभात वृत्तसेवा



**परीक्षा सोप्या पद्धतीने घेण्याचा विचार करा**

पुणे, दि. २ - 'विद्यापीठ, महाविद्यालयांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा सोप्या पद्धतीने कशा घेता येतील यावर विचार करावा. कुलगुरू यांचे काय म्हणणे आहे ते जाणून घ्यावे. समितीचा अहवाल आल्यानंतर त्यावर चर्चा करून विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा,' अशा सूचना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी दिल्या आहेत.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राज्यपालांची भेट घेतली. अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत करून केलेली कार्यवाही, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षाबाबतच्या भावना, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकांची माहिती सामंत यांनी राज्यपालांना दिली. यावेळी राज्यपालांनी वरील सूचना दिल्या. गुरुवारी (दि.३) दुपारी ४ वाजता राज्यपालांच्या उपस्थितीत सर्व अकृषी विद्यापीठाचे कुलगुरू यांची बैठक होणार आहे. या बैठकीनंतर राज्य आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होणार आहे. त्यात समितीचा अहवाल सादर केला जाणार आहे.

'सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेण्याबाबतचे निर्देश दिल्यानुसार राज्यात पदवी परीक्षा रद्द न करता विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी परीक्षा केंद्रापर्यंत जावे लागणार नाही,' असे सामंत यांनी स्पष्ट केले आहे. 'या विषयावर राज्यपालही सकारात्मक आहेत. विद्यार्थ्यांना फार त्रास न होता परीक्षा घ्यायला हव्यात, असेच राज्यपालांचेही मत आहे,' असे सामंत यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या नेतृत्वाखालील समितीच्या बैठकाही होत आहेत. पदवी परीक्षा कधी आणि कशा पद्धतीने घेण्यात येतील याबाबतची अंतिम घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे.

**Prabhat: 3.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### अंतिम वर्षाच्या परीक्षेची पद्धत व वेळापत्रकाबाबत दोन दिवसांत निर्णय

**सीईटीचे वेळापत्रकही ठरविणार**

राज्यातील सीईटीच्या परीक्षाही ऑक्टोबर महिन्यात घेण्यात येणार आहेत. सीईटीच्या परीक्षांसाठी सर्व यंत्रणा कार्यान्वित झाल्या आहेत, असे सांगतानाच अंतिम वर्षाच्या परीक्षेचे वेळापत्रक ठरविल्यानंतर सीईटीच्या परीक्षेचे वेळावत्रक ठरविण्यात येईल, असे उदय सामंत यांनी सांगितले.

मुंबई, (प्रतिनिधी) : ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार, अशी घोषणा राज्य सरकारने केली असली, तरी परीक्षेचे वेळापत्रक व या परीक्षा कशा घेतल्या जाणार याबाबतचा निर्णय अजून झालेला नाही. यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी राज्यपाल व कुलपती भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेऊन चर्चा केली. आज (गुरुवारी) दुपारी राज्यपालांनी राज्यातील सर्व कुलगुरूंची बैठक बोलावली असून, येत्या दोन दिवसांत अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत अंतिम निर्णय होईल, अशी माहिती सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

सर्वोच्च न्यायालयाने पदवी परीक्षा रद्द करता येणार नाहीत, असा निर्णय दिल्याने राज्य सरकारला परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. परीक्षांची तारीख व पद्धती निश्चित करण्यासाठी कुलगुरूंची समिती नेमण्यात आली होती. या समितीने ऑक्टोबर महिन्यात परीक्षा घेण्याची शिफारस केली असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार करून या परीक्षा ऑनलाइन घेण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. उदय सामंत यांनी काल राज्यपालांची भेट घेऊन त्यांना याबाबतची पूर्ण माहिती दिली. परीक्षेसंदर्भात आज राज्यपालांसोबत सर्व अकृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंची बैठक होणार आहे. पुढील दोन दिवसांत हा विषय मार्गी लागेल, असे सामंत यांनी सांगितले.

'विद्यार्थ्यांना कमीत कमी त्रास होईल, अशा पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी राज्यपालांनीदेखील सकारात्मक भूमिका दाखवली आहे. परीक्षा सहज, सोप्या पद्धतीने कशा घेता येतील, तसेच विद्यार्थ्यांना मानसिक तणाव न येता परीक्षा घ्याव्यात यावर विचार करावा, अशा सूचना राज्यपालांनी केल्याचे सामंत यांनी सांगितले.

Kesari: 3.9.2020

### पुणे विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ स्थगित

पुणे, दि. २ - माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या निधनामुळे राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा गुरुवारी (दि.३) होणारा ऑनलाइन पदवीप्रदान समारंभ स्थगित केला आहे. पुढील तारीख लवकरच कळविण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले. यात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे अध्यक्षपद भूषविणार होते. विद्यार्थ्यांनी अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर येत्या १५ दिवसांत पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येणार आहे.

Prabhat: 3.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

शहर

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ स्थगित

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या निधनामुळे गुरुवारी (दि. ३) होणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ स्थगित करण्यात आला आहे. पुढील तारीख लवकरच कळविली जाईल, असे विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे. प्रणव मुखर्जी यांच्या निधनामुळे राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे हा समारंभ स्थगित करण्यात आला आहे. हा समारंभ गुरुवारी संध्याकाळी ४.३० वाजता ऑनलाइन पद्धतीने होणार होता. यामध्ये राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, फोर्स मार्शल प्रा. लि.चे सह अध्यक्ष डॉ. नौशाद डी. फोर्ब्स हे प्रमुख अतिथी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित असणार होते. २०१८-१९ मध्ये व तत्पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विविध विद्याशाखांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील एकूण ७ हजार ३५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे वितरित करण्यात येणार आहेत. त्यापैकी १०४ पीएच. डी. पदवी प्रमाणपत्रांसाठी अर्ज केलेले विद्यार्थी आहेत. सदर पीएच. डी. विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान समारंभात पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत.

Saamana: 3.9.2020

### दोन विद्यार्थ्यांत सहा फुटांचे अंतर

#### परीक्षांसाठी केंद्राची मार्गदर्शक तत्वे

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेताना दोन विद्यार्थ्यांमध्ये सहा फुटांचे अंतर ठेवणे बंधनकारक असणार आहे. तसेच गरज भासल्यास विद्यार्थ्यांना मास्क, सॅनिटायझर पुरविणे ही जबाबदारी शिक्षण संस्थांची असणार आहे, अशा महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना बुधवारी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने विद्यापीठ आणि शिक्षण संस्थांसाठी जारी केल्या आहेत. याशिवाय वय अधिक असलेले प्राध्यापक, गर्भवती कर्मचारी, प्राध्यापक, आजारांची पार्श्वभूमी असलेले कर्मचारी आणि प्राध्यापक यांना परीक्षा केंद्रावर काम देऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

केंद्रावर थर्मल स्क्रीनिंगची सुविधा उपलब्ध करून द्यावी, केंद्रावर आल्यानंतर कोणाला लक्षणे आढळल्यास त्यांचे विलगीकरण करावे, अशी सूचनाही करण्यात आली आहे.



**महत्त्वाच्या सूचना**

- जास्त गर्दी होणार नाही अशा प्रकारे आसन व्यवस्थेचे नियोजन करावे.
- जागोजागी साबण, सॅनिटायझर, मास्क आदींची उपलब्धता करून द्यावी.
- विद्यार्थ्यांनी स्वत:चे मास्क, पाण्याची बाटली, सॅनिटायझर, ओळखपत्र बाळगावे.
- एखाद्या विद्यार्थ्याला करोनाची लक्षणे असतील, तर त्याला जवळील आरोग्य केंद्रातून परीक्षा देण्याची सुविधा द्यावी.

Maharashtra Times: 3.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# अकरावी प्रवेशासाठी आजपर्यंत मुदत

## दुसऱ्या फेरीची यादी १० ऑगस्टला

**पुणे, ता. ३ :** 'कोरोनामुळे विद्यार्थी आणि पालकांना अकरावी प्रवेश घेण्यास विलंब होत आहे. तसेच अद्याप निश्चित झालेल्या प्रवेशाची संख्या देखील कमी आहे. त्यामुळे पहिल्या नियमित गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आता शुक्रवारपर्यंत (ता. ४) मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रवेश घेऊ शकणार आहेत. अकरावीच्या दुसरी नियमित गुणवत्ता यादी १० सप्टेंबर रोजी जाहीर होणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक दिनकर पाटील यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

अकरावी प्रवेशाची पहिली नियमित गुणवत्ता यादी ३० ऑगस्टला जाहीर झाली होती. या यादीत निवड



झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी यापूर्वी गुरुवारपर्यंतची (ता.३) मुदत दिली होती. परंतु आता प्रवेशासाठी शुक्रवारपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास आपल्या लॉगिनमध्ये त्यांनी 'प्रोसीड फॉर ॲडमिशन'वर क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधित महाविद्यालयांशी संपर्क साधून प्रवेश निश्चित करून घ्यावा. त्यानंतर एडमिशनचे पत्र प्रिंट काढून ठेवावे.

### विद्यार्थी आणि पालकांसाठी सूचना

- पहिला पसंतीक्रम मिळाला असल्यास विद्यार्थ्यांनी निवडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.
- प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही अथवा नाकारला तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये संधी दिली जाणार नाही. त्यांना केवळ विशेष फेरीमध्ये संधी मिळू शकेल.
- विद्यार्थ्यांना घेतलेला प्रवेश रद्द करायचा असल्यास तशी विनंती संबंधित कनिष्ठ महाविद्यालयास करावी.
- घेतलेला प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित करण्यात येतील.

### 'विड्रॉवल ऑफ ॲप्लिकेशन'ची सुविधा

अकरावी प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडायचे असल्यास आणि इतर अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा असल्यास त्या विद्यार्थ्यांनी 'विड्रॉवल ऑफ ॲप्लिकेशन' सुविधेचा वापर करावा. तसेच 'विड्रॉवल ऑफ ॲप्लिकेशन' या सुविधेचा वापर केल्यानंतर त्या विद्यार्थ्यांचा अर्ज सिस्टीममधून रद्द होईल. परंतु एखाद्या विद्यार्थ्याने चुकून 'विड्रॉवल एप्लिकेशन' हे बटण क्लिक केले असल्यास हा अर्ज पुन्हा 'अनविड्रॉव' करण्याची सुविधा शिक्षण उपसंचालक यांच्या लॉगिन दिली आहे.

**Sakaal: 4.9.2020**

# प्रवेशाला थंड प्रतिसाद

## अकरावीच्या दुसऱ्या फेरीला आजपासून सुरुवात

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात येणाऱ्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीला विद्यार्थ्यांनी थंड प्रतिसाद दिल्याने, प्रवेश घेण्यासाठी मुदत आज शुक्रवार ४ सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यासोबतच दुसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, दुसरी फेरी आज, शुक्रवारपासून सुरू होत आहे. या प्रवेशफेरीच्या निवडयादीत नाव जाहीर होणाऱ्या विद्यार्थ्यांना १० ते १२ सप्टेंबर या कालावधीत प्रवेश घ्यायचा आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. प्रवेश प्रक्रियेतील पहिली गुणवत्ता यादी रविवारी ३० ऑगस्ट रोजी जाहीर झाली. मात्र, करोना स्थितीमुळे या यादीत अलॉट झालेल्या कॉलेजांमध्ये प्रवेश निश्चित करण्यास विलंब होत आहे.

परिणामी प्रवेश निश्चितीसाठी आज (४ सप्टेंबर) सायंकाळी पाच वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवेश जाहीर झालेल्या ४० हजार १३ विद्यार्थ्यांपैकी गुरुवारी सायंकाळपर्यंत २२ हजार ८५३ विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले होते, तर १५ हजार ४ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही सुरू केली नसून, उर्वरित विद्यार्थी प्रवेशाच्या प्रक्रियेत आहेत. त्यामुळे ही मुदतवाढ दिली आहे; शिवाय नियमित फेरी दोनचे वेळापत्रकही शिक्षण विभागाने जाहीर केले आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मिळालेल्या महाविद्यालयात त्याला प्रवेश घ्यायचा असेल, तर त्याने आपल्या 'लॉग इन'मध्ये 'प्रोसिड फॉर ॲडमिशन' क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधित कॉलेजशी संपर्क साधून, आपला प्रवेश निश्चित करून घ्यावा; तसेच 'ॲडमिशन लेटर'ची प्रिंट काढून ठेवावी. अधिक माहिती प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाइटवर आहे.

### दुसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक

- रिक्त जागांची यादी प्रसिद्ध : ४ सप्टेंबरला रात्री १० वाजता
- पसंतिक्रम नोंदविण्यासाठी मुदत : ५ ते ७ सप्टेंबर
- दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी प्रसिद्ध : १० सप्टेंबरला १० वाजता
- प्रवेश निश्चित करण्यासाठी मुदत : १० ते १२ सप्टेंबर
- प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध : १२ सप्टेंबरला रात्री ८
- तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील : १२ सप्टेंबरला रात्री १० वाजता

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

**Maharashtra Times: 4.9.2020**

## News Paper Clippings During September 2020

### Section: Education

6/9/2020

# डिस्टिंक्शनही अपुरे

## बारावीत ८० टक्क्यांपेक्षा कमी गुण असलेले प्रवेशापासून वंचित

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. ५ : मला बारावीत ७६ टक्के आहेत. बीकॉमला प्रवेश घेण्यासाठी पुण्यातील सात ते आठ महाविद्यालयांना अर्ज केले; पण ८० टक्क्यांपेक्षा जास्त कटऑफ असल्याने मला कोठेही प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे वर्ष वाया जाते की काय, अशी भीती वाटतेय... ही कैफियत आहे तनिष्का घारे या विद्यार्थिनीची.**

तिच्यासारखीच अवस्था पुण्यातील हजारो विद्यार्थ्यांची झाली आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांना जागा वाढवून द्याव्यात, या मागणीने जोर धरलाय. एके काळी डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांवर कौतुकाची थाप पडायची; पण आता मात्र डिस्टिंक्शनही अपुरे पडत आहे, अशी प्रतिक्रिया विद्यार्थी देत आहेत.

कोरोनामुळे बाहेरचे विद्यार्थी पुण्यात येणार नाहीत, अशी शक्यता होती; पण ती फोल ठरली. मेडिकल, इंजिनिअरिंग, फार्मसी, कृषी, विधी या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा झालेल्या नाहीत. त्यामुळे या क्षेत्राच्या विद्यार्थ्यांनी देखील पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांसाठी अर्ज केले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना कमी गुण आहेत, त्यांना प्रवेश मिळणे अवघड झाले आहे.

**अडीचपट अर्ज वाढले**

बारावीचा चांगला लागलेला निकाल आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांची लांबलेली प्रवेश प्रक्रिया यामुळे पदवी अभ्यासक्रमांना चांगला प्रतिसाद आहे. मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, "पदवी अभ्यासक्रमासाठी मॉडर्नची क्षमता दोन हजार जागांची आहे; पण यंदा १७ हजार अर्ज आले आहेत." ज्यांना ८० पेक्षा कमी टक्के आहेत, त्यांना दहापैकी एकाही महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही. त्यांना प्रवेश मिळावा म्हणून जागा वाढवून द्याव्यात, अशी मागणी केल्याचे महाराष्ट्र नागरी कृती समितीचे सुरेश जैन यांनी सांगितले.

**पुण्यातील स्थिती**



- **५०** महाविद्यालयांची संख्या
- **५० ते ५५ हजार** प्रवेश क्षमता
- **१ लाख** अर्ज करणारे विद्यार्थी

**Sakaal: 6.9.2020**

पुढारी

## विद्यापीठाची अंतिम वर्ष परीक्षा १० ऑक्टोबरपासून

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा १० ते २२ ऑक्टोबरदरम्यान घेतल्या जाणार आहेत.

बहुपर्यायी स्वरुपाची प्रश्नपत्रिका आणि ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली. राज्य शासनाच्या पान २ वर

- **बहुपर्यायी ऑनलाइन परीक्षा**
- **१५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा**

**'त्या' विद्यार्थ्यांना ऑफलाइनचा पर्याय-** पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील गावी असलेल्या, ऑनलाइन परीक्षा देण्यासाठीच्या सुविधा नसलेल्या विद्यार्थ्यांना जवळच्या महाविद्यालयात जाऊन ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देता येणार आहे.

Pune Edition
Sep 6, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## विद्यापीठाची अंतिम वर्ष परीक्षा १० ऑक्टोबरपासून

निर्णयानुसार विद्यापीठाने परीक्षांचे नियोजन केले आहे. त्यासंदर्भात विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाची शुक्रवारी बैठक झाली. या बैठकीत संभाव्य वेळापत्रकासह काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार बॅकलॉग विद्यार्थ्यांची परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर दरम्यान घेतली जाईल. नियमित अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा १० ते २२ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. तसेच १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार आहे.

Pune Edition
Sep 6, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### ऑनलाइन परीक्षा आता कशा काय शक्य?

**पुणे** : अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात अडचणी असल्याचे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात सादर करणाऱ्या उच्च शिक्षण संचालकांनी आता अंतिम वर्ष परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याबाबतचे निर्देश परिपत्रकाद्वारे दिले आहेत. त्यामुळे आता ऑनलाइन परीक्षा घेणे कसे शक्य झाले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विद्यापीठांच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या होत्या. त्यावेळी परीक्षा घेण्यात काय अडचणी आहेत याचे प्रतिज्ञापत्र राज्य शासनाच्या वतीने उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी सादर केले होते. प्रतिज्ञापत्रात वाढत्या करोना संसर्गासह ऑनलाइन परीक्षा का शक्य नाहीत याची कारणेही त्यांनी दिली होती. 'विद्यापीठ अनुदान आयोगाने परीक्षा घेण्यासाठी विविध पर्याय दिले आहेत. त्यात ऑनलाइन परीक्षेचाही पर्याय आहे. मात्र ऑनलाइन परीक्षा घेण्यात काही मर्यादा आहेत. अचानकपणे वीज जाणे, ग्रामीण भागात इंटरनेटच्या सुविधांचा अभाव, अशी कारणे डॉ. माने यांनी नमूद केली होती. सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्ष परीक्षा घेण्याचा निर्णय दिल्यानंतर शासनाने परीक्षा घेण्याच्या नियोजनासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. या समितीने आपला अहवाल २ सप्टेंबरला शासनाला सादर केला. या पार्श्वभूमीवर डॉ. धनराज माने यांनी परीक्षांच्या आयोजनासंदर्भात ३ सप्टेंबरला सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना परिपत्रक पाठवले आहे.

**परिपत्रकात काय?** : 'विद्यार्थ्यांच्या आरोग्याला बाधा न होण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा घ्याव्यात, १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा, १ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान अंतिम परीक्षा घेऊन निकाल जाहीर करण्यात यावा, परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम, परीक्षेचे वेळापत्रक या संदर्भात विद्यार्थ्यांना लवकरात लवकर कळवावे' असे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र प्रतिज्ञापत्रात लिहिल्याप्रमाणे ऑनलाइन परीक्षांसाठी एवढ्या अडचणी असतील, तर आता ऑनलाइन परीक्षा कशा शक्य झाल्या हा प्रश्न निर्माण होत आहे. या संदर्भात माहिती घेण्यासाठी डॉ. माने यांना संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

लोकसत्ता Sun, 06 September 2020 https://epaper.loksatta.com/c

### नव्या शैक्षणिक धोरणाचा सर्वसमावेशक ऊहापोह

#### केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांच्याशी वेबसंवाद

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**लोकसत्ता विश्लेषण**

कार्यक्रमात सहभागासाठी http://tiny.cc/LS_Vishleshan_10Sep येथे नोंदणी आवश्यक.

**पुणे** : देशातील शिक्षण व्यवस्थेची पुढील काही वर्षांतील दिशा ठरवणाऱ्या नव्या शैक्षणिक धोरणामागील विचार, त्याची अंमलबजावणी याचा सर्वसमावेशक ऊहापोह 'लोकसत्ता विश्लेषण' या कार्यक्रमात होणार आहे. केंद्रीय पर्यावरण, माहिती आणि प्रसारणमंत्री मंत्री प्रकाश जावडेकर यांचा सहभाग असलेला हा वेबसंवाद गुरुवारी (१० सप्टेंबर) सायंकाळी पाच वाजता होईल.

पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते संशोधनापर्यंतचा समावेश असलेल्या शिक्षण क्षेत्रासाठीच्या धोरणात नव्या शैक्षणिक धोरणामुळे ३४ वर्षांनी बदल होणार आहे. शिक्षण व्यवस्थेची नवी संरचना, ऑनलाइन अभ्यासक्रमांचा समावेश, संशोधनावर भर, आंतरविद्याशाखीय शिक्षणाला प्रोत्साहन, विद्यार्थ्यांमधील कौशल्यांचा विकास, विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार अभ्यासक्रमांमधील लवचिकता, केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाला शिक्षण मंत्रालय अशी ओळख अशी नव्या शैक्षणिक धोरणाची अनेक वैशिष्ट्ये आहेत.

नवे शैक्षणिक धोरण तयार करण्याची प्रक्रिया प्रकाश जावडेकर केंद्रीय मनुष्यबळ मंत्री असतानाच सुरू झाली होती. त्यामुळे नवे शैक्षणिक धोरण तयार करण्यामागील विचार, येत्या काळात धोरणाची अंमलबजावणी कशी केली जाईल या संदर्भातील केंद्र सरकारची भूमिका जावडेकर 'लोकसत्ता विश्लेषण' या कार्यक्रमात मांडणार आहेत. शिक्षण अभ्यासक आणि विद्यार्थी-पालकांना हा वेबसंवाद उपयुक्त ठरेल.

लोकसत्ता Sun, 06 September 2020 https://epaper.loksatta.com/c/54756082

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### नव्या शैक्षणिक धोरणाबाबत जावडेकर यांच्याशी वेबसंवाद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** देशातील शिक्षण व्यवस्थेची पुढील काही वर्षांतील दिशा ठरवणाऱ्या नव्या शैक्षणिक धोरणामागील विचार, त्याची अंमलबजावणी याचा सर्वसमावेशक ऊहापोह 'लोकसत्ता विश्लेषण' या कार्यक्रमात होणार आहे. केंद्रीय पर्यावरण, माहिती आणि प्रसारणमंत्री मंत्री प्रकाश जावडेकर यांचा सहभाग असलेला हा वेबसंवाद गुरुवारी (१० सप्टेंबर) सायंकाळी पाच वाजता होईल.

पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते संशोधनापर्यंतचा समावेश असलेल्या शिक्षण क्षेत्रासाठीच्या धोरणात नव्या

लोकसत्ता विश्लेषण

कार्यक्रमात सहभागासाठी http://tiny.cc/LS_Vishleshan_10Sep येथे नोंदणी आवश्यक.

शैक्षणिक धोरणामुळे ३४ वर्षांनी बदल होणार आहे. शिक्षण व्यवस्थेची नवी संरचना, ऑनलाइन अभ्यासक्रमांचा समावेश, संशोधनावर भर, आंतरविद्याशाखीय शिक्षणाला प्रोत्साहन, विद्यार्थ्यांमधील कौशल्यांचा विकास, विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार अभ्यासक्रमांमधील लवचिकता, केंद्रीय मनुष्यबळ



मंत्रालयाला शिक्षण मंत्रालय अशी ओळख अशी नव्या शैक्षणिक धोरणाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. नवे शैक्षणिक धोरण तयार करण्याची प्रक्रिया प्रकाश जावडेकर केंद्रीय मनुष्यबळ मंत्री असतानाच सुरू झाली होती. त्यामुळे धोरण तयार करण्यामागील विचार, येत्या काळात धोरणाची अंमलबजावणी कशी केली जाईल या संदर्भातील केंद्र सरकारची भूमिका 'लोकसत्ता विश्लेषण' या कार्यक्रमात जावडेकर मांडणार आहेत. शिक्षण अभ्यासक आणि विद्यार्थी-पालकांना हा वेबसंवाद उपयुक्त ठरेल.

लोकसत्ता Mon, 07 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54772443

---

लोकमत

### अंतर्गत गुण : कोरोनामुळे दंडाला व्यवस्थापन परिषद सदस्यांचा नकार

# परीक्षा विभागाकडून प्राध्यापकांवर दंडाची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या विविध परीक्षांचे अंतर्गत गुण योग्य पद्धतीने न भरणाऱ्या प्राध्यापकांवर विद्यापीठाने दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला असून, संलग्न महाविद्यालयांकडे याबाबत नोटीसही पाठवली आहे. मात्र, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत प्राध्यापकांवर कारवाई करू नये, अशी भूमिका विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्यांनी घेतली आहे.

विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे अंतर्गत गुण योग्य तऱ्हेने भरण्याची संपूर्ण जबाबदारी संयुक्तपणे संबंधित विषय शिक्षक व महाविद्यालयांची असून याबाबत त्रुटी आढळल्यास महाविद्यालय आणि संबंधित शिक्षकांकडून प्रतिविद्यार्थी १ हजार रुपये दंड आकारला जाईल. तसेच त्याची अंमलबजावणी २०२० च्या उन्हाळी परीक्षांपासून केली जाईल, असे परिपत्रक ऑगस्ट महिन्यात विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यानुसार विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयामधील प्राध्यापकांना दंड भरण्याबाबत नोटीस पाठविण्यात आली आहे.

विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर अंतर्गत गुण स्वीकारण्याबाबत विनंती करणाऱ्या महाविद्यालयांवर विद्यापीठाकडून नोव्हेंबर २०१८ पासून कारवाई केली जात आहे. त्यात विविध अनुदान योजनांचा लाभ न देणे, गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ न देणे, दहा टक्के वाढीव जागा न देणे, विविध प्रकारचे पुरस्कार आदींपासून महाविद्यालयांना दोन वर्षे कालावधीसाठी अपात्र ठरवणे या स्वरूपाची कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, ऑगस्ट महिन्यात त्यात सुधारण करून नवीन नियमावली व कार्यपद्धती प्रसिद्ध करण्यात आली होती.

दरम्यान, विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत (बीओई) अंतर्गत गुणांबाबत चर्चा करण्यात आली. त्यात विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संजय चाकणे व डॉ. विलास उगले यांनी विद्यापीठाने प्राध्यापकांकडून दंडात्मक रक्कम आकारू नये, असे मत मांडले.



**कोरोनामुळे** विद्यापीठातर्फे उशिरापर्यंत विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारले जाते होते. तसेच प्राप्त होणाऱ्या अर्जानुसार विद्यापीठाकडून महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांची माहिती पाठवून अंतर्गत गुण भरण्याबाबत सूचना दिल्या जात होत्या.

**लॉकडाऊन** असूनही बहुतांश प्राध्यापक महाविद्यालयात येऊन अंतर्गत गुण भरत होते. मात्र, काही प्राध्यापकांना गुण भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे विद्यापीठाने संबंधित प्राध्यापकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे.

> कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत विद्यापीठाने कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचे शुल्क व दंड आकारू नये, असा धोरणात्मक निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत घेण्यात आला आहे. त्यामुळे प्राध्यापकांकडून अंतर्गत गुणांचा दंड घेणे चुकीचे होईल.
>
> **- राजेश पांडे,** सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार प्राध्यापकांनी अंतर्गत गुण भरुन देणे बंधनकारक आहे. ज्या प्राध्यापकांकडून अंतर्गत गुण भरुन देण्यात अनियमितता झाली त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई होणार आहे.
>
> **- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Hello Pune
Page No. 1 Sep 07, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# 'एमसीक्यू'मुळे विद्यार्थ्यांची 'परीक्षा'



## निकालावर परिणामाची शक्यता; विद्यापीठाकडून स्पष्टता आवश्यक

सकाळ EXCLUSIVE

**ब्रिजमोहन पाटील :**
सकाळ वृत्तसेवा

**काय म्हणतात विद्यार्थी...**

- अभ्यासक्रम कोणता हे जाहीर करा.
- क्रेडिट सिस्टिममध्ये मूल्यमापन कसे होणार?
- इतर राज्यांप्रमाणे असाइनमेंट बेस परीक्षा घ्या.
- परीक्षा ऑनलाइन घ्यायची होती तर सहा महिने वाया का घालविले?

पुणे, ता. ६ : पदवीची गुणवत्ता राखण्यासाठी अंतिम वर्षाच्या परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. पण, आतापर्यंत सर्व तयारी दीर्घोत्तरी प्रश्नांच्या दृष्टीने केलेली आहे. 'एमसीक्यू'साठी प्रश्न संच उपलब्ध नाहीत, प्रश्न कसे विचारले जातील, याचा अंदाज नाही. मग एवढ्या कमी वेळात नव्या परीक्षा पद्धतीची तयारी करायची कशी? यावर विद्यापीठांची स्पष्टता गरजेची आहे, अन्यथा निकालावर परिणाम होण्याची भीती विद्यार्थ्यांमध्ये आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह इतर विद्यापीठांनी एमसीक्यू पद्धतीने अंतिम वर्षाची परीक्षा घेतली जाणार असल्याचे स्पष्ट केले. यावरून विद्यार्थी गोंधळात पडले आहेत.

बीएस्सी तृतीय वर्षातील प्रीतम वाकलकर म्हणाला, "परीक्षा झाली पाहिजे; पण माझ्या कॉम्प्युटर सायन्स या विषयाचे प्रश्न 'एमसीक्यू'मध्ये कसे विचारणार? त्याची तयारी कशी करायची? हे मला समजत नाही.

पान २ वर »

**एमसीक्यू पद्धतीने परीक्षा होणार म्हणून विद्यार्थ्यांनी घाबरून जाऊ नये. जो अभ्यासक्रम शिकवला आहे, त्याचा व्यवस्थित अभ्यास करावा. प्रश्नांची संख्याही योग्य असेल. पुणे विद्यापीठाने यापूर्वी एमबीए आणि इंजिनिअरिंगच्या परीक्षा घेतल्या आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेतली जाईल.**
**- डॉ. पराग काळकर,**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, पुणे विद्यापीठ

**Sakaal: 7.9.2020**

लोकमत

# अकरावी प्रवेशासाठी नोंदणी लाखाच्या पुढे

## दुसरी फेरी सुरु : पसंतीक्रम भरण्याचा सोमवारी अंतिम दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे:** पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील अकरावी प्रवेशासाठी राबविल्या जात असलेल्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येने एक लाखाचा आकडा ओलांडला आहे. तसेच प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीसाठी महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदवण्याचा सोमवारी (दि.७) शेवटचा दिवस आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक पसंतीक्रम नोंदवावेत असे आवाहन इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीतर्फे करण्यात आले आहे.

पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय व इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीतर्फे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी प्रवेशाच्या १ लाख ६ हजार ७७५ जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. आतापर्यंत या जागांच्या प्रवेशासाठी १ लाख १४६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील ८३ हजार २६७ विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन लॉक केला असून ८२ हजार ६४८ विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून झाले आहेत. तर, एकूण ७४ हजार २१४ विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरले आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या जागांपैकी ३० हजार ६०२ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून, प्रवेशासाठी ७६ हजार १७३ जागा उपलब्ध आहेत.

### ऑनलाइन अर्ज



1 अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीसाठी आतापर्यंत ७७ हजार ७२१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील ७६ हजार १९७ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरुन पूर्ण केला आहे.

2 ७४ हजार २१६ विद्यार्थ्यांनी अर्ज लॉक केला आहे. मात्र, विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीतून प्रवेश मिळण्यासाठी सोमवारपर्यंत अर्ज भरण्यास मुदत देण्यात आली आहे.

Hello Pune
Page No. 4 Sep 07, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# दहावी, बारावी फेरपरीक्षा होणार की नाही?

## राज्य मंडळाने संभ्रम दूर करावा : पालकांची मागणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

दरवर्षी मार्च - फेब्रुवारी मध्ये झालेल्या मुख्य परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा जून-जुलैमध्ये घेण्यात येते मात्र यंदा कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ही परीक्षा ऑक्टोबरमध्ये होणार असल्याचे राज्य मंडळाच्या संभाव्य वेळापत्रकात म्हटले होते. परीक्षा होणार की नाही याबाबत संभ्रम आहे. राज्य मंडळाने यासंदर्भात माहिती स्पष्ट करावी अशी मागणी पालकांनी केली आहे.

यंदा दहावीच्या परीक्षेत राज्यात ७३ हजार ९९८ विद्यार्थी नापास झाले आहेत. तर बारावी परीक्षेत एक लाख ३१ हजार ९७५ विद्यार्थी नापास झाले आहेत. दहावी आणि बारावीच्या नापास विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा ऑक्टोबर महिन्यात होईल अशी आशा होती. मात्र शिक्षण विभागाने ती शक्यताही नाकारली आहे. यामुळे या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार का? असा प्रश्नही पालकांना पडला आहे. ही परीक्षा वेळेत पार पडली असती तर विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश घेणे शक्य झाले असते. मात्र याबाबत अद्याप कोणताच निर्णय झालेला नाही.

सीबीएसईने फेरपरीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. दहावी व बारावीची ही परीक्षा २२ ते ३० सप्टेंबर या कालावधीत पार पडणार आहे. राज्य शिक्षण मंडळाने फेरपरीक्षा कधी व कशी घ्यायची याबाबत राज्यातील विविध शिक्षणाधिकारी आणि मुख्याध्यापकांकडून माहिती मागविली होती. मात्र अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. अंतिम वर्षाप्रमाणे या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षाही ऑनलाइन स्वरुपात घेण्यात यावी अशी मागणी पालक करत आहेत. . सीबीएसईला दहावी आणि बारावीचे मिळून दोन लाख ३७ हजार ८४९ विद्यार्थी या फेरपरीक्षेत पात्र आहेत.

Pune Edition
Sep 7, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# पहिल्या फेरीतील प्रवेशासाठी आज अखेरची संधी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांत अकरावीच्या प्रवेशांसाठीच्या प्रक्रियेतील पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी एक दिवसाची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल.

प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीतील प्रवेशासाठी ३ सप्टेंबरची मुदत देण्यात आली होती. मात्र, करोना संसर्गामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यात अडचणी येत असल्याने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिल्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या ४०,०१३ विद्यार्थ्यांपैकी २२,४५३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत, तर २५ ,००९ विद्यार्थ्यांनी प्रोसिड फॉर अॅडमिशन केले आहे. प्रवेशासाठी मुदतवाढ दिल्याने प्रवेश जाहीर होऊन आतापर्यंत प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना आज प्रवेश घेता येईल, अशी माहिती प्रवेश नियंत्रण समितीने दिली.

### प्रवेश निश्चित करणे, प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडणे

पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी लॉगीनमध्ये प्रोसिड फॉर अॅडमिशनवर क्लिक करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित महाविद्यालयात संपर्क साधून प्रवेश निश्चित करावा, प्रवेशपत्राची प्रत काढून ठेवावी. केवळ प्रोसिड फॉर अॅडमिशन केल्यावर प्रवेश निश्चित होत नाही हे लक्षात ठेवावे, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. तसेच विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेश प्रक्रियेतून बाहेर जायचे असल्यास किंवा अन्य अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यायचा असल्यास विद्यार्थ्यांना अर्ज मागे घेता येईल. त्यासाठी विड्रॉवल ऑफ अॅडमिशनचा पर्याय संकेतस्थळावर देण्यात आला आहे.




### दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक

- रिक्त जागांची यादी : ४ सप्टेंबर
- पसंतीक्रम नोंदवणे : ५ ते ७ सप्टेंबर
- दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी : १० सप्टेंबर
- प्रवेश निश्चिती : १० ते १२ सप्टेंबर

लोकसत्ता Fri, 04 September 2020 https://epaper.loksatta.com/c/54698129

# प्रवेश निश्चित करण्यासाठी मुदतवाढ

## अकरावी प्रवेश : दुसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक जाहीर

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३ -** अकरावी प्रवेशप्रक्रियेच्या पहिल्या नियमित फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश निश्चित करण्यासाठी एक दिवसाची मुदतवाढ देण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना शुक्रवारी (दि.४) सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल. त्याचबरोबर दुसऱ्या नियमित प्रवेश फेरीचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीनुसार प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. पहिल्या नियमित फेरीत मिळालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी ३ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली होती; परंतु करोनामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चितसाठी अडचण येत असल्याचे निदर्शनास आले. दिलेल्या मुदतीत निश्चित झालेल्या प्रवेशांची संख्या कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणखी एक दिवस मुदत वाढवून देण्यात आली आहे. त्यामुळे पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

### अर्ज मागे घेण्याची सुविधा



अकरावी प्रवेश प्रक्रियेतून विद्यार्थ्यांना बाहेर जायचे असेल अथवा ज्या विद्यार्थ्यांना अन्य अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांना आपला अर्ज मागे घेता येणार आहे. त्यासाठी 'विड्रॉल ऑफ ॲप्लिकेशन' ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. असा अर्ज केल्यानंतर विद्यार्थ्यांचा अर्ज सिस्टिममधून रद्द होईल.

### दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक

- रिक्त जागांची यादी प्रसिद्ध : ४ सप्टेंबरला रात्री १०.
- पसंतीक्रम नोंदविण्यासाठी मुदत : ५ ते ७ सप्टेंबर
- दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी प्रसिद्ध : १० सप्टेंबरला १० वाजता
- प्रवेश निश्चित करण्यासाठी मुदत : १० ते १२ सप्टेंबर
- प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध : १२ सप्टेंबर रात्री ८
- तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील : १२ सप्टेंबर रात्री १०

### प्रवेश निश्चित करताना...

पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात अकरावीला प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याने आपल्या लॉगीनमध्ये 'प्रोसिड फॉर ॲडमिशन'वर क्लिक करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधून प्रवेश निश्चित करून घ्यावा व प्रवेशपत्राची प्रिंट काढून ठेवावी. केवळ 'प्रोसिड' केले म्हणजे प्रवेश झाला असे होत नाही हे लक्षात घ्यावे, अशी सूचना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने केली.

**Prabhat: 4.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

# घरूनच देता येईल परीक्षा

## राज्यपाल अनुकूल; अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षा ऑक्टोबरमध्ये

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ३ : अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात सुरू होतील. तर निकाल ३१ ऑक्टोबरपर्यंत जाहीर होणार असून १५ ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रात्यक्षिक परीक्षा होतील, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना घरातून परीक्षा देण्यास राज्यपालांनी मंजुरी दिल्याने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. अंतिम वर्षाची परीक्षा विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेत सोप्या पद्धतीने होणार असल्याचे सामंत यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी बैठकांचे सत्र चालवले आहे. या परीक्षा घेण्याबाबतच्या चर्चांवर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी पडदा टाकला. राज्यातील अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात राज्यपाल भगतसिंह कोशियारी, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत आणि कुलगुरू समितीची बैठक पार पडली.



या बैठकीत अंतिम वर्षाच्या परीक्षा कशा घ्यायच्या यावर चर्चा झाली. त्यानंतर १५ ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रात्यक्षित परीक्षा होतील. तर ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल जाहीर होईल, असे सामंत यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना या परीक्षा घरी बसून देता येणार आहेत. लेखी परीक्षेप्रमाणे प्रॅक्टिकल परीक्षेलाही त्यांना महाविद्यालयात जावे लागणार नाही, यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मनात कोणताही संभ्रम न ठेवता अभ्यासाला लागावे, असे सांगताना त्यांनी अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात होईल, असे स्पष्ट केले. परीक्षेची तारीख अद्याप निश्चित झाली नसली तरी लवकरच विद्यापीठांमार्फत वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.



**परीक्षा घेण्यासाठी वेगवेगळे पर्याय समोर आहेत. त्यावर चर्चा सुरू असून सोपी पद्धत वापरण्यावर एकमत झाले आहे. परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय करायचे याबाबतही आम्ही चर्चा करून निर्णय घेऊ. राज्यपाल आणि आमच्यामध्ये विसंगती नाही.**
**- उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

**Sakaal: 4.9.2020**

# घरी बसूनच अंतिम वर्षाची परीक्षा द्या!

**राज्यपालांची मंजुरी** | १५ सप्टेंबरपासून प्रॅक्टिकल्स | ऑक्टोबरमध्ये लेखी परीक्षा | ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) - राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी विद्यार्थ्यांना घरी बसून परीक्षा देण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे घरी बसूनच विद्यार्थ्यांना आपला पेपर देता येणार आहे. या परीक्षांची प्रक्रिया १५ सप्टेंबरपासून सुरू होणार असून, ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल लागणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राज्यपाल आणि कुलगुरू यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर दिली.

बैठकीविषयीची माहिती उदय सामंत यांनी दिली. ते म्हणाले, घरात बसूनच विद्यार्थ्यांना परीक्षा देता यावी, हा आमचा आग्रह होता. त्याला राज्यपालांनी मंजुरी दिली. परीक्षेच्या ऑनलाइन, ऑफलाइन पर्यायांसंदर्भात अंतिम अहवाल आज रात्रीपर्यंत तयार होणार आहे. तो उद्या सरकारला देण्यात येईल. अहवाल मिळाल्यानंतर अधिक मुदत न दवडता तो तातडीने विद्यापीठांना पाठविला जाईल. या बैठकीला उच्च आणि तंत्र शिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, अतिरिक्त मुख्य सचिव राजीव जलोटा, परीक्षेसंदर्भात गठीत केलेल्या समितीचे अध्यक्ष तथा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर आदी उपस्थित होते.

१५ ते ३० सप्टेंबरदरम्यान प्रॅक्टिकल परीक्षा घेण्याचा प्रयत्न आहे. या प्रॅक्टिकल सोप्या पद्धतीने कशा घेता येतील. यासाठी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर न जाता त्या देता येतील का, याचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. परीक्षेच्या तारखा विद्यापीठे अंतिम करतील. सध्या ठरलेल्या तारखांनुसार लेखी परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात घेतल्या जातील. अंतिम निकाल ३१ ऑक्टोबरपूर्वी लावण्याचा प्रयत्न असल्याचे उदय सामंत म्हणाले.



### सोमवार-मंगळवारी आपत्ती व्यवस्थापनाची बैठक

सोमवारी आणि मंगळवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन विभागाची बैठकी बोलाविली जाईल. या बैठकीत यूजीसीला परीक्षेसंदर्भात विनंती करण्याचा निर्णय घेतला जाईल. ३१ ऑक्टोबरपर्यंत महाराष्ट्रातील सर्व निकाल लावता येतील याबाबत कुलगुरू सुहास पेडणेकर यांनी मांडलेली भूमिका यूजीसीकडे मांडली जाईल, असे उदय सामंत यांनी सांगितले.

**Saamana: 4.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### प्रात्यक्षिक परीक्षा १५ सप्टेंबरपासून घेण्याच्या राज्यपालांच्या सूचना

# पदवी परीक्षा घरबसल्या ?

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविलेल्या पर्यायानुसार अंतिम वर्षासाठी ऑनलाइन म्हणजे घरबसल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याबाबत सरकारी पातळीवर विचार सुरू आहे. विद्यापीठांच्या कुलगुरूंनी त्यांचे मत मांडल्यावर नेमकी परीक्षा कशी देता येईल याचा निर्णय घेतला जाईल. त्यानंतरच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेने परीक्षा कधी घ्यायच्या याचे वेळापत्रक तयार केले जाईल.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने चाचपणी सुरू केली आहे. या संदर्भात राज्यपाल आणि कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी गुरुवारी आढावा घेतला. ३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षांचे काम पूर्ण करण्यासाठी कोश्यारी यांनी परवानगी दिली. अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा १५ सप्टेंबरपासून सुरू होणार असून विद्यापीठांनी अधिकार मंडळाच्या बैठका घेऊन त्याचा अहवाल दोन दिवसांत शासनाला द्यायचा आहे. या आढावा बैठकीत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, अतिरिक्त मुख्य सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) राजीव जलोटा आणि कुलगुरूंच्या समितीचे अध्यक्ष व मुंबई विद्यापीठाचे *(पान ५ वर)*

**अंतिम निर्णय मंगळवारी...** परीक्षा कशा आणि कधी घ्याव्यात याचा निर्णय विद्यापीठांनी अधिकार मंडळाच्या बैठकीत घ्यावा, अशीही सूचना देण्यात आली असून त्यासाठी विद्यापीठांना दोन दिवसांचा वेळ देण्यात आला आहे. विद्यापीठांनी त्यांचे अहवाल दिल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक घेऊन मंगळवारपर्यंत अंतिम निर्णय जाहीर करण्यात येईल, अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.

**नवे प्रश्न...**

बहुतांशी विद्यापीठांनी गेले पाच महिने परीक्षांची फारशी तयारी केली नाही. ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य आहे का, याची चाचपणीही बहुतेक विद्यापीठांनी केलेली नाही. त्यामुळे आता अचानक पुढील दहा दिवसांमध्ये परीक्षांची तयारी होऊ शकणार का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

**प्रात्यक्षिकेही घरून?** प्रात्यक्षिक परीक्षांसाठीही विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये बोलवू नये अशी सूचना विद्यापीठांना दिली असल्याचे सामंत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. मात्र अशा प्रकारे घरून प्रात्यक्षिके कशी करून घ्यावीत, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. 'विद्यार्थ्यांकडून कृती, परिणाम, निष्कर्ष असे लेखी स्वरूपात घेता येऊ शकते,' असे एका प्राचार्यांनी सांगितले.



**एटीकेटीच्या विद्यार्थ्यांचाही परीक्षा?**

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या आधीच्या वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या विषयाच्या (बॅकलॉग) परीक्षाही नियमित परीक्षांबरोबरच घेण्यात येण्याचा विचार करण्यात येत आहे.

लोकसत्ता Fri, 04 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54697907

# पदवी परीक्षा घरबसल्या ?

**(पान १ वरून)** कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर उपस्थित होते.

परीक्षा कशी घेता येईल याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने विविध पर्याय सुचविले आहेत. यात ऑनलाइन तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षा देण्याच्या पर्यायांचा समावेश आहे. यानुसार विद्यार्थ्यांना घरबसल्या म्हणजेच ऑनलाइन परीक्षा देण्याच्या पर्यायाला राज्यपाल कोश्यारी यांनी मान्यता दिल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. राज्याच्या ग्रामीण किंवा दुर्गम भागांत ऑनलाइन परीक्षा देणे शक्य होणार नाही. अशा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा द्यावी लागेल.

राज्यातील प्रत्येक विद्यापीठाअंतर्गत वेगळे प्रश्न आहेत. परीक्षा नक्की कशा आणि कधी घ्यायचा याबाबत सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंचा अहवाल प्राप्त झाल्यावरच विद्यापीठ अनुदान आयोगाला पत्र पाठविण्यात येईल. यामध्ये परीक्षा कशा आणि कधी घेणार याची सविस्तर माहिती आणि कालावधीचा समावेश असेल. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेनंतरच परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल, असे उच्चपदस्थांकडून सांगण्यात आले.

लोकसत्ता Fri, https

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

## अंतिम वर्षाच्या परीक्षेची पक्रिया ऑक्टोबर महिन्यात पूर्ण

**मुंबई, (प्रतिनिधी) :** अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या तारखा विद्यापीठांद्वारे निश्चित केल्या जातील. साधारणतः १५ सप्टेंबरपासून परीक्षांची प्रक्रिया सुरू होईल व ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून लेखी परीक्षा सुरू होतील. ३१ ऑक्टोबरपर्यंत निकालासह सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी स्पष्ट केले. कोरोनाच्या धोक्यामुळे विद्यार्थ्यांना घरातून ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देण्यास राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी परवानगी दिली असल्याचीही माहिती त्यांनी दिली.

अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात राज्यातील कृषि, अकृषी विद्यापीठांच्या सर्व कुलगुरूंची राजभवन येथे ऑनलाईनच्या माध्यमातून राज्यपाल कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी उच्च व तंत्र



शिक्षण मंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, अप्पर मुख्य सचिव राजीव जलोटा, परीक्षेसंदर्भातील समितीचे अध्यक्ष तथा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालय आणि विद्यापीठ अनुदान मंडळाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनानुसार १५ सप्टेंबरपासून सुरू करून ३१ ऑक्टोबरपर्यंत निकालासह परीक्षा प्रक्रिया पूर्ण करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषद आणि

### घरी बसूनच देता येणार परीक्षा

विद्यापीठाच्या परीक्षा मंडळासमोर ठेऊन दोन दिवसांत शासनास कळवावे आणि राज्य आपत्कालीन प्राधिकरणाची बैठक घेण्यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना विनंती करावी, अशी सूचना राज्यपालांनी केली.

परीक्षा पद्धतीसंदर्भात विद्यापीठांनी व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा मंडळामध्ये परीक्षेसंदर्भातील समितीचा अहवाल सादर करून परीक्षा पद्धती निवडावी, असेही राज्यपालांनी सांगितले. कालच्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. लवकरच राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्या उपस्थितीत होईल. त्यानंतर विद्यापीठ अनुदान मंडळाच्या दिनांक ३० सप्टेंबर पर्यंत परीक्षा घेण्याच्या मार्गदर्शक सूचना आहेत. यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाला पत्र पाठवून राज्यातील कोविड-१९ ची सध्याची परिस्थिती आणि परीक्षेसंदर्भातील नियोजन कळविण्यात येईल, असेही सामंत यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत विद्यापीठांनी परीक्षा प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, पुढील शैक्षणिक वर्ष लवकर सुरू करण्यासंदर्भातील तयारी पूर्ण करावी. या बरोबरच एटीकेटीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेची प्रक्रिया वेळेत पूर्ण करून अपवादात्मक परिस्थितीमध्ये विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिला, तर अशा विद्यार्थांच्या परीक्षेचे सुद्धा नियोजन करण्यात यावे. या संदर्भात चर्चा करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

**Kesari: 4.9.2020**

मटा अँकर **राज्यपालांबरोबर कुलगुरूंचे विचारमंथन**

## अंतिम परीक्षा घरूनच होणार?

**म. टा. विशेष प्रतनिधी, मुंबई**

करोनाच्या काळात अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करताना, विद्यार्थ्यांना घरी बसूनच परीक्षा देता यावी, याबाबत राज्यपालांनीही आग्रह धरला. यानंतर प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर करून परीक्षा घेता येऊ शकतात का, याबाबत चर्चा करण्यात आली. यामुळे आता अंतिम वर्षाच्या परीक्षा घरूनच होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. असे असले, तरी यात गैरप्रकार करण्याची मुभा नसणार, यासाठी विशेष तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल यावर कुलगुरूंचे विचारमंथन झाले.

अंतिम वर्षाची परीक्षा कशा प्रकारे घेण्यात येईल याबाबत गुरुवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांना घरूनच परीक्षा कशी देता येईल, यावर चर्चा करण्यात आली. यात बहुतांश कुलगुरूंनी बहुपर्यायी प्रश्नांच्या आधारे परीक्षा घेण्याची तयारी दर्शविली. यात परीक्षा ऑनलाइनद्वारे प्रॉक्टर्ड पद्धतीने घेण्याचा पर्याय विद्यापीठांसमोर आहे.

### परीक्षा १५ सप्टेंबरपासून




या बैठकीत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, अपर मुख्य सचिव राजीव जलोटा आदी उपस्थित होते. अमरावती विद्यापीठाने १५ सप्टेंबरपासून परीक्षा घेण्यास समर्थता दर्शविली आहे. यामुळे राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा १५ सप्टेंबरपासून सुरू होऊन निकाल लावून ३१ ऑक्टोबरपर्यंत सर्व प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती सामंत यांनी या वेळी दिली.

**Maharashtra Times: 4.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# अंतिम वर्षाच्या परीक्षा घरी बसून

## उदय सामंत : राज्यपाल कोश्यारी यांनी दिली मंजुरी



**मुंबई, दि. ३ -** राज्यातील विद्यापीठस्तरावरील अंतिम सत्राच्या परीक्षा विद्यार्थ्यांनी घरी बसून देण्यास राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी मंजुरी दिली आहे, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात लेखी परीक्षा होतील, तर महिना अखेरपर्यंत निकाल जाहीर करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यपाल आणि कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

(पान २ पहा) ▸▸

### परीक्षा सोप्या पद्धतीने

१५ ते ३० सप्टेंबरदरम्यान प्रॅक्टिकल परीक्षा घेण्याचा प्रयत्न असणार आहे. प्रॅक्टिकल परीक्षा सोप्या पद्धतीने घेतल्या जातील. यासंबंधी कुलगुरू निर्णय घेत आहेत. प्रॅक्टिकल परीक्षादेखील विद्यार्थ्यांना केंद्रावर न येता देता यावी यासाठी प्रयत्न असून तसाच अहवाल तयार करण्यात आला आहे. परीक्षेच्या तारखा संबंधित विद्यापीठं अंतिम करणार आहेत. तर युजीसीकडे अहवाल दिल्यानंतर ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल लागण्याचं बंधन विद्यापीठांवर असणार आहे, असेही ते म्हणाले.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा घरी बसून

. उदय सामंत म्हणाले, उद्या १२ वाजता अंतिम अहवाल सादर केला जाणार आहे. घरात बसून परीक्षा झाली पाहिजे यासाठी आमचा आग्रह होता. त्याला राज्यपालांनी मंजुरी दिली आहे. परीक्षा घेण्यासंबंधी ऑनलाइन, ऑफलाइन असे चार प्रकार असून त्यासंबंधी अंतिम अहवाल आज रात्रीपर्यंत तयार होईल. उद्या शासनाला तो प्राप्त होईल. अहवाल मिळाल्यानंतर कोणतीही मुदत न घेता तातडीने विद्यापीठांकडे पाठवू, असे त्यांनी सांगितले. सोमवारी किंवा मंगळवारी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन विभागाची बैठक बोलावून यूजीसीला विनंती करण्याबाबत निर्णय घेऊ. ३१ ऑक्टोबरपर्यंत महाराष्ट्रातील सर्व निकाल लावू शकतो ही जी कुलगुरूंनी भूमिका घेतली आहे ती आम्ही यूजीसीकडे मांडू, असे सामंत म्हणाले.

**Prabhat: 4.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# एटीकेटी विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३** - दहावी व बारावीच्या फेरपरीक्षा करोना पार्श्वभूमीवर नोव्हेंबर अथवा डिसेंबर महिन्यात घेण्याचे नियोजन आहे. फेरपरीक्षा लांबणीवर पडल्याने दहावीत दोन विषयांत अनुत्तीर्ण झालेल्या म्हणजेच एटीकेटी मिळालेल्या विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश कसा होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या फेरपरीक्षा लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी बुधवारी दिली. यंदा राज्यावर करोनाचे सावट असल्याने या परीक्षा नोव्हेंबर किंवा कदाचित डिसेंबरपर्यंतही लांबणीवर पडतील, असेही त्या म्हणाल्या.

दरम्यान, दहावी-बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर महिनाभरात फेरपरीक्षा घेतली जाते. त्यानंतर या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश दिला जातो. त्यादृष्टीने फेरपरीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होत नाही. त्यामुळे ही परीक्षा महत्त्वाची असते. मात्र ही परीक्षा कधी होणार, याविषयी बोर्डाकडून काहीच स्पष्टता नाही. मात्र, शिक्षणमंत्र्यांनी बहुधा दिवाळीनंतरच फेरपरीक्षा घेण्याचे सुतोवाच केले आहे.

करोनामुळे लगेच फेरपरीक्षा घेणे शक्य नाही, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, दिवाळीनंतर फेरपरीक्षा घेतल्यानंतर दहावीत एटीकेटी मिळालेले विद्यार्थी अकरावी प्रवेशापासून वंचित राहणार आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> सद्य:स्थितीत परीक्षा घेण्यात अनेक अडचणी आहेत. प्रशासनाने अनेक शाळा विलगीकरण कक्षासाठी घेतल्या आहेत. परस्पर अंतर राखून परीक्षा घेण्यासाठी परीक्षा कक्ष वाढवावे लागतील, त्यासाठी मनुष्यबळही वाढवावे लागेल. मात्र, त्याआधी शाळा उपलब्ध व्हाव्या लागतील. त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन परीक्षा घेतल्या जातील.
>
> – **डॉ. शकुंतला काळे,** अध्यक्षा, राज्य शिक्षण मंडळ

**Prabhat: 4.9.2020**

# २२ हजार ४८५ विद्यार्थ्यांचे पहिल्या फेरीत प्रवेश

## १८,४७२ विद्यार्थ्यांची अकरावी प्रवेशाकडे पाठ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या नियमित फेरीत २२ हजार ४८५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांपैकी २२ हजार ४८५ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले असून, १८ हजार ४७२ विद्यार्थ्यांनी प्रवेशाकडे पाठ फिरवली. आता प्रवेशाची दुसरी नियमित फेरी राबवली जाणार आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या फेरीत ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले होते. त्यातील १९ हजार ५७५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले होते. प्रवेश निश्चित करण्यासाठी शुक्रवारपर्यंतची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार आतापर्यंत केंद्रीय प्रवेश प्रक्रिया आणि कोट्यातील प्रवेश मिळून २९ हजार ४२७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. ४ हजार १२३ विद्यार्थ्यांनी इनहाऊस कोट्यातून, २ हजार ३०१ विद्यार्थ्यांनी अल्पसंख्याक कोट्यातून, ५१८ विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतल्याची माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

पहिल्या फेरीत पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेतलेले विद्यार्थी आता प्रवेश प्रक्रियेच्या बाहेर गेले असून, त्यांना विशेष फेरीत प्रवेश मिळेल. तसेच विशेष फेरीत जे विद्यार्थी प्रवेशासाठी सहमती देतील, त्यांनाच विशेष फेरीत सहभागी करून घेतले जाईल, असेही शेंडकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Sat, 05 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54731219

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# अकरावीच्या पहिल्या फेरीत २२ हजार ४८५ प्रवेश

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या नियमित फेरीत २२ हजार ४८५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. १८ हजार ४७२ विद्यार्थ्यांनी प्रवेशाकडे पाठ फिरवली. आता प्रवेशाची दुसरी नियमित फेरी राबवली जाणार आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या फेरीत ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले होते. त्यातील १९ हजार ५७५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले होते. प्रवेश निश्चित करण्यासाठी शुक्रवारपर्यंतची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार आतापर्यंत केंद्रीय प्रवेश प्रक्रिया आणि कोट्यातील प्रवेश मिळून २१ हजार ४२७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. ४ हजार १२३ विद्यार्थ्यांनी इनहाऊस कोट्यातून, २ हजार ३०१ विद्यार्थ्यांनी अल्पसंख्याक कोट्यातून, ५१८ विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतल्याची माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

पहिल्या फेरीत पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेतलेले विद्यार्थी आता प्रवेश प्रक्रियेच्या बाहेर गेले असून, त्यांना विशेष फेरीत प्रवेश मिळेल. तसेच विशेष फेरीत जे विद्यार्थी प्रवेशासाठी सहमती देतील त्यांनाच विशेष फेरीत सहभागी करून घेतले जाईल, असेही शेंडकर यांनी सांगितले.

My Pune Edition
Sep 5, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

लोकमत

अकरावी प्रवेशाचे बदलते चित्र : कोरोनाचाही झाला परिणाम

# हुशार विद्यार्थ्यांचा कला शाखेकडे कल

लोकमत न्यूज नेटवर्क

| विद्यालय | विषय (विज्ञान) | कटऑफ (कला) |
|---|---|---|
| फर्ग्युसन महाविद्यालय | ४८४ | ४८७ |
| स. प. महाविद्यालय | ४७६ | ४७९ |
| मॉडर्न महाविद्यालय | ४७४ | ४७५ |
| सेंट मीराज | ४५९ | ४६० |



पुणे : इयत्ता अकरावीला विज्ञान शाखेपेक्षा कला शाखेला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असली तरी शहरातील नामांकित महाविद्यालयांमधील इंग्रजी माध्यमाच्या कला शाखेचा कटऑफ विज्ञान शाखेच्या कटऑफपेक्षा अधिक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीचा कल बदलत असल्याचे दिसून येत आहे.

मेडिकल, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर आदी क्षेत्रातील करिअर समोर ठेवून विद्यार्थी इयत्ता अकरावी प्रवेशासाठी प्रयत्न करतात. परंतु, कोरोनामुळे निर्माण झालेल्या एकूण परिस्थितीमुळे परदेशातील शिक्षणाच्या संधीवर परिणाम झाला आहे.

तसेच इंजिनिअरिंची पदवी घेऊनही विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे विद्यार्थी करिअर म्हणून दुसऱ्या अभ्यासक्रमांचा विचार करत आहेत. परिणामी विज्ञान शाखेत प्रवेश न घेता गुणवत्ताधारक विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या कला शाखेस प्रवेश घेत असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या काही वर्षांपासून पुणे स्पर्धा परीक्षांचे केंद्र म्हणून समोर आले आहे. त्यामुळे काही विद्यार्थी अकरावी-बारावीपासूनच स्पर्धा परीक्षेच्या तयारीला सुरुवात करतात. तसेच मानसोपचार तज्ज्ञ म्हणून करिअरच्या संधी वाढल्या आहेत.

त्याचप्रमाणे आपल्या पाल्याने कोणत्या क्षेत्रात करिअर करावे, याबाबत पालकांचा पूर्वी असलेला आग्रह कमी झाला आहे.वैद्यकीय शिक्षण महाग झाल्यामुळे पालकही आता आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे,असा हट्ट धरून बसत नाहीत, असे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. अकरावीत अनेक विद्यार्थी शास्त्र शाखेला प्रवेश घेतात. पण यंदा कला शाखेला कल वाढला असल्याचे दिसत आहे.

मेडिकल, इंजिनिअरिंग यासह अनेक संधी शोधण्यासाठी विद्यार्थ्यांची शास्त्र शाखेला पसंती असते. परंतु कोरोनामुळे परदेशातील शिक्षणाच्या संधीवर परिणाम झाल्याने कलाशाखेला प्राधान्य दिले आहे.

अभियांत्रिकी क्षेत्रात करिअरच्या क्षेत्राला अलीकडे मर्यादा आल्या आहेत. कला शाखेची पदवी आणि डिझायनिंगसारखा पदविका अभ्यासक्रम करून विद्यार्थी करिअर निवडीचा मार्ग स्वीकारत आहेत.वैद्यकीय शिक्षण घेणे केवळ एखाद्या डॉक्टर असणाऱ्या पालकाच्या मुलालाच घेणे शक्य झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा करिअर निवडीचा कल बदलत असल्याचे दिसून येत आहे.

**- डॉ. पराग काळकर**, अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

अकरावी प्रवेशापासूनच विद्यार्थी करिअर निवडीबाबत ठाम असल्याचे दिसून आले. काही विद्यार्थ्यांनी मानसशास्त्र विषय घेऊन कौन्सिलर, स्पोर्ट सायकोलॉजिस्ट आणि स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून करिअर करण्याचे ठरवून इंग्रजी कला शाखेत प्रवेश घेतला. शहरात कला इंग्रजी शाखेच्या तुकड्या कमी असल्यामुळे यंदा या जागा वाढवाव्या लागतील, असे दिसून येत आहे.

**- डॉ. राजेंद्र झुंजारराव**, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Sep 05, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

**लोकमत**

**महत्त्वाचे**

### पदवीप्रदान समारंभ १० सप्टेंबरला

पुणे : माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या निधनामुळे रद्द करण्यात आलेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ दि. १० सप्टेंबर रोजी होणार आहे. यापुर्वी हा समारंभ दि. ३ सप्टेंबर रोजी होणार होता. हा समारंभ ऑनलाइन पध्दतीने होणार असून, लिंकद्वारे विद्यार्थ्यांना थेट प्रसारण पाहता येईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली. मुखर्जी यांच्या निधनामुळे दुखवटा जाहीर करण्यात आला होता. त्यामुळे पदवीप्रदान समारंभ पुढे ढकलावा लागला. फोर्ब्स मार्शलचे सह-अध्यक्ष डॉ. नौशाद फोर्ब्स यांचे दीक्षांत भाषण होणार आहे. कुलपती व राज्यपाल भगत सिंह कोश्यारी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

Pune Main
Page No. 2 Sep 05, 2020
Powered by: erelego.com

**प्रभात** पुणे, शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२० ५

### पुणे विद्यापीठाचा निर्णय : ऑनलाइन, ऑफलाइनचा पर्याय

## पहिल्या टप्प्यात बॅकलॉगची परीक्षा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ४ - अंतिम वर्ष परीक्षेसाठी ऑनलाइन पद्धतीस प्राधान्य राहील. तसेच पहिल्या टप्प्यात काही विषयात अनुत्तीर्ण राहिलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. त्यानंतर नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेण्यात येणार असल्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला.

राज्य शासनाने सर्व विद्यापीठांना परीक्षेसंदर्भात निर्णय घेण्यासाठी ७ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक झाली. यात कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. यात राज्य शासनाने ३१ ऑक्टोबरपर्यंत सर्व परीक्षा व निकालाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले. त्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

दरम्यान, बैठकीत विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षेत सहभाग घ्यावा यासाठी प्रयत्न केले जातील. मात्र, ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाइल, लॅपटॉप अशी साधने नाहीत किंवा इंटरनेटची व्यवस्था नाही अशा विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेचे वेळापत्रक पुढील चार ते पाच दिवसांमध्ये जाहीर केले जातील, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी दिली.

**'प्रॉक्टर्ड' प्रणालीचा वापर**

'प्रॉक्टर्ड' प्रणालीचा वापर करून अंतिम वर्षाची ऑनलाइन परीक्षा होईल. यात विद्यार्थ्याला घरात बसल्या ठिकाणी परीक्षा देता येईल, पण त्याने गैरमार्गाचा वापर करण्याचा प्रयत्न केल्यास रोखताही येऊ शकते. त्यामुळे परीक्षेचे महत्त्व कमी होणार नाही.

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

# अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी सर्व पर्याय खुले ठेवावेत!

## १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान परीक्षा घ्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या अंतिम सत्रातील परीक्षेसाठी ऑनलाइन, ऑफलाइन आणि संमिश्र असे सर्व पर्याय खुले ठेवण्याची शिफारस कुलगुरुंच्या समितीने राज्य सरकारकडे केली. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव आणि प्रत्येक जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षा पद्धती ठरविण्याचा निर्णय विद्यापीठ प्राधिकरणांवर सोपविण्यात आला आहे.

अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासंदर्भात नियोजन करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखालील दहा सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. या समितीने केलेल्या ११ शिफारशींचा अहवाल उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केला. अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या निर्णयासाठी १५ ते ३० सप्टेंबरदरम्यान प्रात्यक्षिक परीक्षा आणि १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान परीक्षा आयोजित करून विद्यापीठांनी निकाल लावावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, परदेशी उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मागच्या सेमिस्टरपुरते प्रोव्हिजनल सर्टिफिकेट दिले जाईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

प्राधिकरणामधील व्यवस्थापन परिषद, परीक्षा मंडळे, विद्यापरिषद यांनी या संदर्भातील बैठकांमध्ये परीक्षा पद्धती, वेळापत्रक, कालावधी यांचे नियोजन करून (पान ७ वर)

Pune Main
Page No. 1 Sep 05, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# परीक्षेसाठी सर्व पर्याय खुले ठेवावेत!

(पान १ वरून) सोमवारी ७ सप्टेंबर २०२० रोजी १२ वाजता अहवाल शासनीला सादर करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाने दिले आहेत.

**महत्त्वाच्या शिफारशी**

विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतरांच्या आरोग्याच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन परीक्षांचे नियोजन करावे. विद्यार्थी घरातून परीक्षा देतील, यासाठी प्रयत्न करावेत.

कमीत कमी कालावधीच्या परीक्षांचे आयोजन करता येईल. वस्तुनिष्ठ प्रश्न, ओएमआर पद्धती, ओपन बुक किंवा असाइनमेंट पद्धतींचा अवलंब करता येईल.

दिव्यांगांना आवश्यक सुविधा विद्यापीठांनी उपलब्ध करुन द्याव्या. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या प्रकल्प अहवालांसाठी यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करता येईल. विशेष बाब म्हणून, विद्यार्थी एखाद्या विषयाला बसू शकला नाही, तर त्याला पुन्हा संधी द्यावी. प्रात्यक्षिक परीक्षांसाठी स्काईप, मीटिंग ॲपचा वा टेलिफोनिक पद्धत वापरावी.

Pune Main
Page No. 7 Sep 05, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

# अंतिम वर्षाची परीक्षा १ ऑक्टोबरपासून

लोकमत न्युज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांना अंतिम वर्षाच्या परीक्षा घरी बसून ऑनलाईन पद्धतीने देता येणार असल्याचे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे. मात्र, ज्या विद्यार्थ्यांना विविध तांत्रिक कारणांमुळे ऑनलाईन परीक्षा देता येणार नाहीत, त्यांच्यासाठी ऑफलाईन पद्धतीचा पर्यायही खुला ठेवला जाणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक तयार केले असून १ ते २२ ऑक्टोबर दरम्यान परीक्षा होणार आहेत.

राज्यातील सर्व विद्यापीठांनी ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी सहमती दर्शविली आहे. या परीक्षांचे वेळापत्रक, नियोजन तसेच आराखडा तयार करण्यासंदर्भात विद्यापिठांना सांगण्यात आले आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक शुक्रवारी झाली.

या बैठकीमध्ये ऑनलाईनसह ऑफलाईन पर्यायही खुला ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजते. प्रामुख्याने ऑनलाईन परीक्षेवरच भर दिला जाणार आहे. मात्र, काही विद्यार्थ्यांना लॅपटॉप, इंटरनेट जोडणी, नेटवर्क आदी समस्या येऊ शकतात. या विद्यार्थ्यांचाही बैठकीत विचार करण्यात आला. त्यानुसार या विद्यार्थ्यांना ऑफलाईन पध्दतीने जवळच्या महाविद्यालयात परीक्षा घेण्याच्या निर्णयावर सहमती झाली.

विद्यापीठाने तयार केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार, बॅकलॉग असलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर दरम्यान तर नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा १० ते २२ ऑक्टोबर दरम्यान घेतली जाणार आहे. तसेच १५ ऑक्टोबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होतील, असे परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

पुढील आठवड्यात परीक्षांचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे. अंतिम वर्षाची परीक्षा सुरु होण्यापुर्वी बॅकलॉग राहिलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे नियोजन केले जाणार आहे. प्रत्येक विषयाची परीक्षा बहुपर्यायी ५० गुणांची होणार असून त्यासाठी एक तासांचा वेळ दिला जाणार आहे.

Hello Pune
Page No. 4 Sep 05, 2020
Powered by: erelego.com

# १ ते २२ ऑक्टोबर दरम्यान बहुपर्यायी, ऑनलाइन परीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या आणि विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या (बॅकलॉग) परीक्षा १ ते २२ ऑक्टोबर दरम्यान घेतल्या जाणार आहेत. बहुपर्यायी स्वरूपाची प्रश्नपत्रिका आणि ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार विद्यापीठाने परीक्षांचे नियोजन केले आहे. त्या संदर्भात विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाची शुक्रवारी बैठक झाली. या बैठकीत संभाव्य वेळापत्रकासह काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार बॅकलॉग विद्यार्थ्यांची परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर दरम्यान घेतली जाईल, तर नियमित अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा १० ते २२ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. तसेच १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील गावी असलेल्या, ऑनलाइन परीक्षा देण्यासाठीच्या सुविधा नसलेल्या विद्यार्थ्यांना जवळच्या महाविद्यालयात जाऊन ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देता येणार आहे, असे काकडे यांनी सांगितले.

लोकसत्ता Sat, 05 September 2020
https://epaper.loksatta.com/

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# वस्तुनिष्ठ पद्धतीने परीक्षा?

## 'मटा'च्या 'फेसबुक लाइव्ह'मध्ये कुलगुरूंचे संकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे



डॉ. नितीन करमळकर

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा 'एमसीक्यू बेस्ड' एक तासाच्या कालावधीत सोप्या पद्धतीने घेण्याचा विचार कुलगुरूंच्या बैठकीत समोर आला असून, येत्या सोमवारी किंवा मंगळवारी परीक्षेबाबत पूर्ण चित्र स्पष्ट होईल. त्याचप्रमाणे अंतिम वर्षातील बॅकलॉग आणि रेग्युलर विषयांच्या परीक्षा काही दिवसांच्या अंतराने होतील. त्यामुळे अंतिम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी कोणतीही काळजी न करता अभ्यास करावा, असा सल्ला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शुक्रवारी विद्यार्थ्यांना दिला.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या फेसबुक लाइव्हमध्ये डॉ. नितीन करमळकर यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा, ई- कंटेंट निर्मिती, विद्यापीठातील अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा अशा विविध मुद्द्यांवर माहिती दिली. डॉ. करमळकर परीक्षा नियोजनाच्या समितीत आहेत. अंतिम वर्षाला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे काही विषय बॅकलॉग असतील, तर अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षादेखील काही दिवसांच्या अंतराने घेण्यात येतील. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी कोणत्याही संभ्रमात न राहता अभ्यासाला सुरुवात करावी, असेही डॉ. करमळकर म्हणाले.

डॉ. नितीन करमळकर म्हणाले, 'विद्यार्थ्यांना करोनाच्या प्रादुर्भावात ऑनलाइन आणि डिजिटल पद्धतीने अभ्यास करता यावा, यासाठी सर्व विद्याशाखांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ई-कंटेंटची निर्मिती केली आहे. याचा फायदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व संलग्न कॉलेजांमधील विद्यार्थ्यांसोबतच राज्यातील विद्यार्थ्यांना होत आहे. विद्यापीठाच्या वेबसाइटवर ही ई-कंटेंटची सुविधा मोफत आहे.'

'येत्या १५ सप्टेंबरपासून इंजिनीअरिंगसोबतच इतर अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षांना सुरुवात होणार असून, ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात लेखी परीक्षांना सुरुवात होईल. शक्य असेल, तेथे ऑनलाइन; तसेच इंटरनेटची सोय नसलेल्या दुर्गम भागात ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याचा पर्यायही समोर आहे. तांत्रिक किंवा कोणत्याही अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी आम्ही घेणार आहोत,' असेही डॉ. करमळकर यांनी सांगितले.

### परीक्षा १ ते २२ ऑक्टोबरदरम्यान

'अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या रेग्युलर आणि बॅकलॉग विषयाच्या परीक्षा १ ते २२ ऑक्टोबर दरम्यान घेतल्या जाणार आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा १५ सप्टेंबरपासून सुरू होतील. विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार अंतिम वर्षातील बॅकलॉग विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर दरम्यान घेतली जाईल; तर नियमित अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा १० ते २२ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे,' अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

### निकाल ३१ ऑक्टोबरपूर्वी

'विद्यापीठ आणि संलग्न कॉलेजांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात किंवा परराज्यात जाण्याची इच्छा असते. या विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होऊ नये, यासाठी परीक्षा सर्व सुरक्षित अंतराचे नियम पाळून लवकर घेण्यात येईल. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे निकाल ३१ ऑक्टोबरच्या आत जाहीर करण्यात येतील. 'प्रॉक्टर्ड मेथड'चा वापर करण्याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही,' असेही डॉ. करमळकर म्हणाले.

**Maharashtra Times: 5.9.2020**

# परीक्षा... एक तास, ५० गुण?

## उदय सामंत यांचे संकेत

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

अंतिम वर्षाची परीक्षा ही तीन तासांऐवजी एक तासांची होईल. तसेच १०० गुणांऐवजी ५० गुणांची बहुपर्यायी प्रश्नांच्या आधारे परीक्षा घेण्यात येणार असल्याचे संकेत शुक्रवारी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिले.

या परीक्षा घेताना तंत्रज्ञानावर भर देण्यात यावा, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. तसेच लेखी परीक्षांसाठी विद्यापीठाला बहुपर्यायी प्रश्न, असाइन्मेंट किंवा ओपन बुकचे पर्यायही खुले केले आहेत. परीक्षा पद्धती, वेळापत्रक व अभ्यासक्रम ७ सप्टेंबरपर्यंत सरकारकडे सादर करावेत, अशा सूचना त्यांनी विद्यापीठाला दिल्या.

"स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षा घेण्यात अडचण असल्यास विद्यापीठांनी तातडीने कळवावे; जेणेकरून परीक्षा पुढे ढकलण्यासंदर्भात यूजीसीला कळवून मुदतवाढ घेण्यात येईल.
- उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

### काही महत्त्वाच्या शिफारशी



- परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात. ऑनलाइन शक्य नसेल तिथे ऑनलाइन आणि ऑफलाइन संमिश्र किंवा पेन-पेपरने परीक्षा घ्याव्या.
- परीक्षा विद्यार्थ्यांना घरबसल्याच देता यायला हव्यात. एमसीक्यू, ओएमआर, असाइनमेंट पद्धत, ओपन बुक टेस्ट यांपैकी एक पर्याय स्वीकारावा.
- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या त्यांच्या सोयीनुसार परीक्षा घ्यायच्या आहेत.
- विद्यार्थी एखाद्या विषयाला कोणत्याही कारणास्तव बसू शकला नाही, तर त्या विद्यार्थ्याला त्या विद्यापीठाने पुन्हा परीक्षेची संधी द्यायची आहे.
- प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षांसाठी मीटिंग ॲप्स, फोनचा वापर करावा.
- अंतिम वर्ष अंतिम सत्र विद्यार्थ्यांचे बॅकलॉग पेपर याच पर्यायांनी घेण्यात यावेत.

## 'ताण न घेता, अभ्यास करा'



डॉ. नितीन करमळकर

पुणे : अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत सोमवारी किंवा मंगळवारी पूर्ण चित्र स्पष्ट होईल. त्याचप्रमाणे अंतिम वर्षातील बॅकलॉग आणि नियमित विषयांच्या परीक्षा काही दिवसांच्या अंतराने होतील. त्यामुळे अंतिम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी कोणतीही काळजी न करता अभ्यास करावा, असा सल्ला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शुक्रवारी विद्यार्थ्यांना दिला. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या फेसबुक लाइव्हमध्ये डॉ. करमळकर बोलत होते.

» सविस्तर वृत्त...५

**Maharashtra Times: 5.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ५० गुण आणि वेळ एक तास

### अंतिम वर्षे परीक्षांचे नियोजन

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ४ - अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी ओपन बूक, एमसीक्यू, असाईनमेन्ट बेस हे तीन पर्याय असून, त्यापैकी एक प्रत्येक विद्यापीठ निवडणार आहे. अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइनद्वारे होणार असून ती ५० मार्कांची, तर वेळ एक तासाची असेल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.



अंतिम वर्ष परीक्षेबाबत कुलगुरू समितीने दिलेल्या अहवालानंतर आणि राज्यपाल, कुलगुरू यांच्यात झालेल्या बैठकीनंतर उच्च व तंत्रशिक्षण विभाग संचालक यांच्याकडून शासन परिपत्रक विद्यापीठाच्या कुलगुरूंना पाठवले आहे. अंतिम वर्षाची परीक्षा घेऊन निकाल जाहीर करणे ही प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून सगळ्या विद्यापीठांना निकाल जाहीर करावा लागणार आहे, असे सामंत यांनी म्हटले आहे.

#### परीक्षेविषयी निर्देश

- विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत परीक्षा पद्धतीचा अवलंब करणे.
- परीक्षेसाठी अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.
- परीक्षा पद्धत ठरवण्यासाठी विद्यापीठांनी ७ सप्टेंबरपर्यंत निर्णय घेणे.
- १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक व १ ते ३१ ऑक्टोबर परीक्षा घेऊन निकाल जाहीर करणे.
- विद्यार्थ्यांना परीक्षेबाबत अभ्यासक्रम वेळापत्रक लवकर अवगत करणे.
- परीक्षा घेण्यासाठी मुदतवाढीचा प्रस्ताव यूजीसीला पाठवणे.

#### कशी असेल परीक्षा?

- परीक्षेत ६० प्रश्न असतील. त्यातील ५० सोडवणे आवश्यक.
- प्रत्येक प्रश्न १ मार्काचा अन् एक तासाची वेळ.
- १ ते ३१ ऑक्टोबर सर्व विषयांची ऑनलाइन परीक्षा आणि निकाल.
- १ नोव्हेंबरला नवे प्रवेश सुरू होतील.
- १० नोव्हेंबरला ऑनलाइन वर्ग सुरू होईल.
- ऑनलाइन सुविधा नसलेल्यांची 'एमकेसीएल' मार्फत परीक्षा

**Prabhat: 5.9.2020**

पुढारी

# अंतिम वर्षाची परीक्षा केवळ एका तासाची!

### पेपर ५० गुणांचा; निकाल ऑक्टोबरपर्यंत

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा घरी बसूनच देता याव्यात, यासाठी त्यांना विविध प्रकारचे तीन पर्याय देण्यात येणार आहेत. हे पर्याय राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने आपल्या निवडीनुसार स्वीकारावेत. तसेच अंतिम वर्षाची परीक्षा केवळ एका तासाची, परीक्षा पेपर ५० गुणांचा असेल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली. या परीक्षांचे वेळापत्रक ७ सप्टेंबर रोजी जाहीर करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असेही त्यांनी सांगितले.



अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात शुक्रवारी पुन्हा कुलगुरू आणि इतर तज्ज्ञांच्यासोबत एक बैठक घेतली. राज्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा या ओपन बुक, एमसीक्यू, असाईनमेंट बेस अशा तीन पर्यायांच्या माध्यमातून घेतल्या जातील आणि हे पर्याय निवडीचे स्वातंत्र्य विद्यापीठांना असेल, असेही सामंत म्हणाले.

कुलगुरू समितीकडून सादर केलेला अहवाल राज्यातील प्रत्येक विद्यापीठांना पाठविला आहे. या अहवालावर संबंधित विद्यापीठाने तातडीने आपल्या परीक्षेच्या संदर्भात निर्णय घेऊन त्यासाठीची माहिती कळवावी. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानंतर कोणत्याही स्थितीत या परीक्षा पार पाडायच्या आहेत. राज्यपालांनी विद्यार्थ्यांना पान २ वर

Pune Edition
Sep 5, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# अंतिम वर्षाची परीक्षा केवळ एका तासाची!

घरी बसून परीक्षा देण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता सोमवारी अथवा मंगळवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेण्यात येईल. त्यानंतर यूजीसीकडे परीक्षेच्या काही तारखा आणि त्याची मुदत वाढ करून द्यावी, अशी मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्ये १५ ते ३० सप्टेंबर या कालावधीमध्ये प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जातील आणि या सर्व प्रात्यक्षिक परीक्षा तोंडी पद्धतीने घेतल्या जातील, याविषयी आमचा निर्णय झाला आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांना लॅबमध्ये जाऊन ही प्रात्यक्षिक परीक्षा देण्याची गरज नाही, असेही सामंत यांनी स्पष्ट केले. राज्यातील विद्यापीठांमध्ये तब्बल सात लाख ९२ हजार ३८५ विद्यार्थी अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. या विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या पद्धतीने परीक्षा कशी देता येईल, यावर आमचा भर असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**Pudhari: 5.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑनलाइनसह ऑफलाइनचाही पर्याय

## अंतिम वर्ष परीक्षेसंदर्भात पुणे विद्यापीठाच्या बैठकीत निर्णय

**पुणे, ता. ४ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन हे दोन्ही पर्याय खुले ठेवले आहेत. मात्र, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाइन माध्यमाचा वापर करावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच, बॅकलॉग राहिलेल्या विषयांची पहिल्यांदा परीक्षा होईल व त्यानंतर नियमित विषयांच्या परीक्षा ऑक्टोबर महिन्यात होणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्य सरकारच्या आदेशानुसार कुलगुरूंच्या समितीने परीक्षा कशा घेता येतील याचा अहवाल सादर केला. त्यावर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्याकडे गुरुवारी बैठक झाली. त्यामध्ये सर्व विद्यापीठांना परीक्षेसंदर्भात निर्णय घेण्यासाठी ७ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार आज (शुक्रवार) पुणे विद्यापीठातील परीक्षा मंडळाची बैठक पार पडली.

अंतिम वर्षाच्या परीक्षा देणारे मात्र, आधीच्या वर्षातील किंवा सत्रातील बॅकलॉग असणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आधी घेतील जाईल. त्यानंतर अंतिम वर्षाची मुख्य परीक्षा सुरू होईल. या सर्व परीक्षा ऑक्टोबर महिन्यात पार पडणार आहेत. पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉक्टर एन. एस. उमराणी म्हणाले, ''जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षेत सहभाग घ्यावा यासाठी प्रयत्न केले जातील. मात्र ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल, लॅपटॉप अशी साधने नाहीत किंवा इंटरनेटची व्यवस्था नाही अशांसाठी ऑफलाइन परीक्षा घेतली जाणार आहे. ही परीक्षा एम.सी.क्यू. पद्धतीने होईल. परीक्षेचे वेळापत्रक पुढील चार ते पाच दिवसांमध्ये जाहीर केले जाईल.''

### एका तासाची अन् ५० गुणांची परीक्षा

विद्यापीठाने यापूर्वी विद्या परिषदेच्या बैठकीत अंतिम वर्ष परीक्षा ही एका तासाची आणि ५० गुणांची घेण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय आताही कायम असून, त्याच पद्धतीने परीक्षा घेतली जाणार आहे. तसेच, विद्यापीठाला आता पुन्हा एकदा विद्या किंवा व्यवस्थापन परिषदेकडे प्रस्ताव सादर करण्याची गरज नाही.

- पुढील ५ ते ६ दिवसांत वेळापत्रक जाहीर होणार
- एका तासाची व ५० गुणांची एसीक्यू पद्धतीने परीक्षा
- विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून ऑनलाइन, ऑफलाइनचा पर्याय खुला
- पावणेतीन लाख विद्यार्थी देणार परीक्षा

### 'प्रॉक्टर्ड' प्रणालीचा वापर

'प्रॉक्टर्ड' प्रणालीचा वापर करून अंतिम वर्षाची ऑनलाइन परीक्षा होईल. यामध्ये विद्यार्थ्याला घरात बसल्या बसल्या परीक्षा देता येईल. पण त्याने गैरमार्गाचा वापर करण्याचा प्रयत्न केल्यास रोखताही येऊ शकते. त्यामुळे परीक्षेचे महत्व कमी होणार नाही.

**Sakaal: 5.9.2020**

# गुणपत्रिकेवर येणार फोटो

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नवी प्रणाली; गैरप्रकारांना बसणार आळा

**ब्रिजमोहन पाटील :**
सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षा विभागात सुधारणा करताना आणखी एक पाऊल उचलले आहे. गुणपत्रिकेवर विद्यार्थ्यांचा फोटो छापण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे गैरप्रकारांना लगाम बसेल व सुरक्षेसाठी उपयोग होणार आहे.**

विद्यापीठाचा विस्तार पुणे, नगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमध्ये झाला आहे. या विद्यापीठाशी संलग्न १ हजार महाविद्यालयांमध्ये सुमारे सात लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठातील बहुतांश अभ्यासक्रम सत्र पद्धतीनुसारच आहेत. त्यामुळे परीक्षा विभागाचे काम निरंतर सुरु असते. विद्यापीठाच्या 'एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन'ने परीक्षा विभागासाठी पदवी प्रमाणपत्रांच्या डेटा प्रक्रिया व छपाईकरिता 'डिग्री डेटा प्रोसेसिंग अँड प्रिंटिंग' हे सॉफ्टवेअर विकसित केले आहे. डॉट मॅट्रिक प्रिंटरऐवजी लेझर प्रिंटर घेतले आहेत. यामध्ये एका मिनिटात जवळपास ६५ प्रिंट निघतात. या सॉफ्टवेअरच्या वापराने गुणपत्रिकांवर विद्यार्थ्यांचा फोटो प्रिंट करणे शक्य आहे. त्यासाठी अधिकार मंडळाची व व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली जाणार आहे.

### हे असतील फायदे

1. नामसाधर्म्यामुळे गुणपत्रिकांचा गोंधळ टाळता येईल.
2. फोटोमुळे गुणपत्रिका आपली असल्याची विद्यार्थ्याला खात्री होईल.
3. यूजीसीच्या सुरक्षा मानांकनाची अंमलबजावणी.
4. गुण बदलणे, गुणपत्रिकेवर छेडछाड करणे, डुप्लिकेट करणे हे प्रकार टळतील.

**परीक्षा विभागाने नवे तंत्रज्ञान स्वीकारल्याने गुणपत्रिकेवर फोटो छापणे शक्य आहे. अधिकार मंडळ व व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यासाठी लवकरच प्रस्ताव सादर केला जाईल. फोटो गुणपत्रिकेवर छापला गेल्याने विद्यार्थ्यांनाही समाधान असेल. सुरक्षेच्या दृष्टीनेही हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.**

**डॉ. महेश काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुणे विद्यापीठ

### प्रायोगिक तत्त्वावर अभ्यासक्रम

ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेनंतर प्रायोगिक तत्त्वावर गुणपत्रिकांवर विद्यार्थ्यांचा फोटो छापला जाण्याची शक्यता आहे.

**Sakaal: 5.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# परीक्षा अहवालातील शिफारशींबाबत कुलगुरूच अनभिज्ञ

लोकसत्ता प्रतिनिधी



**मुंबई :** परीक्षांबाबत नियुक्त करण्यात आलेल्या समितीचा अहवाल राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी जाहीर केला, मात्र राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंनाच या अहवालाची प्रत देण्यात आलेली नाही.

अगदी समितीच्या सदस्यांनाही अंतिम अहवालाची प्रत देण्यात आली नसल्याचे समजते. 'घरबसल्या' परीक्षा देण्याची घोषणा सामंत यांनी केली असली तरी अशी शिफारस करण्यात आली नसून परीक्षा घेण्याचे पर्याय सुचवण्यात आले होते, असे सूत्रांनी सांगितले.

राज्यातील अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत नेमण्यात आलेल्या विद्यापीठांचे आजी-माजी कुलगुरू, अधिकारी यांच्या समितीने परीक्षा कशा घ्याव्यात याबाबतचा अहवाल शासनाला दिला. अहवालात ऑनलाइन, बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असे विविध पर्याय सुचवण्यात आले आहेत. ११ शिफारशी *(पान २ वर)*

### घरबसल्या परीक्षांचा उल्लेखच नव्हता...

विद्यार्थ्यांना घरबसल्या परीक्षा देता येणार असल्याचे सामंत यांनी जाहीर केले. अहवालातील शिफारसी माध्यमांसमोर वाचून दाखवल्या. ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य नसल्यास लेखी परीक्षा घेण्यात यावी, मात्र तीही घरबसल्या देण्याची मुभा विद्यार्थ्यांना द्यावी, अशी शिफारस समितीने केल्याचे सामंत यांनी जाहीर केले. परंतु 'घरबसल्या' परीक्षा देण्याचा निर्णय झाला नव्हता असे सूत्रांनी सांगितले. समितीने अहवाल दिल्यानंतर कुलपतींनी कुलगुरू, उच्चशिक्षणमंत्री, राज्यमंत्री, अधिकारी यांची बैठक घेतली. त्यानंतर राज्याच्या उच्चशिक्षण संचालकांनी विद्यापीठांना परीक्षा कशा घ्याव्यात, प्राधिकरणांची मंजुरी घ्यावी अशा आशयाचे पत्र पाठवले. त्या पत्रात परीक्षा घेण्याबाबत पर्याय सुचवले आहेत. मात्र विद्यार्थ्यांना परीक्षा घरबसल्या देता येतील असा उल्लेख संचालकांच्या पत्रातही नाही. त्याचबरोबर शिरस्त्यानुसार पत्राला अहवालही जोडलेला नाही.

लोकसत्ता Sat, 05 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54722891

# परीक्षा समितीचा अहवाल कुलगुरूंकडेच नाही

*(पान १ वरून)*
असलेला अहवाल सामंत यांनी जाहीर केला. त्यानुसार पुढील दोन दिवसांत प्राधिकरणांच्या बैठका घेऊन विद्यापीठांनी निर्णय शासनाला कळवायचा आहे. प्राधिकरणांच्या मंजुरीनुसारच परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. मात्र राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंनाच अहवाल देण्यात आलेला नाही. इतकेच नाही तर समितीच्या सदस्यांनाही अंतिम अहवाल देण्यात आलेला नसून मंत्र्यांनी अहवाल जाहीर केला तरी त्यावर सर्व सदस्यांची स्वाक्षरीही नसल्याचे सूत्रांनी सांगितले. गुलदस्त्यात ठेवलेल्या अहवालाच्या आधारे प्राधिकरणांमध्ये निर्णय कसा घ्यायचा, असा प्रश्न कुलगुरूंना पडला आहे.

**कुलगुरूंची परीक्षा**

प्राधिकरणांच्या मंजुरीने विद्यापीठांच्या परीक्षांबाबत दोन दिवसांत निर्णय घेऊन, त्यानंतर पुढील १५ ते २० दिवसांमध्ये परीक्षांचे नियोजन करण्याचे आव्हान कुलगुरूंना पेलावे लागणार आहे. त्यानंतर ३१ ऑक्टोबरपूर्वी निकाल जाहीर करावा लागणार आहे. प्रत्येक विद्यापीठाला नव्याने स्वीकारलेल्या परीक्षा पद्धतीनुसार हजारो प्रश्नपत्रिका तयार कराव्या लागणार आहेत. विद्यापीठांमध्ये सद्यःस्थितीत कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची संख्याही मर्यादित आहे.

### सामंत यांनी जाहीर केलेल्या शिफारशी

- राज्यातील कोविड स्थिती लक्षात घेता विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या आरोग्याच्या काळजी याला सर्वोच्च प्राधान्य देऊन परीक्षांचे नियोजन करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी विद्यार्थ्यांना घरी बसून परीक्षा देता यावी यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत.
- विद्यापीठांची गुणवत्ता राखणे आवश्यक आहे. विद्यापीठांची विषम परिस्थिती लक्षात घेऊन कमी कालावधीच्या परीक्षा विद्यापीठांनी घ्याव्या. त्या ऑनलाइन पद्धतीने घ्याव्या. जिथे ऑनलाइन शक्य नसेल तिथे ऑफलाइन आणि प्रत्यक्ष अशा संमिश्र पद्धतीने किंवा तेही शक्य नसेल तिथे लेखी परीक्षा घ्याव्या. मात्र बहुपर्यायी प्रश्नपत्रिका, प्रकल्प, पुस्तकाच्या सहकार्याने परीक्षा या पर्यायांपैकी कोणताही एक पर्याय स्वीकारावा.
- अपंग विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरवाव्यात. त्याचप्रमाणे त्यांच्या सोयीनुसार परीक्षा घ्याव्यात.
- विद्यार्थी एखाद्या विषयाची परीक्षा देऊ न शकल्यास, त्या विद्यार्थ्याला पुन्हा परीक्षेची संधी द्यायची आहे.
- पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांच्या प्रकल्प अहवालांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने २९ एप्रिल २०२०ला निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करावी.
- प्रात्यक्षिक परीक्षा आणि तोंडी परीक्षा या ॲप, फोन या माध्यमांतून घ्याव्यात.
- परीक्षा घेऊन निकाल जाहीर करण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी.
- अंतिम वर्ष, अंतिम सत्र विद्यार्थी आधीच्या सत्रात काही विषयांत अनुत्तीर्ण असल्यास (बॅकलॉग) त्यांच्याही परीक्षा याच कालावधीत घेण्यात याव्यात.
- अभ्यासक्रम, परीक्षांची पद्धत, वेळापत्रक प्रत्येक विद्यापीठाने लवकरात लवकर जाहीर करावे.
- या तरतुदी केवळ २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षासाठीच राहील.
- या परीक्षांसाठी बदललेल्या परिस्थितीनुसार कराव्या लागणाऱ्या परीक्षांचे नियोजन, त्यासाठी विद्यापीठांची प्रचलित पद्धती, नियम, अधिनियम, परिनियम यांची तपासणी करून संबंधित प्राधिकरणाची मंजुरी लवकरात लवकर घ्यावी. परीक्षांच्या नियोजनासाठी विद्यापीठांनी विनंती केल्यास शासकीय संस्थांनी सहकार्य करावे.

लोकसत्ता Sat, 05 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54725561

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# विद्यापीठ पदवीप्रदान गुरुवारी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११७ वा पदवीप्रदान समारंभ दि. ३ सप्टेंबरला होणार होता. परंतु, माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्यानिधनामुळेत्यालास्थगितीदिली होती. आता हा सोहळा येत्या गुरुवारी (दि. १०) संध्याकाळी ४. ३० वाजता ऑनलाइन पद्धतीने व विद्यापीठाच्या काही मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पार पडेल. कार्यक्रमासाठी फोर्ब्स मार्शल कंपनीचे सह-अध्यक्ष डॉ. नौशाद डी. फोर्ब्स प्रमुख अतिथी या नात्याने ऑनलाइन पद्धतीने स्नातकांना उद्देशून दीक्षान्त भाषण देतील, तसेच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी ऑनलाइन अध्यक्षीय भाषण करतील.

सन २०१८-१९ मध्ये व तत्पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विविध विद्याशाखांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील एकूण ७ हजार ३५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे वितरित करण्यात येणार आहेत. त्यापैकी १०४ पीएच. डी. पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेले विद्यार्थी आहेत. पीएच. डी. विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांना पदवीप्रदान समारंभात पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर पुढील १५ दिवसांमध्ये पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येणार आहे.

Pune Edition
Sep 7, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# पदवी प्रदान समारंभ गुरुवारी

**पुणे :** माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या निधनामुळे राष्ट्रीय शोक व दुखवटा जाहीर करण्यात आल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११७ वा पदवी प्रदान समारंभ स्थगित करण्यात आला होता. तो आता गुरुवारी (१० सप्टेंबर) दुपारी साडेचार वाजता होणार आहे.

या वेळी कुलपती भगतसिंह कोश्यारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, उद्योजक डॉ. नौशाद फोर्ब्ज दीक्षांत भाषण देणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या उपस्थितीत हा समारंभ ऑनलाइन पद्धतीने होईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये व तत्पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विविध विद्याशाखांमधील पदवी व पदव्युत्तर परीक्षेच्या एकूण ७०३५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे. पीएचडी विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान समारंभात प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर पुढील १५ दिवसातमध्ये पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येणार आहेत.

**Maharashtra Times:7.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### अंतिम वर्ष परीक्षा : विद्यार्थ्यांकडून माहिती मागवण्यात येणार

## ऑनलाइन सुविधेची विद्यापीठाकडून चाचपणी

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६ -** अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा येत्या १ ऑक्टोबरपासून घेण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर किती विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड मोबाइल, लॅपटॉप, संगणक, इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे? याबाबतची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून चाचपणी करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून माहिती प्राप्त करण्यासाठी पुणे विद्यापीठातर्फे स्वतंत्र यंत्रणा सोमवारपासून खुली केली जाणार आहे. त्यानंतर ऑनलाइन सुविधांची उपलब्धतता स्पष्ट होणार आहे. [illegible]



पुणे विद्यापीठाकडून ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पर्यायातून परीक्षा घेण्याचे नियोजन आहे. मात्र, ऑनलाइन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी प्राधान्य देण्यासाठी विद्यापीठाचा प्रयत्न राहणार आहे. राज्य शासनाच्या सूचनेनंतर पुणे विद्यापीठाने परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले. पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयांतील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा १ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत घेतल्या जाणार आहेत.

तथापि, या परीक्षेला किती विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने व ऑफलाइन पद्धतीने बसणार आहेत, याची माहिती विद्यापीठाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून ही माहिती ऑनलाइन पद्धतीने भरून घेतली जाणार आहे. अंतिम वर्ष परीक्षेसाठी पुणे विद्यापीठातून सुमारे सव्वादोन लाख विद्यार्थी बसणार आहेत. त्यापैकी किती विद्यार्थी ऑफलाइन, ऑनलाइन ही संख्या प्राप्त होणार आहे.

> "ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देऊन शकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या महाविद्यालयामध्ये परीक्षा देण्याची व्यवस्था विद्यापीठाकडून केली जाईल. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांनासुद्धा रायटर उपलब्ध करून देण्याबाबत विद्यापीठाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.
>
> – महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुणे विद्यापीठ

प्रभात ७ सप्टे २०२०

**Prabhat: 7.9.2020**

## १ लाख ३४६ विद्यार्थ्यांनी केली ऑनलाइन नोंदणी

### अकरावी प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी पूर्ण

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ७ -** पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीसाठी प्रवेश घेण्याकरिता इच्छुक असलेल्या आत्तापर्यंत १ लाख ३४६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. प्रवेशाची पहिली फेरी पूर्ण झाली असल्याने आता विद्यार्थ्यांच्या नोंदणीत फारशी वाढ होण्याची शक्यता नाही.

या विभागात ३०४ कनिष्ठ महाविद्यालयात १ लाख ६ हजार ७७५ प्रवेशाच्या जागा दर्शवण्यात आलेल्या आहेत. या प्रवेशासाठी आधी विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करण्याचे बंधन घालण्यात आले होते. त्यानंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग-१ व २ भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

आतापर्यंत ८३ हजार ६६२ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग-१ भरला असून अर्ज लॉक करण्यात आलेले आहेत. त्यातील ८३ हजार २५४ अर्जांची तपासणीही पूर्ण झालेली आहे. ७५ हजार ३७६ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग-२ भरुन महाविद्यालयांचे पसंतीक्रमही नोंदवले आहेत. ३० हजार ५६० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून ७६ हजार २१५ प्रवेश रिक्तच आहेत.

आता दुसऱ्या नियमित प्रवेश फेरीची प्रक्रिया ४ सप्टेंबारपासून सुरू झालेली आहे. दि.८ व ९ सप्टेंबर रोजी पात्र विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी अंतिम करण्याची कार्यवाही होणार आहे. १० सप्टेंबरला या फेरीची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे. १२ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात संबंधित महाविद्यालयात प्रवेश नोंदवता येणार आहेत, अशी माहिती प्रवेश प्रक्रिया समितीकडून देण्यात आली आहे.

**Prabhat: 8.9.2020**

## अकरावीच्या दुसऱ्या फेरीसाठी पंचाहत्तर हजारांपेक्षा जास्त अर्ज

**पुणे, ता. ७ :** अकरावी प्रवेशांच्या दुसऱ्या फेरीसाठी ७५ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज केले आहेत. १० सप्टेंबर रोजी या फेरीची गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.

पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय व अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीतर्फे पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ही प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. पहिल्या फेरीनंतर ५ ते ७ सप्टेंबर या कालावधीत दुसऱ्या फेरीत कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरण्यासाठी मुदत देण्यात आली होती. त्यानुसार सोमवारी सायंकाळपर्यंत ७५ हजार ६३० विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना १० ते १२ सप्टेंबर या कालावधीमध्ये मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करायचा आहे. प्रथम पसंती क्रमानुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक असणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

**Sakaal: 8.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

Ind. Exp. 9.9.2020

### Senate members, educationists write to SPPU V-C; recommend offline, online pattern for final year exams

ALIFIYA KHAN
PUNE, SEPTEMBER 8

EVEN AS the state government and authorities at Savitribai Phule Pune University (SPPU) are yet to come up with a confirmed plan on how final year degree exams would be conducted, a letter, jointly signed by a dozen Senate members and educationists, has recommended an offline-online exam pattern for professional and non-professional courses along with a staggered exam schedule.

The letter addressed to SPPU Vice-Chancellor Dr Nitin Karmalkar states that after the Supreme Court mandated that final year degree examination would have to be conducted as per directives from University Grants Commission (UGC), a state-level committee was set up to study how exams can be conducted.

According to reports in the media, it appears that an online exam mode is being contemplated, in which students can appear from their homes.

Keeping in mind, however, the international ranking of SPPU and other factors, Senate members have suggested some measures: first, exams of professional courses should be conducted online, and second, exams of non-professional or traditional courses should be conducted offline for many reasons, of which the main is that only about 40 per cent students would have access to laptops, computers, smart phones.

"Many students come from rural pockets and low-income families. Some of them are first-generation learners. Their parents have lost their jobs or small businesses have incurred heavy losses owing to the Covid-19 pandemic. It would be wrong to assume that students would have access to technology and gadgets to appear for these online exams or even the money to ensure high speed internet or WiFi connections," the letter stated.

**They also stated that the exams should be of 50 marks, with multiple choice questions, while students should be called in three batches**

Senate members also pointed out that students have returned to their villages. Of the 2,30,000 degree students in final year, many live in remote and tribal areas where power failure is common.

Considering all these points, Senate members have requested that the exams be conducted offline at centres close to hometowns and villages of students, and that the number of centres should be increased.

They also stated that the exams should be of 50 marks, with multiple choice questions and a time duration of an hour, while students should be called in three batches. All guidelines should be followed, including maintaining a distance of two benches between each student, along with mandatory use of masks and sanitisers by students, invigilators and other staff at the exam centres, the letter further stated.

The letter was signed by the Senate's senior members and educationists, including Gajanan Ekbote, Shamkant Deshmukh, Sanjay Kharat, Santosh Dhore, Dadabhau Shinalkar, Bhagyashree Manthalkar, among others.

The Indian Express: 9.9.2020

### ऑफलाइन परीक्षेची 'सिनेट'कडून मागणी

**पुणे, ता. ८ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाइन, तर अव्यावसायिक पदवीच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, अशी मागणी अधिसभा (सिनेट) सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, अधिसभा सदस्य प्रा. डॉ. संजय खरात दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, अभिषेक बोके, बागेश्री मंठाळकर, विद्यापरिषद सदस्या प्राचार्य प्रा. डॉ. सुनीता आढाव यांनी ही मागणी केली. अव्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणारे गरीब व ग्रामीण भागातील आहेत. 'कोरोना'मुळे अनेक पालकांच्या नोकऱ्या गेलेल्या आहेत, अशा स्थितीत ऑनलाइन परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांकडे कॉम्प्युटर, लॅपटॉप, टॅब, अँड्रॉइड मोबाईल असतील असे गृहीत धरणे चुकीचे ठरेल. परीक्षेसाठी आवश्यक इंटरनेट कनेक्टिव्हिटीची खात्री देता येत नाही. ग्रामीण भागात वीजेची समस्या आहे. त्यामुळे पारंपरिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात. पुणे विद्यापीठाच्या परिक्षेत्रात राहणाऱ्या विद्यार्थ्यास त्याच्या घराजवळच्या कोणत्याही महाविद्यालयात परीक्षा केंद्र द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

Sakaal: 9.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन?

## विद्यार्थ्यांना इच्छेप्रमाणे परीक्षा देण्यासाठी विद्यापीठाची तयारी

### ऑनलाईनची चाचपणी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची 'एमसीक्यू' बेस्ड (बहुपर्यायी) परीक्षा घेण्यात येणार असून, परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने घेण्याबाबत चर्चा सुरू आहे. परीक्षा पद्धतीबाबत अजूनही अंतिम निर्णय झालेला नसून, विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देता येण्यासाठी विद्यापीठाकडून तयारी केली जात आहे. दरम्यान, ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असणाऱ्या, 'गॅजेट्स'चा आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा सर्व्हे करण्यात येत आहे.



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून परीक्षेची तयारी सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाने परीक्षेसाठी ऑनलाइन किंवा ऑफलाइन असे पर्याय विद्यार्थ्यांसमोर ठेवल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे. काही विद्याशाखांच्या अभ्यासक्रमांतील विषयांच्या परीक्षा नियमाप्रमाणे ४० गुणांच्या राहतील. अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षा १५ सप्टेंबरपासून सुरू होणार आहेत. कॉलेज प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा गुगल मीट किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग तंत्रज्ञानाचा पर्याय वापरुन घ्यायच्या आहेत. कोरोनामुळे प्रत्यक्ष प्रयोगशाळांमध्ये येऊन प्रात्यक्षिक परीक्षा शक्य नाही, असे डॉ. काकडे म्हणाले.

अंतिम वर्षाच्या परीक्षा किती विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने देऊ शकतात, याची चाचपणी विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून सर्व्हेद्वारे संबंधित माहिती भरून घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या संपूर्ण माहितीसह त्याच्याकडे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी लॅपटॉप, डेस्कटॉप, टॅबलेट, अँड्रॉईड मोबाईल अशी साधने आहेत का, त्यांची रॅम, स्क्रीन, इंटरनेट स्पीड, इंटरनेट कनेक्टिव्हिटी अशी माहिती विद्यार्थ्यांना स्टुडन्ट प्रोफाइल सिस्टीममधून भरायला सांगण्यात आली आहे. विद्यार्थ्याने ही माहिती एकदा भरली की, ती अंतिम समजली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी माहिती काळजीपूर्वक भरण्याचे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.

## सीईटी लांबल्याने पदवी प्रवेशासाठी चुरस

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

व्यावसायिक अभ्यासक्रमांची सीईटी परीक्षा लांबणीवर पडल्यामुळे विद्यार्थ्यांचा सध्या पदवी प्रवेशाकडे कल आहे. त्यातच बारावीच्या निकालात यंदा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ४.७८ टक्क्यांनी वाढले आहे. त्यामुळे पुण्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये पारंपरिक बीए, बीकॉम, बीएस्सी अशा पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी यंदा चुरस पाहायला मिळत आहे.



पुण्यातील नामांकित फर्ग्युसन कॉलेज, बीएमसीसी, एसपी कॉलेज, गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स अशा महाविद्यालयामांध्ये प्रथम वर्ष बीए, बीकॉम, बीएस्सी अशा अभ्यासक्रमांचे कट ऑफ गुण ८५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या कॉलेजांमध्ये प्रवेशाच्या चौथ्या किंवा पाचव्या फेऱ्या सुरू असून, कट ऑफ गुणांची टक्केवारी ८० ते ८५ टक्के गुणांच्या दरम्यान आहे, असे प्राध्यापकांनी सांगितले. बीएमसीसीच्या शेवटच्या निवड यादीचे कट ऑफ गुण ८९ टक्के आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे यंदा इंजिनिअरिंग, फार्मसी, वैद्यकीय शाखांच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया रखडल्या आहेत. तर, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी होणारी सीईटी परीक्षा अजूनही झालेली नाही. तर, वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी होणारी नीट प्रवेशपरीक्षा येत्या १३ सप्टेंबर रोजी होणार आहे. या सर्वाचा विचार करून, शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून, अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणारे विद्यार्थी नामांकित महाविद्यालयांच्या प्रवेशप्रक्रियेत सहभागी झाले आहेत. तर, काही विद्यार्थ्यांनी बीएस्सी किंवा बीकॉम शाखेत प्रवेशही निश्चित केले आहेत. या सर्व प्रकारामध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून नामांकित महाविद्यालयांमध्ये पदवीचे शिक्षण घेण्याची आशा लावून बसलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी झगडावे लागत आहे. ८० टक्क्यांपेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयांऐवजी इतर महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा लागणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

Pune Edition
Sep 9, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

**ऑफलाइन घेण्याची अधिसभा सदस्यांची मागणी**

# विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षेवर प्रश्नचिन्ह

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. ८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइनद्वारे घेण्यास प्राधान्य दिले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांची परीक्षा ऑनलाइनद्वारे घेण्यास हरकत नाही. मात्र, ऑनलाइन सुविधा सर्वच विद्यार्थ्यांकडे नाहीत. त्याचा विचार करून आणि विद्यापीठाची गुणवत्ता टिकविण्यासाठी पारंपरिक अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइनद्वारे घेण्यात येऊ नये, अशी मागणी करीत अधिसभा सदस्यांनी ऑनलाइन परीक्षांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

सध्या अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन सुरू आहे. त्या ऑनलाइनद्वारे होणार असल्याचे दिसून येत आहे. मात्र, सरसकट सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेसाठी आग्रह धरणे चुकीचे आहे. त्यामुळे पारंपरिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाइन अर्थात पूर्वीप्रमाणेच घेण्यात यावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. अधिसभा सदस्य प्राचार्य संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर आणि प्राचार्य सुनीता आढाव यांनी ही मागणी केली. त्याचबरोबर प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांचीही निवेदनावर स्वाक्षरी आहे.

**Prabhat: 9.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

## विद्यार्थ्यांकडील सुविधांचे विद्यापीठाकडून सर्वेक्षण



**पुणे :** अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यात ऑनलाइन परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकडे असलेल्या साधनसुविधांची माहिती संकलित करण्यात येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शन तत्त्वानुसार विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून परीक्षेची तयारी सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाकडून परीक्षेसाठी ऑनलाइन किंवा ऑफलाइन या दोन्ही पर्यायांचा विचार सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन परीक्षा घेण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकडून माहिती घेतली जात आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले की, करोनाच्या प्रादुर्भावात सर्व नियम पाळून अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. बहुपर्यायी प्रश्न स्वरूपाची पन्नास गुणांची परीक्षा होईल. त्यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन हे दोन्ही पर्याय समोर आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा १५ सप्टेंबरपासून दूरचित्र संवाद तंत्रज्ञानाद्वारे होतील. अंतिम वर्षाचे किती विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देऊ शकतात हे तपासण्यासाठी सर्वेक्षण सुरू आहे. त्यात लॅपटॉप, संगणक, टॅबलेट, स्मार्टफोन अशी साधने, इंटरनेट जोडणी आदी सुविधांच्या उपलब्धतेची माहिती विद्यार्थ्यांकडून घेतली जात आहे. सर्वेक्षणानंतर विद्यापीठाकडून परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले जाईल.

लोकसत्ता Wed, http:

---

लोकमत

# 'क्वेशन बँक' करण्यास प्रारंभ

### अंतिम वर्षाची परीक्षा : विद्यार्थ्यांची 'मॉकटेस्ट' घेणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरु केली असून, नुकत्याच झालेल्या सर्व अभ्यास मंडळाच्या (बोर्ड ऑफ स्टडीज) बैठकीत सर्वांना प्रश्न संच (क्वेशन बँक) तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच विद्यापीठातर्फे ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती जमा करून ऑनलाइन परीक्षा देणे शक्य असणाऱ्या विद्यार्थ्यांची मॉकटेस्ट घेण्याचे निश्चित केले आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत परीक्षेच्या नियोजनाच्या तयारीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच एमसीक्यू पद्धतीने परीक्षा घेण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर व प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांनी सर्व अभ्यास मंडळांची नुकतीच बैठक झाली. त्यात सर्व विषयांच्या परीक्षेसाठी क्वेशन बँक तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. एका विषयासाठी ३०० ते ५०० प्रश्न तयार करून ठेवावेत, असे अभ्यास मंडळाच्या प्रमुखांना सांगण्यात आले. त्यानुसार सर्व अभ्यास मंडळांनी कामास सुरुवात केली आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील किती विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा देणे शक्य आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांकडे लॅपटॉप, अँड्रॉईड मोबाईल, संगणक आदी कोणती इलेक्ट्रॉनिक साधने उपलब्ध आहेत, याबाबत माहिती जमा करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यासंदर्भातील लिंक प्रसिद्ध करून विद्यार्थ्यांकडून ही माहिती भरून घेतली जाईल. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रोफाईलमध्ये ही माहिती जमा होणार असल्याने पुढील काळात होणाऱ्या परीक्षांसाठी सुद्धा त्याचा उपयोग करता येणार आहे.

#### परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात

विद्यापीठाने व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन, तर अव्यावसायिक विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात. अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असते. त्यामुळे या विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन परीक्षा देण्यासाठी साधणे उपलब्ध असण्याची शक्यता कमी आहे. विद्यापीठाने सकाळी १० ते ११, दुपारी १ ते २ आणि दुपारी ४ ते ५ या तीन सत्रांत ५० गुणांची ऑफलाइन पद्धतीने बहुपर्यायी परीक्षा घ्यावी. दोन विद्यार्थ्यांमध्ये दोन बाकांचे अंतर ठेवल्यास आणि प्रत्येकाने मास्कचा वापर केल्यास परीक्षा घेणे शक्य आहे, असे निवेदन विद्यापीठाच्या काही अधिसभा सदस्यांनी व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठाला दिले आहे.

Pune Main
Page No. 2 Sep 09, 2020
Powered by: erelego.com

---

## अंतिम सत्राची परीक्षा गृहपाठ आधारित घ्यावी

**पुणे :** अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांची परीक्षा गृहपाठ आधारित घ्यावी, अशी मागणी सावित्राबाई फुले पुणे



विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य अभिषेक बोके यांनी केली आहे. मागणीचे निवेदन त्यांनी नुकतेच कुलगुरूंकडे दिले.

वस्तुनिष्ठ पद्धतीने अंतिम सत्राच्या परीक्षा घेणे अव्यवहार्य ठरेल, विद्यार्थ्यांमध्ये त्याबद्दल नाराजी आहे, याकडे लक्ष वेधून बोके यांनी म्हटले आहे की, मध्य प्रदेश, झारखंड या राज्यात तसेच बनारस विद्यापीठात गृहपाठ पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय झाला आहे.

**Kesari: 9.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# नव्या शैक्षणिक धोरणाबाबत सर्वंकष चर्चा

### केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांच्याशी उद्या वेबसंवाद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** देशातील शिक्षणाची पुढील दिशा ठरवणाऱ्या नव्या शिक्षण धोरणाबाबत सर्वंकष चर्चा 'लोकसत्ता विश्लेषण' या कार्यक्रमात होणार आहे. केंद्रीय पर्यावरण, माहिती आणि प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर यांचा सहभाग असलेला हा वेबसंवाद गुरुवारी (१० सप्टेंबर) सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

केंद्र सरकारने नुकतीच नव्या शिक्षण धोरणाला मान्यता दिली आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हे धोरण तयार केले आहे. काळानुरूप आवश्यक असलेल्या बदलांचा या धोरणात समावेश करण्यात आला आहे. तसेच शिक्षणातील पारंपरिक चौकटी मोडून शिक्षक, विद्यार्थ्यांना मोकळीक देण्यात आली आहे. तसेच ऑनलाइन अभ्यासक्रम, संशोधनावर भर, आंतरविद्याशाखीय शिक्षण, कौशल्य विकास, अभ्यासक्रमांतील बदल यावर या धोरणात भर देण्यात आला आहे. या सर्वच मुद्द्यांच्या अनुषंगाने 'लोकसत्ता विश्लेषण'मध्ये सविस्तर चर्चा होणार आहे. नव्या धोरणामागील विचार, अंमलबजावणी या अनुषंगाने जावडेकर भूमिका मांडणार आहेत. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक, शिक्षण क्षेत्राशी संबंधित स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, पालक यांना शिक्षण धोरण समजून घेण्यासाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरेल.



लोकसत्ता विश्लेषण

कार्यक्रमात सहभागासाठी http://tiny.cc/LS_Vishleshan_10Sep येथे नोंदणी आवश्यक.

लोकसत्ता Wed, 09 September 2020 https://epaper.loksatta.com/c/54824263

# पदवी प्रवेशासाठीही चुरस

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बारावीचा निकालात यंदा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ४.७८ टक्क्यांनी वाढल्याने पुण्यातील नामांकित महाविद्यालयांत बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. या अभ्यासक्रमांना ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी झगडावे लावत आहे. करोनाच्या प्रादुर्भावामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत संदिग्धता असल्याने, विद्यार्थ्यांचा सायन्स व कॉमर्स शाखेकडील ओढा वाढल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS

फर्ग्युसन, बी. एम. सी. सी. , एस. पी., गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स अशा महाविद्यालयांचे प्रथम वर्ष बीए, बीकॉम, बीएस्सीचे कट ऑफ ८५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या महाविद्यालयांत प्रवेशाची चौथी किंवा पाचवी फेरी सुरू असून, कट ऑफ गुणांची टक्केवारी ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत आहे. 'बीएमसीसी'च्या शेवटच्या निवड यादीचा कट ऑफ गुण ८९ टक्के आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे इंजिनीअरिंग, फार्मसी, वैद्यकीय शाखांच्या प्रवेश प्रक्रिया रखडल्या आहेत. तर, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची सीईटी अजून झालेली नाही. शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणारे विद्यार्थीही नामांकित महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. यामध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयांत पदवीचे शिक्षण घेण्यासाठी झगडावे लागत आहे. ८० टक्क्यांपेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयांत प्रवेश घ्यावा लागणार असल्याचे चित्र आहे.

> "नवीन शैक्षणिक धोरणानुसार नियमित विद्यार्थ्याला त्याच्या गरजेप्रमाणे दूरशिक्षण घेता आले पाहिजे; तसेच दूरशिक्षण घेणाऱ्यालाही नियमित पद्धतीने शिक्षण घेता आले पाहिजे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची दूरशिक्षण व्यवस्था उत्तम दर्जाची आहे. विद्यार्थी-पालकांनी अशा पर्यायांचा विचार करावा.
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव**, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स, कॉमर्स

> खुल्या प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी झगडावे लागत आहे. तर, ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्येही प्रवेशासाठी स्पर्धा आहे. बारावीच्या निकालाचा टक्का वाढल्यावर सरकारने पदवीच्या जागा वाढवाव्यात.
> **- डॉ. सी. एन. रावळ**, प्राचार्य, बीएमसीसी

**पुणे जिल्ह्यातील बारावी उत्तीर्ण विद्यार्थी**

| श्रेणी | विद्यार्थी |
|---|---|
| विशेष प्रावीण्य श्रेणी | १५८८४ |
| प्रथम श्रेणी | ४४,०२० |
| द्वितीय श्रेणी | ४९.८५५ |
| उत्तीर्ण | ४,२९७ |
| एकूण | १,१४,०५६ |

पुणे जिल्ह्यातील आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्सच्या महाविद्यालयांची क्षमता
**५५ ते ५५ हजार**

अभियांत्रिकी महाविद्यालयांची क्षमता
**सुमारे ४० हजार**



Maharashtra Times: 9.9.2020

पुणे PLUS

# विद्यापीठाचे उद्या ऑनलाइन पदवीप्रदान

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११७ वा पदवीप्रदान समारंभ उद्या, गुरुवारी (१० सप्टेंबर) सायंकाळी ४.३० वाजता ऑनलाइन पद्धतीने काही मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणार आहे. समारंभासाठी उद्योजक डॉ. नौशाद फोर्ब्स हे प्रमुख अतिथी म्हणून; तसेच राज्यपाल भगतसिंह कोश्यारीसुद्धा ऑनलाइन पद्धतीने पदवीप्रदान समारंभात सहभागी होणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये व तत्पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विविध विद्याशाखांतील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील एकूण ७,०३५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे दिली जातील. त्यापैकी १०४ पीएचडी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेले विद्यार्थी आहेत. यापैकी सात विद्यार्थ्यांना पदवी प्रदान समारंभात पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. करोनाच्या प्रादुर्भावामुळे सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर पुढील १५ दिवसांत पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्रे पाठविण्यात येतील. ११७ व्या पदवीप्रदान समारंभाचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या वेबसाइटवर पाहता येईल.

Maharashtra Times: 9.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

### ९ वी-१२ वीपर्यंत शाळा; मार्गदर्शक सूचना जारी

नवी दिल्ली : नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी २१ सप्टेंबरपासून स्वेच्छा आधारावर अंशत: शाळा सुरु करण्यासाठी आरोग्य मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांना आपसात वही, पुस्तक, पेन, पेन्सिल, पाण्याची बाटली सामायिकपणे वापर करता येणार नाही. सामूहिक प्रार्थना, खेळांचे आयोजन करण्याची मुभा नसेल, असे मार्गदर्शक सूचनांत म्हटले आहे. ऑनलाईन शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि लक्षणेरहित विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना शालेय परिसरात परवानगी असेल. वर्ग घेण्यासाठी स्वंतत्र वेळेचे नियोजन करावे लागेल. शाळा अंशत: सुरु करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांची, आई-वडिलांची लेखी संमती असणे जरुरी आहे. सहा फूट अंतर राहील, अशी बैठक व्यवस्था करावी लागेल. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मास्क घालणे जरुरी आहे. रांगेसाठी शाळेत आणि शाळेबाहेरच्या परिसरात जमिनीवर सहा फूट अंतरावर खुणा आखाव्यात. शिक्षक, कर्मचारी कक्ष, कार्यालय, स्वागत कक्ष, उपाहारगृह, ग्रंथालयात कटाक्षाचे शारीरिक अंतर राखले जावे. व्यवस्थापनाला शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसाठी फेस मास्क, हॅण्ड सॅनिटायझर उपलब्ध करुन द्यावे लागेल. मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन उच्च शैक्षणिक संस्था आणि कौशल्य प्रशिक्षण केंद्रही २१ सप्टेंबरपासून वर्ग सुरु करु शकतात.

Pune Main
Page No. 7 Sep 09, 2020
Powered by: erelego.com

### नववी ते बारावीसाठी केंद्राकडून एसओपी जारी

नवी दिल्ली, ता. ८ (वृत्तसंस्था) : इयत्ता ९ ते १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे वर्ग २१ सप्टेंबरपासून सुरू करण्यासंबंधीची प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) आज रात्री जारी केली. प्रत्येक इयत्तेचे वर्ग वेगवेगळ्या वेळी घ्यावे लागतील, तसेच कोरोनाचे लक्षण दिसणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश दिला जाता कामा नये, अशा अटी त्यात आहेत.

शिक्षण, विद्यार्थी आणि शाळेच्या इतर कर्मचाऱ्यांनी आपापल्यांमध्ये किमान सहा फुटांचे अंतर ठेवले पाहिजे. ठरावीक वेळाने हात धुणे, तोंडाला मास्क लावणे, आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे अशा अटी सरकारने घातल्या आहेत.

**विद्यार्थ्यांसाठी**

- शाळेत येण्यासाठी पालकांची लेखी संमती आवश्यक
- लॉकर वापरता येतील; मात्र शारीरिक अंतराच्या नियमांचे पालन सक्तीचे
- जलतरण तलाव, सामूहिक खेळांना परवानगी नाही
- आपल्या कोणत्याही वस्तू एकमेकांना देता येणार नाहीत
- प्रात्यक्षिकांच्या वेळा वेगवेगळ्या असतील

**शाळांसाठी...**

- विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी वेगवेगळ्या वेळा निश्चित कराव्यात
- वर्गाऐवजी खुल्या मैदानात शिकविण्याच्या पर्यायाचा विचार करावा
- ऑनलाइन व डिस्टन्स लर्निंगची व्यवस्था करावी
- शाळा उघण्यापूर्वी निर्जंतुकीकरण गरजेचे
- केवळ ५० टक्के शिक्षकांनाच ऑनलाइन टीचिंग किंवा टेलि कौन्सिलिंगसाठी बोलवावे
- बायोमेट्रिक उपस्थिती ऐवजी इतर पर्यायांचा वापर करावा
- सर्वांच्या तपासणीसाठी पल्स ऑक्सिमीटर आवश्यक

**यांना प्रवेश नाही...**

- क्वारंटाइन झोनमधील विद्यार्थी, शिक्षक वा कर्मचारी
- विद्यार्थी, शिक्षक किंवा कर्मचाऱ्यांना कोणताही आजार असल्यास

**Sakaal: 9.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### ९वी ते १२ वीच्या शाळा २१ सप्टेंबरपासून सुरू होणार

***नवी दिल्ली*** : इयत्ता ९ ते १२ वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळा २१ सप्टेंबरपासून सुरू करण्यास केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची परवानगी मिळाली आहे. स्वेच्छेने व पालकांच्या संमतीने शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी शाळेत येतील. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून याबाबतच्या गाईडलाईन्स जारी करण्यात आल्या आहेत. त्यासाठी काटेकोरपणे गाईडलाईन्सचे पालन करणेसुद्धा गरजेचे आहे. पालकांच्या संमतीनेच विद्यार्थी शाळेत येतील. शिवाय शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाळा सुरू करण्यास परवानगी असेल. एखादा विद्यार्थी किंवा शिक्षक आजारी असल्यास त्याने शाळेत येऊ नये. शाळेत एक वेगळी विलगीकरण खोली बनविली पाहिजे. जेणेकरून जर कोणी आजारी असेल तर तो आरोग्य सुविधा येईपर्यंत त्या खोलीत राहू शकेल. जर एखादा विद्यार्थी आजारी पडला तर त्याला पालकांसह स्थानिक आरोग्य यंत्रणेस माहिती द्यावी लागेल. मास्क, सॅनिटायझरचा वापर शाळेत वेळोवेळी खबरदारी म्हणून केला जाणार आहे. शाळेत सोशल डिस्टन्सिंग पाळलं जाण्यासाठी ६ फूट अंतर राखावे.

**Saamana: 9.9.2020**

NATION

THE TIMES OF INDIA, PUNE
WEDNESDAY, SEPTEMBER 9, 2020

# SOPs out for reopening of sr schools, higher edu institutes

## Centres That Are In Containment Zones Can't Open

TIMES NEWS NETWORK

**New Delhi**: As part of the phase-wise unlocking, the ministry of health and family welfare issued standard operating procedures (SOPs) for partial reopening of secondary and senior secondary schools on Tuesday. The preventive measures to contain spread of Covid-19 are also meant for skill or entrepreneurship training institutions, higher educational institutions conducting doctoral courses and post graduate studies.

File pic



CURBING SPREAD OF COVID-19

As per the SOP effective from September 21, 2020, students from class IX onwards would be allowed to visit schools on "voluntary basis, for taking guidance from their teachers" subject to written consent of their parents/guardians. The visits and teacher–student interaction must be organised in a staggered manner.

The SOP for higher education stated that entrepreneurship training has been permitted skill training institutes registered with National Skill Development Corporation or State Skill Development Missions or other government ministries, National Institute for Entrepreneurship and Small Business Development, Indian Institute of Entrepreneurship, and their training providers.

For higher educational institutions, conducting technical programmes requiring laboratory/experimental works will be permitted by the department of higher education. Both the SOPs outlined precautionary measures to be adopted including physical distancing, use of face masks, hand washing, reporting illness and prohibition on spitting, among others.

Only schools and HEIs outside containment zones shall be allowed to open. Moreover, students, teachers and employees living in containment zones are not allowed to attend the. Institutions are also to arrange back-up stock of personal protection items for teachers and staff. Allotment will be prioritised for those who are not local residents or do not have facility for online education.

**Times of India: 9.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# अंशतः निर्बंधांसह २१ सप्टेंबरपासून शाळा

## नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास आरोग्य मंत्रालयाची परवानगी

नवी दिल्ली, दि. ८ - अंशतः निर्बंधांसह इयत्ता नववी ते बारावीच्या वर्गांसाठी स्वेच्छेने शाळा सुरू करण्यास आरोग्य मंत्रालयाने परवानगी दिली आहे. मात्र विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, पाण्याच्या बाटल्या वगैरे साहित्य बाळगायला परवानगी नसेल. विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण आणि खेळांचे तासही होणार नाहीत. तसेच ऑनलाइन शिक्षणाला प्रोत्साहन दिले जावे आणि लक्षण न दिसणाऱ्यांनाच प्रवेश दिला. जावा. मात्र शाळेत विद्यार्थ्यांना पाठवण्याबाबत पालकांची लेखी संमती आवश्यक असणार आहे, असेही मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केले आहे.

विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या आवारातच कॅफेटेरिया अथवा मेस असतील, तर ते बंद ठेवावे लागणार आहे. विद्यार्थ्यांनी एकाचवेळी गर्दी करू नये, म्हणून रांगेसाठी ६ फूट अंतरावरील खुणा केल्या जायला हव्यात. त्याचप्रमाणे शिक्षक, कार्यालय आदी ठिकाणीही सोशल डिस्टन्सिंग राखले जायला हवे. शिक्षक आणि शिक्षकेतर अशा ५० टक्के कर्मचाऱ्यांना 'ऑनलाइन शिक्षण, टेलिकौन्सिलिंग' सारख्या कामांसाठी शाळेत बोलावले जावे.

शाळेत मास्क, फेस शिल्ड, सॅनिटायजर इत्यादीचा पुरेसा साठा शाळा व्यवस्थापनाकडून शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करून द्यावा. जेथे शक्य तेथे आरोग्य सेतू ॲपच्या वापराची सूचना दिली जायला हवी, असेही मार्गदर्शक सूचनेत म्हटले आहे.

**Prabhat: 9.9.2020**

9·9·2020

## अकरावीच्या वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापनच्या विद्यार्थ्यांना अजब धडे

9sep20

# बालभारतीच्या पुस्तकात हजारो चुका

लोकसत्ता

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : बालभारतीच्या इयत्ता अकरावीच्या 'वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन' विषयाच्या पुस्तकात हजारो चुका असल्याचे समोर आले आहे. गेल्या वर्षीच्या पुस्तकात दुरुस्ती केल्याचे बालभारतीचे म्हणणे असून, प्रत्यक्षात पुस्तकात अद्यापही चुका असल्याचे दिसून येते.

वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन विषयाच्या अभ्यास मंडळाचे माजी सदस्य प्रा. भानुदास चौधरी यांनी या चुका दाखवून दिल्या. 'वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन' हे मराठी माध्यमाचे पुस्तक २०१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. या पुस्तकातील प्रत्येक प्रकरणात चुका आहेत. त्यात व्याकरणाच्या आणि आशयाच्या दोन्ही प्रकारच्या चुकांचा समावेश आहे.

"पुस्तकातील चुका गेल्या वर्षीच मंडळाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यातील काही चुका यंदा दुरुस्त करण्यात आल्या आहेत. मात्र अजूनही पुस्तक संपूर्णतः निर्दोष झालेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. या विषयासाठीचे अभ्यास मंडळ अपात्र आहे. ते बरखास्त करण्यात यावे. तसेच सदर पुस्तक रद्द करून त्याचा खर्च अभ्यास मंडळाच्या सदस्यांकडून वसूल करण्यात यावा. विनोद तावडे आणि प्राची साठे यांच्या कार्यकाळात या अभ्यास मंडळाची नेमणूक करण्यात आली आहे," असे प्रा. चौधरी यांनी सांगितले.

### फास्ट फूड म्हणजे सकस आहार...



या चुकांमध्ये चक्क सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव चुकीचे छापण्यात आले आहे. जागतिक बँकेची माहिती देताना 'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स'चे भाषांतर 'राज्यपाल मंडळ' असे करण्यात आले आहे, तर 'फास्ट फूड'च्या जागी 'सकस आहार' असे लिहिण्यात आले आहे, अशी माहिती प्रा. भानुदास चौधरी यांनी दिली.

> चौधरी यांनी गेल्या वर्षी मंडळाच्या निदर्शनास आणलेल्या आशयाच्या चुकांची दुरुस्ती करून त्याचे शुद्धिपत्र सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना पाठवण्यात आले आहे, तसेच संकेतस्थळावरही त्याची प्रत उपलब्ध आहे. शैक्षणिक वर्ष २०२० साठीच्या पुस्तकात चुकांची दुरुस्ती करून पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. तरीही पुस्तकात काही चुका राहिल्या असल्यास त्या मंडळाला कळवाव्यात. त्या अभ्यास मंडळापुढे ठेवून अभिप्रायानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
>
> – विवेक गोसावी, संचालक, बालभारती

**Loksatta: 9.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

## ऑनलाइन परीक्षेबाबत अधिसभा सदस्यांकडून प्रश्नचिन्ह



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या सर्वच विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन परीक्षेसाठीच्या सुविधा नाहीत. त्याचा विचार करून आणि विद्यापीठाची गुणवत्ता टिकवण्यासाठी पारंपरिक अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येऊ नये, अशी मागणी विद्यापीठाच्या काही अधिसभा सदस्यांनी केली आहे. तसेच संलग्न महाविद्यालयांतील भौतिक सुविधांचा वापर करण्याची शिफारसही करण्यात आली आहे.

विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबत सुरू असलेल्या नियोजनाच्या पार्श्वभूमीवर अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना निवेदन देऊन बैठक घेण्याची मागणी केली आहे.

अधिसभा सदस्यांमध्ये प्राचार्य डॉ. संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर, प्राचार्य सुनीता आढाव, प्रा. शामकांत देशमुख यांच्यासह प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांचा समावेश आहे. तसेच परीक्षा केंद्रांची संख्या वाढवावी, विद्यार्थ्यांना घराच्या जवळचे केंद्र द्यावे, परीक्षा दिवसभरात तीन सत्रात घ्यावी, संसर्ग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करण्याच्या शिफारसीही करण्यात आल्या आहेत.

लोकसत्ता Thu, 10 September 2020
https://epaper.loksatta.com/c/

---

लोकमत

## अंतिम वर्षाच्या परीक्षांचा विकल्प अर्ज उपलब्ध

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : १३ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरण्यास मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम सत्र वर्षातील पात्र विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन पध्दतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली असून, विद्यार्थ्यांना ऑफलाइन पद्धतीने सुद्धा परीक्षा देता येणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन येत्या १३ सप्टेंबरपर्यंत लॉगइन आयडीतून विकल्प अर्ज भरता येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा, तसेच प्रात्यक्षित / मौखिक / प्रकल्प / चर्चासत्रे या परीक्षांच्या आयोजनाबाबत विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली आहे. अधिकार मंडळांच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या व अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन विद्यापीठातर्फे केले जात आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात देशभरातील व परदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या सुध्दा मोठी आहे.

> विद्यार्थ्यांना लॉगइन आयडीतून विकल्प अर्ज भरता येणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रतिकूल परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या आरोग्याची सुरक्षितता धोक्यात न घालता पालकांच्या सहकार्याने विकल्प अर्ज भरावा. तसेच विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या ऑनलाइन पध्दतीने परीक्षा देण्याचा अवलंब करावा.
>
> **- डॉ. महेश काकडे,** संचालक ,परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यार्थ्यांना परीक्षांबाबतचा विकल्प अर्ज http://sps.unipune.ac.in या लिंकवर उपलब्ध होईल.

कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठाने ऑनलाइन पध्दतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडीवर विकल्प अर्ज उपलब्ध करुन देण्यात आला असून विद्यार्थ्यांना बाबत काही अडचण असल्यास आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य, परीक्षा अधिकारी/ विषय शिक्षक यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

Hello Pune
Page No. 8 Sep 10, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑफलाइन परीक्षेचाही पर्याय

### पर्याय निवडण्याची मुदत १३ सप्टेंबरपर्यंत

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांना ऑफलाइन पद्धतीनेसुद्धा परीक्षा देता येईल. करोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या आरोग्याची सुरक्षितता धोक्यात न घालता पालकांच्या सहकार्याने परीक्षा पद्धतीबाबत पर्याय अर्ज भरावा. ऑनलाइन पद्धतीने अधिकाधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी.

– डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षातील पात्र विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन; तसेच ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने परीक्षा देण्याची सुविधा विद्यापीठाकडून उपलब्ध करून दिली आहे. याबाबत अधिक माहिती पुणे विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध असून, विद्यार्थ्यांना लॉगइन आयडीचा वापर करून पर्यायाचा अर्ज भरता येणार आहे. अर्ज भरण्याची अंतिम मुदत रविवार १३ सप्टेंबरपर्यंत आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

पुणे विद्यापीठाचा देशभरातील व परदेशातील नावलौकिक व प्रतिष्ठा लक्षात घेऊन या विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रमांसाठी इतर राज्यातील; तसेच परदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यांतील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील अशा विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. सध्या करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता अंतिम सत्रातील/ अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरीता विद्यापीठाने ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याबाबत विद्यापीठाच्या वेबसाइटवर विद्यार्थ्यांच्या लॉगइन आयडीवरून पर्याय अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. याबाबतीत काही अडचणी असल्यास विद्यार्थ्यांनी आपल्या कॉलेजचे प्राचार्य किंवा परीक्षा अधिकारी; तसेच विषय शिक्षक यांच्याशी संपर्क साधावा. दरम्यान, करोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर अंतिम वर्षातील परीक्षांसाठी पात्र विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडून सुरक्षितपणे परीक्षा द्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे. परीक्षांच्या पद्धतीबाबतचा पर्याय अर्ज विद्यार्थ्यांना पुढील लिंकवर उपलब्ध होईल : http://sps.unipune.ac.in/

CS Scanned with CamScanner

**Maharashtra Times: 10.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

### Section: Education



पुणे/ जिल्हा-उपनगर/पिंपरी-चिंचवड

# परीक्षेसाठी कंपन्यांचे 'लॉग इन'

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बड्या व्यक्तीचा संदर्भ देऊन विद्यापीठांत सादरीकरण

मटा विशेष

Harsh.Dudhe

### ऑनलाइन परीक्षेसाठी थेट आयटी कंपनीची नियुक्ती?

राज्यातील विद्यापीठात एखादे काम त्रयस्थामार्फत करायचे झाल्यास किंवा त्रयस्थ यंत्रणा कार्यान्वित करायचे असल्यास, त्याची मान्यता अधिकार मंडळाकडून घ्यावी लागते. त्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून, त्यात या संस्थांना सहभागी व्हायची संधी देण्यात येते. या प्रक्रियेतून सर्वोत्तम व्यक्तीची कंत्राटदार म्हणून निवड होते. मात्र, या प्रक्रियेत थेट आयटी कंपनीची निवड होण्यासाठी बड्या व्यक्तीच्या नावाने लॉबिंग करण्यात येत असल्याची चर्चा सुरू आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अशाच एका कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ऑनलाइन परीक्षेच्या नियोजनाबाबत सादरीकरण केल्याची चर्चा आहे.

पुणे : राज्यात अकृषी विद्यापीठांच्या ...तिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन होणार, ...ी ऑफलाइन ही चर्चा सुरू असतानाच, ...ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी ...ासगी आयटी कंपन्या विद्यापीठांमध्ये ...रकाव करण्याच्या तयारीत आहेत. ...का कंपनीच्या अधिकाऱ्याकडून ...ाहेबांचा माणूस आहे,' असे सांगून ... व तंत्रशिक्षण विभागाच्या एका ...संदर्भ देऊन ऑनलाइन परीक्षा पद्धतीचे सादरीकरण विद्यापीठांमध्ये करण्यात येत आहे.

याबाबत कोणीही उघडपणे बोलत नसले, तरी विद्यापीठाच्या वर्तुळात याबाबत चर्चा रंगल्या आहेत. राज्य सरकारने विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊन, निकाल जाहीर करण्यासाठी विद्यापीठांना ३१ ऑक्टोबरची मुदत दिली आहे. एवढ्या कमी कालावधीत परीक्षांचे नियोजन करायचे असल्याने, विद्यापीठांनी परीक्षा पद्धतींसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोन पर्याय निवडले आहेत. या दोन पर्यायांबाबत विद्यापीठांच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळामध्ये चर्चा सुरू असतानाच, एका आयटी कंपनीने ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी पुढाकार घेतला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागातील बड्या व्यक्तींचे नाव घेऊन, संबंधित आयटी कंपनीचे अधिकारी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्तुळात शिरकाव करण्याचा प्रयत्न करीत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे या कंपनीला कोणाचे पाठबळ आहे, सर्व विद्यापीठांमध्ये एकच कंपनी ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी असेल का, असे अनेक प्रश्न शैक्षणिक वर्तुळात उपस्थित करण्यात येत आहे. दरम्यान, या कंपनीकडे एवढ्या कमी कालावधीत ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याची यंत्रणा असल्याचा दावा करीत त्याचे सादरीकरण सुरू आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाइन, तर बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात; तसेच परीक्षा सुरळीत होण्यासाठी परीक्षांच्या नियोजनासाठी होणाऱ्या बैठकीमध्ये शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींना व सिनेट सदस्यांना बोलवावे, अशी मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे; तसेच सिनेट सदस्य संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर, अभिषेक बोके यांनी केली आहे.

Maharashtra Times: 10.9.2020



व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाइन, तर बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात; तसेच परीक्षा सुरळीत होण्यासाठी परीक्षांच्या नियोजनासाठी होणाऱ्या बैठकीमध्ये शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींना व सिनेट सदस्यांना बोलवावे, अशी मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे; तसेच सिनेट सदस्य संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर, अभिषेक बोके यांनी केली आहे.

Maharashtra Times: 10.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

अकरावी प्रवेश प्रक्रियेला स्थगिती : शासन आदेशानंतर नवे वेळापत्रक

# मराठा आरक्षण स्थगितीचा पहिला फटका अकरावीला

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्याचा पहिला फटका अकरावीच्या विद्यार्थ्यांना बसला आहे. राज्याच्या शिक्षण विभागाने अकरावी प्रवेश प्रक्रियेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे.

परिणामी, यंदा सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून (एसईबीसी) मराठा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याची शक्यता धूसर झाली आहे. त्यामुळे हजारो मराठा विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयातील प्रवेशापासून मुकावे लागणार आहे.

राज्याच्या शिक्षण विभागातर्फे राबवली जाणारी अकरावी प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली आहे. राज्य शासनाकडून आदेश आल्यानंतर वेळापत्रक प्रसिध्द केले जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय व इयत्ता अकरावी प्रवेश समितीतर्फे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांतील एक लाखाहून अधिक जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे.

पहिली प्रवेश फेरी पूर्ण झाल्यानंतर अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या नियमित फेरीची गुणवत्ता यादी १० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार होती. परंतु, न्यायालयाच्या निर्णयामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेची पूर्ण कार्यवाही थांबविण्यात आली.

### खुल्या व एसईबीसी गटाचा गेल्या वर्षीचा कटऑफ (विज्ञान शाखा)

| महाविद्यालय | खुला गट | एसईबीसी गट |
|---|---|---|
| आपटे प्रशाला | ४७८ | ४५३ |
| मॉडर्न कॉलेज | ४५३ | ४०८ |
| आबासाहेब गरवारे | ४४८ | ३८० |
| फर्ग्युसन कॉलेज | ४८० | ४४६ |
| नौरोसजी वाडिया | ४२६ | २५३ |
| अशोक विद्यालय | ४५५ | २८७ |
| स.प.महाविद्यालय | ४५६ | ३८७ |
| सिंबायोसिस | ४२३ | २९० |

- मागील वर्षी अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रकियेतून एसईबीसी प्रवर्गाचा कटऑफ खुल्या प्रवर्गाच्या कटऑफपेक्षा कमी होता. त्यामुळे हजारो मराठा विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळाला होता.
- यंदा राबविण्यात आलेल्या पहिल्या प्रवेश फेरीतही तसेच चित्र दिसून येत आहे. त्यामुळे एसईबीसीतून प्रवेशाची संधी मिळाली नाही, तर अनेक विद्यार्थ्यांचा तोटा होणार असल्याचे उपलब्ध आकडेवारी वरून दिसून येत आहे. मागील वर्षी बीएमसीसीमध्ये वाणिज्य शाखेत खुल्या संवर्गाचा कटऑफ ४७४ होता, तर एसईबीसीचा कटऑफ साठी ४३८ होता.

Hello Pune
Page No. 1 Sep 11, 2020
Powered by: erelego.com

केसरी
११।९।२०२०

### इयत्ता ११वीची प्रवेश प्रक्रिया स्थगित

**पुणे** : सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्याचा परिणाम इयत्ता ११वीच्या प्रवेश प्रक्रियेवर झाला आहे. गुरुवारी दुसऱ्या फेरीची निवड यादी जाहीर केली जाणार होती, ती पुढे ढकलण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये केंद्रीय पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. यामध्ये १ लाख ७ हजार ३० प्रवेश क्षमता आहे. १ लाख ३७२ जणांनी प्रवेशासाठी नोंदणी केली आहे. ११वी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली आहे. त्यामध्ये ३० हजारांपेक्षा जास्त जणांनी ११वीचा प्रवेश निश्चित केला आहे. दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी ७५ हजारांपेक्षा जास्त जणांनी त्यांचा पसंतीक्रम भरला आहे. दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी काल सकाळी १० वाजता जाहीर केली जाणार होती. पालक आणि विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे महाविद्यालय मिळेल की नाही याची चिंता लागली असताना दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी पुढे ढकलण्यात आल्याने चिंतेत भर पडणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणास स्थगिती दिल्यानंतर शिक्षण विभागातील अधिकारी व इयत्ता ११वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या अधिकाऱ्यांनी वरिष्ठांशी चर्चा केली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात नेमके काय नमूद केले आहे त्याचा अभ्यास करून शासन पुढील आदेश देईल. तो पर्यंत ही प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला, असे शिक्षण संचालक दिनकर पाटील यांनी सांगितले.

Kesari: 11.9.2020

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

प्रभात

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२०

## अकरावी प्रवेश प्रक्रिया थांबवली

- जाहीर होणारी दुसरी गुणवत्ता यादी पुढे ढकलली
- प्रवेशासाठी प्रतीक्षा करावी लागणार



प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १० - इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया थांबवली आहे. त्यामुळे गुरुवारी जाहीर होणारी दुसरी गुणवत्ता यादी पुढे ढकलली आहे. सर्वोच्च न्यायालयाने शैक्षणिक प्रवेशासाठीच्या मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे अकरावीचे प्रवेश आता लांबणीवर गेले आहेत.

अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी यापूर्वीच जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. मात्र, आज प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होणार होती. मात्र, मराठा आरक्षणाच्या निर्णयावरून अकरावी प्रवेश लांबणीवर टाकण्यात आले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबाबत विधी आणि न्याय विभागाशी चर्चा करून पुढील पावले उचलली जाणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

आरक्षणाच्या निर्णयामुळे अकरावी प्रवेशप्रक्रिया रखडणार असल्याचे स्पष्ट होत आहे. पहिल्या फेरीतून विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयात जाऊन प्रवेश घेतला आहे. आता मात्र दुसरी यादी लांबणीवर टाकली आहे. त्यामुळे आता अकरावीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्रतिक्षा करावी लागणार असल्याचे दिसून येत आहे.

**शालेय शिक्षणमंत्र्यांचे ट्विट**

'मराठा आरक्षणाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानंतर अकरावी प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील कार्यवाहीचे वेळापत्रक शासन आदेश प्राप्त झाल्यानंतर जाहीर करण्यात येईल,' असे ट्विट शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी केले आहे.

**Prabhat: 11.9.2020**

मराठा आरक्षणाच्या स्थगितीचा फटका

## अकरावीची प्रवेश प्रक्रिया रखडली; प्रथम सत्राचे वर्गही लटकणार!

सामना ११।९।२०२०



पुणे, दि. १० (प्रतिनिधी) - सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाच्या निर्णयावर स्थगिती दिल्याने आज गुरुवारी जाहीर होणारी अकरावीची दुसरी गुणवत्ता यादी लांबणीवर गेली आहे. शिक्षण संचालनालयाकडून प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर होईपर्यंत प्रवेश प्रक्रिया रखडणारच असून, याचा फटका विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला बसणार आहे. या विलंबामुळे अकरावीचे प्रथम सत्र वाया जाण्याच्या मार्गावर आहे.

आधीच कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दहावीचा निकाल उशिराने जाहीर झाला. त्यामुळे अकरावी ऑनलाइन प्रवेशही लांबणीवर गेले. त्यात आता मराठा आरक्षणावर आलेल्या न्यायालयाच्या स्थगितीची भर पडली आहे. मराठा आरक्षण वगळून अकरावी प्रवेश प्रक्रिया पार पाडावी लागणार आहे.

इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू असून, ३० ऑगस्ट रोजी पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली. गुरुवारी दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होणार होती. मात्र, विद्यार्थ्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अकरावी प्रवेश प्रक्रियेची यापुढील कार्यवाही पुढे ढकलली आहे. प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक शासन आदेश आल्यानंतर जाहीर करण्यात येईल, असे माध्यमिक शिक्षण संचालक दिनकर पाटील यांनी सांगितले.

### प्रथम सत्र डिसेंबरपर्यंत सुरू ठेवा

अकारावी प्रवेशाला होणारा उशीर पाहता अकरावीचे शैक्षणिक वर्ष ऑक्टोबर ते एप्रिल असे राबविण्यात यावे, अशी मागणी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे सरचिटणीस प्रा. मुकुंद आंधळकर यांनी केली आहे. अकरावीचे प्रथम सत्र डिसेंबरपर्यंत घ्यावे तसेच अभ्यासक्रमाची व्याप्ती कमी करून परीक्षाही वैकल्पिक स्वरूपात घ्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**Saamana:11.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

City | Pune Times Mirror | Friday, September 11, 2020 | 4

# In future, SET might go online with help from national testing agency

### This year, it will be conducted in offline mode itself; SPPU conducts exam for 1 lakh aspirants

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Savitribai Phule Pune University (SPPU) is planning to make announcements regarding the future of state eligibility test (SET), for which students have already filled the forms. The exam pattern will undergo a drastic change with the varsity planning to rope in the national testing agency (NTA), which conducts various tests online. SET joins the string of educational aspects that have gone online.

Prafulla Pawar, the registrar of SPPU, said, "SET has been announced this for this year. It will be conducted offline, depending on the situation. In the future, this exam may be conducted online with the help of NTA. It is in the planning stage."

Every year, University Grants Commission conducts national eligibility test (NET), and the varsity conducts SET for professors from various faculties like humanities, commerce, management science among others. SPPU conducts SET for the students in Maharashtra as well as Goa.

The official informed that more than one lakh candidates enrol for this examination. The answer key is an important component of these tests as its separation takes time. The process for the 2020 edition of SET has already begun. The official also informed that in the future, this procedure along with all the other parameters, could be online and assessed by NTA.

A student, who has applied for NET — which is already going online — said that SET could follow into the footsteps. "It may not be possible to transform the exam immediately, but it could be done shortly when e-centres are made available," the student said.



FILE PHOTO

SPPU conducts the tests for Maharashtra and Goa




**Pune Mirror: 11.9.2020**

# खासगी विद्यापीठांची शासनाबरोबर चालण्याची भूमिका असावी

- उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांचे मत 11-9-2020
- पेरा संघटनेच्या व्हर्च्युअल एज्युकेशन फेअरचे उद्घाटन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सरकार आणि शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या सर्व संस्था आणि खासगी विद्यापीठ यांच्यात सुसंवाद नसल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता असते. विद्यार्थी केंद्रित धोरण ठेवूनच सरकार आणि शिक्षण संस्थांना कार्य करावे लागणार आहे. पेरा या खासगी विद्यापीठांच्या संघटनांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम नेहमीच घेतल्यास देशात नवीन शिक्षण धोरणासंदर्भातील सकारात्मक पाऊल टाकल्याचा संदेश देशभर जाईल, असे मत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मांडले.

'पेरा' (प्रिमीन्यंट एज्युकेशन अँड रिसर्च असोसिएशन) या खासगी विद्यापीठांच्या संघटनेकडून बुधवारी (दि.९) व्हर्च्युअल एज्युकेशन फेअरचे आयोजन करण्यात आले होते, त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या वेळी पेरा संघटनेचे अध्यक्ष डॉ. मंगेश कराड, उपाध्यक्ष भरत अग्रवाल, डॉ. स्वाती मुजुमदार, डॉ. सुधीर गव्हाणे आदी उपस्थित होते.

सरकार आणि संघटनांना हातात हात घालून काम करावे लागणार आहे. खासगी विद्यापीठांच्या अनेक अडचणी आहेत, मात्र कोरोनाचे संकट असल्यामुळे त्याकडे व्यवस्थित लक्ष दिले जात नाही. भविष्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देत असताना संस्थाचालकांनी चांगल्या वातावरणामध्ये संस्था चालवली पाहिजे. त्यालाच पूरक नियम आणि बंधन सरकारचे असले पाहिजे. जीआर काढल्यानंतर मागे घेणारा मंत्री मी नाही. सरकारचा प्रतिनिधी म्हणून मी संस्थाचालकांच्या अडचणी दूर करून, फ्री हँड काम करण्याची संधी देण्याचा आमचा प्रयत्न राहील, असेही ते म्हणाले.

**राज्यात लवकरच व्हर्टिकल युनिव्हर्सिटी**

राज्यात शासकीय वा खासगी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जागा हवी, ही महत्त्वाची अट असते. राज्य सरकारने त्याचा नव्याने विचार करण्याचे ठरवले आहे. राज्यात व्हर्टिकल युनिव्हर्सिटी ही संकल्पना राबविण्याचा विचार असून, त्यात जागेची अट असणार नाही, त्यामुळे नव्या विद्यापीठांच्या स्थापनेचा मार्ग सुलभ होणार आहे.

पुढारी

**Pudhari: 11.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# नवे शैक्षणिक धोरण २०२२ पासून लागू

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची माहिति

नवी दिल्ली : 'स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षापासून म्हणजेच २०२२पासून देशात नव्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम लागू केला जाईल,' अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी दिली. राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत 'एकविसाव्या शतकातील शालेय शिक्षण' या विषयावरील परिषदेत ते बोलत होते.

व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून परिषदेत बोलताना पंतप्रधान म्हणाले, 'नवे अभ्यासक्रम दूरदृष्टीचे आणि वैज्ञानिकतेवर आधारित असतील. नवे शिक्षण एकविसाव्या शतकाची गरज ओळखून दिलेले असेल आणि त्यातून नवी बीजे रुजतील. तीन दशकांत जग बदलले असले, तरी धोरण जुनेच होते. नवभारताच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, नव्या संधी निर्माण करण्यासाठी हे धोरण उपयुक्त ठरेल. पूर्व प्राथमिक शिक्षणात खेळत-खेळत शिक्षण, कृतीआधारित शिक्षण आणि संशोधनाचा वापर करण्याची गरज आहे. नव्या धोरणाची अंमलबजावणी झाल्यानंतर पूर्व-प्राथमिक, प्राथमिक शिक्षण शहरांप्रमाणेच ग्रामीण भागांतही पोहोचेल.'



> प्राचार्य आणि शिक्षकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या चर्चेत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आहे. प्राप्त झालेल्या सूचना आणि शिफारशींची योग्य दखल घेतली जाईल.
>
> -नरेंद्र मोदी, पंतप्रधान

**Maharashtra Times: 12.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# विद्यार्थ्यांच्या डोक्यावरील गुणांचे ओझे दूर -पंतप्रधान

**नवी दिल्ली :** नव्या शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या डोक्यावरचे गुणपत्रिकेचे ओझे काढून टाकण्यात आले असून नवीन अभ्यासक्रम पद्धती देश स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करीत असताना, २०२२ पासून लागू होत आहे. त्यामुळे विद्यार्थी नवीन भविष्याकडे वाटचाल करतील, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.



नवीन धोरणातील अभ्यासक्रम व तरतुदी भविष्यवेधी, वैज्ञानिक पद्धतीच्या आहेत असेही ते म्हणाले.

'एकविसाव्या शतकातील शालेय शिक्षण' या विषयावर आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान बोलत होते. त्यांनी सांगितले की, गेल्या तीन दशकांत जग बदलले आहे, पण आपले शैक्षणिक धोरण बदलले नव्हते. सध्याच्या शैक्षणिक धोरणात गुणांना महत्त्व होते. त्यामुळे गुणपत्रक हे विद्यार्थ्यांसाठी ताणपत्रक तर कुटुंबीयांसाठी प्रतिष्ठापत्रक होते. आता हा ताण आम्ही दूर केला आहे. शैक्षणिक धोरण जाहीर केले म्हणजे काम संपले असे नाही. त्याची प्रभावी अंमलबजावणी सर्वांच्या सहकार्याने झाली पाहिजे. लोकांचे याबाबत अनेक प्रश्न आहेत व ते रास्तही आहेत. या धोरणावर १५ लाख सूचना एका आठवड्यात शिक्षकांकडून आल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

नवीन धोरणातील तरतुदीनुसार २०२२ पासून प्रत्येक विद्यार्थी शिक्षण घेईल. गणिती विचार, वैज्ञानिक विचार, गमतीदार पद्धतीतून शिक्षण यावर भर दिला आहे. अभ्यासक्रम कमी करून मूलभूत तत्त्वांवर भर दिला आहे. विद्यार्थ्यांची शिक्षणातून गळती ही त्यांना विषय निवडण्याचे स्वातंत्र्य नसण्याशी काही प्रमाणात निगडित होती. आता त्यांना हे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. विविध ज्ञानशाखातील बंदिस्तता काढली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, काही विरोधी पक्षांनी भाजप हिंदी लादत असल्याचा आरोप केला आहे, पण त्यात तथ्य नाही, असे भाजपने म्हटले आहे.

लोकसत्ता Sat, 12 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54890774

पुढारी

# गुणपत्रिकेवरून मूल्यमापन नको

## पंतप्रधान मोदी : नवे शैक्षणिक धोरण हे पाच वर्षांच्या मेहनतीचा परिणाम



### २१ व्या शतकातील पाच कौशल्ये

पंतप्रधान म्हणाले, लहान मुलांना गणितीय विचारसरणी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होणे खूप गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील कौशल्यांसह पुढे नेले पाहिजे. क्रिटिकल थिंकिंग, क्रिएटीव्हिटी, कोलॅबरेशन, क्युरियोसिटी आणि कम्युनिकेशन ही २१ व्या शतकातील पाच कौशल्ये आहेत.

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

गेल्या तीन दशकांत जगातील प्रत्येक क्षेत्रांत बदल झाला आहे. मात्र, आपली शिक्षण व्यवस्था जुन्याच पद्धतीनुसार सुरू आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण गेल्या ४-५ वर्षांतील मेहनतीचा परिणाम आहे. अद्याप काम पूर्ण झालेले नाही तर ही एक नवी सुरुवात आहे. गुणपत्रिका हा एक दबाव असून, त्याद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यांकन होऊ शकत नाही, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० बाबत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे शिक्षकांना संबोधित केले. 'एकविसाव्या शतकातील शिक्षण' या विषयावर ते बोलत होते. शिक्षण मंत्रालयाने आयोजित केलेल्या दोन दिवसीय संमेलनाचा शुक्रवारी अखेरचा दिवस होता.

मोदी म्हणाले, हे धोरण लागू करण्याच्या या अभियानात आमचे मुख्याध्यापक, शिक्षक उत्साहाने सहभागी होत आहेत, याचा आनंद आहे. काही दिवसांपूर्वी शिक्षण मंत्रालयाने देशभरातील शिक्षकांकडून कल्पना मागवल्या होत्या. एका आठवड्यातच १५ लाख सूचना मिळाल्या. राष्ट्रीय शिक्षण धोरण अधिक प्रभावी पद्धतीने लागू करण्यासाठी त्याचा फायदाच होणार आहे. या धोरणाच्या घोषणेनंतर अनेकांच्या मनात प्रश्न आहेत. मूलभूत शिक्षणाला दिलेले महत्त्व हा यातील सर्वात महत्त्वाचा पैलू आहे.

ते म्हणाले, अभ्यासक्रम कमी करून मूलभूत गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार केले आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत शिस्त, गंमत आणि एक संपूर्ण अनुभव व्हावा यासाठी नॅशनल करिकुलम फ्रेमवर्क तयार केले जाणार आहे. पारंपरिक कला, भारतीय कलाकुसर जगप्रसिद्ध आहे. विद्यार्थ्यांना त्याचा अनुभव घेता येईल. असा निपुण लोकांचे मार्गदर्शन शाळेत बोलावूनही घेतले जाऊ शकते.

Pune Edition
Sep 12, 2020 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

THE TIMES OF INDIA, PUNE
SATURDAY, SEPTEMBER 12, 2020

Times

# NEP curriculum to be in place by 2022: PM

TIMES NEWS NETWORK



**New Delhi:** PM **Narendra Modi** on Friday said a new curriculum in sync with the new National Education Policy will be in place by 2022, coinciding with the 75th year of Independence, which will be 'forward-looking, future-ready and scientific' and relieve school students of the 'pressure of marksheet'.

Addressing the "School Education Conclave" organised by the ministry of education, the PM said the new curriculum will be learning-driven and promote critical thinking, creativity, communication and curiosity. It will reduce syllabus and make learning a fun-based and complete experience, he said.

Modi lamented how marksheet-driven education had over-shadowed learning in the country. He said marksheet has now become like a "mental pressure sheet". "Removing this stress from education is one of the main objectives of the National Education Policy (NEP). The effort is that students should not be evaluated by just one examination, but based on various aspects of development like self-assessment, peer-to-peer assessment," he said adding that NEP has proposed for a holistic report card which will incorporate a student's unique potential, aptitude, attitude, skills, efficiency and competency.

Advocating teaching up to Class 5 in mother tongue, Modi said language is just a mode of study and not learning in itself.

"We should understand it scientifically. Language is a medium for education and not an education in itself. Therefore, in whatever language a child can learn should be the medium of instruction. We have to see whether the child is utilising most of the time dealing with the language rather than understanding the subject ... in most countries, primary education is delivered through mother tongue," said the PM, citing countries like Japan, South Korea, Finland, Poland, Ireland etc.

In an apparent reference to the debate on the issue, he said, "This the reason the national education policy is speaking about teaching in mother tongue or local language at least till Class V, wherever possible. I have seen people getting confused with this policy." "Apart from the mother tongue, the national education policy has not made any provision of teaching of any specific language. Along with English, whichever international language a child wants, he or she can learn. However, along with that Indian languages will be promoted so that our youth can also learn about different languages, culture and traditions of our states," the PM said.

*Full report on www.toi.in*

## SC lets NLSIU hold own test but restrains it from declaring results till pendency of plea

The Supreme Court on Friday allowed National Law School of India University (NLSIU), Bengaluru, to conduct its separate entrance examination—NLAT-2020—but restrained it from declaring the results and admitting students till the pendency of the plea against it. Though a bench of Justices Ashok Bhushan, R Subhash Reddy and M R Shah questioned the University for holding a separate examination and distancing itself from CLAT, the common entrance test for admission to law courses, it, however, refrained from interfering in it as the exam was scheduled for Saturday.

"In the meantime, the examination for admission in pursuance of notification dated September 04 may take place but neither the result shall be declared nor any admission be made consequent thereto. We make it clear that conducting of examination shall be subject to the outcome of the writ petition," the bench said. The court passed the order on a plea filed by former NLSIU V-C Dr R Venkata Rao and a parent of an aspiring law student who contended that the decision of NLSIU to hold NLAT is illegal. TNN *Full report on www.toi.in*

# मार्कशीट ठरतेय प्रेशरशीट

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांसंदर्भात मोदींनी दिली माहिती**



नवी दिल्ली, दि. ११ - नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारताची भविष्यातील गरज लक्षात घेऊन नवीन विचार आणि मागणीची योग्य सांगड घालून तयार करण्यात आलेले माध्यम आहे. मागील चार ते पाच वर्षांपासून हे धोरण ठरवण्यासाठी अनेकांनी मेहनत घेतली आहे.

प्रत्येक क्षेत्रामधील, प्रत्येक भाषेतील व्यक्तींनी या धोरणासाठी काम केले आहे. मात्र, ही केवळ सुरुवात असून काम अद्याप पूर्ण झालेले नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

मोदी यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत २१व्या शतकातील शालेय शिक्षण या विषयावरील संमेलनास संबोधित केले. यावेळी शिक्षणमंत्री रमेश पोखरियालही उपस्थित होते.

नरेंद्र मोदी म्हणाले, एक परीक्षा किंवा एक प्रगतीपुस्तक मुलांच्या शिकण्याची शक्ती आणि मानसिक विकास मोजण्याची क्षमता सांगू शकते का?, खरं तर आज मार्कशीट हे (पान २ पहा) ▸▸

### 'पाच सी' अत्यंत महत्त्वाचे

आपल्याला २१व्या शतकातील नवीन कौशल्य आत्मसात करून पुढील वाटचाल करायची आहे. २१व्या शतकामधील या कौशल्यांमध्ये क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिएटिव्हीटी, कोलॅब्रेशन, क्युरिऑसिटी आणि कम्युनिकेशन हे 'पाच सी' अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मोदींनी म्हटले आहे. भाषा हे शिकण्याचे माध्यम आहे हे आपल्याला आता समजून घेतले पाहिजे. भाषा म्हणजेच पूर्ण शिक्षण हा समज चुकीचा आहे, असेही मोदी म्हणाले. जी भाषा मुलांना सहज समजत असेल आणि कळत असेल तीच अभ्यासाची भाषा हवी, अशी अपेक्षा मोदींनी व्यक्त केली.

### मार्कशीट ठरतेय प्रेशरशीट

मानसिक प्रेशरशीट होताना दिसत आहे. तर पालकांसाठी त्या प्रेशरशीट झाल्या आहेत. केवळ गुणांच्या आधारांवर मुलांची बौद्धिक वाढ मोजली जाऊ नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुले जेव्हा खेळत असतात तेव्हा खेळता खेळताच अनेक गोष्टी शिकतात. ते कुटुंबाबरोबर असताना शिकतात. बाहेर फिरायला गेल्यावर नवीन गोष्टी पाहिल्यावर मुले त्यातूनही शिकतात. मात्र, अनेकदा पालक मुलांना काय शिकला हे विचारत नाहीत तर किती मार्क मिळाले असे विचारतात, असे म्हणत मोदींनी शिक्षणसंदर्भातील विचारसरणी बदलण्याची गरज असल्याचे सांगितले.

The Times of India:12.9.2020

Prabhat: 12.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# 'मार्कशीट' को छात्र 'प्रेशरशीट' न बनाएं

## परिवारों के लिए बन गई 'प्रतिष्ठाशीट' : मोदी



### स्टूडेंट्स को दिया 5C-5E का मंत्र

मसलन, ये शिक्षा नीति क्या है? ये कैसे अलग है, इससे स्कूल और कॉलेजों में क्या बदलाव आएगा. उन्होंने कहा कि एनईपी मे बच्चों पर ध्यान केंद्रित किया गया है, इसमे अन्वेषण, गतिविधियों और मनोरंजक तरीकों से सीखने पर जोर दिया गया है. पीएम ने कहा कि 'एक टेस्ट, एक मार्क्सशीट क्या बच्चों के सीखने की, उनके मानसिक विकास का मानक हो सकती है? आज सच्चाई ये है कि मार्क्सशीट, मानसिक प्रेशरशीट बन गई है. बच्चे तब भी सीख रहे होते हैं जब वो खेल रहे होते हैं, जब वो परिवार में बात कर रहे होते हैं, जब वो बाहर आपके साथ घूमने जाते हैं लेकिन अक्सर माता-पिता भी बच्चों से ये नहीं पूछते कि क्या सीखा? वो भी यही पूछते हैं कि मार्क्स कितने आए.'

### समझाया मतलब

- पीएम ने इस दौरान 5 सी और 5 ई का मंत्र दिया. 5 C का मंत्र देते हुए पीएम ने कहा कि हमें अपने छात्रों को 21वीं सदी की स्किल्स के साथ आगे बढ़ाना है. 21वीं सदी के स्किल्स में क्रिटिकल थिंकिंग (गुण दोष में अंतर करने वाली सोच), क्रिएटिविटी (रचनात्मकता), कोलैबरेशन (सहयोग), क्यूरियोसिटी (जिज्ञासा) और कम्युनिकेशन (संचार) शामिल है.
- वहीं 5 ई का मंत्र देते हुए पीएम ने कहा कि हमें आसान और नए-नए तौर-तरीकों को बढ़ाना होगा. हमारे ये प्रयोग नए समय की शिक्षा का मूलमंत्र होने चाहिए. पीएम ने कहा कि 5 ई में इंगेज (प्रण करना), एक्सप्लोर (खोज करना), एक्सपीरियंस (अनुभव करना), एक्सप्रेस (प्रकट करना) और एक्सेल (श्रेष्ठ होना) शामिल है.

नवभारत न्यूज नेटवर्क

**दिल्ली.** प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने कहा है कि नई राष्ट्रीय शिक्षा नीति (एनईपी 2020) नए भारत की, नई उम्मीदों की, नई आवश्यकताओं की पूर्ति का माध्यम है और राष्ट्रीय शिक्षा नीति की इस यात्रा के पथ प्रदर्शक देश के शिक्षक हैं. प्रधानमंत्री ने राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 के तहत '21वीं सदी में स्कूली शिक्षा' विषय पर एक सम्मेलन को संबोधित करते हुए यह बात कही. उन्होंने कहा कि नई शिक्षा नीति से नए युग के निर्माण के बीज पड़े हैं और यह 21वीं सदी के भारत को नई दिशा प्रदान करेगी. प्रधानमंत्री ने कहा कि राष्ट्रीय शिक्षा नीति का ऐलान होने के बाद बहुत से लोगों के मन में कई सवाल आ रहे हैं.

### भाषा शिक्षा का माध्यम है, भाषा ही सारी शिक्षा नहीं

मोदी ने कहा कि हमें एक वैज्ञानिक बात समझने की जरूरत है कि भाषा शिक्षा का माध्यम है, भाषा ही सारी शिक्षा नही है. जिस भी भाषा में बच्चा आसानी से सीख सके, चीजें लर्न कर सके, वही भाषा पढ़ाई की भाषा होनी चाहिए. कहीं ऐसा तो नही कि विषय से ज्यादा बच्चे की ऊर्जा भाषा को समझने में खप रही है. पिछले 3 दशकों में दुनिया का हर क्षेत्र बदल गया, हर व्यवस्था बदल गई. इन 3 दशकों में हमारे जीवन का शायद ही कोई पक्ष हो जो पहले जैसा हो. लेकिन वो मार्ग, जिस पर चलते हुए समाज भविष्य की तरफ बढ़ता है, हमारी शिक्षा व्यवस्था, वो अब भी पुराने ढर्रे पर ही चल रही थी. अब तक हमारे देश में अंक तथा अंकपत्र आधारित शिक्षा व्यवस्था हावी थी, लेकिन अब हमें शिक्षा में आसान और नए नए तौर-तरीकों को बढ़ाना होगा. बच्चों के लिए नए दौर के अध्ययन का मूलमंत्र होना चाहिए भागीदारी, खोज, अनुभव, अभिव्यक्ति तथा उत्कृष्टता.

**Navbharat: 12.9.2020**

# नव्या अभ्यासक्रमांच्या निधीला कात्री

## आर्थिक सक्षमता असेल तरच विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ११ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नव्याने पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यावर व्यवस्थापन परिषदेने नियंत्रण आणले आहे. नवे अभ्यासक्रम आर्थिकदृष्ट्या सक्षम असतील तरच त्यांस मान्यता मिळेल. विद्यापीठ फंडातून त्यावर खर्च केला जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे.**

विद्यापीठाचा लौकिक मोठा असल्याने पदव्युत्तर पदवी, संशोधनासह पदवी, पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची धडपड असते. हे अभ्यासक्रम विद्यापीठाचे असल्याने कमी शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना पूर्ण करता येतात. त्याशिवाय इतर सुविधांचा लाभ मिळतो. मात्र गेल्या काही काळात पदवी व पदविका अभ्यासक्रमांची संख्या वाढत आहे.

काही अभ्यासक्रम महाविद्यालयांमध्ये शिकवले जातात, तरीही विद्यापीठात सुरू आहेत, हे लक्षात आल्याने व्यवस्थापन परिषदेत यावर चर्चा झाली. त्यानंतर नवे अभ्यासक्रम स्वयंअर्थसाह्य नसतील तर त्यांना परवानगी देऊ नये, असा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. नव्याने सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमांचे शुल्क विद्यार्थ्यांना परवडणारे असेल यावर लक्ष ठेवले जाईल.



**नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांचे स्वागत**

जे अभ्यासक्रम आर्थिकदृष्ट्या सक्षम असतील त्यांनाच मान्यता द्यावी, असा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत झाला आहे. जे पदविका, पदवी अभ्यासक्रम महाविद्यालयांमध्ये शिकवले जात नसतील, असे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकविण्यासाठी विद्यापीठ तयार आहे, असे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी सांगितले.

> **विद्यापीठात शिकवल्या जाणाऱ्या प्रत्येक पदविकेचे शुल्क वेगळे आहे, त्याचा खर्चाचा तपशीलही वेगळा आहे; पण यावर नियंत्रण आवश्यक आहे. नवीन अभ्यासक्रमांना बंदी नसेल; पण हे अभ्यासक्रम सुरू करताना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत का, याची तपासणी केली जाईल.**
> – प्राचार्य डॉ. संजय चाकणे, सदस्य, व्यवस्थापन परिषद

> **विद्यापीठात कमी शुल्कात चांगले शिक्षण मिळते, त्यामुळे विद्यार्थी प्रवेश घेतात; पण सर्वच प्रकारचे शुल्क वाढविण्याचे विद्यापीठाचे धोरण दिसून येत आहे. इतर गोष्टींवरचा खर्च कमी करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर हा निधी खर्च झाला पाहिजे.**
> – एक विद्यार्थी, पुणे विद्यापीठ

**दृष्टिक्षेपात विद्यापीठ**

- ४ विद्याशाखा
- ८१ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम
- १५ पदवी अभ्यासक्रम
- ६६ पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- ५५ कोटी अभ्यासक्रमांसाठी तरतूद

**Sakaal: 12.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेसाठी प्रोत्साहित करा : करमळकर

**पुणे, ता. ११ :** विद्यापीठाकडून अडचणी सोडविण्यासाठी महाविद्यालयांना सहकार्य केले जाईल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

परीक्षा ऑनलाइन देणार की ऑफलाइन हा पर्याय विद्यार्थ्यांना १३ सप्टेंबरपर्यंत निवडायचा आहे. पुणे विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा ऑक्टोबर महिन्यात 'मल्टिपल च्वाईस कोश्चन' (एमसीक्यू) पद्धतीने ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा होणार आहे. मात्र, बहुतांश विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा द्यावी, अशी विद्यापीठाची भूमिका आहे. त्यासंदर्भात डॉ. करमळकर यांनी आज प्राचार्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा केली. यावेळी ग्रामीण भागातील प्राचार्यांनी ऑनलाइन परीक्षेबाबत तक्रारींचा पाढा वाचला. ऑनलाइन परीक्षा घेताना ग्रामीण भागात इंटरनेटची अडचण आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे मोबाईल, टॅब, लॅपटॉप उपलब्ध नाही. त्यांना ऑनलाइन परीक्षा शक्य झाली नाही तर कशा पद्धतीने परीक्षा घ्यावी, असे प्रश्न प्राचार्यांनी उपस्थित केले. त्याबाबत कुलगुरूंनी शंकांचे निरसन केले.

**Sakaal: 12.9.2020**

# सायन्सपेक्षा आर्टस् भारी

## ९० टक्के गुण मिळालेले विद्यार्थीही कला शाखेकडे

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ११ :** ''दहावीत जास्त गुण मिळाले, की विद्यार्थी विज्ञान शाखा (सायन्स) निवडून अभियांत्रिकी, वैद्यकीय अशा करिअरच्या साचेबद्ध वाटा निवडतात. परंतु, काहीतरी वेगळे करण्यासाठी कला शाखा (आर्टस्) महत्त्वाचे ठरते. डिझाइनच्या क्षेत्रात करिअर करायचे म्हणून मी कला शाखेत प्रवेश घेत आहे. त्यामुळे डिझाइनच्या प्रोफेशनसाठी आवश्यक कौशल्य आत्मसात करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल,'' असे सांगत ओजसने 'अकरावीसाठी कला शाखा का निवडली' हे स्पष्ट केले.

सकाळ EXCLUSIVE

कोथरूड येथील न्यू इंडिया स्कूलमधून ओजस जोशी ९५ टक्के गुण मिळवून दहावी उत्तीर्ण झाला. त्याने पुढील शिक्षणासाठी कला शाखेची निवड केली असून, अकरावीला प्रवेश घेतला आहे. ओजसप्रमाणे अनेक विद्यार्थी ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवूनही कला शाखेची निवड करीत असल्याचे दिसत आहे. आतापर्यंत कधीही झाला नव्हता असा बदल या वेळी अकरावीच्या प्रवेशावेळी पाहायला मिळत आहे. विज्ञान शाखेपेक्षा कला शाखेला प्रवेश घेण्याकडे हुशार विद्यार्थ्यांचा कल आहे. त्यामुळे शहरातील नामांकित महाविद्यालयांतील अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीत विज्ञान शाखेपेक्षा कला शाखेचा 'कट ऑफ' अधिक आहे.

**पुण्यातील नामांकित महाविद्यालयांतील कला शाखेचा 'कट ऑफ'**

(सर्व आकडे टक्क्यांत)




(अकरावी प्रवेशाच्या पहिल्या नियमित गुणवत्ता यादीनुसार)

**पसंती कशामुळे ?**

- स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी मिळतो पुरेसा वेळ
- मानसशास्त्र, समाजशास्त्र, डिझाइन, समुपदेशक अशा करिअरच्या विविध वाटा उपलब्ध
- छंद जोपासत करिअर करता यावे
- परदेशी भाषांमध्ये करिअरची संधी
- अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील वाढती बेरोजगारी

प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न आहे. त्यामुळे एमपीएससी किंवा यूपीएससीची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून कला शाखा निवडली आहे. या अभ्यासक्रमामुळे स्पर्धा परीक्षेचाही बराचसा अभ्यास होतो.
– निहारिका दीक्षित, विद्यार्थिनी (९६.४ टक्के)

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करायचा म्हणून चांगले गुण मिळविलेले विद्यार्थीही कला शाखेची निवड करतात. कला शाखेतील अभ्यासक्रमांमुळे स्पर्धा परीक्षेत चांगला स्कोअर करता येईल, असा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन असतो. त्याशिवाय करिअरच्या वेगवेगळ्या वाटा कला शाखेमुळे खुल्या होतात.
– डॉ. रवींद्रसिंह परदेशी, प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय

**Sakaal: 12.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑनलाइन परीक्षा घेणार; पण सुविधांचे काय?

## कुलगुरूंसोबतच्या बैठकीत प्राचार्यांनी वाचला तक्रारींचा पाढा : ग्रामीण भागांत प्रश्न बिकट

**पुढील महिन्यात होणार आहेत परीक्षा**



प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ११ - ऑनलाइन परीक्षा घेताना ग्रामीण भागात इंटरनेटची अडचण आहे. काही विद्यार्थ्यांकडे मोबाइल, टॅब, लॅपटॉप उपलब्ध नाहीत. राज्याच्या ग्रामीण भागात अनेक प्रवेशित विद्यार्थी आहेत. त्यांना ऑनलाइन परीक्षा शक्य झाली नाही, तर कशा पद्धतीने परीक्षा घ्यायच्या, अशा अनेक तक्रारींचा पाढा ग्रामीण भागातील महाविद्यालयांतील प्राचार्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याबरोबर झालेल्या ऑनलाइन बैठकीत वाचला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. करमळकर यांनी आज संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी ऑनलाइन बैठक घेतली. त्यात पुढील महिन्यात अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा होत आहे. त्याबाबत महाविद्यालयांना ऑनलाइन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन केले. महाविद्यालयाच्या अडचणी सोडवण्यासाठी सहकार्य केले जातील, अशी ग्वाहीही कुलगुरुंनी यावेळी दिली.

पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाची परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीने ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. बहुतांश विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा द्यावी अशी विद्यापीठाची भूमिका आहे.

### अंध विद्यार्थ्यांचा विचार आवश्यक

महाविद्यालयांमध्ये काही अंध विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. त्यांना ऑनलाइन परीक्षा देणे शक्य नाही, अशी अडचणी काही प्राचार्यांनी मांडली. या विद्यार्थ्यांसाठी 'स्पीक टू टेक्स्ट'ची सुविधा सॉफ्टवेअरवर दिल्यास ते परीक्षा देऊ शकतील. त्याबाबतही विचार केला जाणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले.

त्यासंदर्भात विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेण्यात आली. यात ग्रामीण भागातील प्राचार्यांनी ऑनलाइन परीक्षा घेताना येणाऱ्या अडचणी मांडल्या. त्या शंकांचे कुलगुरूंनी निरसन केले.दरम्यान, विद्यार्थ्यांना परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन अशा दोन पर्याय निवडण्यासाठी दि.१३ सप्टेंबरपर्यंत संधी देण्यात आली आहे. त्यावेळी विद्यार्थ्यांनी ऑनलाइनच पर्याय निवडावा, यासाठी त्यांच्यात जागृती करावी. 'एमसीक्यू' परीक्षेपूर्वी त्यांना सराव परीक्षा करण्यासाठी संधी दिली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

**Prabhat: 12.9.2020**

पुढारी

# एमसीक्यू परीक्षेविरोधात विद्यापीठात उपोषण

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतिम वर्षाची परीक्षा 'मल्टिपल चॉइस क्वेश्चन' (एमसीक्यू) पद्धतीने घेणार असल्याच्या विरोधात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे सोमनाथ लोहार यांनी गुरुवारपासून उपोषण सुरू केले आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांचा विचार करून इतर राज्यांप्रमाणे घरून परीक्षा देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.



अंतिम वर्ष परीक्षा 'मल्टिपल चॉइस क्वेश्चन' (एमसीक्यू) पद्धतीने घेण्याविरोधात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे सोमनाथ लोहार उपोषण करताना.

पुणे विद्यापीठाने ९ सप्टेंबर रोजी काढलेले परिपत्रक रद्द करावे, एमसीक्यू पद्धतीने परीक्षा न घेता मध्य प्रदेश, झारखंड, पंजाब, पश्चिम बंगाल, वाराणसी विद्यापीठांप्रमाणे होम असाइनमेंट बेस परीक्षा घ्यावी. मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना प्रश्नसंच देऊन परीक्षेची तयारी करण्यासाठी पुरेसा कालावधी द्यावा. तसेच, विद्यार्थी हिताचा आणि त्यांच्या भविष्याचा अजिबात विचार न करता स्वतःचा मनमानी कारभार करू पाहणारे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे यांना या पदावरून दूर करावे, अशा मागण्यांचे निवेदन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना लोहार यांनी दिले आहे. रयत विद्यार्थी परिषदेचे ओमकार भोईर, हर्षद बनसोडे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या पुणे विभागप्रमुख संध्या सोनावणे यांनी विद्यापीठात भेट घेऊन उपोषणाला पाठिंबा दिला.

My Pune Edition
Sep 12, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# 'एमसीक्यू'च्या विरोधात उपोषण

**पुणे, ता. ११ :** अंतिम वर्षाची परीक्षा 'मल्टिपल चॉइस क्वेश्चन' (एमसीक्यू) पद्धतीने घेण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्णयाविरोधात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने गुरुवार (ता. १०) पासून विद्यापीठात उपोषण सुरू करण्यात आले आहे. विद्यापीठाने इतर राज्यांप्रमाणे घरून परीक्षा देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

पुणे विद्यापीठाने ९ सप्टेंबर रोजी काढलेले परिपत्रक रद्द करावे, एमसीक्यू पद्धतीने परीक्षा न घेता मध्य प्रदेश, झारखंड, पंजाब, पश्चिम बंगाल, वाराणसी विद्यापीठ यांच्या धर्तीवर 'होम असाइन्मेंट बेस' परीक्षा घ्यावी, मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना प्रश्न संच देऊन परीक्षेची तयारी करण्यासाठी पुरेसा कालावधी द्यावा. तसेच, विद्यार्थिहिताचा आणि त्यांच्या भविष्याचा अजिबात विचार न करता स्वतःचा मनमानी कारभार करू पाहणारे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे यांना पदावरून दूर करावे, अशा मागण्यांचे निवेदन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे उपोषणकर्ते सोमनाथ लोहार यांनी दिले आहे. रयत विद्यार्थी परिषदेचे ओमकार भोईर, हर्षद बनसोडे, अजय चव्हाण आदींनी लोहार यांची भेट घेऊन पाठिंबा दिला.

> विद्यार्थ्यांची परीक्षा सोप्या पद्धतीने घ्यावी, अशी मागणी विद्यापीठाकडे केली होती. तरीही विद्यापीठाने 'एमसीक्यू' पद्धतीने परीक्षा घेणार असल्याचे परिपत्रक काढले. हे परिपत्रक रद्द करून विद्यार्थ्यांची 'होम असाइन्मेंट बेस' परीक्षा घ्यावी.
> – सोमनाथ लोहार, उपोषणकर्ते

विद्यापीठाची 'एमसीक्यू'नेच परीक्षा

**Sakaal:12.9.2020**

पुढारी

# अकरावी प्रवेशात अडकला खेळाडूंचा पाच टक्के कोटा

## ५ टक्के कोट्यावर निर्णय नाही, सचिवांकडे प्रस्ताव सादर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदकांची कमाई करणाऱ्या खेळाडूला दहावीमध्ये ग्रेस गुणांची सवलत दिली जाते. त्याचप्रमाणे सन २००८ च्या शासननिर्णयानुसार अकरावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या खेळाडूंना ५ टक्के राखीव कोटा मंजूर करण्यात आलेला आहे. परंतु, कोरोनाच्या पाश्र्वभूमीवर अकरावी प्रवेशामध्ये खेळाडूंचा कोटा रखडणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शासनाने इयत्ता अकरावी प्रवेशाकरिता आवश्यक ती पद्धत निर्शचित करून दिलेली आहे. त्यानुसार २६ जून २००८ च्या शासननिर्णयानुसार शासनाने क्रीडाप्रावीण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंकरिता ५ टक्के राखीव कोटा निश्‍चित केलेला असून त्यानुसार प्रवेश होणे अपेक्षित आहे. भारतीय शालेय खेळ महासंघ तसेच भारतीय प्राधिकरण आयोजित विभागीय स्तरावरील प्रावीण्यप्राप्त खेळाडूबरोबरच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडूचा या आरक्षणामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

दरम्यान, इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन मान्यताप्राप्त एकविध खेळांच्या संघटनांकडून आयोजिल्या जाणाऱ्या अधिकृत राज्यस्तरीय स्पर्धांमधील प्रावीण्यप्राप्त खेळाडू व राज्य व राष्ट्रीय स्पर्धांमधील सहभागी खेळाडूंनादेखील या ५ टक्के राखीव कोट्याचा फायदा होणार आहे. वास्तविक पाहता ग्रेस गुणांबरोबरच खेळाडूंना अकरावी प्रवेशासाठीही हा कोटा मंजूर असून कोरोनाच्या पाश्र्वभूमीवर संबंधित खेळाडूला प्राधान्य दिले जाणार का, याबाबत अद्याप कोणतीच माहिती पुढे आलेली नाही. त्यामुळे खेळाडूंचा कोटा अकरावीच्या प्रवेशात अडकला की काय, असा प्रश्न खेळाडूंना पडला आहे.

> २००८ च्या शासननिर्णयानुसार अकरावी प्रवेशासाठी क्रीडाप्रावीण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंकरिता ५ टक्के राखीव कोटा निश्चित करण्यात आलेला आहे. या आरक्षणानुसार खेळाडूंना प्रवेश मिळावा, असा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिवांना पाठविण्यात आलेला आहे. खेळाडूंचा विचार करता सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.
> - **ओमप्रकाश बकोरिया**
> (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय).

My Pune Edition
Sep 12, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

अंतिम वर्ष परीक्षांबाबत आरोग्य मंत्रालयाच्या सूचना

### सुरक्षित अंतर ठेवा, विद्यार्थ्यांची काळजी घ्या

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ११** - सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार देशात अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा होत आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा घेत असताना सुरक्षित अंतर राखत आणि विद्यार्थ्यांची काळजी घेत परीक्षा घेण्याच्या सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिल्या आहेत.

करोनाचा संसर्ग पसरू नये म्हणून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. दोन व्यक्तींमध्ये सुरक्षित अंतर ठेवतानाच परीक्षा केंद्रांच्या निर्जंतुकीकरणाबाबत सरकारने मार्गदर्शन केले आहे. तसेच, दोन व्यक्तींमध्ये किमान सहा फूट अंतर असावे. मास्कचा वापर अनिवार्य आहे. सॅनिटायझर अथवा साबणाचा वापर वारंवार करावा. शिंकताना अथवा खोकताना नाका-तोंडावर रूमाल असणे आवश्यक आहे. थुंकण्यास सक्त मनाई आहे. सर्वांना आरोग्य सेतू ॲप बंधनकारक आहे.

प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील परीक्षा केंद्रांनाच मुभा देण्यात यावी. प्रतिबंधित क्षेत्रातील शिक्षक, विद्यार्थ्यांना प्रवेश नाही. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा इतर मार्गांनी घ्यावी. केंद्रावर गर्दी न होण्याची काळजी घ्यावी, असे नियोजन करावे, असे केंद्राने म्हटले आहे.

**Prabhat: 12.9.2020**

लोकमत

### एक लाख विद्यार्थ्यांनी भरला विकल्प अर्ज

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा । अर्ज भरण्यास १३ सप्टेंबरपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन किंवा ऑफलाइन परीक्षा देण्यासंदर्भातील विकल्प अर्ज भरुन घेतला जात असून, आतापर्यंत सुमारे १ लाख विद्यार्थ्यांनी हा अर्ज भरुन दिला आहे. येत्या १३ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना विकल्प अर्ज भरता येणार आहे. सुमारे सव्वादोन लाख विद्यार्थी अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व राज्य शासनाच्या निर्देशानुसार विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरु केली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, नगर, नाशिक या तीनही जिल्ह्यांतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

विद्यार्थ्याचे नाव, महाविद्यालयाचे नाव, पीआरएन नंबर, पात्रता क्रमांक, विद्यार्थी दिव्यांग आहे का, ऑनलाइन परीक्षा देणार का, लॅपटॉप-स्मार्टफोन आहे का, मोबाईलला थ्रीजी किंवा त्यापेक्षा अधिक इंटरनेट कनेक्टिव्हिटी आहे का आदी माहिती विद्यार्थ्यांकडून गोळा केली जात आहे.

Pune Main
Page No. 2 Sep 13, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

### Section: Education



लोकमत

# ग्रामीण विद्यार्थ्यांना नको ऑनलाइन परीक्षा

## अंतिम वर्षाची परीक्षा । पुणे विद्यापीठाकडून ऑनलाइन परीक्षेचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा द्यावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे केले जात असले, तरी सुमारे ८० ते ९० टक्के ग्रामीण विद्यार्थी ऑफलाइन परीक्षेलाच पसंती देत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालयांना ऑनलाइन बरोबरच ऑफलाइन परीक्षेची तयारीसुद्धा करावी लागणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची तयारी सुरु केली आहे. सध्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेसंदर्भात विकल्प अर्ज भरुन घेतले जात आहेत. त्यात ९० टक्क्यांहून अधिक ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्राधान्य ऑफलाइन परीक्षेला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन परीक्षेसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नाही.

अँड्रॉईड मोबाईल व इंटरनेट कनेक्टिव्हिटी बाबत अडचणी आहेत. कला-वाणिज्य विद्या शाखेचे सह विज्ञान शाखेचे काही विद्यार्थीसुद्धा तंत्रस्नेही नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून ऑफलाइन परीक्षेलाच पसंती दिली जात असल्याचे ग्रामीण महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सांगितले.

### परीक्षेची भीती

ग्रामीण महाविद्यालयातील सरसकट विद्यार्थ्यांकडे लॅपटॉप किंवा अँड्रॉइड मोबाइल असण्याची शक्यता खूपच कमी आहे. तसेच, विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्याबाबत काहीशी भीती आहे. त्यामुळे कला व वाणिज्य शाखेच्या अधिक विद्यार्थ्यांची पसंती ऑफलाइन परीक्षेला आहे.

कोरोनामुळे सुमारे सहा महिन्यांपासून विद्यार्थी मानसिक तणावाखाली आहेत. आरोग्याची काळजी सर्वांना आहे. घरी बसून ऑनलाइन परीक्षा देणे सोपे असले, तरी अनेकांकडे लॅपटॉप किंवा अँड्रॉइड मोबाईल नाहीत. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षा द्यायची आहे.

**- गोविंदराजे निंबाळकर,**
प्राचार्य, सुभाष बाबूराव कुल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केडगाव, दौंड

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयातील विद्यार्थी विकल्प अर्ज भरुन देत आहेत. मात्र, अँड्रॉइड मोबाईल व लॅपटॉप उपलब्ध नसल्याने आणि ऑनलाइन परीक्षेबाबत भीती असल्याने जास्तीत जास्त विद्यार्थी ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडत आहेत.

**- डॉ. एकनाथ खांदवे,**
प्राचार्य, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा, अहमदनगर

विद्यार्थ्यांना मोबाईल व इंटरनेट कनेक्टिव्हिटी बाबत अडचणी आहेत. त्यामुळे पूर्वी ऑनलाइन परीक्षेसाठी अर्ज भरणारे विद्यार्थी बदल करुन आता ऑफलाइन अर्ज भरत आहेत. कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचे ऑफलाइन-ऑनलाइन परीक्षेचे प्रमाण ७०/ ३०, तर विज्ञान शाखेचे प्रमाण ६०/ ४० आहे.

**- डॉ. आर. एम. चिंतामणी,**
प्राचार्य के. के. वाघ महाविद्यालय, निफाड, नाशिक

Pune Main
Page No. 2 Sep 13, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

# प्रथम वर्ष प्रवेशाची रद्द झालेली प्रक्रिया 'जैसे थे'च सुरु राहणार

## उच्च शिक्षण संचालकांकडून परिपत्रक मागे । उच्च शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ समोर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील उच्च शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ पुन्हा एकदा समोर आला आहे. मराठा आरक्षण स्थगित झाल्याने महाविद्यालयातील प्रथम वर्ष प्रवेशाची प्रक्रियाच रद्द करण्याचे आदेश उच्च शिक्षण संचालक धनराज माने यांनी दिले होते. परंतु, दुसऱ्याच दिवशी त्यांनी हे परिपत्रक मागे घेतले आहे. यामुळे विद्यार्थ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला असला तरी महाविद्यालयांची मात्र धावपळ उडाली होती.

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणासंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर शैक्षणिक संस्थांमध्ये २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) आरक्षणाशिवाय राबवावी, असे परिपत्रक उच्च शिक्षण संचालक कार्यालयातर्फे प्रसिद्ध करण्यात आले होते. यामुळे संपूर्ण प्रवेश प्रक्रियाच नव्याने राबवावी लागणार होती. मात्र, त्यामुळे होणारा संभाव्य गोंधळ लक्षात घेऊन शुक्रवारी काढण्यात आलेले परिपत्रक शनिवारी रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना नव्याने पुन्हा प्रवेश घ्यावे लागणार नाहीत

### पत्रक शनिवारी रद्द

राज्य शासनाने एसईबीसी आरक्षणासंदर्भात दिलेल्या आदेशाचे योग्य पालन करून सर्व शैक्षणिक संस्थांनी अंमलबजावणीच्या कार्यवाहीचा अहवाल राज्याच्या उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर करावा, असे परिपत्रक राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी शुक्रवारी प्रसिद्ध केले होते. परंतु, हे पत्रक शनिवारी रद्द करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे एसईबीसी आरक्षणाचा लाभ बंद झाला. त्याचा परिणाम राज्यातील सर्व महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेवर झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर राज्य शासनाने विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आला. त्यात वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रियेत कोणताही बदल होणार नाही. परंतु, महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांमध्ये एसईबीसी आरक्षासह प्रवेश प्रक्रिया राबविली असल्यास ती पुन्हा एसईबीसी आरक्षणाशिवाय राबवा, असे नमूद करण्यात आले होते. त्यामुळे आरक्षणाचा निर्णय जाहीर होण्यापूर्वी महाविद्यालयांनी पूर्ण केलेली व सध्या सुरु असलेली प्रवेश प्रक्रिया रद्द करून पुन्हा नव्याने राबवावी लागणार होती. शासनाने व शिक्षण विभागाने काढलेल्या परिपत्रकाला स्थगिती देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना व महाविद्यालयांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नव्याने पुन्हा सगळी प्रक्रिया करावी लागली असती. त्यासाठी महाविद्यालयांवरही ताण आला असता.

Hello Pune
Page No. 1 Sep 13, 2020
Powered by: erelego.com

# शैक्षणिक शुल्क होणार कमी?

## कोरोनाच्या परिस्थितीमुळे शासनाची समिती

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १२ : 'आम्ही महाविद्यालयातच जात नाही तर ग्रंथालय, जिम, लॅबचे शुल्क का द्यायचे? केवळ शैक्षणिक शुल्क महाविद्यालयांनी घ्यावे,' अशी मागणी विद्यार्थी करत आहेत. महाविद्यालयांचा पूर्ण शुल्क भरा, असा तगादा आहे. या पार्श्वभूमीवर शासनाकडे तक्रारी केल्याने यंदाच्या शैक्षणिक शुल्काबाबत विचार करण्यासाठी माजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे.**



या समितीने संबंधित विभागांच्या बैठका घेण्यास सुरवात केली आहे. समितीचा अहवाल शासनाला सादर केल्यानंतर यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता आहे. कोरोनामुळे अनेक पालकांकडे पैसे नसताना पुढच्या वर्षात प्रवेश घेण्यासाठी पूर्ण शुल्क भरा अशा सूचना महाविद्यालयांनी दिल्या आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी, संघटनांनी २०१९ - २० या वर्षाची परीक्षा शुल्क व २०२०-२१ या वर्षाचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशी मागणी केली होती. त्यामुळे माजी मुख्य सचिव जे. पी. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीकडून शुल्काचा आढावा घेण्यात येत आहे. उच्च शिक्षण विभागाने शुल्क माफीसंदर्भात आलेल्या मागण्यांचे निवेदन पुढील कार्यवाहीसाठी अपर मुख्य सचिव विभागाकडे पाठविले आहे, असे सुराज्य विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमर एकाड यांनी सांगितले.

### विद्यापीठात बैठक

गतवर्षीचे परीक्षा शुल्क व यंदाचे शैक्षणिक शुल्क कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती, महाविद्यालयांकडून घेतले जाणारे विविध प्रकारचे शुल्क याचा विचार केला जात आहे. यासंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जे. पी. डांगे समितीची आणि विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली.

**"विद्यार्थ्यांकडून शुल्क कमी करण्याची मागणी केली आहे, त्यामुळे माजी मुख्य सचिव जे. पी. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. अहवाल सादर केल्यानंतर तो निर्णय होईल.**
**- डॉ. धनराज माने,** संचालक, उच्च शिक्षण विभाग

**"यंदा आम्ही महाविद्यालयात जाणारच नाही तर ग्रंथालय, जिम, प्रयोगशाळा, संगणक, क्रीडांगण याचे शुल्क घेऊ नये. कोरोनामुळे पालकांची स्थिती नाजूक असताना हे शुल्क माफ झाले पाहिजे.**
**- सोमनाथ काळे,** विद्यार्थी

**"शासनाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा विचार करून समिती नेमली आहे. वस्तुस्थितीचा विचार करून समितीने लवकर अहवाल सादर करून आम्हाला दिलासा द्यावा. गतवर्षी परीक्षा न झाल्याने त्याचे शुल्कही परत मिळाले पाहिजे.**
**- संकेत देशपांडे,** विद्यार्थी

**Sakaal: 13.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# 'एफवाय'चे प्रवेश कायम

## मराठा आरक्षणावरून सरकारचा गोंधळ; परिपत्रक रद्द




**पुणे, ता. १२ : मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असताना आपल्या करिअरचे काय होणार, असा प्रश्न लाखो विद्यार्थ्यांना पडलेला आहे. असे असतानाच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा अभूतपूर्व गोंधळ समोर आला. शुक्रवारी (ता. ११) तातडीचे परिपत्रक काढून मराठा आरक्षणानुसार पदवी प्रथम वर्षाचे सर्व प्रवेश रद्द केल्याचे आदेश काढले. मात्र, चूक लक्षात येताच आज (ता. १२) सुधारित आदेश काढत हे परिपत्रक रद्द करून सारवासारव केली आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती देऊन ते खंडपीठाकडे पुढील सुनावणीसाठी पाठविले आहे. राज्य सरकारने याबाबत पुढे काय करायचे याबाबत अद्याप भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे अकरावीपासून उच्च शिक्षणाच्या स्तरावर संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, न्याय व विधी विभागाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशासंदर्भात दिलेल्या अभिप्रायावरून उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीचे परिपत्रक काढले. त्यामध्ये 'ज्या महाविद्यालयांनी किंवा शिक्षण संस्थांनी २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश दिले आहेत, त्यांनी ही सर्व प्रक्रिया मागे घ्यावी तसेच या वर्षासाठी 'एसईबीसी' हे आरक्षण लागू होणार नाही. हे आरक्षण वगळून प्रवेश प्रक्रिया राबविता येईल' असे आदेश दिले होते.

या आदेशामुळे पदवीचे झालेले प्रवेश रद्द होणार असल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला. विद्यार्थ्यांमध्ये प्रवेशाबाबत चिंता निर्माण झाली तर, महाविद्यालयांना पुन्हा एकदा प्रवेशप्रक्रिया राबवावी लागणार असल्याने त्यांच्यापुढे मोठी समस्या निर्माण झाली. ही चूक लक्षात येताच आज उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पुन्हा एक परिपत्रक काढून प्रवेशासंबंधी ११ सप्टेंबर रोजी काढलेले परिपत्रक रद्द केले आहे. शासनाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे स्पष्ट केले.

> **महाविद्यालयांमध्ये पदवी प्रथम वर्षाचे प्रवेश शेवटच्या टप्प्यात आलेले असताना प्रवेश रद्द केल्याचे परिपत्रक काढल्याने यंत्रणेसह विद्यार्थ्यांना त्रास झाला. मात्र, उशिरा का होईना चूक सुधारत हे परिपत्रक रद्द केल्याबद्दल शासनाचे धन्यवाद. अशा विषयांमध्ये अभ्यास करून परिपत्रक काढल्यास असे गोंधळ टाळता येतील.**
> **– ॲड. एस. के. जैन,** अध्यक्ष, नियामक मंडळ, शि.प्र. मंडळी

**Sakaal: 13.9.2020**

## मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्याने नवा प्रश्न

# पदवी प्रवेशाबाबत संभ्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिल्यानंतर आता राज्यातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

'आरक्षण लागू करून झालेली प्रवेश प्रक्रिया रद्द करण्यात यावी' अशा आशयाचा अभिप्राय विधि आणि न्याय विभागाने दिला. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे पत्र उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठांना शनिवारी पाठवले आणि अवघ्या काही तासांत हे पत्र मागेही घेण्यात आले. मात्र, त्यामुळे मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिल्यानंतर राज्यातील प्रवेश प्रक्रियेचे काय होणार, हा प्रश्न आहे.

मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीस अंतरिम स्थगिती देताना या शैक्षणिक वर्षासाठी (२०२०-२१) वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम वगळून इतर अभ्यासक्रमांसाठी आरक्षण लागू करू नये, अशा आशयाचे आदेश सर्वोच्च *(पान ४ वर)*

### पत्राचे नाट्य...



- विधि आणि न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करावी असे पत्र उच्चशिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांना शनिवारी दुपारी पाठवले.
- त्यानुसार विद्यापीठांना प्रथम वर्षाची झालेली सर्व प्रवेश प्रक्रिया रद्द करावी लागणार होती. त्याबाबत विद्यापीठे, महाविद्यालयांनी विचारणा केल्यावर सायंकाळी घातलेल्या गोंधळाची जाणीव उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाला झाली.
- त्यानुसार विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायाचा दाखला देत कार्यवाही करण्याचे आदेश देणारे पत्र विभागाने रात्री रद्द केले. प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर सूचना देण्यात येतील, असे विभागाने विद्यापीठांना कळवले.

लोकसत्ता Sun, 13 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54915347

## पदवी परिक्षेबाबत संभ्रम

प्रक्रिया रद्द करून सामाजिक आणि आर्थिक दुर्बल घटकांसाठी (एसईबीसी) आरक्षण देण्याचा कायदा नसल्याचे गृहीत धरून प्रवेश प्रक्रिया राबवावी लागेल. प्रवेश प्रक्रिया सुरू ठेवण्यास कोणतेही बंधन नाही; परंतु मराठा आरक्षणाची तरतूद लागू न करता प्रक्रिया करण्यात यावी,' असा अभिप्राय विभागाने दिला. त्यामुळे राज्यातील प्रवेश प्रक्रियेचे काय होणार, असा संभ्रम निर्माण झाला आहे.

**पुन्हा प्रवेशदिव्य ?**

यंदा बारावीचा निकाल वाढला. त्याचप्रमाणे राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेशही रखडले आहेत. त्यामुळे मुळातच पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी चढाओढ होती. नामवंत महाविद्यालयातील एकेका जागेवरील प्रवेशासाठी असलेल्या अटीतटीच्या स्पर्धेच्या ताणातून पार पडून विद्यार्थ्यांनी निःश्वास सोडला. अनेक महाविद्यालयांनी प्रथम वर्षाचे ऑनलाइन वर्गही सुरू केले आहेत. बारावीतून नव्या महाविद्यालयीन व्यवस्थेत आलेले विद्यार्थी स्थिरावू लागले आहेत.

मराठा प्रवर्गासाठी राखून ठेवलेल्या १२ टक्के जागा खुल्या प्रवर्गात वर्ग करून प्रवेश करायचे झाल्यास महाविद्यालयांच्या गुणवत्ता यादीतही बदल होऊन विद्यार्थ्यांना मिळालेली महाविद्यालये बदलण्याची शक्यता आहे. प्रवेश प्रक्रिया पुन्हा राबवल्यास विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा या प्रवेशाच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे.

लोकसत्ता Sun, 13 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# पदवी प्रवेशाचा गोंधळ

## प्रक्रिया नव्याने करण्याचे विधी विभागाचे आदेश रात्री मागे

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील पदवी प्रवेशप्रक्रियेबाबत शनिवारी राज्य सरकारच्या भूमिकेमुळे संभ्रम निर्माण झाला. प्रक्रिया नव्याने करण्याचे उच्चशिक्षण विभागाचे पत्र प्रसिद्ध झाले आणि काही तासांतच ते रद्द करण्याचा आदेशही निघाला. मराठा आरक्षणाला हंगामी स्थगितीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर भूमिका स्पष्ट नसल्याने राज्य सरकार गोंधळलेले असल्याचे त्यातून उघड झाले. दरम्यान, अकरावीची प्रक्रिया [illegible] होत असतानाच पदवीबाबतच्या स्थितीने गोंधळ वाढला आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता वैद्यकीय पदव्युत्तर पदवी वगळता अन्य कोणत्याही अभ्यासक्रमाच्या प्रवेशांमध्ये मराठा आरक्षण देता येणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले आहे, असा अभिप्राय राज्याच्या विधी व न्याय विभागाने दिला आहे.

याचबरोबर सरकारने अकरावी प्रवेश प्रक्रियाही स्थगित केली आहे. विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायाचा आधार घेत शुक्रवारी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांना पदवी प्रवेश प्रक्रिया नव्याने राबवण्याचे आदेश दिले होते. असे आदेश आल्याने याचा मोठा फटका सध्या प्रवेश घेतलेल्या लाखो विद्यार्थ्यांना बसणार होता. त्यामुळे विद्यापीठ स्तरावरही गोंधळ उडाला. अखेर हे परिपत्रक राज्याच्या विभागाने रात्री उशिरा रद्द केले. यामुळे सुमारे १२ लाख विद्यार्थ्यांना सध्या तरी दिलासा मिळाला आहे.

### अकरावी प्रवेशाबाबत उद्या बैठक



राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात पदवी प्रवेशाबाबत वस्तुस्थिती मांडल्यास या प्रवेश प्रक्रियेला दिलासा मिळू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. यामुळे राज्य सरकार याबाबत नेमकी काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, अकरावी प्रवेशाची पुढची दिशा ठरविण्यासाठी उद्या, सोमवारी बैठक पार पडणार आहे.

Scanned with CamScanner

**Maharashtra Times: 13.9.2020**

लोकमत

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अंतिम वर्षाच्या परीक्षेचा अर्ज

# विकल्प अर्ज भरण्यास आजपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विकल्प अर्ज भरुन घेतला जात असून, विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास एकदिवसाची मुदत वाढ देण्यात आली आहे. त्यामुळे येत्या (दि.१४) सोमवारपर्यंत विद्यार्थी ऑनलाइन किंवा ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडू शकतील.

उच्च न्यायालयाचे आदेश व राज्य शासनाच्या निर्देशानुसार विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाची परीक्षा घेतली जात आहे. परंतु, किती विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देऊ इच्छितात याबाबतची माहिती विद्यापीठाकडून विकल्प अर्जाद्वारे भरुन घेतली जात आहे. विद्यार्थ्यांना १३ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरण्यास मुदत देण्यात आली होती. मात्र, काही कारणास्तव अर्ज भरणे शक्य न झालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास आणखी एक दिवस मुदत वाढवून दिला आहे.

ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडत असल्याचे काही महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून सांगितले जात असले, तरी सुमारे ९२ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली असल्याचे विद्यापीठातील अधिकारी सांगत आहेत. परंतु, प्रत्यक्षात किती विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांसाठी १७ सप्टेंबरपर्यंत मुदत

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १४ सप्टेंबरपर्यंत विकल्प अर्ज भरता येणार आहे, तर विद्यापीठ परिसरातील विविध विभागांमधील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना १७ सप्टेंबरपर्यंत विकल्प अर्ज भरता येईल, असेही विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.




“अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी सुमारे २ लाख २३ हजार विद्यार्थी विकल्प अर्ज भरणार आहेत. त्यातील १ लाख ७० हजार विद्यार्थ्यांनी आत्तापर्यंत अर्ज भरला असून, सुमारे ९२ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्यास पसंती दर्शविली आहे. त्यातही मोबाईलद्वारे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. विकल्प अर्ज भरण्यास १४ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

- **डॉ. महेश काकडे**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Sep 14, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### 'एकात्मिक'ची प्रवेशप्रक्रिया सुरू

**प्रशासकीय सेवेत करिअर करू इच्छिणाऱ्यांना लाभ**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कॉलेजांमध्ये पदवीचे शिक्षण घेत असलेल्या; तसेच प्रशासकीय सेवेत करिअर करण्याची इच्छा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे राबविण्यात येणाऱ्या तीन वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाची (आयसीएसी) प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षीपासून हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत तो चालवला जातो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये पदवी शिक्षण घेणारे विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी पात्र असतील. हा अभ्यासक्रम ऑफलाइन आणि ऑनलाइन अशा दोन्ही पद्धतीने पार पडणार आहे. यंदाच्या व २०२०-२१ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना बारावीच्या गुणांवर प्रवेश दिला जाईल. यात ८० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन माध्यमातून आणि उर्वरित २० टक्के 'ऑफलाइन'द्वारे शिकवला जाणार आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करून हा अभ्यासक्रम शिकवला जाणार असल्याची माहिती स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे देण्यात आली आहे.

या अभ्यासक्रमात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तीन पातळ्यांवर तयारी करून घेण्यात येईल. याद्वारे लेखन सराव, व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी भाषेतील प्राविण्य मिळवण्यासाठी कार्यक्रम, वादविवाद कार्यक्रम, चर्चासत्र, वेबिनार यातून विद्यार्थ्यांची क्षमताबांधणी केली जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**अभ्यासक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये**

- एसपीपीयू मॉड्यूल लर्निंग ॲप्लिकेशन, लाइव्ह लेक्चर्स, व्हिडिओ लेक्चर्स, डिजिटल ग्रंथालय
- विद्यार्थ्यांच्या शंकांना उत्तरे देण्यासाठी विशेष सत्र
- ऑनलाइन पद्धतीने लेखनाचा सराव व त्याचे मूल्यमापन
- ऑनलाइन प्रश्नोत्तरे, परीक्षा व मूल्यमापन
- विद्यापीठातील प्राध्यापक आणि तज्ज्ञ मंडळींकडून शिकण्याची संधी



**ऑनलाइन अर्ज अनिवार्य**

या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करायचा असून, त्यासाठी लिंक https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx आहे. अधिक माहितीसाठी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या ०२०-२५६२१८४१/ ४२ या क्रमांकावर संपर्क साधू शकता किंवा cec@unipune.ac.in या ई-मेलद्वारे संपर्क साधू शकता, अशी माहिती केंद्राचे प्रमुख डॉ. सी. आर. दास यांनी दिली.

Maharashtra Times: 14.9.2020

### अंतिम वर्षाची परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीनेच

**तीन-चार दिवसांत विद्यार्थ्यांना प्रश्नांची बँक उपलब्ध**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ अशा मोठ्या विद्यापीठांमध्ये बहुपर्यायी आधारावर (एमसीक्यू) परीक्षा होणार असून, येत्या तीन-चार दिवसांत विद्यार्थ्यांना प्रश्नांची बँक उपलब्ध करून देण्यात येईल,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी रविवारी रात्री दिली.

'होम असाइनमेंट'च्या पद्धतीने परीक्षा घेणे शक्य नसून, विद्यापीठांच्या परीक्षा मंडळांनी घेतलेल्या निर्णयाचे सर्व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पालन करून परीक्षा देण्याचे आवाहन सामंत यांनी केले. सामंत यांनी 'फेसबुक लाइव्ह'द्वारे राज्यातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत झालेल्या विविध टप्प्यांची माहिती दिली. मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, विद्यार्थ्यांनी प्रवेशांबाबत काळजी करू नये, अशीही माहिती सामंत यांनी दिली. 'विद्यार्थ्यांनी आता एमसीक्यू पद्धतीने परीक्षा देण्याची तयारी करावी,' असे सामंत यांनी सांगितले.

Maharashtra Times: 14.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# विद्यार्थ्यांना आता प्रश्नसंचांची प्रतीक्षा

प्रभात वृत्तसेवा

### पदवीच्या अंतिम वर्ष परीक्षांची तयारी

### समितीच्या निर्णयाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष



पुणे, दि. १३ - पदवीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेपूर्वी बहुपर्यायी प्रश्नांचे (एमसीक्यू) संच द्यावेत, असे शासनाने आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला दिले आहेत. मात्र, परीक्षेसाठी महिन्यापेक्षा कमी कालावधी असताना प्रश्नसंच मिळण्यासाठी विद्यार्थी प्रतीक्षेत आहेत. प्रश्नसंच उपलब्ध होण्यास आणखी आठवभराचा कालावधी लागणार असल्याचे दिसून येत आहे.

पुणे विद्यापीठाने ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने 'एमसीक्यू' परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. 'एमसीक्यू'मध्ये उत्तर चुकले, की थेट शून्य गुण मिळतात, त्याचा परिणाम निकालावर होणार असल्याने सरावासाठी प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी होत आहे. पुणे विद्यापीठाने प्रश्नसंच तयार करण्यासाठी विद्याशाखा व अभ्यासमंडळांच्या माध्यमातून तज्ज्ञ प्राध्यापकांना हे काम दिले आहे. एका विषयाचे सुमारे ३०० प्रश्न काढले जाणार आहेत. त्यापैकी ५० गुणांच्या परीक्षेमध्ये ५० प्रश्न सोडविणे अनिवार्य असतील. विद्यार्थ्यांना सुमारे ६० प्रश्न परीक्षेसाठी दिले जाणार आहेत.

दरम्यान, परीक्षेचे नियोजन, प्रश्नसंच तयार करणे, वेळापत्रकाच्या कामासाठी विद्यापीठात प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती नियुक्त केली. त्यात चार विद्याशाखांचे अधिष्ठाता व तीन ते चार प्राचार्य आहेत. ही समिती विद्यार्थ्यांना प्रश्नसंच द्यायचा की नाही, द्यायचा असेल तर तो कधी उपलब्ध होईल, याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

**Prabhat: 14.9.2020**

# सराव प्रश्नसंच मिळण्यास आठवडा उजाडणार

**» अंतिम वर्ष परीक्षा**

पुणे, ता. १३ : पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी बहुपर्यायी सराव प्रश्नसंच (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एमसीक्यू) उपलब्ध करून द्यावेत, असा आदेश राज्य शासनातर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला देण्यात आला आहे. परीक्षेसाठी एक महिन्यापेक्षा कमी कालावधी असला, तरी या प्रश्नसंचांसाठी एक आठवड्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.

कमी कालावधीमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी पुणे विद्यापीठाने ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने 'एमसीक्यू' परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. 'एमसीक्यू'मध्ये उत्तर चुकले, की थेट शून्य गुण मिळतात, त्याचा परिणाम निकालावर होणार असल्याने सरावासाठी प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी विद्यार्थी करत आहेत.

**सुकाणू समिती घेणार निर्णय**

परीक्षेचे नियोजन, प्रश्नसंच तयार करणे, वेळापत्रकासाठी विद्यापीठात प्रकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती नियुक्त केली. समिती विद्यार्थ्यांना प्रश्नसंच द्यायचा असेल तर तो कधी उपलब्ध होईल, याबाबत निर्णय घेईल, असे सूत्रांनी सांगितले.

**Sakaal: 14.9.2020**

# विद्यापीठांच्या कारभारात शासकीय हस्तक्षेप सुरूच

## परीक्षेआधी विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याचे निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी



**विद्यार्थी संघटनांपुढे नमते**

- अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास सत्ताधारी शिवसेनेची विद्यार्थी संघटना युवासेनेने विरोध केला होता. त्यानंतर शासनानेही परीक्षा न घेताच अंतिम वर्षाचे निकाल जाहीर करण्याचा निर्णय घेतला.
- सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निर्णय मागे घेत राज्यात अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी सुरू झाली. मात्र, आता परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना प्रश्नसंच देऊन त्यातील प्रश्न विचारण्याची मागणी युवासेनेसह काही विद्यार्थी संघटनांनी केली.
- विद्यार्थी संघटनांनी मागणी करताच पुन्हा एकदा संघटनांसमोर नमते घेत उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना प्रश्नसंच देण्याच्या सूचना कुलगुरूंना दिल्या आहेत.

मुंबई : राज्यातील विद्यापीठांनी अधिकार मंडळांच्या संमतीने अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी केली असली तरी विद्यापीठे आणि परीक्षांच्या नियोजनात अद्यापही शासकीय ढवळाढवळ सुरूच आहे. परीक्षेपूर्वी प्रश्नसंच उपलब्ध करून देऊन त्यातीलच प्रश्न विचारावेत, अशी मागणी विद्यार्थी संघटनांनी केल्यानंतर उच्चशिक्षण विभागाने प्रश्नसंच देण्याचे निर्देश विद्यापीठांना दिले.

परीक्षा घेतल्याशिवाय पदवी देणे योग्य नाही, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निकषांनुसार परीक्षा घ्याव्यात, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्यानंतर राज्यातील विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी सुरू केली. विद्यापीठ कायद्यानुसार परीक्षांबाबतचे निर्णय विद्यापीठांनी त्यांच्या अधिकार मंडळांच्या संमतीने घेणे आवश्यक आहे. त्यानुसार विद्यापीठांनी अधिकार मंडळांच्या बैठकीत परीक्षांचा आराखडा निश्चित करून शासनाला सादर केला. कुलपतींनीही त्याला समंती दिली. मात्र, त्यानंतरही विद्यापीठांचे कामकाज आणि परीक्षांच्या नियोजनातील उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाची ढवळाढवळ संपलेली नाही. बहुतेक विद्यापीठांनी बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपात ऑनलाइन माध्यमातून परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. बदललेल्या परीक्षेचे स्वरूप कसे असावे, याची विद्यार्थ्यांना कल्पना येण्यासाठी सराव चाचण्यांचेही नियोजन केले. मात्र, आता परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याचा फतवा *(पान ८ वर)*

लोकसत्ता Mon, 14 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54934168

# विद्यापीठांच्या कारभारात हस्तक्षेप सुरूच

*(पान ३ वरून)*

उच्च शिक्षण विभागाने काढला आहे. 'विद्यार्थ्यांना परीक्षेचे प्रश्नसंच उपलब्ध करून देण्यात येतील. कुलगुरूंना त्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत,' असे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी फेसबुकच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना रविवारी जाहीर केले.

उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री म्हणाले... 'परीक्षांबाबत विद्यार्थ्यांच्या मनातील भावना आम्ही सर्वोच्च न्यायालयात मांडली. मात्र, न्यायलयाने परीक्षा घ्याव्यात, असे आदेश दिले. त्याचा आदर ठेवून आता परीक्षा द्याव्या लागतील. प्रश्नसंच मिळणार का, अशी शंका विद्यार्थ्यांच्या मनात होती. त्याविषयी नुकतीच कुलगुरूंशी चर्चा केली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर यांनी दोन-तीन दिवसांत विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्यात येतील, असे सांगितले.

लोकसत्ता Mon, 14 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

MONDAY, SEPTEMBER 14, 2020 TIMES CITY | PUNE

# Online videos, study groups come to the rescue of final-yr examinees

### Question Banks From University In Demand

Ardhra Nair & Swati Shinde Gole | TNN

**Pune:** Final-year students of Savitribai Phule Pune University (SPPU) have started preparations for their upcoming term-end examination by seeking question banks from the university, ensuring that they have power back-up, connectivity and proper gadgets to appear for the university examinations.

Many students have decided to return to their hostels/ paying guest accommodation to fetch their textbooks while others have made online groups to study.

A student of final year Master's in Hindi Dayanand Shinde from Tuljapur, Osmanabad district in the Marathwada region said that along with many from his region he had left the university without taking any textbooks when the lockdown was announced.

"We never thought the lockdown would extend this long and did not take any textbooks. But now we are studying using the digital library at the university's official website. Almost all books are available online on the website," said Shinde.

He added that there are students who stay in Pune and have been helping their friends by sending photographs or PDF files of notes and textbooks.

Shruti Turkane, final-year student of political science and public administration, said students who opted for Marathi medium are facing immense problems. "We hardly have any material with us. When I came home, I just took with me three textbooks, which were reference books. Now, we are completely relying on YouTube videos for material because 14 out of 15 videos uploaded by the university have errors and do not open. While we are still in a better place, the worst-case scenario is for my classmates from Chandrapur. We have not had any contact with them for the past four months. I wonder if they know about the decisions," Turkane said.

Students lack platforms to clear doubts. "In class, we had a study group, and if the study group too couldn't solve a problem, we could go to teachers who would solve the problem. This cannot happen via phone as our subjects are such that discussions and debates are needed for every single concept to be understood. We are very anxious about the entire thing. This is our last year and we had planned to study well and get good marks. Now, all we hope is that the exams are held without further delay because we have already forgotten whatever was taught and any more delays would mean we won't remember anything of the syllabus that we had studied so hard," she added.

The environment itself has changed such that the students are unable to concentrate on studies. "There has been a six-month gap and now it is becoming really hard for us to study. It would have been good if the exams were taken immediately, then at least, we had everything taught fresh in our minds. I have been sitting with my textbook since morning and have hardly covered a single topic. I have scored 9.7, 10 and again a 9.7 CGPA in three semesters and now all I am hoping for are pass marks," she added.

MISSION ADMISSION

### FINDING THE FOCUS

Illustration: Aamir Shaikh



**SOME TIPS TO CONCENTRATE ON STUDIES**

- **BE SELF-DISCIPLINED** | It is your responsibility. No one can monitor students to ensure whether they are studying or not. Students should make up their minds that they have to study regularly to make their preparation stronger
- **FOLLOW A TIME-TABLE** | Make a time-table and follow it diligently. All the subjects of the exam must get equal time. Students should take up the important chapters first, so they should make the time-table, accordingly
- **UTILISE ONLINE CLASSES** | As many coaching institutes are providing online classes, students should utilise these classes to clear their doubts. It is experts' guidance. Check various free lectures available on social media platforms
- **RELAX** | Don't make it all work and no play. Take time for activities like watching TV, listening to music, reading, playing indoor games or to be relaxed and calm
- **DO NOT WASTE TIME** | Recreational activities are important but understand when to stop. They should know how much time should be invested for relaxation activities
- **ATTEMPT MOCK TESTS** | To keep regularity in studies, students should try to attempt mock tests based on the actual pattern to get a real feel of examination. Analyse your performance through these mock tests, and work on the weaker areas

Source: Career360

### High scorers feel loss of academics more

Pranjali Dewda, a student from Nashik, who has scored above 9.5 GPA in all her three semesters, is stressed about the final examination.

"We want question-banks to study as soon as possible. Otherwise, none of us will clear the examination. Till now, my study has been knowledge-oriented but now, all I am thinking about is examinations. For most of us, the Master's level is the last of our academic life and it is sad that in the last leg, we are thinking of just exams and getting through it rather than understanding the concepts or studying anything thoroughly," Dewda said. TNN

Times of India: 14.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

नवभारत

# पुणे यूनिवर्सिटी की अंतिम परीक्षाएं अक्टूबर में

संवाददाता@नवभारत




**पुणे.** सावित्रीबाई फुले पुणे यूनिवर्सिटी की अंतिम वर्ष की अक्टूबर महीने में आयोजित होंगी. हालांकि, अभी परीक्षा तिथियों की घोषणा नहीं हुई है. मगर यह साफ हो गया है कि अंतिम वर्ष की परीक्षाएं अक्टूबर महीने में कराए जाएंगे. इस बार की परीक्षा की खास बात यह है कि परीक्षा ऑनलाइन और ऑफलाइन दोनों तरह से आयोजित होंगे, इसलिए विद्यार्थी अपनी सुविधा के अनुसार जो तरीका चाहें चुन सकते हैं.

Pune Edition
14-september-2020 Page No. 2
epaper.enavabharat.com

नवभारत

## ऑनलाइन-ऑफलाइन दोनों मोड्स उपलब्ध

कोरोना के कारण इस बार परीक्षाएं दोनों मो* यानी ऑनलाइन और ऑफलाइन कंडक्ट करायी जा रही हैं. विद्यार्थी अपनी सुविधा के अनुसार चुनाव कर सकते हैं. दरअसल कई बार विद्यार्थियों के पास अच्छा इंटरनेट कनेक्शन अथवा डिवाइस नहीं होती जिससे वे परीक्षा ठीक से दे सकें. ऐसे विद्यार्थियों की समस्या को देखते हुए यूनिवर्सिटी ने निर्णय लिया है कि वे दोनों तरह से परीक्षाएं आयोजित कराई जाएगी. हालांकि विद्यार्थी जो भी तरीका अपनाते हैं उन्हें उसके बारे में यूनिवर्सिटी को पहले ही बताना होगा क्योंकि इस बाबत विद्यार्थियों की संख्या के हिसाब से तैयारी करनी होगी.

Pune Edition
14-september-2020 Page No. 2
epaper.enavabharat.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# सर्वच विद्यापीठांनी गुंडाळले परीक्षा पॅटर्न

## ऑक्टोबरमध्ये ऑनलाईन अंतिम परीक्षा; बारा विद्यापीठांच्या बारा तऱ्हा

मुंबई : पवन होन्याळकर

राज्य शासनाच्या अखत्यारीतील आणि पारंपरिक विद्यापीठ म्हणून ओळख असलेल्या विद्यापीठांनी ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्ष परीक्षा घेण्याची तयारी चालवली असून, ऑनलाईन परीक्षा घेताना पूर्वीचे विविध पॅटर्न गुंडाळले आहेत. तर विद्यार्थ्यांना या तंत्रावर आधारित परीक्षांचा अभ्यास करतच परीक्षा द्यावी लागेल. त्यातही अनेक विद्यापीठांनी ऑफलाईन म्हणजे परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा देण्याचा पर्यायदेखील खुला ठेवून ऑनलाईन/ऑफलाईनचा द्राविडी प्राणायाम घालण्याचे ठरवलेले दिसते.

राज्यातील सर्व १२ विद्यापीठांमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षांना तब्बल ७ लाख ३४ हजार ५१६, तर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी २ लाख ८३ हजार ९३७ विद्यार्थी सरकारी नोंदणीनुसार बसणार आहेत. राज्यात ऑक्टोबरमध्ये विद्यापीठांनी परीक्षांचे नियोजन केले आहे. अंतिम वर्षाची परीक्षा ही तीन तासांऐवजी सव्वा ते दीड तासाचे नियोजन केले असून, १०० गुणांऐवजी ५० किंवा ७५ गुणांची बहुपर्यायी प्रश्नांच्या आधारे परीक्षा होणार आहेत. या परीक्षा महाविद्यालयस्तरावर होणार असून, ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याचेही विद्यापीठांनी स्पष्ट केले. जे विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी त्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयामध्येच ऑफलाईन परीक्षांचे आयोजन केले आहे. उदाहरणार्थ, १०० पैकी २५ मुलांनी केंद्रावर येऊन परीक्षा देण्याचे ठरवले, तर फक्त २५ विद्यार्थ्यांसाठी लेखी परीक्षेची तयारी करावी लागणार आहे. हा द्राविडी प्राणायाम अनेक विद्यापीठांनी स्वीकारल्याचे दिसते.

प्रत्येक विद्यापीठाने ऑनलाईन पद्धतीचा वापर करताना वेगवेगळे पर्याय देत परीक्षा पॅटर्न सरकार दरबारी पाठवला आहे. मात्र, परीक्षा जरी ऑनलाईन असल्या, तरी गोंधळ विद्यार्थ्यांचा आहे. गेल्या सहा महिन्यांपासून विद्यार्थी अभ्यासापासून दूर आहेत. तसेच या विद्यार्थ्यांना बहुपर्यायी प्रश्न सोडविण्याची सवय नाही. यामुळे विद्यापीठांनी प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणीही विद्यार्थी संघटनांनी केली. ही मागणी लक्षात घेऊन विद्यापीठांनाही उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आदेश दिले आहेत. मात्र, हे विद्यापीठांना कितपत शक्य होणार आहे हे येणारा काळ सांगेल, असे दिसते.

### क्वेश्चन बँकवर नाराजी; विद्यापीठ-महाविद्यालय संघर्ष वाढला

कमी वेळात सर्वच विद्यापीठांना परीक्षांची तयारी करावी लागणार आहे. यामध्ये विद्यार्थी संघटनांनी विद्यार्थ्यांना चठट पेपरचा पॅटर्न लक्षात यावा यासाठी परीक्षेपूर्वी क्वेश्चन बँक देण्यात येणार असल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. मात्र, यासंदर्भात विद्यापीठांत नाराजी पसरली आहे. इतक्या कमी वेळात सरावासाठी प्रश्नावली देणे शक्य नसल्याचे प्राध्यापकांनी म्हटले आहे. सर्वच जबाबदारी विद्यापीठांनी महाविद्यालय स्तरावर दिल्याने विद्यापीठ आणि महाविद्यालय संघर्ष वाढला आहे.

पुढारी विशेष

### ज्याचा त्याचा परीक्षा पॅटर्न

१) मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी - २,०३,७००
५० गुण/१ तास/बहुपर्यायी/ऑनलाईन

२) संत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर
विद्यार्थी - ७०,०००
५० गुण/१ तास/बहुपर्यायी/ऑनलाईन-मोबाईल ॲप

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
विद्यार्थी - ७३,६२१
५० गुण/बहुपर्यायी/५०-५० फॉर्म्युला/ऑनलाईन

४) बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
विद्यार्थी - ४६,४६६
६० गुण/९० मिनिटे/वस्तुनिष्ठ बहुपर्यायी/ऑनलाईन

५) संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती
विद्यार्थी - ७०,२३४
इंजिनिअरिंग तांत्रिक वगळता सर्व अंतिम परीक्षा लेखी/५० गुण/बहुपर्यायी/ऑनलाईन-मोबाईल ॲप

६) स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड : विद्यार्थी - ३५,५००
५० गुण/१ तास/ऑनलाईन/बहुपर्यायी/ऑफलाईन परीक्षादेखील देता येईल/ऑनलाईन-ऑफलाईन परीक्षा एकाच वेळी सुरू होतील

७) गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
विद्यार्थी - २४,०००, ५० गुण/सव्वा तास/आनलाईन-एक प्रश्न सोडवल्यानंतरच दुसरा प्रश्न दिसेल

८) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
विद्यार्थी - ७३,५०६
५० गुण/१ तास/बहुपर्यायी प्रश्न/ऑनलाईन आणि ऑफलाईन परीक्षा

९) सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे
विद्यार्थी - २,५५,१२४
५० गुण/१ तास/ऑनलाईन आणि ऑफलाईनदेखील/बहुपर्यायी प्रश्न

१०) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर :
विद्यार्थी - ३८,०००
५० गुण/दीड तास/ऑनलाईन/बहुपर्यायी प्रश्न

११) एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई : विद्यार्थी - १४,८३१
५० गुण/१ तास/ऑनलाईन

Pune Edition
Sep 14, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# प्रशासकीय सेवेसाठीच्या अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पदवीचे शिक्षण घेत असलेल्या आणि प्रशासकीय सेवेत करिअर करण्याची इच्छा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे तीन वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम (आयसीएसी) गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत चालवला जातो. या अभ्यासक्रमाची २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदवीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी पात्र असतील. मुख्य म्हणजे हा अभ्यासक्रम ऑफलाइन आणि ऑनलाइन पार पडणार आहे. २०२०-२१ साठी प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना बारावीच्या गुणांवर प्रवेश दिला जाईल. यामध्ये ८० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन माध्यमातून आणि उर्वरित २० टक्के ऑफलाइन शिकवला जाणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करून हा अभ्यासक्रम शिकवला जाणार असल्याची माहिती स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे देण्यात आली आहे.

या अभ्यासक्रमात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तीन पातळ्यांवर तयारी करून घेण्यात येईल. या अभ्यासक्रमाद्वारे लेखन सराव, व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी भाषेवर प्रावीण्य मिळवण्याकरिता कार्यक्रम, वादविवाद कार्यक्रम, चर्चासत्र, वेबिनार यामधून विद्यार्थ्यांची क्षमता बांधणी केली जाणार आहे.

My Pune Edition
Sep 14, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# पुस्तकांच्या पायरेटेड पीडीएफचा सुळसुळाट

पुणे : पुढारी वृत्तसेवा

शहरात विविध ठिकाणी नामवंत लेखकांची पुस्तके सर्रासपणे पायरेटेड विकली जात आहेत... पण, आता नामवंत लेखक आणि प्रकाशकांच्या याच पुस्तकांचे पायरेटेड पीडीएफ विविध मोबाईल ॲप्लिकेशनवर उपलब्ध करून दिली जात आहेत. या पुस्तकांना स्कॅन करून त्याला पीडीएफ स्वरूप दिले जात असून, यामुळे प्रकाशकांपासून ते लेखकापर्यंत सर्वांना मोठी आर्थिक झळ बसत आहे. याविरुद्ध अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाने आवाज उठवला आहे. असे प्रकार करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याची मागणी सायबर पोलिसांकडे संघाकडून निवेदनाद्वारे केली आहे.

### प्रकाशकांना मोठी आर्थिक झळ



आधीपासूनच नामवंत लेखक आणि प्रकाशकांची पायरेटेड पुस्तके ठिकठिकाणी विकली जात आहेत. पण, आता पुस्तकांची स्कॅन कॉपी तयार करून त्याला पीडीएफचे स्वरूप देऊन ती पुस्तके मोबाईल ॲप्लिकेशन, संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जात आहेत. याचा लॉकडाऊनकाळात तर सर्वांना मोठा आर्थिक फटका बसत असून, आता या पायरसीविरोधात प्रकाशक एकत्र आले आहेत. याला कायमस्वरूपी आळा बसावा, असे प्रकाशकांचे म्हणणे आहे.

संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे म्हणाले, संघाच्या शिष्टमंडळाने सायबर पोलिसांना पायरसीबद्दल पावले उचलावीत, यासाठी निवेदन दिले आहे. सध्या नामवंत लेखकांची पुस्तके पायरेटेड स्वरूपात विकण्याचे प्रमाण वाढले आहे. पण, त्याला पीडीएफचे स्वरूपही दिले जात आहे. हे पीडीएफ स्वरूप त्या विविध मोबाईल ॲप्लिकेशनवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. जवळजवळ साडेतीन हजार पुस्तकांची पायरेटेड पीडीएफ करण्यात आली असून, याविरुद्ध आता प्रकाशक एकवटले आहेत. पायरसीचा प्रश्न आताचा नाही. याविषयी ठोस पावले उचलली जावीत.

पुढारी अंकर

प्रकाशक सुनील मेहता म्हणाले, की सायबर पोलिसांनी या लोकांवर कडक कारवाई करावी, असे पायरेटेड पीडीएफ पुरविणाऱ्या संकेतस्थळ ब्लॉक केले पाहिजेत. अशा प्रकारच्या पायरसीमुळे फक्त प्रकाशकच नव्हे, तर सर्वांचेच आर्थिक नुकसान होते. ही एक साखळी आहे. मध्यंतरी आम्ही पण पायरसीविरोधात तक्रार केली होती. त्यावर कारवाईही झाली. काही नामवंत ई-कॉमर्स संकेतस्थळावरही पीडीएफ उपलब्ध केली जात आहेत. म्हणूनच या लोकांवर कारवाई झाली पाहिजे.

"पायरसीविरुद्ध आज प्रत्येक प्रकाशक उभा आहे. आम्ही एक पुस्तक बनवायला दोन वर्षे मेहनत घेतो. पैसे गुंतवतो. ते एका दिवसात पायरसी करून पुस्तके विकतात. म्हणजे त्यांना आयते पैसे मिळतात. आमची मेहनत त्यामुळे वाया जाते. एका पुस्तकासाठी साधारणपणे ४० हजार रुपयांच्या पुढे खर्च येतो. पायरसी करणारे लोक तर त्याला पायरेटेड करायला एक क्षण लावत नाहीत. त्यांच्यावर बंदी घातली पाहिजे.

- अरविंद पाटकर, प्रकाशक

My Pune Edition
Sep 14, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

लोकमत

ऑनलाइन अंतर्गत परीक्षा गुण : विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत निर्णय

# गुण न भरणाऱ्या प्राध्यापकांवर नाही कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांचे विविध परीक्षांचे अंतर्गत गुण ऑनलाइन पद्धतीने भरण्याबाबत अडचणी आलेल्या प्राध्यापकांवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून केली जाणारी दंडात्मक कारवाई टळली आहे; मात्र अंतर्गत गुणांबाबत गंभीर निष्काळजीपणा करणाऱ्या प्राध्यापकांना विद्यापीठाच्या नियमित कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

### दंडात्मक कारवाई न करण्याचा निर्णय




लोकमत इफेक्ट

"कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत विलंब शुल्क व दंडात्मक कारवाई न करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. परंतु, याबाबत गंभीर निष्काळजीपणा करणाऱ्या प्राध्यापकांवर कार्यवाही केली जाईल.

- डॉ एन.एस. उमराणी, प्र-कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे अंतर्गत गुण योग्य तऱ्हेने भरण्याची जबाबदारी संयुक्तपणे संबंधित विषय शिक्षक व महाविद्यालयांची आहे. याबाबत त्रुटी आढळल्यास महाविद्यालय आणि संबंधित शिक्षकांकडून प्रत्येक विद्यार्थ्यामागे १ हजार रुपये दंड आकारला जाईल, असे विद्यापीठाने स्पष्ट केले होते. २०२० मध्ये उन्हाळी परीक्षेपासून ही दंडात्मक कारवाई करणार असल्याचे परीक्षा विभागाने स्पष्ट केले होते. त्यानुसार अंतर्गत गुणांबाबत त्रुटी असणाऱ्या प्राध्यापकांना दंड भरण्याबाबत महाविद्यालयामार्फत नोटीस पाठविण्यात आली होती. या विषयाला सर्वप्रथम 'लोकमत'ने वाचा फोडली होती.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीतही प्राध्यापकांनी महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण भरण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मात्र, विद्यापीठातर्फे उशिरापर्यंत विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारले जात असल्याने काही विद्यार्थ्यांचे गुण भरण्याचे राहून गेले. त्यामुळे विद्यापीठाने दंडात्मक कारवाई करू नये, अशी मागणी प्राध्यापकांनी केली होती. त्यावर नुकत्याच झालेल्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यात कोरोनामुळे विद्यार्थी व प्राध्यापकांवर विलंब शुल्क किंवा दंडात्मक कारवाई करु नये, असा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे यंदा प्राध्यापकांवरची दंडात्मक कारवाई टळली आहे.

अंतर्गत गुणांच्या त्रुटीबाबत विद्यापीठाकडून नोव्हेंबर २०१८ पासून कारवाई महाविद्यालय व प्राध्यापकांवर केली जात आहे. ऑगस्ट महिन्यात त्यात सुधारण करुन नवीन नियमावली प्रसिद्ध करण्यात आली. त्यात प्रत्येक विद्यार्थ्यामागे प्राध्यापकांना १ हजार रुपये दंडाची तरतूद करण्यात आली. त्यानुसार विद्यापीठाकडून प्राध्यापकांवर दंडात्मक कारवाई केली जाणार होती.

Pune Main
Page No. 2 Sep 15, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

## ऑनलाइन परीक्षेला ८० टक्के विद्यार्थी तयार

### १ लाख ८३ हजार विद्यार्थी देणार परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील अंतिम वर्षाचे सुमारे ८० टक्के विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देण्यास तयार असून, उर्वरित २० टक्के विद्यार्थीच ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची परीक्षा नियोजित वेळेत घेऊन ऑक्टोबर महिनाअखेरीस परीक्षेचा निकाल जाहीर करणे शक्य होणार आहे, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना १४ सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडण्यासाठी विकल्प अर्ज भरण्यास मुदत देण्यात आली होती.

सोमवारी दुपारी ३ वाजेपर्यंत विद्यापीठाकडे २ लाख ४८ हजार विद्यार्थ्यांपैकी २ लाख २० हजार विद्यार्थ्यांनी विकल्प अर्ज भरला. त्यातील १ लाख ८३ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला.

Pune Main
Page No. 3 Sep 15, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

## २ दिवस परीक्षेचा सराव करण्यासाठी अवधी



◆ विद्यापीठातर्फे ऑनलाइन परीक्षेसाठी बहुपर्यायी प्रश्नांची 'क्वेश्चन बँक' तयार केली जात आहे. ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन ते तीन दिवस परीक्षेचा सराव करण्यासाठी अवधी दिला जाणार आहे. अंतिम वर्षाचा विकल्प अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सुमारे २ लाख २४ हजार नियमित विद्यार्थी तर सुमारे २० हजार बॅकलॉगचे विद्यार्थी आहेत.

◆ विद्यापीठातर्फे येत्या १ ते ९ ऑक्टोबरदरम्यान बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा तर १० ते २० ऑक्टोबर या कालावधीत नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. विद्यापीठाकडे विकल्प अर्ज भरलेल्या एकूण २ लाख २० हजार विद्यार्थ्यांमध्ये काही विद्यार्थी बॅकलॉकचे आहे.

Pune Main
Page No. 3 Sep 15, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### उदय सामंत यांचा कंपन्यांना इशारा : शैक्षणिक वर्ष कधी सुरु होणार सांगणे अशक्य

## पदव्यांवर शंका घेतल्यास कारवाई

नागपूर : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यभरातील विद्यापीठांमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी युद्धस्तरावर सुरु आहे. या विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा उद्योगजगताचा दृष्टिकोन बदलेल अशी चर्चा आहे. मात्र या विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणेच पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या पदवीकडे शंकेच्या नजरेने पाहिले तर महाराष्ट्र शासन तातडीने हस्तक्षेप करेल. वेळ पडली तर संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्यासही मागेपुढे पाहणार नाही, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

सोमवारी त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तसेच गोंडवाना विद्यापीठाच्या परीक्षांच्या तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर आयोजित पत्रपरिषदेदरम्यान ते बोलत होते. अंतिम वर्षाच्या परीक्षांवर बरेच आरोप झाले. परीक्षा घेणारच नाही असे आम्ही कधीच म्हटले नव्हते. केवळ आताची स्थिती लक्षात घेता सध्या पदवी देऊ व ज्यांना गुणसुधार करायचा आहे, त्यांची नंतर परीक्षा घेऊन अशी आमची भूमिका होती. मी परीक्षा न घेण्याच्या माझ्या मतावर आजही ठाम आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करणे हे कर्तव्यच असून ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील विद्यापीठात अंतिम वर्षाच्या परीक्षा होतील, असे सामंत यांनी सांगितले. आयआयटीसह देशातील इतर राज्यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द केल्या होत्या, तेव्हा ओरड का झाली नाही, असा प्रश्नदेखील त्यांनी उपस्थित केला.

आम्ही तंत्रनिकेतन अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेला मुदतवाढ दिली आहे. अभियांत्रिकीच्या प्रवेश परीक्षेचे निकाल आल्यानंतर तेथील प्रवेशप्रक्रिया सुरु होईल. सध्याची स्थिती पाहता शैक्षणिक वर्ष नेमके कधी सुरु होईल हे सांगता येत नाही, असे सामंत यांनी प्रतिपादन केले.

### नागपूर विद्यापीठात ७५ हजारांहून अधिक परीक्षार्थी

नागपूर विद्यापीठात एमसीक्यू करायची की नाही अशी शंका होती. मात्र आता परीक्षेचे काम वेगाने सुरु आहे. मॉक टेस्ट घेतल्या जात आहे. नियमित व अनुत्तीर्ण मिळून ७५ हजार ९२५ विद्यार्थी १ हजार ८८२ विषयांच्या परीक्षा देणार आहेत. त्यातील ९० ते ९२ टक्के विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी सज्ज असून उर्वरित विद्यार्थ्यांचीदेखील सोय करण्यात येईल, अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.

### अनुत्तीर्णांची दीड महिन्यात परीक्षा

एखादा पेपर द्यायचा राहिला तर कसे होणार अशी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शंका होती. मात्र अशा विद्यार्थ्यांची १५ दिवसांनी परत परीक्षा घेण्यात येईल. शिवाय अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची परीक्षादेखील महिना दीड महिन्यात होईल, असे उच्च शिक्षणमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### आठ दिवसात सर्व विद्यापीठांचा दौरा

कोरोना काळात मी दौरा का करतो आहे याबाबत अनेकांना आश्चर्य वाटले. मात्र राज्यातील विद्यापीठे प्रतिकूल परिस्थितीत परीक्षा घेत आहेत. शासन या सर्व विद्यापीठांच्या पाठीशी आहे. यासाठीच मी नागपूर व गडचिरोलीचा दौरा केला. पुढील आठ दिवसांत सर्व विद्यापीठांचा दौरा करणार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

### कोरोना संपल्यानंतर भरती प्रक्रिया

कोरोनामुळे राज्यभरातील विद्यापीठांतील भरती प्रक्रियेला ब्रेक लागला आहे. मात्र शासनाने भरती नेहमीसाठी थांबविलेली नाही. कोरोनाचा प्रकोप संपल्यानंतर परत भरती प्रक्रिया सुरु होईल, असा दावा सामंत यांनी केला.

Pune Main
Page No. 8 Sep 15, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# मोबाईल, लॅपटॉपवर परीक्षा

**» अंतिम वर्ष परीक्षा** एक लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी दाखविली तयारी

**पुणे, ता. १४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी २ लाख २० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामध्ये १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा देण्याची तयारी दाखविली आहे. त्यामध्ये तब्बल १ लाख १० हजार विद्यार्थी मोबाईलवरून परीक्षा देणार आहेत.**



सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याचे आदेश दिल्याने पुणे विद्यापीठाने परीक्षा घेण्याची तयारी सुरू केली आहे.

कमी काळात ही परीक्षा संपविण्यासाठी बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेचे पर्याय आहेत. मात्र, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा द्यावी, यासाठी विद्यापीठाने प्रयत्न सुरू केले होते; त्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी प्राचार्यांची बैठक घेऊन त्याबाबत सूचना केल्या होत्या. विद्यार्थ्यांना परीक्षेचे माध्यम निवडण्यासाठी सोमवारी (ता. १४) रात्री १२ पर्यंत नोंदणीसाठी लिंक खुली ठेवली आहे, तर विद्यापीठ आवारात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १७ सप्टेंबरपर्यंत लिंक खुली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

### ३५ हजार जणांची ऑफलाइन परीक्षा

स्मार्टफोन, लॅपटॉप, टॅबलेट अशी साधने उपलब्ध नसणे, नेटवर्कचा प्रॉब्लेम यासह अन्य कारणांमुळे सुमारे ३५ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा देण्याचा पर्याय निवडला आहे. रात्री १२ पर्यंत जे विद्यार्थी कोणत्याही प्रकारचा पर्याय निवडणार नाहीत अशांची ऑफलाइन परीक्षा घ्यावी लागणार आहे. त्यामुळे या आकड्यांत वाढ होण्याची शक्यता आहे.

### अशी देणार परीक्षा

**२ लाख ४८ हजार**
एकूण विद्यार्थी

**२ लाख २० हजार**
परीक्षेसाठी नोंदणी

**१ लाख ८५ हजार**
ऑनलाइन पर्याय

**१ लाख १० हजार**
मोबाईलचा वापर

**७० हजार**
लॅपटॉप

**५ हजार**
डेस्कटॉप, टॅबलेट

**३५ हजार**
ऑफलाइन

Sakaal: 15.9.2020

# 'डिजिटल'चा अभाव अन् शिक्षणावर प्रभाव

## विद्यार्थी कंटाळले; अध्यापनासाठी शिक्षकांना अत्याधुनिक प्रशिक्षणाची गरज

**संतोष शाळिग्राम :**
सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १४ : विद्यार्थी वर्गात येत नाहीत. आता ऑनलाइन क्लासमध्ये त्यांच्याशी संवादी होणे, त्यांना एकाग्र करता येणे, यात आम्हाला अडचणी येत आहेत. तसेच डिजिटल माध्यमातून अध्यापन हा पहिलाच अनुभव असल्याने त्याचा वापर करणेही कठीण जाते. त्यामुळे प्रभावी अध्यापन करण्यावर मर्यादा येत आहेत...

राज्यातील बहुतांश शाळांमधील शिक्षकांचे हे गाऱ्हाणे आहे. आत्तापर्यंत शिक्षक म्हणजे वर्ग, खडू आणि फळा हे सूत्र होते. आता त्यांच्या हाती मोबाईल आणि प्रत्येक घर हा वर्ग झाला. त्या वर्गात शिक्षक मात्र नाहीत. अशा स्थितीत विद्यार्थ्यांना धडे देण्यासाठी आवश्यक असलेले डिजिटल कौशल्य शिक्षकांमध्ये नसल्याने प्रभावी अध्यापन करता येत नाही. परिणामी, विद्यार्थिदेखील झूम, डिजिटल क्लास रूम आणि अन्य ॲपच्या माध्यमातून चाललेल्या अध्यापनास कंटाळल्याचे चित्र आहे.

शिक्षकांना डिजिटल अध्यापनासाठी आधुनिक कौशल्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे, असे शिक्षकांचे म्हणणे आहे. करंदी येथील विद्या विकास मंदिर या शाळेतील शिक्षक बबन डकिर्डे सकाळशी बोलताना म्हणाले, की तरुण शिक्षक तंत्रज्ञान वापरतो; परंतु वयाच्या पन्नाशीला पोचलेल्या शिक्षकाला हे तंत्रज्ञान वापरून विद्यार्थ्यांना शिकविणे जड जात आहे. कारण शिक्षकाकडे ऑनलाइन शिकविण्याचे कौशल्य नाही. वर्गात मुलांसमोर जाऊन त्याला एकाग्र करणे हे त्याच्याकडील मुख्य कौशल्य आहे.

अध्यापन परिणामकारक होण्यासाठी मोबाईलसमोर कसे बोलावे किंवा प्रभावी व्हिडिओ कसा तयार करावा? त्यात विषयाची संबंधित माहिती जोडून त्याला अधिक परिणामकारक कसा करावा? ई-मटेरियल कसे तयार करावे आदी कौशल्ये शिक्षकांनी कधीच आत्मसात केलेली नाहीत. कारण त्याची गरज पडली नाही. परंतु आता कोरोनामुळे ही कौशल्य खूप गरजेची आहेत. त्यामुळे आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण शिक्षकांसाठी गरज बनले आहे, असे डकिर्डे म्हणाले.

### शिक्षकांना काय हवे

- नवतंत्रज्ञानाची भीती शिक्षकांमध्ये आहे, ती घालविण्यासाठी योग्य प्रशिक्षण
- ऑनलाइन अध्यापनासाठी आवश्यक ई-कंटेट कसा तयार करावा, याबद्दल मार्गदर्शन
- प्रभावी अध्यापनासाठी ॲपचा वापर आणि विद्यार्थी एकाग्र होण्यासाठी सादरीकरणाचे शिक्षण

**डिजिटल अध्यापनाचे कौशल्य शिक्षकांमध्ये नाही. ई-कंटेट तयार करून त्याचा डिजिटल अध्यापनातील वापर त्यांना करता येत नाही. अनेक जण पुस्तकावर मोबाईल फिरवून शिकवितात. त्याद्वारे योग्य अध्यापन होणार नाही. म्हणून शिक्षकांना डिजिटल अध्यापन कसे करावे? याचे धडे तंत्रज्ञांनी दिले पाहिजे.**
- **संजय नायडू**, मुख्याध्यापक, बालाजी माध्यमिक विद्यालय, धनकवडी

Sakaal: 15.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### कनिष्ठ महाविद्यालयांतील 'त्या' प्रवेशाला बसणार खीळ

**पुणे, ता. १४ : वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशातील ७० टक्के कोट्यातून प्रवेश मिळविण्यासाठी हजारो विद्यार्थी पश्चिम महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेत होते. मात्र, हा प्रवेश केवळ नावापुरताच असायचा आणि त्यावेळेत महाविद्यालयीन शिक्षणाऐवजी विद्यार्थी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेची तयारी करत होते. त्यामुळे आता वैद्यकीय प्रवेशासाठी असलेल्या ७०/३० कोट्याचा निर्णय रद्द केल्याने असे प्रकार काही प्रमाणात रोखण्यात यश येणार आहे.**

वैद्यकीय प्रवेशासाठी मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र असे विभाग केले होते. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ७० टक्के जागा उपलब्ध होत होत्या. मराठवाड्यालगतच्या आणि पश्चिम महाराष्ट्राच्या कार्यकक्षेत येणाऱ्या जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयात मराठवाडा व विदर्भातील काही विद्यार्थी अकरावी-बारावीसाठी प्रवेश घेत होते. ते केवळ प्रात्यक्षिक परीक्षांसाठी महाविद्यालयात येत आणि वर्षभर प्रवेशाची तयारी करत होते. मात्र आता वैद्यकीय प्रवेशातील नव्या बदलामुळे अशा प्रकाराला काही प्रमाणात आळा बसणार आहे.

**“ मराठवाड्यातील अनेक विद्यार्थी बार्शीजवळ असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेत होते. तसेच, पश्चिम महाराष्ट्रातील इतरही जिल्ह्यांत प्रवेश घेऊन मराठवाड्यात व विदर्भात वैद्यकीय अभ्यासक्रमाची तयारी करत होते. मात्र, आता ७०/३० कोटा रद्द केल्याने या प्रकाराला आळा बसेल.**
**- हरीश बुटले,** संस्थापक सचिव, डिपर

Sakaal: 15.9.2020

### अकरावी प्रवेशाबाबत विद्यार्थी हवालदिल

#### प्रतीक्षा कधी संपणार; स्थगितीमुळे पालकांचीही चिंता वाढली

**“ पुणे शहरातील नामांकित महाविद्यालयात अकरावीसाठी वाणिज्य शाखेत प्रवेश मिळावा, अशी अपेक्षा आहे. लवकरात लवकर प्रवेश मिळेल आणि टेन्शन जाईल, असे वाटले होते. परंतु, आता प्रवेश प्रक्रियेला स्थगिती दिल्यामुळे 'टेन्शन' आणखी वाढले आहे. अकरावी प्रवेशाची प्रतीक्षा संपणार कधी, असा प्रश्न पडला आहे.**
**- श्रावण सोनटक्के,** प्रवेशाच्या प्रतीक्षेतील विद्यार्थी

**पुणे, ता. १४ :** शेतकरी कुटुंबातील अंकिताला (नाव बदललेले आहे) दहावीला ८७ टक्के मिळाले. पुढील शिक्षण शहरातील नामांकित महाविद्यालयात घेण्यासाठी तिच्या पालकांसह शेजारीही प्रयत्न करत आहेत. अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या यादीत पसंतीच्या महाविद्यालयात नाव येईल अन शुल्क भरून प्रवेश निश्चित करता येईल, म्हणून तिच्या पालकांनी काही रक्कम बाजूलाही ठेवली होती. परंतु, आता प्रवेश प्रक्रियेला स्थगिती मिळाल्याने अंकितासह तिच्या कुटुंबीयांची चिंता वाढली आहे.

अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील दुसरी नियमित गुणवत्ता यादी १० सप्टेंबर रोजी जाहीर होणार होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या मराठा आरक्षणासंदर्भातील आदेशाच्या अनुषंगाने या प्रक्रियेची कार्यवाही पुढे ढकलली आहे. तसेच, याबाबत कोणताही निर्णय घेण्यात न आल्याने अंकिता आणि तिच्या पालकांप्रमाणेच अन्य विद्यार्थी-पालक हवालदिल झाले आहेत.

धायरीत राहणारे संतोष साकोरे म्हणाले, “प्रतिकूल परिस्थितीवर मात करत दहावीत ८७ टक्के गुण मिळविलेल्या विद्यार्थिनीच्या प्रवेशासाठी आम्ही शेजारी म्हणून प्रयत्न करत आहोत. आरक्षणाला आमचा निश्चितच विरोध नाही. परंतु, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून प्रवेशाबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यामुळे कोरोनाच्या परिस्थितीमुळे निराश झालेल्या विद्यार्थ्यांना काहीसा दिलासा मिळेल.”

दहावीला ८२ टक्के मिळालेल्या अनिकेतचे वडील संतोष सरडे म्हणाले, “दहावीची परीक्षा झाल्यापासून कोरोनामुळे विद्यार्थी घरात बसून आहेत. अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यामुळे आता कुठे त्यांना दिलासा मिळाला. मात्र, ही प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलल्यामुळे मुलांचा चिडचिडपणा काहीसा वाढला आहे.”

Sakaal: 15.9.2020

# News Paper Clippings During September 2020

**Section: Education**

## आंतरशाखीय शिक्षणाची तरतूद उपयुक्त

### डॉ. वसंत काळपांडे यांचे मत ; विज्ञान परिषदेतर्फे परिसंवाद

**पुणे, ता. १४ :** नव्या शैक्षणिक धोरणात विज्ञान, कला, वाणिज्य, शालेय, अभ्यासक्रमेतर अशा भिंती पुसट झाल्या आहेत. बहुशाखीय, आंतरशाखीय शिक्षण घेण्याची मुभा यामध्ये आहे. शालेय स्तरापासूनच व्यावसायिक शिक्षणावर भर देण्याचा प्रयत्न परिणामकारक वाटतो, असे मत राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले.

मराठी विज्ञान परिषद पुणे विभागातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरणात विज्ञानाचे स्थान' यावर आयोजित परिसंवादात काळपांडे बोलत होते. गुगल मीटद्वारे झालेल्या या परिसंवादावेळी महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. बाळकृष्ण बोकील, पत्रकार श्रीधर लोणी, विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा. राजेंद्रकुमार सराफ, माजी अध्यक्ष विनय र. र., अशोक तातुगडे आदी उपस्थित होते.

डॉ. काळपांडे म्हणाले, ''भारतीय ज्ञान, परंपरा, प्राचीन वारसा, मूल्ये यांसह गणिती, संगणकशास्त्र, माहितीशास्त्र आणि कौशल्यविकास हा नव्या शिक्षणपद्धतीचा आधार आहे.''

> **कृतिशील आणि अनुभवातून शिक्षण, तंत्रज्ञानाचा अंतर्भाव हा शिक्षणाचा गाभा आहे. सर्जनात्मक शिक्षण पद्धती, मूल्यमापन पद्धती विकसित करण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर दिली आहे. त्यामुळे त्यांना उपक्रमशील बनावे लागणार आहे.**
> – **डॉ. बाळकृष्ण बोकील,** उपाध्यक्ष, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद

**Sakaal: 15.9.2020**

## विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देऊ नका

### मराठा क्रांती मोर्चाची मागणी ; स्थगिती उठविण्यासाठी प्रयत्न करा

पुणे, ता. १४ : सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाबाबत दिलेली स्थगिती उठविण्यासाठी राज्य सरकारने अध्यादेशाचा पर्याय न स्वीकारता अंतरिम सुनावणीसाठी प्रयत्न करावेत. न्यायालयाचा स्थगिती आदेश येण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश आणि नियुक्त्या झाल्या आहेत, त्या संरक्षित कराव्यात. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशा मागण्या पुणे जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आल्या.

पुणे जिल्हा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र कोंढरे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. राजेंद्र कुंजीर, तुषार काकडे, धनंजय जाधव, सचिन आडेकर, हनुमंत मोटे, रघुनाथ चित्रेपाटील, अमर पवार, बाळासाहेब अमराळे, युवराज दिसले, श्रुतिका पाडळे, मीना जाधव या वेळी उपस्थित होत्या. सर्वोच्च न्यायालयाचा मराठा आरक्षण स्थगितीचा निर्णय न्यायालयाच्या संकेतस्थळावर आलेला नसतानाही शिक्षण विभागाने मराठा प्रवेशावर लगेच स्थगिती दिली. यावरून सरकार दुजाभाव करत असल्याचा आरोप या वेळी करण्यात आला. राज्य सरकारने आरक्षणाबाबत गांभीर्याने पावले उचलावीत; अन्यथा तीव्र प्रतिक्रिया उमटतील, असा इशारा पुणे जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने देण्यात आला.

**मराठा क्रांती मोर्चाच्या प्रमुख मागण्या**

- राज्य सरकारने घटनातज्ज्ञांचा सल्ला घेऊन कायदेशीर बाबींचा अवलंब करावा
- सरन्यायाधीशांकडे अर्ज करून स्थगिती उठवावी
- आदेशापूर्वी ज्या प्रवेश आणि नियुक्त्या झाल्या आहेत त्या संरक्षित कराव्यात
- एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आरक्षण सोडून इतर सवलती सुरू ठेवाव्यात
- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या व्याज परताव्यासाठी तरतूद करावी
- मराठा क्रांती मोर्चाच्या आंदोलनात दाखल ४३ गुन्हे त्वरित मागे घ्यावेत

**Sakaal: 15.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### नवसंकल्पना आधारित विद्यापीठात पदविका अभ्यासक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** स्वतःची नवउद्यमी सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी, नवसंकल्पना क्षेत्रात काही करू पाहणाऱ्यांसाठी आता पदविका अभ्यासक्रम उपलब्ध झाला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड एंटरप्राइजतर्फे डिप्लोमा इन इनोव्हेशन अँड न्यू व्हेंचर हा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असून, या प्रकारचा हा पहिलाच अभ्यासक्रम आहे.

अहमदाबादच्या आंत्रप्रुनरशीप डेव्हलपमेंट ऑफ इंडिया या संस्थेच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम राबवला जाणार आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विज्ञान, तंत्रज्ञान, संगणकशास्त्र या विषयातील पदवी ही पात्रता आहे. २१ आठवडे मुदतीचा हा अभ्यासक्रम आहे. व्यवस्थापन नवसंकल्पना, ग्राहककेंद्रित नवसंकल्पना आणि उत्पादन व्यवस्थापन, कायदेशीर बाबी, बौद्धिक संपदा व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान, नव्या उद्योगाचे नियोजन आणि व्यवस्थापन हे विषय या अभ्यासक्रमाद्वारे शिकवले जातील.

'अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने आतापर्यंत सुरू केलेले अभ्यासक्रम पदव्युत्तर पदवी स्तरावरचे आहेत. त्यामुळे हा कमी कालावधीचा पहिला अभ्यासक्रम आहे. ऑनलाइन माध्यमातून हा अभ्यासक्रम चालवला जाणार आहे. या अभ्यासक्रमामुळे नवउद्यमीची संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होऊ शकेल,' असे सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड एंटरप्राइजच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर यांनी सांगितले. अधिक माहिती ttp://iil.unipune.ac.in/applicationProcess.aspx या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

लोकसत्ता Tue, 1 https:

पुढारी

### मोबाइलद्वारे परीक्षा देण्यास लाखाहून अधिक विद्यार्थी तयार

#### अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी ऑनलाइनला पसंती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन देणार की ऑफलाइन, यासाठी विद्यार्थ्यांकडून विकल्प अर्ज भरून घेतले. यामध्ये जवळपास ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे. एकूण १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला असून, त्यापैकी सुमारे १ लाख ९ हजार विद्यार्थ्यांनी मोबाइलद्वारे परीक्षा देणार असल्याचे नमूद केल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने पदवीच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी)



मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यापीठाने १ ऑक्टोबरपासून परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून ही परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र, ऑनलाइन परीक्षेसाठी सुविधांची अडचण लक्षात घेऊन, विद्यापीठाने विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यासाठी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पर्याय निवडण्यास सांगितले होते. त्यानुसार सोमवार सायंकाळपर्यंत संकलित झालेल्या माहितीनुसार ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यातील महाविद्यालयांतील अंतिम वर्षाचे जवळपास २ लाख ४० हजार विद्यार्थी आहेत. त्यातील १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. त्यापैकी १ लाख ९ हजार विद्यार्थ्यांनी मोबाइलद्वारे परीक्षा देणार असल्याचे नमूद केले आहे. उर्वरित विद्यार्थ्यांनी लॅपटॉप, संगणक, टॅबद्वारे परीक्षा देणार असल्याचे सांगितले आहे, तर ऑफलाइन परीक्षेसाठी ३८ हजार विद्यार्थ्यांनी तयारी दर्शविली असल्याचे परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Sep 15, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

### प्रश्नसंच नाही, तर सराव प्रश्न!

#### राज्यातील विद्यापीठांकडून नियमावली स्पष्ट

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्रालयाने विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याची सूचना कुलगुरूंना दिली असली तरी विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी मात्र प्रश्नसंच नाही तर सराव प्रश्न देण्याची भूमिका घेतल्याचे दिसत आहे.

विद्यार्थ्यांना प्रश्नांचे स्वरूप कळण्यासाठी सराव प्रश्न देण्यात येणार असल्याचे विद्यापीठांनी जाहीर केलेल्या सुधारित नियमावलीत नमूद करण्यात आले आहे.

विद्यापीठांनी परीक्षांचे स्वरूप जाहीर केल्यानंतर विद्यार्थी संघटनांनी परीक्षेपूर्वी प्रश्नसंच देऊन त्यातील प्रश्न विचारण्याची मागणी केली. त्यानंतर उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्नसंच देण्याच्या सूचना विद्यापीठांच्या कुलगुरूंनी दिल्या. मुंबई विद्यापीठाने विद्यार्थ्यांना सरावासाठी प्रश्न देण्यात येतील असे सुधारित नियमावलीत स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाने परीक्षांची जबाबदारी महाविद्यालयांच्या समूहावर सोपवली आहे. प्रत्येक महाविद्यालयाला परीक्षेसाठी प्रश्नसंच तयार करण्याची सूचना देण्यात आली आहे. हे प्रश्नसंच महाविद्यालयाकडेच राहणार आहेत. त्यावर आधारित परीक्षा घेण्यात येणार आहे. मात्र, परीक्षेचे स्वरूप बदलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेचे स्वरूप लक्षात यावे यासाठी सराव प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यात येईल. या सराव प्रश्नपत्रिकेतील प्रश्नच परीक्षेत विचारण्यात येतील असे नाही. परीक्षेसाठी १३ मार्चपर्यंत शिकवण्यात आलेल्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न विचारण्यात येतील. विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी देण्यात येणारी प्रश्नपत्रिका ही फक्त सरावासाठी आणि प्रश्नांचे स्वरूप कळण्यासाठी असेल, असे एका महाविद्यालय समुहातील प्रमुख महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले.

#### महाविद्यालयांकडून परीक्षा शुल्काची मागणी



विद्यापीठाने परीक्षा महाविद्यालयांकडे सोपवल्या आहेत. दरवर्षी विद्यार्थ्यांकडून परीक्षेसाठी घेण्यात येणाऱ्या शुल्काची रक्कम महाविद्यालये विद्यापीठांना देतात. सद्यस्थितीत परीक्षांचे नियोजन, प्रश्नपत्रिका काढणे अशी सर्व कामे महाविद्यालये करत आहेत. त्यासाठी लागणाऱ्या सुविधांचा खर्चही महाविद्यालये करत आहेत. त्यामुळे विद्यापीठाला दिलेले ६० टक्के परीक्षा शुल्क महाविद्यालयांना परत दिले जावे, अशी मागणी अशासकीय महाविद्यालयांच्या संघटनेने केली आहे.

#### विद्यार्थ्यांत संभ्रम

अंतिम वर्षाच्या परीक्षा तोंडावर आल्या आहेत. या स्थितीत विद्यापीठ परिपत्रक काढते, त्यानंतर मंत्रालयाकडून वेगळी घोषणा केली जाते. पुन्हा विद्यापीठांना स्पष्टीकरण देते, असा गोंधळ सुरूच आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांत संभ्रम मात्र वाढत आहे.

लोकसत्ता Tue, 15 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54953314

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑनलाइन परीक्षेला पसंती

## ८५ टक्के विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन परीक्षा पर्यायाची निवड

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन या पर्यायातून जवळपास ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे. एकूण १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला असून, त्यापैकी सुमारे १ लाख ९ हजार विद्यार्थ्यांनी मोबाइलद्वारे परीक्षा देणार असल्याचे नमूद के ल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिली.

सर्वोच्च न्यायालयाने पदवीच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यापीठाने १ ऑक्टोबरपासून परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमातून परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र, ऑनलाइन परीक्षेसाठी सुविधांची अडचण लक्षात घेऊन विद्यापीठाने विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यासाठी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन यातून पर्याय निवडण्यास सांगितले होते. त्यासाठी १४ सप्टेंबरपर्यंतची मुदत दिली होती. त्यानुसार सोमवार सायंकाळपर्यंत संकलित झालेल्या माहितीनुसार ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यातील महाविद्यालयांतील अंतिम वर्षाचे जवळपास २ लाख ४० हजार विद्यार्थी आहेत. त्यातील १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पर्याय निवडला. त्यापैकी १ लाख ९ हजार विद्यार्थ्यांनी मोबाइलद्वारे परीक्षा देणार असल्याचे नमूद के ले आहे. उर्वरित विद्यार्थ्यांनी लॅपटॉप, संगणक, टॅब्लेटद्वारे परीक्षा देणार असल्याचे सांगितले आहे. तर ऑफलाइन परीक्षेसाठी ३८ हजार विद्यार्थ्यांनी तयारी दर्शवली आहे, अशी माहिती परीक्षा विभागाने दिली.

### ऑनलाइन परीक्षेच्या तयारीसाठी सराव चाचणीची संधी

ऑनलाइन परीक्षा अंतिम वर्ष विद्यार्थ्यांसाठी नवीन असल्याने त्यांना तयारीसाठी सुविधा दिल्या जाणार आहेत. विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना तयारीसाठी नमुना प्रश्नसंच पुढील काही दिवसांत दिला जाणार आहे. तसेच ऑनलाइन परीक्षेची तयारी होण्याच्या दृष्टीने त्यांना सराव चाचणी परीक्षेची (मॉक टेस्ट) सुविधाही उपलब्ध करून देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्या अध्यक्षतेखालील सुकाणू समितीने घेतल्याचे डॉ. काकडे यांनी स्पष्ट केले.

> करोना संसर्गाच्या काळात विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणे महत्त्वाचे आहे. ऑनलाइन परीक्षेमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य जपले जाईल. विद्यार्थ्यांचा कलही ऑनलाइन परीक्षेकडे असल्याचे दिसून येत आहे. ऑनलाइन परीक्षेमुळे विद्यार्थी घरातूनच परीक्षा देणार असल्याने पालकांमध्ये असलेली काळजी आणि संभ्रमही दूर होईल.
>
> - डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Tue, 15 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54953728

पुढारी

# बारावीचा सुधारित मूल्यमापन आराखडा मंडळाकडून जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून २०२०-२१ पासून बारावीच्या पुनर्रचित व नवीन पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यासाठीची सुधारित मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना याला शासनाने मान्यता दिली असून, त्या संदर्भातील मूल्यमापन आराखडा राज्य मंडळाकडून जाहीर करण्यात आला आहे.

इयत्ता बारावीच्या भाषेतर गटातील इतिहास, भूशास्त्र, राज्यशास्त्र, बालविकास, वस्त्रशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, पूस्तपालन व लेखाकर्म, व्यापार संघटन, चिटणिसांची कार्यपद्धती, सहकार, कृषी विज्ञान, माहिती तंत्रज्ञान-विज्ञान, कला व वाणिज्य, शिक्षणशास्त्र, पर्यावरण व जलसुरक्षा या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेची यंदा अंमलबजावणी करण्यात येणार आहे. मंडळाने निश्चित केलेल्या सुधारित मूल्यमापन योजनेसाठी येत्या काळात शिक्षकांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणात शिक्षकांना विषयनिहाय मूल्यमापन आराखडा आणि अन्य तपशिलाची माहिती देण्यात येणार असल्याचे राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी स्पष्ट केले आहे.

> बदललेल्या मूल्यमापन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी ज्ञान, आकलन, उपयोजन आणि कौशल्य यावर भर दिला आहे. वस्तुनिष्ठ प्रश्नांचे प्रमाण वाढविल्याने विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान घेता येणार आहे. परंतु त्यांना मूल्यमापन पत्रिका सोडविताना देण्यात आलेला कालावधी कमी पडणार नाही याची काळजी घेतली गेली आहे. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्यासाठी नक्कीच होणार आहे. अंतर्गत गुण असल्यामुळे मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा बोर्डाच्या लेखी परीक्षेच्या दृष्टीने संपूर्ण अभ्यास व्हावा यावर भर दिला आहे.
>
> **- प्राचार्य अविनाश ताकवले,** अभ्यासगट सदस्य

My Pune Edition
Sep 15, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

**नवभारत**

# 11वीं एडमिशन में अटका खिलाड़ियों का 5% रिजर्वेशन

संवाददाता@नवभारत

**पुणे.** नेशनल व इंटर नेशनल प्रतियोगिता में अच्छे खेल का प्रदर्शन कर गोल्ड, सिल्वर व ब्रांज मेडल जीतनेवाले खिलाड़ियों को 10 वीं की परीक्षा में ग्रेस मार्क की छूट दी जाती है. इसके साथ ही 2008 के शासन के फैसले के तहत 11वीं में एडमिशन लेनेवाले छात्रों को 5% रिजर्व कोटा घोषित किया गया है. लेकिन कोरोना के चलते लाड़ियों के रिजर्व पर आंच आएगी क्या? यह सवाल पैदा हो गया है.

## आरक्षण पर फैसला नहीं, सचिव के पास भेजा गया प्रस्ताव

शासन द्वारा 11वीं के एडमिशन के लिए आवशयक गाइड लाइन बनाई गई है. इसके तहत 26 जून 2008 के शासन के फैसले द्वारा शासन ने खेल में विशेष सफलता हासिल करनेवाले खिलाड़ियों के लिए 5% रिजर्वेशन तय किया है. इसके आधार पर एडमिशन होने की आपेक्षा है. भारतीय शालेय खेल महासंघ तथा भारतीय प्राधिकरण आयोजित विभागीय स्तर पर सफलता हासिल करनेवाले खिलाड़ियों के साथ ही राज्य तथा नेशनल लेवल पर शामिल खिलाड़ियों का इस रिजर्वेशन में समावेश है.

### खिलाड़ियों में भ्रम की स्थिति

- इस बीच इंडियन ओलंपिक एसोसिएशन व महाराष्ट्र ओलंपिक एसोसिएशन की मान्यता प्राप्त विभिन्न खेलों के एसोसिएशन द्वारा आयोजित अधिकृत राज्य स्तरीय प्रतियोगिता में मेडल जीतनेवाले तथा राज्य व राष्ट्रीय प्रतियोगिता में शामिल खिलाड़ियों को भी इस 5% रिजर्वेशन का मुनाफा होगा.
- ग्रेस मार्क के साथ 11वीं के एडमिशन के लिए भी यह रिजर्वेशन मान्यता प्राप्त है. लेकिन कोरोना के चलते संबंधित खिलाड़ियों को रिजर्वेशन मिलेगा, या नहीं इसकी किसी भी प्रकार की जानकारी अबतक सामने नहीं आई है.
- इससे खिलाड़ियों का रिजर्वेशन 11वीं के एडमिशन में अटका हुआ है, या नहीं. यह सवाल खिलाड़ियों के मन में उठ रहा है.

2008 के शासन के फैसले के आधार पर खेल में विशेष सफलता हासिल करनेवाले खिलाड़ियों को 5% रिजर्वेशन निश्चित किया गया है. इस रिजर्वेशन द्वारा खिलाड़ियों को एडमिशन मिले. यह प्रस्ताव शालेय शिक्षा विभाग के अप्पर मुख्य सचिव को भेजा गया है. खिलाड़ियों का विचार करते हुए सकारात्मक निर्णय होगा. यह आपेक्षा है.

-**ओमप्रकाश बकोरिया**,आयुक्त, क्रीड़ा व युवक सेवा संचालनालय

Pune Edition
15-september-2020 Page No. 2
epaper.enavabharat.com

**लोकमत**

गरीब मुलांना योग्य संसाधने उपलब्ध करून द्या

# ऑनलाइनसाठी राज्य सरकारे विद्यार्थ्यांना देणार स्मार्टफोन

एस.के. गुप्ता।
लोकमत न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** कोरोना महामारीच्या उद्रेकामुळे शालेय विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण घ्यावे लागत आहे. अशा स्थितीत जे विद्यार्थी स्मार्टफोन खरेदी करण्यास असमर्थ आहेत व त्यामुळे ते ऑनलाइन वर्गांना हजेरी लावू शकत नाहीत, त्यांच्यासाठी राज्य सरकारांनी स्मार्टफोन व योग्य संसाधने उपलब्ध करून द्यावीत, असे सांगण्यात आल्याचे केंद्रीय शिक्षणमंत्री रमेश पोखरियाल यांनी सांगितले आहे.

राजस्थानच्या बांसवाडाचे खा. कनकमल कटारा यांनी याबाबत लोकसभेत प्रश्न विचारला होता. या प्रश्नाच्या उत्तरात पोखरियाल म्हणाले की, गरीब विद्यार्थ्यांना डिजिटल सेवा प्रदान करण्यासाठी राज्य सरकारांनी सर्वेक्षण करून त्यांच्यापर्यंत संसाधने पोहोचवावीत, असे सांगण्यात आले आहे. डिजिटल इंडिया मोहिमेंतर्गत गरीब विद्यार्थ्यांना संसाधनयुक्त बनविण्यासाठी नवीन शिक्षण धोरणातही राज्य सरकारांची भागीदारी महत्त्वाची आहे.

**३०० प्रोग्राम विद्यार्थ्यांच्या टॅबवर केले अपलोड**

एनसीईआरटीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ‘लोकमत’ला सांगितले की, ई-पाठशाळा ॲपवर एनसीईआरटीची संपूर्ण पाठ्यसामग्री उपलब्ध आहे. सरकारच्या सांगण्यावरून मागील वर्षी एनसीईआरटीने ३०० प्रोग्राम विद्यार्थ्यांच्या टॅबवर ऑफलाइन मोडवर अपलोड केलेले आहेत.

Pune Main
Page No. 1 Sep 16, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

### विद्यार्थ्यांना क्वेश्चन बँक मिळणार का?

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठाने क्वेश्चन बँक उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी काही विद्यार्थी संघटनांकडून केली जात आहे. मात्र, विद्यापीठ प्रशासनाकडून अद्याप याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही, असे विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या सध्या अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दीर्घोत्तरी प्रश्नपत्रिकेनुसार परीक्षा देण्याची सवय आहे. तसेच महाविद्यालयात सर्व विषय शिक्षकांनी त्यानुसारच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. परंतु, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांची परीक्षा एमसीक्यू पद्धतीने घेतली जाणार असून, विद्यार्थ्यांना या परीक्षेची सवय नाही. त्यामुळे कोणत्या स्वरुपाचे प्रश्न विचारले जाऊ शकतात, याबाबतचा अंदाज विद्यार्थ्यांना यावा, यासाठी विद्यार्थ्यांना क्वेश्चन बँक उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विद्यार्थी संघटनांनी केली. विद्यापीठातर्फे विविध विषयांच्या परीक्षेसाठी बहुपर्यायी प्रश्न तयार करण्याचे काम सुरु आहे. परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना सरावासाठी दोन दिवस दिले जाणार आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांना क्वेश्चन बँक देण्याची आवश्यकता आहे का, अशी चर्चा आहे.

Pune Main
Page No. 3 Sep 16, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

**मूल्यमापन आराखडा जाहीर : चालू शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी**

### बारावीच्या परीक्षेत तोंडीऐवजी 'ॲक्टिव्हिटी शीट'वर भर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता बारावीचा मूल्यमापन आराखडा जाहीर करण्यात आला असून व्यावहारिक कौशल्याची गरज लक्षात घेऊन या आराखड्यात विषय ज्ञान, आकलन आणि उपयोजनेला अधिक महत्व दिले आहे. तसेच तोंडी परीक्षेऐवजी आता उपयोजनात्मक चाचणी घेऊन अंतर्गत मूल्यमापनाचे गुण दिले जाणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासूनच या आराखड्याची अंमलबजावणी होईल.

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम यंदा बदलला आहे. अभ्यासक्रमाबरोबरच बारावीच्या मूल्यमापन पद्धतही बदल केला आहे. कला, वाणिज्य शाखेसाठी ८०/२० तर विज्ञान शाखेसाठी ७०/३० पॅटर्न कायम ठेवला आहे. परंतु, तोंडी परीक्षा ऐवजी आता 'ॲक्टिव्हिटी शीट'च्या माध्यमातून अंतर्गत मूल्यमापनाचे गुण दिले जातील.

विद्यार्थ्यांनी घोकंपट्टी करून परीक्षेत उत्तरे लिहिण्याऐवजी वर्षभर घेतलेल्या ज्ञानाचे उपयोजन कसे करावे, यावर मूल्यमापन आराखडा तयार करताना लक्ष दिले आहे. त्याचप्रमाणे प्रश्नपत्रिकेच्या आराखड्यातही काही बदल केला आहे. यापूर्वी विचारल्या जाणाऱ्या एक, पाच आणि दहा गुणांच्या प्रश्नांऐवजी एक, दोन, तीन, चार ,पाच गुणांचे प्रश्न सुद्धा विचारले जाणार आहेत. त्यामुळे यापुढील काळात प्रश्नपत्रिकेत वस्तुनिष्ठ स्वरुपातील प्रश्नांचे प्रमाण सुमारे २५ टक्क्यांपर्यंत असणार आहे.

बारावीच्या इतिहास, भूशास्त्र, राज्यशास्त्र, बालविकास, वस्त्रशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, पुस्तपालन व लेखाकर्म, व्यापार संघटन, चिटणीसाची कार्यपद्धती, सहकार, कृषीविज्ञान, माहिती तंत्रज्ञान-विज्ञान, कला व वाणिज्य, शिक्षणशास्त्र, पर्यावरण व जलसुरक्षा या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षापासून सुरु केले जाणार आहे.

सुधारित मूल्यमापनाबाबत राज्य मंडळामार्फत विषयनिहाय ऑनलाइन पद्धतीने शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यात विषय शिक्षकांना विषयनिहाय मूल्यमापन आराखडे व अन्य तपशील अवगत करून दिला जाणार आहे.

> बदलेल्या मूल्यमापन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी ज्ञान, आकलन, उपयोजन आणि कौशल्य यावर भर दिला आहे. वस्तुनिष्ठ प्रश्नांचे प्रमाण वाढविल्याने विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापनासाठी 'ॲक्टिव्हिटी शीट' सोडविण्यास दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या परीक्षेच्या दृष्टीने संपूर्ण अभ्यास करावा व त्यांची अभ्यासक्रम आकलनशक्ती वाढावी यावर भर आहे.
>
> \- **अविनाश ताकवले,** अभ्यासगट सदस्य, बालभारती, पुणे

> एखादा विषय कळणे ,समजणे यापलीकडे जावून आता विद्यार्थ्यांना मिळालेल्या ज्ञानाचे उपयोजन करता आले पाहिजे. त्यादृष्टीने मूल्यमापनात आमूलाग्र बदल करण्यात आला आहे. वाणिज्य शाखेतील काही विषयांसाठी विद्यार्थ्यांना 'केस स्टडी' देवून त्यावर प्रश्न विचारले जातील. तसेच विद्यार्थ्यांच्या विचार करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळावी यासाठी आता १ ते ५ गुणांचे प्रश्न विचारले जातील.
>
> \- **ज्योती गायकवाड,** सदस्य, अभ्यासगट, बालभारती, पुणे

> विद्यार्थी परीक्षार्थी न बनता ज्ञानार्थी बनवा हा विचार करुन इयत्ता बारावीचा मूल्यमापन आराखडा तयार करण्यात आला आहे. व्यावहारिक कौशल्यातील शिक्षणाची गरज लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी ज्ञानाचे उपयोजन करावे,यावर त्यात भर दिला आहे. तसेच वस्तुनिष्ठ प्रश्नांमध्ये वैविध्यता आणली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या समयसूचकतेत वाढ होईल. तसेच बदललेला आराखडा विद्यार्थ्यांची व्यावहारिक कौशल्याची गरज भरुन काढण्यासाठी आधार देईल.
>
> \- **डॉ. रूपसेन कांबळे,** अभ्यासगट सदस्य, बालभारती, पुणे

Pune Main
Page No. 4 Sep 16, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

### मराठा आरक्षण स्थगिती : विद्यार्थी, महाविद्यालयासमोर नवा पेच

# प्रवेश प्रक्रियेबाबत संभ्रम कायम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्याने इयत्ता अकरावी व महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेवर परिणाम झाला आहे. प्रवेश प्रक्रिया पुन्हा राबविण्याची वेळ आल्यास मोठा गोंधळ निर्माण होऊ शकतो. त्यामुळे राज्य शासनाने न्यायालयात याबाबत भूमिका मांडणे गरजेचे आहे, असे मत काही माजी कुलगुरु व शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्याने सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून (एसईबीसी) प्रवेश मिळण्याचा मार्ग बंद झाला. त्यामुळे राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. तसेच राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायासह शासनाकडून प्राप्त झालेले परिपत्रक प्रसिद्ध केले. तसेच या पत्रकानुसार सर्व महाविद्यालयांनी एसईबीसी आरक्षणासह प्रवेश प्रक्रिया राबविली असल्यास एसईबीसी आरक्षणाशिवाय पुन्हा नव्याने प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या सूचना विद्यापीठ व महाविद्यालयांना दिल्या. परंतु, त्यामुळे मोठा गोंधळ निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन उच्च शिक्षण विभागाने हे परिपत्रक तत्काळ मागे घेतले. मात्र, परिपत्रक मागे घेतल्यामुळे प्रवेश प्रक्रियाचा प्रश्न सुटलेला नाही.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली आहे. ती पुन्हा राबविण्याची आवश्यकता नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये यापूर्वी प्रवेश प्रक्रिया कायम ठेवून यापुढील प्रक्रियेसाठी स्थगितीबाबत न्यायालयाकडे विनंती केल्यास विद्यार्थी व महाविद्यालयांना दिलासा मिळू शकतो, असे माजी कुलगुरुंनी सांगितले.

#### न्यायालयीन आदेशाचा प्रवेश प्रक्रियेवर परिणाम

- पुण्यासह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये इयत्ता अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात आलेल्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अंतर्गत प्रवेशाची पहिली फेरी पूर्ण करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशामुळे या फेरीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो का? याबाबत पालकांच्या मनात गोंधळाचे वातावरण आहे.



- तसेच प्रवेश प्रक्रिया राबविण्यात मंत्रालय स्तरावर येत्या दोन-तीन दिवसांत निर्णय होण्याची शक्यता आहे, असे शालेय शिक्षण विभागाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षण अधिकाऱ्यांमध्येही संभ्रमाचे वातावरण आहे.

Hello Pune
Page No. 2 Sep 16, 2020
Powered by: erelego.com

# परीक्षेसाठी ४०:४०:२०चा फॉर्म्युला

## आराखडा जाहीर; सोपे अधिक, अवघड प्रश्न कमी विचारणार

**पुणे, ता. १५ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेचा आराखडा जाहीर केला आहे. विद्यार्थ्यांना ही परीक्षा अवघड जाऊ नये, यासाठी ६० प्रश्नांपैकी ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम, तर उर्वरित २० टक्के प्रश्न अवघड असणार आहेत. तर, 'एमसीक्यू' प्रश्न उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत असताना अंतिम परीक्षेतील नमुना प्रश्नांवर आधारित सराव परीक्षा मुख्य परीक्षेच्या आधी दोन वेळा घेतली जाणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.**

**>>अंतिम वर्ष परीक्षा**

पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाची परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉईस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे. यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइनचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. अंतिम वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांचे विषय बॅकलॉग राहिले आहेत त्यांची परीक्षा १ ऑक्टोबर पासून सुरू होईल, तर नियमित परीक्षा १० ऑक्टोबरला सुरू होणार आहे. ही परीक्षा एका तासाची आणि ५० गुणांची असेल. विद्यार्थ्यांना ६० प्रश्न दिले जाणार असून, ५०अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार आहेत. 'एमसीक्यू' परीक्षेमुळे कमी गुण मिळतील किंवा अनुत्तीर्ण होईल अशी भीती विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली जात होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा सोपी जावी यासाठी ४० टक्के सोपे प्रश्न, ४०टक्के अवघड आणि २० टक्के कठीण प्रश्न असणार आहेत.

ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना इ-मेल व मोबाईलद्वारे सर्व माहिती दिली जाणार आहे. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या परीक्षा केंद्रावर सुरक्षेचे सर्व नियम पाळून, ऑप्टिकल मार्क रेकग्नायझेशन (ओएमआर) शीट उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यावरून त्यांना 'एमसीक्यू' प्रश्न सोडवायचे आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.

**छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकन नाही**

परीक्षेचा निकाल लागल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना समाधानकारक गुण मिळत नाहीत, त्यामुळे ते विद्यापीठाकडे उत्तरपत्रिकेची छायांकित व पुनर्मूल्यांकनाची प्रतची मागणी करतात. त्यामध्ये अनेकांना फायदा होतो. मात्र, यावेळी 'एमसीक्यू' परीक्षा असल्याने ऑफलाइन व ऑनलाइन परीक्षेतील उत्तरपत्रीकेची छायांकित प्रत मिळणार नाही. तसेच पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येणार नसल्याचे विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे.

#### असे असेल परीक्षेचे स्वरूप

- जे विद्यार्थी ऑफलाइन, ऑनलाइन परीक्षा देऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी नंतर स्वतंत्र परीक्षा
- अंतिम वर्षाच्या किंवा सत्राच्या परीक्षांसाठी १३ मार्चपर्यंत शिकवलेल्या अभ्यासक्रमावर परीक्षा
- अंतिम पूर्व वर्षाच्या किंवा सत्राच्या परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी २० मिनिटे जास्तीचा वेळ दिला जाईल
- नेटवर्कचा अडथळा आल्यास तेवढा वेळ वाढवून मिळणार
- सोडवलेले प्रश्न सेव्ह असतील, त्यामुळे ते पुन्हा सोडविण्याची गरज नाही
- अडचणी सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय अभ्यासक्रमनिहाय समन्वयक
- वेळापत्रक www.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध होईल

**Sakaal: 16.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# बारावीचा मूल्यमापन आराखडा जाहीर

### अंमलबजावणीसाठी शिक्षकांना ऑनलाइन प्रशिक्षण

**पुणे, ता. १५ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीची सुधारित मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना याला राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यासंदर्भातील मूल्यमापन आराखडा राज्य मंडळाकडून जाहीर करण्यात आला आहे.

राज्य मंडळाकडून बारावीच्या पुनर्रचित व नवीन पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या नव्या पाठ्यपुस्तकाप्रमाणे हा मूल्यमापन आराखडा राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर केला आहे.

बारावीच्या इतिहास, भूशास्त्र, राज्यशास्त्र, बालविकास, वस्त्रशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, व्यापार संघटन, चिटणीसांची कार्यपद्धती, सहकार, कृषिविज्ञान, माहिती तंत्रज्ञान-विज्ञान, कला व वाणिज्य, शिक्षणशास्त्र, पर्यावरण व जलसूरक्षा या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२०- २१ पासून सुरू करण्यात आली आहे. मंडळाने निश्चित केलेल्या सुधारित मूल्यमापन योजनेसाठी येत्या काळात शिक्षकांना ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली.

**बदललेल्या मूल्यमापन पद्धतीमध्ये...**

- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी ज्ञान, आकलन, उपयोजन आणि कौशल्य यावर भर.
- वस्तुनिष्ठ प्रश्नांचे प्रमाण वाढविल्याने विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान.
- मूल्यमापन पत्रिका सोडविताना दिलेला कालावधी कमी पडणार नाही याची काळजी.
- अंतर्गत गुण असल्यामुळे या मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा राज्य मंडळाच्या लेखी परीक्षेच्या दृष्टीने संपूर्ण अभ्यास व्हावा व त्यांचा अभ्यासक्रम आकलनशक्ती वाढावी यावर भर

– **अविनाश ताकवले**, सदस्य, राज्य मंडळाचा अभ्यासगट

**Sakaal: 16.9.2020**

# दहावी आणि बारावीच्या फेरपरीक्षा परिस्थितीनुसार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा परिस्थिती पाहून घेतली जाणार आहे. नोव्हेंबर डिसेंबरच्या सुमारास फेरपरीक्षा होऊ शकेल. मात्र, या विद्यार्थ्यांच्या अकरावी प्रवेशाचे काय, हा प्रश्न मात्र अनुत्तरीत आहे.

राज्य मंडळाकडून दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर केल्यानंतर महिन्याभरात फेरपरीक्षा घेतली जाते. त्यात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी संधी मिळते. मात्र करोना संसर्गामुळे यंदा फेरपरीक्षा घेण्यात आलेली नाही. तसेच फेरपरीक्षा कधी होणार याबाबत अद्याप निर्णयही झालेला नाही.

राज्य मंडळाच्या अध्यक्षा शकुंतला काळे म्हणाल्या, 'शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितल्यानुसार संसर्गाची परिस्थिती पाहून फेरपरीक्षा घेण्यात येईल. नोव्हेंबर-डिसेंबरच्या सुमारास परीक्षा होऊ शकेल. सद्यस्थितीत परीक्षा घेण्यात अनेक अडचणी आहेत. प्रशासनाने अनेक शाळा विलगीकरण कक्षासाठी घेतल्या आहेत. परस्पर अंतर राखून परीक्षा घेण्यासाठी परीक्षा कक्ष वाढवावे लागतील, त्यासाठी मनुष्यबळही वाढवावे लागेल. मात्र, त्याआधी शाळा उपलब्ध व्हाव्या लागतील. त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन परीक्षा घेण्यात येईल.'

दरम्यान, फेरपरीक्षा नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये घेतली जाणार असल्यास एटीकेटी मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या अकरावी प्रवेशाचे काय, हे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार का असा प्रश्न आहे.

लोकसत्ता Wed, 16 September 2020 https://epaper.loksatta.com/c/54

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ८५ टक्के विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन परीक्षा पर्यायाची निवड

पुणे, दि. १५(प्रतिनिधी ) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे. एकूण एक लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला असून, त्यांपैकी सुमारे एक लाख नऊ हजार विद्यार्थ्यांनी मोबाईलद्वारे परीक्षा देणार असल्याचे नमूद केल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिली.

पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यांतील महाविद्यालयांमधील अंतिम वर्षाचे जवळपास दोन लाख ४० हजार विद्यार्थी आहेत. त्यांतील एक लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला. त्यांपैकी एक लाख नऊ हजार विद्यार्थ्यांनी मोबाईलद्वारे परीक्षा देणार असल्याचे नमूद केले आहे. उर्वरित विद्यार्थ्यांनी लॅपटॉप, संगणक, टॅब्लेटद्वारे परीक्षा देणार असल्याचे सांगितले आहे, तर ऑफलाइनसाठी ३८ हजार विद्यार्थ्यांनी तयारी दर्शविली आहे.

अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सराव चाचणी परीक्षेची सुविधाही उपलब्ध करून देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्या अध्यक्षतेखालील सुकाणू समितीने घेतला, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थी घरातूनच परीक्षा देणार असल्याने पालकांची काळजी दूर होईल, असे डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

**Saamana: 16.9.2020**

प्रभात पुणे, बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२० ५

# अंतिम वर्षाचा पेपर ४० टक्के सोपा

## ऑफलाइन परीक्षा 'ओएमआर शीट'पद्धतीने : मुख्य परीक्षेपूर्वी दोन सराव परीक्षा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवीच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांसाठी परीक्षेबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना प्रसिद्ध केली आहे. परीक्षा बहुपर्यायी प्रश्नाद्वारे (एमसीक्यू) होणार असून, यात ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम व २० टक्के कठीण या काठिण्यपातळीचे प्रश्न असतील. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑप्टिकल मार्क रिकग्निशन (ओएमआर) पद्धतीने होणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले.

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून मार्गदर्शक तत्त्वे व सूचना प्रसिद्ध
- ऑनलाइन परीक्षेत फोटोकॉपी आणि पुनर्मूल्यांकनची सुविधा नाही

विद्यापीठाने अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही पद्धतीने होतील. एकूण ५० गुणांची परीक्षा असून, त्यासाठी एक तासाचा कालावधी राहील. त्यासाठी ६० प्रश्नांपैकी ५०ची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील. तसेच, ज्या अभ्यासक्रमांचे प्रात्यक्षिक, मौखिकची परीक्षा होऊ शकली नाहीत. त्यांनी सर्व परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घ्यावेत. त्यासंबंधीचे संपूर्ण रेकॉर्डिंग महाविद्यालयांमध्ये जतन करून ठेवणे आवश्यक आहे. तसेच बॅकलॉग आणि अंतिम वर्षातील नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

दरम्यान, ऑनलाइन परीक्षा होत असली तरी त्यात विद्यार्थ्यांना फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनची सुविधा उपलब्ध नसेल. ऑनलाइन परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी अंतिम परीक्षेमधील नमुना प्रश्नांवर आधारित सराव परीक्षांचे आयोजन मुख्य परीक्षेपूर्वी दोन वेळा करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा १३ मार्च २०२० पर्यंत झालेल्या अभ्यासक्रमांवर आधारित राहील.



### ऑफलाइन विद्यार्थ्यांना जवळचे परीक्षा केंद्र

ऑफलाइनचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा 'ओएमआर शिट'चा वापर करून होणार आहे. ऑफलाइन विद्यार्थ्यांची परीक्षा सुरक्षित अंतर, विद्यार्थ्यांची सुरक्षा राखून महाविद्यालयात घेण्यात येतील. विद्यार्थ्यांना नजीकचे महाविद्यालय अथवा स्वतःचे महाविद्यालय हे परीक्षा केंद्र म्हणून निवडता येणार आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ मिळेल.

### परीक्षेचे नियोजन

- बॅकलॉग विद्यार्थ्यांची परीक्षा : १ ते ९ ऑक्टोबर
- अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा : १० ते ३० ऑक्टोबर
- प्रात्यक्षिक परीक्षा : १५ ते २५ सप्टेंबर

### विद्यापीठाच्या सूचना

- विद्यार्थ्यांना ई-मेल व एसएमएसद्वारे मिळणार परीक्षेची माहिती.
- ई-मेल आयडी व मोबाइल क्रमांक अद्ययावत ठेवा.
- जे परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्या परीक्षा नंतर होतील.
- परीक्षा देताना तांत्रिक कारणाने खंड पडल्यास, वेळ वाढवून मिळणार.
- शंकाचे निरसन करण्यासाठी विद्यापीठाला ई-मेल करा.
- अडचणींचे निवारण करण्यासाठी समन्वयकांची नियुक्ती.

**Prabhat: 16.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

**नवभारत**

फाइनल ईयर की परीक्षा के लिए ऑनलाइन पसंदगी

### मोबाइल द्वारा परीक्षा देने के लिए लाखों छात्र तैयार

संवाददाता@नवभारत

**पुणे.** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वारा फाइनल ईयर की परीक्षा ऑनलाइन की, ऑफलाइन हो इस के लिए छात्रों द्वारा विकल्प अर्जी भरवाई गई थी. इसमें कुल 85% छात्रों ने ऑनलाइन परीक्षा को पसंदगी जताई है. कुल 1 लाख 85 हजार छात्रों ने ऑनलाइन परीक्षा का ऑप्शन चुना है. इसमें 1 लाख 9 हजार छात्रों ने मोबाइल द्वारा परीक्षा देने का दर्ज किया है. यह जानकारी विद्यापीठ परीक्षा विभाग द्वारा दी गई है.

#### हाइकोर्ट ने दिए हैं परीक्षा लेने के निर्देश



हाइकोर्ट द्वारा डिग्री की फाइनल ईयर के छात्रों की परीक्षा लेने के निर्देश दिये है. इस द्वारा विद्यापीठ अनुदान आयोग के (यूजीसी) मार्गदर्शक तत्वों द्वारा विद्यापीठ ने 1 अक्टूबर से परीक्षा लेने का फैसला किया है. ऑनलाइन व ऑफलाइन इन दोनों माध्यमों द्वारा यह परीक्षा आयोजित की जाएगी. लेकिन ऑनलाइन परीक्षा के लिए सुविधाओं के दक्कतों को सामने रखते हुए विद्यापीठ ने छात्रों की जानकारी इकट्ठा करने के लिए छात्रों को परीक्षा के लिए ऑप्शन चुने के लिए कहा गया था. इस द्वारा प्राप्त जानकारी के आधार पर 85% छात्रों ने ऑनलाइन परीक्षा को पसंदगी दी है.

#### 85 प्रतिशत छात्रों ने ऑनलाइन ऑप्शन चुना

विद्यापीठ के कार्यक्षेत्र के पुणे, अहमदनगर व नासिक इन जिलों के कॉलेज के फाइनल ईयर के लगभग 2 लाख 40 हजार छात्र है. इसमें से 1 लाख 85 हजार छात्र ने ऑनलाइन परिक्षा का ऑप्शन चुना है. इसमें से 1 लाख 9 हजार छात्रों ने मोबाइल द्वारा परिक्षा देने की इच्छा व्यक्त की है. अन्य छात्रों ने लॉपटॉप, कप्यूटर व टैब द्वारा परिक्षा देने का लिखा है. साथ में ऑफलाइन परिक्षा के लिए 38 हजार छात्रों ने तैयारी दर्शाई है.

Pune Edition
16-september-2020 Page No. 2
epaper.enavabharat.com

**पुढारी**

### कोरोना काळात उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नेहमीसारखेच पदवी प्रमाणपत्र मिळणार

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत : बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने परीक्षा

**नागपूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना संकट काळात परीक्षा देऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना नेहमीसारखेच पदवी प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यात कोणताही बदल करण्यात येणार नसल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी नागपुरात दिली आहे. कोरोना संकट काळात पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकडे कोणीही वेगळ्या किंवा नकारात्मक दृष्टिकोनातून पाहू नये, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची परीक्षा प्रक्रिया नोव्हेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येतील. अंतिम वर्षाच्या पदवी परीक्षा बहुपर्यायी उत्तरांचे वस्तुनिष्ठ प्रश्न (एमसीक्यू) पद्धतीने होणार असल्याची माहितीही मंत्री सामंत यांनी दिली. विद्यापीठ परिसरातील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनात परीक्षांच्या संदर्भात आढावा घेताना ते बोलत होते. कोणताही ताण न घेता परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचे निरसन करण्यासाठी कुलगुरू व परीक्षा संचालकांनी फेसबुक लाईव्ह करण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

सामंत म्हणाले, राज्यातील कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे शक्य नाही, असा पवित्रा राज्य सरकारने घेतला होता. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्याच लागतील, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सोप्या पद्धतीने परीक्षा घेतल्या जाणार असून त्यासाठी नियोजनही केले आहे. कोरोना संकट काळात पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पदवीकडे कोणीही वेगळ्या किंवा नकारात्मक दृष्टिकोनातून पाहू नये. जर कोणत्याही उद्योग समूहाने किंवा कंपनीने कोरोना वर्षात पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी देताना ते कोरोना वर्षातील उत्तीर्ण असल्याने निवडीच्या प्रक्रियेत भेदाभेद केले, तर राज्य शासनाच्या वतीने त्या उद्योग, व्यवसायांवर कारवाई करण्यात येईल. नियोजनानुसार विद्यार्थ्यांनी बिनधास्त परीक्षा द्यावी.

#### नापास विद्यार्थ्यांचीही परीक्षा प्रक्रिया नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश

ऑनलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांची जास्त वेळ न दवडता एक ते दीड महिन्यात लगेच परीक्षा घेण्याची व्यवस्था करण्याचे निर्देशही त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला दिले. परीक्षा घेणे, नापास विद्यार्थ्यांची पुन्हा १५ दिवसांत परीक्षा घेणे ही सर्व प्रक्रिया नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

Pune Edition
Sep 16, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# विद्यापीठ अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन, ऑफलाइनही

## एमसीक्यू पद्धतीने तासाची ५० गुणांची परीक्षा

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची परीक्षा नेमकी कशी होणार या वादावर अखेर पडदा पडला असून, परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने होणार आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून जाहीर करण्यात आले आहे. त्यासाठीच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत.

विद्यापीठाने परीक्षा कशी घ्यावी यासाठी उपलब्ध करून दिलेल्या विकल्प अर्जांमध्ये ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पर्याय निवडला आहे. नव्या सूचनांनुसार प्रात्यक्षिक परीक्षा येत्या २५ सप्टेंबरपर्यंत गुगल मीट, झूम, मायक्रोसॉफ्ट टीम्स, वेबेक्स, दूरध्वनी अशा कोणत्याही पद्धतीने ऑनलाइन माध्यमातून घ्यायची आहे. ही परीक्षा ठरलेल्या आराखड्यानुसार घेण्यात यावी; तसेच परीक्षेचे रेकॉर्डिंग जतन करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

परीक्षा झाल्यानंतर विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध असणाऱ्या लिंकद्वारे ५ ऑक्टोबरपर्यंत गुणांची नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांच्या परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत होतील. तर, नियमित विषयांसाठीच्या परीक्षा १० ते ३० ऑक्टोबरदरम्यान होणार आहेत. या दोन्ही परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या वेबसाइटवर जाहीर होणार आहे.

ऑनलाइनपरीक्षेचापर्यायनिवडणाऱ्या विद्यार्थ्यांना ओएमआर शीटचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारच्या सूचनेप्रमाणे सुरक्षित अंतराचा वापर करून महाविद्यालयांमध्ये परीक्षा देता येणार आहे.



### लेखी परीक्षा ५० गुणांची

लेखी परीक्षेसाठी एमसीक्यू पद्धतीने एक तास कालावधीची ५० गुणांची परीक्षा असेल. त्यामध्ये ६० प्रश्नांपैकी ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार असून, प्रत्येकी ४० टक्के सोपे, मध्यम स्वरूपाचे, तर २० टक्के कठीण प्रश्न राहणार असल्याचे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे.

### परीक्षा अशी होईल

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | २ लाख ५९ हजार ४०२ |
| अर्ज भरले | २ लाख २३ हजार १८ |
| ऑनलाइन | १ लाख ८५ हजार १७७ |

### अशी होईल ऑनलाइन

| | |
|---|---|
| मोबाईल | १ लाख ११ हजार १५ |
| लॅपटॉप | ७० हजार २५९ |
| संगणक | २ हजार ५८९ |
| टॅब्लेट | १ हजार ३१४ |
| ऑफलाइन | ३७ हजारांहून अधिक |
| पर्यायाशिवायचे विद्यार्थी- | १८ हजार |



ज्यांनी कोणताच पर्याय निवडलेला नाही, त्यांचा महाविद्यालयांच्या माध्यमातून पाठपुरावा केला जाईल. त्यांचे परीक्षेसाठीचे पर्याय भरून घेतले जातील. त्यामुळे किमान ४० ते ४५ हजार विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन परीक्षा घ्यावी लागणार आहे.

My Pune Edition
Sep 16, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# परीक्षेच्या तयारीला लागा!

## अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबतच्या सूचना प्रसिद्ध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षांचे आयोजन करण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या असून, त्यानुसार विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, मौखिक परीक्षा, प्रकल्प, चर्चासत्र आदी ऑनलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात. लेखी परीक्षेसाठी 'एमसीक्यू' पद्धतीने एक तास कालावधीची ५० गुणांची परीक्षा असणार आहे. त्यामध्ये ६० प्रश्नांपैकी ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार असून,

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

प्रत्येकी ४० टक्के सोपे, मध्यम स्वरूपाचे; तर २० टक्के कठीण प्रश्न असतील, असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे. कोणत्या कारणास्तव विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही, तर पुन्हा संधी देण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीने 'ऑनलाइन' आणि 'ऑफलाइन' अशा दोन्ही स्वरूपात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांना 'ऑनलाइन' आणि 'ऑफलाइन' अशा दोन्ही पर्यायांसाठी विचारणा केली होती. त्यात साधारण ८५ टक्के विद्यार्थ्यांनी 'ऑनलाइन' पर्याय निवडला आहे. आता विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून परीक्षेचे नियोजन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना आणि माहिती प्रसिद्ध केली आहे. नव्या सूचनांनुसार प्रात्यक्षिक परीक्षा येत्या २५ सप्टेंबरपर्यंत गुगल मीट, झूम, मायक्रोसॉफ्ट टीम्स, वेबेक्स, दूरध्वनी अशा कोणत्याही पद्धतीने ऑनलाइन माध्यमातून घ्यायची आहे. ही परीक्षा ठरलेल्या गुणांच्या आराखड्यानुसार घेण्यात यावी; तसेच परीक्षेचे रेकॉर्डिंग जतन करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा झाल्यानंतर विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध असणाऱ्या लिंकद्वारे ५ ऑक्टोबरपर्यंत गुणांची नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

### बॅकलॉग परीक्षा एक ऑक्टोबरपासून



अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांच्या परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत होतील, तर नियमित विषयांसाठीच्या परीक्षा १० ते ३० ऑक्टोबरदरम्यान विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पर्यायानुसार 'ऑनलाइन' किंवा 'ऑफलाइन' पद्धतीने होणार आहेत. या दोन्ही परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीने होणार असून, त्याचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या वेबसाइटवर जाहीर होणार आहे. ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना 'ओएमआर' शीटचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारच्या सूचनेप्रमाणे सुरक्षित अंतराचा वापर करून कॉलेजांमध्ये घेण्यात येणार आहे.

### 'शंका निरसनासाठी मेल करा'

परीक्षांच्या आयोजनापूर्वी येणाऱ्या अडचणी आणि शंकांचे निराकरण करण्यासाठी covid19helpdesk@pun.unipune.ac.in या मेल आयडीवर स्क्रीनशॉटसह ई-मेल करण्यात यावा; तसेच प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी जिल्हास्तरीय अभ्यासक्रमनिहाय समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्याचा तपशील स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या वेबसाइटवर जाहीर करण्यात येणार आहे.

### परीक्षेसाठी नियम...

- ऑफलाइन परीक्षेसाठी यापूर्वी वितरित करण्यात आलेले प्रवेशपत्र ग्राह्य धरण्यात येईल. विद्यार्थ्यांना जवळचे कॉलेज परीक्षा केंद्र म्हणून निवडता येईल.
- कोणत्याही कारणास्तव जे विद्यार्थी अंतिम सत्र/अंतिम वर्षाची नियमित किंवा बॅकलॉग विषयांची परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांची परीक्षा आणि वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल.
- ऑनलाइन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला सॉफ्टवेअरमार्फत आपोआप वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे आपोआप 'सेव्ह' होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा सुरू होईल.
- अंतिम परीक्षेतील नमुना प्रश्नांवर आधारित सराव परीक्षांचे आयोजन मुख्य परीक्षेपूर्वी दोन वेळा करण्यात येईल.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना सरकारी निर्णयाप्रमाणे सोयी आणि सवलती देय राहतील; तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. या विद्यार्थ्यांना महाविद्यालये/ प्राचार्य यांच्या पूर्वपरवानगीने लेखनिक/ सहायक घेता येईल.
- अंतिम वर्ष/ अंतिम सत्राच्या नियमित, पुनःपरीक्षार्थी आणि बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या समसत्राच्या परीक्षा दिनांक १३ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर होतील. अंतिम पूर्व वर्षाच्या/ सत्राच्या पुनःपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा या संपूर्ण १०० टक्के अभ्यासक्रमावर होतील. या परीक्षा 'एमसीक्यू' स्वरूपात आयोजित करण्यात येतील.

Maharashtra Times: 16.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# 83% final year students opt for online mode of exams

## Over 60,000 Pupils To Attempt Pen & Paper Test

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** As many as 2.23 lakh out of the 2.49 lakh filled up the option form uploaded by the Savitribai Phule Pune University (SPPU) confirming if they want to opt for online or offline mode of examination.

An overwhelming majority of 1.85 lakh students opted for online examinations, leaving only 37,841 students for offline examinations. Among physically-disabled students, 468 opted for online exams while remaining 167 chose to attempt the exams offline. Students, who have not participated in the process, would be considered for offline examinations to be conducted using Optical Mark Recognition (OMR) sheets by default.

Mahesh Kakade, director of the Board of Examination and Evaluation at SPPU, said, "It is good to see that the maximum number of students have replied to the option-form and a majority have opted for the online process of examination."

The option-form mentioned that students could appear for the exam from any place of convenience but they need to have a working front camera on the computer that is switched on throughout the duration of the examination.

Kakade further said that the varsity recognized the possibility of some students being unable to appear for both online and offline examination during the prescribed time frame. "For such students, we will again provide an opportunity to appear for the exams when class improvement and other such examinations are held at a later stage, maybe around December. Meanwhile, students who have not filled up the option form will be considered for the offline mode of examination by default. Another chance will not be given to fill up the form, as the university also needs time to prepare for the conduct of exam," said Kakade.

The data of about 6,000 students studying at the university departments is yet to be included in these figures. "For university students, the form-filling exercise opened up on September 14 while the last date is September 17. Since the university already has our data and our previous mark sheet, we have just one question to answer — whether we want to choose online or offline mode of examination," said Kamalakar Shete, a final year student of Commerce.

### DATA BRINGS CLARITY

File photo



**2,49,052** students are eligible for the final year exams

**2,23,018** students filled up SPPU's option form

**1,85,177** students have opted for online exams

**37,841** students have chosen Optical Mark Recognition/offline exams

**468** physically-challenged students have opted for online exams

**167** physically-challenged students have chosen the offline option

**1,11,015** students have access to a mobile phone

**70,259** students have access to a laptop

**2,589** students have access to a desktop

**1,314** students have access to a tablet

**Students must have an internet data pack of at least 500 MB, per examination of one-hour duration, to complete the online examination. Once logged in, a student must complete the test in one hour**

### MOCK TESTS IN THE OFFING

The examination department at SPPU would be conducting mock tests for students to get a hang of the exam pattern. Students can see in the online option form that they must remember their login ID and password to access mock tests. "For others, we would give OMR sheets to colleges and they will conduct the mock tests so that no student is left untrained," said Kakade.

The Times of India: 16.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

## विद्यापीठ परीक्षेतील बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेबाबत पुनर्विचार व्हावा

**– उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे**

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) - विद्यापीठाच्या परीक्षा घेताना बहुपर्यायी प्रश्नपत्रिका देण्यात येणार आहेत. पारंपरिकरीत्या विद्यार्थांना वर्णनात्मक उत्तरे लिहिण्याची सवय आहे. परिणामी बहुपर्यायी प्रश्नपत्रिका परीक्षेत विद्यार्थ्यांचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे. याबरोबरच ऑनलाइन परीक्षा देताना काही तांत्रिक बिघाड झाल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याबाबत पुनर्विचार व्हावा, असे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे मंत्री उदय सामंत यांना निर्देशित केले.

ऑनलाइन परीक्षा देणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन परीक्षेची परवानगी दिली आहे. यात ऑनलाइन पेपर आधी माहीत झाल्याने ऑफलाईन परीक्षार्थींना प्रश्न आधीच माहिती पडण्याची शक्यता जाणवते. राज्यातील विद्यापीठांत कार्यक्रमांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार यांना मोठ्या प्रमाणात सहभागी करण्याचे कुलगुरूंना सूचित करावे. काही विद्यापीठे स्वायत्ततेच्या आधारे कोणताही संवाद, विचारविनिमय न करता विविध घोषणा, परीक्षाविषयक नियम घोषित करत आहेत त्यात सुसूत्रीकरण व मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर विचार करून आराखडे देण्यास सर्व विद्यापीठांना सुचवावे. परीक्षांचे सुसूत्रीकरण आपल्या विभागाने करावे, असे डॉ. गोऱ्हे यांनी सामंत यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

**Saamana: 17.9.2020**

**लोकमत**

## अंतिम वर्षाच्या परीक्षांना ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

### राज्याच्या विनंतीला यूजीसीचा हिरवा कंदील

**मुंबई :** राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने केलेल्या विनंतीला यूजीसीने अखेर हिरवा कंदिल दाखवला आहे. त्यानुसार, राज्याच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा व निकालांचे आयोजन ३० ऑक्टोबरपर्यंत करण्यास राज्याला परवानगी मिळाली आहे. १० सप्टेंबर रोजी उच्च व तंत्र शिक्षण अतिरिक्त मुख्य सचिवांकडून यूजीसीला राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत सप्टेंबरअखेर परीक्षा घेणे शक्य नसल्याचा निर्णय घेत, मुदतवाढ मागितली होती. यूजीसीने विद्यार्थ्यांच्या हिताचा आणि सुरक्षेचा विचार करून मुदतवाढ दिली.

अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात ६ जुलै रोजी यूजीसीने सुधारित मार्गदर्शक सूचना जाहीर केल्यानंतर अनेक राज्यांनी कोविड काळात परीक्षा घेण्यास असमर्थता दर्शविली. पुढे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर २८ ऑगस्टच्या निर्णयानुसार यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यावर शिक्कामोर्तब झाले. राज्यांना तेथील भौगोलिक आणि कोविड संसर्गाचा विचार करून परीक्षा कधी आणि कशा घ्याव्यात या संदर्भात यूजीसीशी संवाद साधण्याची मुभाही दिली. राज्ये यूजीसीकडे मुदतवाढ मागू शकतात असा पर्याय सर्वोच्च न्यायालयाने दिला. याचाच आधार घेत राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने यूजीसीकडे ३० ऑक्टोबरपर्यंतची मुदतवाढ मागून घेतली.

यूजीसीने या परीक्षांच्या मुदतवाढीसोबतच परीक्षांचे मूल्यमापन आणि निकालाच्या सर्व बाबी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण कराव्यात अशी विनंती केली आहे. पदव्युत्तर किंवा पीएचडीसारख्या प्रवेशांना विलंब होऊ नये आणि त्या वेळेत पूर्ण व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यामुळे ऑनलाइन पद्धतीने अंतिम वर्षाच्या तयारीला लागलेल्या विद्यापीठांना दिलासा मिळाला आहे.

### विद्यापीठांनी खबरदारी घेणे अपेक्षित

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि आरोग्य ही राज्याप्रमाणेच यूजीसीचीही प्राथमिकता आहे. मुदतवाढीचा उपयोग करुन परीक्षांचे नियोजन सुरक्षित वातावरणात केले जावे आणि विद्यार्थ्यांना कोणताही मानसिक तणाव येऊ नये याची खबरदारी विद्यापीठांनी घेणे अपेक्षित आहे.

**- भूषण पटवर्धन,** उपाध्यक्ष यूजीसी

Pune Main
Page No. 4 Sep 17, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### विद्यापीठ परीक्षांना महिन्याची मुदतवाढ

पुणे : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ३१ ऑक्टोबरपर्यंत घेण्याची परवानगी दिली आहे. याशिवाय परीक्षांचा निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठांना दिलासा मिळाला आहे.

या निर्णयाची माहिती 'यूजीसी'चे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी परिपत्रकाद्वारे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण सचिव राजीव जलोटा यांना दिली आहे. निकालानंतर पदव्युत्तर आणि पीएचडी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी राज्य आपत्ती व्यवस्थापन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने; तसेच विद्यापीठांनी यूजीसीला केली होती.

Maharashtra Times: 17.9.2020

---

लोकमत

नवीन शिक्षक भरती करू नये : शासनाच्या निर्णयाने गोंधळ वाढणार

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला फाटा; इयत्ता पाचवी प्राथमिकला जोडली

यदु जोशी । लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या विसंगत भूमिका घेत इयत्ता पाचवीचा वर्ग प्राथमिक शाळांना जोडण्याचा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने बुधवारी घेतला. हे करताना कोणत्याही शाळांनी नवीन शिक्षक भरती करु नये, असे तर बजावले आहेच शिवाय नवीन वर्गखोल्यांच्या उभारणीचा आर्थिक भार संस्थांवर टाकण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी राज्यात करण्यासाठी एका समितीची नियुक्ती शासनाने केलेली आहे. या समितीचा अहवाल येणे बाकी असतानाच बुधवारी पाचवा वर्ग प्राथमिकला जोडण्याचा निर्णय घेतल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. कारण, नवीन शैक्षणिक धोरणात ५:३:३:४ असे सूत्र स्वीकारण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात नर्सरी, केजी वन, केजी टू, इयत्ता पहिली आणि इयत्ता दुसरी यांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात इयत्ता तिसरी, चौथी आणि पाचवीचा समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यात इयत्ता सहावी, सातवी आणि आठवी तर चौथ्या टप्प्यात इयत्ता नववी, दहावी, अकरावी आणि बारावीचा समावेश आहे.

या धोरणाची अंमलबजावणी ही राज्यात करावीच लागणार आहे. असे असताना त्याची प्रतीक्षा न करता इयत्ता पाचवीचा वर्ग प्राथमिकला जोडण्याने गोंधळात भर पडणार आहे. उद्या ५:३:३:४ हे सूत्र स्वीकारले तर पुन्हा बदल करावा लागणार आहे.

इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच वर्ग असलेल्या शाळांनी चौथ्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना निकालानंतर केव्हाच टीसी दिल्या आणि त्या विद्यार्थ्यांनी अन्यत्र प्रवेशही घेतले. आता पाचवा वर्ग सुरु करायचा तर अनेक शाळांवर विद्यार्थी शोधण्याची वेळ येणार आहे. ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी पाचवीत प्रवेश घेतला त्यांना आता अन्यत्र प्राथमिक शाळेत जावे लागेल. अशा वेळी त्यांनी भरलेल्या शुल्काचे काय, असाही प्रश्न निर्माण झाला आहे.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवीचे वर्ग आहेत त्या शाळांमधील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे समायोजन त्यांच्या इच्छेप्रमाणे व त्यांच्या घराजवळच्या खासगी, अनुदानित, स्थानिक/नागरी स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक शाळांमध्ये करावे, असे आदेशात म्हटले आहे. राज्यात हजारो प्राथमिक शाळा अशा आहेत, ज्यांच्याकडे चारपेक्षा जास्त खोल्या नाहीत. मुख्याध्यापकांसाठी वेगळे कार्यालय नाही, शिक्षकांसाठी स्टाफ रुमदेखील नाहीत.

#### पहिल्या टप्प्यात प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवी



पहिल्या टप्प्यात प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवीचे वर्ग जोडताना ज्या प्राथमिक शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे समायोजन करावे, जिल्हा परिषद शाळेत पाचव्या वर्गासाठी अन्य पर्यायी व्यवस्था करावी किंवा नवीन खोली बांधून द्यावी, असेही आदेशात म्हटले आहे.

> शैक्षणिक सत्राच्या मध्येच आणि राष्ट्रीय धोरणाशी विसंगत असा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. तो तत्काळ रद्द करणे हेच विद्यार्थी आणि शिक्षण संस्थांच्या हिताचे ठरेल.
>
> **- नागो गाणार,** शिक्षक आमदार, नागपूर

Pune Main
Page No. 4 Sep 17, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती

**३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत**

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १६ - केंद्र शासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याकरिता ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावी परीक्षेत उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रासाठी ७ हजार ४१७ इतके संच निर्धारित केले आहे.

योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित महाविद्यालय प्राचार्य, संस्थाप्रमुख यांची असणार आहे. अर्जदाराच्या सोयीसाठी मार्गदर्शक सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, अशा माहिती पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी दिली. योजनेचा लाभ घेण्यासाठी अटीही घालण्यात आल्या आहेत. अर्जदार हा भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, कोणत्याही शिष्यवृत्तीचा अथवा स्टायपेंडचा लाभार्थी नसावा, अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा जास्त नसावे आदींचा समावेश आहे.

**Prabhat: 17.9.2020**

# नवीन अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव

पुणे, दि. १६ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन अभ्यासक्रम, विषय, तुकडी, विद्याशाखा सुरू करण्यास इच्छुक महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविले आहेत. संबंधित प्रस्ताव सादर करण्यास ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार व शासन मान्यतेच्या अधीन राहून संलग्नित महाविद्यालये, परिसंस्था, संसोधन संस्था, केंद्र यांना प्रस्ताव सादर करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली आहे.

नवीन अभ्यासक्रमासह विशेषस्तरावरील विषय, नवीन संशोधन संस्था सुरू करण्यासंदर्भातील प्रस्तावासाठी महाविद्यालयांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून दिली आहे.

**Prabhat: 17.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### ''एमसीक्यू' परीक्षेचा पुनर्विचार व्हावा'

पुणे : राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा बहुपर्यायी स्वरूपात (एमसीक्यू) ऑनलाइन घेण्याच्या निर्णयाचा पुन्हा एकदा विचार व्हावा, अशी विनंती विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांना केली आहे.

'विद्यार्थ्यांना पारंपरिक पद्धतीने वर्णनात्मक उत्तरे लिहिण्याची सवय आहे. त्यामुळे बहुपर्यायी पद्धतीत त्यांचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे; तसेच ऑनलाइन परीक्षेव्यतिरिक्त ऑफलाइन परीक्षेची परवानगी दिली असली, तरी ऑनलाइन परीक्षा आधीच होत असल्याने ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्न परीक्षेपूर्वीच माहिती होण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे याबाबतीत पुनर्विचार व्हावा,' अशी विनंती डॉ. गोऱ्हे यांनी केली.

'विविध विद्यापीठे स्वायत्ततेच्या आधारे कोणताही संवाद, विचारविनिमय न करता विविध घोषणा व परीक्षाविषयक नियम घोषित करत आहेत. त्यात काही प्रमाणात सुसूत्रीकरण व मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर विचार करून आराखडे देण्यास सर्व विद्यापीठांना आदेश द्यावेत,' असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

Maharashtra Times: 17.9.2020

# Marks out of 600 in HSC from 2021, new syllabus training for teachers

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The students of standard XII from the state board will appear for their term-end examination for a total of 600 marks instead of the prevalent 650 marks from 2021.

The Environment Education subject which counted for the remaining 50 marks would now be just a graded subject with water security being included in it. Teachers would soon be given online training for the changed syllabus of standard XII, officials said.

"The changes were implemented as per the circular in 2017. The syllabus and the textbooks changed for standard XI in 2019-20, and for standard XII in 2020-21. The question paper will be based on this syllabus and the question paper too will be based on this. Teachers will be trained online," said Shakuntala Kale, chairperson of the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education.

Kale also said the paper pattern would remain the same as 2020 even though about 25% syllabus has been reduced by the Maharashtra education department because of the Covid 19 pandemic disrupting regular academic year.

A junior college teacher, who did not wish to be named, said, "This year, the class XII curriculum has changed. I teach English and there were many activities planned for the subject but due to Covid 19 pandemic, all that has been hit."

The previous circular says that along with term end examination, students would be continuously evaluated for various factors for internal marks.

**FOR THE BIG EXAMS**

- Based on a national framework as laid down by the Council of Boards of School Education (COBSE) in India, the question paper pattern for physics, chemistry, biology and mathematics were changed since 2018
- It was done so that students fare better in entrance exams like the National Eligibility cum Entrance Test (NEET) and Joint Entrance Exam (JEE)
- While the languages and mathematics subjects follow a 80 (theory) and 20 (internal/viva/practical) marks pattern, the science subjects follow a 70+30 marks pattern, respectively

The Times of India: 17.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# No re-evaluation or answer sheet copy

## SPPU Grievance Cell To Work During Papers

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) will not give the option of re-evaluation and securing photocopy of answer sheets to students for the term-end examination. The students are demanding a grievance redressal portal which will work throughout the duration of the examination.

However, university officials have assured that the examination process would be transparent, an answer key would be uploaded the very next day and dedicated coordinators would be appointed for all queries, before and during the examination.

The university has assured that in case the student logs out due to problems such as connectivity or gadget issues, then whenever he or she logs in again, they will be able to recover whatever time was left in their one-hour duration exam before they logged out. The software would also ensure that the question paper picks up immediately after the last answered question by the student.

The circular issued on Tuesday and uploaded on the SPPU website, said the decisions were taken after the meetings of various academic bodies within the university. The online practicals/viva/seminars will be held for the full marks dedicated to them in the regular set up and the colleges need to upload the marks obtained by each student before October 5. Mock tests would also be taken twice before the actual exam so that students get familiarised with the question paper pattern.

For grievance redressal during the course of the examination, districtwise, subjectwise coordinators would be appointed and the details would be independently shared by the university on its website.

"It is an international practice for such examinations not to have re-evaluation or give photocopy, as it is not possible in the online exam and even the OMR sheet based offline examination. Hence answer keys will be uploaded on the university website the next day immediately after the examination," N S Umrani, pro-vice-chancellor, SPPU, said.

Umrani added, "We have identified about 20 coordinators from the three districts of Pune, Nashik, and Ahmednagar who will be resolving any doubts or confusions of the student, before the exam as well as during the exam. These are highly experienced faculty members with technical know-how of the examination. We have held meetings with these people, guided them and also provided them with the information regarding the Supreme Court order, the state government orders and SPPU's circulars so that they are well-equipped to field all questions regarding examination, not only from students but also from the concerned parents."

**MISSION ADMISSION**

### 60 QUESTIONS IN MCQ FORMAT

- Of these, **students need to answer any 50** and there won't be any negative marking
- The difficulty level of questions would be such that **40%** would be easy
- **40%** would be of medium difficulty level, and the **remaining 20%** would be difficult
- Keep the same email ID and cellphone number used while creating the student login ID and password
- Hall tickets made available to students when they filled up the examination forms for the **March/April 2020 exam or later,** would remain valid for this examination too
- **Two mock tests** before the exam
- Students can choose the college, affiliated to SPPU and nearest to them **as their exam centre**
- For grievance redressal or doubts, students can write to **covid19helpdesk@pun.unipune.ac.in** along with the screenshot of the problem



The Times of India: 17.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच पदवी प्रमाणपत्र मिळणार

मुंबई, (प्रतिनिधी) : पदवीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच पदवीचे प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामध्ये काहीही बदल असणार नाही. पदवीच्या प्रमाणपत्रावर कोविड-१९ च्या संदर्भाने काहीही उल्लेख नसेल. याबाबत विद्यार्थ्यांनी कसलाही संभ्रम निर्माण करू नये, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून तयारी केली आहे. विशेषतः विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेऊन परीक्षा प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. पदवीच्या प्रमाणपत्रावर कोविड - १९ च्या संदर्भाने काहीही उल्लेख नसेल.

Kesari: 18.9.2020

लोकमत

### पदवी प्रमाणपत्रांवर कोविडचा उल्लेख नसेल

#### उदय सामंत यांचा खुलासा



मुंबई : पदवीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी जसे प्रमाणपत्र दिले जाते तसेच प्रमाणपत्र यंदाही दिले जाईल. विद्यार्थी आणि पालकांनी याबाबत कोणताच संभ्रम करुन घेऊ नये. कोणत्याच पदवी प्रमाणपत्रावर कोविड-१९ चा उल्लेख नसेल, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी स्पष्ट केले.

पदवी परीक्षांबाबत माध्यमांना सामंत यांनी सांगितले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेऊन परीक्षा प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तरीही, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुनच परीक्षा घेतल्या जातील. त्यादृष्टीने सर्व विद्यापीठांकडून तयारी करण्यात आली आहे. पदवीच्या प्रमाणपत्रावर कोविड - १९ च्या संदर्भात काहीही उल्लेख नसेल. दरम्यान, सामंत यांच्या अध्यक्षतेखाली श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठाच्या परीक्षेसंदर्भात आढावा बैठक पार पडली. यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरू शशिकला

सर्व मेडिकल स्टोअर्सवर उप

Pune Main
Page No. 12 Sep 18, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# परीक्षा अर्जांसाठी मुदतवाढ

## विशेष बाब म्हणून १८ ते २० सप्टेंबरपर्यंत वाढीव कालावधी

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई



उदय सामंत

अंतिम वर्ष परीक्षा घेऊन निकाल जाहीर करण्यासाठी महाराष्ट्रातील विद्यापीठांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ३१ ऑक्टोबरपर्यंतची मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे, काही कारणांमुळे परीक्षा अर्ज भरू न शकलेल्या विद्यार्थांसाठी विशेष बाब म्हणून १८ ते २० सप्टेंबरपर्यंत वाढीव कालावधी देण्यात आला आहे. या वाढीव कालावधीचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी केले.

'यूजीसी'च्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापीठांना अंतिम वर्षाची परीक्षा प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र, राज्य सरकारने आयोगाकडे राज्यातील विद्यापीठांना परीक्षा घेण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंतची मुदत द्यावी अशी विनंती केली होती. यानुसार आयोगाने मुदतवाढ मंजूर केली आहे.

'अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी 'यूजीसी'कडून मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे, काही कारणांमुळे परीक्षा अर्ज भरू न शकलेल्या विद्यार्थांसाठी विशेष बाब म्हणून १८ ते २० सप्टेंबरपर्यंत वाढीव कालावधी देण्यात आला आहे. या वाढीव कालावधीचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठांना सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल. याचबरोबर अंतिम वर्षाच्या विद्यार्थांना विद्यापीठाकडून सराव प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिली जाणार आहे,' असेही सामंत म्हणाले.

### पदव्युत्तर पदवीचे प्रवेश नोव्हेंबरपासून

राज्यातील विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊन लवकरात लवकर निकाल जाहीर करावा अशी सूचना अनुदान आयोगाच्या पत्रात देण्यात आली आहे. यानंतर तातडीने नोव्हेंबरच्या सुरुवातीला पदव्युत्तर पदवी तसेच पी. एचडी.ची प्रवेशप्रक्रिया सुरू करावी अशी सूचनाही आयोगाने पत्रात केली आहे.

### राज्यातील विद्यापीठे सज्ज

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा या ३१ ऑक्टोबरपूर्वी होतील, असे नियोजन राज्यातील विद्यापीठांनी केले आहे. उदय सामंत सध्या राज्यातील विद्यापीठांचा दौरा करून आढावा घेत आहेत. गुरुवारी एसएनडीटी महिला विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठातील आढावा बैठक पार पडल्याचे सूत्रांनी सांगितले.

**Maharashtra Times: 18.9.2020**

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२० || ५

# विद्यापीठांना यूजीसीचा दिलासा

## अंतिम वर्ष परीक्षा आता ३० ऑक्टोबरपर्यंत घेण्यासाठी मुभा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १७** - महाराष्ट्र सरकारने अंतिम वर्ष परीक्षेसंदर्भात मुदतवाढीच्या मागणीला विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) हिरवा कंदील दाखविला. राज्यातील विद्यापीठांना आता अंतिम वर्षाच्या परीक्षा सप्टेंबरअखेर ऐवजी ३० ऑक्टोबरपर्यंत घेण्यासाठी 'यूजीसी'ने मुभा दिली आहे. त्यामुळे विद्यापीठांना दिलासा मिळाला आहे.

'यूजीसी'चे सचिव प्रो. रजनीश जैन यांनी यासंबंधिचे परिपत्रक प्रसिद्ध केले. राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव राजीव जलोटा यांना हे परिपत्रक पाठविले आहे. अंतिम वर्षाच्या



परीक्षा रद्द करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याचदरम्यान 'यूजीसी'ने दि. ६ जुलै रोजी मार्गदर्शक सूचना जारी करीत त्यानुसार राज्यांना तसेच विद्यापीठांना परीक्षा घेणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही परीक्षाविना विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे चुकीचे असून, परीक्षा घेतलीच पाहिजे, असे निर्देश दिले.

### मुदतवाढीची राज्य शासनाने केली होती मागणी

त्यानुसार विद्यापीठांनी परीक्षेचे नियोजन करण्यास सुरुवात केली.

तथापि, 'यूजीसी'ने ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेण्यासाठी कालावधी दिला होता. करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाचा विचार करता या कालावधीत राज्यातील विद्यापीठांना परीक्षा घेणे शक्य नाही. त्यामुळे परीक्षा घेण्यासाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी राज्य सरकारने 'यूजीसी'कडे केली होती. विद्यार्थ्यांचा विचार करून 'यूजीसी'ने आता ३० ऑक्टोबरपर्यंत परीक्षा घेण्यास परवानगी दिली आहे.

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education



# Varsities can conduct exams in Oct, declare results in Nov

## UGC Agrees To State Govt Plea On Final Sem Tests

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** The state and public universities in Maharashtra will have to complete the final semester examinations by October 31, and universities will have to announce the results of these exams by November first week, the University Grants Commission (UGC) has informed the Maharashtra government on Wednesday.

The UGC approved the state government's request to extend the exam date from September to October-end.

The UGC, in its letter, to the state government said that it had considered the request of the additional chief secretary, higher and technical education department, Maharashtra government on September 10, for an extension of time sought till October 31 to complete the conduct of terminal semester / final year examinations.

The UGC letter added, "The said request states that such an extension is being sought pursuant to a decision of the state disaster management authority that it would not be possible to hold the final year/ terminal semester examinations in colleges and universities till September 2020."

Keeping in view the health and safety of the students and also in larger interest of their academic progression, the UGC decided to accede to the request of the Maharashtra government.

"Accordingly, the final year/terminal semester examinations in colleges and universities in Maharashtra will be completed by October 31. Further, you are requested to ensure that the assessment and evaluation work should also be done simultaneously so that the result of these examinations be declared at the earliest and preferably by the first week of November 2020 so that the admissions to the first year of post graduate and PhD programmes can be completed without any further delay and the next session can commence timely," the UGC stated to Maharashtra government.

### GETTING READY FOR A NEW WAY

**2,49, 052** students eligible for final year examinations

**2, 23,018** filled up the option form on online or offline mode of examination

**1,85,177** applied for online examinations

Only **37,841** will go for offline examinations

**RESULTS LIKELY IN NOVEMBER**

Controller of examination at SPPU, Mangesh Kakade, said, "Announcing of the results in November will completely depend on how smooth the examinations happen. We are trying our best to avoid any hurdles and make the online and offline exam system function smoothly and if that happens, announcing the results in November first week will not be an issue. However, if any problems arise during conduct of examination then we will require more time to declare the results."

**UGC VERSUS MAHARASHTRA**

- Maharashtra and some other states had cancelled the final-year exams
- The government had decided to award degrees based on previous semester's performance
- The UGC said this move by the state dilutes standards and told universities to hold exams either online, off-line or blended before September 30
- Minister for higher education Uday Samant had tweeted in September that the state would seek extension to complete the final year exam process by October 31
- The move was recommended made by the vice-chancellors' panel
- It was led by Mumbai University V-C Suhas Pednekar
- The panel was formed to advise the state on conducting the final-year exams

Times of India; 18.9.2020



# परीक्षांचा निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ३१ ऑक्टोबरपर्यंत घेण्यासाठी मान्यता दिली. तसेच परीक्षांचा निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे राज्यातील विद्यापीठांना परीक्षांच्या नियोजनाच्या दृष्टीने दिलासा मिळाला आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी परिपत्रकाद्वारे राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव राजीव जलोटा यांना माहिती दिली आहे. यूजीसीने ६ जुलैला प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी ३० सप्टेंबरची मुदत दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्ष परीक्षांबाबत दिलेल्या निकालात अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी वेळ वाढवून हवा असल्यास यूजीसीकडून मान्यता घेण्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसार राज्यात करोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्याने, सुरक्षित अंतराचे नियम पाळून परीक्षांचे नियोजन करण्यासाठी अधिकचा वेळ हवा असल्याने परीक्षा घेण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून देण्याची मागणी यूजीसीकडे करण्यात आली होती.

लोकसत्ता Fri, 18 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55034499

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

## साडेपाचाव्या वर्षीच मिळणार पहिलीच्या इयत्तेमध्ये प्रवेश

### शाळा प्रवेशाचे वय केले शिथिल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य सरकारने शाळा प्रवेशाचे वय शिथिल के ले असून आता अडीच वर्षाच्या बालकास प्ले ग्रूप/नर्सरीत तर साडेपाच वर्षे वयाच्या बालकास इयत्ता पहिलीत प्रवेश देण्यात येणार आहे. २०२१-२२ च्या शैक्षणिक सत्रापासून हा नियम लागू होणार असल्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाने शुक्रवारी काढला.



ज्या मुलांच्या वयास ३१ डिसेंबरपर्यंत तीन वर्षे पूर्ण होतील त्यांना जून वा त्यानंतरच्या काळात प्ले ग्रुप/नर्सरीत प्रवेश घेता येईल. याचा अर्थ अडीच वर्षाच्या वयातच त्यांना प्रवेश मिळेल. ज्या मुलांच्या वयास ३१ डिसेंबरपर्यंत ६ वर्षे पूर्ण होणार आहेत त्यांना जून वा त्यानंतरच्या काळात इयत्ता पहिलीत प्रवेश घेता येईल. कमी वयात शाळा प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे. २०२१-२२ पासून हा नियम लागू होईल.

शाळा प्रवेशासाठी बालकांच्या वयात शिथिलता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती आणि त्यासाठी शिक्षण संचालकांची (प्राथमिक) एक सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. समितीच्या शिफारशीनुसार निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता वयाच्या अडीचव्या वर्षी प्ले ग्रूप/नर्सरीला तर वयाच्या साडेपाचव्या वर्षी इयत्ता पहिलीला प्रवेश मिळू शकेल.

या आधी ३० सप्टेंबरपर्यंत अनुक्रमे तीन आणि सहा वर्षे वय पूर्ण करणाऱ्या मुलांना अनुक्रमे प्ले ग्रूप/नर्सरीत प्रवेश दिला जात होता आणि प्रवेशासाठी बालकांच्या किमान वयामध्ये जास्तीतजास्त १५ दिवसांची शिथिलता देण्याचे अधिकार संबंधित मुख्याध्यापकांना देण्यात आले होते. आता मुख्याध्यापकांचा हा अधिकार काढून घेण्यात आला आहे.

Pune Main
Page No. 5 Sep 19, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

मंत्र्यांच्या बैठकीत निर्णय : शिक्षकांची जबाबदारी वाढली

## राज्यातील शाळा दिवाळीपर्यंत बंद

अतुल कुलकर्णी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोनाच्या वाढत्या प्रभावामुळे राज्यातील सर्व शाळा दिवाळीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय ज्येष्ठ मंत्र्यांच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती आहे.

शाळा सुरु केल्या तर काय परिस्थिती निर्माण होईल. कुठे किती सुरक्षितता आहे. याची विस्तृत माहिती अधिकाऱ्यांनी मंत्र्यांना दिली. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. ज्या जिल्ह्यात दोन आकडी रुग्ण संख्या होती तेथे आता रुग्णांची संख्या चार आकड्यांवर गेलेली आहे. त्यामुळे शाळा सुरु झाल्या तर मुलांना याची लागण होईल. मुलांच्या माध्यमातून ही साथ त्यांच्या घरापर्यंत जाईल. हे होऊ द्यायचे नसेल तर शाळा दिवाळीपर्यंत बंद ठेवणे योग्य राहील, असे यावेळी सांगण्यात आले. राज्यातली एकही शाळा क्वारंनटाईनसाठी वापरली जात नाही, तसेच शिक्षकांच्या सेवा देखील मोठ्या प्रमाणावर आता कोरोनासाठी घेणे कमी झाले आहे, अशी माहितीही अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

### कोरोनाचा वाढता संसर्ग कमी करण्याचे आव्हान



पहिली ते चौथी चे
एकूण विद्यार्थी : ७९,३८,५९१
पाचवी ते सातवीचे
एकूण विद्यार्थी : ५८,८३,५२५
आठवी ते दहावीचे
एकूण विद्यार्थी : ५६,४९,१४९
अकरावी-बारावीचे
एक विद्यार्थी : २८,८४,७६८

ऑनलाइन शिक्षण घेण्यावरुन यावेळी चर्चा झाली. अनेक भागात नेटवर्कचा प्रश्न आहे. त्यामुळे या शिक्षणाचा फारसा उपयोग होईल असे वाटत नाही, यावर जवळपास सर्व मंत्र्यांचे एकमत झाल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मात्र दिवाळीपर्यंत विद्यार्थ्यांना रिकामे बसू न देता त्यांच्याकडून, त्यांच्या वयोगटानुसार, वेगवेगळ्या उपक्रम राबवून घेणे, अभ्यासक्रमांची ओळख कायम ठेवणे, या गोष्टी जाणीवपूर्वक शिक्षकांनी केल्या पाहिजेत.

पालकांनी देखील यात हातभार लावला पाहिजे. जेणेकरुन विद्यार्थ्यांची अभ्यासाची सवय तुटणार नाही, याकडे लक्ष दिले पाहिजे, असे मत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बैठकीत व्यक्त केल्याचे समजते. त्यामुळे शाळा दिवाळीपर्यंत बंद ठेवण्याच्या निर्णयाची अधिकृत घोषणा लवकरच होईल.

Pune Main
Page No. 7 Sep 19, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या कामांना सुरवात

**मुंबई, (प्रतिनिधी) :** अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल घोषित करण्याची कामे पूर्ण करण्यासाठी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे आणि स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०० टक्के उपस्थिती अनिवार्य केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १ ते ३१ ऑक्टोबर या काळात घेण्यात येणार आहेत. या परीक्षांचा निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची गरज लागणार आहे. त्यामुळे १०० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

**Kesari:19.9.2020**

### अपंग विद्यार्थ्यांना सुविधा पुरवण्याचे विद्यापीठांना निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अंतिम वर्ष परीक्षांसाठी अपंग विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा पुरवण्याचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांना दिले आहेत. राज्यातील करोना संसर्गाची परिस्थिती लक्षात घेऊन अपंग विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याची सूचनाही करण्यात आली आहे.

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या नुकत्याच झालेल्या ऑनलाइन बैठकीला अपंग विद्यार्थ्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत अंतिम वर्ष परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हित विचारात घेऊन आवश्यक सोयीसुविधा पुरवण्याची मागणी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, अंतिम वर्ष परीक्षेत एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, विद्यार्थ्यांना सर्व सोयीसुविधा पुरवणे आवश्यक आहे, अपंग विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करावी, अधिकाऱ्याचे नाव, संपर्क क्रमांक प्रसिद्ध करावेत असे, उच्च शिक्षण संचालक डॉ. माने यांनी स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Sat, 19 September 2020 https://epaper.loksatta.com/c/55061567

प्रभात पुणे, शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२० ॥ ५

### दिव्यांगांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य

#### अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन : उच्च शिक्षण विभागाच्या विद्यापीठांना सूचना

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १८ - सध्या पदवीच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन होत आहे. यात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीसुविधा पुरविण्याचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांना दिले आहेत. करोना संकट लक्षात घेता परीक्षेत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, असेही उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठांना सूचित केले आहे.

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची ऑनलाइन बैठक चार दिवसांपूर्वी झाली. त्या बैठकीत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी करोना पार्श्वभूमीवर घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्ष परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हित विचारात घ्यावे. त्यानुसार आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात यावी, अशी मागणी केली. त्याची दखल घेत उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांना परिपत्रकाद्वारे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा योग्य पद्धतीने पुरविण्याचे निर्देश दिले.

दरम्यान, अंतिम वर्ष परीक्षांच्या नियोजनाबाबत गठीत केलेल्या डॉ. पेडणेकर समितीने सादर केलेला अहवाल शासनाने स्वीकारला आहे. यातदेखील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधांसह त्यांना सोयीच्या पडतील अशा पद्धतीने परीक्षांचे नियोजन करावे. त्यांच्या आरोग्याला प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस केली. त्याचे योग्य पद्धतीने पालन करावे, असे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी सांगितले आहे.

**उच्च शिक्षण विभागाच्या सूचना**

- एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही.
- सर्व विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविणे आवश्यक.
- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अडचणीसाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करा.
- अधिकाऱ्यांची नावे, फोन क्रमांक, हेल्पलाइन क्रमांक प्रसिद्ध करा.
- सोयीसुविधांची माहिती विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# अंतिम वर्ष परीक्षेत दिव्यांगांना सर्व सोयी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पदवीच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन होत आहे. यात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीसुविधा पुरविण्याचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांना दिले आहेत. कोरोना संकट लक्षात घेता परीक्षेत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्यालासर्वोच्चप्राधान्य देण्यात यावे, असे स्पष्ट आदेश उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी विद्यापीठांना सूचित केले आहेत.

### ७५६ दिव्यांग देणार परीक्षा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ७५६ दिव्यांग विद्यार्थी अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. यामध्ये ऑनलाइन परीक्षेचा पर्याय ४७३ विद्यार्थ्यांनी निवडला असून, १६७ विद्यार्थी ऑफलाइन परीक्षा देणार आहेत. तर ११६ विद्यार्थ्यांनी कोणताही पर्याय निवडला नाही. ७५६ विद्यार्थ्यांमध्ये २७७ विद्यार्थी दृष्टिदोष, ४२ कर्णदोष, ३६९ अपंग आणि ६८ अन्य दोष असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संबंधित विद्यार्थ्यांना लेखनिक तसेच सहायक उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पेपर सोडविण्यासाठी २० मिनिटांचा अधिकचा कालावधी देण्यात येणार आहे. तसेच तळ मजल्यावरच त्यांची परीक्षेची व्यवस्था आदी सुविधा विद्यापीठामार्फत आवश्यकतेनुसार त्यांना दिल्या जाणार आहेत.

My Pune Edition
Sep 19, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# शिक्षकांची १०० टक्के उपस्थिती

प्रभात वृत्तसेवा

### अंतिम वर्ष परीक्षांच्या पार्श्वभूमीवर निर्णय

पुणे, दि. १८ - विद्यापीठाच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा पुढच्या महिन्यात होत आहे. परीक्षेच्या कामकाजासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. त्या पार्श्वभूमीवर आता विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थेत यापुढे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची १०० टक्के उपस्थिती अनिवार्य असल्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

लॉकडाऊन काळात विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांमधील प्रशासकीय कामकाज मर्यादित कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत होत होते. दरम्यान, विद्यापीठ अनुदान आयोगाने अंतिम वर्ष परीक्षा घेण्यासंदर्भात ६ जुलै रोजी मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. परंतु राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याच्या निर्णयास न्यायालयात याचिका दाखल केली. त्यात सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे निर्देश दिले.

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा १ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. त्याच कालावधीत नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात निकाल जाहीर करणे आवश्यक आहे. त्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन करणे अशी परीक्षेचे कामकाज राहणार आहे. त्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे. त्या पार्श्वभूमीवर परीक्षेचे कामकाज प्राप्त परिस्थितीत पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयात कर्मचाऱ्यांची उपस्थिती १०० टक्के बंधनकारक राहील, असा शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध केला.

### मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक

करोना विषाणूचा प्रसार होऊ नये तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्याचा संसर्ग होऊ नये म्हणून राज्य शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांनी कार्यवाही करावी, असेही शासन निर्णयात नमूद केले आहे.

**Prabhat:19.9.2020**

लोकमत

# महाविद्यालयात शिक्षकांची १००% उपस्थिती अनिवार्य



मुंबई : राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांमधील शिक्षक, कर्मचाऱ्यांसाठी आता १०० टक्के कार्यालयीन उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शुक्रवारी या बाबतचा आदेश काढला.

राज्यात विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या /अंतिम सत्राच्या परीक्षा घ्यायच्या आहेत. या परीक्षेच्या कामकाजासाठी शिक्षक, कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. या परिक्षा १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान घेऊन निकाल २०२० च्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने १०० टक्के उपस्थिती अनिवार्य करण्यात येत असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. हा आदेश तत्काळ लागू झाला आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शासनाच्या व आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आदेशात म्हटले आहे.

Pune Main
Page No. 7 Sep 19, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॉलेजमध्ये हजर राहण्याचे आदेश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिल्यामुळे राज्यातील सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर हजर राहण्याचे आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिले.

कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच परीक्षा कालावधीत एकत्र येणाऱ्या विद्यार्थ्यांना कोरोनाची बाधा होऊ नये यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येणार नसल्याचे जाहीर केले होते. मात्र, या निर्णयाला विद्यापीठ अनुदान आयोगाने हरकत घेतली. तसेच काही जणांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकांचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने २८ ऑगस्ट रोजीच्या सुनावनीमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा आदेश दिला आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाला १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत राज्यातील अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेऊन त्याचा निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करणे आवश्यक आहे.

परीक्षासाठी प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन करणे अशी अनेक कामे समाविष्ट आहेत. कमी कालावधीत परीक्षा पार पाडणे व त्याचा निकाल जाहीर करणे आव्हानात्मक काम पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. यामुळे विद्यापीठे व शैक्षणिक संस्थेच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यापुढे शंभर टक्के उपस्थिती असावी, असे आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिले आहे.

सदर कामकाज करताना केंद्र व राज्य सरकारने निश्चित केलेल्या कोरोनाबाबतच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे या विभागाने स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Sep 19, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# शिक्षक, कर्मचाऱ्यांना हजेरी अनिवार्य

## अंतिम वर्ष परीक्षा, निकाल वेळेत लावण्यासाठी राज्य शासनाचे आदेश

**पुणे, ता. १९ :** अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन करून वेळेत निकाल लावण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने विद्यापीठ, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपस्थित राहून काम करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शंभर टक्के मनुष्यबळ उपस्थित राहणार असल्याने कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी काळजी घ्यावी लागणार आहे.

राज्य सरकारने कोरोनाच्या धोक्यामुळे विद्यापीठ, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांना घरातून काम करण्याची मुभा दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर महिन्यात पदवी व पदव्युत्तर पदवीच्या परीक्षा घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन आदी कामाचा व्याप वाढणार आहे. त्यामुळे महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे.

पुणे विद्यापीठात ठराविक मनुष्यबळात काम सुरू झाल्यानंतर कोरोनाची लागण झाल्याची घटना घडली होती. आता शंभर टक्के उपस्थितीमध्ये काम करावे लागणार आहे. महाविद्यालयांमध्येही प्राध्यापक, कर्मचारी यांची संख्या वाढल्यानंतर संसर्ग टाळण्यासाठी काळजी घ्यावी लागणार आहे.

CS Scanned with CamScanner

Sakaal: 20.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### शिक्षक, कर्मचाऱ्यांना हजेरी अनिवार्य

**अंतिम वर्ष परीक्षा, निकाल वेळेत लावण्यासाठी राज्य शासनाचे आदेश**

**पुणे, ता. १९ :** अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन करून वेळेत निकाल लावण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने विद्यापीठ, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपस्थित राहून काम करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शंभर टक्के मनुष्यबळ उपस्थित राहणार असल्याने कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी काळजी घ्यावी लागणार आहे.

राज्य सरकारने कोरोनाच्या धोक्यामुळे विद्यापीठ, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांना घरातून काम करण्याची मुभा दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर महिन्यात पदवी व पदव्युत्तर पदवीच्या परीक्षा घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन आदी कामाचा व्याप वाढणार आहे. त्यामुळे महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे.

पुणे विद्यापीठात ठराविक मनुष्यबळात काम सुरू झाल्यानंतर कोरोनाची लागण झाल्याची घटना घडली होती. आता शंभर टक्के उपस्थितीमध्ये काम करावे लागणार आहे. महाविद्यालयांमध्येही प्राध्यापक, कर्मचारी यांची संख्या वाढल्यानंतर संसर्ग टाळण्यासाठी काळजी घ्यावी लागणार आहे.

Sakaal: 20.9.2020

### प्राध्यापकांची उपस्थिती अनिवार्य

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्याचे निश्चित झाले असून, त्यासाठी आता सर्व अकृषी विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची १०० टक्के उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने हा निर्णय घेतला असून, शुक्रवारी रात्री याबाबतचा आदेश जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे उद्या सोमवार २१ सप्टेंबरपासून महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना हजर राहावे लागणार आहे.

या आदेशानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, महाविद्यालय, शैक्षणिक संस्थांना निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्णयानुसार विद्यापीठांच्या परीक्षा १ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत घेण्यात येणार असून, नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात निकाल जाहीर केला जाणार आहे. एकंदरीत कमी कालावधीत परीक्षा पार पाडणे व निकाल घोषित करणे हे आव्हानात्मक काम पार पाडण्यासाठी सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची १०० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने म्हटले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आणि संलग्न महाविद्यालयांनी प्राध्यापकांना लॉकडाउनमध्ये 'वर्क फ्रॉम होम'ची सुविधा उपलब्ध करून दिली होती.

#### निर्णय मागे घेण्याची मागणी

'राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांतील प्राध्यापकांना महाविद्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य केले आहे. राज्यात करोनाने थैमान घातले असताना, लोकांनी आवश्यक असेल, तरच घराबाहेर पडा, सार्वजनिक ठिकाणी जायचे टाळा अशा सूचनांनुसार जमावबंदीचे आदेशही साथ नियंत्रणात आणण्यासाठी दिले आहेत. अशा परिस्थितीत सरकारी निर्णयामुळे प्राध्यापकांचा सार्वजनिक ठिकाणी वावर वाढेल. त्यामुळे पुढच्या काळात हा संसर्ग वाढण्याची शक्यता आहे. हा निर्णय तत्काळ मागे घ्यावा,' अशी मागणी शिक्षक हितकारणी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पवार यांनी केली आहे. सिनेट सदस्य विवेक बुचडे यांनीही या निर्णयास तीव्र विरोध दर्शवला आहे.

Maharashtra Times 20.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

# शिक्षक, शिक्षकेतरांना १०० टक्के हजेरी बंधनकारक

### शासन आदेश । विद्यापीठाने काढले परिपत्रक; अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा येत्या १ ऑक्टोबरपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील सर्व विद्यापीठातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा येत्या १ ऑक्टोबरपासून घेतली जाणार असल्याने परीक्षेच्या कामासाठी मोठ्या मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ व महाविद्यालयात १०० टक्के उपस्थित रहावे, असा अध्यादेश राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने काढला आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयाना दिले आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील आणि संलग्न महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना ‘वर्क फ्रॉम होम’ची अनुमती देण्यात आली होती. मात्र आता अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार असल्याने प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे आदीसाठी मनुष्यबळ भासणार आहे. त्यामुळे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शंभर टक्के उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे.



“कोरोनाच्या पार्श्वभूमीवर काही महाविद्यालयांच्या वसतिगृहात कोविड केंद्र सुरु केले आहे. त्यामुळे या महाविद्यालयातल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना १०० टक्के उपस्थिती बंधनकारक करु नये. ‘वर्क फ्रॉम होम’द्वारे परीक्षेची कामे करण्याची मुभा द्यावी.

- डॉ. विवेक बुचडे,
अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

“आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडा, सार्वजनिक ठिकाणी जायचे टाळा असे आवाहन शासन करत असताना दुसऱ्या बाजूला १०० टक्के उपस्थितीची सूचना दिली जात आहे. मुंबईसारख्या ठिकाणी लोकल बंद आहेत, सार्वजनिक वाहतुकीच्या समस्या आहेत. शासनाने अध्यादेश मागे घ्यावा.

- डॉ. प्रकाश पवार,
अध्यक्ष, शिक्षक हितकारणी संघटना

Pune Main
Page No. 3 Sep 20, 2020
Powered by: erelego.com

# 100% attendance order ruffles profs

### They write to state govt to withdraw it over safety concerns

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

After the state government’s higher and technical education department issued a circular to all colleges and universities regarding 100 per cent mandatory attendance of all staff, the professors’ association objected to it and questioned why it contradicted the earlier order of colleges and schools to be shut till September 30.

Teachers have now written to the state government, asking them to reconsider the decision as it will force many to work in close proximity which will increase the risk of coronavirus disease (COVID-19) transmission.

Prakash Pawar, Shikshak Hitakarani Association, who also teaches in Fergusson College, said, “It is surprising to see that the state government is asking all teachers to have 100 per cent attendance. Physical distancing is not possible as usually teachers have a common seating area where they work in close proximity.”

“There should be at least some way wherein teachers can work from home and also work for the examinations which are scheduled in October. We have been working remotely and taking online lectures and the same can be continued,” he added.

Vivek Buchade, a professor from Abasaheb Garware College and also senate member of Savitribai Phule Pune University (SPPU), said, “Many colleges are being used as COVID care centres (CCC). For example, in the college where I work, the entrance for college and CCC is the same and there is hardly any distance between it and the college building. The state government should at least think about the colleges which have quarantine facilities.”



FILE PHOTO

New order contradicts the previous one





The higher and technical education department has been approached with the demand that the circular should be taken back and some system can be worked out for online examination through work from home.

Buchade said, “Work from home is possible as the entire process of examination is also going to be online. Therefore, staggered attendance or work from home should be allowed.”

Mohan Khatal, joint director, higher and technical education department, said, “The decision of 100 per cent has been taken to ensure that examinations are conducted without difficulty. Colleges have also been asked to take proper precautions. The decision about the colleges with quarantine facilities hasn’t been taken yet.”

Pune Mirror: 20.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### प्राध्यापकांच्या उपस्थितीचा निर्णय मागे घेण्याची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील अकृषी विद्यापीठे, महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या शंभर टक्के उपस्थितीमुळे संसर्ग वाढण्याची भीती आहे. त्यामुळे हा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

अंतिम वर्ष परीक्षांच्या तयारीच्या दृष्टीने अकृषी विद्यापीठे, महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या शंभर टक्के उपस्थितीचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. मात्र या निर्णयाला विरोध करण्यात येत आहे.

शिक्षक हितकारिणी संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पवार यांनी हा निर्णय मागे घेण्याची मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

'राज्यात करोना बाधितांची संख्या वाढत असताना साथीच्या नियंत्रणासाठी जमावबंदीचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच काम असेल तरच बाहेर पडण्यास सांगण्यात येत आहे. असे असताना प्राध्यापकांची शंभर टक्के उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे प्राध्यापकांचा सार्वजनिक ठिकाणी वावर वाढणार आहे. मुंबईत अद्यापही रेल्वेसेवा सुरू नाही, सार्वजनिक वाहतुकीच्या समस्या आहेत. महाविद्यालयातील प्राध्यापक एका सामायिक खोलीत बसतात. त्यामुळे संसर्ग वाढण्याची भीती असून, प्राध्यापकांच्या उपस्थितीचा निर्णय मागे घ्यावा,' असे डॉ. पवार यांनी नमूद केले आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनीही उपस्थितीचा निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे.

लोकसत्ता Sun, 20 September 2020 https://epaper.loksatta.com/c/556

पुढारी

### प्राध्यापकांच्या 'कॅस' मुलाखती पुढे ढकला

**प्राध्यापक, सिनेट सदस्य, संस्थाचालकांकडून मागणी**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने कॅसअंतर्गत प्राध्यापकांच्या पदोन्नती मिळवण्यासाठी मुलाखतीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यामुळे अंतिम वर्ष परीक्षांची तयारी करायची की कॅससाठी मुलाखत द्यावी, अशा अडचणीत प्राध्यापकवर्ग सापडला आहे. विद्यापीठाने हा मुलाखतीचा कार्यक्रम परीक्षा झाल्यानंतर आखावा, अशी मागणी प्राध्यापक, सिनेट सदस्य आणि संस्थाचालकांकडून होत आहे.

पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यातील सर्व अशासकीय महाविद्यालयातील पात्र सहयोगी प्राध्यापकांकडून कॅसअंतर्गत अर्ज ऑनलाइन मागविण्यात आले होते. या मुलाखतीचा कार्यक्रम २३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत विद्यापीठात आयोजिला आहे. मात्र, १५ ते २५ सप्टेंबर या कालावधीत अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरू असून, १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत लेखी परीक्षा होणार आहेत. त्यामुळे सध्या प्राचार्य आणि प्राध्यापक परीक्षांचे नियोजन करण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे मुलाखती परीक्षा झाल्यानंतर घेण्यात याव्या, अशी मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्यासह बागेश्री मंठाळकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे या सिनेट सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.

Pune Edition
Sep 20, 2020 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

### आधी मुलाखत, की परीक्षा?

**'कॅस'मुळे प्राध्यापकांची अडचण**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्राध्यापक अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करण्यात व्यग्र असताना, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने 'कॅस'अंतर्गत प्राध्यापकांच्या पदोन्नती मिळवण्यासाठी मुलाखतींचा कार्यक्रम आखला आहे. त्यामुळे परीक्षांची तयारी करायची, की 'कॅस'साठी मुलाखत द्यावी, अशा अडचणीत प्राध्यापक वर्ग सापडला आहे.

विद्यापीठ प्रशासनाने हा मुलाखतीचा कार्यक्रम परीक्षा झाल्यानंतर आखावा, अशी मागणी प्राध्यापक, सिनेट सदस्य आणि संस्थाचालकांकडून होत आहे.

पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यांतील सर्व अशासकीय महाविद्यालयातील पात्र सहयोगी प्राध्यापकांकडून 'कॅस'अंतर्गत पदोन्नती मिळवण्यासाठीचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जातील पात्र उमेदवारांच्या 'कॅस'अंतर्गत प्राध्यापक पदांच्या मुलाखतीचा कार्यक्रम २३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत विद्यापीठात आयोजित केला आहे. या मुलाखतीसाठी उमेदवारासोबत प्राचार्य, विभागप्रमुख, संस्थाचालक यांनाही उपस्थित राहायचे आहे. मात्र, १५ ते २५ सप्टेंबर या कालावधीत अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरू असून, १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत लेखी परीक्षा 'एमसीक्यू पॅटर्न'ने ऑनलाइन आणि ऑफलाइन होणार आहेत. त्यामुळे सध्या प्राचार्य आणि प्राध्यापक परीक्षांचे नियोजन करण्यात व्यग्र असून, अनेक जण विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपेढी तयार करीत आहेत.

**परीक्षांनंतर मुलाखतीचा आग्रह**



परीक्षांचे नियोजन आणि प्रश्नपेढी तयार करण्यात व्यग्र असतानाच प्राध्यापकांच्या मुलाखतीचे आयोजन केल्यास; तसेच करोनाकाळात अनावश्यक गर्दी होऊ शकते. अंतिम वर्षाच्या परीक्षांचे आयोजन करण्याकडे दुर्लक्ष होऊन, गोंधळ होऊ शकतो. त्यामुळे कॅसच्या मुलाखतीचा कार्यक्रम परीक्षा झाल्यानंतर आयोजित करण्यात यावा, अशी मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्यासोबत सिनेट सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना केली आहे. यात बागेश्री मंठाळकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे आदींचा समावेश आहे.

**Maharashtra Times: 20.9.2020**

### ऐन परीक्षेच्या काळात पदोन्नतीच्या मुलाखती

**प्रक्रिया पुढे ढकलण्याची मागणी**

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. १९ -** अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन सुरू असताना दुसरीकडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत मुलाखती घेण्यासाठी तारखा प्रसिद्ध केल्या आहेत. त्यास विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी विरोध केला आहे. या मुलाखती आता न घेता ऑक्टोबरमध्ये परीक्षा झाल्यानंतर घ्याव्यात, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पदवी व पदव्युत्तर पदवीच्या महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक परीक्षा सुरू आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेतल्या जाणार आहेत. प्रश्नसंच काढणे, परीक्षेचे नियोजन करणे यात प्राध्यापक गुंतलेले आहेत. असे असताना शैक्षणिक विभागाने २३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यास अधिसभा सदस्यांनी विरोध केला आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, ज्योत्स्ना एकबोटे, अधिसभा सदस्य प्रा. शामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर यांनी ही यासंदर्भात निवेदन दिले आहे. प्राध्यापक परीक्षेचे काम सोडून स्वतःची फाइल तयार करण्यासाठी वेळ देतील, याचा परिणाम परीक्षेवर होऊ शकतो, याकडे प्रा. शामकांत देशमुख यांनी लक्ष वेधले.

**Prabhat: 20.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# अंतिम वर्ष परीक्षेनंतर प्राध्यापकांच्या मुलाखती घेण्याची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्राध्यापक अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन करत असताना विद्यापीठाकडून प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. त्यामुळे परीक्षांची तयारी करायची की, मुलाखत द्यायची अशा अडचणीत प्राध्यापक आहेत. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने परीक्षेनंतर मुलाखती घेण्याची मागणी प्राध्यापक, सिनेट सदस्य आणि संस्थाचालकांनी केली आहे.

पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यातील सर्व अशासकीय महाविद्यालयातील पात्र सहयोगी प्राध्यापकांकडून कॅसअंतर्गत पदोन्नतीसाठीचे अर्ज मागवण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जातील पात्र प्राध्यापकांच्या मुलाखती २३ ते २८ सप्टेंबरदरम्यान विद्यापीठात होणार आहेत. या मुलाखतींसाठी प्राध्यापकांसह प्राचार्य, विभागप्रमुख, संस्थाचालक यांनीही उपस्थित राहायचे आहे. मात्र, १५ ते २५ सप्टेंबर या कालावधीत अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा, १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत नियमित परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. महाविद्यालयांचे प्राचार्य आणि प्राध्यापक या परीक्षांचे नियोजन, प्रश्नसंच तयार करण्यात व्यग्र आहेत. याच काळात प्राध्यापकांच्या मुलाखतीचे आयोजन केल्यास, करोना काळात अनावश्यक गर्दी होऊ शकते. तसेच परीक्षांच्या नियोजनाकडे दुर्लक्ष होऊन गोंधळ होऊ शकतो. हे प्रकार टाळण्यासाठी परीक्षा झाल्यानंतर मुलाखती घेण्याची मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्यासह अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे आदींनी केली आहे. निवेदन कु लगुरू डॉ. नितीन करमळकर यांना देण्यात आले आहे.

लोकसत्ता Sun, 20 September 2020 https://epaper.loksatta.com/c/55(

# 'कॅस' अंतर्गत मुलाखतींसाठी विरोध

**विद्यापीठ अधिसभा सदस्यांचे कुलगुरूंना निवेदन**

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत मुलाखती घेण्यासाठी मुहूर्त काढला आहे. त्यास विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी विरोध केला आहे. या मुलाखती आत्ताच न घेता ऑक्टोबर महिन्यात परीक्षा झाल्यानंतर घ्याव्यात, अशी मागणी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे करण्यात आली आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पदवी व पदव्युत्तर पदवीच्या महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक परीक्षा सुरू आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेतल्या जाणार आहेत. ऑफलाइन व ऑनलाइन बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन- एमसीक्यू) पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. प्रश्नसंच काढणे, परीक्षेचे नियोजन करणे यात प्राध्यापक गुंतलेले आहेत. असे असताना शैक्षणिक विभागाने २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत कॅस अंतर्गत प्राध्यापकांच्या मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यास अधिसभा सदस्यांनी विरोध केला आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सह कार्यवाह जोत्स्ना एकबोटे, अधिसभा सदस्य डॉ. श्यामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर यांनी ही यासंदर्भात निवेदन दिले आहे.



**परीक्षेच्या काळात मुलाखती अयोग्य**

डॉ. श्यामकांत देशमुख म्हणाले, प्राध्यापकांची पदोन्नतीसाठी कॅसच्या मुलाखती महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे परीक्षेच्या काळात या मुलाखती ठेवणे योग्य नाही. अन्यथा प्राध्यापक परीक्षेचे काम सोडून स्वतःची फाइल तयार करण्यासाठी वेळ देतील, याचा परिणाम परीक्षेवर होऊ शकतो. परीक्षा झाल्यानंतर या मुलाखती घ्याव्यात, अशी मागणी कुलगुरूंकडे केली आहे.

**Kesari: 20.9.2020**

# अंतिम वर्ष परीक्षांसाठी विद्यापीठाकडून समिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे : कोणत्याही अडथळ्यांशिवाय अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रमनिहाय आणि जिल्हानिहाय समन्वय समितीची स्थापना केली आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यांतील महाविद्यालयांच्या प्राचार्यांची समितीमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. समितीमधील प्राचार्य, महाविद्यालयांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली असल्याची माहिती परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत विद्यार्थी, प्राध्यापक, पालक, कर्मचारी या घटकांना कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास त्यांना या समितीतील प्राचार्यांशी संपर्क साधता येईल.

लोकसत्ता Sat, 19 September 2020 https://epaper.loksatta.com/c/55067078

# अंतिम वर्ष परीक्षेसाठी समन्वय समिती स्थापन

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. १९ - अंतिम वर्षाच्या परीक्षांचे अडथळ्यांशिवाय योग्य नियोजन करण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रमनिहाय आणि जिल्हानिहाय समन्वय समितीची स्थापना केली असून, समितीवर एकूण तीस प्राचार्यांची नियुक्ती केली आहे.

पुणे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असणाऱ्या पुणे, नगर, नाशिक अशा तिन्ही जिल्ह्यांतील कॉलेज व प्राचार्यांची प्राचार्यांची समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत विद्यार्थी, प्राध्यापक, पालक कर्मचारी आदींना कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास ते यादीतील प्राचार्यांशी संपर्क साधू शकतात. यातील प्राचार्यांची नावे; तसेच त्यांच्या कॉलेजांची नावे विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रकाशित करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती वेबसाइटवर मिळेल.

**Prabhat: 20.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

# ऑफलाइन परीक्षेसाठी असणार ५० परीक्षा केंद्र

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ।

### ऑफलाइन परीक्षेसाठी नवा विकल्प अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन केले जात असून विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुमारे ५० केंद्रांवर घेतली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या जवळचे परीक्षा केंद्र निवडावे यासाठी विद्यापीठाकडून लवकर विकल्प अर्ज भरुन घेतला जाणार आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील सुमारे ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देतील. या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्याबाबत विद्यापीठ पातळावर विविध स्वरुपाची तयारी केली जात आहे. या पूर्वी विद्यापीठाने ऑफलाइन व ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विकल्प अर्ज भरुन घेतला. त्यातील सुमारे १ लाख ८६ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दर्शविली आहे. तर उर्वरित सुमारे ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने 'ओएमआर शीट'द्वारे परीक्षा देणार आहेत.

पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमध्ये एकट्या पुणे जिल्ह्यात ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २२ हजार आहे. तर उर्वरित विद्यार्थी नगर व नाशिक जिल्ह्यातील आहेत. कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाकडून सर्व सुविधा उपलब्ध असणाऱ्या महाविद्यालयांची निवड परीक्षा केंद्र म्हणून निवड केली जात आहे. त्यातही काही महाविद्यालयांच्या आवारातील वसतिगृह कोविड केअर सेंटर म्हणून जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेतली आहेत. त्यामुळे या इमारतीमध्ये परीक्षा केंद्र देणे शक्य होत नाही. परिणामी, विद्यापीठातर्फे इतर पर्यायांचा विचार केला जात आहे, असे सूत्रांनी सांगितले.

विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे. परंतु, ऑफलाइन परीक्षा केव्हा घेतली जाणार याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा एकाच वेळी घेऊन प्राध्यापक, प्रशासन व परीक्षा विभागावर ताण येऊ शकतो. त्यामुळे दोन्ही परीक्षा स्वतंत्र घेतल्या जाऊ शकतात. त्यातच विद्यापीठ अनुदान आयोगाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत दिल्याने विद्यापीठाला परीक्षा घेण्यासाठी अवधी मिळाला आहे.

#### विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार केला जाईल

ऑनलाईन-ऑफलाईन परीक्षेचा विकल्प अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांना कोणत्या परीक्षा केंद्रात द्यावयाची आहे, याबाबतचा विकल्प अर्ज विद्यापीठाकडून लवकरच उपलब्ध करुन दिला जाणार आहे. परंतु, विद्यार्थ्यांच्या किंवा जवळच्या महाविद्यालयात परीक्षा देता येईल, असे विद्यापीठाने यापूर्वी स्पष्ट केले होते. त्यामुळे विद्यापीठाकडून उपलब्ध करुन दिल्या जाणा-या महाविद्यालयातील परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर ठिकाणच्या महाविद्यालयात परीक्षा देणे सोईचे असेल, तर विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार केला जाणार आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



Pune Main
Page No. 2 Sep 20, 2020
Powered by: erelego.com

# नापास विद्यार्थ्यांची परीक्षा महिनाभरात

## रिझल्टवर कोविडचा शिक्का नसणार



संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - अंतिम वर्षाची परीक्षा १ ऑक्टोबरपासून ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. परीक्षा झाल्यानंतर निकाल १० ऑक्टोबरपासूनच लागायला सुरुवात होईल. विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर कोविडचा शेरा देण्यात येणार नाही. तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा राहिली तर तातडीने घेणार. त्याचप्रमाणे नापास झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा एका महिन्यात घेण्यात येईल. त्यांनाही पदवीचे प्रमाणपत्र दिले जाईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज दिली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत आढावा घेण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत हे संभाजीनगरच्या दौऱ्यावर होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना उदय सामंत यांनी परीक्षेविषयीची माहिती दिली.

■ अंतिम वर्षातील १ लाख १६ हजार ४०० विद्यार्थ्यांपैकी जवळजवळ ९० ते ९२ टक्के विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देतील, अशी नोंद विद्यापीठाकडे झाली आहे. तर उरलेले १० टक्के विद्यार्थी हे स्वत: जवळच्या केंद्रात ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी तयार आहेत. त्यासाठी यंत्रणा सज्ज आहे, असे उदय सामंत म्हणाले.

#### विद्यापीठाचे विभाजन होणार नाही

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे कष्टाने उभारले गेले आहे, राज्य सरकारच्या नावे विरोधक राजकारण करीत आहेत. धाराशिव उपकेंद्र विद्यापीठापासून वेगळे करण्याचा कुठलाही हेतू नाही, तसा सरकारच्या समोर प्रस्तावही नाही, असे उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

#### पदवी प्रमाणपत्राचा आदर न केल्यास कारवाई

*पदवीच्या प्रमाणपत्रांवर कोविड-१९ असा कोणत्याही प्रकारचा शेरा दिला जाणार नाही. हे पदवीचे प्रमाणपत्र हे गेल्यावर्षाप्रमाणेच दिले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मनात संभ्रम ठेवू नये. या प्रमाणपत्राचा आदर हा सर्व ठिकाणी पूर्वीप्रमाणे केला पाहिजे. या पदवीकडे जर कोणी तसे बघत नसेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आनंददायी वातावरणात परीक्षा द्यावी, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.*

**Saamana: 20.9.2020**

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । रविवार, २० सप्टेंबर २०२० ३

# 'बहि:स्थ'लाही पर्याय ऑफलाइन परीक्षेचा

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:स्थ अभ्यासक्रमाच्या पदवी आणि पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाची; तसेच बॅकलॉग विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षाही घेण्यात येणार आहे. ही परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही माध्यमातून होतील. त्यातील एक पर्याय निवडण्यासाठी विद्यार्थ्यांना २१ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे, अशी माहिती मुक्त अध्ययन प्रशाळेकडून देण्यात आली आहे.

नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम वर्षाची परीक्षा पुढच्या महिन्यात होत आहे. ही परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइनद्वारे होणार आहे. नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षेबरोबरच विद्यापीठाच्या बहि:स्थ अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षातील बॅकलॉग आणि अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा दोन्ही पर्यायातून होणार आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन माहिती भरण्यासाठी लिंक खुली केली असून, विद्यार्थ्यांनी त्यात सर्व माहिती भरण्याचे आवाहन विद्यापीठाच्या मुक्त अध्ययन प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांनी केले. बहि:स्थ अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लिंकवरून अर्ज सादर करणे आवश्यक आहे; अन्यथा विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही. 'परीक्षेचा पर्याय निवडताना अर्ज कसा सादर करावा, याची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर देण्यात आली आहे,' असेही प्रा. सोनवणे यांनी सांगितले.

#### येथे करा संपर्क

'बहि:स्थ' परीक्षेसाठी अर्ज करताना काही अडचणी अथवा शंका आल्यास विभागाच्या ०२०-२५६२२४५८/५९ या क्रमांकावर संपर्क साधावा. अर्जासाठी http://sps.unipune.ac.in/app/ या लिंकचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

### परीक्षेची कामे करणाऱ्यांनाच फक्त महाविद्यालयात बोलवा

**प्राचार्य, प्राध्यापक संघटनेची भूमिका : उच्च शिक्षण विभागाला देणार निवेदन**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या कामासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयात शंभर टक्के उपस्थिती लावावी, असा अध्यादेश राज्य शासनातर्फे नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. मात्र, सर्वांना महाविद्यालयात बोलावल्यास कोरोनाचा संसर्ग वाढण्याची भीती आहे. त्यामुळे केवळ परीक्षेचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच महाविद्यालयात बोलवावे, अशी मागणी प्राचार्य व प्राध्यापक संघटनेकडून केली जात आहे.

"सध्या काही महाविद्यालयातर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग घेतले जात आहेत. प्राध्यापक घरी बसूनसुद्धा शैक्षणिक कामे करत आहेत. कोरोनाचा फैलाव वाढत असताना सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात बोलण्याची आवश्यकता नाही. केवळ परीक्षेचे काम करणाऱ्यांनाच महाविद्यालयात बोलवावे. शासनाने इतरांना 'वर्क फ्रॉम होम'ची सुविधा द्यावी.

— डॉ. सुधाकर जाधवर, अध्यक्ष, अखिल भारतीय प्राचार्य संघटना

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर काही महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांना आठवड्यातून दोन ते तीन वेळा शैक्षणिक कामकाज करण्यासाठी बोलविले जाते. परंतु, काही संस्थाचालकांनी कोरोनाच्या काळातही प्राध्यापकांना सुमारे दोन महिन्यांपासून महाविद्यालयात १०० टक्के उपस्थिती बंधनकारक केले आहे. मात्र, आता विद्यापीठ व महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या कामासाठी १०० टक्के उपस्थित राहावे, असे निर्देश राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने दिले आहेत. परंतु, सद्य परिस्थितीमध्ये सार्वजनिक वाहतूक सुरळीतपणे सुरु झालेली नाही. त्याचप्रमाणे प्राध्यापक महाविद्यालयाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने वर्ग घेत आहेत. काही महाविद्यालयांच्या परिसरात कोविड केअर सेंटर सुरु आहे. परिणामी या महाविद्यालयांमध्ये दररोज प्राध्यापकांनी येणे आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक आहे, त्यामुळे विनाकारण सर्व प्राध्यापकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालय परिसरात बोलू नये, अशी भूमिका प्राचार्य व प्राध्यापक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली आहे.

पुटा संघटनेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. राठोड म्हणाले, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत अद्याप सुधारणा झालेली नाही. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात बोलावल्यास कोरोनाचा फैलास वाढण्याची भीती आहे. त्यामुळे केवळ परीक्षेची काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात बोलवावे. या मागणीचे निवेदन उच्च शिक्षण विभागाला दिले जाणार आहे.

Pune Main
Page No. 2 Sep 21, 2020
Powered by: erelego.com

### फक्त परीक्षेचे काम करणाऱ्यांनाच कॉलेजला बोलवा

**करोनाच्या पार्श्वभूमीवर प्राचार्य व प्राध्यापक संघटनेची मागणी**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २० -** राज्य शासनाने विद्यापीठ व महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या कामकाजासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांची महाविद्यालयात शंभर टक्के उपस्थिती अनिवार्य करण्याचा निर्णय मागे घ्यावा. करोनाचा प्रादुर्भाव कमी होताना दिसत नाही. अशा परिस्थितीत शैक्षणिक संकुलात सर्वांच्या उपस्थितीने करोनाचा संसर्ग वाढण्याचा धोका आहे. त्यामुळे केवळ परीक्षेचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच महाविद्यालयात बोलवावे, अशी मागणी प्राचार्य व प्राध्यापक संघटनेकडून होत आहे.

"सध्या काही महाविद्यालयातर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग घेतले जात आहेत. प्राध्यापक घरी बसून सुद्धा शैक्षणिक कामे करत आहेत. करोनाचा फैलाव वाढत असताना सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात बोलवण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी केवळ परीक्षेचे काम करणाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे.

**- डॉ. सुधाकर जाधवर,**
अध्यक्ष, अखिल भारतीय प्राचार्य संघटना.

करोनाच्या पार्श्वभूमीवर काही महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांना आठवड्यातून दोन ते तीन वेळा शैक्षणिक कामकाज करण्यासाठी बोलविले जाते. परंतु, काही संस्थाचालकांनी करोनाच्या काळातही प्राध्यापकांना सुमारे दोन महिन्यापासून महाविद्यालयात १०० टक्के उपस्थिती बंधनकारक केले आहे. मात्र, आता विद्यापीठ व महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या कामासाठी



१०० टक्के उपस्थित राहावे, असे निर्देश राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने दिले आहेत.

सद्यस्थितीत सार्वजनिक वाहतूक सुरळीतपणे सुरू झालेली नाही. त्याचप्रमाणे प्राध्यापक महाविद्यालयाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने वर्ग घेत आहेत.

काही महाविद्यालयांच्या परिसरात कोविड केअर सेंटर सुरू आहे. परिणामी या महाविद्यालयांमध्ये दररोज प्राध्यापकांनी येणे आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक आहे. त्यामुळे विनाकारण सर्व प्राध्यापकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालय परिसरात बा एस. एम. राठोड यांनी उच्च शिक्षण विभागाला निवेदन देणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, याबाबत राज्य शासनाने लवकर निर्णय घ्यावा. अन्यथा शेकडो कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येईल असा इशारा संघटनांनी दिला आहे.

**Prabhat: 21.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

**लोकमत**

## शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासासाठी समिती स्थापन

### राज्य शासनाचा निर्णय : पुण्यातील तीन जणांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा कार्यबल गट गठीत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. येत्या तीन महिन्यांत ही समिती सर्वकष अभ्यास करून शासनास अहवाल सादर करणार आहे. या समितीत पुण्यातील 'एमएमसीसी'चे प्राचार्य डॉ. देवीदास गोल्हार, 'सीओईपी'चे प्रा. भालचंद्र बिराजदार, अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. अजिंक्य पाटील यांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने गुणवत्तापूर्ण शिक्षण, नावीन्यपूर्ण शिक्षण व संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार केलेला आहे. या मसुद्यांबाबत राज्य शासनाकडून सूचना व अभिप्राय मागविले. त्यानुसार राज्य शासनाकडून केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे अभिप्राय व सूचनापत्राद्वारे सूचना पाठविले होते. नवीन शैक्षणिक धोरण लागू केले आहे. त्यामुळे यासंदर्भात अभ्यास करून राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी नव्याने कार्यबदल गट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माजी कुलगुरु डॉ. वसुधा कामत यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची समिती गठित करण्यात आली आहे. समितीने वेळोवेळी बैठका घेऊन अंतरिम अहवाल शासनास सादर करावा, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

Pune Main
Page No. 3 Sep 21, 2020
Powered by: erelego.com

## शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासासाठी कार्यबल गट

### अध्यक्षपदी डॉ. वसुधा कामत; १६ जणांचा समावेश

**पुणे, ता. २०** : केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा कार्यबल गट गठित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यात १६ जणांचा समावेश आहे.

एसएनडीटीच्या माजी कुलगुरू डॉ. वसुधा कामत कार्यबलगटाच्या अध्यक्ष आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष वासुदेव थोरात, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, माजी कुलगुरू डॉ. राजन वेळूकर, माजी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर, माजी कुलगुरू जे. डी. यादव, हिरानंदानी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक निरंजन हिरानंदानी, 'एमएमसीसी'चे प्राचार्य डॉ. देविदास गोल्हार, 'सीओईपी'चे भालचंद्र बिराजदार, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे अजिंक्य पाटील, मिलिंद साटम, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अजित जोशी, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ आदींचा समावेश आहे.

Sakaal: 21.9.2020

## ऐन परीक्षेच्या काळात पदोन्नतीच्या मुलाखती

**पुणे, ता. २०** : एकीकडे अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन सुरू असताना दुसरीकडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत मुलाखती घेण्यासाठी मुहूर्त काढला आहे. त्यास विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी विरोध केला आहे. या मुलाखती ऑक्टोबर महिन्यात परीक्षा झाल्यानंतर घेण्याची मागणी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे करण्यात आली आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पदवी व पदव्युत्तर पदवीच्या महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक परीक्षा सुरू आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेतल्या जाणार आहेत. ऑफलाइन व ऑनलाइन बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन- एमसीक्यू) पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. प्रश्नसंच काढणे, परीक्षेचे नियोजन करणे यात प्राध्यापक गुंतलेले आहेत. असे असताना शैक्षणिक विभागाने २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत कॅस अंतर्गत प्राध्यापकांच्या मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यास अधिसभा सदस्यांनी विरोध केला आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सह कार्यवाह जोत्स्ना एकबोटे, अधिसभा सदस्य डॉ. श्यामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर यांनी ही यासंदर्भात निवेदन दिले आहे. डॉ. देशमुख म्हणाले, ''प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅसच्या मुलाखती महत्त्वाच्या आहेत, त्यामुळे परीक्षेच्या काळात या मुलाखती ठेवणे योग्य नाही. अन्यथा प्राध्यापक परीक्षेचे काम सोडून स्वतःची फाइल तयार करण्यासाठी वेळ देतील, याचा परिणाम परीक्षेवर होऊ शकतो.''

Sakaal: 21.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी परीक्षा खडतर

## योग्य माहिती मिळत नाही; प्राचार्यांना सूचना दिल्याचे विद्यापीठाचे म्हणणे

पुणे, ता. २० : अंतिम परीक्षेवरून सर्वच विद्यार्थी गोंधळले आहेत, तर माझ्यासारख्या दृष्टिहीन विद्यार्थ्यांनी परीक्षा कशी द्यायची हा मोठा प्रश्नच आहे. मी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडलेला आहे. पण, त्यासाठी विद्यापीठ काय सुविधा देणार, हे अद्याप तरी मला माहीत नाही, असे सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून अर्थशास्त्रात एम. ए. करणारा महेश भारती सांगत होता.

'कोरोना'मुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. या परीक्षा रद्द कराव्या अशी राज्य सरकारची भूमिका होती. पण सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेण्याचे आदेश दिले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉईस क्वेश्चन- एमसीक्यू) पद्धतीने परीक्षा घेण्याचे निश्चित केले आहे. ८५ टक्के विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देणार आहेत.

पुण्यातील अनेक महाविद्यालयात दृष्टिहीन विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाला आहेत. पुणे विद्यापीठाने परीक्षेसाठी काढलेल्या परिपत्रकात दिव्यांगांना २० मिनिटे अधिक वेळ दिला जाईल असे स्पष्ट केले आहे, पण अंध विद्यार्थ्यांसाठी काय सुविधा असणार याचा उल्लेख नाही.

नॅशनल असोसिएशन फॉर द वेल्फेअर ऑफ फिजिकल चॅलेंज (एनएडब्ल्यूपीसी)चे अध्यक्ष राहुल देशमुख म्हणाले, 'पुण्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये किमान ३० ते ४० पेक्षा जास्त दृष्टिहिन विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्यभरातही संख्या मोठी आहे. हे विद्यार्थी स्क्रीन रीडिंग सॉफ्टवेअरचा वापर करतात, योग्य पद्धतीने स्मार्ट फोन वापरू शकतात. पण परीक्षेत अशा सुविधा मिळणार आहे का हे माहीत नाही. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्यांना कोरोना संसर्गाचा धोका आहे.

### नेमकी समस्या काय आहे?

इतर वेळी परीक्षेत दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी सोबत स्वयंसेवक असतात. पण आता घरी बसून ऑनलाइन परीक्षा देणार आहेत, ते प्रश्न कसे वाचणार, योग्य पर्याय कसे निवडणार, यासाठी कोणाची मदत घेता येणार आहेत का? हे अजून स्पष्ट केलेले नाही. यावर स्पष्टता येणे गरजेचे आहे.

**"अंध विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी चर्चा केली आहे. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्यांना रायटर देण्याची सूचना महाविद्यालयांना केली आहे. तर ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पीक टू. टेक्स्ट ही सुविधा दिली जाईल. याबाबत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात.**

**- डॉ. एन. एस. उमराणी**, प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ

| सुमारे २ लाख ४८ हजार | सुमारे २ लाख २३ हजार | सुमारे २५ हजार | सुमारे ८०० |
|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | नियमित विद्यार्थी | फेरपरीक्षा देणारे विद्यार्थी | दिव्यांग विद्यार्थी |

**Sakaal: 21.9.2020**

# अंतिम वर्ष अंध विद्यार्थ्यांची 'सत्त्वपरीक्षा'

## ऑनलाइन परीक्षेबाबत स्पष्टता नाही; केंद्रात पोहचण्याचाही प्रश्न

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २० - पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी अंध विद्यार्थ्यांनी ऑफलाइन व ऑनलाइनचा पर्याय निवडला. मात्र, दोन्ही पर्याय निवडलेले अंध विद्यार्थी परीक्षेबाबत संभ्रमात आहेत. ऑनलाइन परीक्षा देत असताना अंध विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाकडून अधिक स्पष्टता नाही. याउलट ऑफलाइन निवडलेल्या विद्यार्थ्यांना करोनाच्या संसर्ग काळात परीक्षा केंद्रात कसे पोहचायचे, असा प्रश्न आहे. त्यामुळे करोनाच्या काळात अंतिम वर्षाची परीक्षा अंध विद्यार्थ्यांना सत्त्वपरीक्षा ठरत आहे.

बहुतांश अंध विद्यार्थी विशेषत: ग्रामीण भागातील आहेत. त्यांच्याकडे सर्व सुविधा उपलब्ध असण्याची शक्यता नाही, अशा परिस्थितीत अंतिम वर्षाची परीक्षा कशा द्यायची, असा प्रश्न उभा राहिला आहे. आता परीक्षेचा निर्णय झाल्यानंतर अंध विद्यार्थ्यांना दोन्ही पर्याय निवडणे आवश्यक होते. त्यानुसार बहुतांश अंध विद्यार्थ्यांनी ऑनलाइनची जोखीम न पत्करता ऑफलाइनचा पर्याय निवडल्याचे दिसून आले.

उच्च शिक्षण विभागाने अंधसह दिव्यांग विद्यार्थ्यांची परीक्षा घेताना सर्व सुविधा पुरविण्याचे निर्देश विद्यापीठ व महाविद्यालयांना दिले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षेसाठी दिव्यांगांना २० मिनिटे अधिक वेळ दिला जाणार असल्याचे स्पष्ट केले. पण, अंध विद्यार्थ्यांसाठी काय सुविधा असणार याचा उल्लेख नाही. त्यामुळे ही परीक्षा देताना अंध विद्यार्थी गोंधळून गेल्याचे 'चित्र पाहावयास मिळत आहे.

"अंध विद्यार्थ्यांच्या अडचणीकडे तितकेसे लक्ष दिले जात नाही. शिक्षण घेतलेले बहुतांश अंध विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत, त्यांच्याकडे सर्व सुविधा असणे शक्य नाही. करोनाच्या प्रादुर्भावात परीक्षा केंद्रापर्यंत पोहाचणेही अडचणीचे आहे.

**- राहुल देशमुख,**
अध्यक्ष : नॅशनल असोसिएशन फॉर द वेल्फेअर ऑफ फिजिकल चॅलेंज

"अंध विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी चर्चा केली आहे. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्यांना रायटर देण्याची सूचना महाविद्यालयांना केली आहे. तर ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'स्पीक टू टेक्स्ट' ही सुविधा दिली जाईल, त्यामुळे त्यांना परीक्षा देता येणे सोपे होईल. याबाबत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात.

**- डॉ. एन. एस. उमराणी,**
प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ

### विद्यापीठाने पुढाकार घेणे आवश्यक...

विद्यापीठाच्या नगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील कार्यक्षेत्रात ७५६ दिव्यांग विद्यार्थी अंतिम वर्षाची परीक्षा देत आहेत. त्यापैकी २७७ विद्यार्थी दृष्टिदोष असलेले आहेत. ह्या सर्व विद्यार्थ्यांना अंतिम वर्षाची परीक्षा देणे अडचणीचे ठरत आहेत. त्यामुळे अंध विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी विद्यापीठ व महाविद्यालयांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.



**Prabhat: 21.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑफलाइन परीक्षेला ३ जिल्ह्यांत ५५ केंद्रे

## विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षेचे नियोजन

**पुणे, ता. २० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेचे नियोजन सुरू केले असून, ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५० हजारांच्या आसपास जाण्याची शक्यता आहे. यासाठी पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांतील ५५ महाविद्यालयांमध्ये परीक्षा केंद्रे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. कोणत्या केंद्रावर परीक्षा द्यायची आहे, हे विद्यार्थ्यांना निवडावे लागणार आहे.**

विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेसाठी पर्याय निवडण्यास सांगितले आहे. त्यानुसार २ लाख ४८ हजार विद्यार्थ्यांपैकी सुमारे १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दर्शविली आहे. उर्वरित विद्यार्थी ऑफलाइन परीक्षा देणार आहेत. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात ऑप्टिकल मार्क रेकग्नायझेशन (ओएमआर) शीट उपलब्ध करून दिली जाणार आहे. दरम्यान, अद्यापही १० हजार विद्यार्थ्यांनी कोणताच पर्याय निवडला नाही. त्यांच्यासाठी सोमवारी (ता.२१) सायंकाळपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. पर्याय न निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यामुळे ऑफलाइन



परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५० हजारांच्या जवळपास जाणार आहे. ५० हजार विद्यार्थ्यांपैकी २२ ते २३ हजार जण पुणे जिल्ह्यातील आहेत. सोशल डिस्टन्स ठेवून परीक्षा घेण्याचे मोठे आव्हान विद्यापीठासमोर आहे. यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळ किंवा गावाजवळील परीक्षा केंद्र निवडण्याची संधी दिली जाणार असून, त्यासाठी विद्यापीठाचे नियोजन सुरू आहे.

**२ लाख ४८ हजार**
**परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या**

**३९ हजार**
**ऑफलाइनचा पर्याय निवडलेले विद्यार्थी**

**१ लाख ८५ हजार**
**ऑनलाइनचा पर्याय निवडलेले विद्यार्थी**

**१० हजार**
**पर्याय न निवडलेले विद्यार्थी**

### गरजेनुसार संख्या वाढविणार

ज्या विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडला आहे, त्यांच्या परीक्षेसाठी सुमारे ५५ केंद्रांची व्यवस्था केली जाईल. गरजेनुसार ही संख्या वाढवली जाईल. अद्याप ज्यांनी ऑनलाइन व ऑफलाइनचा पर्याय निवडला नाही, त्यांच्यासाठी सोमवारची अखेरची मुदत आहे. पर्याय निवडला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षा द्यावी लागणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.



- इंटरनेटच्या अभावामुळे ऑफलाइनची निवड
- शहरी भागातील विद्यार्थ्यांची ऑनलाइनला अधिक पसंती
- पेपर सोडविण्यासाठी 'ओएमआर शीट' देणार
- पर्याय निवडण्यासाठी आज शेवटची मुदत

**Sakaal: 21.9.2020**

# महाविद्यालयांत कोविड सेंटर; परीक्षा केंद्रासाठी पर्यायांचा शोध

## विद्यापीठ प्रशासनाकडून तयारी

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. २० - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन केले जात आहे. विद्यापीठाच्या ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा केंद्रात होणार आहे. काही महाविद्यालयांच्या आवारातील वसतीगृह कोविड केअर सेंटर म्हणून जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेतली आहेत. त्यामुळे अशा इमारतीमध्ये परीक्षा केंद्र देणे शक्य नाही. परिणामी, विद्यापीठातर्फे इतर पर्यायांचा विचार केला जात असल्याचे तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या जवळचे परीक्षा केंद्र निवडावे यासाठी विद्यापीठाकडून लवकरच विकल्प अर्ज भरून घेतला जाणार असल्याचे

विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील सुमारे ५0 हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्याबाबत विद्यापीठ पातळीवर तयारी केली जात आहे. यापूर्वी विद्यापीठाने ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विकल्प अर्ज भरून घेतला. त्यातील सुमारे १ लाख ८६ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दर्शविली आहे. तर उर्ववित सुमारे ५0 हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने 'ओएमआर शीट'द्वारे परीक्षा देणार आहेत.

दरम्यान, तीन जिल्ह्यांमध्ये एकट्या पुणे जिल्ह्यात ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २२ हजार आहे. तर उर्वरित विद्यार्थी नगर व नाशिक जिल्ह्यातील आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाकडून सर्व सुविधा उपलब्ध असणाऱ्या महाविद्यालयांची निवड परीक्षा केंद्र म्हणून निवड केली जात आहे.

**Prabhat: 21.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

लोकमत

मराठा आरक्षणाला स्थगिती : ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास लागणार वेळ

# अकरावीचे वर्ग सुरु होण्यास दिवाळी उजाडणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे राज्यातील अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. तसेच यापुढे ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास सुमारे एक ते दीड महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे इयत्ता अकरावीचे ऑनलाइन वर्ग दिवाळीनंतरच सुरु होतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविली जात होती. मराठा आरक्षणाला स्थगिती मिळाल्यामुळे सद्य परिस्थितीत सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील (एसईबीसी) प्रवेश देता येणे शक्य नाही. मात्र, अकरावीच्या अनेक विद्यार्थ्यांनी एसईबीसी संवर्गातून प्रवेश मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेत काही बदल करून पुन्हा नव्याने प्रवेश प्रक्रिया राबवण्याची वेळ येऊ शकते. परिणामी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास पुढील एक ते दीड महिना लागण्याची शक्यता नाकारता येत आहे.

### दहावीचा निकाल अन् न्यायालयाच्या निर्णयाचा परिणाम

पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी प्रवेशासाठी यापूर्वी सहा ते सात फेऱ्या घेतल्या गेल्या. त्यामुळे पुण्यातील नामांकित महाविद्यालयातील अकरावीचे वर्ग ऑगस्ट महिन्यात, तर काही महाविद्यालयांतील वर्ग सप्टेंबर महिन्यात सुरु झाले होते. वर्ग उशिरा सुरु झाले तरी; दिवाळीपूर्वी पहिल्या सत्रातील अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयांतर्फे पूर्ण केला जात होता. मात्र, यंदा कोरोनामुळे लांबलेला दहावीचा निकाल आणि न्यायालयाने मराठा आरक्षणाला दिलेली स्थगिती यामुळे प्रवेश प्रक्रियेस चांगलाच विलंब झाला आहे. त्यामुळे यंदा दिवाळीनंतरच अकरावीचे वर्ग सुरु होतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

"अकरावी प्रवेश प्रक्रियेला सध्या स्थगिती दिली आहे. प्रवेश प्रक्रिया केव्हा सुरु होणार याबाबतही अद्याप स्पष्टता आलेली नाही. त्यामुळे यंदा अकरावीच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर ऑनलाइन वर्ग घेण्यासाठीसुद्धा दिवाळी उजाडणार असे दिसून येत आहे.

– **प्रा. संतोष फासगे**, अध्यक्ष, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, पुणे

Pune Main
Page No. 3 Sep 21, 2020
Powered by: erelego.com

# ऑफलाइन परीक्षेसाठी निवडा परीक्षा केंद्र

### अंतिम वर्ष परीक्षा

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेचे नियोजन सुरू केले आहे. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५० हजारांच्या जवळ जाण्याची शक्यता आहे. यासाठी पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यात ५५ महाविद्यालयांमध्ये परीक्षा केंद्र उपलब्ध करून दिली जाणार आहेत. कोणत्या केंद्रावर परीक्षा द्यायची आहे, हे विद्यार्थ्यांना निवडावे लागणार आहे. विद्यापीठाने ऑनलाइन आणि ऑफलाइन परीक्षेसाठी पर्याय निवडण्यास आवाहन केले आहे.

विद्यार्थ्यांना महाविद्यालयात ऑप्टिकल मार्क रेकग्नायझेशन (ओएमआर) शीट उपलब्ध करून दिली जाणार आहेत. दरम्यान अद्यापही १० हजार विद्यार्थ्यांनी कोणताच पर्याय दिला नाही. त्या विद्यार्थ्यांसाठी आज (सोमवारी) सायंकाळपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली नाही त्या सर्वांना ऑफलाइन परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यामुळे ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या या विद्यार्थ्यांची संख्या ५० हजारांच्या जवळपास जाणार आहे.

५० हजार विद्यार्थ्यांपैकी त्यातील २२ ते २३ हजार जण पुणे जिल्ह्यातील आहेत. ही संख्या मोठी असल्याने कोरोनाच्या काळात त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, ज्या विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडला आहे, त्यांच्या परीक्षेसाठी सुमारे ५५ केंद्रात व्यवस्था केली जाईल. गरजेनुसार केंद्रांची संख्या वाढवली जाईल. अद्याप ज्यांनी ऑनलाइन आणि ऑफलाइनचा पर्याय निवडला नाही, त्यांच्यासाठी सोमवारची अखेरची मुदत आहे, त्यांनी पर्याय निवडला नाही, तर ऑफलाइन परीक्षा द्यावी लागेल.

**Kesari: 21.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# राज्यात 'व्हर्टिकल युनिव्हर्सिटी'

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राज्यात सरकारी किंवा खासगी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जागा हवी, अशी महत्त्वाची अट असते. राज्य सरकारने त्याचा नव्याने विचार करण्याचे ठरवले आहे. राज्यात 'व्हर्टिकल युनिव्हर्सिटी' ही संकल्पना राबविण्याचा विचार असून, त्यात जागेची अट असणार नाही. त्यामुळे नव्या विद्यापीठांच्या स्थापनेचा मार्ग सुलभ होणार आहे,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी दिली.

प्रीमिनंट एज्युकेशन अँड रिसर्च असोसिएशन (पेरा) या खासगी विद्यापीठांच्या संघटनेतर्फे आयोजित 'व्हर्च्युअल एज्युकेशन फेअर'चे उद्घाटन सामंत यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. या वेळी पेरा संघटनेचे अध्यक्ष डॉ. मंगेश कराड, उपाध्यक्ष भरत अग्रवाल, डॉ. स्वाती मुजुमदार, डॉ. सुधीर गव्हाणे, डॉ. संदीप झा, एन. टी. राव, डॉ. अश्विनकुमार शर्मा, डॉ. व्ही. ए. रायकर, डॉ. एकनाथ खेडकर, डॉ. संजीवन असुड, डॉ. सायली गणकर, डॉ. प्रभात रंजन, डॉ. मनीमाला पुरी, डॉ. मिलिंद पांडे आदी उपस्थित होते.

सामंत म्हणाले, की नवीन शिक्षण धोरण राबविताना खासगी विद्यापीठांच्या प्रतिनिधींची नियुक्ती धोरणासंबंधीच्या समितीत करण्याचा आमचा मानस आहे. ही समिती नेहमीच खासगी विद्यापीठांशी संवाद ठेवून काम करेल. करोना संकटावर मात करून राज्यातील विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या प्रगल्भ झाले पाहिजेत. त्यांना चांगले मार्गदर्शन मिळाले पाहिजे. व्हर्च्युअल एज्युकेशन फेअर महाराष्ट्राच्या जडणघडणीला वेगळी दिशा देणारे ठरेल. 'करोनाच्या संकटकाळात खासगी विद्यापीठांनी एकत्र येऊन जगातील आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांना काही नवे देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा,' असेही सामंत यांनी सांगितले. डॉ. कराड म्हणाले, 'नवीन शिक्षण धोरणानुसार काही परदेशी विद्यापीठांना भारतात येण्याची परवानगी दिली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठांसोबत आमची स्पर्धा आहे. भविष्यातील बदलाची नांदी ओळखून बेस्ट प्रॅक्टिसपेक्षा नेक्स्ट प्रॅक्टिससाठी आम्ही कार्य करत राहू. 'थिंक टँक' होऊन राज्याच्या उच्च शिक्षणाला दिशा देण्याचा प्रयत्न करणार आहोत. डॉ. अग्रवाल म्हणाले, 'खासगी विद्यापीठांचा अधिक काम करण्याचा मानस आहे. राज्य सरकार आणि शिक्षण मंत्रालयाकडून सहकार्य मिळत राहावे.'

> 'जीआर' काढल्यानंतर मागे घेणारा मंत्री नसून, कोणतेही नियम जाचक असू नयेत, या मताचा मी आहे. भविष्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देताना संस्थाचालकांनी चांगल्या वातावरणात संस्था चालवली पाहिजे. सरकारचे नियम आणि बंधने त्यालाच पूरक असली पाहिजेत. सरकारचा प्रतिनिधी म्हणून मी संस्थाचालकांच्या अडचणी सोडविण्याचा आमचा प्रयत्न राहील
> – उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

Scanned with CamScanner

Maharashtra Times: 21.9.2020

# 'श्रेणीसुधार'साठी १७ हजार अर्ज

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रमांचे अंतिम वर्ष वगळता इतर वर्षांच्या जाहीर केलेल्या निकालानंतर, १७ हजार विद्यार्थ्यांनी श्रेणीसुधार परीक्षा देण्यासाठी अर्ज केला आहे. एकूण उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत ही संख्या कमी आहे. मात्र, आता या विद्यार्थ्यांची विद्यापीठाला परीक्षा घ्यावी लागणार असून, सुरक्षित नियोजन करावे लागणार आहे.

करोना संसर्गामुळे विद्यापीठाच्या परीक्षांचा प्रश्न निर्माण झाला होता. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) जाहीर केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यापीठाने वर्षभरातील अंतर्गत मूल्यमापनानुसार अंतिम वर्ष वगळता अन्य वर्षांचा निकाल जाहीर केला. विविध अभ्यासक्रमांच्या जवळपास ४ लाख ३६ हजार विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात आला. यातील उत्तीर्ण झालेल्या १७ हजार विद्यार्थ्यांनी श्रेणीसुधार परीक्षेसाठी अर्ज केला आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या तुलनेत ही संख्या कमी आहे. अंतिम वर्ष वगळता अन्य वर्षांच्या विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापनानुसार श्रेणी देण्यात आली. मात्र, सुमारे १७ हजार विद्यार्थ्यांनी श्रेणीसुधार परीक्षेसाठी अर्ज केला आहे. त्यामुळे आता या विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी लागणार आहे. ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने ही परीक्षा घेण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून दिली आहे.

## ऑफलाइन परीक्षेसाठी चाळीस हजार विद्यार्थी

'विद्यापीठाला अंतिम वर्षाच्या जवळपास चाळीस ते पंचेचाळीस हजार विद्यार्थ्यांची ऑफलाइन परीक्षा घ्यावी लागणार आहे. साधारणतः १८ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन आणि ऑफलाइन यापैकी कोणताच पर्याय निवडलेला नाही. त्यामुळे आता महाविद्यालयांच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांकडे पाठपुरावा करून त्यांचे पर्याय भरून घेतले जातील,' अशी माहिती मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

Maharashtra Times: 21.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# College begins at home with virtual lectures, downloaded books & notes

## Bonding With Friends And Professors Sorely Missed

**Swati Shinde Gole & Ardhra Nair | TNN**

**Pune:** The new academic session for senior colleges has begun, but the charm of meeting new classmates, the first day orientation session amidst a packed hall, and the face-to-face interaction is missing.

Colleges organised online orientation sessions for students to kickstart the academic year for various undergraduate courses even as many of them started without new books or meeting new friends.

A first-year Bachelor of Arts student, Rozmin Bhagat, said the first day is always special to students as well as teachers.

"We are excited and nervous about new beginnings in life. But virtual studies were new as well, so I felt nervous and we still met our friends through the screen but it wasn't the same," he added.

Bhagat said the virtual learning was not easy and it was difficult to concentrate through the screen and then there were connectivity issues as well. "But, on the brighter side at least our academic year is not spent in vain and we are moving forward with this new situation and getting used to it," he said. Classes started on September 1.

Another student, Riya Jahir Samnani, from St Mira's College who has taken admission to the bachelor in business administration degree, said, "I miss my classroom, my friends and my teachers a lot. Attending the class physically and attending it online has a huge difference. Online attending is like just sitting with our phones or laptop and it's so difficult to sit for hours and hours. When we used to attend lectures by going to our colleges it was so amazing, we had teachers to interact with our friends talking between lectures. We used to have great fun during our college time."

Now, the students do not have any physical activities as they had earlier like competitions, events in colleges. "After college, we all friends used to chill out, and now it's just spending hours and hours on the phone. We had seven days of induction programme in which we got to know about different courses, internships, club programmes and other stuff. On the first day, I logged in and I saw so many students joining and everything was new for me then and even now," she added.

Srihari Sathe, a student of Brihan Maharashtra College of Commerce, said, "The first day charm of sitting in classrooms knowing new mates, getting introduced to the teachers and strolling inside the new college has vanished this year as a result of Covid. Even the orientation that took place was not as exciting."

Principal of St Mira's College, Gulshan Gidwani, said lectures for the first year of degree college have commenced from September 1. There is no doubt that online teaching is a challenge and no substitute for face-to-face teaching. Teaching learning is also a facial activity and as such there are limitations to online teaching no doubt. But we have had a six day induction programme for our fresh students and from the feedback received from faculty and students it has been highly encouraging."

At the St Mira's College, the management has been able to conduct all activities online right from teaching to extra curricular activities, competitions, cultural events and even a virtual newsletter with three volumes so far.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College of Arts Science and Commerce, Shivajinagar said they started online teaching from August 1. "At the PG level, we have 100% attendance. We had a live interaction with students using our YouTube channel. For first-year students, we had a three-day online induction," he added.

The institute is also doing co-curricular activities in the online mode. "Our library is well-automated and we have an institutional repository. All the e-content developed is easily available to students at home through this IR facility. We have also created a principal's virtual office where visitors who come to college for interaction can do so via Google Meet," he said.

The college also has a technical team that helps in cyber security.

### DEALING WITH NEW WAYS OF LEARNING



- Students must set aside an hour a day of study for your course matter
- Keep track of the syllabus, and what is being taught
- Check specific duration and time commitments and put it down in your calendar
- Some portion will be self-paced, other sections can go on for some time
- At home, keep a place to do your self-study, keep it stocked with notebooks and study material
- Invest in a good headphone, software and a note-taking app
- Take down notes when classes are live; it will help retain information; record lectures
- Observe class discipline; do not disrupt the class
- Remember, everyone is also coping with online teaching

### EXPERTS' CAUTION



- According to reports, experts have said that online courses work for highly skilled, highly motivated people
- Those who struggle with studies in college need in-person professors
- When there is a disconnect, low-performers may fall back in online learning

**The Times of India: 21.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### ऑनलाइन परीक्षेसाठी सेतू सुविधा : उदय सामंत

#### मुक्त विद्यापीठाच्या परीक्षांसंदर्भात आढावा

**नाशिक, ता. २० :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेला १ लाख ४१ हजार विद्यार्थी सामोरे जाणार आहेत. यापैकी सुमारे ३८ हजार विद्यार्थी ऑफलाइन स्वरूपात परीक्षा देतील. तर, ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना सेतू सुविधा तसेच, आपले सरकार केंद्र उपलब्ध करून देण्यासंदर्भात विचार केला जाईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी दिली.

सामंत यांनी मुक्त विद्यापीठात आढावा बैठक घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सामंत म्हणाले, मंगळवारपर्यंत (ता. २२) मुक्त विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. तर ३० ऑक्टोबरपर्यंत अंतिम वर्षाच्या परीक्षा पार पडतील. विद्यार्थ्यांना ऑनलाइन तसेच ऑफलाइन असे दोन्ही पर्याय उपलब्ध करून दिले जातील. प्रारंभी ऑनलाइन परीक्षा घेतली जाईल. ज्या विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली नाही, त्यांना सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार केंद्राद्वारे परीक्षेचा विकल्प दिला जाईल. यानंतरही परीक्षा न दिलेल्या विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षा देण्याचा पर्याय असेल.

**उपकेंद्राचे दिवाळीत बांधकाम**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपकेंद्र उभारणीचे काम दिवाळीदरम्यान सुरू केले जाईल, तर येत्या जानेवारी २०२१पासून उपकेंद्राच्या माध्यमातून शिक्षणक्रमांना सुरुवात होईल, यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती उदय सामंत यांनी दिली.

**Sakaal: 21.9.2020**

### विद्यार्थ्यांमधील संभ्रम कायम : प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याची मागणी

### प्रश्नसंच नव्हे, नमुना प्रश्नांद्वारे सराव परीक्षा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २१ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सुमारे ८५ टक्के विद्यार्थी ऑनलाइनद्वारे अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. मात्र, त्यांना विद्यापीठाकडून परीक्षेपूर्वी प्रश्नसंच उपलब्ध करून दिले जाणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले. त्याऐवजी नमुना प्रश्नांद्वारे सराव परीक्षा घेतली जाणार आहे.

पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाची परीक्षा ऑक्टोबरमध्ये होत आहे. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉईस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे. विद्यार्थ्यांनी आतापर्यंत दीर्घोत्तरी प्रश्नांना अनुसरून अभ्यासाची तयारी केली आहे. आता मात्र 'एमसीक्यू' पद्धतीने प्रश्न विचारला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थी संभ्रमात आहेत. त्या पार्श्वभूमीवर परीक्षेपूर्वी प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी विद्यार्थ्यांनी राज्य सरकार व विद्यापीठाकडे केली होती. उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मुंबई विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध होतील, अशी ग्वाही दिली होती. त्यावरून पुणे विद्यापीठातील परीक्षार्थीही प्रश्नसंचच्या प्रतीक्षेत होते. मात्र, प्रश्नसंच न देता केवळ नमुना प्रश्नांवरून सराव परीक्षा घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट होत आहे.



दरम्यान, विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावी. परीक्षेचा वेळ एक तासऐवजी दीड तास करावा, परीक्षा एमसीक्यू व असाइनमेंट बेस या दोन्ही पद्धतीने घ्यावी, अशी मागणी युवक क्रांती दलाने पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे केली आहे. यावेळी युवक क्रांती दलाचे राज्य संघटक जांबुवंत मनोहर, सहकार्यवाह अप्पा अनारसे, शहराध्यक्ष सचिन पांडूळे, उपाध्यक्ष कमलाकर शेटे उपस्थित होते.

> पुणे विद्यापीठातर्फे 'मॉक टेस्ट' होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नसंच दिले जाणार नाही. विद्यार्थ्यांना परीक्षेचा पॅटर्नची माहिती होण्यासाठी परीक्षेपूर्वी दोनवेळा नमुना प्रश्नांद्वारे सराव परीक्षा घेतली जाणार आहे.
>
> **- डॉ. मनोहर चासकर,** अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान, पुणे विद्यापीठ

**Prabhat: 22.9.2020**

### अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांची नमुना प्रश्नांद्वारे सराव परीक्षा

**पुणे :** अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेपूर्वी प्रश्न संच उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली असली तरी त्यांना प्रश्नसंच मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्याऐवजी नमुना प्रश्नांद्वारे त्यांची सराव परीक्षा घेतली जाणार आहे.

ऑक्टोबर महिन्यामध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल च्वाईस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे. विद्यार्थ्यांनी आत्तापर्यंत दिलेल्या परीक्षा व त्यासाठी केलेली तयारी ही दिर्घोत्तरी प्रश्नांसाठी केलेली आहे. आता अचानक 'एमसीक्यू' पद्धतीने प्रश्न विचारले जाणार असल्याने विद्यार्थी गोंधळात पडले आहेत. आम्हाला या पद्धतीने परीक्षेचा अभ्यास माहिती नाही. त्यामुळे प्रश्न संच उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राज्यभरातील विद्यार्थी राज्य सरकार व संबंधित विद्यापीठांकडे करत आहेत आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी १० सप्टेंबर रोजी ट्विट करत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांना परीक्षेच्या दोन दिवस आधी विद्यार्थ्यांना प्रश्न संच उपलब्ध करून द्यावा अशा सूचना दिल्याचे सांगितले होते. त्यामुळे पुणे विद्यापीठ ही प्रश्नसंच कधी देणार अशी विचारणा विद्यार्थी करत आहेत. पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, विद्यार्थ्यांना परीक्षेचा पॅटर्न कळावा यासाठी दोन वेळा नमुना प्रश्नांद्वारे सराव परीक्षा घेतली जाणार आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अशाच पद्धतीने परीक्षा घेण्याचे ठरले आहे. प्रश्नसंच उपलब्ध करून देणे, परीक्षेची वेळ एक तासा ऐवजी दीड तास करावा, परीक्षा एमसीक्यू व असाइनमेंट बेस या दोन्ही पद्धतीने घ्यावी अशी मागणी युवक क्रांती दलाच्या वतीने करण्यात आली. या मागणीचे निवेदन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांना देण्यात आले. यावेळी युवक क्रांती दलाचे राज्य संघटक जांबुवंत मनोहर, सहकार्यवाह अप्पा अनारसे, शहराध्यक्ष सचिन पांडूळे, उपाध्यक्ष कमलाकर शेटे उपस्थित होते.

**Kesari: 22.9.2020**

### प्रश्नसंच देण्यास नकार

#### नमुना प्रश्नांद्वारे सराव करण्याचा विद्यापीठाचा विद्यार्थ्यांना सल्ला



**पुणे, ता. २१ :** अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी केली जात असली; तरी त्यांना तसे प्रश्नसंच मिळणार नसल्याचे पुणे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. त्याऐवजी नमुना प्रश्नांद्वारे त्यांची सराव परीक्षा घेतली जाणार आहे.

ऑक्टोबर महिन्यात पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार आहेत. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे. विद्यार्थ्यांनी आत्तापर्यंत दिलेल्या परीक्षा व त्यासाठी केलेली तयारी ही दीर्घोत्तरी प्रश्नांसाठीची आहे. आता अचानक 'एमसीक्यू' पद्धतीने प्रश्न विचारला जाणार असल्याने विद्यार्थी गोंधळात पडले आहेत. आम्हाला 'एमसीक्यू' पद्धतीने परीक्षेचा सराव नसल्याने प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी राज्यभरातील विद्यार्थी राज्य सरकार व संबंधित विद्यापीठांकडे करत आहेत. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी १० सप्टेंबरला ट्विट करत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांना परीक्षेच्या दोन दिवसआधी विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, अशी सूचना दिल्याचे सांगितले होते. त्यामुळे पुणे विद्यापीठही प्रश्नसंच कधी देणार? अशी विचारणा विद्यार्थी करत आहेत.

पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, 'परीक्षेचा पॅटर्न कळावा, यासाठी दोनवेळा नमुना प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेतली जाणार आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अशाच पद्धतीने परीक्षा घेण्याचे ठरले आहे.'

**परीक्षेची वेळ वाढवा**

युवक क्रांती दलाने परीक्षेसंदर्भात कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांना निवेदन दिले. प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, परीक्षेचा कालावधी दीड तास करावा आदी मागण्या त्यांनी केल्या आहेत. या वेळी पवार यांनी परीक्षेपूर्वी दोन ते तीन सराव परीक्षा होतील. त्यात नमुना प्रश्न विचारले जाणार आहेत. त्यामुळे प्रश्न कसे असणार, याबाबत स्पष्टता येईल. परीक्षेची वेळ वाढविण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करू, असे पवार यांनी या वेळी सांगितले. या वेळी युवक क्रांती दलाचे राज्य संघटक जांबुवंत मनोहर, सहकार्यवाह आप्पा अनारसे, शहराध्यक्ष सचिन पांडुळे, उपाध्यक्ष कमलाकर शेटे उपस्थित होते.

**Sakaal 22.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# प्रश्नसंचाऐवजी सराव चाचणी

### अंतिम वर्ष विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून सुविधा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अंतिम वर्ष परीक्षा बहुपर्यायी पद्धतीने होणार असल्याने विद्यार्थ्यांना ही पद्धत समजण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रश्नसंच देण्याची सूचना विद्यापीठांना केली आहे. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्रश्नसंचाऐवजी सराव चाचणीची सुविधा दिली जाणार असून, परीक्षेपूर्वी पाच ते सहा दिवस आधी सराव चाचणीची सुविधा उपलब्ध होईल.

विद्यापीठाकडून अंतिम वर्षाची परीक्षा बहुपर्यायी स्वरूपाची, एक तास वेळाची आणि ५० गुणांची घेतली जाणार आहे. बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नेमण्यात आली आहे. प्रत्येक विषयाचा प्रश्नसंच तयार करण्यात येणार आहे. त्यातील साठ प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारले जातील. सरावासाठी प्रश्नसंच कधी मिळणार असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून विचारण्यात येत आहे. मात्र विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना सराव चाचणी दिली जाणार आहे.

विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, 'विद्यापीठाकडून ऑनलाइन सराव चाचणीची सुविधा दिली जाणार आहे. परीक्षेपूर्वी पाच ते सहा दिवस आधी ही सुविधा उपलब्ध होईल.'

**ऑफलाइन परीक्षा घेण्यासाठी ५५ महाविद्यालयांना विचारणा**

ऑनलाइनची सुविधा उपलब्ध नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून ऑफलाइन परीक्षाही घेतली जाणार आहे. जवळपास ३९ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑफलाइन हा पर्याय निवडला आहे. त्यामुळे ऑफलाइन परीक्षा आयोजित करण्यासाठी विद्यापीठाकडून कार्यक्षेत्रातील ५५ महाविद्यालयांना विचारणा करण्यात आली आहे.

**परीक्षेसाठी वेळ वाढवून देण्याची मागणी**

विद्यापीठाकडून एक तासाची परीक्षा घेतली जाणार आहे. त्यामुळे या परीक्षेसाठी एक तासाऐवजी दीड तास वेळ देण्याची मागणी युवक क्रांती दलाने विद्यापीठाकडे केली आहे. दीड तास वेळ मिळण्यासह प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

लोकसत्ता Tue, 22 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55118425

पुढारी

# प्रश्नसंचाऐवजी थेट सराव चाचणीच

### अंतिम वर्ष विद्यार्थ्यांना विद्यापीठाची सुविधा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्ष परीक्षा बहुपर्यायी पद्धतीने होणार असल्याने विद्यार्थ्यांना ही पद्धत समजण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रश्नसंच देण्याची सूचना विद्यापीठांना केली आहे. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्रश्नसंचाऐवजी सराव चाचणीची (मॉक टेस्ट) सुविधा दिली जाणार असून, परीक्षेपूर्वी पाच ते सहा दिवस आधी सराव चाचणीची सुविधा उपलब्ध होईल.

बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नेमण्यात आली आहे. प्रत्येक विषयाचे प्रश्नसंच तयार करण्यात येणार आहेत. त्यातील साठ प्रश्न परीक्षेत विचारले जातील. सरावासाठी प्रश्नसंच कधी मिळणार, असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून विचारण्यात येत आहे. मात्र, विद्यार्थ्यांना सराव चाचणी दिली जाणार आहे.

**५५ महाविद्यालयांना ऑफलाइनसाठी विचारणा**

ऑनलाइनची सुविधा नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून ऑफलाइन परीक्षाही घेतली जाणार आहे. ऑफलाइन परीक्षा आयोजिण्यासाठी विद्यापीठाकडून कार्यक्षेत्रातील ५५ महाविद्यालयांना विचारणा करण्यात आली आहे. त्यांच्याकडे उपलब्ध सोयीसुविधा ऑफलाइन परीक्षेसाठी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे या महाविद्यालयांच्या प्रतिसादानंतर केंद्रे निश्चित करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने म्हटले आहे.

**वेळ वाढवून देण्याची मागणी**

विद्यापीठाकडून एक तासाची परीक्षा घेतली जाणार आहे. त्यामुळे या परीक्षेसाठी एक तासाऐवजी दीड तास वेळ देण्याची मागणी युवक क्रांती दलाने विद्यापीठाकडे केली आहे. दीड तास वेळ मिळण्यासह प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. या मागण्यांचे निवेदन युवक क्रांती दलाचे राज्य संघटक जांबुवंत मनोहर, सहकार्यवाह अप्पा अनारसे, शहराध्यक्ष सचिन पांडुळे, उपाध्यक्ष कमलाकर लेटे यांनी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांना दिले.

My Pune Edition
Sep 22, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### महाविद्यालयांतील १०० टक्के उपस्थिती; आदेश बदलला

**मुंबई :** राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची १०० टक्के उपस्थिती अनिवार्य करणारा आदेश तीनच दिवसांत मागे घेण्यात आला आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने १८ रोजी १०० टक्के उपस्थितीचा आदेश काढला होता. त्यात बदल करण्यात आला आहे. आदेशात म्हटले आहे की, अकृषी विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन जशी शक्य आहे तशी गरजेनुसार लागू राहील. परीक्षा वा परीक्षांशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे, महाविद्यालयांनी निर्णय घ्यावा.

**Lokmat: 22.9.2020**

### परीक्षेच्या कामासाठी उपस्थित रहा

#### कुलगुरुंचे आवाहन : आरोग्याची काळजी घेऊन करा काम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाच्या निर्देशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यापूर्वी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याची तयारी केली आहे. परीक्षेच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे विद्यापीठातील व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कामावर उपस्थित राहून विद्यापीठाला सहकार्य करावे, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर राज्य शासन व विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरु केली आहे. तसेच परीक्षेच्या कामासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालयातील सर्व

> सध्या आणीबाणीची परिस्थिती असून अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणेसुद्धा आवश्यक आहे. परीक्षेच्या कामासाठी मोठ्या मनुष्यबळाची आवश्यकता असून विद्यापीठाने २५ ऑक्टोबरपूर्वी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कोरोनाची भीती न बाळगता फिजिकल डिस्टन्सिंगचे नियम पाळून स्वत:च्या आरोग्याची काळजी घेऊन परीक्षेच्या कामास सहकार्य करावे.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यालयात १०० टक्के उपस्थिती लावावी, असा अध्यादेश उच्च शिक्षण विभागातर्फे प्रसिद्ध केला होता. मात्र, कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी परीक्षेचे काम करणाऱ्यांनाच महाविद्यालयात बोलवा, अशी मागणी प्राचार्य व प्राध्यापक संघटनेतर्फे केली होती. त्यावर उच्च शिक्षण विभागाने परीक्षा व परीक्षेशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होणार नाही म्हणून विद्यापीठ व महाविद्यालयांनी उपस्थिती संदर्भात आपल्या स्तरावर गरजेनुसार निर्णय घ्यावा, असा सुधारित अध्यादेश सोमवारी काढला आहे.

बहुपर्यायी (एमसीक्यू) पद्धतीने परीक्षा घेतली जाणार आहे. सर्व विषयांच्या अभ्यास मंडळाच्या बैठका घेऊन संबंधितांना प्रश्नसंच (क्वेशन बँक) तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परीक्षा घेण्यासाठी मिळालेला कालावधी मर्यादित असल्यामुळे परीक्षेच्या प्रत्येक कामासाठी मोठ्या मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळेच परीक्षेच्या कामासाठी प्राध्यापकांनी उपस्थित राहावे. तसेच याबाबत विद्यापीठ व महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे राज्य शासनाने अध्यादेशाद्वारे स्पष्ट केले.

**Lokmat: 22.9.2020**

### शंभर टक्के उपस्थितीवरून राज्य सरकारचे घूमजाव

#### शिक्षक संघटनेच्या विरोधानंतर आवश्यकतेनुसार राहणार असल्याचे स्पष्टीकरण

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २१ -** अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विद्यापीठ व महाविद्यालयात शंभर टक्के शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवरून घूमजाव केला आहे. शिक्षक संघटनेच्या विरोधानंतर आता विद्यापीठ व महाविद्यालयात शंभर टक्के उपस्थिती ही ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार राहणार असल्याचे स्पष्टीकरण राज्य शासनाने सोमवारी दिले.

परीक्षेच्या कामानिमित्त महाविद्यालयात सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची शंभर टक्के उपस्थिती बंधनकारक असल्याचा निर्णय राज्य शासनाने तीन दिवसांपूर्वी घेतला होता. परीक्षेच्या कामासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासणार आहे. प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन करणे अशा अनेक कामांसाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षपणे शंभर टक्के उपस्थिती अनिवार्य केल्याचे राज्य शासनाने स्पष्ट केले होते.



दरम्यान, सध्या राज्यात करोना प्रादुर्भाव कमी होताना दिसत नाही. अशा स्थितीत सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात येणे शक्य नाही. त्यामुळे हा निर्णय राज्य शासनाने मागे घ्यावा, अशी मागणी राज्यभरातील महाविद्यालयीन शिक्षक व कर्मचाऱ्यांनी राज्य सरकारकडे केली होती. या निर्णयास संघटनेचा विरोध लक्षात घेता राज्य सरकारला अखेर खुलासा करण्याची नामुष्की आली.

> **उपस्थितीचा निर्णय आता विद्यापीठाकडे**
>
> परीक्षा व परीक्षेशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठ व महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर गरजेनुसार निर्णय घ्यावेत, असे राज्य सरकारने स्पष्ट केले. त्यामुळे आता विद्यापीठांना शिक्षक व कर्मचाऱ्यांना योग्य पद्धतीने उपस्थितीवरून निर्णय घ्यावे लागणार आहे.

राज्य शासनाने उपस्थितीच्या विषयावरून शासन निर्णय प्रसिद्ध करून खुलासा केला. परीक्षेच्या कामकाजाशी संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. मात्र ही उपस्थिती ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष, जसे शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार राहणार असल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे. त्यामुळे शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**Prabhat: 22.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑनलाइन उपस्थितीचा पर्याय

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या शंभर टक्के उपस्थितीबाबत राज्य सरकारने एक पाऊल मागे घेऊन, ऑनलाइन माध्यमातून काम करण्याचा पर्याय दिला आहे; तसेच याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठ व महाविद्यालया प्रशासनाला दिले आहेत. याबाबतचा खुलासा उच्च व तंत्रशिक्षण मंडळाने सोमवारी निर्णयाद्वारे केला.

या निर्णयानुसार आता प्राध्यापकांना महाविद्यालय, विद्यापीठात ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष यापैकी जे शक्य असेल त्या पद्धतीने काम करता येणार असून, परीक्षा किंवा परीक्षेशी संबंधित कामांचा खोळंबा होऊ नये यासाठी विद्यापीठे, महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याची सूचनाही दिली. दरम्यान, पूर्वीच्या १८ सप्टेंबरच्या निर्णयामुळे विद्यापीठ आणि कॉलेजांमध्ये अनावश्यक गर्दी होऊन करोनाचा संसर्ग [illegible]ण्याची शक्यता आहे. याबाबत

**प्राध्यापकांची उपस्थिती अनिवार्य**

'महाराष्ट्र टाइम्स'ने रविवारी वृत्ताद्वारे प्रकाश टाकला होता. त्यानंतर राज्य सरकारने खुलासा जाहीर करून, ऑनलाइन उपस्थितीचा पर्याय उपलब्ध करून दिला.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शंभर टक्के उपस्थितीबाबतचा शासन निर्णय १८ सप्टेंबरला प्रसिद्ध केला होता. मात्र, करोना संसर्गाच्या काळात शंभर टक्के उपस्थिती धोक्याची असल्याने शिक्षक संघटना, शिक्षकेतर संघटनांकडून या निर्णयाला विरोध करण्यात आला होता. शिक्षक हितकारणी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पवार, सिनेट सदस्य विवेक बुचडे यांनी निर्णय मागे घेण्याची मागणी केली होती. प्राध्यापक एका खोलीत एकत्र बसत असल्याने संसर्गाचा धोका वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती; तसेच शंभर टक्के उपस्थितीचा निर्णय मागे घेण्याची मागणी निवेदनांद्वारे करण्यात आली होती. त्यानंतर सुधारित निर्णय जाहीर करण्यात आला असून, त्यानुसार परीक्षा आणि परीक्षा संबंधित कामकाजाशी संबंधित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे. मात्र, ही उपस्थिती ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष यापैकी ज्याप्रमाणे शक्य आहे, त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहील. परीक्षा आणि परीक्षेशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे, महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा, अशी माहिती कार्यासन अधिकारी प्रवीणकुमार पवार यांनी निर्णयात दिली आहे.

**Maharashtra Times: 22.9.2020**

# प्राध्यापकांसाठी १०० टक्के उपस्थिती बंधनकारक नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून खुलासा

**पुणे :** महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या शंभर टक्के उपस्थितीबाबत राज्य शासनाने स्पष्टीकरणात्मक खुलासा सोमवारी केला. त्यानुसार आता प्राध्यापकांना महाविद्यालय, विद्यापीठात ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष यापैकी जे शक्य असेल त्या पद्धतीने काम करता येणार असून, परीक्षा किंवा परीक्षा संबंधित कामांचा खोळंबा होऊ नये यासाठी विद्यापीठे, महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याची सूचनाही दिली.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शंभर टक्के उपस्थितीबाबतचा शासन निर्णय १८ सप्टेंबरला प्रसिद्ध केला होता. मात्र करोना संसर्गाच्या काळात शंभर टक्के उपस्थिती धोक्याची असल्याने शिक्षक संघटना, शिक्षकेतर संघटनांकडून या निर्णयाला विरोध करण्यात आला होता. प्राध्यापक एका खोलीत एकत्र बसत असल्याने संसर्गाचा धोका वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. तसेच शंभर टक्के उपस्थितीचा निर्णय मागे घेण्याची मागणी निवेदनांद्वारे करण्यात आली होती.

शिक्षक संघटना, शिक्षकेतर संघटनांच्या मागणीची दखल उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेऊन खुलासा केला आहे. 'परीक्षा आणि परीक्षा संबंधित कामकाजाशी संबंधित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे. तथापि ही उपस्थिती ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष या पैकी जशी शक्य आहे त्या प्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहील. परीक्षा आणि परीक्षेशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे, महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा,' असे कार्यासन अधिकारी प्रवीणकुमार पवार यांनी शासन निर्णयात नमूद केले आहे.

लोकसत्ता Tue, 22 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55118417

# STATE CLARIFIES: 100% ATTENDANCE FOR TEACHERS NOT BINDING

Shreya Bhandary
shreya.bhandary@hindustantimes.com

**MUMBAI :** Three days after the state government released a government resolution (GR) making 100% attendance compulsory for all teaching and non-teaching staff of colleges, the department of higher and technical education released a clarification on Monday.

In its clarification, the state has specified that 100% attendance is not binding, and respective colleges or universities can decide how many staff members, especially from the examination department, need to be present in order to ensure smooth functioning of the upcoming online exams for final-year (summer 2020) students. It further states that institutes can also decide if physical presence of the staff is required for exams or whether they can smoothly conduct exams through online presence.

The previous GR dated September 18 had highlighted that based on the Supreme Court judgement of August 28 to conduct final-semester exams and to conduct the same, teaching and non-teaching staff will be required in absolute numbers.

It further stated that the practice of conducting examination includes several processes like question paper preparation, assessment of answer sheets, preparation of mark sheets and declaration of results; and all this work will require a large amount of manpower. "To complete the challenging task, 100% attendance of teaching and non-teaching staff is required henceforth," stated the September 18 GR.

**Hindustan times: 22.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# प्राध्यापकांची उपस्थिती ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष

### उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे स्पष्टीकरण

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्याशंभरटक्के उपस्थितीबाबत राज्य शासनाने स्पष्टीकरणात्मक खुलासा सोमवारी जाहीर केला. त्यानुसार आता प्राध्यापकांनी महाविद्यालय, विद्यापीठात ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष यापैकी जे शक्य असेल त्या पद्धतीने काम करायचे आहे. परीक्षा किंवा परीक्षा संबंधित कामांचा खोळंबा होऊ नये, यासाठी विद्यापीठे, महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याची सूचनादेखील शासनाने केली.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शंभर टक्के उपस्थितीबाबतचा शासननिर्णय १८ सप्टेंबरला प्रसिद्ध केला होता. मात्र कोरोना संसर्गाच्या काळात शंभर टक्के उपस्थिती धोक्याची असल्याने शिक्षक संघटना, शिक्षकेतर संघटनांकडून या निर्णयाला विरोध करण्यात आला होता. प्राध्यापक एका खोलीत एकत्र बसत असल्याने संसर्गाचा धोका वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. तसेच शंभर टक्के उपस्थितीचा निर्णय मागे घेण्याची मागणी निवेदनांद्वारे करण्यात आली होती.

शिक्षक संघटना, शिक्षकेतर संघटनांच्या मागणीची दखल उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतली. 'परीक्षा आणि परीक्षा संबंधित कामकाजाशी संबंधित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे. ही उपस्थिती ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष, यापैकी जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहील. परीक्षा आणि परीक्षेशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये, म्हणून विद्यापीठे, महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा,' असे कार्यासन अधिकारी प्रवीणकुमार पवार यांनी नमूद केले आहे.

My Pune Edition
Sep 22, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# State revokes circular on 100% attendance

The Maharashtra government has done a U-turn and clarified that universities and colleges can individually decide staff and faculty requirements and accordingly ask them to travel to campus, **reports Hemali Chhapia.**

On September 18, the state had ordered 100% compulsory attendance for teaching and non-teaching staff across universities and colleges. Staffers were expected to be present on their campuses for smooth conduct of exams starting October 1.

However, the move was followed by protests from teachers' organizations who said the decision was against the guidelines of the disaster management authority. **P4**

# Maha revokes its circular seeking 100% attendance

**Hemali.Chhapia @timesgroup.com**

**Mumbai:** The state government has done a U-turn and clarified that universities and colleges can individually decide staff and faculty requirements and accordingly ask them to travel to campus.

On September 18, the state had ordered 100% compulsory attendance for teaching and non-teaching staff across universities and colleges. Staff members were all expected to be present on their campuses for smooth conduct of exams starting October 1. However, teachers' organizations protested saying the decision is against the disaster management authority's guidelines.

### COLLEGE TEACHERS

Faculty members said the state had hastily brought out the earlier circular, but was prompt to withdraw the directive once it woke up to the fact that the situation for teachers was different in various pockets of the state. Tapati Mukhopadhyay, president, Maharashtra Federation of University and College Teachers' Organisation, said when the state issued a circular asking all teachers to be present, they had protested against it.

"We are happy that the state has taken cognizance of our grievance and changed its stand."

TA Shiware, chairman, Association of Non-Government Colleges, said the rollback will bring respite to teachers and staff who live far. "While exams are from October 1, teachers are already burdened with teaching and preparing sample question banks. They will continue to work from home for the exams."

**The Times of India: 22.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### पदोन्नती मुलाखती अखेर स्थगित

#### निर्णयानंतर पुणे विद्यापीठाचे घुमजाव

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २१** - ऐन परीक्षा कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. मात्र त्यास अधिसभा सदस्यांकडून विरोध होऊ लागल्याने विद्यापीठाने पदोन्नतीच्या मुलाखती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पदवी व पदव्युत्तर पदवीच्या महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक



परीक्षा सुरू आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबरमध्ये होत आहेत.

त्यामुळे प्राध्यापक नियोजनात व्यस्त आहेत. अशा स्थितीत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने दि.२३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत 'कॅस'अंतर्गत मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर केले आहे. पण, या मुलाखती परीक्षेनंतर घेण्यात याव्यात, अशी मागणी अधिसभा सदस्यांसह शिक्षणसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कुलगुरूंकडे केली होती.

यासंदर्भात विद्यापीठाने परिपत्रक प्रसिद्ध करून मुलाखती स्थगित केल्याचे स्पष्ट केले. 'करोनाची स्थिती लक्षात घेता मुलाखतीचे आयोजन करताना विषय तज्ज्ञांनी उपस्थित राहण्यासंबंधी असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे मुलाखती स्थगित करण्यात येत आहे. मुलाखतीचे नवे वेळापत्रक यथावकाश कळविण्यात येणार आहे,' असे विद्यापीठाने म्हटले आहे.

**Prabhat: 22.9.2020**

### प्राध्यापकांच्या मुलाखती स्थगित

**पुणे :** विद्यापीठ व महाविद्यालयांमधील प्राध्यापक अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या गडबडीत असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत मुलाखतींचे वेळापत्रक निश्चित केले होते. मात्र, त्यास विरोध झाल्याने हा कार्यक्रम अखेर स्थगित केला आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने २३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर केले. यास अधिसभा सदस्यांनी विरोध करत या मुलाखती परीक्षेनंतर घ्याव्यात, अशी मागणी केली होती. यासंदर्भात विद्यापीठाने सोमवारी (ता. २१ ) परिपत्रक प्रसिद्ध करून मुलाखती स्थगित केल्या आहेत. कोरोनाची स्थिती लक्षात घेता मुलाखतीसाठी विषय तज्ज्ञांनी उपस्थित राहण्यास नकार दिल्याने मुलाखती स्थगित केल्या आहेत. नवे वेळापत्रक कालांतराने जाहीर केले जाईल, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

**Sakaal: 22.9.2020**

### विद्यापीठाकडून कॅस मुलाखतींना स्थिगिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या नियोजनाच्या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत जाहीर केलेला मुलाखतीचा कार्यक्रम स्थगिती करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत विद्यापीठाच्या काही अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाने कॅस शिबिर पुढे ढकलण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता.

पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार अंतिम वर्षाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जात सुरु आहे. तसेच अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेतल्या जाणार असून प्राध्यापक या परीक्षेच्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने २३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत कॅस अंतर्गत प्राध्यापकांच्या मुलाखती घेण्याचे नियोजन करु नये, असे निवेदन अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाला दिले होते. त्यावर विद्यापीठाने याबाबत परिपत्रक प्रसिद्ध करुन मुलाखती स्थगित करण्यात आल्या असल्याचे स्पष्ट केले आहे.

कोरोना परिस्थितीमुळे कॅस अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या मुलाखतीसाठी विषय तज्ज्ञांनी उपस्थित राहण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे मुलाखती स्थगित करण्यात आल्या आहेत. मुलाखतीचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठातर्फे प्रसिध्द केले जाणार आहे.

**Lokmat: 22.9.2020**

### 'कॅस' योजनेतील मुलाखती स्थगित

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्राध्यापक अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करण्यात व्यग्र असतांना, विद्यापीठाने प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी 'कॅस'अंतर्गत (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. मात्र, त्याला अधिसभा सदस्य, प्राचार्य, संस्थाचालकांकडून विरोध होऊ लागल्यावर विद्यापीठाने पदोन्नतीच्या मुलाखती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

ऐन परीक्षेच्या कालावधीत मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने, मुलाखत की परीक्षा असा पेच प्राध्यापकांसमोर होता. त्यातच उमेदवारासोबत प्राचार्य, विभाग प्रमुख, संस्थेचे प्रतिनिधी आदींना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे गर्दी होऊन, करोना संसर्ग वाढण्याची शक्यता होती. याबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'ने रविवारी वृत्ताद्वारे प्रकाश टाकल्यानंतर प्रशासन जागे झाले.




विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत 'कॅस' अंतर्गत प्राध्यापकांच्या मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर केले होते. सध्या परीक्षेचा कालावधी सुरू असून, ह्या मुलाखती परीक्षेनंतर घेण्यात यावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांसह शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कुलगुरूंकडे केली होती. या संदर्भात विद्यापीठाने सोमवारी परिपत्रक प्रसिद्ध करून मुलाखती स्थगित करण्यात आल्याचे स्पष्ट केले. विषय तज्ज्ञांनी उपस्थित राहण्यासंबंधी मोठ्या प्रमाणात असमर्थता दर्शविली आहे. मुलाखतीचे नवे वेळापत्रक यथावकाश कळविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

**Maharashtra Times: 22.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

**पुढारी**

### प्राध्यापकांच्या 'कॅस' मुलाखती अखेर स्थगित

**पुणे :** परीक्षेच्या काळात कॅसअंतर्गत (करिअर ॲडव्हान्समेंट स्किम) प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या नियोजित मुलाखतीचा कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्थगित केला आहे. आता मुलाखतीचे नवीन वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या काळातच प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या मुलाखती घेतल्या जाणार होत्या. प्राध्यापक परीक्षेच्या कामात असल्याने मुलाखत द्यायची कशी, असा प्रश्न निर्माण झाला. परीक्षेच्या काळात होणाऱ्या या मुलाखतींना अधिसभा सदस्य, संस्थाचालकांनी विरोध करत परीक्षेनंतर मुलाखतीचा कार्यक्रम घेण्याचे निवेदन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना दिले होते.

My Pune Edition
Sep 22, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

### पदोन्नतीच्या प्रस्तावित मुलाखती विद्यापीठाकडून स्थगित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** परीक्षेच्या काळात 'कॅस'अंतर्गत (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या नियोजित मुलाखतींचा कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्थगित केला आहे. आता मुलाखतीचे नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाकडून जाहीर करण्यात आले आहे.

अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या काळातच, २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या मुलाखती विद्यापीठाकडून घेतल्या जाणार होत्या. प्राध्यापक परीक्षेच्या कामात असल्याने मुलाखत द्यायची कशी असा प्रश्न निर्माण झाला. तसेच परीक्षेच्या काळात होणाऱ्या या मुलाखतींना अधिसभा सदस्य, संस्थाचालकांनी विरोध करत अंतिम वर्ष परीक्षेनंतर मुलाखतींचा कार्यक्रम घेण्याचे निवेदन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना देण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने सोमवारी परिपत्रक प्रसिद्ध करून प्रस्तावित कार्यक्रम स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

करोना संसर्गाची स्थिती लक्षात घेता मुलाखतीचे आयोजन करताना विषय तज्ज्ञांनी उपस्थित राहण्यासंबंधी मोठ्या प्रमाणात असमर्थता दर्शवल्याने मुलाखती स्थगित करण्यात येत आहेत.

मुलाखतींचे नवे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे.

लोकसत्ता
Tue, 22 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55135963

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### पदवी, पदव्युत्तर १ नोव्हेंबरपासून

#### शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक यूजीसीकडून जाहीर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २१ - पदवी आणि पदव्युत्तरच्या प्रथम वर्षाचे वर्ग १ नोव्हेंबर २०२० पासून सुरू होणार आहे. यंदाच्या प्रथम वर्षाचे शैक्षणिक वेळापत्रक विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिद्ध करीत त्यानुसार विद्यापीठांनी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

करोनामुळे यंदाच्या वर्षी उच्च शिक्षणाचे शैक्षणिक वेळापत्रक कोलमडले. त्या पार्श्वभूमीवर 'यूजीसी'ने तज्ज्ञांची समिती नेमली होती. त्यांच्या शिफारशीनंतर 'यूजीसी'ने पदवी आणि पदव्युत्तर प्रथम वर्षाचे गाइडलाइन जाहीर केली. पदवी आणि पदव्युत्तरच्या प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. बारावीनंतरच्या जेईई मेन्स, नीट परीक्षा, सीईटी निकालानंतर विद्यार्थी पदवीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्राधान्य देतात. (पान २ पहा) ▸▸

"यूजीसीने पदवी आणि पदव्युतरचे शैक्षणिक वर्ष दि.१ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रासाठीतील पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ३१ ऑक्टोबरपर्यंत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रथम वर्षाचे वर्ग सुरू करण्यासाठी दि. १८ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

– डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, यूजीसी

### पदवी, पदव्युत्तर १ नोव्हेंबरपासून

(पान १ वरून) ▸▸ ऑक्टोबर अखेरपर्यंत बारावीनंतर होणाऱ्या प्रवेश परीक्षेच्या निकालाची प्रक्रिया पूर्ण होतील. त्यामुळे पहिल्या वर्षाच्या रिक्त जागांवरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत अंतिम मुदत असेल, असेही 'यूजीसी'ने म्हटले आहे. दरम्यान, अंतिम वर्षाची परीक्षा ऑक्टोबरमध्ये होणार असून, त्याचा निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होतील. या निकालास विलंब झाल्यास विद्यापीठांना तसे नियोजन करून १८ नोव्हेंबरपासून शैक्षणिक वर्ष सुरू शकतील. विद्यार्थ्यांना पहिल्या आणि दुसऱ्या सेमिस्टरच्या परीक्षेनंतर एक-दोन महिन्यांची सुटी नसेल. केवळ सात दिवसांची दोन सत्रात सुटीसाठी कालावधी देण्यात आला आहे. त्यानंतर ३० ऑगस्ट २०२१ पुढच्या वर्षीच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार असल्याचे 'यूजीसी' गाइडलाइनमध्ये नमूद करण्यात आले आहे.

**वेळापत्रक**

- प्रत्यक्षात वर्ग सुरू होणार : १ नोव्हेंबर २०२०
- शैक्षणिक ब्रेक : १ ते ७ मार्च २०२१
- परीक्षेचे आयोजन : ८ ते २६ मार्च २०२१
- सेमिस्टर ब्रेक : २७ मार्च ते ४ एप्रिल २०२१
- दुसऱ्या सेमिस्टरचे वर्ग : ५ एप्रिलपासून २०२१
- शैक्षणिक ब्रेक : १ ते ८ ऑगस्ट २०२१
- सेमिस्टर परीक्षेचे नियोजन : ९ ते २१ ऑगस्ट २०२१
- नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात : ३० ऑगस्ट २०२१

**Prabhat: 22.9.2020**

### नवीन शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबर ते २९ ऑगस्ट

#### यूजीसीतर्फे शैक्षणिक वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विद्यापीठ अनुदान आयोगाने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचे पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार प्रथम वर्षासाठी १ नोव्हेंबर २०२० ते २९ ऑगस्ट २०२१ असे शैक्षणिक वर्ष असणार आहे. त्यात दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुट्ट्या कमी केल्या आहेत.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातील शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे बारावीच्या निकालासह महाविद्यालयीन शैक्षणिक वर्ष सुरु करण्यावर परिणाम झाला. विद्यापीठ अनुदान आयोगाने यापूर्वी दोन वेळा शैक्षणिक वर्ष सुरु (पान ७ वर)

**यूजीसीचे शैक्षणिक वेळापत्रक**

- प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे : **30 ऑक्टोबर २०२०**
- शैक्षणिक वर्ष व प्रथम वर्षाचे वर्ग सुरु करणे : **१ नोव्हेंबर २०२०**
- परीक्षेच्या तयारीसाठी सुट्टी : **१ ते ७ मार्च २०२१**
- परीक्षांचे आयोजन : **८ ते २७ मार्च**
- पहिल्या सत्रासाठी सुट्टी : **२७ मार्च ते ४ एप्रिल**
- दुसऱ्या सत्राला सुरुवात : **५ एप्रिल**
- परीक्षेच्या तयारीसाठी सुट्टी : **१ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट**
- दुसऱ्या सत्रातील परीक्षांचे आयोजन : **९ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट**
- पुढील नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात : **30 ऑगस्ट**

### नवीन शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबर ते २९ ऑगस्ट

(पान १ वरुन) करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे शक्य झाले नाही. परंतु, आता यूजीसीने नवीन शैक्षणिक वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. पहिले सत्र १ नोव्हेंबरपासून ४ एप्रिलपर्यंत पूर्ण करावे लागेल. दुसरे सत्र ५ एप्रिलपासून २९ ऑगस्टपर्यंत असेल, असे यूजीसीतर्फे स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्यांनी एखाद्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर त्यांनी प्रवेश रद्द केल्यास विद्यापीठ व महाविद्यालयांना प्रवेश रद्द केल्यामुळे विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारता येणार नाही, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**Lokmat: 22.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# राज्यात १८ नोव्हेंबरपासून प्रथम वर्षाचे वर्ग

## शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक 'यूजीसी'कडून जाहीर

**पुणे, ता. २१ : 'कोरोना'मुळे लांबलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवीचे प्रथम वर्षाचे वेळापत्रक अखेर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) जाहीर केले आहे. देशभरात प्रथम वर्षाचे वर्ग १ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत. महाराष्ट्रातील परीक्षा ऑक्टोबरअखेरपर्यंत चालणार असल्याने १८ नोव्हेंबरपासून वर्ग सुरू करण्याची मुभा 'यूजीसी'ने दिली आहे.**

कोरोनामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीयसह सर्वच अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा खोळंबल्या होत्या. न्यायालयाच्या आदेशानंतर या परीक्षा नुकत्याच झाल्या आहेत. त्यामुळे २०२०-२१ मध्ये प्रथम वर्षाचे वर्ग कसे सुरू करायचे नियोजन करण्यासाठी 'यूजीसी'ने समिती गठित केली होती. या समितीने २९ एप्रिल, ६ जुलैच्या नियमावलीतील तरतुदींचा विचार करत नवीन अहवाल सोमवारी (ता. २१) सादर केला आहे. त्यानंतर हा निर्णय घेतला आहे. मात्र, शिकवणे, परीक्षा, सोशल डिस्टन्स यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

'यूजीसी'ने महाविद्यालयांनी प्रवेश परीक्षा घेऊन गुणवत्ता यादी जाहीर करण्यासाठी किंवा रिक्त जागा भरण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी ३१ डिसेंबर २०२० पर्यंत मुदत आहे.

कोरोनामुळे अनेक पालकांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे. काही कारणामुळे पालकांना विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करावा लागल्यास त्यांना १०० टक्के शुल्क परत करावे. प्रवेश रद्द करताना इतर कोणतेही शुल्क लावू नये. प्रवेश रद्द करण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. विद्यापीठाला प्रवेश प्रक्रिया राबविण्यास अडचणी येत असतील तर कायदेशीरदृष्ट्या पर्यायी मार्ग निवडण्याची मुभा 'यूजीसी'ने दिली आहे.

**प्रथम वर्षाच्या वेळापत्रकाबाबत समितीने अहवाल सादर केल्यानंतर सोमवारी (ता. २१) 'यूजीसी'ने १ नोव्हेंबरपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रासाठीतील पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ३१ ऑक्टोबरपर्यंत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रथम वर्षाचे वर्ग सुरू करण्यासाठी १८ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.**
**- डॉ. भूषण पटवर्धन,** उपाध्यक्ष, यूजीसी

**असे असेल प्रथम वर्षाचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ३१ ऑक्टोबर — प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची मुदत | १ नोव्हेंबर — प्रथम वर्षाचे वर्ग सुरू |
| १ ते ७ मार्च २१ — शैक्षणिक सुट्टी | ८ ते २६ मार्च — प्रथम सत्र परीक्षा |
| २७ मार्च ते ४ एप्रिल — सत्र सुट्टी | ५ एप्रिल — दुसरे सत्र सुरुवात |
| १ ते ८ ऑगस्ट — शैक्षणिक सुट्टी | ८ ते २१ ऑगस्ट — दुसरे सत्र परीक्षा |
| | ३० ऑगस्ट — दुसरे वर्ष सुरुवात |

Sakaal: 22.9.2020

# Classes for first year to start from Nov 1: UGC to varsities

RITIKA CHOPRA
NEW DELHI, SEPTEMBER 21

CLASSES FOR first-year students will start from November, and no new admissions will be allowed beyond November 30, according to the revised academic calendar approved by the University Grants Commission (UGC) this month.

The UGC had first released an alternative academic calendar for higher education institutions on April 29, in which it had prescribed that universities conduct their final-year or terminal semester examination from July 1 to July 15 and declare the results at the end of the month.

Classes for first-year students were to begin on September 1.

However, in July, the higher education regulator revisited the calendar and mandated all institutions to conduct final-year or terminal semester examination by September-end.

The latest revision has been made to the dates meant for starting classes for first-year students. Given the delay in conducting entrance examinations due to the Covid-19 outbreak, the UGC has now pushed the first day of the new academic session for them from September 1 to November 1.

**All higher education institutions have been advised to teach six days a week to make up for lost learning hours, while breaks and vacations will be curtailed**

"If there is a delay in declaration of results of the qualifying examinations, the universities may plan and start the academic session by 18.11.2020. The teaching-learning process may continue in offline/ online/ blended mode," the UGC's revised guidelines state.

All higher education institutions have been advised to teach six days a week to make up for the lost learning hours. Breaks and vacations will also be curtailed.

"In order to avoid financial hardship being faced by the parents due to lockdown and related factors, full refund of fees be made on account of all cancellation of admissions/ migration of students, up to 30.11.2020, for this very session as a special case," the guidelines state.

The UGC guidelines state: "To be crystal clear, the entire fees, including all charges, be refunded in totality (zero cncellation charges) on account of cancellation/ migration up to 30.11.2020. Thereafter, on cancellation/ withdrawal of admissions up to 31.12.2020, the entire fee collected from a student be refunded in full after deduction of not more than Rs 1000 as processing fee."

The Indian Express: 22.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

## राज्यातील महाविद्यालये १ नोव्हेंबरला गजबजणार

मुंबई : देशातील सर्व महाविद्यालयांचे पदवी प्रथम वर्षाचे वर्ग १ नोव्हेंबरपासून भरविण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीने घेतला आहे. शैक्षणिक सत्र निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी सुट्ट्यांचा कालावधी कमी करण्यात येणार आहे. राज्यातील विद्यापीठांना मात्र १८ नोव्हेंबरपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू करण्याची मुभा मिळणार आहे.

'यूजीसी'ने नेमलेल्या समितीने १ नोव्हेंबरपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासाठी विद्यापीठांना प्रथम वर्ष पदवीचे सर्व प्रवेश ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावे लागणार आहेत. याचबरोबर ही प्रवेश प्रक्रिया पूर्ण न झाल्यास १८ नोव्हेंबरपर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. पहिल्या सत्राच्या परीक्षा संपल्या की, दरवर्षी साधारणत: २० ते २५ दिवसांची सुट्टी मिळते, तर वर्षअखेरीस जवळपास महिन्याभराची सुट्टी मिळते. मात्र, आता या सुट्ट्यांमध्ये कपात होणार आहे. अभियांत्रिकीची प्रवेश परीक्षा न झाल्याने हे प्रवेश रखडलेले आहेत. मात्र, अद्याप सुरू न झालेल्या सर्व अभ्यासक्रमांचे नवे शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून सुरू होणे अपेक्षित आहे. सुट्ट्यांचा कालावधी कमी करावा, आठवड्याचे सहा दिवस काम करा, प्रवेश रद्द किंवा स्थलांतरित करावे लागल्यास पूर्ण फी परत करा, अशा विविध सूचना या अहवालात दिल्या आहेत.

**असे असेल शैक्षणिक कॅलेंडर...**

- शैक्षणिक वर्षाची सुरुवात १ किंवा १८ नोव्हेंबरपासून
- प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास १८ नोव्हेंबरपर्यंतचा वेळ
- पहिल्या सत्र परीक्षेपूर्वी १ ते ७ मार्च २०२१ सुट्टी
- ८ ते २६ मार्च २०२१ दरम्यान पहिल्या सत्र परीक्षा
- २७ मार्च ते ४ एप्रिल २०२१ पहिल्या सत्राअखेरची सुट्टी
- ५ एप्रिल २०२१ पासून दुसरे सत्र
- दुसऱ्या सत्र परीक्षेपूर्वी १ ते ८ ऑगस्ट २०२१ सुट्टी
- ९ ते २१ ऑगस्ट २०२१ दरम्यान दुसऱ्या सत्राच्या परीक्षा
- २२ ते २९ ऑगस्ट २०२१ वार्षिक सत्रा अखेरची सुट्टी
- पुढील शैक्षणिक वर्ष ३० ऑगस्ट २०२१ पासून सुरू

Pune Edition
Sep 22, 2020 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## विद्यापीठांचे शैक्षणिक वर्ष नोव्हेंबरपासून

### अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सुट्ट्यांमध्ये कपात; विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : देशभरातील विद्यापीठांतील प्रथम वर्षाचे नवे शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने घेतला आहे. राज्यातील विद्यापीठांना १८ नोव्हेंबर पासून नवे वर्ष सुरू करण्याची मुभा मिळणार आहे. सत्राअखेर एका आठवड्याचीच सुट्टी मिळणार आहे.

"नव्या शैक्षणिक वर्षाचे सुधारित वेळापत्रक तयार करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालास आयोगाने मान्यता दिली. त्यानुसार देशातील विद्यापीठांचे शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहे. मात्र महाराष्ट्राला परीक्षा आणि निकालाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे राज्याला १८ नोव्हेंबरपासून नवे वर्ष सुरु करता येईल.

- डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

करोनाच्या प्रादुर्भावामुळे उच्चशिक्षण संस्थांचे हे शैक्षणिक वर्ष अद्यापही सुरळीत झालेले नाही. द्वितीय, तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांचे पुढील सत्राचे ऑनलाइन वर्ग सुरू झाले आहेत. प्रथम वर्षाचेही ऑनलाइन वर्ग राज्यातील विद्यापीठांत सुरु झाले आहेत. मात्र, अद्यापही केंद्रीय शिक्षण मंडळाच्या श्रेणीसुधार परीक्षेचा निकाल जाहीर झालेला नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा खोळंबल्यामुळे त्याचेही प्रवेश झालेले नाहीत. अंतिम वर्षाच्या पदवीच्या परीक्षा (पान २ वर)

लोकसत्ता Tue, 22 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55118398

## विद्यापीठांचे शैक्षणिक वर्ष नोव्हेंबरपासून

(पान १ वरून)

ऑक्टोबरमध्ये होणार आहेत. त्यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रमांचीही प्रवेश प्रक्रिया झालेली नाही. या पार्श्वभूमीवर अद्यापही सुरू न झालेल्या सर्व अभ्यासक्रमांचे नवे शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून सुरू होणे अपेक्षित आहे. मात्र, प्रवेश प्रक्रिया किंवा निकालाचे काम पूर्ण झाले नसल्यास वर्ष सुरू करण्यासाठी १८ नोव्हेंबरपर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील विद्यापीठांचे वर्ष १८ नोव्हेंबरपासून सुरू होणे अपेक्षित आहे.

**सुट्ट्यांना कात्री**

पहिल्या सत्राच्या परीक्षा संपल्या की दरवर्षी साधारण २० ते २५ दिवसांची सुट्टी मिळते तर वर्षाअखेरीस जवळपास महिन्याभराची सुट्टी मिळते. परीक्षा सुरू होण्यापूर्वीही १५ ते २० दिवसांची सुट्टी विद्यार्थ्यांना मिळते. यंदा मात्र या सुट्ट्यांमध्ये कपात होणार आहे. जून-जुलैमध्ये सुरू होणारे शैक्षणिक वर्ष अद्यापही सुरु न झाल्यामुळे बुडालेला कालावधी सुट्ट्या कमी करून भरून काढण्याची शिफारस अहवालात करण्यात आली आहे. दोन्ही सत्रांच्या परीक्षेपूर्वी साधारण आठवड्याची आणि परीक्षेनंतर दुसरे सत्र किंवा नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी साधारण आठवड्याची सुट्टी देण्यात येईल.

### शैक्षणिक वर्ष कसे असेल?



- नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १ किंवा १८ नोव्हेंबरपासून
- प्रवेश प्रक्रिया किंवा निकालाचे काम रखडले असल्यास वर्ष सुरू करण्यासाठी १८ नोव्हेंबरपर्यंतचा वेळ देण्यात आला आहे.
- पहिल्या सत्र परीक्षेपूर्वी १ ते ७ मार्च २०२१ सुट्टी देण्यात येईल
- ८ ते २६ मार्च २०२१ दरम्यान पहिल्या सत्र परीक्षा होतील.
- २७ मार्च ते ४ एप्रिल २०२१ या कालावधीत पहिल्या सत्रा अखेरची सुट्टी देण्यात येईल.
- ५ एप्रिल २०२१ पासून दुसरे सत्र सुरु होईल
- दुसऱ्या सत्र परीक्षेपूर्वी १ ते ८ ऑगस्ट २०२१ या कालावधीत सुट्टी देण्यात येईल.
- ९ ते २१ ऑगस्ट २०२१ दरम्यान दुसऱ्या सत्राच्या परीक्षा होतील.
- २२ ते २९ ऑगस्ट २०२१ वार्षिक किंवा दुसऱ्या सत्रा अखेरची सुट्टी देण्यात येईल.
- या तुकडीचे पुढील शैक्षणिक वर्ष ३० ऑगस्ट २०२१ पासून सुरु होईल.

### सीईटी आणि निकाल ऑक्टोबरमध्ये जाहीर करण्याचे आव्हान

अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र यांसह विविध अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी राज्यस्तरावरील प्रवेश परीक्षा (सीईटी) १ ते २० ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. बारावीनंतरच्या विधि अभ्यासक्रमाची आणि हॉटेल मॅनेजमेंट पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा १०



ऑक्टोबर रोजी तर शिक्षणशास्त्र आणि इतर व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा ३ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहे. त्यानंतर अवघ्या दहा ते पंधरा दिवसांत निकाल जाहीर करणे आणि पुढील प्रवेश प्रक्रिया राज्याच्या प्रवेश नियमन प्राधिकरणाला पूर्ण करावी लागेल.

**प्रवेश रद्द झाल्यास शुल्क परत मिळणार**

सध्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया खोळंबल्यामुळे विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतले आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर घेतलेले प्रवेश रद्द करून दुसरीकडे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आता भरलेल्या शुल्काचे काय, असा प्रश्न निर्माण झाला होता. नोव्हेंबर अखेरपर्यंत प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शुल्कात कोणत्याही प्रकारची कपात न करता संपूर्ण शुल्क परत करण्यात यावे. त्यानंतर डिसेंबर अखेरपर्यंत एक हजार रुपयांपर्यंत प्रक्रिया शुल्क कमी करून बाकी सर्व शुल्क परत करण्यात यावे असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 22 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55118403

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

## व्हॉट्सअ‍ॅप व ई-मेलवरुन देता येणार परिक्षा

**नवी दिल्ली :** अंतीम वर्षाच्या परीक्षांबाबत आरोग्य मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. यानुसार कंटेन्मेंट झोन वगळता इतर भागांमध्ये परिक्षा केंद्रांवर परिक्षा घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच काही विद्यापीठांना ई-मेल व व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रीका पाठवण्यास परवानगी देण्यात आली आहे. विद्यार्थी आपल्या उत्तर पत्रिका ऑनलाईन सादर करतील. जर एखादा विद्यार्थी असे करण्यास अयशस्वी ठरला तर तो आपल्या उत्तर पत्रिकेची हार्ड कॉपी देखील पोस्टद्वारे विद्यापीठाला पाठवू शकेल. कंटेनमेंट झोनमधून येणारे विद्यार्थी, परीक्षक तसेच कर्मचाऱ्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारण्यात आला आहे.

Pune Edition
Sep 22, 2020 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## बारावी भूगोलासाठी 'जिओ टीचर अ‍ॅप'

**पुणे, ता. २१ :** राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या भूगोल विषयात प्रात्यक्षिकातील सर्वेक्षणासाठी प्रथमच 'जिओ टीचर अ‍ॅप'चा वापर केला जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जमा झालेल्या माहितीचे विश्लेषण करण्याचे कौशल्य यातून मिळविता येणार आहे.

विद्यार्थ्यांना बारावीत मानवी भूगोल शिकायचा आहे. त्यात लोकसंख्या, लिंग गुणोत्तर, जन्मदर, मृत्यूदर आदी घटक आहेत. त्याचा समावेश प्रात्यक्षिकामध्ये करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना सर्वेक्षणाद्वारे ही माहिती जमा करायची आहे. भूगोलाचे शिक्षक सुद्धा या अ‍ॅपचा भाग आहेत. त्यांनीही अ‍ॅपवर नोंदणी करायची आहे. त्यांना येणारा वन टाइम पासवर्ड (ओटीपी) त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना द्यायचा आहे. त्या ओटीपीचा वापर करून विद्यार्थी त्यांच्या सर्वेक्षणाच्या प्रात्यक्षिकांची सुरवात करतील.

**सध्या माहितीचे युग आहे. त्यामुळे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करता येणे आणि महत्त्वाची भौगोलिक कौशल्ये विकसित होणे ही काळाजी गरज आहे. त्याची संधी अ‍ॅपद्वारे विद्यार्थ्यांना दिली आहे. यातून आधुनिक तंत्रज्ञान शिकता येईल. मुलांमध्ये विषयाबद्दल कुतूहल आणि आवड वाढविण्यास मदत होईल.**

**- रवी जाधव,**
विशेषाधिकारी, भूगोल-बालभारती

### अ‍ॅपच्या वापराचे फायदे

- कागद-पेनचा वापर न करता मुलांनी पंधरा घरांचे सर्वेक्षण करायचे आहे.
- मुलांनी शाळेचे/कॉलेजचे नाव अ‍ॅपमध्ये टाकून नोंदणी करायची आहे.
- अ‍ॅपमध्ये शैक्षणिक घटकांसंबंधी काही प्रश्न आधीच दिलेले आहेत.
- मुलांना हवे असल्यास आणखी प्रश्न त्याच्यात जोडण्याची सोय आहे.
- एकाच वेळेला मराठी व इंग्रजी दोन्हींमधील प्रश्न एकत्र स्क्रीनवर दिसतात.
- सर्वेक्षणातील उत्तरे नंतर प्रिंट करता येतात.
- सर्वेक्षण करताना कुटुंबासोबत सेल्फी घेण्याची सुविधा आहे.

Sakaal: 22.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# सुधारित मूल्यमापन आराखडा अंमलबजावणीचे बंधन

## तोंडी परीक्षेऐवजी ॲक्टिव्हिटी शीटच्या माध्यमातून अंतर्गत मूल्यमापनाचे गुण

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. २१ - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता बारावीसाठी पुनर्रचित अभ्यासक्रम व नवीन पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी सुरू केली आहे. याबरोबर सुधारित मूल्यमापन आराखडाही तयार केला असून त्याची अंमलबजावणी करावीच लागणार आहे.




बारावी अभ्यासक्रम बदलला आहे. त्यामुळे मूल्यमापनासाठीही नवीन पद्धत वापरण्यात येणार आहे. कला, वाणिज्य शाखेसाठी ८०/२०, तर विज्ञान शाखेसाठी ७०/३० याप्रमाणे गुणांचा पॅटर्न कायम आहे. तोंडी परीक्षेऐवजी ॲक्टिव्हिटी शीटच्या माध्यमातून अंतर्गत मूल्यमापनाचे गुण देण्यात येणार आहेत. भाषेत्तर गटातील इतिहास, भूशास्त्र, राज्यशास्त्र, बालविकास, वस्त्रशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, व्यापार संघटन, कृषीविज्ञान, माहिती तंत्रज्ञान-कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, पर्यावरण व जलसुरक्षा या विषयांच्या सुधारित मूल्यामापन योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात येणार आहे. घटकनिहाय गुणविभागणी, अंतर्गत मूल्यमापन योजना यास शासनाने मान्यता दिली. प्रश्नपत्रिकेच्या आराखड्यातही बदल करण्यात येणार आहे.

> विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी बदललेल्या मूल्यमापनात ज्ञान, आकलन, कौशल्य याला प्राधान्य देण्यात आले आहे. वस्तुनिष्ठ प्रश्नांचे प्रमाण वाढविल्यामुळे विद्यार्थ्यांना बारकाईने वाचन, अभ्यास करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापनासाठी ॲक्टिव्हिटी शीटचा वापर करावा लागणार आहे.
>
> – **अविनाश ताकवले**, अभ्यास गट सदस्य, बालभारती

एक, पाच, दहा गुणांच्या प्रश्नांऐवजी एक, दोन, तीन, चार, पाच गुणांचे प्रश्न आता विचारले जाणार आहेत. २५ टक्के प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरुपाचे असणार आहेत. पर्यावरणाच्या विषयासाठी ५० गुणांऐवजी श्रेणी देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता एकूण ६५० ऐवजी ६०० गुणांपैकीच विषयनिहाय गुण मिळणार आहेत.

शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या सुधारित मूल्यामापन योजनेचा राज्य मंडळामार्फत विषयनिहाय ऑनलाइन प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात येणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक या सर्वांच्या निदर्शनास सुधारित मूल्यमापन आराखडा आणून देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना राज्य मंडळाचे सचिव डॉ.अशोक भोसले यांनी दिल्या.

**Prabhat: 22.9.2020**

**पुढारी**

# नव्या शैक्षणिक धोरणासाठी राज्याचा उच्च शिक्षण टास्क फोर्स

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

**राज्याराज्यात शैक्षणिक पातळ्यांवर टास्क फोर्सची स्थापना करून नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रचार-प्रसार आणि अंमलबजावणी केली पाहिजे. या करीता आता राज्य सरकारनेही पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकारने मंजूर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाची उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात अंमलबजावणी कशी करायची याबाबत राज्य सरकारने टास्क फोर्स तयार केला आहे. याचे अध्यक्षपद शिक्षण धोरण समितीच्या सदस्य आणि एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. वसुधा कामत यांच्याकडे आहे.**

टास्क फोर्समध्ये ज्यांची नियुक्ती झाली आहे त्यात विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगरु डॉ. राजन वेळुकर, डॉ. भालचंद्र मुणगेकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, रसायन तंत्रज्ञान संस्थेचे माजी कुलगुरू डॉ. जी. डी. यादव, हिरानंदानी समुहाचे व्यवस्थापकीय संचालक निरंजन हिरानंदानी, मराठवाडा वाणिज्य कॉलेजचे प्राचार्य डॉ. देवीदास गोल्हार, शासकीय अभियांत्रिकी कॉलेजचे प्राध्यापक भालचंद्र बिराजदार, अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे अजिंक्य पाटील, मुंबई विद्यापीठाचे अधिसभा सदस्य मिलिंद साटम, पार्ले टिळक व्यवस्थापन कॉलेजचे शिक्षणतज्ज्ञ डॉ. अजित जोशी आणि तंत्र शिक्षण संचालक डॉ. अभय वाघ यांचा समावेश आहे. तर समितीचे समन्वयक म्हणून उच्च शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. संजय जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



Pune Edition
Sep 22, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# हॉलतिकीट उपलब्ध; सराव परीक्षाही होणार

### अंतिम परीक्षांसाठी विद्यापीठाचे नियोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी जोरदार तयारी केली असून, साधारण अडीच लाख विद्यार्थ्यांच्या 'प्रोफाइल'मध्ये हॉलतिकीट उपलब्ध करून दिले आहे. त्याचप्रमाणे एमसीक्यू परीक्षा पद्धतीची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी दोन सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाकडून अंतिम वर्षाची परीक्षा एमसीक्यू (बहुपर्यायी स्वरूपाची), एक तास वेळाची आणि ५० गुणांची घेतली जाणार आहे. बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नेमण्यात आली आहे. प्रत्येक विषयाचे प्रश्नसंच तयार करण्यात येणार आहेत. त्यातील ६० प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारले जातील. विद्यार्थ्यांना एमसीक्यू परीक्षा पद्धतीचा अंदाज येण्यासाठी सराव चाचणी दिली जाणार आहे. साधारण परीक्षेच्या आठवडाभरापूर्वी ही चाचणी होईल. दरम्यान, सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रोफाइलमध्ये दिलेले हॉलतिकीट डाउनलोड करता येईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली.

'अंतिम वर्षाच्या ऑनलाइन पद्धतीच्या परीक्षांसाठी अतिशय सोपी आणि सुरक्षित पद्धत आहे. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मोबाइलवर ओटीपी येईल. हा ओटीपी व हॉलतिकीटच्या साह्याने विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल,' असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना अंतिम वर्षाच्या परीक्षा देतांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतली आहे. विद्यार्थ्यांना एमसीक्यू परीक्षा पद्धतीचा अंदाज येण्यासाठी सराव चाचणी घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी कोणताही मानसिक तणाव न घेता परीक्षा द्यावी.
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन

**Maharashtra Times: 23.9.2020**

# प्रवेश रद्द झाल्यास संपूर्ण शुल्क परत मिळणार

### विद्यापीठ अनुदान आयोगाचे महाविद्यालयांना आदेश

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. २२ -** व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नोव्हेंबर अखेरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास त्यांच्याकडून शुल्कात कोणत्याही प्रकारची कपात न करता संपूर्ण शुल्क परत करण्यात यावे, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

'यूजीसी'ने नव्या शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्याच्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या. त्यानुसार राज्यात नोव्हेंबरपासून पदवी आणि पदव्युत्तरच्या प्रथम वर्षाचे वर्ष सुरू होणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यानंतर त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची शुल्काची कपात करू नये, असेही त्यात नमूद केले आहे. लॉकडाऊनमुळे सर्वसामान्य पालकांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे. अशा परिस्थितीत व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी मुख्यत: पारंपरिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ शकतात. त्यामुळे काही विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश रद्द करून दुसरीकडे प्रवेश घेण्याची शक्यता आहे. प्रवेश रद्द केल्यानंतर भरलेले शुल्क संस्थांकडून परत मिळणे शक्य नसते. त्यात पालकांची आर्थिक परवड होऊ नये, यासाठी यूजीसीचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

नोव्हेंबरपर्यंत प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शुल्कात कपात करू नये. त्यांना संपूर्ण शुल्क परत करण्यात यावेत. तसेच त्यानंतरही डिसेंबरअखेपर्यंत एक हजार रुपयांपर्यंत प्रक्रिया शुल्क कमी करून बाकी सर्व शुल्क परत करण्यात यावे असेही युजीसीने म्हटले आहे.

**Prabhat: 23.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# शैक्षणिक वेळापत्रकात हवी स्पष्टता

## विद्यापीठ, महाविद्यालयात संभ्रम : शैक्षणिक असमतोल निर्माण होणार ?

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे प्रसिद्ध केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकामुळे विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. नामांकित महाविद्यालयांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार प्रथम वर्षाचे ऑनलाइन वर्ग सुरू केले आहेत. परंतु, ग्रामीण व निमशहरी भागातील महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. परिणामी महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक असमतोल निर्माण होणार आहे. त्यामुळे यूजीसीने शैक्षणिक वेळापत्रकाबाबत अधिक स्पष्टता आणावी, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

कोरोनामुळे शैक्षणिक क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. बारावीच्या परीक्षांसह विविध प्रवेशपूर्व परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया रखडली आहे.

यूजीसीने प्रसिद्ध केलेल्या २०२०-२१ या शैक्षणिक वेळापत्रकाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने प्रथम वर्षाचे शैक्षणिक वर्ष सुरु करण्याबाबत अधिकार मंडळात चर्चा करुन निर्णय घ्यायाला हवा.

- प्रा. नंदकुमार निकम, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

विद्यापीठाने केलेल्या सूचनांनुसार संलग्न महाविद्यालयांनी प्रथम वर्षाचे ऑनलाइन वर्ग सुरु केले. आता नवीन वेळापत्रक प्रसिद्ध केल्यामुळे गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक असमतोल निर्माण होऊ शकतो.

- डॉ. अशोक चासकर, माजी अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पारंपरिक अभ्यासक्रमाचे प्रवेश पूर्ण होत आले आहेत. मात्र, व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे यूजीसीने प्रसिद्ध केलेले शैक्षणिक वेळापत्रक व्यावसायिक व अव्यावसायिक या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी आहे का? याबाबत अधिक स्पष्टता येणे गरजेचे आहे.

- डॉ. पराग काळकर, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष सुरु करण्याचा अधिकार विद्यापीठ व राज्य शासनाला देणे उचित होईल. काही महाविद्यालयांचे वर्ग सुरु झाले आहेत. त्यामुळे गोंधळ निर्माण होऊ शकतो. तसेच १ नोव्हेंबरपासून ऑनलाइन की प्रत्यक्षात वर्ग सुरु होतील; याबाबत यूजीसीने स्पष्टता देणे गरजेचे आहे.

- डॉ. मनोहर चासकर, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

यूजीसीने दोन वेळा शैक्षणिक वेळापत्रक प्रसिद्ध केले. त्याची अंमलबजावणी सर्वच विद्यापीठांना करणे शक्य झाले नाही. परंतु, काही विद्यापीठांनी प्रथम वर्षाचे शैक्षणिक वर्ष जुन्या नियमावलीनुसार सुरु केले आहे. काही संलग्न महाविद्यालयांनी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यापासून प्रथम वर्षाचे ऑनलाइन वर्ग सुरू केले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने याबाबत मार्गदर्शन करावे, अशी मागणी प्राचार्यांकडून केली जात आहे.

सध्या काही महाविद्यालयांनी प्रथम वर्षाचे ऑनलाइन वर्ग सुरू केले आहेत. येत्या १ नोव्हेंबरपर्यंत या महाविद्यालयांनी पहिल्या सत्रातील बहुतांश अभ्यासक्रम पूर्ण केलेला असेल. मात्र, १ नोव्हेंबरपासून शैक्षणिक वर्ष सुरु केल्यास इतर महाविद्यालयांचा अभ्यासक्रम मागे राहील. विद्यापीठाला अधिकार मंडळांमध्ये चर्चा करुन याबाबत निर्णय निर्णय घ्यावा लागेल, असे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

**Lokmat: 23.9.2020**

# यूजीसीकडून शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक जाहीर

पुणे : विद्यापीठ अनुदान मंडळाने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचे पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे वेळापत्रक नुकतेच प्रसिद्ध केले. त्यानुसार प्रथम वर्षासाठी १ नोव्हेंबर २०२० ते २९ ऑगस्ट २०२१ असे शैक्षणिक वर्ष असणार आहे. त्यात दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुट्टया कमी केल्या आहेत.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातील शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे बारावीच्या निकालासह महाविद्यालयीन शैक्षणिक वर्ष सुरु करण्यावर परिणाम झाला. विद्यापीठ अनुदान मंडळाने यापूर्वी दोन वेळा शैक्षणिक वर्ष सुरु करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे शक्य झाले नाही. परंतु, आता यूजीसीने नवीन शैक्षणिक वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. पहिले सत्र १ नोव्हेंबरपासून ४ एप्रिलपर्यंत पूर्ण करावे लागेल. दुसरे सत्र ५ एप्रिलपासून २९ ऑगस्टपर्यंत असेल, असे यूजीसीने स्पष्ट केले.

| | |
|---|---|
| प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे : | ३० ऑक्टोबर २०२० |
| शैक्षणिक वर्ष व प्रथम वर्षाचे वर्ग सुरु करणे : | १ नोव्हेंबर २०२० |
| परीक्षेच्या तयारीसाठी सुट्टी : | १ ते ७ मार्च २०२१ |
| परिक्षांचे आयोजन करणे : | ८ते २७ मार्च २०२१ |
| पहिल्या सत्रासाठी सुट्टी : | २७ मार्च ते ४ एप्रिल २१ |
| दुसऱ्या सत्राला सुरुवात : | ५ एप्रिल २०२१ |
| परीक्षेच्या तयारीसाठी सुट्टी : | १ ते ८ ऑगस्ट |
| दुसऱ्या सत्रातील परीक्षांचे आयोजन : | ९ ते २१ ऑगस्ट |
| पुढील नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात : | ३० ऑगस्ट २०२१ |

**Kesari: 23.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे वर्ग १ नोव्हेंबरपासून

**विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीचा निर्णय**

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) – अंतिम वर्ष परीक्षांचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर आता देशातील सर्व महाविद्यालयांचे प्रथम वर्षाचे वर्ग १ नोव्हेंबरपासून भरविण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीने घेतला आहे. यानुसार 'यूजीसी'ने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचे कॅलेंडरही जाहीर केले आहे. राज्यातील विद्यापीठांना १८ नोव्हेंबरपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू करण्याची मुभा मिळणार आहे.

सत्र निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी सुट्ट्यांच्या कालावधीत कपात करण्यात येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने शैक्षणिक सत्र २०२०-२१साठी ॲकॅडेमिक कॅलेंडर जाहीर केले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांनी ही माहिती ट्विटरद्वारे दिली आहे. पोखरियाल म्हणाले, 'विद्यापीठांमध्ये 'यूजी' आणि 'पीजी' प्रथम वर्षासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे तयार केलेल्या ॲकॅडेमिक कॅलेंडरला मंजुरी मिळाली आहे.' याच ट्विटमध्ये पोखरियाल यांनी नव्या शैक्षणिक वर्षाचे पूर्ण वेळापत्रकही जारी केले आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे अंतिम वर्ष परीक्षांपासून ते नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करेपर्यंत अनेक प्रश्न उभे आहेत. यात आता प्रथम वर्षाचे वर्ग कधी सुरू करावेत, यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने समिती नेमली होती. समितीच्या शिफारशी स्वीकारून त्यानुसार कॅलेंडर जाहीर केले.

**२०२०-२१ : असे आहे संपूर्ण वेळापत्रक...**

▮ प्रवेशप्रक्रिया पूर्ण होणार : ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत ▮ पहिले सत्र/पहिल्या वर्षाचे वर्ग सुरू होणार : १ नोव्हेंबर २०२० ▮ परीक्षेच्या तयारीसाठी ब्रेक : १ ते ७ मार्च २०२१ पर्यंत. परीक्षा : ८ ते २६ मार्च २०२१ पर्यंत ▮ सेमिस्टर ब्रेक : २७ मार्च ते ४ एप्रिल २०२१ सेमिस्टरचे वर्ग सुरू होणार : ५ एप्रिल २०२१ ▮ परीक्षेच्या तयारीसाठी ब्रेक : १ ते ८ ऑगस्ट २०२१. परीक्षा : ८ ते २१ ऑगस्ट २०२१ ▮ सेमिस्टर ब्रेक : २२ ते २९ ऑगस्ट २०२१ ▮ पुढील शैक्षणिक वर्षाची सुरुवात : ३० ऑगस्ट २०२१.

**Saamana: 23.9.2020**

### Academic session of first year UG, PG courses will begin on November 1: UGC

**To make up for lost time due to COVID, vacations to be curtailed, six-day week will be implemented**

#NEW DELHI

The delayed academic session for freshers in universities and colleges will begin from November 1, and the winter break this year, the summer vacation in 2021 and other holidays would be curtailed to compensate for the time lost, according to the University Grants Commission.

The guidelines by an expect committee, set up for revising the academic calendar in view of Covid-19 pandemic, have been accepted by the UGC and accordingly universities have been recommended a six-day teaching learning schedule every week.

The UGC had in April released an alternative academic calendar for colleges to reopen, with guidelines on exams, mode of study and the schedule.

At that time, the plan was to reopen colleges from September, but it could not materialise due to a continuing surge in coronavirus cases.

As per the revised calendar, the admission process for first year students needs to be completed by October 31 and classes for the first semester should commence by November 1.

In order to compensate for the loss of academic time, the UGC has asked colleges to teach six days a week and shorten the winter break this year and the summer break next year.

Universities and schools have been closed since March 16 when the Centre announced a countrywide shutdown as part of measures to contain the spread of Covid-19. PTI

**Pune mirror: 23.9.2020**

### New academic session for college freshers from Nov 1

Times News Network

**New Delhi:** The 2020-21 academic session for freshers in universities and colleges, delayed due to the pandemic, will commence from November 1, the University Grants Commission has said.

Issuing the guidelines on academic calendar for the first year of undergraduate and PG students, UGC said that as a one-time measure, students will get full refund of fees on account of all cancellation of admissions/ migration of students, up to November 30 in view of the Covid-19 situation. The guidelines have been recommended by an expert committee set up for revising the academic calendar, and accepted by the UGC.



The education minister, **Ramesh Pokhriyal**, tweeted: "In view of the pandemic, the Commission has accepted the report of the committee and approved the guidelines on academic calendar for the first year of undergraduate and postgraduate students of the Universities for the session 2020-21. To avoid financial hardship being faced by parents due to lockdown and related factors, a full refund of fees will be made on account of all cancellation of admissions/ migration of students, up to 30.11.2020 as a special case."

RELATED REPORTS: P 11

The teaching process may continue in offline/ online/ blended mode. If there is delay in declaration of results of qualifying exams, universities may start the academic session by November 18, UGC said.

As per the suggested academic calendar, first week of March 2021 will be a preparatory break and first semester exams will be conducted between March 8 and March 26, 2021.

Thereafter, there will be a nine-day semester break. The second semester exams will be conducted in August 2021 and the 2021-22 academic session will start from August 30, 2021. The new calendar has not made any provision for summer and winter breaks.

Besides, UGC has also suggested that universities may follow a 6-day week pattern for the academic sessions 2020-21 and 2021-2022 to compensate the loss for this batch of students.

"The universities are requested to compensate the delay in the start of academic session in the subsequent years by curtailing the breaks/vacations so that this batch of students would get their final results for award of degree timely," said the guidelines.

**The Times of India: 23.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# पदव्युत्तर पदवीचे शैक्षणिक वर्ष आणखी उशिराने?

## १८ नोव्हेंबरपासून आरंभ होण्याबाबत साशंकता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राज्यातील विद्यापीठांना शैक्षणिक वर्ष १८ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र अंतिम वर्षाच्या परीक्षांचे निकाल विद्यापीठांकडून जाहीर झाल्यावर पुढील पंधरा दिवसांत पदव्युत्तर पदवीची प्रवेश प्रक्रिया कशी पूर्ण होणार असा प्रश्न उपस्थित होत असून, राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालयातील पदव्युत्तर पदवीचे शैक्षणिक वर्ष १८ नोव्हेंबरपासून सुरू होण्याबाबत साशंकताच आहे.

यूजीसीने देशभरातील विद्यापीठांसाठी सुधारित शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यामुळे देशभरातील विद्यापीठांचे शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. तर राज्यातील विद्यापीठातील अंतिम वर्षाच्या परीक्षा ३१ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहेत. हे लक्षात घेऊन राज्यातील विद्यापीठांना १८ नोव्हेंबरपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याची मुभा देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, पदव्युत्तर पदवीचे शैक्षणिक वर्ष १८ नोव्हेंबरपासून सुरू होऊ शकत नसल्याचे स्पष्ट होत आहे.

> राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ३१ ऑक्टोबरपर्यंत होणार आहेत. याचा विचार करून राज्यातील विद्यापीठांना १८ दिवस जास्तीचे देण्यात आले आहेत. मात्र विद्यापीठांना त्यांच्या पातळीवर परिस्थितीनुसार निर्णय घेता येईल. शैक्षणिक प्रक्रिया पूर्ण होणे, गुणवत्ता राखली जाणे, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता जपणे हा सुधारित वेळापत्रकामागील विचार आहे. मात्र विद्यापीठांनी पदव्युत्तर पदवीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून लवकरात लवकर शैक्षणिक वर्ष सुरू करणे अपेक्षित आहे.
>
> – डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, यूजीसी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, 'नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात अंतिम वर्ष परीक्षांचे निकाल जाहीर होतील. पण पदव्युत्तर पदवी प्रवेशांसाठी किमान पंचवीस दिवस लागू शकतात.'

'पदवी अंतिम वर्ष परीक्षा बहुपर्यायी, ऑनलाइन स्वरुपाच्या असल्याने निकाल लवकर जाहीर होईल. पण पदव्युत्तर प्रवेशांसाठी अर्ज भरणे, गुणवत्ता यादी जाहीर करणे, प्रत्यक्ष प्रवेश राबवणे ही प्रक्रिया तीन आठवड्यात होऊ शकणार नाही. त्यामुळे पदव्युत्तर पदवीचे शैक्षणिक वर्ष दोन आठवडे उशिरा होऊ शकते,' असे स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 23 September 2020 https://epaper.loksatta.com/c/

# No question bank, says SPPU official

## Final-year students feel the varsity should follow Mumbai University model, as MCQ is a new pattern

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror



FILE PHOTO

Exams are scheduled from October 1

The examination department of Savitribai Phule Pune University (SPPU) has decided not to give any question bank to its final-year students for preparation. Instead, the varsity will conduct a mock test for the students ensuring that they get an idea of examination.

The examination, scheduled from October 1 for all final-year students of bachelor's and master's courses, will have multiple choice questions (MCQs) and will take place through proctored method.

While Mumbai University has decided to provide students question banks for their preparation and their knowledge about the kind of questions, students of SPPU also demanded for the same.

Clarifying the development, Mahesh Kakade, director, examination department, SPPU said, "There has been no decision to give question bank to students. We understand that the paper pattern is different than earlier years, still students can appear for the mock test and get an idea about the questions to be asked."

He added, "Mock tests will be conducted three-four days before the scheduled examination and students can appear for the same."

While there are approximately 4,000 courses for which at least 2.5 lakh students will take the examinations and preparing for the entire question bank for the students at such a short notice would have been difficult, said SPPU officials.

The officers added that no question bank will also ensure that the examination will be conducted in its purest form.

Even while the decision has been taken to ensure seriousness of the examination, students believe that it would be difficult for them to prepare for the tests. Kamalakar Shete, a commerce student of SPPU, said, "All this while, we have been taking examination in descriptive way, and this is for the first time that tests will be based on MCQ pattern. Also, many of us do not have their study material with them therefore it will be difficult to prepare. Question banks would have been an easy way to prepare for the examination."

Another student of the SPPU Marathi department said, "Colleges or departments concerned should at least give PDF files of the study material so that we can prepare for the examination. Taking mock tests three-four days prior the examination will be too late for us to prepare for the final one."

Another student of law of ILS Law College said, "Law examinations have been completely based on descriptive questions and there are few subjects in which we cannot imagine as the MCQs. We are now taking help from our professors to prepare for the examination. But some idea about the type of questions at least 10-15 days prior to the final examination is needed."

**Pune mirror: 23.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# अकरावी प्रवेशाबाबत अद्याप अनिश्चितता

## पाच लाख विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला; पालक चिंतेत

**पुणे, ता. २२ :** पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती येथे इयत्ता अकरावीला प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या सुमारे पाच लाख विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. सर्वोच्च न्यायाल्यालयाने मराठा आरक्षणाबाबत दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ही प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली. तेरा दिवस उलटले तरी अद्याप शिक्षण विभागाने प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतीही पावले उचलली नसल्याने विद्यार्थी व पालकांचे 'टेन्शन' वाढले आहे.

अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर होऊन प्रवेशही निश्चित झाले आहेत. या प्रक्रियेतील दुसरी नियमित गुणवत्ता यादी १० सप्टेंबरला जाहीर होणार होती. दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होण्यापूर्वीच प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली. प्रवेश प्रक्रियेबाबत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक दिनकर पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. अकरावीची दुसरी प्रवेश फेरीची गुणवत्ता यादी १० सप्टेंबरला जाहीर होणार होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षण संदर्भातील आदेशाच्या अनुषंगाने यापुढील इयत्ता अकरावी प्रवेशाची कार्यवाही पुढे ढकलली आहे. या प्रवेश प्रक्रियेबाबत पुढील कार्यवाहीचे वेळापत्रक शासन आदेश आल्यानंतर जाहीर करण्यात येईल.

**अकरावी प्रवेशाचा आढावा**

| शहर | नोंदणी झालेले अर्ज | महाविद्यालये | प्रवेशासाठी जागा | प्रवेश घेतलेले | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई | २,७५,६०३ | ८४४ | ३,२०,८३० | ७८,६११ | २,४२,२१९ |
| पुणे | १,००,३७२ | ३०४ | १,०७,०३० | ३०,५५६ | ७६,४७४ |
| नागपूर | ४१,६०७ | २१६ | ५९,१७० | १५,९७२ | ४३,१९८ |
| नाशिक | ३१,४६० | ६० | २५,२७० | ८,१८३ | १७,०८७ |
| औरंगाबाद | २४,९८० | ११६ | ३१,४७० | ७,८८२ | २३,५८८ |
| अमरावती | १४,९९० | ६३ | १५,३६० | ४,९२६ | १०,४३४ |

"अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळावर शिक्षण विभाग, सरकारने विद्यार्थी-पालकांना दिलासा देणारी कोणतीही माहिती दिलेली नाही. त्याबाबत कोणीही बोलत नाही. त्यामुळे या प्रवेशाबाबत आणखी किती दिवस अनिश्चितता राहणार हा प्रश्न पडत आहे.
- अंकुश पवार, पालक

**Sakaal: 23.9.2020**

# नेट-सेटग्रस्त प्राध्यापकांबाबत सवलतींचा घाट?

## याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित; तरीही नियमित करण्याच्या हालचाली

**मुंबई :** प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक पात्रता परीक्षा (नेट-सेट) उत्तीर्ण न होता सेवेत असलेल्या प्राध्यापकांच्या नेमणुका नियमित करण्याचा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रविष्ट असतानाही मंत्रालयात मात्र या प्राध्यापकांच्या सेवा त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून नियमित करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी याबाबत नुकतीच आमदारांची बैठक घेतली.

नेट-सेट नसतानाही सेवेत असलेल्या प्राध्यापकांच्या मान्यतेचा वाद दोन दशके राज्यात सुरू आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. असे असले तरी आता शासनाने या प्राध्यापकांची सेवा नियुक्ती दिनांकापासून मान्य करून त्यांना लाभ देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. याबाबत उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्र्यांनी गेल्या पंधरा दिवसांत आमदारांच्या दोन बैठका घेतल्या.

यापूर्वी न्यायालयाने २००० पर्यंत नेट-सेट झालेल्या प्राध्यापकांच्या सेवाही नियुक्ती दिनांकापासून नियमित करण्याची मागणी फेटाळून लावत शासनाचा २०१३ पासून सेवा ग्राह्य धरण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. नेट- सेट न झालेल्या प्राध्यापकांच्या नियुक्तीबाबत वाद अजूनही प्रलंबित आहे. तरीही शासनाने २००४ पर्यंत नेट-सेट न होता सेवेत रुजू झालेल्या प्राध्यापकांच्या सेवा नियमित करण्याचा घाट घातला आहे.

### न्यायालयीन वाद...

प्राध्यापक होण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट ही पात्रता परीक्षा बंधनकारक केली. आयोगाने याबाबत १९ सप्टेंबर १९९१ रोजी परिपत्रक काढले. मात्र, त्यानंतरही नेट-सेट न केलेल्या प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली. शासनाने या प्राध्यापकांची नियुक्ती अमान्य केली. प्राध्यापक संघटनांचे संप, आंदोलने यानंतर २०१३ मध्ये शासनाने १९९२ ते २००० या कालावधीत नेट-सेट नसतानाही नियुक्त झालेल्या प्राध्यापकांची सेवा शासन निर्णयाच्या दिनांकापासून नियमित केली. मात्र, या प्राध्यापकांच्या नियुक्ती दिनांकापासून सेवा नियमित करून त्यांना सगळे लाभ देण्याची प्राध्यापक संघटनेची मागणी होती. त्यामुळे संघटनेने शासनाच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले. याबाबत झालेल्या सर्व याचिका एकत्र करून सुनावणी घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई उच्च न्यायालयात विशेष खंडपीठाच्या माध्यमातून सुनावणी झाली. त्या वेळी न्यायालयाने शासन निर्णयापासून सेवा ग्राह्य धरण्याचा शासनाचा निर्णय कायम ठेवला. त्याला प्राध्यापकांनी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून या प्रकरणाची सुनावणी प्रलंबित आहे. याशिवाय ममता मोहंती विरुद्ध ओडिशा शासन या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'आयोगाने ठरवलेली पात्रता नसेल तर आयोगाने ठरवलेली वेतनश्रेणी देता येत नाही,' अशा आशयाचे आदेश दिले आहेत.

### हजारो पात्रताधारक बेकार

दरवर्षी राज्यातील हजारो पदवीधर नेट किंवा सेट देतात. मात्र, प्राध्यापक भरतीच होत नसल्यामुळे मोजक्याच उमेदवारांना नोकरी मिळते. सद्य:स्थितीत नेट-सेटच नाही तर पीएच.डी. झालेले उमेदवारही बेकार आहेत. असे असताना पात्रता परीक्षा देताच नियमबाह्य नियुक्ती झालेल्या प्राध्यापकांकडे शासनाचा कल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### हजारो कोटी रुपयांचा आर्थिक भार

नेट-सेट नसतानाही सेवेत असलेले २००० पर्यंतचे जवळपास ८ ते १० हजार प्राध्यापक आहेत. शिवाय पुढील चार वर्षांतील प्राध्यापकांची त्यात भर पडेल. नियुक्ती दिनांकापासून लाभ गृहीत धरल्यास प्रत्येक प्राध्यापकाच्या वेतनात जवळपास मासिक १ लाख रुपयांची वाढ होईल. शिवाय प्राध्यापकांना नियुक्ती दिनांकापासूनचा फरकही द्यावा लागेल. त्याचा हजारो कोटी रुपयांचा भार शासनाच्या तिजोरीवर पडणार आहे, अशी माहिती उच्चशिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने दिली.

### शासनाची दुटप्पी भूमिका?

नेट-सेट नसलेल्या प्राध्यापकांच्या सेवा नियमित करण्याच्या ज्या शासन निर्णयावरून वाद सुरू आहे तो निर्णय यापूर्वी आघाडी शासनाच्या काळात (२०१३) घेण्यात आला होता. 'आयोगाच्या नियमानुसार नेट-सेट बंधनकारक आहे. तरीही मानवतेच्या दृष्टीने विचार करून नेट-सेट नसलेल्या प्राध्यापकांची सेवा शासन निर्णयापासून ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला,' अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र शासनाने उच्च न्यायालयात दाखल केले होते. निर्णय ज्यांच्या कालावधीत घेण्यात आला ते राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्ष आताही सत्तेत आहेत. पुढील दोन महिन्यांत शिक्षक आणि पदवीधरांसाठी राखीव जागांच्या तीन मतदारसंघांतील निवडणुका येऊ घातल्या आहेत. या निवडणुकांसाठी हा आटापिटा असल्याचीही चर्चा आहे.

लोकसत्ता Wed, 23 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55148623

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

E FUTURE
THE TIMES OF INDIA | PUNE | WEDNESDAY | SEPTEMBER 23, 2020

# UGC refund rules trigger anxiety over vacant seats & monetary loss

Swati Shinde Gole & Ardhra Nair | TNN

**Pune:** Raunak Shah recently scored 89.9% in the higher secondary certificate (HSC, std XII) examination and has secured admission based on this score in a private university for science.

He is now willing to take up a course in a college affiliated to Savitribai Phule Pune University. "I am worried if the college will refund me the entire amount if I cancel my admission once the college of my choice offers me a seat," he said.

Like Raunak, thousands of undergraduate students in the city and across Maharashtra have taken provisional admission by paying 10 to 80% fees, and are rethinking their decisions about courses.

But these students need not worry following the latest guidelines by the University Grants Commission (UGC) that has directed institutes to not charge any admission-cancellation fee from the students.

The UGC guidelines have said, a refund of all fees in totality on account of cancellation/migration up to November 30, and just a deduction of Rs 1,000 if cancellation happens up to December 31 will be allowed.

Many deemed and private universities have already completed their admission process and started regular classes. With this new diktat, and the JEE/CET results yet to be declared, private institutes fear there is a big chance that students may cancel their admissions in these colleges leading to vacant seats as well as loss of finances in these institutes post cancellation of admission.

Principal of Modern College of Arts Science and Commerce, Rajendra Zunjarrao, said, "Apart from the UGC guidelines, there are rules in place by the Pune university which all colleges affiliated to it have to follow with respect to the refund. We also follow those rules judiciously.

As per the SPPU rules and regulations, from the date of commencement of the course to cancellation within 1 to 10 days, 20% deductions and 80% refund is followed.

From the date of commencement from the 11th to the 30th day, a 40% deduction and a 60% refund is permitted. Cancellation of admission after 30 days from date of commencement has no refund.

If cancellation of admission is done before commencement of the course, then the entire fee should be refunded. However, as administrative charges not more than Rs 1000 may be deducted by the college.

Principal of Brihan Maharashtra College of Commerce, C N Rawal, said, "We have been following the UGC rules with respect to fees since the beginning. The UGC guidelines are annual and all varsities and its affiliated colleges have to follow these set of rules regarding the fee refund."

### GUIDELINES FOR UNDERGRAD, POSTGRAD PUPILS

- Institutions where admissions are through entrance tests and completed or likely to complete them may start first year academic session at the earliest
- Provisional admissions may also be given and relevant documents accepted up to December-end
- Merit/ entrance-based admissions to first-year be done by October
- Last date to fill up the vacant seats is **November 30**

### ACADEMIC CALENDAR

| | |
|---|---|
| **ADMISSION PROCESS** (to be completed) Oct 31 | **COMMENCEMENT OF CLASSES** \| (First Semester/Year) Nov 1 |
| **ACADEMIC BREAK** \| March 1, 2021 to March 7, 2021 | **EXAMINATIONS** \| March 8, 2021 to March 26, 2021 |
| **SEMESTER BREAK** \| March 27, 2021 to April 4, 2021 | **COMMENCEMENT OF EVEN SEMESTER** \| April 5, 2021 |
| **ACADEMIC BREAK** \| August 1, 2021 to August 8, 2021 | **EXAMINATIONS** \| August 9, 2021 to August 21, 2021 |
| **SEMESTER BREAK** \| August 22, 2021 to August 29, 2021 | **NEXT ACADEMIC SESSION** \| August 30, 2021 |

### SIX-DAY WEEK FOR NEXT TWO ACADEMIC YEARS

- If result of the qualifying examinations are delayed, the universities may start the academic session by November 18; teaching learning process may continue in offline/ online/ blended mode
- Universities must compensate the delay in the start of the academic session in the subsequent years by curtailing the breaks/ vacations so that this batch would get their final results for degrees

### ZERO CANCELLATION CHARGES

- Entire fees, including all charges, be refunded in totality if the student cancels or migrates up to **November 30**
- On cancellation/ withdrawal of admissions up to December 31, the entire fee collected from a student be refunded in full after deduction of not more than **Rs 1000** as processing fee



The Times of India: 23.9.2020

पुढारी

# नवे धोरण शिक्षणाला तंत्रज्ञानाशी जोडेल : नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली :** शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी जे नवे धोरण अंगीकारले आहे, ते शिक्षणाला तंत्रज्ञानाशी जोडेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी व्यक्त केला. आयआयटी गुवाहाटीच्या दीक्षान्त कार्यक्रमात ते बोलत होते.

मोदी म्हणाले, देशासाठी ईशान्य भारत खूप महत्त्वपूर्ण भाग आहे. अशा स्थितीत येथील विद्यार्थ्यांचे संशोधन नवीन गोष्टींना चालना देऊ शकते. ज्ञान घेण्याची कोणतीही सीमा नसते. नव्या शिक्षण धोरणांमुळे विदेशी विद्यापीठे आपले कॅम्पस भारतात काढू शकतील. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जावे लागणार नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनातून स्थानिक समस्या सोडविण्याची नितांत गरज आहे.

Pune Edition
Sep 23, 2020 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### १९६ अभ्यासक्रमांच्या कॉलेजस्तरावर परीक्षा

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परिपत्रक**

पुणे : तीनपेक्षा कमी महाविद्यालयांमध्ये चालविल्या जाणाऱ्या १९६ अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे संपूर्ण नियोजन महाविद्यालय स्तरावर केले जाणार असल्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने बुधवारी स्पष्ट केले आहे. विद्यापीठातर्फे संबंधित महाविद्यालयांसाठी परिपत्रक काढण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन केले जात आहे. त्यासाठी प्राध्यापकांकडून प्रत्येक विषयांचे बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) काढले जात आहे. अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नियमित परीक्षा देणारे सुमारे २ लाख २३ हजार, तर पुनर्परीक्षा देणारे २५ हजार विद्यार्थी आहेत. विद्यापीठातील विविध विभागांमध्ये (पान ७ वर)

### १९६ अभ्यासक्रमांच्या कॉलेजस्तरावर परीक्षा

(पान १ वरून) किंवा महाविद्यालय स्तरावर दर वर्षी नव्याने अभ्यासक्रम सुरु केले जातात. जे अभ्यासक्रम तीन किंवा तीनपेक्षा कमी महाविद्यालयांत सुरु आहेत. त्यांच्या परीक्षांचे नियोजन संबंधित महाविद्यालयांनीच घ्यावयात याबाबतचा निर्णय पूर्वीच झालेला आहे. परंतु, विद्यापीठाकडून प्रसिद्ध केलेल्या परीक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये याबाबत स्पष्टता नव्हती. त्यामुळे परीक्षा विभागाने परिपत्रक काढून संबंधित महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत. विद्यापीठाने मान्यता दिलेले १९६ अभ्यासक्रम हे तीनपेक्षा कमी महाविद्यालयांत शिकवले जात आहेत.

> “तीनपेक्षा कमी महाविद्यालयांत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाचे नियोजन संबंधित महाविद्यालयाला करावे लागते. सध्या अशा अभ्यासक्रमांची संख्या १९६ आहे. या अभ्यासक्रमांच्या परीक्षेबाबत महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.
>
> - डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालयांना घ्याव्या लागणार आहेत.

**Lokmat: 24.9.2020**

### १९६ अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांत परीक्षा

पुणे, ता. २३ : जे अभ्यासक्रम तीनपेक्षा कमी महाविद्यालयांमध्ये चालविले जातात, अशा १९६ अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे संपूर्ण नियोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येणार आहे. याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज (ता. २३) आदेश काढले.

पुणे विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन सुरू केले आहे. ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी एजन्सी निवडीसाठी तांत्रिक समितीच्या बैठका सुरू आहेत. अंतिम वर्षासाठी नियमित परीक्षा देणारे सुमारे २ लाख २३ हजार विद्यार्थी आहेत तर २५ हजार विद्यार्थी हे पुर्नपरीक्षा देणारे आहेत. परीक्षा मंडळाकडून मिळालेल्या माहितीनुसार १९६ अभ्यासक्रम हे तीन पेक्षा कमी महाविद्यालयात शिकवले जात आहेत. त्यासाठी या अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका तयार करणे, वेळापत्रक निश्चित करून ते ५ ऑक्टोबर पर्यंत सादर करण्याचे आदेश विद्यापीठाने दिले आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

**Sakaal: 24.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

FINAL-YEAR ONLINE EXAMS

### Hall tickets issued, but SPPU students yet to get timetable for first exam

ALIFIYA KHAN
PUNE, SEPTEMBER 23

WITH BARELY two weeks to go before the final year end-term/degree examination, students who received their hall tickets from the Savitribai Phule Pune University (SPPU) on Wednesday received a rude shock. While the hall tickets were issued to students in a bid to assuage their fears and anxiety over the uncertainty regarding the examination, students complained that the hall tickets gave them little comfort as there was no mention of the examination timetable.

The SPPU administration had declared that the exams will be held from October 5 to 30, but so far no timetable has been given to students.

"Everything is new this year... and so shocking. We needed some clarity. Firstly, for months they kept saying there would be no exams but when the court order came in, they suddenly started preparing for it. Much of our syllabus is not complete and many students were not given proper notes. They are making a mockery of us by sending hall tickets without the timetable," said a final-year LLB student.

Students who will be writing a multiple-choice based online exam for the first time complained that even a question bank has not been put out yet.

"How should we prepare for the exams when we have absolutely no reference point? Two weeks before exams begin, don't we deserve to know what to expect? Just 15 days to go and they don't even have a question bank... and now they don't have a timetable. They keep saying 'stay calm', but how is it possible with so much uncertainty?" questioned a mass media student.

When asked about why the exam timetable had not been issued, Mahesh Kakade, controller of examinations at SPPU, said, "We are in the process of getting a question bank from professors. Once that is finalised, we can set the exam dates. Before 100 per cent work is completed, it is not correct to announce a timetable."

Vice-Chancellor Dr Nitin Karmalkar, however, admitted to a delay in getting a question bank ready despite giving trainings professors weeks in advance on this subject. "We are nearly 60 per cent through with the work, it should be done in another couple of days. I agree that there is a delay in the work and it is unfortunate," he said.

**The Indian Express: 24.9.2020**

### अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी अडीच लाख विद्यार्थ्यांच्या प्रोफाइलवर हॉलतिकीट

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी जोरदार तयारी केली असून, साधारण अडीच लाख विद्यार्थ्यांच्या 'प्रोफाइल'मध्ये हॉलतिकीट उपलब्ध करून दिले आहे. त्याचप्रमाणे एमसीक्यू परीक्षा पद्धतीची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी दोन सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाकडून अंतिम वर्षाची परीक्षा एमसीक्यू (बहुपर्यायी स्वरूपाची), एक तास वेळाची आणि ५० गुणांची घेतली जाणार आहे. बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नेमण्यात आली आहे. प्रत्येक विषयाचे प्रश्नसंच तयार करण्यात येणार आहेत. त्यातील ६० प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारले जातील. विद्यार्थ्यांना एमसीक्यू परीक्षा पद्धतीचा अंदाज येण्यासाठी सराव चाचणी दिली जाणार आहे. साधारण परीक्षेच्या आठवडाभरापूर्वी ही चाचणी होईल. दरम्यान, सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रोफाइलमध्ये दिलेले हॉलतिकीट डाउनलोड करता येईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली. 'अंतिम वर्षाच्या ऑनलाइन पद्धतीच्या परीक्षांसाठी अतिशय सोपी आणि सुरक्षित पद्धत आहे. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मोबाइलवर ओटीपी येईल. हा ओटीपी व हॉलतिकीटच्या साह्याने विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल,' असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

**Kesari: 24.9.2020**

पुढारी

### अंतिम वर्षाच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत घेऊन, निकाल १० नोव्हेंबरपूर्वी जाहीर करण्यात येणार आहे, असे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक किंवा प्रकल्पाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपूर्वी घेण्यात येण्याच्या सूचना परिपत्रकामध्ये देण्यात आल्या आहेत.

परीक्षा मूल्यमापन व मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी याबाबत परिपत्रक काढून सूचना दिल्या आहेत. यामध्ये परीक्षा पद्धतीबाबत इतर सूचना या पूर्वीच्या परिपत्रकाप्रमाणे ठेवण्यात आल्या आहेत.

अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी नियमित, पुनःपरीक्षार्थी, बॅकलॉग विषयांच्या परीक्षा १३ मार्च २०२० पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर घेण्यात याव्यात; तसेच अंतिम पूर्व वर्षाच्या पुनःपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपूर्ण अभ्यासक्रमावर घेण्याच्या सूचना डॉ. काकडे यांनी केल्या आहेत. त्याचप्रमाणे ऑनलाइन परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी सराव परीक्षांचे आयोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

Pune Edition
Sep 24, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

## विद्यापीठाचा निकाल दहा नोव्हेंबरपूर्वी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत घेऊन, निकाल १० नोव्हेंबरपूर्वी जाहीर करण्यात येणार आहे, असे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक किंवा प्रकल्पाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपूर्वी घेण्यात येण्याच्या सूचना परिपत्रकामध्ये देण्यात आल्या आहेत.

परीक्षा मूल्यमापन व मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी याबाबत परिपत्रक काढून सूचना दिल्या आहेत. यामध्ये परीक्षा पद्धतीबाबत इतर सूचना यापूर्वीच्या परिपत्रकाप्रमाणे ठेवण्यात आल्या आहेत. अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी नियमित, पुनःपरीक्षार्थी, बॅकलॉग विषयांच्या परीक्षा १३ मार्च २०२०पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर घेण्यात याव्यात; तसेच अंतिम पूर्व वर्षाच्या पुनःपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपूर्ण अभ्यासक्रमावर घेण्याच्या सूचना डॉ. काकडे यांनी केल्या आहेत. 'ऑनलाइन परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी सराव परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने होणाऱ्या एमसीक्यू बेस्ड परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही,' असेही डॉ. काकडे यांनी सांगितले.

### महाविद्यालयांना हेल्प डेस्क स्थापन करण्याच्या सूचना

### समन्वयक नियुक्तीची सूचना

विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या नियोजनापूर्वी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी महाविद्यालयामध्ये हेल्प डेस्क स्थापन करावा. यासोबतच प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी अभ्यासक्रमनिहाय समन्वयकांची नियुक्ती करण्यात यावी; तसेच याबाबतचा स्वतंत्र तपशील महाविद्यालयाच्या वेबसाइटवर जाहीर करण्याची सूचना डॉ. महेश काकडे यांनी केली आहे.

**Maharashtra Times: 24.9.2020**

## अकरावी प्रवेशावरून पालक-विद्यार्थी चिंतेत

- मराठा आरक्षण स्थगितीमुळे प्रवेश प्रक्रियेबाबत अस्पष्टता

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला अंतरिम स्थगिती दिल्याने अकरावी प्रवेश स्थगित करण्यात आले. त्यास दोन आठवडे उलटून गेले, तरी अद्याप प्रवेशाविषयी काहीच स्पष्टता नसल्याने अकरावी प्रवेश प्रवेशप्रक्रियेविषयी अनिश्चितता आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशावरून पालक व विद्यार्थी चिंतेत आहेत. जवळपास पाच लाख विद्यार्थी अकरावी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.

पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक या महापालिकांच्या क्षेत्रात ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. यंदा ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत ५ लाख ५९ हजार जागांवरील प्रवेशांसाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानुसार यंदा प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली. तर दुसऱ्या फेरीच्या प्रवेशांसाठी गुणवत्ता यादी १० सप्टेंबरला जाहीर करण्यात येणार होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला अंतरिम स्थगिती दिल्याने प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. आता मराठा आरक्षणाच्या निर्णयावर प्रवेश प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

प्रवेश प्रक्रियेत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये ८३ हजार ३२९, अमरावतीमध्ये १२ हजार १३८, औरंगाबादमध्ये १९ हजार ५५९ , मुंबईमध्ये २ लाख ४८ हजार , नागपूरमध्ये ३५ हजार ९६४ आणि नाशिकमध्ये २६ हजार १८ अशा ४ लाख २५ हजार ६२८ विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. पहिल्या फेरीत कोट्यातील प्रवेशांसह १ लाख ४६ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे.

**Prabhat: 24.9.2020**

## अकरावी प्रवेश प्रक्रियेबाबत अद्याप अनिश्चितताच

लोकसत्ता प्रतिनिधी

> शासनाकडून अकरावीची प्रवेश प्रक्रिया राबवण्याबाबत अद्याप निर्देश प्राप्त झालेले नाही. शासनाकडून निर्देश देण्यात आल्यानंतर पुढील प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येईल.
>
> – दिनकर पाटील, संचालक, माध्यमिक शिक्षण संचालनालय

पुणे : सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला अंतरिम स्थगिती दिल्याने स्थगित करण्यात आलेल्या अकरावी प्रवेश प्रक्रियेबाबत अद्याप अनिश्चितता आहे. त्यामुळे जवळपास पाच लाख विद्यार्थ्यांच्या प्रवेशांचे काय होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीमार्फत पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक या महापालिकांच्या क्षेत्रात ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. यंदा ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत ५ लाख ५९ हजार १३० जागांवरील प्रवेशांसाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानुसार यंदा प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली. तर दुसऱ्या फेरीच्या प्रवेशांसाठी गुणवत्ता यादी १० सप्टेंबरला जाहीर करण्यात येणार होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला अंतरिम स्थगिती दिल्याने प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. आता मराठा आरक्षणाच्या निर्णयावर प्रवेश प्रक्रियेचे भवितव्य अवलंबून आहे. प्रवेश प्रक्रियेत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये ८३ हजार ३२९, अमरावतीमध्ये १२ हजार १३८, औरंगाबादमध्ये १९ हजार ५५९, मुंबईमध्ये २ लाख ४८ हजार ८२०, नागपूरमध्ये ३५ हजार ९६४ आणि नाशिकमध्ये २६ हजार १८ अशा ४ लाख २५ हजार ६२८ विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. पहिल्या फेरीत कोट्यातील प्रवेशांसह १ लाख ४६ हजार १३० विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे.

लोकसत्ता Thu, 24 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55177585

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# State seeks advice on FYJC admissions

Sujit.Mahamulkar
@timesgroup.com

**Mumbai:** The state government, before restarting the FYJC admissions process, has sought legal opinion on whether Maratha students should be allowed to avail the benefits in the 10% Economically Weaker Sections (EWS) quota.

The FYJC admissions process was put on hold after the Supreme Court ordered a stay on the Maratha quota on September 9.

The issue came up for discussion in the state cabinet on Tuesday. A senior official said the SC had clearly stated that admissions to educational institutions for the academic year 2020-21 shall be made without reference to reservations provided in the SEBC Act and appointments to public services and posts shall be made without implementing the reservation as provided.

Following the cabinet meeting, Ashok Chavan, chairman of the cabinet subcommittee, announced sops for the Maratha community. He said there are legal issues about the admission process and government jobs which will be examined before a decision is taken.

**AVAILING BENEFITS**

An official said the state must first issue a revised government resolution as it had, in July, stated that the Maratha community could not avail of EWS quota benefits. "What if the state issues a revised GR allowing Marathas to avail of reservation under EWS and the SC larger bench lifts the stay on SEBC Act? Hence, there is ambiguity over the issue," the official said.

Vinod Patil, convenor of Maratha Kranti Morcha, said the state should clarify its stand soon.

The Times of India: 24.9.2020

# ...आता २००४ पर्यंतच्या अपात्र प्राध्यापकांना सवलत देण्याची चर्चा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** विद्यापीठ अनुदान आयोगाने निश्चित केलेली नेट-सेटची पात्रता पूर्ण न करणाऱ्या १९९२ ते २००० पर्यंतच्या प्राध्यापकांच्या सेवा कायम करण्याचा वाद पूर्णपणे शमलेला नसताना आमदारांचे मात्र आणखी चार वर्षांच्या प्राध्यापकांना सवलत देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीच्या कार्यक्रमपत्रिकेनुसार २००४ पर्यंतच्या प्राध्यापकांना नेट-सेटमधून सवलत देण्याचा विषय चर्चेला घेण्यात आला होता.

आयोगाने प्राध्यापकांसाठी नेट-सेट ही पात्रता निश्चित केली. नेट-सेट देण्यासाठी प्राध्यापकांना संधीही देण्यात आली. मात्र, त्यानंतरही ही पात्रता धारण न केलेल्या प्राध्यापकांची आंदोलने, न्यायालयीन प्रकरणे यानंतर आयोगाने नेट-सेट नसतानाही नियुक्ती झालेल्या १९९१ ते २००० या कालावधीतील प्राध्यापकांची सेवा कायम ठेवली. मात्र, ही सवलत कोणत्याही आर्थिक लाभासाठी नाही हेदेखील स्पष्ट केले. उच्च न्यायालयातही २००० पर्यंत नियुक्ती झालेल्या प्राध्यापकांची सेवा शासन निर्णयापासून ग्राह्य धरावी की नियुक्ती दिनांकापासून, याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहेत. तरीही प्राध्यापकांना नियुक्ती दिनांकापासून लाभ देण्याच्या चर्चा सुरू आहेत.

यापुढील एक पाऊल टाकत २००० पर्यंतच नाही तर २००४ पर्यंतच्या नेट-सेट नसतानाही नियुक्त झालेल्या प्राध्यापकांना लाभ देण्याची चर्चा सुरू असल्याचे दिसते आहे.

लोकसत्ता Thu, 24 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55176176

ऑनलाइनचा निर्णय अधांतरित

# 'सेट' परीक्षा पुन्हा लांबणीवर

डिसेंबरमध्ये होण्याची चिन्हे

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २३** - सहायक प्राध्यापक पदासाठी अनिवार्य असलेली राज्यस्तरीय पात्रता परीक्षा अर्थात 'सेट' आता डिसेंबरमध्ये होण्याची चिन्हे आहेत. सध्या करोना प्रादुर्भाव, अंतिम वर्षाची परीक्षा ऑक्टोबरमध्ये आणि नवीन शैक्षणिक वर्ष नोव्हेंबरमध्ये सुरू होणार आहे. त्यामुळे सेट परीक्षा डिसेंबरपर्यंत लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत महाराष्ट्र व गोवा राज्यात सेट परीक्षा घेतली जाते. ती नियोजित वेळापत्रकानुसार २८ जून रोजी होणार होती. त्यासाठी जवळपास सव्वालाख विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज भरले. मात्र, करोनामुळे ही परीक्षा पुढे ढकलली. अद्यापपर्यंत सेट परीक्षेची तारीख निश्चित करण्यात आली नाही. त्यामुळे सेट परीक्षा कधी होणार, अशी विचारणा विद्यार्थ्यांकडून होत आहे.

राज्यात करोना संसर्गाचे संकट कायम आहे. त्यातच सर्व विद्यापीठे अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या तयारीत आहेत. त्याची परीक्षा ऑक्टोबर महिन्यात होत आहेत. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने १ नोव्हेंबरपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यातच ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये यूपीएससीच्या परीक्षा होणार आहेत. त्यामुळे सेट परीक्षेच्या केंद्रासाठी महाविद्यालये डिसेंबर महिन्यात उपलब्ध होतील. त्यामुळे सेट परीक्षा डिसेंबर अखेरपर्यंत घेण्याचे नियोजन असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, सेट परीक्षेसाठी अर्ज करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी मिळण्याची शक्यता कमी असल्याचे दिसून येत आहे.

### नेट झाल्यानंतर सेटचे नियोजन

पुणे विद्यापीठाला सेट परीक्षा याच महिन्यात घ्यायची होती. मात्र, नेटची परीक्षा झाल्यानंतर सेट परीक्षा घेतल्यास योग्य ठरेल, अशी विद्यापीठाची भूमिका होती. त्यामुळे नेट परीक्षा झाल्यानंतर सेटची परीक्षेसाठी नियोजन करण्यात येणार आहे. मात्र, सद्य:स्थिती ऑफलाइन परीक्षेच्या दृष्टीने नियोजन सुरू आहे. सेट परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन याचा निर्णय अद्याप ठरलेला नाही, असेही सेट विभागाने स्पष्ट केले.

### एक दिवस अगोदर प्रवेशपत्र मिळणार



राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेटची परीक्षा गुरुवारपासून (दि. २४) सुरू होत आहे. त्याचे वेळापत्रक राष्ट्रीय टेस्टिंग एजन्सीने प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार नेट परीक्षा दि. २४ ते ५ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे. कोणत्या विषयाची परीक्षा कधी होणार आहे, त्याचा तपशीलही जाहीर केला आहे. दरम्यान, ज्या दिवशी परीक्षा होणार आहे, त्याच्या एक दिवस अगोदरच विद्यार्थ्यांना परीक्षेचे प्रवेशपत्र (अॅडमिट कार्ड) डाऊलोड करता येणार आहे.

Prabhat: 24.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

ऑनलाइन परीक्षेसाठी निविदा मागविल्या : ऑक्टोबर महिन्यात परीक्षा घेणार

# मोबाइलवर ऑनलाइन परीक्षा घेण्याचे आव्हान

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. त्यात ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोबाइलच्या माध्यमातून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक १ लाख ८९ हजार २११ एवढी आहे. त्यामुळे कोणतीही तांत्रिक अडचण येऊ न देता या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे मोठे आव्हान विद्यापीठासमोर आहे.

सर्वोच्च न्यायालय व राज्य शासनाच्या निर्देशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठातर्फे ऑक्टोबर महिन्यात घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी सुमारे २ लाख २८ हजार ४९९ विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. त्यातील १ लाख ८९ हजार २११ विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने तर ३९ हजार २८३ विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. कोरोनामुळे विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सध्या ऑनलाइन पद्धतीने कॉम्प्युटरवर किंवा लॅपटॉपवर घेतल्या जात आहेत. विद्यार्थ्याने परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार करू नये याबाबतची काळजी या ऑनलाइन परीक्षेत घेता येते. मोबाइलच्या माध्यमातून विविध ॲपद्वारे परदेशात ऑनलाइन परीक्षा घेतल्या जातात. त्यासाठी विशिष्ट ॲप डिझाइन केले आहेत. या ॲपद्वारे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांच्या नकळत छायाचित्र काढले जातात. त्यातूनही विद्यार्थ्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवता येते. त्यामुळे मोबाइल ॲपद्वारेसुद्धा परीक्षेच्या नियमांचे पालन करून सुरक्षित वातावरणात परीक्षा घेता येऊ शकतात. विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षेसाठी निविदा मागविल्या आहेत. त्यातून विद्यापीठ कोणत्या एजन्सीची निवड करणार याबाबत उत्सुकता आहे.

## विद्यापीठ प्रथमच घेणार मोबाइलवर ऑनलाइन परीक्षा



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून विद्यापीठातर्फे ऑनलाइन परीक्षांचे आयोजन केले जात आहे. परंतु, एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांची मोबाइलद्वारे परीक्षा घेण्याची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पहिलीच वेळ आहे. त्यामुळे विद्यापीठाकडून परीक्षेसाठी निवड केल्या जाणाऱ्या एजन्सीकडून परीक्षेदरम्यान कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण होणार नाही; याची खबरदारी घेऊन परीक्षा घेतली जाणार आहे का? यावर विद्यापीठाचे ऑनलाइन परीक्षेचे यश-अपयश अवलंबून आहे, अशी विद्यापीठ वर्तुळात चर्चा आहे.

(संग्रहित छायाचित्र)



**1,89,211** ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

**1,13,363** मोबाइलवर परीक्षा देणारे विद्यार्थी

**71,740** लॅपटॉपवर परीक्षा देणारे विद्यार्थी

**2,722** कॉम्प्युटरवर परीक्षा देणारे विद्यार्थी

**1,384** आयपॅडद्वारे परीक्षा देणारे विद्यार्थी

**Lokmat: 25.9.2020**

# 'सेट' परीक्षा डिसेंबरमध्ये

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सहायक प्राध्यापक पदासाठी अनिवार्य असलेली राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) डिसेंबरमध्ये होण्याची चिन्हे आहेत. करोना प्रादुर्भाव, अंतिम वर्षाची परीक्षा ऑक्टोबरमध्ये आणि नवीन शैक्षणिक वर्ष नोव्हेंबरमध्ये सुरू होणार आहे. त्यामुळे सेट परीक्षा डिसेंबरपर्यंत लांबणीवर पडणार असल्याचे चित्र आहे.

राज्यात करोना संसर्गाचे संकट कायम असून, सर्व विद्यापीठे अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या तयारीत आहेत. त्याची परीक्षा ऑक्टोबर महिन्यात होत आहेत. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने १ नोव्हेंबरपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचे आदेश दिले. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये 'यूपीएससी'च्या परीक्षा होणार आहेत. त्यामुळे सेट परीक्षेच्या केंद्रासाठी महाविद्यालये डिसेंबर महिन्यात उपलब्ध होतील. त्यामुळे सेट परीक्षा डिसेंबर अखेरपर्यंत घेण्याचे नियोजन असल्याचे सूत्रांनी सांगितले.

राज्यात विविध प्रवेश परीक्षा लांबल्याने, प्रशासकीय यंत्रणेकडून या परीक्षांसाठी अर्ज करण्याला साधारण दोन दिवसांची मुदतवाढ दिली. सीईटी सेलनेसुद्धा दोन दिवस अर्ज करण्याची लिंक सुरू केली होती. 'एनटीए'नेसुद्धा नेट परीक्षेसाठी अर्ज करण्याला मुदतवाढ दिली होती. या पार्श्वभूमीवर सेट परीक्षेसाठी अर्ज करण्याला एक संधी देण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

**Maharashtra Times: 25.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत एकमताने निर्णय

## मराठा साम्राज्य इतिहासाचे अभ्यासकेंद्र उभारणार

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. २४ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठा साम्राज्याच्या इतिहासाचे एक अभ्यासकेंद्र स्थापन करण्यास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

विद्यापीठाची व्यवस्थापन परिषदेची गुरुवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मराठा साम्राज्याचा इतिहासाचे अभ्यास केंद्र विद्यापीठात स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. या अभ्यास केंद्राच्या माध्यमातून मराठा साम्राज्याचा उज्ज्वल इतिहास, त्यांचे संशोधन व उलगडा होण्यास, प्रचार व प्रसार होण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, डॉ. संजय चाकणे यांच्यासह इतर सदस्यांनी विविध प्रस्तावांवर चर्चा करत सूचनाही मांडल्या. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार हे बैठकीस उपस्थित होते.

मराठा साम्राज्याच्या इतिहासाचे अभ्यासकेंद्र स्थापन करण्यासाठी उत्तम नियोजन करण्यात येणार आहे. नामांकित इतिहासतज्ज्ञांचे सहकार्यही यासाठी घेण्यात येणार आहे. जूने व मोडी लिपीतील साहित्य, कागदपत्रांचाही सखोल अभ्यास व संशोधन करण्यात येणार आहे. कालांतराने या अभ्यास केंद्रासाठी विद्यापीठाने आवश्यक तेवढा निधी उभारून त्याचे अध्यासन केंद्रात रुपांतर करण्याच्या सूचनाही सदस्यांनी मांडल्या आहेत.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जेम्स अॅंड ज्वेलरी या मुंबईतील नामांकित संस्थेबरोबर सहकार्याचा करार करून विद्यापीठात बॅचलर ऑफ आर्ट्स जेम्स अॅंड ज्वेलरी डिझाईन हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करणार आहे. याबाबतचा प्रस्तावही कुलगुरूंनी बैठकीत मांडला होता. त्यास एकमुखाने मान्यात मिळाली आहे. यामुळे आता रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित हा कोर्स सुरु होणार आहे.

**Prabhat: 25.9.2020**

## मराठा इतिहास अभ्यासण्यासाठी केंद्र

पुणे, ता. २४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठा साम्राज्याच्या देदीप्यमान आणि वैभवशाली इतिहासाचा सखोल अभ्यास व त्यावर संशोधन करण्यासाठी स्वतंत्र अभ्यास केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचा आणि मराठा साम्राज्याचा सर्वांगीण अभ्यास केला जाईल.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक गुरुवारी झाली. बैठकीत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी अभ्यास केंद्र उभारण्याचा प्रस्ताव मांडला. त्याला परिषदेच्या सर्व सदस्यांनी मान्यता दिली. केंद्रासाठी आर्थिक तरतूदही करण्यात आली आहे. केंद्राद्वारे ऐतिहासिक माहितीचा प्रसार प्रचारासोबतच आदान-प्रदान होण्यास मदत होणार आहे, असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सांगितले.

पुण्यातील खाद्य प्रक्रिया उद्योगाशी संबंधित १७ प्रमुख उत्पादकांसोबत चर्चा करून विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलामध्ये अन्नप्रक्रिया उद्योगाशी निगडित अभ्यासक्रम आणि संशोधन करण्याबाबतच्या प्रस्तावाला देखील मान्यता मिळाली आहे.

### ज्वेलरी डिझाइन अभ्यासक्रमास मान्यता

मुंबईतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जेम्स अॅण्ड ज्वेलरी या संस्थेशी सहकार्याचा करार करून विद्यापीठाच्या आवारात बॅचलर ऑफ आर्टस (जेम्स अॅण्ड ज्वेलरी डिझाइन) हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव कुलगुरूंनी परिषदेसमोर सादर केला. या प्रस्तावाला परिषदेच्या सदस्यांनी एकमुखाने मान्यता दिली. येत्या काही दिवसांत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरवात होणार आहे. अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठ कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार दिली.

**Sakaal: 25.9.2020**

## मराठा साम्राज्याच्या अभ्यासासाठी केंद्र

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा सखोल अभ्यास व संशोधन करण्यासाठी स्वतंत्र अभ्यास केंद्र उभारण्याचा निर्णय गुरुवारी घेतला. त्याद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांचा; तसेच इतर राजांचाही अभ्यास करण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मॅनेजमेंट कौन्सिल गुरुवारी पार पडली. यामध्ये कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व सदस्यांनी एकमताने मान्यता दिली. या केंद्रासाठी आर्थिक तरतूदही करण्यात आली आहे. यामुळे माहितीच्या प्रसार-प्रचारासोबतच आदान-प्रदान होण्यास मदत होणार असल्याचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सांगितले. 'येत्या काही दिवसांत अभ्यास केंद्राच्या निर्मितीचे काम तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली सुरू होईल,' अशी माहिती डॉ. करमळकर यांनी दिली.

दरम्यान, 'पुण्यातील फूड इंडस्ट्रीशी निगडित १७ प्रमुख उत्पादकांसोबत चर्चा करुन, विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलामध्ये अन्नप्रक्रिया उद्योगाशी निगडित अभ्यासक्रम आणि संशोधन करण्याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे. या प्रक्रियेशी निगडित एक केंद्र लवकरच सुरू करण्यात येईल,' असेही डॉ. करमळकर यांनी सांगितले.

> **मराठा साम्राज्याच्या इतिहासाबाबत मोठ्या प्रमाणात अभ्यासाची आवश्यकता आहे. मोडी लिपीतील असंख्य कागदपत्रांचे आजही वाचन झालेले नाही. त्यामुळे मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा सर्वसमावेशक अभ्यास आणि संशोधन या माध्यमातून व्हावे ही कल्पना आहे.**
>
> – **डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### 'जेम्स अॅंड ज्वेलरी'चा अभ्यासक्रम

''बीए इन जेम्स अॅंड ज्वेलरी डिझाइन' हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम यंदाच्या शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात येणार आहे. मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जेम्स अॅंड ज्वेलरी या संस्थेच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता साधारण ५० आहे. येत्या काही दिवसांत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होईल,' असे डॉ. करमळकर आणि डॉ. पवार यांनी सांगितले.

**Maharashtra Times: 25.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# कॉलेजचे शैक्षणिक सत्र १ नोव्हेंबरपासून

## 'यूजीसी'ची सूचना; १८ नोव्हेंबरपासून वर्ग सुरु करण्याचा सल्ला

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. २४ : विद्यापीठांनी महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून शक्यतो १ नोव्हेंबरपासून २०२०-२१ चे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करावे, अशी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) केली आहे. रिक्त जागांवरील प्रलंबित प्रवेश प्रक्रिया ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी, असेही यूजीसीने म्हटले आहे. कोरोना उद्रेक परिस्थिती गंभीर असलेल्या राज्यांनी यात काही बदल हवे असतील तर तसे 'यूजीसी'ला कळवावे, असे सांगण्यात आले आहे.

'यूजीसी'च्या कार्यकारिणी बैठकीत याबाबतचे निर्णय घेतल्याचे 'यूजीसी'चे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी 'सकाळ'ला सांगितले. कोरोनामुळे उद्भवलेल्या अभूतपूर्व परीस्थितीत महाविद्यालये -विद्यापीठांच्या प्रवेश परीक्षांना विलंब होणार असेल तर १८ नोव्हेंबरपासून वर्ग सुरू करावेत, अशीही सूचना करण्यात आली आहे. 'यूजीसी'ने नवीन शैक्षणिक वर्षाबाबतचे दिशानिर्देश विद्यापीठांना जारी केले आहेत. कोरोना लॉकडाउनमुळे अनेक पालकांची आर्थिक परिस्थिती नाजूक बनल्याने ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेले संपूर्ण (१०० टक्के) व प्रवेश शुल्क कॅन्सलेशन शुल्क न आकारता परत करावे. त्यानंतर प्रवेश रद्द केलेल्यांच्या शुल्कातूनही १००० रूपयांपेक्षा जास्त रक्कम कापून घेऊ नये. नवीन शैक्षणिक वर्षातील वर्ग ऑनलाईन-ऑफलाईन किंवा दूरस्थ पद्धतीने घेण्याची मुभाही विद्यापीठे-महाविद्यालयांना देण्यात आली आहे.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

### फेरपरीक्षांचे निकाल १० ऑक्टोबरपर्यंत

केंद्रीय शालेय शिक्षण मंडळाने (सीबीएसई) १२ वी च्या परीक्षेत अगदी थोड्या गुणांनी अनुत्तीर्ण झालेल्या व उत्तीर्ण होण्याची शक्यता असलेल्या (कंपार्टमेंट झोन) विद्यार्थ्यांच्या बोर्डाच्या फेरपरीक्षांचे निकाल १० ऑक्टोबरपर्यंत जाहीर करण्यात येतील, असे म्हटले आहे. न्या. अजय खानविलकर यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या पीठाला 'सीबीआएसई'ने आज हा निर्णय कळवला. यामुळे या विद्यार्थ्यांनाही महाविद्यालयीन प्रवेशाची संधी मिळणार असली तरी त्यांना महाविद्यालयीन प्रवेश मिळतील याची 'यूजीसी'ने दक्षता घ्यावी, अशी सूचना न्यायालयाने केली.

### असे आहे वेळापत्रक

**३१ ऑक्टोबरपर्यंत**
प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावेत

**१ नोव्हेंबरपासून**
पहिल्या सेमिस्टरचे वर्ग सुरू

**५ एप्रिल २०२१ पर्यंत**
अभ्यासक्रम पूर्ण करावा

**१ ते ८ ऑगस्ट २०२१**
परीक्षा पूर्वतयारीसाठी सुटी

**९ ऑगस्ट ते २१ ऑगस्टपर्यंत**
अंतिम परीक्षा घ्याव्यात

**३० ऑगस्ट २०२१ पासून**
नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करावे



Sakaal: 25.9.2020

# महाविद्यालय स्तरावर होणार १९६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा

**पुणे** : जे अभ्यासक्रम तीनपेक्षा कमी महाविद्यालयांमध्ये चालविले जातात, अशा १९६ अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे संपूर्ण नियोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येणार आहे. याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आदेश काढले आहेत.

पुणे विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन सुरू केले आहे. सध्या प्रत्येक विषयांचे बहुपर्यायी प्रश्न काढण्याचे काम सुरू आहे. तसेच, ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी एजन्सी निवडीसाठी तांत्रिक समितीच्या बैठका सुरू आहेत. अंतिम वर्षासाठी नियमित परीक्षा देणारे सुमारे २ लाख २३ हजार विद्यार्थी आहेत, तर २५ हजार विद्यार्थी हे पुनर्परीक्षा देणारे आहेत.

पुणे विद्यापीठात किंवा महाविद्यालय स्तरावर दरवर्षी नव्याने अभ्यासक्रम सुरू केले जातात. हे अभ्यासक्रम तीन किंवा तीनपेक्षा कमी महाविद्यालयात सुरू असतील, तर त्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी संबंधित महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यासाठी २०११-१२ मध्येच निर्णय घेतला आहे. मात्र, यंदाच्या परीक्षेसाठी त्याबाबत परिपत्रकात स्पष्टता नव्हती, त्यामुळे परीक्षा मंडळाने आज परिपत्रक काढून संबंधित महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा मंडळाकडून मिळालेल्या माहितीनुसार १९६ अभ्यासक्रम हे तीनपेक्षा कमी महाविद्यालयात शिकवले जात आहेत. त्यासाठी या अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका तयार करणे, वेळापत्रक निश्चित करून ते ५ ऑक्टोबरपर्यंत सादर करण्याचे आदेश विद्यापीठाने दिले आहेत. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. काकडे म्हणाले, १२५ या परिपत्रकानुसार तीनपेक्षा कमी महाविद्यालयात सुरू असलेल्या अभ्यासक्रमाचे नियोजन संबंधित महाविद्यालयाला करावे लागते.

Kesari: 25.9.2020

# विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षेचे सुधारित वेळापत्रक जाहीर

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने दि. १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत घेऊन, निकाल दि. १० नोव्हेंबरपूर्वी जाहीर करण्यात येणार आहे, असे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक किंवा प्रकल्पाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपूर्वी घेण्यात येणार असल्याच्या सूचना परिपत्रकामध्ये देण्यात आल्या आहेत. परीक्षा मूल्यमापन व मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी याबाबत परिपत्रक काढून सूचना दिल्या आहेत. यामध्ये परीक्षा पद्धतीबाबत इतर सूचना यापूर्वीच्या परिपत्रकाप्रमाणे ठेवण्यात आल्या आहेत. अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी नियमित, पुनर्परीक्षार्थी, बॅकलॉग विषयांच्या परीक्षा १३ मार्च २०२० पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर घेण्यात याव्यात; तसेच अंतिम पूर्व वर्षाच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपूर्ण अभ्यासक्रमावर घेण्याच्या सूचना डॉ. काकडे यांनी केल्या आहेत. त्याचप्रमाणे ऑनलाइन परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी सराव परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने होणाऱ्या एमसीक्यू बेस्ड परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही, असेही डॉ. काकडे यांनी सांगितले.

Saamana: 25.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education



### अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० ऑक्टोबरपर्यंत

### १० नोव्हेंबरपूर्वी लागणार निकाल

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत घेण्यात येणार आहे, तर निकाल १० नोव्हेंबरपूर्वी जाहीर करण्यात येणार आहे, असे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक किंवा प्रकल्पाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपूर्वी घेण्यात येण्याच्या सूचना परिपत्रकामध्ये देण्यात आल्या आहेत.

परीक्षा मूल्यमापन व मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी याबाबत परिपत्रक काढून सूचना दिल्या आहेत. यामध्ये परीक्षा पद्धतीबाबत इतर सूचना यापूर्वीच्या परिपत्रकाप्रमाणे ठेवण्यात आल्या आहेत. अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी नियमित, पुनःपरीक्षार्थी, बॅकलॉग विषयांच्या परीक्षा १३ मार्च २०२० पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमांवर घेण्यात याव्यात; तसेच अंतिम पूर्व वर्षाच्या पुनः परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपूर्ण अभ्यासक्रमावर घेण्याच्या सूचना डॉ. काकडे यांनी केल्या आहेत. त्याचप्रमाणे ऑनलाइन परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी सराव परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने होणाऱ्या परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही, असेही डॉ. काकडे यांनी सांगितले. विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या नियोजनापूर्वी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी महाविद्यालयामध्ये हेल्पडेस्क तयार करावा, आदी सूचना डॉ. महेश काकडे यांनी केली आहे.

**Kesari: 25.9.2020**



### शिष्यवृत्ती योजनेसाठी 'केवायसी' बंधनकारक

पुणे, दि. २४ - केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना, महाविद्यालय व विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाविद्यालयांनी उच्चशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरून तत्काळ केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आदेश संचालनालयाचे सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी दिले.

केंद्र सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी असणाऱ्या एनएसपी पोर्टलमार्फत विविध शिष्यवृत्तींसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर आहे. महाविद्यालय आणि विद्यापीठांनी नोंदणी करून त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही, तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अर्ज लॉगइनमध्ये दिसणार नाही. त्यामुळे शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येण्यासाठी केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे केवायसी प्रक्रिया प्रलंबित असणाऱ्या महाविद्यालयांनी एनएसपी पोर्टलवर भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह संचालनालयाकडे पाठविण्यात यावे, या योजनेबाबत प्राचार्यांनी सूचनाफलकामार्फत प्रसिद्धी करण्यात यावी, अशा सूचना खताळ यांनी केल्या आहेत.

**Prabhat: 25.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### SPPU tells 20k students to pick their paper mode

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University has once again appealed to students to choose between online or offline mode of examination by logging in to their profiles.

On September 15, the officials had said that of the 2.49 lakh eligible students, 2.23 lakh had filled the information. As many as 1.85 lakh students had applied for online mode and 37841 students had applied for offline mode.

"The links were kept open for a longer time and at the moment we have about 20,000 students who have not applied for any of these modes of examinations. We have already sent about 60,000 SMSs to these students so that they choose a mode of examination. This will help the university plan better and will also be beneficial for the academic future of these students," Mahesh Kakade, director of examination and evaluation at SPPU, said.

He added that since the links opened on Thursday, by noon about 1,500 students newly applied and majority have chosen the online mode.

According to the option form, students can appear online for the examination from any place of convenience however they need to have a working front camera, switched on, throughout the duration of the examination.

In case they choose the offline mode, OMR (Optical Mark Recognition) sheets would be given to them for answering the multiple-choice questions.

**The times of India: 25.9.2020**

### Varsity exam plan to avoid UGC NET dates

#### Officials Say Candidates Needn't Worry About Overlap

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** University Grants Commission National Eligibility Test (UGC NET) that started from Thursday will go on till November 13.

Savitribai Phule Pune University (SPPU) has scheduled its backlog exams between October 1 and 9 and the regular examinations are to be held between October 10 and 30.

While the university has not declared the exact dates as yet, there is fear among students that the dates will clash with NET exams on October 1, 9 and 17. However, SPPU officials on Thursday, assured students that they will not let the exams overlap.

UGC NET was initially scheduled in June, but due to the Covid 19 pandemic and subsequent lockdown, the exam was postponed. While the admit cards for exams prior to September 29 are already out, the hall tickets for exams scheduled on September 29, 30 and October, were to be available for download on September 24.

Till June 2018, the CBSE conducted the NET in 84 subjects at 91 cities. Since December 2018, the UGC NET is being conducted by the National Testing Agency.

**CONDUCTED TWICE A YEAR**

- National Eligibility Test (NET) is an exam conducted for determining the eligibility of Indian nationals for assistant professor only or junior research fellowship & assistant professor both, in Indian universities and colleges
- The award of JRF and or Eligibility for Assistant Professor depends on the aggregate performance of the candidate in Paper-I and paper-II of UGC-NET
- The candidates qualifying only for assistant professor are not to be considered for the award of junior research fellow
- Candidates who qualify the test for eligibility for assistant professor are governed by the rules and regulations for recruitment of assistant professor of the concerned universities/colleges/state governments, as the case may be



**THE SCHEDULE THIS MONTH**

- **October 1** | 9AM to Noon English Group-1
- 3PM to 6PM English Group-2
- **October 9** | 9AM to Noon History
- 3PM to 6PM Political Science
- **October 17** | 9AM to Noon Commerce Group-1
- 3PM to 6PM Commerce Group-2

A final year commerce student at the university said, "The NET for commerce students is on October 17. But the university has said that they would hold their final year exams in the same time period. Since they have not declared any schedule, we are scared that one of the papers may clash with the NET. All we want the university to do is to ensure there is no overlap. Ideally, the university should start the final year examinations after the NET or finish all papers before NET."

Mahesh Kakade, director of examination and evaluation at Savitribai Phule Pune University said they had not decided on the time-table for the October exam as yet.

"We will be doing so in the next two-three days as we want to be sure that it is not clashing with other examinations. Now that we know the NET dates, we will try to formulate the dates and session-time in such a way that students are not left to choose between which one to appear for. Students need not worry," he added.

**The times of India: 25.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# मराठा आरक्षणाचा पेच : राज्यात प्रवेशप्रक्रिया रखडली

## अकरावी, आयटीआय प्रवेश थांबवले : ईडब्ल्यूएस प्रवर्गातून मराठा विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास तिढा आणखी वाढणार

**पुणे : गणेश खळदकर**

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला दिलेल्या स्थगितीमुळे यंदा उशिरा सुरू झालेल्या शैक्षणिक प्रवेशप्रक्रियेला खीळ बसली आहे. अकरावी व आयटीआयचे प्रवेश स्थगित करण्यात आले असून पदवी प्रवेशप्रक्रियाही संभ्रमावस्थेत सुरु आहे. राज्य सरकारने ईडब्ल्यूएस (आर्थिक दुर्बल घटक) प्रवर्गातून मराठा समाजाच्या सवलती कायम ठेवल्या असल्या तरी त्यात आरक्षण कमी मिळत असल्याने आणखी पेच वाढण्याची चिन्हे आहेत.

कोरोना साथीतील लॉकडाऊनमुळे जूनमध्ये सुरू होणारी विविध अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया यंदा ऑगस्टमध्ये सुरू झाली. अकरावी प्रवेशाला एक ऑगस्टला प्रारंभ झाला. त्याला १० सप्टेंबरला स्थगिती देण्यात आली. आयटीआय आणि अकरावी प्रवेशप्रक्रियाही रखडली आहे.




बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर महाविद्यालयीन तसेच विद्यापीठ स्तरावर पदवीसाठी प्रवेशप्रक्रिया राबविण्यास सुरुवात झाली. आरक्षणाला स्थगिती मिळाल्यानंतर शासनाकडून मराठा आरक्षण वगळून पुन्हा प्रवेशक्रिया राबविण्याचे आदेश एका परिपत्रकाद्वारे देण्यात आले. त्याच वेळी दुसऱ्या परिपत्रकाद्वारे प्रवेशप्रक्रिया पूर्वीप्रमाणेच राबविण्यास सांगण्यात आले. त्यामुळे प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. मात्र, ती अंतिम आहे, असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

राज्य सरकारने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आर्थिक दुर्बल घटकांच्या माध्यमातून जरी प्रवेश दिला, तरी या १० टक्के आरक्षणामध्ये अर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या सर्वच जातींचा समावेश होतो. त्यामुळे मराठा विद्यार्थ्यांच्या वाट्याला कमी जागा येण्याची शक्यता आहे. अद्यापि मराठा विद्यार्थ्यांना प्रवेशात नेमके किती टक्के आरक्षण द्यायचे, पान ४ वर»

> "अकरावी प्रवेशाची पहिली फेरी पूर्ण झाली आहे. दुसऱ्या फेरीबाबत अद्याप शासनाचे कोणतेही आदेश आलेले नाहीत. शासनाच्या पुढील आदेशाची वाट पाहत असून शासनाच्या आदेशानुसारच पुढील प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येईल.
>
> **-दिनकर पाटील,**
> संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय

> "राज्य शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात ज्या काही सोयीसुविधा जाहीर केल्या आहेत, त्या संदर्भात चर्चा सुरु आहे. चर्चेनंतरच पुढील प्रवेशप्रक्रिया कशी राबवायची या संदर्भातील निर्णय घेण्यात येणार आहे.
>
> **- दीपेंद्रसिंह कुशवाह,**
> संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

Pune Edition
Sep 26, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# 'सेट' लांबणीवर पडण्याची शक्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सहायक प्राध्यापक पदासाठी घेतली जाणारी राज्य पात्रता परीक्षा (सेट) आता लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. करोना संसर्ग, अंतिम वर्षाच्या ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या परीक्षा, नोव्हेंबरमध्ये सुरू होणारे नवे शैक्षणिक वर्ष या मुळे सेट परीक्षा डिसेंबरमध्ये होऊ शकेल.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत महाराष्ट्र व गोवा राज्यासाठी सेट परीक्षा घेतली जाते. नियोजित वेळापत्रकानुसार २८ जूनला होणाऱ्या परीक्षेसाठी जवळपास १ लाख २५ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. मात्र करोना संसर्गामुळे ही परीक्षा स्थगित करण्यात आली. सुधारित वेळापत्रक अद्याप जाहीर करण्यात न आल्याने सेट कधी होणार असा प्रश्न उमेदवारांकडून विचारण्यात येत आहे.

राज्यातील सर्व विद्यापीठे ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी करत आहेत. तसेच एमपीएससी-यूपीएससीच्या परीक्षा ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये होणार असल्याने डिसेंबरमध्ये सेट परीक्षेसाठीच्या केंद्रांसाठी महाविद्यालये उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे डिसेंबरमध्ये सेट होऊ शकेल. यूजीसीच्या नेट परीक्षेनंतर सेट परीक्षेचे नियोजन करण्यात येणार आहे. करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सेट परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घ्यायची की ऑफलाइन याबाबत काही ठरलेले नाही, अशी माहिती सेट विभागाने दिली.

### अर्ज भरण्याचा दुवा सुरू करण्याची मागणी

राज्यात विविध प्रवेश परीक्षा लांबल्याने, प्रशासकीय यंत्रणेकडून या परीक्षांसाठी अर्ज करण्यासाठी दोन दिवसांची मुदतवाढ दिली होती. तसेच एनटीएनेही नेट परीक्षेच्या अर्जासाठी मुदतवाढ दिली होती. त्यामुळे सेट परीक्षेच्या अर्जासाठीही संधी देण्याची मागणी करण्यात येत आहे.

लोकसत्ता Sat. 26 September 2020
https://epaper.loksatta.com/c/5

# सोयीचे परीक्षा केंद्र निवडण्यासाठी विकल्प भरा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २५ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सुमारे ३९ हजार विद्यार्थ्यांनी अंतिम वर्षाची परीक्षेचा पर्याय निवडला आहे. या विद्यार्थ्यांनी दि. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत त्यांना सोयीचे ठरेल, असा परीक्षा केंद्राचा विकल्प निवडावेत, असे आवाहन परीक्षा विभागाने परीक्षार्थ्यांना केले आहे.

ऑफलाइनचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यापीठाच्या अधिकृत लॉगिनमध्ये परीक्षा केंद्राची यादी उपलब्ध करून दिली आहे. ती पाहून त्यांना सोयीचे होईल असे परीक्षा केंद्र निवडावेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगिनमधून परीक्षा केंद्र निवडून सादर करणे आवश्यक आहे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले आहे. दरम्यान, काही विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र जवळणे मिळणे अपेक्षित आहे. मात्र, काहींना सोयीचे परीक्षा केंद्र मिळाले नसल्याचे दिसून आले. अशा विद्यार्थ्यांनी हा परीक्षा केंद्राचा विकल्प भरणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना जवळचे परीक्षा केंद्र मिळेल. मात्र जे विकल्प निवडणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून त्यांच्या प्रवेशित महाविद्यालयाजवळच्या यादीतील पत्त्यानुसार केंद्र देण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

**Prabhat: 26.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# विद्यापीठात 'मराठा साम्राज्य' इतिहासाचे अभ्यास केंद्र

### व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मराठा साम्राज्याच्या ऐतिहासिक वाटचालीचा सखोल अभ्यास व संशोधन करण्यासाठी स्वतंत्र अभ्यास केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला असून, त्याद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांसोबत इतर राजांचा अभ्यास करण्यात येईल. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने जेम्स अँड ज्वेलरी डिझाइनचा

निर्णय गुरुवारी घेण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची व्यवस्थापन परिषदेची बैठक गुरुवारी पार पडली. यामध्ये कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी केंद्र उभारण्याचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व सदस्यांनी एकमताने मान्यता दिली. या केंद्रासाठी आर्थिक तरतूदही करण्यात आली आहे. त्यामुळे मराठ्यांच्या देदीप्यमान कामगिरीचा अभ्यास आणि संशोधन करण्यात येणार आहे. या केंद्राद्वारे ऐतिहासिक



आदानप्रदान होण्यास मदत होणार असल्याचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सांगितले. येत्या काही दिवसात अभ्यास केंद्राच्या निर्मितीचे काम तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली सुरू होईल, अशी

### जेम्स अँड ज्वेलरी डिझाइन ३ वर्षांचा अभ्यासक्रम

विद्यापीठात बीबीए इन जेम्स अँड ज्वेलरी डिझाइन हा तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात येणार आहे. मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जेम्स अँड ज्वेलरी या संस्थेच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० च्या आसपास राहणार आहे. येत्या काही दिवसात अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होईल. याबाबत अधिक माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात येईल, असे डॉ. पवार यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे पुण्यातील फूड इंडस्ट्रीशी निगडित १७ प्रमुख उत्पादकांसोबत चर्चा करून, विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलामध्ये अन्नप्रक्रिया उद्योगाशी

करण्याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे. या प्रक्रियेशी निगडित एक केंद्र लवकरच सुरू करण्यात येईल, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

My Pune Edition
Sep 26, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# मराठा साम्राज्याच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी विद्यापीठात केंद्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक गुरुवारी झाली. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मराठा इतिहासाच्या अभ्यासासाठीचे केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेसमोर मांडला. त्यावर चर्चा करून या अभ्यास केंद्रासाठी व्यवस्थापन परिषदेने मंजुरी दिली. केंद्राच्या संकल्पनेबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले,' आजही मोडी लिपीतील असंख्य कागदपत्रांचे वाचन झालेले नाही. कादंबरीच्या माध्यमातून काही वेळा अतिरंजित पद्धतीने इतिहासाची मांडणी केली जाते. त्यामुळे मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा सर्वसमावेशक अभ्यास आणि संशोधन हे केंद्राच्या माध्यमातून व्हावे ही कल्पना आहे.

### जेम्स अँड ज्वेलरीचा पदवी अभ्यासक्रम

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जेम्स अँड ज्वेलरी या मुंबईस्थित संस्थेच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जेम्स अँड ज्वेलरी डिझाईन हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. कौशल्यावर आधारित रोजगाराभिमुख असा हा अभ्यासक्रम आहे.

लोकसत्ता Sat, 26 September 2020
https://epaper.loksatta.com/c/

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# Varsity to set up research chair on Maratha Empire

**SPPU authorities feel move will boost Modi script and unravel more mysteries from the 18th-century era**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Savitribai Phule Pune University (SPPU) is all set to form a research and study chair on the Maratha Empire that will delve into the rich heritage of the community and assimilate its various aspects with academics.

The proposal was accepted by all the members of the management council of the varsity.

Talking about the move, Prafulla Pawar, registrar, SPPU, shared, "It was a unanimous decision taken during a management council meeting on Thursday. This research centre will plumb deeper into Maratha-era history. The findings will only enrich our culture and knowledge of antiquity."

While SPPU already has a Chhatrapati Shivaji Maharaj Chair, it studies the defence angle under the defence studies department. Historians and scholars in the city believe that the upcoming initiative will help students in their academics.

Commenting on the matter, Sadanand More, a scholar of history and Marathi culture, said, "We do not have such a research chair in any of the universities in Maharashtra and the initiative was long overdue. The Marathas were a big power in the 18th century and we need more scholarly work on the field and the time period.

The chair hopes to teach and spread the knowledge of Modi script, which researchers feel is the need of the hour as only a handful of scholars study the format.



RAHUL DESHMUKH

**The proposal got a nod at the SPPU council meeting on Thursday**

Talking about the same, Pandurang Balkawde, a city-based historian, said, "I welcome the decision taken by SPPU as this research chair will initiate the study of Modi script, throwing up many more mysteries from the Maratha era. Pune archives have at least 5 crore papers written in Modi script. However, we lack experts to study the form."

He added, "While I have started teaching the script, at least 200 students can now read and understand the format. The project will explain the various aspect of the Maratha rule under Shindes from Gwalior, Holkars from Indore, Ghorpades in Karnataka, among others."

Historians also feel that instead of just researching, the chair should take up sessions on teaching Modi script to keep the linguistic tradition alive.

After getting a nod in the management council meeting, SPPU is now looking to appoint scholars to establish the chair.

**Pune mirror: 26.9.2020**

# सहायक प्राध्यापक पदासाठी




- तासिका तत्त्वावरील पद भरतीस मिळेना मान्यता
- शासनाकडे प्रस्ताव धूळखात पडून
- बेरोजगारांच्या नशिबी प्रतीक्षाच

डॉ. राजू गुरव

पुणे, दि. २५ - राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापकांची पदे रिक्तच आहेत. त्यातच तासिका तत्त्वावर पदे भरण्याचा उच्च शिक्षण संचालक कार्यालयाने दोन महिन्यांपूर्वी पाठविलेला प्रस्तावही राज्य शासनाकडे धूळखात पडून आहे.

**महाविद्यालयांना भासतेय गरज**

राज्य शासनाकडून तासिका तत्त्वावरील सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यास मान्यता मिळण्याबरोबर त्यांच्या मानधनासाठी अनुदानही उपलब्ध होणे आवश्यक आहे. अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षांसाठी व ऑनलाइन शिक्षणासाठी महाविद्यालयांना तासिका तत्त्वावरील सहायक प्राध्यापकांची गरज भासू लागली आहे. यूजीसीने १ नोव्हेंबरपासून महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचे आदेश काढले. त्यामुळे पदे भरण्याचा तिढा लवकर सोडवावा लागणार आहे. दरम्यान, उमेदवारांनी पदे भरण्याबाबतच्या मागणीसाठी शासनाला निवेदने पाठविण्याचा धडाका लावला आहे.

रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथिल करण्याचा निर्णय राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०१८ रोजी घेतला. १ ऑक्टोबर २०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित पदे भरण्यास मान्यता मिळाली. ४० टक्क्यांच्या पद भरतीच्या मान्यतेनुसार ३ हजार ५८० पदे भरण्यास मान्यता मिळाली. यात ५२८ महाविद्यालयांना भरतीला मंजुरी मिळाली. रोस्टर तपासणी, एनओसी यात अनेक अडथळे निर्माण झाले होते. यामुळे भरती प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही.

राज्यातील १ हजार ७७ पैकी केवळ ३१० अनुदानित महाविद्यालयांनी भरतीची 'एनओसी' मिळविली होती. त्यात केवळ १ हजार ३५१ पदांचीच भरती पूर्ण झाली. त्यातच सेवानिवृत्त होणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे रिक्त पदांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

करोनामुळे राज्याची आर्थिक स्थिती ढासळली आहे. त्यामुळे वित्त विभागाने कोणतीही नवीन पद भरती करू नये, असे आदेश ४ मे २०२० रोजी काढले. यामुळे भरतीला पुन्हा स्थगिती मिळाली. त्यामुळे तासिका तत्त्वावरही पदे भरण्यास अडचण निर्माण झाली, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

सहायक प्राध्यापकांची पूर्णवेळ पदे भरण्यात अडचणी असल्याने दरवर्षी बहुसंख्य महाविद्यालयात तासिका तत्त्वावरच पदे भरण्याला प्राधान्य देण्यात येत असते. यंदाही महाविद्यालयांनी संबंधित विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडे तासिका तत्त्वावरच्या पदांना मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव दाखल केले आहेत. मात्र त्यावर काहीच हालचाली झाल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाच्या आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे पुन्हा रोस्टर तपासणीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

**Prabhat: 26.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑनलाइन पर्याय निवडूनही नोंद ऑफलाइन परीक्षेची!

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑनलाइनचा पर्याय निवडूनही त्यांच्या नावावर ऑफलाइन (प्रत्यक्ष) पर्याय निवडल्याचे दाखवले जात आहे. या विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षेसाठी जवळचे महाविद्यालय केंद्र निवडण्याची सूचना देण्यात आली असून, ऑनलाइन परीक्षा देण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांसमोर आता अडचण निर्माण झाली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षातील नियमित, विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने, बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नपत्रिकेद्वारे होणार आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन यातून पर्याय निवडण्याची संधी देण्यात आली होती. त्यापैकी ८५ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑनलाइनचा पर्याय निवडला. मात्र, काही विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पर्याय निवडूनही प्रणालीमध्ये त्यांच्या नावापुढे ऑफलाइन पर्याय निवडल्याचे दाखवले जात असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

दापोडी येथील वाणिज्य शाखेतील आशुतोष सिंग म्हणाला, की पर्याय निवडताना ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला होता. मात्र आता लॉगिनमध्ये ऑफलाइन का दाखवले जात आहे हे कळत नाही.

'ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडून दोन वेळा पडताळणीही केली होती. परीक्षेचे प्रवेशपत्रही डाऊनलोड केले. मात्र आता ऑफलाइन पर्याय निवडल्याचे दिसून येत आहे. माझ्यासह आणखी आठ-दहा विद्यार्थ्यांच्या बाबतीत हा प्रकार झाला आहे. महाविद्यालयात चौकशी केली तर विद्यापीठाकडे संपर्क साधा असे सांगितले जाते. विद्यापीठात संपर्क साधला तर प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे आता काय करायचे असा प्रश्न आहे,' असे नाशिकच्या प्रवीण गांगुर्डेने सांगितले.

'विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑनलाइनचा पर्याय निवडूनही आता ऑफलाइन परीक्षेसाठी केंद्र निवडण्यास सांगितले जात आहे. काही विद्यार्थ्यांनी अडचणींमुळे परीक्षेचा पर्याय निवडला नव्हता. त्यांना मुदत वाढवून द्यायला हवी. विद्यार्थ्यांच्या तक्रारींसाठी विद्यापीठाने हेल्पलाइन सुरू करावी,' असे कमलाकर शेटे म्हणाला.

> "विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक परीक्षा पर्याय अर्ज भरलेला नाही. विद्यापीठाच्या प्रणालीत चूक नाही. अर्जामध्ये किमान ३जी किंवा त्यापेक्षा जास्त इंटरनेट आणि किमान १ एमबीपीएस वेगाचे इंटरनेट या पर्यायांना विद्यार्थ्यांनी 'नॉट ॲप्लिकेबल' आणि 'नो' हे निवडले असल्यास त्यांना ऑफलाइन परीक्षेसाठी ग्राह्य धरले आहे. कारण इंटरनेट उपलब्ध असल्याशिवाय ऑनलाइन परीक्षा देता येणार नाही. त्यामुळे परीक्षेसाठी ऑनलाइन पर्याय निवडून ऑफलाइन दिसत असलेल्या विद्यार्थ्यांना बदल करण्यासाठी २७ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात येत आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी covid19helpdesk@unipune.ac.in या ई मेलवर संपर्क साधावा.
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sat, 26 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55225989

# अंतिम वर्ष परीक्षेचा 'ऑनलाइन' गोंधळ

## विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पर्याय निवडूनही प्रणालीमध्ये त्यांच्या नावे ऑफलाइन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २५ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी ऑनलाइनचा पर्याय निवडूनही त्यांच्या नावावर ऑफलाइन (प्रत्यक्ष) पर्याय निवडल्याचे दाखवले जात आहे. त्यामुळे ऑनलाइनद्वारे परीक्षा देण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांपुढे मोठा प्रश्न उभा राहिला आहे.



विद्यापीठातर्फे अंतिम वर्षातील नियमित व बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने, बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकेद्वारे होणार आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन यातून पर्याय निवडण्याची संधी दिली होती. त्यापैकी ८५ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑनलाइनचा पर्याय निवडला. मात्र, काहींनी ऑनलाइन पर्याय निवडूनही प्रणालीमध्ये त्यांच्या नावापुढे ऑफलाइन पर्याय निवडल्याचे दाखवले जात असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला होता. मात्र आता लॉगिनमध्ये ऑफलाइन का दाखवले जात आहे हे कळत नाही.

ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडून दोनवेळा पडताळणीही केली होती. परीक्षेचे प्रवेशपत्रही डाऊनलोड केले. मात्र आता ऑफलाइन पर्याय निवडल्याचे दिसून येत आहे. असा प्रकार आणखी आठ-दहा विद्यार्थ्यांच्या बाबतीत घडला आहे. याबाबत महाविद्यालयात चौकशी केली तर विद्यापीठाकडे संपर्क साधा, असे सांगितले जाते. विद्यापीठात संपर्क साधला तर प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे आता काय करायचे असा प्रश्न आहे, असे एका विद्यार्थ्याने सांगितले.

### विद्यापीठाच्या प्रणालीत चूक नाही...

परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक परीक्षा पर्याय अर्ज भरलेला नाही. विद्यापीठाच्या प्रणालीत चूक नाही. अर्जामध्ये विद्यार्थ्यांनी इंटरनेट सुविधेसाठी विद्यार्थ्यांना 'नॉट ॲप्लिकेबल' आणि 'नो' हे निवडले असल्यास त्यांना ऑफलाइन परीक्षेसाठी ग्राह्य धरले आहे. परीक्षेसाठी ऑनलाइन पर्याय निवडून ऑफलाइन दिसत असलेल्या विद्यार्थ्यांना बदल करण्यासाठी २७ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात येत आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून देण्यात आली.

**Prabhat: 26.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

City | PuneTimesMirror

# SPPU mixed up exam options, say students

**Final-yr examinees allege while they opted for online mode, varsity asking them to choose centres now; authorities assure to look into the complaints**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

FILE PHOTO





While students are set to appear for the final-year exams from October 1, they have raised questions over the futility of filling the preference forms (above)

Final-year students of Savitribai Phule Pune University (SPPU), who are set to appear for their examinations from October 1, have accused the varsity of arbitrarily changing their online/offline exam preference mode as well as the exam centres opted for the offline tests.

Students have complained that during filling the forms, while many had opted for the digital format to take the exams, they are at a loss of words to see the selections being changed to offline mode at the last moment, with examinee being asked to provide exam centre preference.

A third-year BA student shared, "I am in Nashik at the moment and will not be able to be physically present to take the test. Therefore, I had opted for the online way. However, I have received my hall ticket, which does not have any mention of the format assigned. On Friday, the varsity suddenly asked me to select to be physically present and choose the centre. Multiple frantic calls to the helpdesk have gone unanswered."

A final-year BBA student added, "I had chosen the online option and even specified taking the test on my mobile phone, emphasising that I do have an internet connection. But on Friday, I got an intimation of selecting an exam centre near my house to physically take the test."

Expressing shock over the mixup, another undergraduate final-year commerce student asked, "What's the point of giving options when we are forced to sit for the exams in person anyway?"

Another student from Hadapsar claimed that he had preferred the online route as there have been COVID-19 patients in his family and he, too, had contracted the infection. The final-year LLB student recounted, "I am virus-positive for past 15 days and in home quarantine. I have been calling up the authorities concerned, but haven't heard from them yet."




Apart from asking students to shift to the offline mode to take the tests, the varsity is allegedly also making pupils change the exam centres.

A student of Jadhavar College of Arts, Science and Commerce said, "We had mentioned our college as the centre for the examination as it is closer to where I stay. The chosen option is suddenly not available anymore, leaving us to scout for other nearby centres."

Putting the onus on the pupils, Mahesh Kakade, director, examination department, SPPU, said, "Students must have mistakenly left the mandatory fields vacant while filling the forms. If they are facing any issues, they can approach the examination department. We are trying to resolve the cases as and when they are coming to our notice."

Unhappy with the treatment meted out, students have, however, questioned the need of filling the preference form in the face of multiple challenges and complications and have further raised concerns over preparedness of holding the exams on part of the authorities.

PICS: MAHENDRA KOLHE

**Pune mirror: 26.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# 'ऑनलाइन' पर्याय 'ऑफ'

### परीक्षा केंद्र निवडण्याच्या सूचनेमुळे विद्यार्थ्यांसमोर प्रश्न

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑनलाइनचा पर्याय निवडूनही त्यांच्या नावावर ऑफलाइन (प्रत्यक्ष) पर्याय निवडल्याचे दाखवले जात आहे. या विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षेसाठी जवळचे महाविद्यालय केंद्र निवडण्याची सूचना देण्यात आली असून, ऑनलाइन परीक्षा देण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांसमोर आता अडचण निर्माण झाली आहे.

पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षातील नियमित, विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने, बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नपत्रिकेद्वारे होणार आहेत. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन यातून पर्याय निवडण्याची संधी देण्यात आली होती. त्यापैकी ८५ टक्के विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी ऑनलाइनचा पर्याय निवडला. मात्र, काही विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पर्याय निवडूनही प्रणालीमध्ये त्यांच्या नावापुढे ऑफलाइन पर्याय निवडल्याचे दाखवले जात असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

दापोडी येथील वाणिज्य शाखेतील आशुतोष सिंग म्हणाला, 'पर्याय, निवडताना ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला होता. मात्र, आता लॉगइननमध्ये ऑफलाइन का दाखवले जात आहे हे कळत नाही.'

'ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडून दोन वेळा पडताळणीही केली. परीक्षेचे प्रवेशपत्रही डाउनलोड केले. मात्र, आता ऑफलाइन पर्याय निवडल्याचे दिसून येत आहे. माझ्यासह आणखी आठ-दहा विद्यार्थ्यांच्या बाबतीत हा प्रकार झाला आहे. महाविद्यालयात चौकशी केली, तर विद्यापीठाकडे संपर्क साधा असे सांगितले जाते. विद्यापीठात संपर्क साधला तर प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे आता काय करायचे असा प्रश्न आहे,' असे प्रवीण गांगुर्डेने सांगितले.

'परीक्षेसाठी ऑनलाइनचा पर्याय निवडूनही आता ऑफलाइन परीक्षेसाठी केंद्र निवडण्यास सांगितले जात आहे. काही विद्यार्थ्यांनी अडचणींमुळे परीक्षेचा पर्याय निवडला नव्हता. त्यांना मुदत वाढवून द्यायला हवी. विद्यार्थ्यांच्या तक्रारींसाठी विद्यापीठाने हेल्पलाइन सुरू करावी,' असे कमलाकर शेटे यांनी सांगितले.

#### 'प्रणालीत चूक नाही'



विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक परीक्षा पर्याय अर्ज भरलेला नाही. विद्यापीठाच्या प्रणालीत चूक नाही. अर्जामध्ये किमान थ्रीजी किंवा त्यापेक्षा जास्त इंटरनेट आणि किमान १ एमबीपीएस वेगाचे इंटरनेट या पर्यायांना विद्यार्थ्यांनी 'नॉट ॲप्लिकेबल' आणि 'नो' हे निवडले असल्यास त्यांना ऑफलाइन परीक्षेसाठी ग्राह्य धरले आहे. कारण इंटरनेट उपलब्ध असल्याशिवाय ऑनलाइन परीक्षा देता येणार नाही. त्यामुळे परीक्षेसाठी ऑनलाइन पर्याय निवडून ऑफलाइन दिसत असलेल्या विद्यार्थ्यांना बदल करण्यासाठी २७ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी covid19helpdesk@unipune.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा. त्यांच्या अडचणींचे पूर्ण समाधान करण्यात येईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**Maharashtra Times: 26.9.2020**

# ऑफलाइन परीक्षेसाठी विद्यापीठाची ११० केंद्रे

**पुणे, ता. २६ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन परीच्या केंद्रांची संख्या पंचावन्नवरून आता ११० करण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचे नियोजन सुरू केले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना ते ऑनलाइन परीक्षा देणार की ऑफलाइन याचा पर्याय निवडण्यास सांगितले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पर्याय निवडलेला असतानाही ऑनलाइनच हाच पर्याय निवडला जात होता. त्यामुळे त्यांना मनस्तापाला सामोरे जावे लागले होते. ही तांत्रिक चूक विद्यापीठाने दुरुस्त केली आहे. पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील १ लाख ८९ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइनचा पर्याय निवडला आहे.

> **विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विद्यापीठाने परीक्षा केंद्रांची संख्या आता ११० केली आहे. पर्याय निवडीची मुदत २७ सप्टेंबरला रात्री १२ वाजता संपणार आहे.**
>
> **- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# आंदोलनामुळे परीक्षा विभाग ठप्प

**पुणे, ता. २६ :** अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरू केलेली असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन सुरू केले आहे. त्यात परीक्षा विभागातील १६३ कर्मचारी, अधिकाऱ्यांना सहभागी झाले आहेत. त्यामुळे मोजक्या १२ अधिकारी व कर्मचारी काम करत आहे. यामुळे परीक्षा विभाग ठप्प झाला आहे.

**Sakaal: 27.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# ऑनलाइन अभ्यासच ठरणार यशाचा मंत्र

## शिक्षकांसह विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेची कोरोनामुळे बदलतेय अभ्यासपद्धती

ब्रिजमोहन पाटील/ महेश जगताप

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. २६ : स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन म्हणजे तज्ज्ञ प्राध्यापकांचा क्लास लावून, सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न असतो. कोरोनामुळे या पद्धतीला ब्रेक लागला आहे. लॉकडाऊनच्या समस्येतून बाहेर पडण्यासाठी ऑनलाइन मार्गदर्शन आणि अभ्यास हाच आता विद्यार्थ्यांच्या यशाचा मंत्र ठरणार आहे. ऑनलाइनमुळे देशभरातील शिक्षकांचे पर्याय उपलब्ध असल्याने शिक्षकांना चांगल्या दर्जाचे व्हिडिओ तयार करण्याचे आव्हान आहे. तर, इंटरनेटवर उपलब्ध साहित्यातून योग्य साहित्य निवडून विद्यार्थ्यांना परीक्षांची अभ्यास करावा लागणार आहे.**

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र म्हणजे मोठे हॉल, शेकडोंच्या संख्येत बसलेले विद्यार्थी, तरीही कोणाचे लक्ष नाही हे शिक्षकांना कळायचं. पण आता 'कोरोना'ने सर्वच बदललं आहे. एकाच विषयाचे खास मार्गदर्शन करणारे शिक्षक सकाळी, दुपारी, संध्याकाळी वेगळ्याच क्लासमध्ये मार्गदर्शन करत होते. तसेच ते पुणे, दिल्ली, नागपूर अशा शहरात जाऊन शिकवायचे. आता पुण्यात बसून ते एकाच वेळी संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना शिकवत आहेत. विद्यार्थ्यांनाही घरबसल्या शिक्षण मिळत आहे. यात तांत्रिक अडचणी येत असल्या तरी हे बदल स्वीकारण्यास विद्यार्थी तयार आहेत.

**नव्या भरतीला वर्षभर ब्रेक**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने काढलेल्या आदेशात २०२०-२१ या वर्षात शासकीय नोकरभरती करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात राज्यसेवा पूर्व परीक्षा, अराजपत्रित गट ब आणि अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा होणार आहे. पण त्यानंतर 'एमपीएससी'कडून किमान वर्षभर तरी नवी जाहिरात येणार नसल्याने राज्यातील सुमारे चार लाख विद्यार्थ्यांना फटका बसणार आहे. नवी जाहिरात येईपर्यंत त्यांना संयमाने अभ्यास करावा लागणार आहे.

**क्लासेसच्या स्वरुपात बदल...**

- ऑनलाइन क्लासमध्ये राज्यभरातील हजारो विद्यार्थी मार्गदर्शनास सहभागी
- ऑनलाइनमुळे क्लासचे शुल्क ५० टक्क्यांनी कमी
- व्हिडिओ, नोट्स, पुस्तके मोफत उपलब्ध, विद्यार्थ्यांचा खर्च वाचला
- परिस्थितीमुळे पुण्यात न येऊ शकलेले विद्यार्थ्यांना मिळत आहे मार्गदर्शन

**अर्थकारणावर परिणाम**

कोरोनामुळे क्लासचालकांचे उत्पन्न बुडाले आहेच, पण ऑनलाइन क्लासमधून शुल्क जमा होत असले तरी त्यावर ५० टक्क्यांपेक्षा जास्त परिणाम झाला आहे. अनेक संस्था, राष्ट्रीय स्तरावरील ॲप असलेल्या कंपन्यांनी एक महिना, तीन महिने, सहा महिने यानुसार पॅकिज तयार केले असून, त्यासाठी ५ हजारपासून ते ५० हजार रुपये शुल्क आकारले आहे.

**ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मोठ्याप्रमाणात साहित्य उपलब्ध झाले आहे. पुढील काळात ७० टक्के ऑफलाइन व ३० टक्के ऑनलाइन असेच स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन असेल. देशभरातील तज्ज्ञ शिक्षक ऑनलाइन सर्वांसाठी उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांसाठी अनेक पर्याय आहेत. त्यामुळे जे प्राध्यापक उत्तम कंटेन्ट असलेले व्हिडिओ तयार करतील, लाइव्ह वर्गात तंत्रज्ञानाचा वापर करून शिकवतील त्यांनाच महत्त्व असणार आहे.**

- **भूषण देशमुख**, मार्गदर्शक, स्पर्धा परीक्षा

**विद्यार्थ्यांना इंटरनेटवर प्रत्येक विषयाचे व्हिडिओ, नोट्स, पुस्तके असे चांगल्या दर्जाचे साहित्य मोफत आणि सशुल्क उपलब्ध आहे. तज्ज्ञांचे ऑनलाइन मार्गदर्शन मिळत आहे. त्यामुळे कोरोनाचा प्रसार बघता विद्यार्थ्यांना आत्ताच पुण्यात येता येईल अशी स्थिती नाही, त्यामुळे हे साहित्याचा पुरेपूर वापर केल्यास विद्यार्थ्यांना त्याचा नक्कीच फायदा होईल.**

- **अशुतोष कुलकर्णी**, यूपीएससी टॉपर (देशात ४४ वा)

**सध्याच्या आर्थिक चणचणीच्या काळात विद्यार्थ्यांनी शहरात येऊन शिकण्याचा हट्ट न ठेवता ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा स्वीकार करावा. तसेच तीन चार वर्ष अभ्यास केल्यानंतर उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू ठेवावा. त्यामुळे त्यांच्यावर मानसिक, सामाजिक दडपण कमी होईल.**

- **रंजन कोळंबे**, संचालक, आयएएस भगीरथ ॲकॅडमी

**Sakaal: 27.9.2020**

# अंतिम सत्र परीक्षा अडचणीत

**मुंबई, ता. २६ :** राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासह इतर दहा प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू झाले आहे; तर मुंबई विद्यापीठातील अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या सोमवारपासून (ता.२८) लेखणी बंद आंदोलनास प्रारंभ होणार आहे. या आंदोलनांमुळे राज्यभरातील अंतिम सत्राच्या परीक्षा संकटात आल्या असून निकालावरही याचा परिणाम होणार आहे.

अंतिम सत्राच्या परीक्षा विद्यापीठांमार्फत घेण्यात येत असतानाच अधिकारी कर्मचाऱ्यांनी आंदोलन पुकारल्याने याचा परिणाम परीक्षा आणि निकालावर होणार आहे.

हे आंदोलन सरकारने लादले असून त्याला सरकार सर्वस्वी जबाबदार आहे. विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक झाल्याशिवाय हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असे समन्वय समितीचे निमंत्रक दीपक घोणे यांनी सांगितले.

**Sakaal: 27.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### SPPU to set up Maratha studies centre

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The management committee of the Savitribai Phule Pune University (SPPU) has given its nod for setting up a 'Centre for Study in Maratha History', which will work to promote and create awareness about Maratha history and conduct research in the field.

In the management council meeting held on September 24, vice-chancellor of SPPU, Nitin Karmalkar, proposed to establish the centre. "All the members unanimously agreed to the proposal. Accordingly, financial aid has been given to start this centre," registrar Prafulla Pawar said.

The SPPU has also signed an agreement with the Indian Institute of Gems and Jewellery (Mumbai) for collaborating on Bachelor of Arts course. The three-year degree will have an intake of 50 students. For more details log onto SPPU's website. The council has also agreed to set up a centre for courses in food processing and allied industries.

**The Times Of India: 28.9.2020**

FUTURE THE TIMES OF INDIA | PUNE | MONDAY | SEPTEMBER 28, 2020

### Edu director tells colleges to appoint nodal officers

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Universities and educational institutes must provide physically-challenged students every facility to write the final year examination in the online or offline mode, said state higher and technical education director Dhanraj Mane.

As many as 756 physically-challenged students registered with the Savitribai Phule Pune University (SPPU) will appear for the final examination. They are to be given ground floor classrooms as exam centres, provided writer facility and 20 extra minutes per exam, said SPPU director of examination and evaluation Mahesh Kakade.

In a notification dated September 18, Mane stated that apart from following all the guidelines issued by the government, a nodal officer must be appointed at every college/university in order to look into the problems faced by physically-challenged students.

"The nodal officer's contact number as well as e-mail id should be displayed on the official website of the college and university. Such students also need to be made aware of all the facilities available to them latest by September 21," stated the notification.

**A CLOSER LOOK**

| No. of students* | Course type |
|---|---|
| 548 | Graduate |
| 208 | Postgraduate |
| 185 | Professional |
| 571 | Non-professional |

(*Physically disabled students expected to attempt final year exams under SPPU)

"Even during normal times, getting a writer is a big problem but during the pandemic, it is even harder. In villages and rural areas, writers may not be available. If students have decided to come to the college and write the exam, we need to figure out the rules of getting a writer

– Dilip Sheth | PRINCIPAL, SP COLLEGE

**The Times Of India: 28.9.2020**

### अंतिम वर्षाच्या परीक्षेत अडथळ्यांची शर्यत

#### स्पर्धा परीक्षा, निविदा आणि प्रश्नसंचाचे काम अर्धवट

**पुणे, ता. २७ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोबरच्या १ तारखेपासून अंतिम वर्षाच्या 'बॅकलॉग'च्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे निश्चित केले होते. मात्र या दरम्यान नेट, यूपीएससी आदी परीक्षांच्या आलेल्या तारखा, प्रश्नसंचाचे अर्धवट काम आणि ऑनलाइन परीक्षेसाठी संस्था निश्चित न झाल्याने अंतिम वर्षाच्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यास अडथळे येत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाने १ ते ९ ऑक्टोबर दरम्यान बॅकलॉगची परीक्षा, तर १० ते ३० ऑक्टोबर दरम्यान मुख्य परीक्षा घेतली जाणार असल्याचे यापूर्वी जाहीर केले आहे. विद्यापीठाने बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यासाठी तयारी सुरू केली. विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांसाठी सुमारे ३ हजार ३०० विषय आहेत. त्यासाठी प्रश्न पत्रिका तयार करण्याचे काम सुरू आहे. २३ सप्टेंबरपर्यंत सर्व प्रश्नपत्रिका तयार होणे अपेक्षित होते. पण इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत प्रश्नपत्रिका तयार करणे अवघड जात आहे. ऑक्टोबर महिन्यात १, ५ व ९ या दिवशी नेटची परीक्षा आहे. ४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा आहे. ११ ऑक्टोबर रोजी राज्य सेवा पूर्व परीक्षा आहे. या दिवशी परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा घेण्याचे टाळले आहे.

ऑनलाइन परीक्षेसाठी खासगी एजन्सी निवडण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली आहे. या निविदा सोमवारी उघडल्या जाणार आहे.

**Sakaal: 28.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# वेळापत्रकाची 'परीक्षा'

## राज्यातील विद्यापीठांपुढे पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात अडथळे

मटा विशेष

Harsh Dudhe
@timesgroup.com
Tweet : @harshdudhe_MT

**पुणे :** राज्यातील विद्यापीठांच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक कोलमडण्याची चिन्हे आहेत. ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी आयटी कंपनीची नेमणूक करण्यात समस्या, अकृषी विद्यापीठांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लेखणी बंद आंदोलन, ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात राष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या प्रवेश परीक्षा आदी कारणांमुळे परीक्षा नियोजनात अडथळे निर्माण झाले आहेत.

प्राप्त परिस्थितीत राज्यातील विद्यापीठांनी परीक्षांच्या वेळापत्रकाची आखणी १० ऑक्टोबरनंतर करण्यावर भर दिल्याचे स्पष्ट होत आहे. त्यातच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न सुटला नाही, तर परीक्षांचे नियोजन करणे आणखी अवघड होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शनानुसार, राज्यातील अकृषी विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील सुमारे आठ लाख विद्यार्थी ही परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने देणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाबरोबरच अन्य विद्यापीठे ऑनलाइन परीक्षा घेण्याची तयारी करत आहेत. त्यासाठी आयटी कंपनी नेमण्याची किंवा आयटी इन्फ्रास्ट्रक्चरच्या उभारणीची कार्यवाही अजूनही निविदा प्रक्रियेच्या स्तरावरच आहे. त्यातच ऑनलाइन परीक्षेला विरोध करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी आता ऑनलाइन परीक्षेचा पर्याय देण्यासाठी विद्यापीठांच्या प्रशासनाला साकडे घातले आहे. त्यासाठी विद्यापीठांकडे मुदतवाढीचीही मागणी करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासोबतच राज्यातील विद्यापीठांनी साधारण १ ते ५ ऑक्टोबरच्या दरम्यान अंतिम वर्षाच्या परीक्षांची सुरुवात करण्यावर भर दिला होता. मात्र, २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंतीनिमित्त सुटी आहे, तर ४ ऑक्टोबरला 'यूपीएससी'ची नागरी सेवा पूर्व परीक्षा आहे. त्याचप्रमाणे 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'कडून घेण्यात येणारी 'नेट'ची परीक्षा एक आणि नऊ ऑक्टोबरला आहे. सीईटी सेलकडून ११ ऑक्टोबरला बीपीएड-सीईटी घेण्यात येणार आहे. तसेच, 'एमपीएससी'चीही परीक्षा आहे. या परीक्षांच्या वेळापत्रकामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक कसे तयार करावे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून मागणी होत असतानादेखील विद्यापीठांकडून अद्याप वेळापत्रक जाहीर करण्यासाठी अडचणी येत आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एक ऑक्टोबरपासून परीक्षा घेण्याबाबतच्या सूचना प्रसिद्ध केल्या होत्या; परंतु उपस्थित झालेल्या सर्व अडचणींमुळे आता ७ ऑक्टोबरपासून परीक्षा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. मात्र, काही अधिकाऱ्यांच्या मते, ११ ऑक्टोबरच्या पुढेच परीक्षा सुरू होतील.



### 'मागण्यांचा विचार करा'

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांबाबत लेखणी बंद आंदोलन पुकारले आहे. 'परीक्षांच्या नियोजनात व्यत्यय आणून कोणालाही त्रास देण्याचा हेतू नाही. त्यामुळे या मागण्यांचा राज्य सरकारने सहानुभूतीपूर्वक विचार करावा. असे पुणे विद्यापीठ शिक्षकेतर सेवक कृती समितीकडून सांगण्यात आले. दरम्यान, कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आज, सोमवारी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे.

| राज्यातील प्रमुख विद्यापीठे | अंतिम वर्ष विद्यार्थी संख्या |
|---|---|
| सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | २,५५,९२४ |
| मुंबई विद्यापीठ | २,०३,७०० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | ७३,६२९ |
| शिवाजी विद्यापीठ | ७३,५०६ |
| संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ | ७०,२२४ |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ | ७०,००० |
| कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ | ४६,४६६ |
| पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ | ३८,००० |
| स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ | ३५,५०० |
| गोंडवाना विद्यापीठ | २४,००० |

**Maharashtra Times: 28.9.2020**

# नवीन शैक्षणिक धोरण 'व्हिजन-मिशन' केंद्रित

## केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. रमेश पोखरियाल : मातृभाषेतून शिक्षणावर भर

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. २७ -** भारतीय संस्कृती आणि शिक्षणपद्धती अतिशय महान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक धोरणात बदल करण्यास सुरुवात झाली. वैज्ञानिक अधिष्ठान, संशोधनाचा समावेश, कौशल्य आणि रोजगाराभिमुख शिक्षण पद्धती राबवणारे हे धोरण आहे. 'व्हिजन आणि मिशन' केंद्रित या धोरणामुळे आगामी काळात भारत विश्वगुरू बनेल, असे मत केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांनी व्यक्त केले आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालय व असोचेम नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशन यांच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: शिक्षणाचे उज्ज्वल भविष्य' या विषयावर वेबिनार आयोजित केला होता. यावेळी असोचेमचे महासचिव दीपक सूद, मानव रचना एज्युकेशनल इन्स्टिट्यूटचे डॉ. प्रशांत भल्ला, शोभीत विद्यापीठाचे कुलपती कुंवर शेखर विजेंद्र, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया, अशोका विद्यापीठाचे विनीत गुप्ता, अनंतकुमार सोनी, फ्लिपलर्न एज्युकेशनच्या दिव्या लाल यांनी मार्गदर्शन केले.

या धोरणामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात उत्साह आहे. आपल्या मातृभाषेत शिकण्याचा आग्रह यामध्ये आहे. जपान, चीन, इस्राईलसारखे अनेक देश मातृभाषेतून शिक्षण देतात. आज अनेक देशांकडून या धोरणाचे प्रारूप मागितले जात आहे. संशोधन, पेटंट आदी गोष्टीवर भर दिला असून, येत्या काळात शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल पाहायला मिळतील, असे डॉ. पोखरियाल यांनी स्पष्ट केले.

"सध्याच्या करोना परिस्थितीमुळे परदेशात शिकायला गेलेले अनेक विद्यार्थी भारतात परतले आहेत. त्यांना पुन्हा तिकडे जायचे नसेल, तर 'क्रेडिट फॉरवर्ड' पद्धतीने भारतीय विद्यापीठांमध्ये उर्वरित अभ्यासक्रम पूर्ण करण्याची परवानगी देण्याबाबत शिक्षण मंत्रालयाने विचार करावा. तशी तरतूद या शिक्षण धोरणात करायला हवी. राष्ट्राच्या विकासात मोलाची भर टाकणारे हे धोरण ठरेल

– **प्रा. डॉ. संजय चोरडिया**, संस्थापक अध्यक्ष, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट

**Prabhat: 28.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

**विद्यापीठातर्फे आवाहन :** विद्यार्थ्यांना गोष्टींमध्ये गुंतवून ठेवणे गरजेचे

# 'ऑनलाइन क्लास' कॉलेजने बंद करु नये

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने शैक्षणिक वर्ष सुरु करण्याबाबत सुधारित वेळापत्रक जाहीर केल्यामुळे महाविद्यालयांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्यामुळे काही महाविद्यालयांनी प्रथम वर्षाचे ऑनलाईन वर्ग बंद केले आहेत. मात्र, महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना केले जात ऑनलाईन मार्गदर्शन बंद करु नये, असे विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले .



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी ऑगस्ट सप्टेंबर महिन्यापासून ऑनलाइन पद्धतीने वर्ग सुरु करावेत,अशा सूचना विद्यापीठातर्फे देण्यात आल्या होत्या. परंतु अनेक महाविद्यालयांची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. मात्र, प्रथम वर्षाची ८० ते ९० टक्के प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेल्या काही महाविद्यालयांनी ऑनलाइन वर्ग सुरु केले होते. मात्र, विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रथम वर्षाचे शैक्षणिक वर्ष येत्या १ नोव्हेंबरपासून सुरु करण्याबाबत परिपत्रक काढले. त्यामुळे काही महाविद्यालयांनी प्रथम वर्षाचे वर्ग बंद केले तर काही वर्ग बंद करण्याचा विचार करत आहेत.



"यूजीसीकडून नवीन शैक्षणिक वेळापत्रकाबाबत मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असल्या तरी शासन व विद्यापीठाकडून अद्याप कोणतेही निर्देश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सध्या सुरु असलेले ऑनलाइन वर्ग महाविद्यालयांनी बंद करु नयेत. दूरध्वनीवर झालेल्या चर्चेत मी काही महाविद्यालयाच्या प्राचार्यांना वर्ग सुरु ठेवण्याबाबत सांगितले आहे.

**- डॉ. पराग काळकर, विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता**

"कोरोनाच्या काळात विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामधील संवाद व समन्वय कायम असला पाहिजे. सध्या विद्यार्थ्यांना कोणत्या ना कोणत्या गोष्टींमध्ये गुंतवून ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना केले जात असलेले मार्गदर्शन सुरु ठेवले पाहिजे.

**- डॉ. एम. जी. चासकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता**

**Lokmat: 28.9.2020**

# अंतिम वर्षाची परीक्षा १२ ऑक्टोबरला

## प्रश्नसंच तयार करण्याचे काम सुरु; वेळापत्रक तयार करण्यात अडचण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा येत्या १ ऑक्टोबरपासून घेण्याचे निश्चित केले असले तरी; अद्याप सर्व विषयांचे प्रश्नसंच तयार करण्याचे काम पूर्ण झाले नाही. तसेच ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात 'नेट', 'यूपीएससी' व 'एमपीएससी'च्या परीक्षा असल्यामुळे विद्यापीठाने परीक्षेसाठी येत्या १२ ऑक्टोबरनंतरचा मुहूर्त काढला असल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे.

सर्वोच्च न्यायालय व राज्य शासनाच्या आदेशानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या कामाला तत्काळ सुरुवात केली. विद्यापीठाच्या अधिष्ठाता त्यांनी सर्व विषयांच्या अभ्यास मंडळाची बैठक घेऊन प्रश्नसंच तयार करण्याबाबत सूचना दिल्या. २३ सप्टेंबरपर्यंत सर्व विषयाचे प्रश्नसंच तयार होणे अपेक्षित होते. मात्र, मराठी व इंग्रजी भाषा विषयातील प्रश्नसंच तयार करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे ऑनलाइन परीक्षेसाठी आवश्यक असणारे 'एमसीक्यू'चे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. प्रश्नसंच तयार करण्याचे काम सुमारे ७५ टक्क्यांपर्यंत झाले आहे. त्यामुळेच विद्यापीठाने प्रत्येक विषयाच्या परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध केले नाही.

विद्यापीठातर्फे १ ते ९ ऑक्टोबरपर्यंत 'बॅकलॉग'च्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. तर १० ते ३० ऑक्टोबर या कालावधीमध्ये नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले होते. मात्र, आता बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ७ ऑक्टोबरनंतर तर नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा १२ ऑक्टोबरनंतर घेतली जाण्याची शक्यता आहे. विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये सुमारे ३ हजार ३०० विषय शिकविले जातात. या प्रत्येक विषयासाठी आवश्यक प्रश्नसंच तयार करण्यात उशीर होत आहे. त्यातच ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात १, ५ व ९ ऑक्टोबर रोजी नेट परीक्षा आहे. तर ४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय लोकसेवा आयोगाची आणि ११ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा होणार आहे. यातील काही परीक्षांना विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचे अनेक विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता आहे.



### परीक्षेचे वेळापत्रकच तयार नाही

- ऑनलाइन परीक्षा घेण्यात तरबेज असणाऱ्या एजन्सीची अद्याप निवड झालेली नाही. निवड केल्या जाणाऱ्या एजन्सीला किती दिवसात परीक्षेचे नियोजन करता येऊ शकते, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.
- त्यामुळे विद्यापीठाने अद्याप परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही. परिणामी विद्यापीठाला अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागणार आहे, असेही सूत्रांनी सांगितले.

**Lokmat: 28.9.2020**

# ऑनलाइन परीक्षा घेणारी एजन्सी आज निवडणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षेसाठी निविदा मागवण्यात आल्या असून येत्या सोमवारी (दि.२८) प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या जाणार आहेत. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा कोणती एजन्सी घेणार आहे, हे स्पष्ट होणार आहे.

विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेतली जाणार आहे. ऑनलाईन परीक्षेसाठी सुमारे १ लाख ९० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्यामुळे विद्यापीठाने या परीक्षेच्या नियोजनासाठी निविदा मागविल्या असून ऑनलाईन प्राप्त झालेल्या निविदा सोमवारी उघडल्या जाणार आहेत.

परीक्षा योग्य पद्धतीने पार पाडण्यासाठी चांगल्या एजन्सीची निवड केले जाणार आहे, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

**Lokmat: 28.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

Kesari: 28.9.2020

# विद्या प्राधिकरण ठेवणार शिक्षकांच्या अध्यापनावर लक्ष

### ऑनलाइन, ऑफलाइन अध्यापनाची माहिती गोळा करणार



**पुणे** : कोरोनाच्या संसर्गामुळे राज्यात शाळा बंद, शिक्षण सुरू असा उपक्रम सुरू आहे. त्यापार्श्वभूमीवर शिक्षक ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवणी देत आहेत. यामध्ये शिक्षक नेमके काय शिकवतात यावर आता राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद अर्थात विद्या प्राधिकरण लक्ष ठेवणार आहेत. त्याचबरोबर शिक्षकांच्या अध्यापनाची माहिती गोळा करणार आहे.

राज्यात कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सद्य:स्थितीत शाळा, महाविद्यालये बंद असली, तरी शालेय शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. याचसोबत राज्यातील शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध ऑनलाइनच्या माध्यमातून, डिजिटल साधने नसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गृहभेटीच्या माध्यमातून, शिक्षक मित्र या उपक्रमाच्या मदतीने आणि अशा अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याचे प्रयत्न करत आहेत. राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील, उच्च माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक करीत असलेल्या या उपक्रमांची माहिती राज्य, तसेच केंद्र शासनास व इतर राज्यांच्या बैठकीत सादर करण्याच्या दृष्टीने htttp://covid19.scertmaha.ac.in या पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकनिहाय ऑनलाइन व ऑफलाइन अध्ययन, अध्यापन पद्धतीच्या माध्यमांचे दर आठवड्याला संकलन केले जाणार आहे. त्यासाठी शिक्षकांना दर आठवड्याला माहिती भरावी लागणार आहे. माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या आयटी विषय साहाय्यकाची शिक्षकांनी मदत घ्यावी. तसेच, शिक्षक आणि प्राचार्यांना संबंधित पोर्टलवर माहिती भरण्यासाठी प्रेरित करावे. अशा प्रकारचे आदेश विद्या प्राधिकरणाचे संचालक दिनकर पाटील यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत.

# नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑक्टोबरपासून दूरदर्शनवर कार्यक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

### पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीही कार्यक्रम

दूरदर्शनवरील कार्यक्रमांमध्ये पहिल्या टप्प्यात नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम सुरू करण्यात येतील. त्यानंतर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीही कार्यक्रम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती पाटील यांनी दिली.

**पुणे** : राज्यातील शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्राच्या अखेरच्या टप्प्यात नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी दूरदर्शनवर शैक्षणिक मार्गदर्शनाचा कार्यक्रम सुरू होणार आहे. विद्या प्राधिकरणातर्फे ऑक्टोबरपासून हा कार्यक्रम होणार आहे.

यंदा करोना विषाणू संसर्गामुळे राज्यातील शाळा-कनिष्ठ महाविद्यालये सुरू करता आलेली नाहीत. परिणामी शिक्षणाची प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने करावी लागत आहे. १५ जूनपासून शिक्षक विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिकवत आहेत, तर संसर्ग कमी असलेल्या ठिकाणी शिक्षक गावांत जाऊन विद्यार्थ्यांच्या गटांना शिकवत आहेत. ऑनलाइन शिक्षणासाठीच्या साधनसुविधांची मर्यादा लक्षात घेऊन एकाच वेळी राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी दूरदर्शनचा वापर करण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाकडून करण्यात येत होता. त्यासाठी शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी मे महिन्यात केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर यांच्याकडे दूरदर्शनवर वेळ मिळण्यासाठी पत्रही लिहिले होते. मात्र त्या वेळी दूरदर्शनवर कार्यक्रम सुरू झाले नाहीत. दरम्यान, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने विद्या प्राधिकरणाच्या सहकार्याने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'टिलीमिली' हा कार्यक्रम सुरू केला. मात्र नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी असा कोणताही शैक्षणिक कार्यक्रम नव्हता. त्यामुळे आता पहिल्या सत्राच्या अखेरच्या टप्प्यात ऑक्टोबरपासून दूरदर्शनवर नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शनाचा कार्यक्रम सुरू होत आहे.

विद्या प्राधिकरणाचे संचालक दिनकर पाटील म्हणाले, की नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्यासाठी दूरदर्शनकडून ऑक्टोबरपासून वेळ उपलब्ध करून देण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या प्रसारणाची वेळ वगैरे तपशील स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल. शैक्षणिक कार्यक्रमांचे काही भाग तयार करण्यात आले आहेत. तसेच पुढील भागांसाठीचे चित्रीकरणही सुरू आहे.

लोकसत्ता Mon, 28 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55269531

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### केवळ १४ महाविद्यालयांकडून वापर : संलग्न महाविद्यालयांची संख्या एक हजाराहून अधिक

# ऑनलाइन व्यासपीठाकडे महाविद्यालयांची पाठ?

राहुल शिंदे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिक्षण मिळावे यासाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठाने सुमारे २ महिन्यांपूर्वी मोठा गाजावाजा करत ऑनलाइन शिक्षणासाठी स्वतंत्र व्यासपीठ तयार केल्याची घोषणा केली. मात्र, विद्यापीठाशी संलग्न १ हजाराहून अधिक महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांपैकी केवळ १४ महाविद्यालयांकडूनच या ऑनलाइन व्यासपीठाचा वापर केला जात आहे. त्यामुळे इतर संलग्न महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या या व्यासपीठाकडे पाठ फिरवली आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व

### 30 ते 40 महाविद्यालयांना मार्गदर्शन सुरु

विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठातर्फे तयार करण्यात आलेले व्यासपीठ सर्व महाविद्यालयांना मोफत उपलब्ध करुन दिले जात आहे. सध्या सुमारे 30 ते 40 महाविद्यालयांना या व्यासपीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन करत आहेत. अधिकाधिक महाविद्यालयांनी या व्यासपीठाचा लाभ घ्यावा, या दृष्टीने विद्यापीठातर्फे प्रयत्न सुरु आहेत. संलग्न महाविद्यालयांनीसुद्धा स्वत:हून याबाबत सकारात्मक पाऊल उचलणे गरजेचे आहे.

- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



ऑनलाइन शिक्षणाबाबत विद्यार्थ्यांना येणाऱ्या तक्रारीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत केला होता. विद्यापीठाने हा कक्ष स्थापन करणे गरजेचे आहे. जर कक्ष स्थापन झाला नसेल तर याबाबत पाठपुरावा केल्या जाईल.

- राजेश पांडे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

नाशिक जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसह इतरही विद्यार्थ्यांना कोरोनाच्या काळात ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेता यावे, यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र व्यासपीठ तयार केले. कमी इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये दुर्गम भागातसुद्धा विद्यार्थ्यांना ऑनलाइन व डाऊन केलेले व्हिडिओ नंतर ऑफलाइन पद्धतीने पाहता येतील या दृष्टीने या व्यासपीठाची निर्मिती करण्यात आली. प्रथमत: ग्रामीण व शहरी भागातील १४ संलग्न महाविद्यालयांमध्ये या व्यासपीठाच्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षण देण्यास सुरुवात केली. मात्र, त्यानंतर एकाही नवीन महाविद्यालयाला या व्यासपीठाचा वापर करणे शक्य झाले नाही.

या ऑनलाइन व्यासपीठाचा वापर करण्यासाठी पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यांतील आणखी १५ महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे पाठपुरावा केला आहे. त्यामुळे संलग्न १ हजार महाविद्यालयांपैकी सप्टेंबर महिना अखेरपर्यंत केवळ ३० महाविद्यालयांनाच या व्यासपीठाचा वापर करता येईल. त्यामुळे विद्यापीठाने तयार केलेली ऑनलाइन शिक्षणाची सुविधा सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलीच नाही तर निर्मिती करून त्याचा उपयोग काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

व्यवस्थापन परिषदेमध्ये तयार केलेल्या या ऑनलाइन व्यासपीठाबाबत चर्चा केली होती. तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाबाबत येणाऱ्या अडचणींसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, अद्याप यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही.

विद्यापीठाचे सर्व अधिकारी सध्या अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या तयारीच्या नियोजनात अडकून पडले आहेत. त्यामुळे कोणालाही ऑनलाइन शिक्षणाकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही. विद्यापीठाने तयार केलेली यंत्रणा महाविद्यालयापर्यंत न पोहोचल्याने संलग्न महाविद्यालयांनी झूम, गुगल मीटसारख्या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग सुरु केले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने तयार केलेल्या यंत्रणेचा सर्वांना उपयोग होणार आहे की निवडक महाविद्यालयांपुरती ही यंत्रणा सीमित राहणार आहे, अशी चर्चा विद्यापीठ वर्तुळात होत आहे.

# प्रवेश परीक्षा, विद्यापीठाच्या परीक्षा एकाच वेळी

### वेळापत्रकात बदल करण्याची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** राज्याच्या प्रवेश नियमन प्राधिकरणाकडून घेण्यात येणाऱ्या विविध प्रवेश परीक्षा आणि विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा एकाच वेळी होणार असून त्यामुळे विद्यार्थी गोंधळले आहेत.

विद्यापीठांच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होत असून साधारण २१ ऑक्टोबरपर्यंत या परीक्षा आहेत. सध्या पुनर्परीक्षार्थींच्या (बॅकलॉग) परीक्षा सुरू आहेत. याच दरम्यान परीक्षा नियमन प्राधिकरणानेही प्रवेश परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. शारीरिक शिक्षणशास्त्र (बीपी.एड) पदवीची प्रवेश परीक्षा ११ ते १६ ऑक्टोबर दरम्यान घेण्याचे नियोजन केले आहे. ही परीक्षा मुंबई, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, जळगाव या ठिकाणी होणार असून प्रवेश परीक्षा द्यावी की, अंतिम वर्षाची परीक्षा द्यावी, अशा पेचात प्रवेशोत्सुक विद्यार्थी सापडले आहेत.

या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये परराज्यातील ४० टक्क्यांहून अधिक विद्यार्थी आहेत. त्यातच प्राध्यापकांसाठीची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) याच कालावधीत होणार आहे. या पार्श्वभूमीवर या परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्याची मागणी 'अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघा'ने केली आहे. 'एका दिवसाची प्रवेश परीक्षा किंवा अंतिम वर्षाचे गुण आणि खेळातील प्रावीण्य या आधारे गुणवत्ता यादी तयार करून प्रवेश देण्यात यावेत,' असे निवेदन संघटनेने दिले आहे. विद्यापीठांकडे परीक्षांबाबत माहिती विचारण्यात आली असून त्यानुसार पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे प्राधिकरणाने कळवले आहे.

लोकसत्ता Mon, 28 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55273636

Lokmat: 28.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

## शिक्षकांच्या शैक्षणिक उपक्रमांचे विद्या प्राधिकरणाकडून संकलन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोना संसर्गामुळे शाळा बंद असल्या तरी शिक्षक ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवत आहेत. त्यामुळे या अध्ययन, अध्यापन प्रक्रियेची माहिती शिक्षकांना ऑनलाइन भरावी लागणार असून, त्याबाबतची सूचना विद्या प्राधिकरणाने राज्यभरातील शिक्षकांना केली आहे.

राज्यात सध्या शाळा बंद शिक्षण सुरू असा उपक्रम सुरू आहे. शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने आणि ऑनलाइन शिक्षणासाठीची साधने नसणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षक मित्र या उपक्रमाअंतर्गत प्रत्यक्ष गृहभेटीच्या माध्यमातून शिक्षक शिकवत आहेत. त्यामुळे या प्रक्रियेची माहिती विद्या प्राधिकरणाकडून संकलित केली जाणार असून, संचालक दिनकर पाटील यांनी शिक्षकांना ऑनलाइन, ऑफलाइन अध्ययन, अध्यापनाची माहिती दर आठवड्याला ऑनलाइन भरण्याची सूचना केली आहे.

पाटील यांच्या परिपत्रकानुसार राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील, उच्च माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती राज्य, केंद्र शासन आणि अन्य राज्यांच्या बैठकीत http://covid19.scertmaha.ac.in या संकेतस्थळाद्वारे सादर केली जाणार आहे.

ऑनलाईन आणि ऑफलाईन अध्ययन, अध्यापन पध्दतीबाबतची माहिती शिक्षकांना द्यावी लागणार आहे. माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांच्या माहिती विषय सहायकाची शिक्षकांनी मदत घेण्याची सूचना विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

लोकसत्ता Sun, 27 September 2020
https://epaper.loksatta.com/c/55249602

पुढारी

## अध्यापनावर आता विद्या प्राधिकरणाचे लक्ष

- **ऑनलाइन, ऑफलाइन अध्यापनाची माहिती गोळा करणार**
- **शिक्षकांना अध्यापनकार्याची माहिती पोर्टलवर भरावी लागणार**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातसध्या शिक्षक ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कार्य करीत आहेत. परंतु, शिक्षक नेमके काय शिकवतात यावर आता राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद अर्थात विद्या प्राधिकरण लक्ष ठेवणार असून, शिक्षकांच्या अध्यापनाची माहिती गोळा करणार आहे.

सध्या कोरोना प्रादुर्भावामुळे शाळा, महाविद्यालये बंद असली तरी शालेय शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. याचसोबत राज्यातील शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून, डिजिटल साधने नसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गृहभेटीच्या माध्यमातून, शिक्षक मित्र या उपक्रमाच्या मदतीने आणि अशा अनेक नाविण्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याचे प्रयत्न करत आहेत.

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील, उच्च माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक करीत असलेल्या या उपक्रमांची माहिती राज्य तसेच केंद्र शासनास व इतर राज्यांच्या बैठकीत सादर करण्याच्या दृष्टीने htttp://covid19.scertmaha.ac.in या पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकनिहाय ऑनलाइन व ऑफलाइन अध्ययन, अध्यापन पद्धतीच्या माध्यमांचे दर आठवड्याला संकलन केले जाणार आहे. त्यासाठी शिक्षकांना दर आठवड्याला माहिती भरावी लागणार आहे. माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या आयटी विषय सहाय्यकाची शिक्षकांनी मदत घ्यावी. तसेच, शिक्षक आणि प्राचार्यांना संबंधित पोर्टलवर माहिती भरण्यासाठी प्रेरित करावे. अशा प्रकारचे आदेश विद्या प्राधिकरणाचे संचालक दिनकर पाटील यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत.

Pune Edition
Sep 27, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## चौदाशे ऑफलाइन विद्यार्थी वळले पुन्हा ऑनलाइनकडे

### अंतिम वर्ष परीक्षा : केवळ ४ विद्यार्थी ऑनलाइन सोडून ऑफलाइन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी पूर्वी ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना रविवारपर्यंत परीक्षेचा पर्याय बदलण्याची संधी देण्यात आली होती. यामध्ये सुमारे १४०० विद्यार्थ्यांनी आता ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. तर केवळ ४ विद्यार्थी ऑनलाइन सोडून ऑफलाइनला गेले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.**



विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेतली जाणार आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेचा पर्याय दिला. त्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे. अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २ लाख २८ हजार ४९९ एवढी असून, त्यातील १ लाख ८९ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला आहे, तर ३९ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षेला पसंती दिली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून विद्यापीठाने विद्यार्थ्यांसमोर ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय ठेवला. त्यास विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ऑनलाइन परीक्षा पद्धतीतही सर्वाधिक विद्यार्थ्यांनी मोबाईलद्वारे परीक्षा देण्याचा पर्याय निवडला आहे. तर सुमारे ३९ हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने ओएमआर शीटद्वारे परीक्षा देणार आहेत. त्यातही अद्याप ऑनलाइन किंवा ऑफलाइन या दोन्हीपैकी कोणताही परीक्षेचा पर्याय न निवडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १९ हजार आहे. या विद्यार्थ्यांनादेखील आता ऑफलाइन पद्धतीने परीक्षा द्यावी लागणार आहे.

**ऑफलाइनसाठी ११० केंद्रे**

विद्यापीठाने ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन परीक्षा केंद्रांची संख्या ५५ वरून ११० करण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षा केंद्रांची संख्या वाढल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही. तसेच कोरोनाच्या पाश्र्वभूमीवर परीक्षेचे व्यवस्थापन करण्यास सुविधा उपलब्ध होणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे.

My Pune Edition
Sep 28, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education



### अकरावीचे विद्यार्थी गोंधळात

**मुंबई :** मराठा आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम स्थगितीनंतर अकरावी प्रवेश प्रक्रिया खोळंबली आहे. दुसरी फेरी स्थगित करून पंधरा दिवस झाले तरीही अद्याप काहीच स्पष्ट झाले नसल्यामुळे विद्यार्थ्यांची चिंता वाढली आहे.

अकरावीची पहिली फेरी झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला अंतरिम स्थगिती दिली. त्यानंतर राज्यातील प्रवेश प्रक्रियांबाबत संभ्रम निर्माण झाला. अकरावीची दुसरी फेरी शिक्षण विभागाने स्थगित केली आहे.

लोकसत्ता Tue, https

पुढारी

### नववी ते बारावी विद्यार्थ्यांना सह्याद्री वाहिनीवर मिळणार धडे

### दररोज ४ तास वर्ग, इयत्तानिहाय वेळापत्रक लवकरच

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता दिवाळीनंतरही शाळा सुरू होतील की नाही याबाबत अनिश्चितता आहे. त्यामुळे नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनाही सह्याद्री वाहिनीच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण घ्यावे लागणार आहे. दररोज चार तास शिक्षणासाठी सह्याद्री वाहिनीवरून परवानगी मिळाली असून यासंदर्भातील वेळापत्रक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने लवकरच जाहीर केले जाणार आहे.

केंद्र सरकारने नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग २१ सप्टेंबरपासून सुरू करावेत अशा मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. त्याला संस्थाचालकांनी नकार दिला. दिवाळीनंतर शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले होते.

> नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सह्याद्री वाहिनीवर चार तास मिळणार आहेत. कार्यक्रमाच्या प्रसारणाची वेळ तसेच इयत्तानिहाय तपशील पालक व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी जाहीर स्वतंत्रपणे करण्यात येईल.
>
> -**दिनकर पाटील,** संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी)

शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्राच्या अखेरच्या टप्प्यात नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर शैक्षणिक मार्गदर्शनाचा कार्यक्रम सुरू केला जाणार आहे. यापूर्वी वर्षा गायकवाड यांनी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री प्रकाश जावडेकर यांना दूरदर्शनची वेळ मागितली होती. त्याला केंद्र सरकारने परवानगी दिली आहे.

Pune Edition
Sep 29, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

### दूरदर्शनवर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम

### नववी ते बारावीचे विद्यार्थी : महिन्यासाठी लागणारा कन्टेन्ट तयार

**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शाळा बंद ठेवल्या असल्या तरी शालेय शिक्षण विभागातर्फे विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑक्टोबर महिन्यापासून दूरदर्शनवर शैक्षणिक कार्यक्रम सुरु केला जाणार आहे, असे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषदेचे संचालक दिनकर पाटील यांनी सांगितले.

> दूरदर्शनवर नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑक्टोबर महिन्यात शैक्षणिक कार्यक्रम सुरु केले जाणार आहेत. या कार्यक्रमांचे सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल. दूरदर्शनवर सकाळी चार तासांच्या कालावधीमध्ये शैक्षणिक कार्यक्रम दाखविले जातील.
>
> **- दिनकर पाटील,** संचालक, राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषद

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'शाळा बंद शिक्षण सुरु', 'टिलीमिली' अशा उपक्रमातून कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु ठेवण्याबाबत प्रयत्न केले जात आहेत. सध्या दूरदर्शनवर दाखविण्यासाठी लागणारा 'कन्टेन्ट' तयार केला जात आहे. परंतु, एक महिन्यासाठी लागणारा कन्टेन्ट तयार झाला आहे. दूरदर्शनवर सकाळी ७.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंतचा कालावधी उपलब्ध आहे. नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाणार आहे. परंतु, कार्यक्रम सुरु करण्याची तारीख निश्चित झालेली नाही.

Lokmat: 29.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# १२ ते २९ ऑक्टोबर दरम्यान अंतिम वर्षाच्या परीक्षा

### विविध परीक्षांमुळे नियोजित वेळापत्रकात बदल

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या कालावधीमध्ये बदल के ला आहे. विद्यापीठाच्या आधीच्या नियोजनानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या काळात केंद्रीय लोकसेवा आयोग , सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) यूजीसी नेट आणि राज्यसेवा परीक्षा या परीक्षाही होणार होत्या. त्यामुळे विद्यापीठाने १२ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर या कालावधीत अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठाच्या नियोजनानुसार १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान परीक्षा घेण्याचे नियोजन के ले होते. मात्र अंतिम वर्षाच्या अनेक विद्यार्थ्यांनी यूपीएससी, राज्यसेवा परीक्षांचे अर्ज भरले आहेत. त्यामुळे अंतिम वर्षाची परीक्षा आणि या स्पर्धा परीक्षा एकाच वेळी होणार असल्याने विद्यार्थ्यांची अडचण झाली. तसेच अंतिम वर्ष परीक्षा बहुपर्यायी आणि ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याने त्यासाठी प्रश्नसंच तयार करण्याचेही काम सुरू आहे. जवळपास तीन हजारांहून अधिक विषयांचे प्रश्नसंच तयार करावे लागत आहेत. त्यालाही थोडा वेळ लागणार आहे. ही सर्व पार्श्वभूमी विचारात घेऊन विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेचा कालावधी बदलण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार १२ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षा होतील.

### ऑफलाइन परीक्षेसाठी ११५ महाविद्यालयात केंद्र

अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइनप्रमाणेच ऑफलाइन पद्धतीनेही घेतल्या जाणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ११५ महाविद्यालयांमध्ये परीक्षा केंद्र असेल. विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था आणि अन्य पायाभूत सुविधांच्या तयारीसाठीचे काम करण्यात येत आहे, असे डॉ. काकडे यांनी सांगितले.

> स्पर्धा परीक्षांमुळे अंतिम वर्ष परीक्षांचा कालावधी बदलण्यात आला आहे. आता १२ ते २९ ऑक्टोबर दरम्यान परीक्षा होईल. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक आणि प्रवेशपत्र पुढील दोन दिवसांत उपलब्ध करून दिले जाणार आहे.
>
> - डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Tue, 29 September 2020 https://epaper.loksatta.com/c/55293945

पुढारी

# स्पर्धा परीक्षांमुळे वेळापत्रक बदलले

### विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षा १२ ते २९ ऑक्टोबरदरम्यान

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होणार होती. परंतु, १ ते ११ ऑक्टोबरदरम्यान स्पर्धा परीक्षांसह अन्य काही परीक्षा असल्यामुळे विद्यापीठाने आता अंतिम वर्षाची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात येणार असल्याचे डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.



१ ते ११ ऑक्टोबरदरम्यान केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) राज्यसेवा पूर्व परीक्षा, यूजीसी नेट आदी परीक्षा होणार आहेत. त्याचबरोबर गांधी जयंतीदेखील आहे. अंतिम वर्षाच्या अनेक विद्यार्थ्यांनी यूपीएससी, राज्यसेवा परीक्षांचे अर्ज भरले आहेत. त्यामुळे अंतिम वर्षाची परीक्षा आणि या स्पर्धा परीक्षा एकाच वेळी होणार असल्याने विद्यार्थ्यांची अडचण झाली आहे.

याशिवाय अंतिम वर्ष परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन बहुपर्यायी पद्धतीने होणार असल्याने त्यासाठी प्रश्नसंच तयार करण्याचेही काम सुरू आहे. जवळपास तीन हजारांहून अधिक विषयांचे प्रश्नसंच तयार करावे लागत आहेत. त्यालाही बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेचा कालावधी बदलण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार १२ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षा होतील.

### ऑनलाइन परीक्षार्थी झाले ४ हजार

*अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी पूर्वी ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना रविवार रात्री बारा वाजेपर्यंत परीक्षेचा पर्याय बदलण्याची संधी देण्यात आली होती. यामध्ये सुमारे ४ हजार विद्यार्थ्यांनी आता ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. केवळ ४ विद्यार्थी ऑनलाइन सोडून ऑफलाइनला गेले आहेत.*

Pune Edition
Sep 29, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

प्रभात पुणे, मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२० ॥ ७

# विद्यापीठाच्या परीक्षा ढकलल्या पुढे

### विविध स्पर्धा परीक्षा, आंदोलन, शासकीय सुटी या पार्श्वभूमीवर घेतला निर्णय

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. २८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बॅकलॉग व अंतिम वर्षाच्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार होती. याच कालावधीत यूपीएससी, नेट, सीईटी, एमपीएससी आदी परीक्षा होत आहेत. त्यामुळे विद्यापीठाने परीक्षेचे फेरनियोजन करीत एक आठवडा परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. आता १२ ऑक्टोबरपासून बॅकलॉग व अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत बॅकलॉग व अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा ५ ऑक्टोबरपासून सुरू करण्याचे नियोजन केले होते. मात्र ऑक्टोबर महिन्यात १, ५ व ९ या दिवशी नेट परीक्षा आहे. ४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा आहे. ११ ऑक्टोबरला राज्य सेवा पूर्व परीक्षा आहे. त्यातच शासकीय सुटी आहे. तर दुसरीकडे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी विद्यापीठाने ११ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा घेण्याचे टाळले आहे.

**पूर्व परीक्षेची तारीख...**

बॅकलॉग व अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षेपूर्वी ६ ते ९ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमांपन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

**परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध करा**

विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठांना ३० ऑक्टोबरपर्यंत विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार विद्यापीठामार्फत पुढील महिन्यात परीक्षा घेण्यात येणार आहे. मात्र अजूनही परीक्षेचे वेळापत्रक अधिकृतरीत्या प्रसिद्ध करण्यात आलेले नाही. त्यामुळे 'आमची परीक्षा कोणत्या तारखेला आहे, याची माहिती अद्याप प्राप्त होत नाही. त्यामुळे विद्यापीठाने परीक्षेचे वेळापत्रक लवकर जाहीर करावे', अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

Prabhat: 29.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लेखणी बंद : ऑक्टोबरपासून तीव्र आंदोलनाचा इशारा

# विद्यापीठ परीक्षा वेळापत्रक आंदोलनामुळे बिघडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** अंतिम वर्षाच्या परीक्षा तोंडावर असताना विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलनाचे हत्यार उपसल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेच्या आयोजनावर परिणाम झाला आहे. शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य न केल्यास येत्या १ ऑक्टोबरपासून तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा पुणे विद्यापीठ शिक्षकेतर सेवक कृती समितीने दिला आहे.

राज्यातील अशासकीय महाविद्यालयांमधील आणि अकृषी विद्यापीठांमधील शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षकेतर संघटना, महासंघ व समन्वय समितीतर्फे उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. मात्र, मंत्रालयातील काही वरिष्ठ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे नाईलाजास्तव आंदोलन करावे लागत असल्याचे शिक्षकेतर सेवक कृती समितीतर्फे सांगितले जात आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन सुरु केले.

> विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वारंवार मागणी करूनही शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे हे आंदोलन शासनानेच कर्मचाऱ्यांवर लादले आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या शासनाने मान्य केल्यास सर्व कर्मचारी कोरोनाच्या काळात आरोग्याची काळजी घेऊन परीक्षेचे काम उत्तम रीतीने करतील.
>
> **- डॉ. सुनील धिवार,** उपाध्यक्ष, पुणे विद्यापीठ शिक्षकेतर कृती समिती

**विद्यापीठातील शिक्षकेतर** कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन केल्यामुळे विद्यापीठातर्फे परीक्षा घेण्यासाठी नियुक्त केल्या जाणाऱ्या एजन्सीला परीक्षेचे काम करु द्यावे, असे विद्यापीठ प्रशासनातर्फे शिक्षकेतर कृती समितीला सांगण्यात आले. मात्र, केवळ विद्यापीठातील कर्मचारीच परीक्षेचे काम करतील इतरांना काम करु दिले जाणार नाही, असा पवित्रा कर्मचाऱ्यांनी घेतला. त्यामुळे विद्यापीठाची अडचण झाली आहे.

परंतु. ऐन परीक्षेच्या तोंडावर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन करुन शासनाची कोंडी केली आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या बरोबर पुण्यासह विविध विद्यापीठांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.२८) चर्चा केली. मात्र, या चर्चेतून मार्ग निघाला नाही. त्यामुळे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी लेखणीबंद आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला. पुणे विद्यापीठातील परीक्षा विभागात सुमारे दीडशे ते दोनशे कर्मचारी काम करतात. या कर्मचाऱ्यांनी सुद्धा आंदोलनांमध्ये भाग घेतल्यामुळे परीक्षेच्या कामावर परिणाम झाला आहे. राज्य शासनाने सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पुनर्जीवित करून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावी. सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना त्वरित लागू करावी, पदोन्नतीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पदोन्नतीमधील आरक्षणाची अंमलबजावणी तत्काळ करावी आदी प्रमुख मागण्यांसाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचारी व अधिकाऱ्यांनी सोमवारी विद्यापीठाच्या मुख्य इमारती समोर जमा होऊन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे आंदोलनामागची भूमिका बोलून दाखवली.

**Lokmat: 29.9.2020**

# ऑनलाइन परीक्षा घेणाऱ्या एजन्सीवर आज होणार शिक्कामोर्तब

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेसाठी चार एजन्सीने प्रतिसाद दिला असून त्यातील एका एजन्सीची निवड केली जाणार आहे. मंगळवारी (दि. २९) त्यावर शिक्कामोर्तब होणार आहे.

विद्यापीठातर्फे येत्या ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. त्यात सुमारे ८० टक्के आणून अधिक विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या २ लाख २४ हजार विद्यार्थ्यांपैकी १ लाख ९० हजाराहून अधिक विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांची परीक्षा कोणत्या एजन्सीमार्फत घेतली जाणार हे स्पष्ट होणार आहे.

ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदेमध्ये ३० ते ३५ कोटींपासून सुमारे २०० कोटीपर्यंत उलाढाल असणाऱ्या कंपन्यांकडून ऑनलाईन परीक्षेसाठी निविदा मागवल्या होत्या. त्यात चार कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्यामुळे परीक्षेसाठी कोणत्या एजन्सींची निवड केली जाणार याबाबत उत्सुकता आहे.

एजन्सीच निश्चित न झाल्यामुळे विद्यापीठाला अंतिम वर्षाच्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करणे शक्य झाले नाही. त्यामुळे विद्यापीठावर सुमारे आठवडाभर परीक्षा पुढे ढकलण्याची वेळ आली आहे.

**Lokmat: 29.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# बॅकलॉगची परीक्षाही १२ ऑक्टोबरपासून

## पुणे विद्यापीठाचे वेळापत्रक कोलमडले; सराव परीक्षा तीन दिवस चालणार

**पुणे, ता. २८ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचे वेळापत्रक कोलमडून गेले आहे, त्यामुळे आता नियमित परीक्षांसह बॅकलॉगच्या परीक्षाही १२ ऑक्टोबरपासून घेतल्या जातील. तर, ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सराव परीक्षा घेतली जाणार आहे.

पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होणार होती पण कर्मचाऱ्यांचे सुरू असलेले लेखणी बंद आंदोलन, प्रश्नसंच तयार करण्याचे सुरू असलेले काम, निविदा प्रक्रिया आणि ऑक्टोबरच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यामध्ये विविध प्रवेश व स्पर्धा परीक्षा आहेत. त्यास अनेक पदवी व पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले आहेत. विद्यापीठाच्या परीक्षेमुळे या विद्यार्थ्यांची संधी जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती.

विद्यापीठाला परीक्षेच्या तयारीसाठी आणखी एक आठवडा लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठानेही एक पाऊल मागे घेत ठरलेल्या नियोजनात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. पूर्वी १ ते ९ ऑक्टोबरपर्यंत बॅकलॉगची परीक्षा होती, पण या काळात ही परीक्षा होणे शक्य नाही. तसेच ११ तारखेला राज्य सेवा पूर्व परीक्षेचा पेपर आहे. त्यामुळे नियमित परीक्षेसह बॅकलॉगची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू करण्याच्या विचारात असल्याचे परीक्षा विभागातील सूत्रांनी सांगितले.

### चार संस्थांची निविदा

अंतिम वर्षाची ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाने निविदा मागविली होती. त्यात चार संस्थांनी निविदा भरली आहे. त्या संस्थांना काही कागदपत्रे सादर करायची आहेत. त्यामुळे मंगळवारी त्यांची छाननी केली जाणार आहे. त्यानंतर प्रत्येकाचे रेट बघून, त्यातून एक संस्था निश्चित केली जाईल. या संस्थेला विद्यापीठाकडील सर्व माहिती देऊन, परीक्षेची तयारी करण्यास किमान चार ते पाच दिवस लागणार आहेत. याच दरम्यान परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे. तर ७, ८ व ९ ऑक्टोबर रोजी सराव परीक्षांचे नियोजन केले जाणार आहे, असे सूत्रांनी सांगितले.

**Sakaal: 29.9.2020**

## वर्ष वाया जाण्याची विद्यार्थ्यांमध्ये भीती; शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर दबाव

# दहावी, बारावी फेरपरीक्षेबाबत अनिश्चितता

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८ -** राज्यात शाळा व महाविद्यालये अद्यापही बंदच आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी व बारावी फेरपरीक्षांबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आहे.

दरवर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये दहावी, बारावीच्या नियमित परीक्षा घेण्यात येतात. बारावीचा निकाल मेअखेर, तर दहावी जूनमध्ये जाहीर होतो. दरम्यान, यंदा करोनामुळे निकालाच्या कामकाजावर परिणाम झाला. त्यामुळे निकाल उशिराने जाहीर झाले. त्यानंतर जुलै, ऑगस्टमध्ये फेरपरीक्षाही घेता आल्या नाहीत.

शालेय शिक्षण विभागाने १५ जूनपासून ऑनलाइन शिक्षण सुरू ठेवले आहे. दिवाळीनंतर शाळा, महाविद्यालये प्रत्यक्षात सुरु करण्याचे स्पष्ट संकेत शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिले.

फेरपरीक्षा होणार की नाही, कधी होणार असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडू लागला आहे. या परीक्षा होऊन त्यांचा निकाल लागल्यानंतरच पुढच्या वर्गात प्रवेश घेता येणार आहे. अन्यथा वर्ष वायाला जाण्याचा धोकाही आहे. विद्यार्थी, पालकांकडून परीक्षेबाबत राज्य मंडळ, विभागीय मंडळांकडे सतत विचारणा होत असल्याने अधिकाऱ्यांचीही डोकेदुखी वाढली आहे. राज्य मंडळामार्फत फेरपरीक्षेचे वेळापत्रक तयार करून त्यास शासन मान्यता मिळाल्यानंतरच होणार आहे.

> इयत्ता दहावी, बारावी फेरपरीक्षा घेण्याबाबत विचार सुरू आहे. मात्र, तारखा अद्यापही निश्चित नाहीत. करोना आटोक्यात आल्यानंतर शाळा, महाविद्यालये उघडल्यानंतर व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पूर्ण क्षमतेने सुरु झाल्यानंतरच फेरपरीक्षा घेता येणार आहे.
>
> **– डॉ. शकुंतला काळे,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

**Prabhat: 29.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### मराठी नियतकालिक संघटनेची स्थापना

**दिवाळी अंकांच्या वितरण, विक्रीसाठी प्रयत्न करणार**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

मराठी भाषेतील नियतकालिकांसमोरील विविध स्वरूपातील समस्या सोडवण्यासाठी कार्यरत असणाऱ्या मंडळींच्या पुढाकाराने पुण्यात अखिल भारतीय मराठी नियतकालिक संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. संघटनेच्या अध्यक्षपदी जडण-घडण मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे यांची निवड करण्यात आली असून, सचिव म्हणून भालचंद्र कुलकर्णी (संपादक : सहकार सुगंध) यांची; तर चपराक साप्ताहिकाचे संपादक घनश्याम पाटील यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.

देशभरातील एकूण मुद्रित माध्यमांतील नियतकालिकांच्या सुमारे १५ टक्के नियतकालिके मराठी भाषेत आहेत. शिवाय शंभरहून अधिक वर्षांची दिवाळी विशेषांकांची परंपरा आहे. गेल्या काही वर्षांत मराठी भाषेतील नियतकालिकांसमोर अनेक नवी आव्हाने उभी राहिली आहेत. त्यांना सामोरे जाण्यासाठी अखिल भारतीय मराठी नियतकालिक संघटनेची स्थापना करण्यात आली आहे, असे देशपांडे यांनी सांगितले.

सूर्यकांत पाठक (ग्राहकहित), अमित वाडेकर (वनराई), आनंद अवधानी (अनुभव), अभय कुलकर्णी (माहेर व मेनका), सुनील गायकवाड (वेदांतश्री), विनोद शिरसाठ (साधना), पी. जी. शर्मा (व्यापारी मित्र) यांच्यासह महाराष्ट्रातील अन्य नियतकालिकांच्या मालक-संपादकांनी या संघटनेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसाठी सहयोग देण्याचे ठरविले आहे.

करोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत दिवाळी अंकांची वितरण व विक्री व्यवस्था अधिक ठिकाणी करण्यासाठी संघटना प्रयत्न करणार आहे. यासाठी नियतकालिकांच्या दिवाळी अंकांच्या संपादक, प्रकाशकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**Maharashtra Times: 29.9.2020**

### 'कोरोना'काळातील अध्यापन पद्धतीचा अभ्यास

**'एससीईआरटी'च्या स्वतंत्र पोर्टलवर होणार नोंद**

पुणे, ता. २८ : कोरोनाचा संसर्ग वाढत असताना शिक्षक शक्य होईल त्या पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोचवत आहेत. त्यासाठी ते कधी शाळेतून किंवा घरातून थेट ऑनलाइन येत आहेत. तर कधी आकर्षक व्हिडीओ तयार करून, व्हाट्सॲपवर अभ्यास पाठवून विद्यार्थ्यांना शिकवीत आहेत.

इंटरनेट, मोबाईल पोचू शकत नसेल, तर शिक्षक स्वतः पायपीट करत विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन शिकवत आहे. अशाप्रकारे संकट काळात शिक्षक प्रत्यक्ष राबवित असलेल्या शिक्षण पद्धतीचे आता संकलन होणार आहे. त्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) पुढाकार घेतला आहे.

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या, सर्व माध्यमांच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती केंद्र आणि राज्य सरकारला देण्यात येणार आहे. तसेच शिक्षकनिहाय ऑनलाइन आणि ऑफलाइन अध्ययन-अध्यापन पद्धतीच्या माहितीचे दर आठवड्याला संकलन केले जाणार आहे, अशी माहिती परिषदेचे संचालक दिनकर पाटील यांनी दिली आहे.

> **"शिक्षक प्रामाणिकपणे काम करत आहेत. असे असताना त्यांच्या कामाचा अहवाल मागणे चुकीचे आहे. हे म्हणजे शिक्षकांवर अविश्वास दाखविल्यासारखे झाले. विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या कामात व्यग्र असताना अहवाल पाठविण्याच्या कामाची त्यात भर पडल्याने काम वाढले आहे.**
> **- माधव सूर्यवंशी,** शिक्षक

**असे होणार संकलन**

- http://covid19.scertmaha.ac.in या पोर्टलवर शिक्षकनिहाय माहितीचे संकलन केले जाणार.
- शिक्षकांनी पोर्टलवर जाऊन नोंदणी करायची असून त्यात दर आठवड्याला माहिती भरायची आहे.
- पोर्टलवरून शिक्षक, शाळा, केंद्र, तालुका आणि जिल्हानिहाय शिक्षकांच्या प्रयत्नांचा अहवाल करणार.

**Sakaal: 29.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# शैक्षणिक संशोधनात 'यूजीसी'ची साफसफाई

## बोगस पीएचडीधारकांना पायबंद, नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी

सकाळ EXCLUSIVE

**मंगेश वैशंपायन :**
सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. २८ : शैक्षणिक क्षेत्रातील पीएचडीसारख्या (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी) मोठ्या पदव्या विकत घेण्याच्या गैरप्रकारांना आळा बसून हे क्षेत्र अधिकाधिक निकोप व्हावे. बोगस पदव्या, संशोधने-निबंध-प्रबंध यांना पायबंद व्हावा, तसेच संशोधनातील नैतिकतेची पातळी उंचवावी यादृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) संशोधनातील आदर्श पद्धतींबाबतची विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे किंवा नियमावली (जीएआरपी) तयार केली आहे. भारतामध्ये उच्चशिक्षणाच्या क्षेत्रातील अशा प्रकारचा हा पहिलाच दस्तावेज असल्याने याचे महत्व असल्याचे जाणकार सांगतात. 'इम्पॅक्ट फॅक्टर' या संकल्पनेची जनक असलेली 'क्लॅरी वॅट' ही संस्था या उपक्रमात यूजीसीची 'नॉलेज पार्टनर' असेल.

संशोधनातील नैतिकता व तिचे उल्लंघन हा गंभीर विषय आहे, हे तत्त्व जगभरात मान्य करण्यात आले आहे. शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर कृषी, आरोग्य, उद्योग, व्यापार, क्रीडा आदी क्षेत्रांत अनेक देशांतील शिखर संस्थांनी मार्गदर्शक तत्त्वे आखून दिलेली आहेत. कोणत्याही क्षेत्रातील संशोधनाबाबत चांगल्या पद्धती काय व कशा असाव्यात याचे संशोधनपर दस्तावेज जगभरात प्रसिद्ध केले जातात. उच्चशिक्षण, विशेषतः संशोधनपर क्षेत्रात भारतातही म्हणायला कागदावरील धोरण आहे. पण त्याबाबतची माहिती संशोधकांपर्यंत पोचविण्याची तसदी ना यंत्रणा घेते ना संबंधित मार्गदर्शक वा संशोधक घेतात.

### म्हणून नियमावली महत्त्वपूर्ण

संशोधन-प्रबंधांतील नवोन्मेषाला चालना देण्याची जबाबदारी विद्यापीठांची असते. ते करताना गैरप्रकार होणार नाहीत याची काळजी घेणे हीदेखील विद्यापीठांचीच जबाबदारी असते. पीएचडी प्रबंधांमध्ये वाङ्मय चौर्य, खोटी माहिती देणे यासारखे गैरप्रकार टाळणे व संशोधन करणाऱ्यांची जबाबदारी कोणती व त्यांनी कोणते भान-पथ्य पाळावे याचा एक ठोस आराखडा याद्वारे आखून देण्यात आला आहे. अशा धर्तीचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

Sakaal: 29.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

### 'Won't fill e-teaching details on portal'

Times News Network

**Mumbai:** Junior college teachers have refused to comply with the education department's instructions to fill in their weekly online teaching details on the newly launched portal.

Faculty across the state said they were already burdened by online teaching, corona-related emergency work and lack of internet facilities in rural and remote areas.

According to the department, teachers from state-run and aided schools have to register on the portal and login each week to submit a report of the remote learning programmes—what they have been teaching throughout the week, how many students attended online classes and if the teachers have made any calls or home visit for students who aren't connected online.

#### TEACHERS SAY THEY ARE OVERBURDENED

"Teachers are carrying out their academic and teaching activities and the head of the institution concerned is in the loop of daily updates. The federation has announced that teachers will not fill in the information on this portal," said Mukund Andhalkar, coordinator of the Maharashtra State Junior College Teachers Federation.

"...It is serious for the State Council for Educational Research and Training to ask teachers to carry out such rules," he said.

"The council should pay more attention to research and teacher training rather than solicit illegal information," he added.

Rajesh Pandya, vice-president of the Teachers Democratic Front, concurred: "The government hasn't provided any training on teaching online, but expects us to submit reports. Not all teachers have access to a computer or internet and this exercise will only add to their non-academic work."

The Times of India: 29.9.2020

4 TIMES CITY | PUNE

### Bids for conducting SPPU final year centralised online exam open today

#### Chosen Entity To Take Up Both Modes

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Entities with a minimum Rs 30 crore annual turnover, experience of conducting examination for at least three lakh students in a year and the experience of holding online examination for at least 20,000 students in a single session or concurrently can file the tender for the online examination of the Savitribai Phule PuneUniversity (SPPU).

The selected player will conduct the online and offline examination, that would decide the fate of over 2.5 lakh final year students of SPPU.

The university has decided on a centralised examination process and has invited online bids for it. The tenders were to be opened on Monday evening but due to technical issues, the commercial bids would be opened on Tuesday, said university officials.

Meanwhile, students from university departments said that autonomous departments that had earlier released their time tables have retracted them and said that the final examinations have been postponed.

"The time-table that was issued to us earlier had said that the examination would begin on October 5. But now the latest message says that as per the new circular received from the university the exams would begin from October 10 instead," a final year commerce department student said.

A senior official from the university said, "The entire assessment would be done by them and the marks will be shared with us. Post that, we would convert these marks into out of 100 or 80 or whatever the case may be and then compile the final results."

The tender documents make it clear that the examinations are required to be secured using live as well as Artificial Intelligence-based secured system.

The tender documents said that a dedicated helpdesk needs to be provided by the party conducting the exam.

"The university has also planned offline examinations parallel to online exams for the students who do not wish to opt for online examinations. In this scenario university already has a traditional Online Question Paper Delivery system in place. However, for those students question paper will be generated from the same question bank which is being used for online examination," the document added.

#### GETTING READY FOR THE BIG DAY

The Savitribai Phule Pune University intends to conduct remote secured online examination for students at colleges and institutes affiliated to the university who are in final year /final semester

- Expected Students: **1,85,000+**
- Expected Papers/ Exams: **3500+**
- Each Exam Duration: **1 Hour**
- Exam format: **MCQ only (NO Descriptive/ Subjective)**
- Questions will be **50 Marks (60 Questions)**
- Schedule of exam (tentative): **From the First week of October, 2020**
- Geographically Area: **Mainly in Pune, Ahmednagar, Nashik & Dadra, and Nagar Haveli**

**EXAMINATION SUPPORT**

The selected vendor is expected to have a dedicated helpdesk to provide support to the candidates during the examination. The examinations may be conducted on weekends and public holidays. The selected vendor is always expected to provide examination related support during the course of the examination

MISSION ADMISSION

Photos And Text By Aditya Walkul And Ashish Gupta

The Times of India: 29.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

## प्रवेश परीक्षांच्या वेळापत्रकात बदल



लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा आणि प्रवेश परीक्षा एकत्र एकाच कालावधीत असल्याचे लक्षात आल्यानंतर कक्षाने वेळापत्रकात बदल केला आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च शिक्षण विभागाच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक २१ सप्टेंबरला जाहीर करण्यात आले. मात्र, त्यानंतर विद्यापीठांच्या परीक्षा आणि प्रवेश परीक्षा एकत्र येत असल्याचे समोर आले. विद्यार्थी आणि शिक्षकांनी परीक्षांचे वेळापत्रक बदलण्याची विनंती कक्षाला केली होती. विशेषतः पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा आणि शारीरिक शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा पुढे ढकलण्यात यावी अशी मागणी होती. त्याअनुषंगाने हा बदल झाला.

**नवे वेळापत्रक**
**(कंसात जुनी तारीख)**

- शिक्षणशास्त्र एकात्मिक अभ्यासक्रम पदवी (बीए-बीएससी बीएड इंटिग्रेटेड) - १८ ऑक्टोबर (११ ऑक्टोबर)
- शारीरिक शिक्षणशास्त्र पदव्युत्तर (एमपीएड) - २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर (३ ते ७ ऑक्टोबर)
- शिक्षणशास्त्र पदव्युत्तर (एम.एड) - ५ नोव्हेंबर (३ ऑक्टोबर)
- शारीरिक शिक्षणशास्त्र पदवी (बी.पी.एड) - ४ ते ८ नोव्हेंबर (११ ते १६ ऑक्टोबर)
- शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) -२१ ते २३ ऑक्टोबर
- ५ वर्षे विधि अभ्यासक्रम -११ ऑक्टोबर
- तीन वर्षे विधि अभ्यासक्रम (एलएलबी) - २ व ३ नोव्हेंबर
- वास्तुकला पदव्युत्तर (एम.आर्च) - २७ ऑक्टोबर
- हॉटेल मॅनेजमेंट पदवी (बी.एचएमसीटी) - १० ऑक्टोबर
- हॉटेल मॅनेजमेंट पदव्युत्तर (एम.एचएमसीटी) - २७ ऑक्टोबर
- एमसीए - २८ ऑक्टोबर

लोकसत्ता Wed, 30 September 2020 https://epaper.loksatta.com/c/553

## राज्यातील पदवी परीक्षा पुन्हा संकटात

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर, पुणे, मुंबई :** सहा महिने चाललेल्या नाट्यमय घडामोडींनंतर विद्यापीठांनी आखलेले अंतिम वर्षाचे वेळापत्रक पुन्हा कोलमडले आहे. पुणे, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, नागपूर, अमरावती विद्यापीठांनी १ ते ५ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा संप, प्रवेश परीक्षा घेणाऱ्या राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील यंत्रणांबरोबर समन्वयाचा अभाव यामुळे आता पुन्हा विद्यार्थ्यांच्या वाट्याला मनस्ताप आला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पूर्वनियोजनानुसार १ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान परीक्षा घेण्यात येणार होत्या. अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या काळात केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) यूजीसी नेट आणि राज्यसेवा परीक्षा या परीक्षाही होणार होत्या. त्यामुळे विद्यापीठाने १२ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरु होणे अपेक्षित होते. मात्र, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संपामुळे महाविद्यालयातील कर्मचारी कामावर नाहीत. परिणामी महाविद्यालयांकडून मंगळवारपर्यंत विद्यार्थ्यांना ओळखपत्र देता आले नाही. त्यामुळे विद्यापीठाला परीक्षा पुढे ढकलावी लागली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्याही अंतिम वर्षाच्या १ ऑक्टोबरपासून सुरू होणार होत्या. मात्र, अपरिहार्य कारणास्तव परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे विद्यापीठाने मंगळवारी जाहीर केले. गोंडवाना विद्यापीठाच्या परीक्षा ५ ऑक्टोबरपासून सुरू होणे अपेक्षित आहे. मात्र, कर्मचारी संपामुळे मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यामुळे या विद्यापीठाच्या परीक्षाही अडचणीत असल्याचे विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

सहा महिने परीक्षा होणार की नाही, या संभ्रमात असलेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षांची वेळापत्रके जाहीर झाल्यावर तयारी सुरू केली. आता पुन्हा परीक्षा पुढे ढकलल्यामुळे विद्यार्थ्यांना मनस्तापाला सामोरे जावे लागणार आहे.

प्रवेश परीक्षांचेही वेळापत्रक बदलले

प्रवेश परीक्षा आणि विद्यापीठाच्या परीक्षा एकत्रित येत असल्याने वेळापत्रक बदलल्याचे कारण विद्यापीठांनी दिले. मात्र, आता प्रवेश नियमन प्राधिकरणानेही अनेक परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. ऑक्टोबरचा शेवटचा आठवडा आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात बहुतेक पदव्युत्तर आणि पदवी प्रवेश परीक्षा होणार आहेत. आता विद्यापीठांनीही परीक्षा पुढे ढकलल्यामुळे पुन्हा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. अनुदान आयोगाने परीक्षा घेण्यासाठी राज्याला मुदतवाढ देतानाच परीक्षेचे निकालही ३१ ऑक्टोबरपर्यंत जाहीर करण्याची सूचना दिली होती. नवे शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून आणि महाराष्ट्रासाठी १८ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचीही सूचना केली. नव्या शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रकही जाहीर केले. मात्र, आता परीक्षा पुढे ढकलल्यामुळे या वेळापत्रकाप्रमाणे राज्यातील शैक्षणिक वर्ष सुरू होण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### मुंबई विद्यापीठावर परिणाम नाही

कर्मचारी संपाचा फटका राज्यातील बहुतांश विद्यापीठांच्या परीक्षांना बसला असली तरी अद्याप मुंबई विद्यापीठावर फारसा परिणाम झालेला नाही. विद्यापीठाने परीक्षांची जबाबदारी महाविद्यालयांवर सोपवली आहे. त्यामुळे परीक्षा होतील. मात्र, आंदोलन लांबल्यास निकालाच्या कामावर परिणाम होऊ शकेल, असे विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 30 September 2020 https://epaper.loksatta.com/c/55322802

## विद्यापीठ परीक्षांमुळे 'सीईटी'पुढे ढकलल्या

**पुणे, ता. २९ :** राज्यात ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचा फटका आता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सीईटी परीक्षांना बसला आहे. यापूर्वी कोरोनामुळे परीक्षा पुढे ढकलल्या होत्या, आता विद्यापीठ परीक्षांमुळे पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व कृषी पदवीच्या वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

'सीईटी सेल'ने १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षा घेण्याचे आधी जाहीर केले गेले होते. तर पण याच कालावधीत राज्यभरात विद्यापीठांकडून अंतिम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक तयार केले आहे. त्यापार्श्वभूमीवर सीईटी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी होत होती. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व कृषी पदवी सीईटी वेळापत्रक कोणताही बदल केला नाही.

१ ते २० ऑक्टोबर दरम्यान या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. सविस्तर वेळापत्रक राज्य सीईटी सेलच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सकाळ — 30/9/2020

| असे आहे नवे वेळापत्रक | |
|---|---|
| पाचवर्ष एलएलबी सीईटी | ११ ऑक्टोबर |
| बीए-बीएस्सी बीएड | १८ ऑक्टोबर |
| बीएड सीईटी | २१ ते २३ ऑक्टोबर |
| बीएड-एमएड | २७ ऑक्टोबर |
| एमपीएड सीईटी | २९ ऑक्टोबर |
| तीन वर्षीय विधी सीईटी | २ ते ३ नोव्हेंबर |
| बीपीएड सीईटी | ४ नोव्हेंबर |
| एमएड सीईटी | ५ नोव्हेंबर |
| मास्टर ऑफ आर्किटेक्चर सीईटी | २७ ऑक्टोबर |
| पदवी एचएमसीटी | १० ऑक्टोबर |
| पदव्युत्तर एचएमसीटी | २७ ऑक्टोबर |
| एमसीए सीईटी | २८ ऑक्टोबर |

### अंतिम परीक्षा अधांतरीच

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी एजन्सीची निवड कधी होते याकडे लाखो विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. याबाबत आजच्या (मंगळवार) खरेदी समितीच्या (पर्चेस कमिटी) बैठकीमध्ये यावर निर्णय होऊ शकला नाही. आलेल्या प्रस्तावांवर तांत्रिक चर्चा करण्यात आली. पुढील एक दोन दिवसात याबाबत निर्णय होणार असला तरी परीक्षेच्या प्रक्रियेस आणखी विलंब होणार आहे.

पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉईस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने ऑनलाइन व ऑफलाइन होणार आहेत. पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यातील सुमारे १ लाख ८९ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइनचा पर्याय निवडला आहे. सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे. २८ सप्टेंबर रोजी निविदेची मुदत संपल्यानंतर यामध्ये चार संस्थांनी सहभाग घेतल्याचे स्पष्ट झाले, पण काही तांत्रिक कारणांमुळे ही या निविदा उघडण्यात आल्या नव्हत्या. त्यावर आजच्या (मंगळवारी) पर्चेस कमिटीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. पण यामध्ये कोणत्या एजन्सीला काम द्यायचे यावर शिक्कामोर्तब होऊ शकले नाही. विद्यापीठाने १ ऑक्टोबर पासून परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता, पण तयारी पूर्ण न झाल्याने आता १२ ऑक्टोबर पासूनच नियमित व बॅकलॉगच्या विषयांचे पेपर होणार आहेत.

**पर्चेस कमिटीच्या बैठकीत ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी आलेल्या निवीदेबाबत तांत्रिक चर्चा झाली. यामध्ये आणखी व्यवस्थित चर्चा होणे गरजेचे आहे. पुढील बैठक येत्या दोन दिवसांमध्ये होऊन यावर निर्णय होईल.**
**- राजेश पांडे, सदस्य, व्यवस्थापन समिती**

**Sakaal: 30.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

पुढारी

# नवे शिक्षण धोरण - २०२०

## केंद्र सरकारने मंजूर केलेल्या नव्या शैक्षणिक धोरणातील तरतुदी

**जाणून घेऊया :**
नवीन शिक्षण धोरण २०२० ला केंद्रीय मंत्रिमंडळाने हिरवा झेंडा दाखवला.

नवीन शिक्षण धोरणाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

- ३ ते १४ वर्षे वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत. यापूर्वी हा वयोगट ६ ते १४ वर्षे होता...
- **५ वर्षे मूलभूत** (Fundamental)

१. नर्सरी ४ वर्षे
२. ज्युनिअर केजी ५ वर्षे
३. एसआर केजी ६ वर्षे
४. इयत्ता पहिली ७ वर्षे
५. इयत्ता दुसरी ८ वर्षे

- **३ वर्षांची प्रारंभिक शाळा** (Preparatory) :

६. इयत्ता तिसरी ९ वर्षे
७. इयत्ता चौथी १० वर्षे
८. इयत्ता पाचवी ११ वर्षे

- **३ वर्षांची माध्यमिक शाळा** (Middle) :

९. इयत्ता सहावी १२ वर्षे
१०. इयत्ता सातवी १३ वर्षे
११. इयत्ता आठवी १४ वर्षे

- **४ वर्ष माध्यमिक शाळा** Secondary :

१२. इयत्ता नववी १५ वर्षे
१३. इयत्ता दहावी १६ वर्षे
१४. एफ.वाय.जे.सी. १७ वर्षे
१५. एस.वाय.जे.सी. १८ वर्षे

**ठळक वैशिष्ट्ये :**

- बोर्ड फक्त बारावीच्या वर्गाला असेल. महाविद्यालयीन पदवी ४ वर्षांची.

दहावी मंडळ रद्द SSC
एमफिल MPhil देखील बंद

- आता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषा, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषा शिकविली जाईल. उर्वरित विषय जरी तो इंग्रजी असला तरी एक विषय म्हणून शिकविला जाईल...

» **नववी ते बारावीच्या सत्र परीक्षा असतील** (Semester Exam.)

- **महाविद्यालयीन पदवी ३ व ४ वर्षांची असेल.** म्हणजेच, पदवीच्या पहिल्या वर्षात प्रमाणपत्र मिळेल, दुसऱ्या वर्षी पदविका असेल, तर तृतीय वर्षात डिग्री मिळेल.
- जे संशोधनासाठी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात, त्या विद्यार्थ्यांसाठी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम तर जे विद्यार्थी पदवीनंतर नोकरी करू इच्छितात, त्यांच्यासाठी तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल...
- विद्यार्थ्यांना यापुढे एम.फिल. करावे लागणार नाही. म्हणजेच रिसर्च करणाऱ्यांसाठी पदवी अधिक एक वर्षांचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षांची पदवी असेल. यानंतर ते थेट पीएच.डी. करू शकतील.
- विद्यार्थी इतर कोर्स करू शकतील. उच्च शिक्षणामध्ये Higher Education 2035 पर्यंत एकूण सकल पट नोंदणी Gross Enrolment Ratio 2035 पर्यंत ५०% पोहोचवण्याचं उद्दिष्ट...
- दुसरीकडे नवीन शिक्षण धोरणांतर्गत जर एखाद्या विद्यार्थ्याला कोर्सच्या मध्यभागी दुसरा कोर्स करायचा असेल तर तो मर्यादित काळासाठी पहिल्या कोर्समधून ब्रेक घेऊन दुसरा कोर्स करू शकतो...
- उच्च शिक्षणातही Higher Education अनेक सुधारणा केल्या आहेत. सुधारणांमध्ये श्रेणीबद्ध शैक्षणिक Graded academic, प्रशासकीय administrative आणि आर्थिक स्वायत्तता Financial autonomy समाविष्ट आहे... त्याशिवाय ई-कोर्सेस प्रादेशिक भाषांमध्येही सुरू केले जातील. आभासी Virtual लॅब विकसित केल्या जातील.
- राष्ट्रीय शैक्षणिक वैज्ञानिक मंच (NETF) सुरू होईल. देशात ४५ हजार महाविद्यालये असल्याचे स्पष्ट आहे...
- सर्व सरकारी Government, खासगी Private आणि मान्यताप्राप्त संस्थांसाठी Deemed University समान नियम असतील...

» **मल्टीडिसिप्लिनरी अभ्यासक्रम** : एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकता येणार आहेत. यात मेजर आणि मायनर असे विषयांचे विभाजन असेल. आर्थिक किंवा अन्य कारणांमुळे होणारे ड्रॉपआऊट यामुळे कमी होतील. शिवाय ज्यांना एखादा विषय आवडीचा असेल तो विषय त्यांना शिकता येईल...

» **बहुभाषिक शिक्षण** : मुलांना शिकवताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार...

- लॉ आणि मेडिकल शिक्षण वगळता उच्च शिक्षण एका छताखाली येणार...
- शिक्षणातील गुंतवणूक जीडीपीच्या ६% करणार, सध्या हे प्रमाण ४.४३% आहे...
- विद्यार्थ्यांचे प्रगतीपुस्तक बदलणार. शिक्षकांसोबतच विद्यार्थदिखील स्वत:चे मूल्यांकन करणार...
- सर्व महाविद्यालयांसाठी एकच सामायिक प्रवेश परीक्षा. एनटीए ही परीक्षा घेणार. मात्र, ही परीक्षा ऐच्छिक असेल...

Pune Edition
Sep 30, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# दहावी जाणार; आता बारावी बोर्डच राहणार

## नवे शैक्षणिक धोरण : शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या ६ टक्क्यांवर जाणार

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन शैक्षणिक धोरण (२०२०) ला नुकतीच मंजुरी दिली असून ३४ वर्षांनंतर शैक्षणिक धोरणात मूलभूत बदल करण्यात आले आहेत. शिक्षणाच्या या नव्या पॅटर्नच्या सविस्तर तरतुदी स्पष्ट झाल्या असून आता बारावीचे एकच बोर्ड राहणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून केली जाणार आहे.

यातील तरतुदींनुसार नर्सरी ते दुसरी पहिला टप्पा, तिसरी ते पाचवी दुसरा टप्पा, तिसरा टप्पा सहावी ते आठवी आणि चौथा टप्पा नववी ते बारावी असे शैक्षणिक टप्पे करताना दहावी बोर्ड रद्द करून बारावी एकच बोर्ड केला आहे. तसेच विधी - वैद्यकीय शिक्षण सोडून सर्व उच्च शिक्षण एकाच छताखाली आणण्यात आले आहे आणि शिक्षणाची गुंतवणूक ४.४३ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे.



नव्या शैक्षणिक धोरणात ५+३+३+४ असे सूत्र अंगिकारताना मातृभाषेला महत्त्व देण्यात आले आहे. प्रगतिपुस्तकही बदलणार असून शिक्षकांसोबत विद्यार्थ्यांचे मूल्यमापनही होणार आहे. तसेच मुलांना शिकविताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषा वापरता येतील. एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकविता येतील. यामध्ये मेजर आणि मायनर असे विभाजन होईल.

विद्यार्थ्यांचे शिक्षणापासून ड्रॉपआऊट (गळती) होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आवडीचा विषय घेऊन पदवी प्राप्त करण्याची मुभा देण्यात आली आहे. देशात ४५ हजार महाविद्यालयांमध्ये ई-कोर्सेस आणि व्हर्च्युअल लॅब आयोजित करण्यात येतील. हे सर्व शिक्षण प्रादेशिक भाषांमध्ये असेल. संशोधन आणि उच्च शिक्षण यासाठी पदवीनंतरचा चार वर्षांचा अभ्यासक्रम असणार आहे. यामध्ये पहिल्या वर्षी प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षी पदविका आणि तिसऱ्या वर्षी डिग्री मिळणार आहे. या शिक्षणामध्ये पाचवीपर्यंत केवळ स्थानिक आणि मातृभाषा राहील. तसेच राष्ट्रीय भाषाही शिकविली जाईल. तर उर्वरित इंग्रजी हा एकच विषय मर्यादित म्हणून शिकविला जाईल. शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यामध्ये नर्सरीच्या मुलाचे वय चार वर्षे, ज्युनियर केजी पाच वर्षे, सीनियर केजी सहा वर्षे, पहिली सात वर्षे आणि दुसरी आठ वर्षे असा पहिला टप्पा असेल. दुसरा टप्पा तिसरी ते पाचवी (९ ते ११ वयोगट), तिसरा टप्पा सहावी ते आठवी (१२ ते १४ वर्षे वयोगट), तर चौथा टप्पा नववी ते बारावी (१५ ते १८ वर्षे वयोगट) असा राहील. या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये प्रामुख्याने सर्व शाळांचे स्ट्रक्चर बदलले जाणार आहे.

सद्य:स्थितीत प्राथमिक शाळांकडे पहिली ते चौथी असे वर्ग आहेत. यामध्ये पाचवीचा वर्ग वाढविला जाणार आहे. माध्यमिक विभागात नववी ते बारावी असा विभाग केल्याने आठवीचा वर्ग प्राथमिक शाळांकडे जाणार आहे. त्यामुळे यापुढील शिक्षण क्षेत्रात मोठे बदल होणार आहेत.

Pune Edition
Sep 30, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# UGC puts out fresh research guidelines

**Document on good academic practices outlines need to be ethical, transparent in scholarly works**

Sukhada.Khandge @timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

The University Grants Commission (UGC), the body that regulates higher education in the country, on Tuesday released a guidance document on good academic research practices, which seeks to guide research scholars associated with various universities and research centres on ethical research practices.

The commission mandates higher education institutes to form an Office of Research Integrity (ORI) to implement the necessary guidelines at institutional levels.

As part of the set protocols, instructions should be mandatorily laid out on research integrity, ethical behaviour and good research practices. Materials outlined can also include matters of local context, says the document.

Talking about the developments, Bhushan Patwardhan, vice chairman, UGC, shared, “The unique and exhaustive document aims to guide scholars on good practices, integrity and ethics in academic research. It covers all the key stages of a research cycle to generate awareness, promote academic honesty and a transparent culture in academia.”

Right from how to avoid plagiarism in projects to getting papers published in journals, the detailed pointers will help researchers in a holistic way, feel the propagators.

While introducing the guidelines, DP Singh, chairman, UGC, said, “Scholars need to focus on the quality of work while publishing papers in noted journals. This is essential in raising the benchmarks of research conducted by institutes and individuals in the country.”

Welcoming the directives, higher educational establishments from the city have hailed the importance of such a detailed research guideline.

Parag Kalkar, dean, commerce and management faculty, Savitribai Phule Pune University (SPPU), added, “Since the papers published by scholars in journal directly affect their promotions, such a guideline will help assess and keep a tab on the quality of work produced. At the end of the day, any kind of academic research should add value to human life and be beneficial for the society at large.”



UGC chairman DP Singh introduced the guidelines digitally on Tuesday

Pune Mirror: 30.9.2020

# बोगस संशोधनांना आता बसेल चाप

## 'यूजीसी'च्या नव्या मार्गदर्शक सूचना

मुंबई : संशोधनाचा खालावणारा दर्जा, बोगस प्रबंध आदींना आता चाप बसणार आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एक मार्गदर्शिका तयार केली आहे. यानुसार विद्यापीठांमध्ये, तसेच संशोधन संस्थांमध्ये यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायमस्वरूपी कक्ष उभारण्याची सूचना करण्यात आली आहे.

देशात अधिकाधिक संशोधन व्हावे या उद्देशाने विविध योजना आणल्या आहेत. मात्र, या योजनांचा लाभ घेताना संशोधनाचा दर्जा खालावत असल्याचेही समोर आले आहे. या संशोधनाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी व त्यावर करडी नजर ठेवण्याच्या उद्देशाने कोणत्या निकषांची पूर्तता झालीच पाहिजे, याची मार्गदर्शिका 'यूजीसी'ने तयार केली आहे. ही पुस्तिका तयार करताना 'इम्पॅक्ट फॅक्टर' या संकल्पनेची जनक असलेल्या 'क्लॅरी वॅट' या संस्थेनेही सहकार्य केले आहे. 'यूजीसी'चे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, आनंद देसाई, अनामिका चौरासिया, सुबश्री नाग, राकेश भटनागर यांनी ही मार्गदर्शिका तयार केली आहे.



**देशातील संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी ही मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकचा समावेश पीएच. डी.च्या अभ्यासक्रमात करण्यात येणार आहे. ही मार्गदर्शिका केवळ भारतासाठीच नव्हे; तर जगातील प्रत्येक विद्यार्थ्याला उपयोगी ठरेल.**

– डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, 'यूजीसी'

Maharashtra times: 30.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Education

# 'अनुत्तीर्ण' होणार का 'अवतीर्ण'?

## 'परीक्षा रद्द'साठी अर्ज भरणारे विद्यार्थी आता मात्र परीक्षेआधी गायब

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @harshdudhe_MT

**'एमसीक्यू'ने परीक्षा होणार का?**

अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या १५ हजार विद्यार्थ्यांनी कोणताही पर्याय निवडले नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना आता विद्यापीठाकडून परीक्षा केंद्र दिले जाणार आहे. यापूर्वी या विद्यार्थ्यांना जवळचे परीक्षा केंद्र निवडण्याची सुविधा होती. मात्र, त्याचा फायदा या विद्यार्थ्यांनी घेतला नाही. आता विद्यापीठाने दिलेल्या परीक्षा केंद्रांवर विद्यार्थी परीक्षा देणार, की 'एमसीक्यू पॅटर्न' निवडणार, हे पाहावे लागेल.




**मटा विशेष**

**पुणे :** राज्य सरकारने पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करून, सरासरी गुणांच्या आधारे पदवी देण्याचा निर्णय घेतल्यावर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सुमारे १२ हजार २०० अनुत्तीर्ण विद्यार्थी खडबडून जागे झाले आणि त्यांनी परीक्षेसाठी अर्ज भरले. मात्र, अंतिम वर्षाची परीक्षा होणार हे समजल्यावर हे विद्यार्थी आता गायब झाले आहेत.

परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध होण्याची प्रक्रिया सुरू झाल्यावरही, या विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी अजूनही ऑनलाइन किंवा ऑफलाइन असा कोणताच पर्याय निवडला नाही. त्यामुळे हे 'सुपर सिनिअर' विद्यार्थी पदवीसाठी सोपी 'एमसीक्यू' पद्धतीची परीक्षा देणार, की अनुपस्थित राहणार हे काही दिवसांत स्पष्ट होईल.

राज्य सरकारने अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करीत, मागील परीक्षांच्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्याचे धोरण अवलंबले. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षण सोडलेल्या १२ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी पदवी मिळण्याच्या आशेने अर्ज भरले होते. या विद्यार्थ्यांत शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर गेलेले २०१४ सालापासूनचे विद्यार्थी असून, सरकारच्या निर्णयाचा फायदा घेण्यासाठी हे विद्यार्थी जागे झाले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयायाच्या निर्णयानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य सरकार आणि विद्यापीठांनी विद्यार्थ्यांच्या सोयीप्रमाणे ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने परीक्षांच्या नियोजनाची तयारी केली आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे एकूण नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी १ लाख ९५ हजार विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने, तर ४४ हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. मात्र, १५ हजार विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत कोणताच पर्याय निवडला नाही. त्यातील १२ हजार २०० विद्यार्थ्यांनी पदवीच्या आशेने अर्ज भरले होते, अशी शक्यता विद्यापीठ प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

दोन दिवसांच्या वाढीव मुदतीत ४००० विद्यार्थ्यांनी ऑफलाइनऐवजी ऑनलाइन पर्याय निवडला. त्यामुळे विद्यापीठाने या विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षेचा पर्याय दिला आहे. येत्या एक-दोन दिवसांत परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर पदवी मिळवण्यासाठी हे विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होतात का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

**परीक्षांचे वेळापत्रक आज जाहीर होणार**

**पुणे :** ऑक्टोबर महिन्यात यूपीएससी, एमपीएससी, नेट, सीईटी प्रवेश परीक्षा; तसेच विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी 'लेखणी बंद' आंदोलन पुकारल्यामुळे परीक्षांचे वेळापत्रक व कामकाज कसे करावे, असा प्रश्न विद्यापीठ प्रशासनापुढे निर्माण झाला आहे. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मंगळवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची रात्री उशिरापर्यंत बैठक सुरू होती.

विद्यापीठाच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू होण्याची अधिक शक्यता आहे. याबाबतचे सविस्तर वेळापत्रक आज, बुधवारी (३० सप्टेंबर) किंवा गुरुवारी, १ ऑक्टोबरला जाहीर होण्याची शक्यता आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत घेऊन, निकाल १० नोव्हेंबरपूर्वी जाहीर करण्यात येणार होता. मात्र, आता १२ ऑक्टोबरपासूनचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

**Maharashtra times: 30.9.2020**

**अंतिम वर्षाच्या परीक्षांमुळे घोळ;** अखेर सुधारित वेळापत्रक जाहीर

# सीईटी परीक्षांच्या तारखांत बदल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च शिक्षण विभागाच्या विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक (सीईटी) २१ सप्टेंबरला जाहीर झाले. परंतु राज्यात विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरु होत असून साधारण ३१ ऑक्टोबपर्यंत असतील. सध्या पुनर्परीक्षार्थींच्या (बॅकलॉग) परीक्षा सुरु आहेत. याच दरम्यान सीईटीच्याही परीक्षा असल्याने गोंधळ निर्माण झाला होता. प्रवेश परीक्षा द्यायची की, अंतिम वर्षाची परीक्षा, अशा पेचात विद्यार्थी असल्याने अखेर सीईटीच्या तारखांत बदल करण्यात आला.

सीईटी तसेच विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या काही तारखा एकाच दिवशी येत असल्याने विद्यार्थ्यांना सीईटीच्या परीक्षांना



मुकावे लागणार होते. यासंदर्भातील तक्रारी विद्यार्थ्यांसह अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ प्राध्यापक संघटनेने संबंधितांकडे केल्या होत्या. त्याची दखल घेण्यात आली.

सीईटीच्या नव्या वेळापत्रकानुसार काही अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. एलएलबी ३ वर्षे अभ्यासक्रमाची सीईटी २ व ३ नोव्हेंबरला विविध सत्रात होईल.

**उच्चशिक्षण विभागाच्या सीईटी परीक्षेचे सुधारित वेळापत्रक**

| अभ्यासक्रम | पूर्वीच्या तारखा | नव्या तारखा |
|---|---|---|
| एमपीएड | ३ ऑक्टोबर (फिल्ड टेस्ट -४ ते ७ ऑक्टोबर) | २९ ऑक्टोबर (फिल्ड टेस्ट - ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर) |
| एमएड | ३ ऑक्टोबर | ५ नोव्हेंबर |
| बीएड/एमएड | १0 ऑक्टोबर | २७ ऑक्टोबर |
| एलएलबी (५ वर्षे) | ११ ऑक्टोबर | ११ ऑक्टोबर |
| बीपीएड | ११ ऑक्टोबर (फिल्ड टेस्ट - १२ ते १६ ऑक्टोबर) | ४ नोव्हेंबर (फिल्ड टेस्ट - ५ ते ८ नोव्हेंबर) |
| बीए/ बीएस्सी बीएड इंटिग्रेटेड | ११ ऑक्टोबर | १८ ऑक्टोबर |
| एम-आर्च सीईटी | ३ ऑक्टोबर | २७ ऑक्टोबर |
| एमएचएमसीटी | ३ ऑक्टोबर | २७ ऑक्टोबर |
| एमसीए | १0 ऑक्टोबर | २८ ऑक्टोबर |
| बी-एचएमसीटी | १0 ऑक्टोबर | १0 ऑक्टोबर |

**Lokmat: 30.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Work of Appreciation

# पुणे विद्यापीठात गुळवेल संशोधन प्रकल्प

## दोन लाख रोपे तयार करणार; आयुष मंत्रालयाकडून निधी प्राप्त



**पुणे, ता. ३ :** 'कोरोना'सह जीर्णज्वर, मधुमेह, काविळीतील ताप, अंगदुखी, मूत्र विकार, विषाणूजन्य रोगासाठी उपायकारक म्हणून गुळवेल वनस्पतीला देश- विदेशातून मोठ्या प्रमाणात मागणी असते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'गुळवेल संशोधन प्रकल्प' सुरू करण्यात आला असून, त्यास केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाकडून निधी प्राप्त झाला आहे.

अमृतासमान मानलेल्या गुळवेल या प्रजातीस संस्कृतमध्ये 'गुडूची' आणि शास्त्रीय भाषेत 'टीनोस्पोरा कॉर्डीफोलिया' असे संबोधले जाते. या वनस्पतीचे खोड व पाने जीर्णज्वर, मधुमेह, काविळीतील ताप, अंगदुखी, मूत्र विकार, विषाणूजन्य रोग, स्वाईन फ्लू, कोरोना यासह इतर विकारात मोठ्या प्रमाणात वापरले जाते. देशांतर्गत तसेच परदेशातून यास मागणी वाढत आहे.

या वनस्पतीची लागवड वाढावी, यासाठी 'जीवनासाठी अमृता' या मिशन अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वनस्पती शास्त्र विभाग येथील डॉ. दिगंबर मोकाट, सहयोगी प्राध्यापक यांना राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालयाकडून या प्रकल्पासाठी निधी प्राप्त झाला आहे.

या प्रकल्पाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्या हस्ते नुकतेच झाले. विद्यापीठाचे वित्त व लेखा विभागाचे प्रमुख अतुल पाटणकर, प्रकल्प प्रमुख डॉ. दिगंबर मोकाट, वनस्पतिशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. अविनाश आडे, आस्थापना विभागाचे प्रमुख आर. व्ही. पाटील, आरोग्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. टिल्लू, वनस्पतिशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक डॉ. के. एन. धुमाळ उपस्थित होते.

या प्रकल्पात गुळवेल या बहुमूल्य औषधी वनस्पतींची दोन लाख रोपे तयार करून दिली जाणार आहेत. या वनस्पतीविषयी समाजात जन-जागृती विविध माध्यमातून केली जाणार आहे. त्याचेही काम पत्रक वाटून सुरू करण्यात आले आहे, असे प्रकल्प प्रमुख डॉ. मोकाट यांनी सांगितले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

**Sakaal: 4.9.2020**

---

**नवराष्ट्र**

**कोविड केअर** महीला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षांचा आरोप

# जम्बो सेंटरबाबत प्रशासनाने फसवणुक केली

प्रतिनिधी@नवराष्ट्र

**पुणे :** शिवाजीनगर येथील जम्बो कोव्हीड सेंटरविषयी महापालिकेतील सत्ताधारी पदाधिकारी आता उघडपणे बोलू लागले आहे. प्रशासनाने फसवणुक केली आहे, वेळ पडली तर त्यांच्या विरोधात भुमिका घेऊ असा इशारा महीला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा ज्योत्स्ना एकबोटे यांनी दिला आहे. पुण्यातील रुग्ण संख्येला अटकाव करण्यासाठी व कोविडग्रस्तांवर उपचार करण्यासाठी पुणे महानगरपालिका व राज्य सरकारच्या विविध यंत्रणांनी शहरात नव्याने जम्बो कोविड केअर सेंटर सुरू केले आहे. या सेंटरविषयी सुरुवातीच्या टप्प्यामध्ये लोकप्रतिनिधींनाही वेगवेगळी माहिती देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात सध्या तशा सुविधा नव्या कोविड केअर सेंटरमध्ये दिसत नाहीत अशी नाराजी व्यक्त करीत एकबोटे यांनी तक्रारी मांडल्या आहेत.



नव्याने उभारलेल्या कोविड केअर सेंटरमध्ये अपुऱ्या सोयीसुविधा, अनुभवी डॉक्टर, नर्सेस व इतर आवश्यक मनुष्यबळ यांची कमतरता दिसून येत आहेत. दुसरीकडे आवश्यकतेपेक्षा जास्त सुरक्षारक्षक दिसून येत आहेत. हे अधिकचे सुरक्षाबळ नेमके कोणाच्या सुरक्षेसाठी आहे, असाही प्रश्न आता उपस्थित होत आहे. डॉक्टर कमी आणि सुरक्षारक्षक जास्त असलेल्या या परिस्थितीमुळे स्थानिक नागरिक माझ्यासारख्या लोकप्रतिनिधींकडे आपली नाराजी तीव्र शब्दांमध्ये मांडत आहेत.

### नागरीकांचा जीव वेठीस धरण्याचे काम प्रशासन करतोय

काही दिवसांपूर्वी उपचाराअभावी दोन नागरीकांचा मृत्यू झाला असतानाही आपले आरोग्यप्रमुख हे माध्यमांना प्रतिक्रिया देताना, आपण कार्यालयात फाईल तपासत असल्याचे सांगत आहेत. आजही महापालिकेचे आरोग्य प्रमुख ऑनफिल्ड कमी आणि कार्यालयातच जास्त दिसून येत आहेत. नागरिकांना आरोग्य सेवा देणारे अधिकारी जर जागेवर बसून असतील, तर सामान्य जनतेच्या आरोग्याची काळजी आपण खाजगी संस्था व रुग्णालयांवर सोडणार आहोत का ?

// कोविड केअर सेंटरमधील रुग्णांच्या डॅश बोर्डच्या या आकडेवारीतही मोठा घोळ झाल्याचे वेळोवेळी दिसून येत आहे. कोविड मदतीबाबतच्या आपल्या संपर्क क्रमांकवर फोन उचलण्यासाठी कोणीही उपलब्ध नसते, फोन उचलल्यास व्यवस्थित माहिती दिली जात नाही.

// याबाबतची तक्रारही माझ्यासारख्या लोकप्रतिनिधीला वेळोवेळी प्रशासनाकडे करावी लागत असेल तर सामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा विचारही करवत नाही. या कोविड केअर सेंटरमध्ये सर्वसामान्य पुणेकर नागरीकांचा जीव वेठीस धरण्याचे काम प्रशासन करत आहे. आपत्कालीन सेवेसाठीच्या १०८ क्रमांकावर उपलब्ध रुग्णवाहिकेतूनच आलेल्या रुग्णाला येथे प्रवेश दिला जातो.

तर मग इतर वाहनाने आलेल्या सर्वसामान्य कोविड रुग्णावरील उपचारांची जबाबदारी हे सेंटर घेणार नाही का? सर्वसामान्य नागरिकांना जर या कोविड केअर सेंटर मध्ये उपचारासाठी दाखल व्हायचे असेल तर कोणत्या एजन्सीच्या मार्फत व्हावे याबाबत नागरिक मला प्रश्न विचारत आहेत. त्याबाबतची योग्य ती माहिती आपले प्रशासन नागरिकांना का देत नाही?माझ्यासारख्या लोकप्रतिनिधीला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करताना चार-चार तास प्रयत्न करावे लागतात तेंव्हा कुठे एखाद्या रुग्णालयात बेड उपलब्ध होते.

Pune Edition
05 September 2020 Page No. 3
epaper.navarashtra.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Work of Appreciation

**नवभारत**

भाजपा नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे प्रशासन

### जंबो अस्पताल में उचित सुविधा उपलब्ध कराएं

नवभारत न्यूज़ नेटवर्क

**पुणे.** पुणे में मरीजों की संख्या को नियंत्रित करने के साथ ही कोविड़ रोगियों के इलाज के लिए मनपा और राज्य सरकार की विभिन्न एजेंसियों ने शहर में नए जंबो कोविड़ केयर सेंटर शुरू किए हैं. शुरुआती चरणों में जनप्रतिनिधियों को केंद्र के बारे में अलग-अलग जानकारी दी गई. लेकिन वास्तव में, इस तरह की सुविधाएं वर्तमान में नए कोविड़ केयर सेंटर में नहीं देखने में आ रही हैं. इस वजह से इस केंद्र में तत्काल उचित सुविधा दें. ऐसी मांग भाजपा नगरसेवक साथ ही महिला एवं बालकल्याण समिति की अध्यक्ष ज्योत्स्ना एकबोटे ने की है.

#### जनप्रतिनिधियों को गलत जानकारी दी

इस बारे में एकबोटे ने कहा कि पिछले कुछ दिनों में मीडिया में जो तस्वीर उभरी है, वह बहुत आशावादी नहीं है. इसलिए, सवाल यह है कि क्या हमारे प्रशासन ने जनप्रतिनिधियों को धोखा दिया है. नवनिर्मित कोविड़ केयर सेंटर में पर्याप्त सुविधाओं, अनुभवी डॉक्टरों, नर्सों और अन्य आवश्यक श्रमशक्ति का अभाव है. दूसरी ओर, वहां आवश्यकता से अधिक सुरक्षा गार्ड हैं. अब सवाल यह है कि यह अतिरिक्त सुरक्षा बल किसकी सुरक्षा के लिए है. कम डॉक्टरों और अधिक सुरक्षा गार्डों के साथ, स्थानीय लोग मेरे पास नाराजगी व्यक्त कर रहे हैं. एकबोटे के अनुसार आज भी, महानगरपालिका के स्वास्थ्य प्रमुख क्षेत्र में कम हैं और कार्यालय में अधिक हैं.

यदि स्वास्थ्य देखभाल प्रदाता जगह पर हैं, तो क्या हम आम जनता की देखभाल को निजी संस्थानों और अस्पतालों में छोड़ देंगे? एकबोटे के अनुसार केयर सेंटर के रोगी डैश बोर्ड के ये आंकड़े भी समय-समय पर एक बड़ी गड़बड़ी प्रतीत होते हैं. कोविड़ की मदद के बारे में आपके संपर्क नंबर पर फोन लेने के लिए कोई उपलब्ध नहीं है. फोन उठाते समय कोई उचित जानकारी नहीं दी गई है. अगर मेरे जैसे जनप्रतिनिधि को समय-समय पर प्रशासन के साथ इस बारे में शिकायत दर्ज करनी पड़ती है.

Pune Edition
05-september-2020 Page No. 4
epaper.enavabharat.com

### सावित्रीच्या लेकींसाठी विद्यापीठाचे नवीन वसतिगृह

#### यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश घेता येणार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थिनींसाठीचे नवीन वसतिगृहाचे काम पूर्ण झाले आहे. या वसतिगृहात विद्यार्थिनींना यंदाच्या शैक्षणिक वर्षात प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठ संकुलात प्रवेश घेणाऱ्या सावित्रींच्या लेकी अर्थात विद्यार्थिनींना नवीन वसतिगृहाची सुविधा प्राप्त होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

तत्कालीन कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी १३ फेब्रुवारी २०१७ मध्ये विद्यापीठात मुलींसाठीच्या नवीन वसतिगृहाचे भूमिपूजन केले होते. त्यासाठी सुमारे ५ कोटींची तरतूद केली आणि हा सर्व निधी 'विद्यापीठ अनुदान आयोगा'कडून प्राप्त झाला होता. मात्र या वसतिगृहाच्या कामास चालढकल केली जात होती. मुलींच्या नवीन वसतिगृहाबाबत विद्यापीठ प्रशासनास अधिसभा सदस्यांनी धारेवर धरले. त्यानंतर वसतिगृहाचे काम हाती घेण्यात आले. सध्या अस्तित्वास असलेल्या विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहाच्या पाठीमागे ही पाच मजली इमारत आहे. यात जवळपास २०० मुलींना राहण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

> मुलींसाठी नव्याने बांधण्यात आलेल्या वसतिगृहाचे काम पूर्ण झाले. यंदाच्या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी मुलींना या वसतिगृहात प्रवेश दिले जातील. विद्यापीठात नव्याने एका वसतिगृहाची भर पडली असून, विद्यार्थिनींना निवासाची चांगली सुविधा उपलब्ध होईल.
>
> **डॉ. प्रफुल्ल पवार,**
> कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Prabhat: 6.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Work of Appreciation

# बाउन्सरचा 'डोस'

## 'जम्बो'तील प्रकार; रुग्णांच्या नातेवाइकांमध्ये दहशत

**पुणे, ता. ६ : डॉक्टरांच्या कमतरतेमुळे 'जम्बो'तील रुग्णांना उपचार मिळेनासे झाले असतानाच, दारात नेमलेल्या बाउन्सरकडून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना अरेरावीचा 'डोस' पाजला जात आहे. तसेच, त्यांच्या अंगावर ते धावून जात आहेत. त्यामुळे येथील 'बाउन्सरराज'बद्दल चिड व्यक्त करण्यात येत आहे.**

सकाळ EXCLUSIVE

गरिबांच्या कैवारीपणाचा आव आणत राज्य सरकारने शंभरहून अधिक कोटी रुपये खर्च करून 'सीओईपी'च्या आवारात जम्बो कोविड केअर सेंटर उभारले. आठशे खाटांच्या क्षमतेच्या या सेंटरमुळे पुण्यातील कोरोना रुग्णांना चांगले उपचार मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. प्रत्यक्षात मात्र उद्घाटनापासूनच ते वादाच्या भोवऱ्यात सापडले. 'जम्बो'चे व्यवस्थापन पाहत असलेल्या खासगी एजन्सीने येथे बाउन्सर नेमल्याने आता नवा वाद उफाळला आहे.

'जम्बो'त डॉक्टरांबरोबरच नर्सचाही तुटवडा आहे. त्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसल्याची वस्तुस्थिती असताना 'जम्बो'च्या दोन्ही दरवाजांत नऊ बाउन्सर खडा पहारा देत आहेत. त्यांच्यामुळे रुग्णांच्या नातेवाइकांत दहशतीचे वातावरण आहे.

रुग्णांच्या चौकशीसह त्यांना जेवण देण्यासाठी येणाऱ्या नातेवाइकांना उद्धट बोलण्यापासून त्यांच्या अंगावर धावून जाण्याइतपत त्यांची मजल जात आहे. लोकांशी नीट बोलण्याच्या सूचना स्वत: विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी व्यवस्थापनाला केल्या आहेत. मात्र, त्यांच्या सूचनेला व्यवस्थापनाने महत्त्व दिले नसल्याचे दिसून येत आहे.

या प्रभागातील नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांनीही बाउन्सर हटवावेत, या मागणीचे पत्र तीन दिवसांपूर्वी महापालिकेला दिले. पण, त्यावरही कोणतीच कार्यवाही झालेली नाही.

### व्यवस्थापन समितीचेही दुर्लक्ष

रुग्णांच्या नातेवाइकांपासून 'जम्बो'तील डॉक्टरांना त्रास होत असल्याने येथे पोलिस नेमण्याचा निर्णय नव्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. या संदर्भात पोलिस आयुक्त के. वेंकटेशम यांच्याशी चर्चा केली आहे. मात्र, रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांसाठी त्रासदायक ठरणारे बाउंसर हलविण्यासंदर्भात या समितीने कोणताही निर्णय घेतलेला नाही.

### पोलिसांची नियुक्ती करा

रुग्णसेवेच्या ठिकाणी बाउन्सर नेमणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. 'जम्बो'त येणारे रुग्ण आजाराने खचलेले आहेत. त्यांच्यावर बाउन्सरच्या माध्यमातून दादागिरी करणे व्यवस्थापनाला शोभते का? अशा प्रतिक्रिया 'जम्बो'च्या आवारात उमटत आहेत. या बाउन्सरनी मारहाण केली, तर दाद कुणाकडे मागायची, असा प्रश्न उपस्थित करतानाच, त्याऐवजी पोलिस नेमावेत, अशी मागणी नातेवाईक करत आहेत.

**#बाउन्सरहटवा**

**जम्बो कोविड केअर सेंटरमध्ये बाउन्सर नेमणे कितपत योग्य आहे? आपले मत आम्हाला कळवा.**

webeditor@esakal.com **Whatsapp : 9130088459**

**Sakaal: 7.9.2020**

# सावित्रीच्या लेकींसाठी पुणे विद्यापीठात नवे होस्टेल

- काम अंतिम टप्प्यात
- दोनशे मुलींची होणार सोय
- अत्याधुनिक सुविधा उपलब्ध

**पुणे, ता. ७ :** तीन वर्षांपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुरू असलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे काम अखेरच्या टप्प्यात आले आहे. अद्ययावत सेवा असलेले हे वसतिगृह दोनशे विद्यार्थिनींना या शैक्षणिक वर्षापासून उपलब्ध होणार आहे.

पुणे विद्यापीठात महाराष्ट्रासह देश-परदेशातून विद्यार्थिनी शिक्षणासाठी येतात. पुण्यात कॉट बेसिस किंवा शेअरिंगमध्ये फ्लॅट घेतला तरी महिन्याला कमीत कमी तीन हजार रुपये खर्च येतो. मात्र विद्यापीठात वर्षाचे शुल्क सहा हजारपेक्षा कमी आहे. आर्थिकदृष्ट्या व सुरक्षेच्या दृष्टीनेही हे वसतिगृह महत्त्वाचे ठरते.

डॉ. वासुदेव गाडे कुलगुरू असताना १३ फेब्रुवारी २०१७ रोजी या वसतिगृहाचे भूमिपूजन झाले होते. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. या वसतिगृहाचे काम संथ गतीने सुरू असल्याने अधिसभेत सदस्यांनी धारेवर धरले होते. त्यानंतर कामाची गती वाढविण्यात आली. अखेर याचे काम पूर्णत्वास आले आहे. सध्या अस्तित्वास असलेल्या मुलींच्या वसतिगृहाच्या पाठीमागे ही चार मजली इमारत आहे. यात जवळपास ५० खोल्या आणि २०० मुलींना राहण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. नोव्हेंबर २०२०पर्यंत ही इमारत विद्यार्थिनींसाठी उपलब्ध होणार आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अंतिम टप्प्यात असलेली वसतिगृहाची इमारत.

### असे आहे वसतिगृह

- ४ मजली इमारत
- १२ खोल्या प्रत्येक मजल्यावर
- २०० मुलींची क्षमता

- प्रत्येक मजल्यावर छोटे किचन आणि कपडे धुण्यासाठी जागा
- एका खोलीत तीन-चार विद्यार्थिनी
- कॉट, लॉकर, टेबल, खुर्चीची व्यवस्था

### सध्याची स्थिती

- ९ मुलींची वसतिगृहे
- १५५० क्षमता

- ९ मुलांची वसतिगृहे
- १७५० क्षमता

"यंदाच्या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी मुलींना या वसतिगृहात प्रवेश दिले जातील. विद्यापीठात विद्यार्थिनींना निवासाची चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे.
- **डॉ. प्रफुल्ल पवार,**
कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"पुणे विद्यापीठात वसतिगृह मिळाले, की उच्चशिक्षण घेण्याची संधी वाढते. काही मुली वसतिगृह मिळत नाही म्हणून प्रवेश रद्द करतात. गेली तीन वर्षे नव्या वसतिगृहाचे काम सुरू होते, ते पूर्ण होत असेल तर आम्हाला नक्कीच फायदा होईल.
- **विद्यार्थिनी,**
एमएस्सी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Sakaal: 8.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Work of Appreciation

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृह

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थिनींसाठीच्या नवीन वसतिगृहाचे काम पूर्ण झाले आहे. या वसतिगृहात विद्यार्थिनींना यंदाच्या शैक्षणिक वर्षात प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठ संकुलात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना नवीन वसतिगृहाची सुविधा प्राप्त होणार आहे.

तत्कालीन कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी १३ फेब्रुवारी २०१७ मध्ये विद्यापीठात मुलींसाठीच्या नवीन वसतिगृहाचे भूमिपूजन केले होते. त्यासाठी सुमारे पाच कोटींची तरतूद केली आणि हा सर्व निधी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झाला होता. मात्र, या वसतिगृहाच्या कामात चालढकल केली जात होती. मुलींच्या नवीन वसतिगृहाबाबत विद्यापीठ प्रशासनास अधिसभा सदस्यांनी धारेवर धरले. त्यानंतर वसतिगृहाचे काम हाती घेण्यात आले. सध्या अस्तित्वास असलेल्या विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहाच्या पाठीमागे ही पाच मजली इमारत आहे. यात जवळपास २०० मुलींना राहण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

"'मुलींसाठी नव्याने बांधण्यात आलेल्या वसतिगृहाचे काम पूर्ण झाले. यंदाच्या शैक्षणिक वर्षी प्रवेशासाठी मुलींच्या वसतिगृहात प्रवेश दिले जातील. विद्यापीठात नव्याने एका वसतिगृहाची भर पडली असून, विद्यार्थिनींना निवासाची चांगली सुविधा उपलब्ध होईल.'

- डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**Saamana: 8.9.2020**

### औषधी 'गुळवेल'चे विद्यापीठात संशोधन

आयुष मंत्रालयाकडून निधी उपलब्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : आयुर्वेदामध्ये महत्त्व असलेल्या गुळवेल या औषधी वनस्पतीचे आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संशोधन करण्यात येणार आहे. 'जीवनासाठी अमृता' या मोहिमेअंतर्गत विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील डॉ. दिगंबर मोकाट यांना या संशोधनासाठी आयुष मंत्रालयाच्या राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाकडून निधी प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्या हस्ते या संशोधन प्रकल्पाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी अतुल पाटणकर, वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. अविनाश आडे, आस्थापना विभागाचे प्रमुख आर. व्ही. पाटील, आरोग्यशास्त्र विभागातील डॉ. गिरीश टिल्लू, डॉ. के. एन. धुमाळ आदी या वेळी उपस्थित होते.

**गुळवेलीचे महत्त्व**

गुळवेलीला संस्कृतमध्ये गुडूची आणि शास्त्रीय भाषेत टीनोस्पोरा कॉर्डीफोलिया म्हटले जाते. या वनस्पतीचे खोड आणि पाने जीर्ण ज्वर, मधुमेह, कावीळीतील ताप, अंगदुखी, मूत्र विकार, विषाणूजन्य रोग, स्वाइन फ्लू अशा आजारांमध्ये वापरली जातात. तसेच करोना विषाणूवरही ही वनस्पती परिणामकारक असल्याचे दिसून आले आहे.

'देश-विदेशात वाढत असलेली मागणी आणि उपयुक्ततेमुळे गुळवेलीच्या संशोधनासह लागवडीची माहिती होणे आवश्यक आहे. या वनस्पतीची दोन लाख रोपे तयार करून दिली जाणार आहेत. तसेच गुळवेलीबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. मोकाट यांनी दिली.

लोकसत्ता Fri, 18 September 2020 https://epaper.loksatta.com/c/550348[illegible]

Monday, September 21, 2020 | 6

### Panel wants PMC's health department to be decentralised

**Demand made for zonal officers for faster response; civic body is in support of proposal which will be taken up in GB**

Prachee.Kulkarni @timesgroup.com

TWEETS @prachee_mirror

In the wake of coronavirus disease (COVID-19), the women and child development committee of Pune Municipal Corporation (PMC) has demanded decentralisation of the health department. The general body will now look at its approval. The administration has voiced support for the proposal as it believes that the implementation will help overcome COVID crisis.

The women and child development committee passed the resolution, citing decentralisation of all departments. The officials believe it has helped in managing the overall situation at zonal and ward levels. The members went on to question why then was the health department decentralised. Now, they want an admission of additional health officers. Every zone, they specified, must have one health officer who is at the level of assistant health chief. They have demanded that all these officers should be responsible for the decision making for the issues faced by that particular zone.

Jyotsna Ekbote, chairman of the women and child development committee, said, "Whenever I used to ask the ward medical officer to implement something, they would send a request to the main office. The decision remained pending for a long time, considering the workload at the central office. In the wake of COVID, quick decision-making has been of utmost importance. Hence, the presence of capable officers, appointed at least at the zonal level, matters. Given the situation, we have asked the authorities to decentralise the department and appoint equally qualified officers."

The resolution, sanctioned by the women and child development committee, is tabled in the general body. Scheduled for next meet, a question regarding its nature has cropped up with many saying the department is already short-staffed. At present, there are almost 750 vacancies in the health department. Out of the 151 doctors needed here, only seven are present.

Moreover, both the heads of departments are on leave. Besides, the general shortage has left the officials struggling. Nonetheless, the administration is optimistic about the move. They claim it will help streamline decisions.

Rubal Agarwal, the additional municipal commissioner, said, "Decentralisation will help in managing the situation in a better manner. The proposal is yet to be approved by the general body. If they get the approval, we will follow up with the state government for the approval of people in these positions."

FILE PHOTO



Jyotsna Ekbote (inset), chairman of the women and child development committee, said that all health department requests would go to the main office, where they would languish due to workload




**Pune Mirror: 21.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Awards and Achievements

### 'आयसीसीआर'वर कुलगुरूंची निवड

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची नवी दिल्ली येथील भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेत (आयसीसीआर) निवड झाली आहे. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. परिषदेच्या सर्वसाधारण सभेवर डॉ. करमळकर यांची निवड तीन वर्षांच्या कालावधीसाठी झाली आहे.

भारताच्या परदेशी सांस्कृतिक संबंधांशी संबंधित धोरणे आणि कार्यक्रम तयार करणे आणि त्यांच्या अंमलबजावणीत भाग घेणे आदि या परिषदेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

डॉ. करमळकर यांची आघारकर संशोधन संस्थेच्या नियामक मंडळाच्या उपाध्यक्षपदीही निवड झाली आहे, तर नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची निवड झाली आहे.

**Maharashtra Times: 4.9.2020**

### 'आयसर', पुणे विद्यापीठाला जागतिक मानांकन

पुणे, ता. ४ : 'टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२१' नुकतेच जाहीर झाले आहे. त्यात बंगळूरमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने जागतिक पातळीवर शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत ३०१-३५० रँक मिळवली आहे. पुण्यातील भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (आयसर) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची रँक ६०१-८०० च्या दरम्यान आहे.

'टाइम्स हायर एज्युकेशन' यांच्या वतीने जगभरातील उच्चशिक्षण संस्थांच्या दर्जाचे मानांकन केले जाते. त्यानुसार पहिल्या १००० विद्यापीठांची नावे जाहीर केली जातात. त्यात प्रामुख्याने अध्यापन (३० टक्के), संशोधन (३० टक्के), ज्ञानप्रसार (२.५ टक्के) आणि आंतरराष्ट्रीय भान (७.५टक्के) असे निकष पाहिले जातात.

**विद्यापीठाचे आत्ताचे रँकिंग सहाशे ते आठशेच्या मध्ये आहे. भविष्यात त्यात सुधारणा करून रँकिंग सहाशेच्या आत येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.**
**- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Sakaal: 5.9.2020**

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२० || ५

### जागतिक नवसंकल्पना क्रमवारीत भारताचे स्थान उंचावले

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ३ - जागतिक नवसंकल्पना क्रमवारीत (ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स २०२०) भारताने जगातील पहिल्या पन्नास देशांत स्थान प्राप्त केले आहे. गेल्या वर्षीच्या क्रमवारीत ५२व्या स्थानी असलेल्या भारताने यंदा ४८वे स्थान प्राप्त केले आहे.

वर्ल्ड इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑर्गनायझेशन, कॉर्नेल विद्यापीठ आणि इनसिड बिझनेस स्कूल यांच्या वतीने ही क्रमवारी जाहीर केली. शिक्षण, पेटंट अशा विविध निकषांवर जगभरातील १३१ देशांच्या कामगिरीचे मूल्यमापन केले. त्यानंतर ही जागतिक क्रमवारी जाहीर केली. क्रमवारीत स्वित्झर्लंडने पहिले स्थान पटकावले आहे. त्यानंतर स्वीडन, अमेरिका, युनायटेड किंग्डम आणि नेदरलँड्स यांचा क्रमांक लागतो.

क्रमवारीत यंदा भारताला ४८वे स्थान मिळाले आहे. मध्य आणि दक्षिण आशिया विभागात भारताने पहिला क्रमांक मिळवला असून, माहिती तंत्रज्ञान सेवा निर्यात, शासकीय ऑनलाइन सेवा, विज्ञान आणि अभियांत्रिकीतील पदवीधर, जागतिक कंपन्यांसह संशोधन आणि विकास अशा विविध १५ निकषांवर भारत पहिल्या स्थानी असल्याचे अहवालातून स्पष्ट होत आहे.

### विद्यापीठाने गतवर्षीचे मानांकन राखले कायम

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जागतिक विद्यापीठाच्या क्रमवारीत पहिल्या सहाशे ते आठशे यादरम्यान स्थान मिळविले आहे. पुणे विद्यापीठाने गतवर्षीचे मानांकन कायम राखले आहे. शैक्षणिक संस्थांचे जागतिक स्तरावर मूल्यांकन करणाऱ्या 'टाइम्स हायर एज्युकेशन' या संस्थेने या वर्षाची जागतिक विद्यापीठाची क्रमवारी जाहीर केली. त्यानुसार पहिल्या एक हजार विद्यापीठांची नावे जाहीर केली जातात. हे मानांकन जगभरात प्रतिष्ठेचे मानले जाते.

'टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड रँकिंग'मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षीचेच रँकिंग कायम ठेवलेले आहे. विद्यापीठातील मोठ्या प्रमाणात संशोधनात्मक काम करणारे प्राध्यापक, प्रशासनातील सहकारी यांच्या सर्वांच्या मेहनतीचेच हे यश आहे.
**- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू

# News Paper Clippings During September 2020

## Section: Awards and Achievements

### 'टाइम्स हायर एज्युकेशन'च्या रँकिंगमध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे स्थान कायम



पुणे : 'टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२१' नुकतेच जाहीर झाले असून, त्यामध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे रँकिंग ६०१-८०० दरम्यान आले आहे. गेल्या वर्षीसुद्धा पुणे विद्यापीठाचे मानांकन ६०१-८०० दरम्यान आले होते. पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षीचे आपले रँकिंग कायम राखले आहे.

'टाइम्स हायर एज्युकेशन' यांच्या वतीने जगभरातील उच्चशिक्षण संस्थांच्या दर्जाचे मानांकन केले जाते. त्यानुसार पहिल्या १००० विद्यापीठांची नावे जाहीर केली जातात. त्यात प्रामुख्याने अध्यापन, संशोधन, ज्ञानप्रसार, आंतरराष्ट्रीय भान असे निकष पाहिले जातात. हे मानांकन जगभरात प्रतिष्ठेचे मानले जाते.

विशेष म्हणजे यावर्षी जून महिन्यात जाहीर झालेल्या क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२१ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रँकिंग ६५१ ते ७०० मध्ये आले आहे, तर नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (NIRF) मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठांच्या यादीत नववे स्थान मिळविले आहे. यामुळे जागतिक स्तरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कामगिरी सातत्याने उंचावत आहे.

"टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड रँकिंगमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्यावर्षीचेच रँकिंग कायम ठेवलेले आहे. विद्यापीठातील मोठ्या प्रमाणात संशोधनात्मक काम करणारे प्राध्यापक, प्रशासनातील सहकारी यांच्या सर्वांच्या मेहनतीचेच हे फळ आहे. विद्यापीठाचे आताचे रँकिंग सहाशे ते आठशेच्या मध्ये आहे. भविष्यात अशीच वाटचाल कायम ठेवत त्यात सुधारणा करून सहाशेच्या आत रँकिंग येण्याच्या दृष्टीने सर्वजण प्रयत्न करूया.

– प्रा. डॉ. नितीन करमळकर
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**Saamana: 5.9.2020**

### विद्यापीठाची क्रमवारी कायम

**'टाइम्स'च्या क्रमवारीत देशात आयआयएस्सी, बेंगळुरू अग्रस्थानी**

म. टा. प्रतिनिधी, पुणे



"विद्यापीठातील मोठ्या प्रमाणात संशोधनात्मक काम करणारे प्राध्यापक, प्रशासनातील सहकारी यांच्या सर्वांच्या मेहनतीचेच हे फळ आहे. विद्यापीठाचे आताचे रँकिंग सहाशे ते आठशेच्यामध्ये आहे. भविष्यात अशीच वाटचाल कायम ठेवून त्यात सुधारणा करून सहाशेच्या आत रँकिंग येण्याच्या दृष्टीने सर्व जण प्रयत्न करू या.

– डॉ. नितीन करमळकर,
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

'टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२१' जाहीर झाले असून, या क्रमवारीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि 'आयसर पुणे'चे रँकिंग ६०१- ८०० मध्ये आले आहे. गेल्या वर्षी सुद्धा पुणे विद्यापीठ याच क्रमवारीत होते. त्यामुळे विद्यापीठाने आपले स्थान राखल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, पहिल्या तीनशेमध्ये एकाही भारतीय विद्यापीठाला स्थान मिळवता आले नसून, क्रमवारीत देशातून आयआयएस्सी, बेंगळुरू अग्रक्रमावर आहे.

शिक्षण, संशोधन, सायटेशन्स, औद्योगिक संबंध, आंतरराष्ट्रीय भान व ओळख अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर ही क्रमवारी जाहीर करण्यात येते. या क्रमवारीत ९३ देशातील पंधराशेपेक्षा अधिक संस्था सहभागी झाल्या होत्या. पहिल्या दहा संस्था अमेरिका आणि ब्रिटनमधील आहेत. पहिल्या क्रमांकावर युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड, दुसऱ्या क्रमांकावर युनिव्हर्सिटी इफ स्टॅनफोर्ड, तर तिसऱ्या क्रमांकावर हॉर्वर्ड युनिव्हर्सिटी आहे.

भारतात प्रामुख्याने आयआयएस्सी, बेंगळुरू; आयआयटी, रोपर; आयआयटी, इंदूर; आयआयएस्सी, पुणे; आयआयटी कोलकता; आयआयटी, गांधीनगर; आयआयटी, हैदराबाद आदींचा सामावेश आहे. सात आयआयटींनी क्रमवारीत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला होता.

पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षीचे आपले स्थान कायम राखले आहे. यंदा जून महिन्यात जाहीर झालेल्या 'क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२१'मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान ६५१ ते ७०० या क्रमवारीत आले आहे; तर 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठांच्या यादीत नववे स्थान मिळवले आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कामगिरी सातत्याने उंचावत आहे.

**Maharashtra Times: 7.9.2020**

### कुलगुरू डॉ. करमळकर यांची भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेवर निवड

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. ७ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची नवी दिल्ली येथील भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेमध्ये (आयसीसीआर) निवड झाली आहे. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही निवड तीन वर्षांसाठी झाली आहे.

भारताच्या परदेशी सांस्कृतिक संबंधांशी संबंधित धोरणे आणि कार्यक्रम तयार करणे आणि त्यांच्या अंमलबजावणीत भाग घेणे, तसेच सांस्कृतिक क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध प्रस्थापित करणे आणि विकसित करणे ही या परिषदेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्याचप्रमाणे डॉ. नितीन करमळकर यांची पुणे येथील आघारकर संशोधन संस्थेच्या नियामक मंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. या नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची निवड झाली आहे, अशी माहिती संस्थेतर्फे देण्यात आली आहे.

**Prabhat: 8.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Contribution of Institutions towards the Society

### विद्यापीठ स्वयंसेवकांच्या माध्यमातून 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' मोहीम

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे (रासेयो) स्वयंसेवक 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम राबवणार आहेत. त्याअंतर्गत स्वयंसेवक विद्यार्थी घरोघरी जाऊन करोनासंदर्भातील सर्वेक्षण करणार असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिली.

करोना संसर्गावर नियंत्रण मिळवण्यासाठीच्या या मोहिमेत मुखपट्टीचा वापर करणे, सतत हात स्वच्छ धुणे, शारीरिक अंतर राखणे या त्रिसूत्रीची जागृती केली जाणार आहे. तसेच स्वयंसेवकांमार्फत घरोघरी सर्वेक्षण होईल. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि परिसंस्थांना त्यांच्या पातळीवर सर्वेक्षणाचा समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्वेक्षणातून विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांची सुरक्षितता याची पाहणी करण्यात येईल. नागरिक आजारी असल्यास त्यांच्या विलगीकरणाची माहिती संकलित केली जाईल. कुटुंबांना सजग करण्यासाठी समाजमाध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येईल.

लोकसत्ता Tue, 29 https:/

# News Paper Clippings During September 2020

## Section: Health

## विद्यापीठात ओपन जिम

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ओपन जिम उभारण्यात आली आहे. परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन यांच्या हस्ते नुकत्याच झालेल्या ऑनलाइन कार्यक्रमात या ओपन जिमचे उद्घाटन करण्यात आले. यात व्यायामासाठीच्या विविध साहित्यांचा समावेश आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, क्रीडा संचालक डॉ. दीपक माने, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, डॉ. संजय चाकणे, डॉ. पराग काळकर, आदी या वेळी उपस्थित होते. स्थानिक विकास क्षेत्र कार्यक्रमाअंतर्गत मुरलीधरन यांनी या ओपन जिमसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे.

लोकसत्ता Thu, 03 https:/

## 'वर्क फ्रॉम होम'मुळे रागाचा पारा चढतोय

### 'टाटा सॉल्ट लाइट'चे सर्वेक्षण

**मुंबई, ता. २० :** कोरोनाच्या साथीमुळे अनेकांना 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीचा स्वीकार करावा लागला आहे. त्यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहे. त्याचाच परिणाम मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर झाला आहे. विशेष म्हणजे आता मानसिक आरोग्यासंदर्भातील रुग्णसंख्येत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. 'टाटा सॉल्ट लाइट'तर्फे केलेल्या सर्वेक्षणात हे स्पष्ट झाले आहे. मुंबईकरांचा राग आणि तणावही वाढल्याचे यामध्ये स्पष्ट झाले आहे.

सुटीच्या दिवशी काम दिले गेले किंवा शुक्रवारी एखाद्या तातडीच्या कामासाठी उशिरापर्यंत काम करण्यास सांगितले, तर खूप राग येईल, कामात चुका होतील किंवा वरिष्ठांशी वाददेखील होतील, असे सर्वेक्षणात सहभागी झालेल्या सुमारे ६० टक्के व्यक्तींनी मान्य केले. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या तीनपैकी दोन व्यक्तींनी असे सांगितले, की त्यांचे वाय-फाय कनेक्शन किंवा इंटरनेट अचानक बंद पडले तर त्यांना राग आणि वैताग येतो. फोन चार्ज होत असताना कोणी तो काढला तर खूप राग येतो, असे ५१ टक्के व्यक्तींनी मान्य केले.



आरोग्यदायी आहार घ्या. तुमच्या दररोजच्या जेवणात सहा धान्यांपासून बनवलेली खिचडी, विविध कडधान्यांपासून बनवलेले धिरडे किंवा घावन, कमी तेल शोषून घेणारे बेसन, लाल तांदळाचे पोहे अशा पारंपरिक भारतीय पदार्थांचा समावेश आवर्जून करा. जीवनशैलीत आरोग्याला लाभदायक ठरतील असे बदल करा.
**- कविता देवगण**, तज्ज्ञ, टाटा न्युट्रिकॉर्नर न्युट्रिशन

### हृदयविकार, मधुमेहाचा धोका

आरोग्याला अपायकारक खाणे, तणाव, बैठे काम यामुळे हृदयविकार, काही प्रकारचे कर्करोग आणि मधुमेह यासारखे आहाराशी संबंधित असंसर्गजन्य आजार होऊ शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार आरोग्याला अपायकारक आहार आणि अपुरे पोषण या जगभरात असंसर्गजन्य आजारांना कारण ठरते.

**Sakaal: 21.9.2020**

लोकमत

## जिम आरोग्य हेल्थ केअरमध्ये समाविष्ट करावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : उत्तम आरोग्य आणि व्यायाम याचा जवळचा संबंध आहे. जिम म्हणजे लक्झरी नव्हे तर ती एक गरज आहे. आरोग्य सुधारणेसाठी जिमकडे महत्त्वाचे घटक म्हणून पाहिले गेले पाहिजे. याकरिता शासनाने जिम आरोग्य हेल्थ केअरमध्ये आणायला हवे. तसेच जिमकडे लोकांनी वळावे यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अनेक चालकांनी कर्ज काढून जिम सुरु केली आहेत. याकरिता बँकेने व्याजदर कमी करावेत. जीएसटी आणि कस्टम ड्युटीमध्ये देखील कपात करावी, अशा मागण्या फिटनेस क्षेत्रामधील तज्ज्ञांकडून मंगळवारी पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आल्या. प्रबोध देवकरे यांनी कस्टम ड्युटी, जीएसटीमध्ये कपात करायला हवी, असे सूचित केले. या वेळी गोल्डस जिमचे निखिल कक्कर, एनीटाइम फिटनेसचे विकास जैन, यूएफसी जिमचे इस्तयाक अन्सारी आणि निट्रोचे प्रबोध देवकरे उपस्थित होते.

उत्तम आरोग्य आणि प्रतिकारशक्ती वाढविण्याकरिता फिटनेसशिवाय पर्याय नाही. त्यामुळे फिटनेसकरिता सकारात्मक वातावरण निर्माण करायला हवे. याकरिता जिम ट्रेनर्सला प्रशिक्षण देण्याची गरज आहे. जनप्रबोधन केल्यास लोक नक्कीच जिमकडे वळतील. **-विकास जैन**

Hello Pune
Page No. 2 Sep 16, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Research

**लोकमत**

### ३३३ जंगलांमधील वृक्षांच्या प्रजाती : सह्याद्रीमधील २५ टक्के प्रदेशनिष्ठ वृक्ष

# पानांच्या रचनेवरुन ४०० वृक्षांची ओळख होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यातील अनेक वृक्षांची ओळख सहजतेने करणे आता सोपे होणार आहे. वृक्षाची पाने कमी उंचीवर आणि वर्षाच्या कोणत्याही वेळी सहज उपलब्ध होऊ शकतात, हेच लक्षात घेत पानांच्या वैशिष्ट्यांवरुन या वृक्षांचे ओळखसूत्र तयार करण्यात आले आहे. वृक्ष प्रजातीच्या ओळखीच्या सूत्रातले हे टप्पे ई-बुकच्या हायपरलिंकमुळे सहज पार करीत वृक्षाच्या नावापर्यंत थेट पोहोचता येणार आहे.

निसर्ग अभ्यासक श्रीकांत इंगळहळीकर यांच्या प्रयत्नांतून हे शक्य झाले आहे. पानांवरुन वृक्षांची ओळख सांगणारे त्यांनी तयार केलेले ई-बुक हा अनोखा प्रयोग आहे. या ई-बुकचे प्रकाशन नुकतेच प्रसिद्ध अभिनेते व सह्याद्री देवराई सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सयाजी शिंदे यांच्या हस्ते पुण्यात झाले.

इंगळहळीकर म्हणाले की, अगदी दक्षिण गुजरात ते उत्तर कर्नाटकपर्यंत पसरलेल्या सह्याद्री डोंगररांगेत चारशे जातींचे वृक्ष सापडतात. दाट जंगलातल्या या दुर्मिळ वृक्षांच्या जातींची ओळख करण्यासाठी कार्ल लिनायस या थोर शास्त्रज्ञाने अठराव्या शतकात फुले-फळे यावरुन त्याची वनस्पती-शास्त्रीय सूत्र ओळख करण्याची पद्धत शोधली, जी आजही वापरली जाते. मात्र वृक्षांची फुले-फळे ही वर्षाच्या ठराविक काळातच असतात याशिवाय अनेकदा ती उंचीमुळे हातात मिळवणे देखील अवघड असते.

या उलट या पुस्तकात सह्याद्रीतल्या ३३३ जंगलांमधील वृक्षांच्या प्रजाती, २४ खारफुटीचे वृक्ष आणि शहरात वाढणारे ४३ वृक्ष अशा एकूण ४०० वृक्ष प्रजातींचा समावेश आहे.


महाधावडा


रानशेवगा


दांडेलीच्या जंगलातील होपिया


ताम्हिणीच्या जंगलातील सागेरिया


दुर्मीळ पोलकी वृक्ष

### १५ वर्षे काम, २२०० 'क्लिक'



- इंगळहळीकर यांनी पंधरा वर्षे काम करुन संकलित केलेली पानांची माहिती या ई-बुकमध्ये आहे. त्यासाठी तीन फिल्ड गाइड आणि इतर वनस्पती संशोधकांची मदत घेतली.
- विविध पानांची सुमारे बावीसशे छायाचित्रे त्यांनी काढले. यातील निवडक ४०० छायाचित्रे पुस्तकात आहेत.

Pune Main
Page No. 2 Sep 09, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2020

## Section: Research

# सजीवांच्या हालचालीचे गूढ उकलले



पुणे, ता. २८ : प्राणी आणि वनस्पती हे दोघेही बहुपेशीय सजीव आहेत. असे असतानाही प्राणी जागा बदलू शकतात, वनस्पती नाही. उत्क्रांतीच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर सजीवांमधील ही पहिली हालचाल कशी झाली, याचे कोडे जलीय सूक्ष्मजीव 'हायड्रा'च्या अभ्यासातून भारतीय शास्त्रज्ञांनी उलगडले आहे.

पुण्यातील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे (आयसर) जीवशास्त्रज्ञ प्रा. संजीव गलांडे आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. शिवप्रसाद पाटील, डॉ. अप्रतिम चॅटर्जी यांनी इस्राईलमधील प्रा. इरिट सागी यांच्या सहकार्याने हे संशोधन केले.

पान ७ वर »

### कसे झाले संशोधन?

- हायड्राच्या उतींची रचना समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी संशोधन सुरू केले.
- ॲटॉमिक फोर्स मायक्रोस्कोपी (एएफएम) या सूक्ष्मदर्शिकेचा वापर.
- उतींचा कडकपणा संपूर्ण शरीरात सारखाच नसल्याचे स्पष्ट झाले.
- हायड्राच्या खांद्याजवळील पेशी उर्वरित भागापेक्षा तीन पट अधिक कडक.
- त्याच्या पाठीतील उतींचा कडकपणा स्प्रिंगसारखा कार्य करतो.

# सजीवांच्या हालचालीचे गूढ उकलले

» पान १ वरून

जर्नल ऑफ एक्सपिरीमेंटल बायोलॉजी या शोधपत्रिकेत हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. उत्क्रांतीच्या सुरवातीच्या टप्प्यात प्राणी आणि वनस्पतींमधला हालचाली संदर्भातला हा फरक अगदी स्पष्ट नव्हता.

> **उतींमधील कडकपणा असमान पद्धतीने वाढत गेल्यामुळे प्राण्यांमध्ये हलण्याच्या क्रियेचा उगम झाला आहे. एक्स्ट्रा सेल्युलर मॅट्रिक्स या प्रथिनामुळे उती एकमेकांना घट्ट चिकटतात, त्यातूनच हा कडकपणा हायड्रामध्ये येतो.**
> - प्रा. संजीव गलांडे, जीवशास्त्रज्ञ, आयसर

### काय आहे हायड्रा?

हायड्रा ताज्या पाण्याच्या तळ्यात किंवा साठ्यामध्ये आढळणारा सूक्ष्मजीव आहे. त्याची लांबी ६ ते १० मिलिमीटर आणि जाडी अर्धा ते एक मिलिमीटर असते. सुक्ष्मदर्शिकेच्या साहाय्याने याला पाहावे लागते. विशेष म्हणजे याचे तुकडे केल्यास तो जिवंत राहतो आणि पुन्हा त्यापासून शरीर तयार करतो. पुन्हा निर्माण होणाऱ्या त्याच्या या गुणधर्मामुळे शास्त्रज्ञांनी त्याची संशोधनासाठी निवड केली.

### संशोधनातून काय सिद्ध झाले?

- उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या टप्प्यात हाडे नसताना सजीवांनी केलेल्या पहिल्या हालचालीचे रहस्य उलगडले.
- पेशींच्या कडकपणातूनच पुढे हाडांचा आणि कठीण स्नायूंचा विकास.
- पेशींमधील कडकपणा फक्त १:३ प्रमाणात असला तरच हायड्रा स्प्रिंगसारख्या कोलांट उड्या मारू शकतो.

Sakaal: 29.9.2020

# News Paper Clippings During September 2020

## Section: Miscellaneous

### सर्वोच्च न्यायालय : तृतीय व चतुर्थ श्रेणींनाही दिलासा

# चुकीने दिलेल्या पैशांची वसुली निवृत्तीनंतर नाही

अजित गोगटे • मुंबई

सरकारी कार्यालयाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही कारणावरून दिलेल्या जादा पैशाची वसुली ते कर्मचारी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर केली जाऊ शकत नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच संबंधित कर्मचारी निवृत्त होण्याच्या वर्षभर आधीही त्याच्याकडून अशा प्रकारची वसुली करणे न्यायालयाने निषिद्ध ठरविले आहे.

एवढेच नव्हे, तृतीय आणि चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांकडून, त्यांना चुकीने दिल्या गेलेल्या पैशांची, केव्हाही व कोणत्याही कारणासाठी वसुली करणे कायद्याला धरून ठरणार नाही, असेही न्यायालयाने जाहीर केला आहे.

सेवेतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयांकडून चुकीने जादा पैसे दिले जाण्याच्या घटना अनेक वेळा घडत असतात. काही वेळा अशी चूक एखाद्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत घडलेली असते किंवा एखाद्या संपूर्ण केडरच्या पगार व भत्त्यांची फेररचना करताना अशी चूक होते. ही चूक बऱ्याच दिवसांनी व काही वेळा तर काही वर्षांनी लक्षात येते. मग चुकीने दिल्या गेलेल्या जादा रकमेची वसुली करण्याची कारवाई सुरु केली जाते.

अशा वसुलीची अनेक प्रकरणे उच्च न्यायालयात दाखल होतात व काही सर्वोच्च न्यायालयापर्यंतही पोहोचतात. त्यांचा निकाल देताना न्यायालय प्रामुख्याने दोन निकषांचा विचार करते. एक म्हणजे, मुळात जादा रक्कम दिली जाण्यास कर्मचारी कारणीभूत आहेत का? म्हणजे कर्मचाऱ्यानेच लबाडी केल्याने किंवा चुकीची माहिती दिल्याने जादा रक्कम दिली गेली का? दोन, जादा रक्कम दिली जाण्याची चूक अनाहूतपणे व प्रामाणिकपणे झालेली असली व त्यात कर्मचाऱ्याचा काही दोष नसला तरी त्या रकमेची वसुली करणे न्यायाचे होईल का?

खंडपीठाने या संबंधीचे निकालपत्र डिसेंबरमध्ये दिलेले असले तरी न्यायमूर्तींच्या स्वाक्षरीनंतर अलीकडेच ते सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

### पाच प्रकारची वसुली निषिद्ध

- न्यायालयाने खालील पाच प्रकारांत मोडणारी वसुली न्यायाच्या दृष्टीने निषिद्ध ठरविली आहे-

1 तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांकडून केली जाणारी वसुली.

2 निवृत्त कर्मचाऱ्यांकडून केली जाणारी वसुली अथवा निवृत्तीच्या वर्षभर आधी केली जाणारी वसुली.

3 सलग पाच वर्षं किंवा त्याहून अधिक काळ चुकीने दिल्या गेलेल्या जादा रकमांची वसुली.

4 कर्मचाऱ्यास चुकीने वरच्या पदाचे काम करण्यास सांगितल्याने त्यामुळे त्याला दिल्या गेलेल्या जादा पैशाची वसुली

5 कार्यालयाचा वसुलीचा अधिकार आणि कर्मचाऱ्याची निरागसता यांचा तौलनिक विचार केला असता जी वसुली कर्मचाऱ्याच्या दृष्टीने अधिक अन्यायाची, कठोर अथवा मनमानीची ठरेल अशी वसुली.



- सर्वोच्च न्यायालयाने आजवर अशा प्रकरणांमध्ये अनेक निकाल दिलेले आहेत. यापैकी प्रत्येक निकाल त्या त्या प्रकरणातील तथ्यानुरुप दिला गेला. असे असले तरी या सर्व निकालांमधून न्यायाच्या दृष्टीने काही सामायिक मुद्दे काढणे गरजेचे होते. पंजाबमधून आलेल्या अशाच शंभरहून अधिक अपिलांवर निकाल देताना न्या. जगदीश सिंग केहार व न्या. अरुण मिश्रा यांच्या खंडपीठाने अलीकडे हेच काम केले.

- भविष्यात न्यायालयांना अशा प्रकरणांचा निकाल करणे सुलभ व्हावे यासाठी खंडपीठाने पूर्वी दिल्या गेलेल्या सर्व संबंधित निकालांचा संगतवार विचार करून प्रकरणाची तथ्ये काहीही असली तरी कोणत्या चार परिस्थितीमध्ये चुकीने दिल्या गेलेल्या पैशांची वसुली कर्मचाऱ्यांकडून करणे कायद्याला धरुन होणार नाही, याचे ढोबळ नियम ठरवून दिले.

## News Paper Clippings During September 2020

### Section: Miscellaneous

# विद्यापीठाला १२५ कोटींची कमाई

## शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील रद्दीची विल्हेवाट



### एका टप्प्यातील लिलाव केलेल्या वस्तू

चारचाकी गाड्या १०, पेपर, रद्दी ५०० टन, लोखंडी वस्तू ६० टन, लाकडी वस्तू ४० टन, इलेक्ट्रिक वस्तू १० टन, ई-वेस्ट १० टन, फ्रिज, कुलर १ टन, तुटलेल्या खुर्चा १० टन, ॲल्युमिनियम १ टन, केबल, वायर १ टन

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. ८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्या नोव्हेंबरपासून हाती घेतलेल्या स्वच्छता मोहिमेत विद्यापीठ आवारातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील धूळखात पडलेले साहित्य संकलित केले. प्रशासकीय पत्रव्यवहाराची शासकीय पद्धत रद्द करीत विद्यापीठ प्रशासनाने संकलित केलेल्या खुर्च्या, संगणक, फर्निचर, गाड्या अशा अनेक वस्तूंची लिलावाद्वारे विक्री करीत त्यातून तब्बल सव्वाकोटी रुपयांची कमाई केली.

पुणे विद्यापीठात जवळपस ५२ शैक्षणिक विभाग आणि प्रशासकीय विभाग आहेत. गेल्या पाच-वर्षांपासून बहुतांश विभागांत तुटलेल्या खुर्च्या, बंद पडलेले संगणक, खराब फर्निचर अस्तावस्त धूळखात पडल्याचे प्रशासनास निदर्शनास आले. एखादी साधी संगणक बदलायचे असल्यास त्यासाठी प्रशासनाकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यानंतर वित्त विभागाकडून मान्यता मिळाल्यानंतर तो प्रश्न मार्गी लागतो. ही सर्व किचकट प्रक्रिया होती. त्यातून विद्यापीठात मोठ्या प्रमाणात अनेक वस्तू पडून होत्या.

नोव्हेंबर महिन्यात विद्यापीठाने डेंग्यू निर्मूलन व स्वच्छता मोहीम हाती घेतले. त्यात ज्या विभागात खराब वस्तू असतील, ती उचलण्यात आले. आवारात ठिकठिकाणी पडलेल्या वस्तू संकलित केल्या. असे सर्व भंगार एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्याचा योग्य भाव मिळण्यासाठी तीन टप्प्यात लिलाव केला. त्यातून साधारणपणे सव्वाकोटी रुपये मिळाले.

> "स्वच्छता मोहिमेच्या कल्पनेतून भंगार वस्तू एकत्रित करण्यात आल्या. पत्रव्यवहाराची शासकीयपद्धत बंद करून जी वस्तू खराब, ती वस्तू संकलित केली. या सर्व भंगार वस्तूंमधून सव्वाकोटी रुपये मिळाले. मात्र, या निमित्ताने किंमतीपेक्षा विद्यापीठ आवारात स्वच्छता राहिली, ही बाब महत्त्वाची आहे.
>
> **- डॉ. प्रफुल्ल पवार,**
> कुलसचिव, पुणे विद्यापीठ

दरम्यान, विद्यापीठाच्या वजन काट्यावरून 'सेटलमेंट' होत असल्याचे निदर्शनास आले. इलेक्ट्रिकऐवजी साधा वजन काटा वापरून वस्तूंचे वजन कमी नोंदवले जात होते. त्याचा फटका विद्यापीठाला बसत होता. अशाप्रकारे सेटलमेंट करणाऱ्या गैरप्रकारावर वेळीच विद्यापीठाने अंकुश घातल्याचे दिसून आले.

**Prabhat: 9.9.2020**

# News Paper Clippings During September 2020

## Section: Miscellaneous



RED CARPET

The garden in front of the main building of Savitribai Phule Pune University presents a pretty picture. Ashish Kale

**The Indian Express: 23.9.2020**

# मराठी 'ळ' हिंदीतही अनिवार्य

म. टा. प्रतिनिधी, पुणे



राजस्थानी, हरयानवी, गढवाली, कुमायुणी, नेमाडी, कन्नड, तेलगू, मल्याळम, तमीळ, मराठी, कोकणी, गुजराती, उडिया अशा १४ भाषांमध्ये 'ळ' आहे. तो हिंदी लेखनात व उच्चारणात कायम राहणे हा संबंधित सर्व भाषांचा विजय आहे.

– प्रकाश निर्मळ, भाषा अभ्यासक

मराठीतील आणि हिंदीच्या उपभाषांमधील शब्दाचा उच्चार हिंदीत करताना किंवा देवनागरीमध्ये लिहिताना 'ळ' हे मुळाक्षर डावलून 'ल'चा वापर आता करता येणार नाही. 'ळ'ला टाळून 'ल'चा वापर केल्यास केंद्र सरकारकडे तक्रार करता येणार आहे. केंद्र सरकारच्या हिंदी विभागाने 'ळ'च्या वापराबाबतचे परिपत्रक रेल्वे, बँकांसह सर्व सरकारी कार्यालयांना पाठविले आहे. यापुढे हिंदीत 'लोणावळा', 'बाळासाहेब' असे शब्द लिहिता येतील. 'ळ'चा 'ल' करणे सूचनांचा भंग करणारे ठरणार आहे.

भाषा अभ्यासक प्रकाश निर्मळ यांनी केंद्र सरकारकडे वर्षभर पाठपुरावा केल्यानंतर या प्रयत्नांना यश मिळाले आहे. हिंदीमध्ये 'ळ'ऐवजी 'ल'चा वापर करणे चुकीचे असल्याचे निर्मळ यांनी पटवून दिले आहे. हिंदीमध्ये 'ळ'चा वापर करण्यात यावा, यासाठी त्यांनी राष्ट्रपती, पंतप्रधान व राज्यपाल कार्यालय; तसेच केंद्रीय गृह मंत्रालयाचा राजभाषा विभाग, उच्च शिक्षण मंत्रालयाचा हिंदी विभाग, प्रसारण मंत्रालय यांना वारंवार पत्र लिहिले. केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल यांना ट्वीट केले. यानंतर हिंदी विभागाने याबाबतचे स्पष्टीकरण दिले आहे.

'या संदर्भातील निर्णय गेल्या वर्षी घेतला असल्याचे दाखवले जात असले, तरी त्याची कोठेही अंमलबजावणी झालेली दिसत नाही. आजही सर्व ठिकाणी 'ळ'चा उच्चार आणि उल्लेख 'ल'च्या वापरातून होतो. उर्दूमध्ये 'ळ' नाही; पण हिंदीच्या उपभाषांमध्ये 'ळ' आहे. 'ळ' अक्षर हिंदीच्या परिवर्धित वर्णावलीत स्वीकृत करण्याचा निर्णय ऐतिहासिक आहे. यापुढे रेल्वे, बँका, तसेच सर्व केंद्र सरकारी कार्यालयांना स्थानिक नावात बदल करता येणार नाही. 'ळ'ऐवजी 'ल' लिहिणे सूचनांचा भंग ठरेल,' असे निर्मळ यांनी 'मटा'ला सांगितले. 'ळ'चा 'ल' केलेला आढळला तर केंद्र सरकारच्या हिंदी आणि राजभाषा विभागाकडे तक्रार करावी,' असे निर्मळ यांनी सांगितले.

**Maharashtra Times: 29.9.2020**

# मराठीतील 'ळ' आता हिंदीतही

## रावेतमधील अभ्यासकाच्या पाठपुराव्याला यश; केंद्राची अनुमती

पितांबर लोहार : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २९ : लोणावळा, खंडाळा, वरळी, बेळगाव, टिळक, बाळासाहेब असे 'ळ'चा समावेश असलेले शब्द हिंदीत 'ल' वापरून लिहिले जातात. त्यांचा उच्चारही लोणावला, खंडाला, वरली, बेलगाव असा केला जातो. आता 'ळ' मूळरूपातच हिंदीतही दिसणार आहे. तसा आदेश केंद्र सरकारच्या हिंदी विभागाने रेल्वे, बँकांसह सर्व सरकारी कार्यालयांना पाठविला आहे. यासाठी रावेतमधील भाषा अभ्यासक प्रकाश निर्मळ गेल्या दोन वर्षांपासून पाठपुरावा करीत होते. अखेर त्यांना यश मिळाले.

हिंदीत 'ळ'चा वापर व उच्चार असताना 'ल' वापरला जातो. तो 'ळ'च वापरावा यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाचा राजभाषा विभाग, उच्च शिक्षण मंत्रालयाचा हिंदी विभाग, प्रसारण मंत्रालय, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रपती व राज्यपाल यांच्यासह विविध भाषांमधील विद्वान आणि विविध राजकीय नेत्यांना वारंवार पत्र लिहून, फोन करून व प्रत्यक्ष भेटीद्वारे निर्मळ यांनी सातत्याने पाठपुरावा केला. विविध लेख व व्याख्यानातून राजभाषा हिंदीत 'ळ' ऐवजी 'ल'चा वापर चुकीचे असल्याचे पुराव्यांसह पटवून दिले.

निर्मळ म्हणाले, "राजभाषा हिंदीच्या वर्णावलीत 'ळ' अक्षर स्वीकृत केले, हा ऐतिहासिक निर्णय आहे. यामुळे रेल्वे, बँका, सर्व सरकारी कार्यालयांना यापुढे 'ळ' युक्त स्थानिक नावांत बदल करता येणार नाही."

### निर्मळ यांचा दावा

संस्कृत, राजस्थानी, हरयानवी, गढवाली, कुमायुणी, नेमाडी, कन्नड, तेलगू, मल्याळम्, तमीळ, मराठी, कोकणी, गुजराथी, ओडिया या १४ भाषांमध्ये 'ळ' आहे. तरीही त्याची उपेक्षा करणे चूक आहे. हिंदी ही उच्चार प्रधान असून, राजभाषा म्हणून सर्व समावेशक असावी. पहाडी लोकांच्या उच्चारणाबाबत नकारात्मक भूमिकेमुळे उर्दूतून 'ळ' व 'ण' आणि खडी बोलीतून 'ळ' नाहीसा झाला. परंतु, अखिल भारतीय हिंदी सर्वसमावेशक भाषा आहे. 'टिळक', 'बाळासाहेब', 'श्रवण बेळगोळ', 'बेळगाव', 'मल्याळम्', 'तमीळ' या भाषांमधील शब्दांचे नामांतर जनभावनेला ठेच पोचवणारे आहे. आता 'ळ'चा हिंदीतील उच्चार हा सर्व प्रादेशिक व राजभाषांचा विजय आहे, असे निर्मळ यांनी सांगितले.

मराठी व हिंदीसह बऱ्याच भाषा देवनागरी लिपीत आहेत आणि या लिपीत 'ळ' आहे. पण, हिंदी भाषकांनी त्याचा वापर टाळला, त्याला अलिप्त ठेवले. प्रकाश निर्मळ यांनी पाठपुरावा करून 'ळ'ला जिवंत ठेवले. अन्यथा, हे मुळाक्षर लुप्त झाले असते.

- डॉ. सदानंद मोरे, ज्येष्ठ साहित्यिक

राजभाषा हिंदीची लिपी देवनागरी आहे. मात्र, लिहिताना व वाचताना तिचा पूर्ण उपयोग केला जात नाही. महाराष्ट्रासह अनेक राज्यांच्या भाषा व संस्कृतमध्येही 'ळ' आहे. त्यामुळे हिंदीतही 'ळ' उच्चारावा व लिहिला जावा, यासाठी केलेला पाठपुरावा कौतुकास्पद आहे.

- विनीता ऐनापुरे, कार्याध्यक्ष, मसाप, पिंपरी-चिंचवड

**Sakaal: 30.9.2020**






## निर्मला मोने यांचे निधन

निर्मला मोने

पुणे : बालवाचकांसाठी विपुल लिखाण करणाऱ्या लेखिका निर्मला मोने (वय ८५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

मुंबईचे चित्रकार मास्तर कृष्णराव केतकर यांच्या त्या ज्येष्ठ कन्या. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी अनेक इंग्रजी पुस्तकांचे मराठी अनुवादही केले आहेत. रेई किमुरा यांच्या 'जॅपनीज मॅग्नोलिया' या वेगळ्या विषयावरच्या पुस्तकाचा अनुवाद मोने यांनी केला. 'सोनेरी चोच आणि जम्मत गोष्टी', 'शेरू, शामू', 'बाहुलीचं घर', 'पिंटू पेलिकन आणि जम्मत गोष्टी', 'गुणकारी आहार', 'कथा चहा-कॉफी-कोको यांची', 'साम्राज्याचा पाडाव' (मिडवेची लढाई) हे अनुवादित साहित्य आदी विविध विषयांवर त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अनेक वर्षे त्या आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावर निवेदिका म्हणूनही कार्यरत होत्या.

**दुःखद बातमी....**

**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे नियामक मंडळाचे माजी उपकार्याध्यक्ष श्री. मुकुंदराव गोडबोले यांचे दुःखद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. श्रीपरमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**

**आपण सर्वजण त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सामील आहोत. ते माझे जवळचे सहकारी होते.**




Image Courtesy: Google Images

# Upcoming Events - October 2020



1. Mahatma Gandhi Jayanti : 2nd October 2020



2.Lal Bahadur Shastri Jayanti :2nd October 2020



3.Dr.A.P.J.Abdul Kalam Jayanti :15th October 2020



4.Display of New Books : 24th October 2020



5.Indira Gandhi Punyatithi va Rashtriya Sankalp Diwas : 31st October 2020



6.Vallabhbhai Patel Jayanti va Rashtriya Ekta Diwas : 31st October 2020



7.Maharshi Valmiki Jayanti (Tithinusar) : 31st October 2020

Image Courtesy: Google Images




*Other than the College Photos, Event Photos, Newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images., PInterest, Freepik.Com.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*